म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. | विभाग पोथी | क्रमांक ५८०० |

पुस्तकाचें नांव अण्णासाहेब खरे
लेखक ( ग्रं. नारायण भास्कर खरे )
ले- न-रा-जोशी
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0019251

# डॉ. ना. भा. उर्फ अण्णासाहेब खरे यांचे चरित्र

लेखक

जगन्नाथ रामचंद्र जोशी

प्रकाशक — १.

सन — १९४३.

पृष्ठे ३२० चे पुढे.

किंमत रु. ४/-



ना. डॉ. खरे यांच्या मातोश्री

REFBK-0019251



ना. डॉ. खरे यांचे पहिले कुटुंब व मामा व मामी



ना. डॉ. खरे यांचे द्वितीय कुटुंब

किंमत ५ रु.

पृष्ठे : ३२०

पुस्तकाचे नाव —

आण्णासाहेब खरे यांचे चरित्र.
(डॉ. ना. भा. खरे).

लेखक

~~[illegible]~~ जगन्नाथ रामचंद्र जोशी.

## श्री. अण्णासाहेब खरे

त्र्यंबकराव उर्फ अण्णासाहेब यांचें बालपणही अत्यंत खडतर अवस्थेंत गेलें. विद्यार्जनाकरतां त्यांना मधुकरी मागावी लागली. मुंबईला मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पंढरपूर व सोलापूर येथें त्यांनीं शिक्षकाची नोकरी केली. पुढें धाकटे बंधु, डॉ. खरे यांना नोकरी लागल्यानंतर ते ऑडिटिंगच्या कोर्सचें शिक्षण घेण्यासाठीं १९०८–९ च्या सुमारास मुंबईस गेले. तो कोर्स संपवून नंतर त्यांनीं स्वतंत्रपणें ऑडिटिंगचा धंदा 'खरे आणि कंपनी' या नांवानें सुरू केला. नामांकित ऑडिटर म्हणून त्यांचा सर्व महाराष्ट्रभर लौकीक आहे. धर्मनिष्ठ, मंत्रशास्त्रवेत्ते व योगविद्येंतील एक मर्मज्ञ, अशी त्यांची ख्याति आहे. 'प्राणशक्तियोग' व 'मंत्रशक्तियोग' नांवाचे मंत्रशास्त्राच्या अद्भुत सामर्थ्यावर प्रकाश पाडणारे अभिनव ग्रंथ त्यांनीं लिहून प्रसिद्ध केले आहेत. त्यामुळें त्यांना 'मंत्रमहार्णव' अशी पदवी मिळाली आहे. याशिवाय, प्राचीन विद्येंतील व्यासंगी व अध्यात्मवादी अशा लोकांत त्यांचा सर्वत्र परिचय असून वरीलसारखीच स्वतःच्या व्यासंगाचीं निदर्शक अशीं आणखीही कांहीं पुस्तकें अण्णासाहेबांनीं लिहिलीं आहेत. त्यांचें जीवन अत्यंत निग्रही, संयमशील आणि परम धार्मिक आहे. गेलीं २५ वर्षें केवळ दुग्धाहार व फलाहार यांचेंच ते सेवन करतात. ते चांगल्यापैकीं कवीही पण आहेत. अण्णासाहेबांना विनायक, केशव, गदाधर आणि महेश्वर असे चार मुलगे आहेत. त्यांपैकीं गदाधरपंत हे एम.बी.बी.एस. असून मुंबईला डॉक्टरीचा व्यवसाय करतात.

### शिक्षणास सुरवात

डॉक्टरसाहेब मुंबईला अण्णासाहेबांकडे असतांना १८९६ सालीं तेथें प्रथमच भयंकर प्लेग झाला. त्यामुळें तेथून खरे बंधूंची पांगापांग झाली. डॉक्टरांचे धाकटे मामा आतां शिवनीहून जबलपूरला बदलून गेले होते. त्यांच्याचकडे डॉक्टरसाहेब आपली मातोश्री व धाकटे बंधु वासुदेवराव यांच्यासह गेले. तेथें गेल्यावर ७-८ महिन्यांनीं हितकारिणी हायस्कूलमधून १८९७ सालीं ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतरचें कॉलेजचें शिक्षण तेथेंच सरकारी कॉलेजांत होऊन १९०२ मध्यें ते बी. ए. झाले. बी. ए. च्या परीक्षेंत ते वरच्या श्रेणींत आल्यामुळें मेडिकल कोर्स घेण्यासाठीं त्यांना सरकारी

९२५९

शिष्यवृत्ति मिळाली. या शिष्यवृत्तीच्या उत्तेजनावरच पुढें ते पंजाबांत लाहोरला सरकारी मेडिकल कॉलेजांत वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठीं दाखल झाले.

आई, मामा व वडील बंधु ही सर्वच वडीलधारी मंडळी जुन्या वळणाची व देवधर्मशील असल्यामुळें आणि त्यांच्याच सान्निध्यांत बालपण गेल्यामुळें बालपणीं डॉक्टरसाहेबांवरही तसलेच संस्कार घडणें स्वाभाविकच होतें. रोज सकाळींच उठून भूपाळ्या, स्तोत्रें, अमरकोश इत्यादि म्हणणें, दुपारीं देवपूजा, नैवेद्य-वैश्वदेव आणि संध्याकाळीं सायंसंध्या, रामरक्षादि स्तोत्रें म्हणणें, हा त्यांचा नित्याचा परिपाठ असे. यामुळें स्वाभाविकच लहानपणापासून त्यांच्या मनावर जुन्या आचाराची छाप पडली होती. १८९९ पर्यंत म्हणजे इंटर होईपर्यंत डॉक्टरसाहेब रोज नियमितपणें देवपूजा करीत.

**स्पृश्यास्पृश्यतेबद्दलचे विचार**

त्याकाळीं स्पर्शास्पर्शाबद्दल तर त्यांचे विचार इतके कडक होते कीं, एके दिवशीं जबलपुरला ते सार्वजनिक नळावर गेले असतां एका शूद्राच्या हातच्या पाण्याचा थेंब त्यांच्या ओंठावर उडाला. तात्काळ डॉक्टरसाहेबांनीं थू: थू: करून व पुन: पुन: आपला ओंठ स्वच्छ धुवून सचैल स्नान केलें. या प्रकारानें आपण अमंगळ झालों ही जाणीव त्यांना बरेच दिवस स्वस्थ बसूं देईना.

अस्पृश्यतानिवारणासंबंधींचे त्यांचे हल्लींचे विचार व आचार पाहिले म्हणजे या दोन काळांत केवढें विलक्षण स्थित्यंतर घडून आलेलें आहे, याची कल्पना येते. त्यावेळीं अस्पृश्याच्या हातचा पाण्याचा एक थेंब अंगावर उडाल्याबरोबर आपण विटाळलों असें समजणारा त्यावेळचा 'नारायण' कोणीकडे आणि आज अ. भा. हरिजन सेवकसंघाचे सभासद या नात्यानें अस्पृश्यांच्या रोटीव्यवहाराला व मंदिरप्रवेशालाही अनुकूल असलेले 'डॉ. खरे' कोणीकडे! कालप्रवाह असा जबरदस्त असतो कीं, त्याच्या वेगांत मनुष्याचें स्थित्यंतर अभावितपणेंही होत जातें. मग निसर्गत:च बंडखोर प्रवृत्तीच्या आणि प्रगतिपथावर गमन करणाऱ्या डॉ. खरे यांच्यासारख्याच्या ठिकाणीं इतकें स्थित्यंतर घडून आलें असल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें!

सन १८९९ मध्यें जी. आय. पी. रेल्वेवर मोठा संप झाला. रेल्वे अधिकाऱ्यांच्या विरुद्ध रेल्वे-कामगारांत पुष्कळ दिवसांपासून सांठलेल्या असंतोषाला या संपाच्या रूपानें अकस्मात वाचा फुटली. कामगार-वर्गास संघटित करून संघशक्तीच्या जोरावर त्यांचीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगणारी ट्रेड युनियन कांग्रेससारखी संस्था त्यावेळीं अस्तित्वांत आलेली नव्हती. रेल्वे अधिकाऱ्यांनीं सरकारच्या मदतीनें शक्य ती दडपशाही गाजवून या संपाचा वीमोड करण्याचा प्रयत्न केला. याच दडपशाहीच्या आगीची झळ डॉ. खरे यांच्या मामास लागून तिच्यांतच त्यांच्या नोकरीची आहुति पडली. त्यामुळें कॉलेजचें शिक्षण चालविणें डॉक्टरसाहेबांना कठीण झालें. त्यांच्या महत्वाकांक्षेस प्रतिबंध घालणारी अशीच खरोखर ही आणीबाणीची वेळ होती. आपत्तीच्या प्रखर ज्वालेनें होरपळून निघाल्याशिवाय मनुष्याच्या ठिकाणचें गुणसुवर्ण चमकूंच शकत नाहीं. पितृविहीन स्थितींत केवळ मामांच्याच आधारावर असलेल्या डॉ. खऱ्यांना मामांची नोकरी जाणें ही मोठी आपत्ति होती, यांत शंका नाहीं. दुसरा एकादा अल्प महत्वाकांक्षी मनुष्य असता तर या आपत्तीनें खचून जाऊन त्यानें तेथेंच शिक्षणास रामराम ठोकला असता. परंतु डॉ. खरे यांची शिक्षणाकांक्षा दुर्दम्य असल्यामुळें, काय वाटेल तें झालें तरी शिक्षण पुरें केल्याशिवाय राहावयाचें नाहीं, असा निश्चय करून स्वावलंबी रीतीनेंच त्यांनीं आपलें शिक्षण पुढें चालविलें. अशा रीतीनें १९०२ सालीं बी. ए. ची परीक्षा तर ते उत्तीर्ण झालेच; पण, तींत त्यांनीं इतकी वरची श्रेणी मिळविली कीं, पुढील डॉक्टरी शिक्षणासाठीं सरकारी शिष्यवृत्तिही त्यांना मिळूं शकली. शिक्षणासंबंधींची त्यांची आकांक्षा ह्या काळापासूनच केवळ आत्मनिष्ठ नव्हती. स्वतः वार लावून व शिकवण्या इत्यादि करून आपलें शिक्षण तर त्यांनीं पूर्ण केलेंच; पण, त्याबरोबरच आपल्या एका सहाध्यायी मित्रालाही त्याचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यास मदत केली. त्यांचा हा सहाध्यायी पुढें याच प्रांतांत इ. ए. सी. च्या हुद्यापर्यंत चढला.

### कॉलेजांतील जीवनक्रम

डॉ. खरे यांची शैक्षणिक आस्था आत्मनिष्ठ नसून व्यापक आहे, याचा

प्रत्यय पुढें जेव्हां ते या प्रांताचे प्रधानमंत्री झाले तेव्हां शिक्षणखातें स्वत:कडे नसतांनाही प्रांताच्या शिक्षणविषयक प्रश्नांना चालना देण्याच्या बाबतींत त्यांनीं जी कळकळ दाखविली तिच्यावरून उत्तम रीतीनें आला. स्वकष्टार्जित विद्यार्जनाचा डॉ. खरे यांचा हा काळ अनेक दृष्टींनीं अतिशय महत्वाचा आहे. कारण त्यांच्या जीवनचरित्राची पुष्कळशी सामुग्री याच काळांत सिद्ध झालेली आहे. मातृभाषा म्हणून मराठी, वैदिक घराण्यांत जन्म म्हणून संस्कृत, हिंदी प्रदेशांत शिक्षणासाठीं वास्तव्य म्हणून हिंदी, हिंदुस्थानी आणि विद्यापीठाची राजभाषा म्हणून इंग्रजी या सर्व भाषांवरील प्रभुत्व त्यांनीं याच काळांत संपादन केलें. निष्ठावंत व महत्वाकांक्षी अशा तरुणाकडे खऱ्या कळकळीच्या पुढाऱ्याचें चटकन लक्ष वेधलें जातें, तसेंच डॉ. खरे यांच्याही बाबतींत झालें. नागपूरचे त्या काळचे प्रसिद्ध सुधारक व नेमस्ताग्रणी रा. ब. वामनराव कोल्हटकर हे जबलपुरास त्यावेळीं डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज होते. त्यांनीं डॉक्टरांना महिन्याकाठीं कांहीं मदत देऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लाविला. बी. ए.च्या पहिल्या वर्षांत असतांना नागपूरचे उमरियाला असलेले असि. सर्जन कृष्णाजी काशिनाथ गोखले यांच्या मुलीशीं त्यांचा प्रथम विवाह झाला. त्यांचें नांव लक्ष्मीबाई. या विवाहानें त्यांच्या शिक्षणांत व्यत्यय न येतां उलट श्वशुरांकडून मदतच मिळाली.

त्यांना खेळण्याचा नाद बराच होता. कॉलेजांत असतांनाही पतंग, भोवरे, दांडपट्टा, फरीगदगा वगैरे बरेच खेळ ते खेळत. प्रसंगी मारामारीही केली व थोडाबहुत आखाडाही पिसला. मर्दानी खेळांची व व्यायामाची त्यांची ही आवड पुढें अधिकारग्रहण केल्यानंतर प्रांताच्या तरुण पिढीच्या विशेष उपयोगी पडली. १९३७ सालीं उमरावती येथील सुप्रसिद्ध हनुमान व्यायाम-प्रसारक-मंडळाच्या वार्षिक समारंभाचें अध्यक्षपद स्वीकारून आणि वर्धा येथील हायस्कुलांत निशाणबाजीच्या शिक्षणास परवानगी देऊन तरुणांच्या मर्दानी गुणांस त्यांनीं बरेंच प्रोत्साहन दिलें.

मामांना पुढें दुसरीकडे नोकरी लागल्यामुळें त्यांना बोर्डिंगांत जावें लागलें. बिलासपुरचे हल्लींचे प्रसिद्ध कांग्रेस कार्यकर्ते पं. कुंजबिहारीलाल

अग्निहोत्री व खांडव्याचे प्रसिद्ध वकील नारायण हरि गद्रे हे त्यावेळीं त्यांचे 'रूम-मेटस्' होते. मामांना विडी ओढण्याची संवय होती. घरांत विडीचें बंडल हमखास असावयाचेंच. त्यांच्या या व्यसनांत सहभागी होण्याला (अर्थात चोरून) डॉक्टरांना फारसा अवधि लागला नाहीं. वयाच्या १५ व्या वर्षीच ते पट्टीचे 'स्मोकर' बनले. हूडपणा व मिस्किलपणा तर त्यांच्या पांचवीलाच पुजलेला होता. कॉलेज-जीवनांतील या बाबतच्या त्यांच्या अनेक आख्यायिका मोठ्या मनोरंजक आहेत. केवळ नमुन्यादाखल कांहीं थोड्या येथें देण्यांत येत आहेत.

कॉलेजमधील इंदूरच्या एका भोळसट विद्यार्थ्याला एकदां डॉक्टरांनीं चांगलेंच बनविलें. डोक्यावर केस ठेवणें त्यावेळीं महा पाप समजत. हा विद्यार्थी उन्हाळ्याच्या किंवा दिपवाळीच्या सुटींत परत इंदूरला जातेवेळीं गुळगुळीत हजामत करी. दुसऱ्याचें तेल, साबण वगैरे वस्तु वापरण्याची त्याला भारी संवय. डॉक्टरांनीं एके दिवशीं दुसऱ्या एका विद्यार्थ्याकडून त्याला तेल म्हणून डोक्यास लावण्यास पिंवळें बूट-पॉलिश देवविलें. त्यानें तें आपल्या डोकीस लावल्यावर 'तूं आपल्या डोकीस बूट-पॉलिश लाविलें' असें त्याला सांगतांच 'हें कसें जाईल?' असें त्यानें डॉक्टरांना विचारलें. तेव्हां 'शेंदूर, कोंबडीचें अंडें व लिंबू खलांत खलून तें तूं डोक्याला लाव म्हणजे तुझ्या डोक्याचें बूट-पॉलिश साफ निघून जाईल' असें डॉक्टरांनीं त्याला सांगितलें. त्या भोळसट प्राण्यानें तसें केलें व तो अक्षरशः मारुतीचा अवतार बनला. या मारुतीरायाची नंतर वर्गांत 'खूब' झाली हें सांगावयास नकोच!

बी. ए. च्या वर्गांत प्रिन्सिपॉल ब्राउनिंग इंग्लिश शिकवीत. ते वर्गांत शिकवीत असतांनाही सिगार ओढीत. 'माझ्या सिगार ओढण्यापासून कोणाला त्रास तर होत नाहीं ना?' असें त्यांनीं एके दिवशीं वर्गांतील विद्यार्थ्यांना विचारलें. डॉक्टर सोडून बाकीच्या सर्व विद्यार्थ्यांनीं 'नाहीं' म्हणून उत्तर दिलें. डॉक्टर मात्र त्यांना म्हणाले, 'सर, तुमचें लेक्चर तर आकर्षक आहेच! पण, तुमच्या सिगारचीं हीं नीलवलयें मला त्याहीपेक्षां

अधिक आकर्षक वाटतात. तीं पाहण्यांत माझें मन रमतें व साहजिकच त्यामुळें आपल्या लेक्चरकडे माझें दुर्लक्ष होतें ही गोष्ट मी लपवूं इच्छीत नाहीं.' त्यांच्या या स्पष्ट बोलण्याचा परिणाम असा झाला कीं, प्रिन्सिपॉल साहेबांनीं पुढें वर्गांत केव्हांहीं सिगार ओढली नाहीं.

**'तूं राजद्रोह फैलावतोस'**

डॉक्टर विडी ओढतात हें त्यांच्या बरोबरच्या इतर विद्यार्थ्यांना माहीत होतें. त्यांनीं आश्चर्यानें डॉक्टरांना विचारलें, 'खरे, तूं स्वतः विडी ओढतोस, तेव्हां तुला प्रिन्सिपॉलच्या सिगार ओढण्यापासून त्रास कसा होतो?' डॉक्टर उत्तरले, "तें कांहीं असो. माझ्या तशा सांगण्यानें प्रिन्सिपॉलनें वर्गांत सिगार ओढणें बंद केल्यामुळें मी क्लासची 'डिग्निटी' तर कायम राखली ना?" मात्र, या स्पष्टोक्तीचा परिणाम पुढें त्यांना भोंवल्याशिवाय राहिला नाहीं. प्रिन्सिपॉलला ते अप्रिय झाले. इतरांपेक्षां त्यांना कमी मार्क मिळूं लागले. प्रिन्सिपॉलनें विद्यार्थ्यांना एके दिवशीं 'ब्रिटिश राजवटीनें हिंदुस्थानला झालेले फायदे व तोटे' या विषयावर निबंध लिहिण्यास सांगितला. सर्व मुलांनीं आपापल्या निबंधांतून ब्रिटिश राजवटीचे खूब गोडवे गायिले. तारायंत्रें, आगगाड्या, टेलिफोन वगैरे ब्रिटिश राजवटीची आम्हांला अमोल देणगी आहे, असा त्यांनीं आपल्या निबंधांतून ब्रिटीश राजवटीबद्दलचा निर्वाळा दिला. डॉक्टरांनीं मात्र याच्या अगदीं उलट प्रकार आपल्या निबंधांतून प्रतिपादिला. ब्रिटिश राज्यापासून हिंदुस्थानला फायदे किती झाले, याची चर्चा न करतां, नुकसान किती झालें याचीच विस्तृत व साधार चर्चा त्यांनीं आपल्या निबंधांतून केली. त्यांच्या निबंधाचें हें अद्वितीय वैशिष्ट्य प्रिन्सिपॉलच्या चटकन लक्षांत आलें. या कोंवळ्या मुलाच्या मनांत येवढे वाईट व क्रांतिकारक विचार कसे आले, या विचारानें ते अस्वस्थ झाले. डॉक्टरसाहेबांना तात्काळ आपल्या खोलींत बोलावून त्यांनीं त्यांना चांगलाच दाट भरला. 'तूं हें कोठें शिकलास?' असें प्रिन्सिपॉलनें डॉक्टरांना दरडावून विचारतांच, 'हें माझें सामान्य ज्ञान आहे, असले विचार कोणाही सुबुद्ध हिंदी विद्यार्थ्याला सहज सुचतील' असें चटदिशीं त्यांनीं प्रिन्सिपॉलला उत्तर दिलें. त्यावर 'तूं राजद्रोह फैलावतोस, तुला पोलिसाच्या

ताब्यांत कां देऊं नये? अशा तऱ्हेचा निबंध लिहिल्याबद्दल पश्चात्तापानें तूं क्षमा मागितली पाहिजेस' असें प्रिन्सिपॉलसाहेब मोठ्या गंभीरतेनें डॉक्टरांना म्हणाले. डॉक्टरसाहेबांनीं त्यांना तत्काळ उत्तर दिलें, 'मी कोणताच अपराध केला नाहीं, तेव्हां मी क्षमा कां मागावी? मला माझ्या लिखाणाबद्दल पश्चात्तापही होत नाहीं. इतकेंच नव्हे तर पुन्हा जर प्रसंग आला तर असेंच मला जें पटतें तें मी अवश्य लिहीन. तुम्ही खुशाल मला पोलिसच्या ताब्यांत द्या.' पण प्रिन्सिपॉलसाहेबांची ही धमकी पोकळ ठरली.

**लाहोरच्या मेडिकल कॉलेजांत**

बी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १९०२ ते १९०७ पर्यंत लाहोरला सरकारी मेडिकल कॉलेजांत डॉक्टरसाहेबांनीं वैद्यकीय शिक्षण घेतलें. तेथें लाहोरचे डॉक्टर सत्यपाल हे त्यांचे वर्गबंधु होते. त्याच वेळीं तेथील फार्मन खिश्चन कॉलेजांत प्रसिद्ध क्रांतिकारक लाला हरदयाळ हे आर्टस्‌चें शिक्षण घेत होते. ज्या लॉजमध्यें डॉक्टर राहत होते, त्यांतील त्यांच्या एका मित्राची लाला हरदयाळशीं दाट मैत्री होती. या मित्राकडे लाला हरदयाळ नेहमीं येत असल्यामुळें डॉक्टरांची त्यांच्याशींही चांगली ओळख झाली होती. डॉक्टरांचा हा रूममेट फार शौकी होता. त्याला तऱ्हेतऱ्हेचे नेक्टॉय, निरनिराळ्या फॅशनचे बूट व इतर विलायती वस्तूंचा मोठा नाद असे. याबद्दल हरदयाळ त्याची नेहमीं टवाळी करीत. ते त्याला म्हणत, 'तूं इतका शौक करतोस हें चांगलें नाहीं. प्रत्येक बाबतींत तूं इंग्रजांचें अनुकरण करतोस, हें तुला शोभतें काय? तूं काय साहेब आहेस? आपण हिंदु आहोंत, याचा तुला विसर पडलासें दिसतें. तुम्हीं साहेबांच्या लाथा दररोज खाताच, आणखी हे त्यांचे बूटही तुला पाहिजेत'?

हरदयाळांचे हे जिव्हारी घाव त्यांच्या मित्राला बरेच लागून त्याच्यांत इष्ट तो फरक नंतर तावडतोब घडून आला.

कॉलेजमध्यें फिजियालॉजी व मटेरिया मेडिका या दोन विषयांचे पहिल्या तिन्ही वर्गांचे वर्ग एकत्र होत असल्यामुळें वर्ग बराच मोठा भरत असे. लेक्चर-थिएटरमध्यें डॉक्टरसाहेब उंच जागेवर म्हणजे जवळ जवळ शेवटच्याच

रांगेंत बसून तेथून खुशाल खोड्या, कुचाळक्या करीत. मटेरिया मेडिका हा विषय जरा नीरस असल्यामुळें अवधानतेनें त्यावरील व्याख्यानें ऐकण्याचा त्यांना कंटाळा येई. लेक्चरहॉलमध्यें नेहमीं चिमण्यांची चिव् चिव् होत असे. कधीं कधीं चिमण्या प्रोफेसरांच्या डोक्यापर्यंतही फडफड करीत यावयाच्या. प्रोफेसरांच्या डोक्याला टक्कल पडून तें गुळगुळीत झालें होतें. या सर्व प्रकारावरून डॉक्टरसाहेबांना एक नामी कल्पना सुचली. त्यांनीं एका चिटोऱ्यावर एक चित्र काढून त्यांत चिमणी प्रोफेसरांच्या डोक्यावर बसण्याचा प्रयत्न करीत आहे, पण तें गुळगुळीत असल्यामुळें त्यावरून त्या चिमणीचे पाय घसरत आहेत, असें त्या चित्रांत दाखविलें आणि चित्राखालीं 'Too slippery' अशीं अक्षरें लिहून त्यांनीं तें चित्र आपल्या जवळच्या एका विद्यार्थ्याला दाखविलें. तें चित्र पुढें एका विद्यार्थ्यापासून दुसऱ्याजवळ प्रवास करीत चाललें. अशा रीतीनें तें एका खट्याळ मुलाच्या हातांत गेलें व त्यानें तें लागलीच प्रोफेसरांना नजर केलें. प्रोफेसर खेळाडू वृत्तीचे असल्यामुळें ते हें चित्र पाहतांच खुदकन हसले व लगेच 'ज्यानें हें चित्र काढलें असेल, त्यानें पुढें यावें' असा खोटाच रागाचा आविर्भाव आणून त्यांनीं विद्यार्थ्यांना हुकूम सोडला. आतां आपली चांगलीच कंबख्ती भरली असें डॉक्टरांना वाटलें. पण, आपण भ्यालों असें न दाखवितां धीटपणें उभे राहून 'चित्र मीं काढलें' असें प्रोफेसरांना त्यांनीं बिनदिक्कत सांगितलें. डॉक्टरांच्या या प्रामाणिकपणाबद्दल प्रोफेसरांना राग न येतां उलट संतोषच वाटला. मात्र, "यापेक्षां तूं जर आपल्या अभ्यासांत अधिक लक्ष घालशील तर आपल्या वेळेचें व पैशाचें तूं चांगलें चीज करशील," अशा सौम्य पण वेंचक आणि बोचक शब्दांत त्यांनीं डॉक्टरांना टोमणा मारला. सुदैवानें डॉक्टरांचें आपल्या अभ्यासाकडे बिलकूल दुर्लक्ष नव्हतें. दर तिमाही परीक्षेंत ते शेंकडा ९८ मार्क मिळवीत.

डॉक्टर ज्यावेळीं लाहोरला शिकत होते त्याकाळीं महाराष्ट्रीयेतर विद्यार्थ्यांत महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांपेक्षां राष्ट्रीय जागृति कमीच दिसून येई. (इंग्रजी) साहेबाशीं वागतांना महाराष्ट्रीयेतर विद्यार्थी आपली वृत्ति जरा नरमच ठेवीत. साहेब पाहिला कीं आपल्या डोक्यावरील छत्री त्यांनीं मिटविलीच!

हा विचित्र प्रकार तेथील महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनींच प्रथम मोडला. हा स्वाभिमान दाखविण्यांत नागपुरचे हल्लीं पुण्यास स्थायिक झालेले ले. कर्नल खंडो गणेश घारपुरे हेच अग्रेसर होते.

## मित्रांना धडा शिकविला

१९०३-४ सालीं लाहोरला प्लेग उद्भवला. डॉक्टरांनीं व ज्यांना डॉक्टर व्हावयाचें आहे अशांनीं प्लेगला भिण्याचें कारण नाहीं, असें त्यावेळींही डॉक्टरसाहेबांचें मत होतें. ते ज्या लॉजमध्यें राहत होते, त्याच्या आसपास प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यामुळें अनारकली भागांतील हा लॉज दुसरीकडे म्हणजे सिव्हिल लाइन्समध्यें हलविण्यांत यावा, असें त्या लॉजमधील विद्यार्थ्यांनीं ठरविलें. या लॉजमध्यें या प्रांतांतले ५-६ विद्यार्थी होते. पैकीं तीन अद्यापि हयात आहेत. प्लेगच्या प्रादुर्भावामुळें या विद्यार्थ्यांनीं दुसरीकडे म्हणजे सिव्हिल लाईन्समध्यें राहावयास जाण्याचा विचार केला. त्यांनीं एक बंगला ठरविलाही. पण, त्या बंगल्यांत नुकतीच एक प्लेग केस झाल्यामुळें हे सर्वजण ज्या दिवशीं त्या बंगल्यांत राहावयास गेले, त्याच दिवशीं पुन्हा अनारकली लॉजमध्यें परत आले. त्याच दिवशीं युक्तप्रांतांत सुटीवर गेलेला त्यांचा एक सहाध्यायी लाहोरला परत आला. प्रवासाच्या दगदगीनें व साधारण पडशाखोकल्यानें त्याला त्या दिवशीं किंचित ताप भरला होता. त्याचा ताप पाहून लॉजमधील इतर सहाध्यायी घाबरले व हा प्लेगनेंच आजारी झाला असें समजून त्याच्या जवळपास फिरकण्यासही ते भिऊं लागले. डॉक्टरसाहेबांनीं मात्र त्या आजारी सहाध्या-याला आपल्या पलंगावर निजवून आपण स्वत: खालीं निजले. त्याच्या खाण्यापिण्याची काळजी वाहिली. इतरांनीं दाखविलेल्या बेफिकीरी वृत्तीबद्दल व त्यांच्या भेकडपणाबद्दल त्यांना मोठा राग आला. या भेकडांना आतां चांगलीच अद्दल घडविली पाहिजे असें मनाशीं ठरवून त्यांनीं त्या आजारी सहाध्यायाला तो प्लेगनेंच आजारी झाला असल्याचा कानमंत्र देऊन आपलें सोंग बेमालूम वठविण्यासाठीं त्याला कांहीं सूचनाही केल्या. त्या आजारी सहाध्यायानेंही आपलें सोंग उत्तम रीतीनें वठविलें. या 'प्लेगोबा' जवळ आतां कोण येतो? भित्रे सहाध्यायी, ज्या खोलींत आजारी सहाध्यायाचा बिछाना होता त्या खोलीच्या मागील

गच्चीवरून दुसऱ्याच एका इसमाच्या घरांत शिरून बाहेर पडत. डॉक्टरांनीं त्यांचा याही बाबतींत पक्का बंदोबस्त करून आजाऱ्याच्या खोलीवांचून दुसरी-कडून जाणें त्यांना अशक्य केलें. तेव्हां तर ते चांगलेच घाबरले.

"तुम्ही डॉक्टर होण्यासाठीं येथें आलां ना ? मग तुम्ही या प्लेगच्या रोग्याला—जो तुमचा सहाध्यायी आहे त्याला—भितां ?" असा डॉक्टरांनीं त्या भित्र्या विद्यार्थ्यांना उपदेशपर सवाल केला. परंतु त्यांच्या उपदेशाचा त्यांच्यावर कांहींएक परिणाम न होतां उलट त्यांची अधिकच गाळण उडाली.

त्यांचा अधिक अंत न पाहतां खरा प्रकार सांगून त्यांना आपण कसें बनविलें, याचा डॉक्टरांनीं त्या भित्र्या सहाध्यायांजवळ उलगडा केला. तेव्हां हा बनवाबनवीचा प्रकार पाहून ते आपल्या मनाशीं फारच खजील झाले.

**एक खरा व नकली तेरा!**

कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाची परीक्षा महत्वाची असे. त्या परीक्षेला पाठविण्यापूर्वीं विद्यार्थ्यांची चांचणीपरीक्षा घेण्यांत येत असे. या चांचणी-परीक्षेंत केमिस्ट्री (रसायनशास्त्र) हा विषय असून सर्व विद्यार्थ्यांनीं या परीक्षेला बसलेंच पाहिजे असा सक्त दंडक होता. परीक्षेच्या वेळीं प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र टेबल व खुर्ची देण्यांत येत असे. हेतू असा कीं, विद्यार्थ्यांनीं एकमेकांची नक्कल करूं नये. बी. ए. च्या वर्गांत केमिस्ट्री घेऊनच डॉक्टर ती परीक्षा उत्तीर्ण झाले असल्यामुळें त्यांना हा विषय कठीण नव्हता. तेव्हां या चांचणी-परीक्षेच्या वेळीं केमिस्ट्री विषयाचा आपला पेपर झटपट लिहून आपल्या टेबलावर ते स्वस्थ बसले. परंतु निरीक्षकाचा डोळा चुकवून एका मुलानें त्यांचा पेपर हळूच उचलून त्याची तंतोतंत नक्कल केली. अशाच रीतीनें पुढें त्यांच्या पेपरची आणखी बारा मुलांनीं नक्कल केली व नंतर त्यांचा पेपर त्यांच्याकडे परत आला. डॉक्टरांना वाटलें, झालें हें चांगलें झालें नाहीं. ते मनांत भ्याले. परंतु निरीक्षकाला झालेला प्रकार सांगण्याचें त्यांना धैर्य झालें नाहीं. शिवाय, बरोबरीच्या विद्यार्थ्यांबद्दल जी एकप्रकारची सहानुभूति असते तिचाही त्यांच्या मनावर पगडा होताच. पुढें लौकरच निकालाचा दिवस उजाडला. सर्व विद्यार्थी कॉलेजमध्यें जमले. निकाल जाहीर करतांना वरील

१३ जण आणि खुद्द डॉक्टरसाहेब अशा चौदा जणांचा निकाल राखून ठेवून बाकीच्या मुलांचा निकाल प्रोफेसरांनीं जाहीर केला. या चौदा जणांना प्रोफेसरांनीं आपल्या खोलींत येऊन भेटण्यास हुकूम केला. तेव्हां ते घाबरले. प्रोफेसरांना भेटण्यापूर्वी त्यांनीं आपापसांत चर्चा करून आपण नक्कल केल्याचें कबूल करूं नये असें ठरविलें. आम्ही सर्व मिळून अभ्यास करीत असल्या-मुळें आमच्या उत्तरांत प्रोफेसरांना साम्य आढळलें असेल, असें एकमुखी उत्तर आपण द्यावें असेंही त्यांनीं ठरविलें. परंतु या गोष्टीला डॉक्टर तयार होईनात. ते त्या विद्यार्थ्यांना म्हणाले, "तुमचें म्हणणें मला पटत नाहीं. प्रोफेसर हुषार आहे. नक्कल कोणी केली हें तो बरोबर ओळखील. खोटें बोलून आपला निभाव लागणार नाहीं. तेव्हां खरा प्रकार त्यांना सांगूनच आपण या आपत्तींतून आपली सुटका करून घ्यावी." परंतु, डॉक्टरांचा हा सल्ला त्या मुलांना पटला नाहीं. आपल्याबरोबर डॉक्टरांनींही खोटें बोलावें अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या या इच्छेला मान देण्याचें डॉक्टरांनीं साफ नाकारलें. ते त्यांना म्हणाले, 'एक तर मीं तुम्हाला नक्कल करूं दिली, तुमचा रिपोर्ट सुद्धां केला नाहीं; वास्तविक मी हें पापच केलें. आतां आणखी खोटें बोलण्याचें दुसरें पाप मीं करावें काय? तें मी कदापि करणार नाहीं. या पायीं मी 'रस्टिकेट' झालों तरी बेहेत्तर."

डॉक्टरांच्या या निश्चयामुळें त्यांच्यांत एकमत झालें नाहीं. पुढें प्रोफेसरांनीं जेव्हां एक एक विद्यार्थ्याला आपल्या खोलींत बोलावून खऱ्या प्रकाराची त्यांच्याजवळ चौकशी केली, तेव्हां डॉक्टर सोडून बाकीच्या तेरा जणांनीं 'आपण नक्कल केली नाहीं' असेंच प्रोफेसरांना सांगितलें. डॉक्टरांनीं आपल्या भेटींत प्रोफेसरांजवळ पुढीलप्रमाणें खुलासा केला. ते प्रोफेसराला म्हणाले, "मी कोणाची नक्कल केली नाहीं. उलट, या तेरा जणांनींच माझी नक्कल केली. त्याबद्दल मी निरीक्षकाकडे रिपोर्ट करावयास हवा होता. पण तो मी केला नाहीं हा माझा दोष मी कबूल करतों. मी रिपोर्ट कां केला नाहीं याचें कारण विद्यार्थ्यांच्या मनांत एकमेकांबद्दल सहानुभूति असते हें तुम्हालाही ज्याअर्थी तुम्हीही एकेकाळीं विद्यार्थी होतां, त्यावरून कळून येईल.

याच भावनेनें मी त्यावेळीं निरीक्षकाकडे रिपोर्ट केला नाहीं. माझा दोष मी कबूल करितों आणि त्याबद्दल मला जी शिक्षा होईल, तीही पण मी आनंदानें भोगावयास तयार आहें."

डॉक्टरांच्या या प्रामाणिकपणाचा प्रोफेसरांवर परिणाम होऊन ते त्यांना म्हणाले, "तुम्हां चौदाजणांपैकीं तूंच एकटा खरें बोललास. तुझ्याबद्दल खरोखर मला आतां सहानुभूति वाटते. तुला शिक्षा व्हावी असें मला आतां वाटत नाहीं व त्याप्रमाणेंच मी प्रिन्सिपॉलला अवश्य शिफारस करीन. इतरांना मात्र शिक्षा झालीच पाहिजे असें मला वाटतें."

डॉक्टरांना सांगितल्याप्रमाणेंच प्रोफेसरांनीं प्रिन्सिपॉलकडे शिफारस केली असावी. त्यावेळीं मेजर लेमॉट, आय्. एम्. एस्., हे प्रिन्सिपॉल होते. एके दिवशीं या चौदाही विद्यार्थ्यांची त्यांच्यापुढें पेशी झाली. या चौदा विद्यार्थ्यांना प्रिन्सिपॉलनें रांगेंत उभें करून पुढीलप्रमाणें दाट भरला. त्यांना ते म्हणाले, "तुम्ही येथें आपल्या आईबापांचे पैसे खर्च करून शिकण्यास आलां आणि असले धंदे करतां? तुमच्या या कृत्यानें तुम्ही आपल्या आईबापांच्या नांवलौकिकाला काळोखी फांसली. तुम्हांला वास्तविक कॉलेज-मधून काढूनच द्यावयास पाहिजे. पण, हा जो एक मुलगा 'खरे' बोलला, त्याला मी कॉलेजमधून काढून देऊं चाहत नाहीं. बरें, त्याला कांहींएक शिक्षा न करतां तुम्हा तेरा जणांनाच मी जर काढून दिलें तर तोही एक प्रकारचा अन्यायच होईल. कारण, सर्वांचा गुन्हा सारखाच आहे. म्हणून मी कोणालाच घालवून देऊं इच्छित नाहीं. तुम्ही या आपत्तींतून वाचलांत हें केवळ ह्या एका मुलाच्या प्रामाणिकपणामुळें वांचलांत. त्याला तुम्ही धन्यवाद द्या. मी तुम्हां सर्वांना आठ दिवसांचा अवधि देतों. तुमची केमिस्ट्री विषयाची पुन्हां परीक्षा होईल, तिला तुम्ही बसा."

याप्रमाणें आठ दिवसांनीं पुन्हां परीक्षा झाली. डॉक्टरांनाही त्या परीक्षेला बसावें लागलेंच. आतां तरी तसा प्रकार होऊं नये म्हणून डॉक्टर-साहेब निरीक्षकाच्या अगदीं नाकासमोर बसण्याला चुकले नाहींत. पण, याही वेळीं कांहीं बिलंदर विद्यार्थ्यांनीं कॉपी केलीच! त्यांतला एक विद्यार्थी

पुढें विलायतेंत जाऊन आय्. एम्. एस्. होऊन आला असून हल्लीं तो रिटायर्ड ले. कर्नल आहे.

**वाताहतं यथा पत्रं वृक्षात् पतति भूतले ।**

कॉलेजला जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर हे तीन महिने सुटी असे. या सुटींत डॉक्टरसाहेब सोलापुरास आपल्या वडील बंधूंकडे जात. या अवधींत तेथें सुद्धां ते स्वस्थ न बसतां शिकवण्या किंवा मास्तरकी करून द्रव्यार्जन करीत. सोलापुरास श्री. आप्पासाहेब वारद हे वीरशैव पंजमलिंगी ब्राह्मण धर्मग्रंथमाला काढीत. या ग्रंथमालेसाठीं संस्कृतचें मराठी भाषांतर करणारांची त्यांना गरज होती. मोठमोठे विद्वान शास्त्री भाषांतराचें काम करीत व तें बरोबर आहे किंवा नाहीं हें तपासण्याचें काम डॉक्टरसाहेबांकडे होतें. त्याबद्दल त्यांना महिन्याकाठीं ७०-८० रुपये मिळत. हें काम करीत असतां एके दिवशीं पोथीचें पान टेबलावरून उडून खालीं पडलें. त्यावर एका शास्त्रीबुवांनीं 'पुस्तकस्यतु तत् पत्रं पपात धरणीतले।' असा संस्कृतांतून श्लोकार्ध करून डॉक्टरसाहेबांस त्याची समस्यापूर्ति करण्यास सांगितलें. डॉक्टरांनीं लगेच 'वाताहतं यथा पत्रं वृक्षात् पतति भूतले॥' अशी समस्यापूर्ति केली. यावर शास्त्रीबुवा आश्चर्यचकित होऊन 'अरे वा, इतक्या त्वरित तुम्ही माझ्या श्लोकाची समस्यापूर्ति केलीत?' असें डॉक्टरांना म्हणाले.

**'इंडियन'ही इंग्रजी लिहितात !**

डॉक्टरसाहेब मेडिकल कॉलेजच्या चौथ्या वर्षाच्या वर्गात असतांना एके दिवशीं 'बेडसाइड लेक्चर्स'चा वर्ग सुरू होता. कॅप्टन सदरलंड हे बेडसाइड लेक्चरर होते. ते एम्. डी., आय्. एम्. एस्. होते. व्याख्यानाच्या वेळीं डॉक्टरांचें जरा दुर्लक्ष होतें. त्यांना लगेच लेक्चरर कॅप्टन सदरलंड यांनीं हटकलें आणि ज्या रोग्याबद्दल कॅप्टन सदरलंड लेक्चर देत होते त्या रोग्याबद्दलची एकूण माहिती व त्याला दिलेल्या औषधांचे गुणधर्म वगैरे माहिती शिक्षा म्हणून डॉक्टरांना घरून लिहून आणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं डॉक्टरांनीं त्या रोग्याची माहिती व त्याला दिलेल्या औषधांचे गुणधर्म लिहून नेऊन ते कॅ. सदरलंड यांना दाखविले. त्या रोग्याला दिलेल्या

औषधांपैकीं एकाचें नांव कालंबा (Calumba) होतें. या औषधाच्या गुणधर्मांचें वर्णन करतांना, 'तें घेतल्यानें क्षुधा प्रज्वलित होते' (When it is taken the appetite is sharpened) असें डॉक्टरांनीं आपल्या वहींत लिहिलें होतें. दुसरे दिवशीं प्रोफेसरांनीं जेव्हां डॉक्टरांची वही तपासली तेव्हां त्यांनीं डॉक्टरांच्या वरील इंग्रजी वाक्याबद्दल त्यांची खूब टर उडविली. ते डॉक्टरांना म्हणाले, 'तुम्हा इंडियन लोकांना इंग्रजी लिहितांच येत नाहीं. 'अपिटाइट' (भूक) ही काय वस्तरा आहे कीं हें औषध घेतल्यानें ती 'शार्पन' म्हणजे तीक्ष्ण होईल? तुझें हें वाक्य चूक आहे.' यावर डॉक्टरांनीं, 'आपण लिहिलेलें इंग्रजी वाक्य बरोबर असून तो एक वाक्प्रचार (ईडियम) आहे,' असें प्रोफेसरांना सांगितलें. ते प्रोफेसरांना असेंही म्हणाले, "मला हंसण्याचें तुम्हाला प्रयोजन नाहीं. मी इंग्रजी भाषा चांगली जाणत असून शिवाय मी इंग्रजीमधून बी. ए. झालों आहे." परंतु प्रोफेसराला त्यांचें म्हणणें पटलें नाहीं. 'आपली चूक तूं कबूल करण्यांतच शहाणपणा आहे, विनाकारण वितंडवाद घालण्यांत काय अर्थ?' असा त्यांनीं डॉक्टरांना उपदेश केला. परंतु शुद्ध व चांगलें इंग्रजी लिहिण्याबद्दल डॉक्टरांचा कटाक्ष असून त्याबद्दल त्यांना अभिमानही होता. त्यांच्या इंग्रजी वाक्याबद्दल प्रोफेसरांनीं केलेला त्यांचा उपहास त्यांना खपला नाहीं. आपलें इंग्रजी वाक्य चुकलें हा प्रोफेसरांचा अभिप्राय त्यांना बिलकुल पटला नाहीं. कॉलेजमधून घरीं आल्यावर औषधांच्या गुणधर्मासंबंधीं अभ्यासक्रमांत जीं पुस्तकें नेमण्यांत आलीं होतीं तीं चाळण्यास त्यांनीं ताबडतोब सुरुवात केली. कर्मधर्मसंयोगानें त्यांपैकीं एका पुस्तकांत 'कालंबा' औषधाच्या गुणधर्मवर्णनांत त्यांनीं आपल्या वहींत लिहिलेलेंच नेमकें वाक्य त्यांना आढळलें. तें वाक्य त्या पुस्तकांत पाहून त्यांना मनस्वी आनंद झाला. लागलीच त्यांनीं पुस्तकांतील त्या वाक्यावर तांबड्या पेन्सिलीनें खूण केली व दुसरे दिवशीं बेडसाइड-लेक्चर चालू असतांनाच त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांसमोर तांबड्या पेन्सिलीनें खूण केलेलें वाक्य दाखवून प्रोफेसरांना 'ज्या इंग्रजी वाक्याबद्दल मला काल दोष देण्यांत आला तेंच नेमकें वाक्य या क्रमिक पुस्तकांत आहे कीं नाहीं तें पहा' असा सवाल केला.

इतकेंच बोलून डॉक्टर स्वस्थ बसले नाहींत, तर त्यांनीं प्रोफेसराला असेंही विचारलें, ' बरोबर कोण ? तुम्ही कीं मी ? निष्कारण वितंडवाद कोण घालतो ? ' या चक्षुर्वैसत्यापुढें प्रोफेसरांना शेवटीं हारच खावी लागली. मनांत ते अगदीं ओशाळून गेले. या सर्व मुलांसमोर यानें आपली चांगलीच फजिती उडविली याचा त्यांना विषाद वाटूं लागला. मोठ्या विषण्ण मुद्रेनें ते म्हणाले, ' तूं याबद्दल येवढें लावून घेशील असें मला वाटलें नव्हतें.' त्यावर डॉक्टर ताडदिशीं म्हणाले, " मी लावून कसा घेणार नाहीं ? तुम्ही मला काल लागण्यासारखेंच बोललां व तेंही सर्व विद्यार्थ्यांसमोर. "

या सर्व प्रकाराबद्दल प्रोफेसरांनीं डॉक्टरसाहेबांची माफी मागून ते डॉक्टरांना म्हणाले, " तूं माझी चूक दाखविलीस हें बरें केलेंस. पण, हा सर्व प्रकार तूं या सर्व मुलांसमोर केलास हें बरोबर केलें नाहींस. तूं जर मला एकीकडे बोलावून हें सर्व दाखविलें असतेस तर माझी या सर्वांसमक्ष फजिती झाली नसती." यावर डॉक्टर त्यांना म्हणाले, "ज्या कारणासाठीं तुम्ही मला काल सर्वांसमक्ष तसें बोललां त्याच कारणासाठीं मी आज तुम्हांला हें उत्तर या सर्वांसमक्ष देत आहें. आम्हा हिंदी लोकांना इंग्रजी लिहितां येत नाहीं असें काल तुम्ही बेधडक म्हणालां. त्यामुळें असें करणें मला भागच पडलें."

कॉलेजमध्यें असतांना डॉक्टरसाहेब खूब सिगारेट्स ओढीत. एम्. बी. च्या शेवटच्या परीक्षेच्या वेळीं अभ्यासामुळें जाग्रणेंही बरींच होऊं लागलीं. त्यांत आणखी कॉफी आणि सिगारेट्सची भर. एका एका रात्रीं ४०-४० सिगारेट्स डॉक्टरसाहेब त्यावेळीं ओढीत. त्यामुळें त्यांचा घसा अगदीं बसून गेला होता. तोंडी परीक्षेच्या वेळीं ही अडचण आपल्याला चांगलीच नडेल या विचारानें त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. कारण सर्व विषयांत उत्तीर्ण झालेंच पाहिजे असा दंडक होता. त्यांच्या तोंडांतून तर शब्दही बाहेर पडत नव्हता. यामुळें परीक्षकाचा ग्रह वाईट होऊन आपण नापास होऊं अशी त्यांना भीति वाटली. म्हणून परीक्षकाला भेटून त्यांनीं त्याला आपली खरी अडचण सांगितली. ' तुमच्या प्रश्नाचें मी उत्तर देईन, पण माझा आवाज तुम्हीं शांतपणें ऐकून घ्यावा. ' अशी त्यांनीं परीक्षकांना विनंति केली.

सुदैवानें या अखेरच्या परीक्षेंत डॉक्टरसाहेब उत्तम प्रकारें उत्तीर्ण होऊन सबंध युनिव्हर्सिटींत त्यांचा पहिला नंबर आल्यामुळें त्यांना डॉ. रहिमखान सुवर्णपदक व सर्जरींत रौप्यपदक मिळालें. किंबहुना या पदकांच्या रूपानें विद्यार्थी-जीवनांतील त्यांच्या कीर्तिमंदिरावर जणूं काय सुवर्णमय व रौप्यमय असे दोन कळसच चढविले गेले.

## सुंदर विरोधाभास

होतकरू, व्यासंगी बुद्धिमत्ता आणि खेळाडू, खोडकर व मिस्किल स्वभाव, यांचें सहसा एकत्र न आढळणारें असें अजब मिश्रण डॉ. खरे यांच्या स्वभावांत आढळून येतें. पुष्कळदां होतकरू व बुद्धिवान मुलें विद्वान निपजत असलीं तरी त्यांचा व्यासंगी स्वभाव त्यांचें जीवन एककल्ली, कुढें व असहिष्णु बनवितो. याच्या उलट खेळाडू, खोडकर व उमद्या स्वभावाचीं मुलें आपल्या खेळाडूपणांत इतकीं गर्क होतात कीं, विद्यार्थी-जीवन संपवून परीक्षादिकांत तीं उत्तीर्ण होत असलीं तरी प्रगाढ व्यासंगाची झांक त्यांच्या चरित्रांत उमटत नाहीं. परंतु या दोन्हीही रंगाच्या मोठ्या मनोरम छटा डॉ. खरे यांच्या स्वभावांत उमटलेल्या स्पष्ट दिसतात. ह्या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याचें आविष्करण त्यांच्या विद्यार्थीजीवनापासूनच होऊं लागलें होतें. तेव्हां त्यांचा जो बहुरंगी स्वभाव बनला तो अद्यापपर्यंत तसाच कायम आहे.

वरील एकंदर विवेचनावरून वाचकांच्या हें ध्यानांत आलेंच असेल कीं, डॉ. खरे यांनीं आपली विद्या व शास्त्रप्राविण्य स्वकष्टावर, निष्ठेनें व निग्रहानें संपादन केलेलें आहे. 'अथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया प्रापिता विद्या वीर्यवत्तरा भवति।' या शास्त्रवचनाप्रमाणें त्यांनीं प्राप्त केलेली विद्या किती 'वीर्यवत्तरा' म्हणजे प्रभावी झाली आहे, याचें प्रतिबिंब त्यांच्या गृहस्थाश्रमी जीवनांत पदोपदीं उमटलेलें आहे. त्यांचें विद्यासाधन हें केवळ एकांगी म्हणजे पाश्चात्य वैद्यकासारख्या एकाच विषयापुरतें परिमित नसून तें सर्वांगीण आहे. त्यांच्या बहुभाषाप्रभुत्वाचा निर्देश यापूर्वीं आलेलाच आहे. मराठी, संस्कृत, हिंदी व इंग्रजी यांच्या जोडीस पंजाबांत ते लाहोरला असतांना त्यांनीं उर्दूचेंही चांगलें ज्ञान संपादन केलें. आपल्या बी. ए. पर्यंतच्या अभ्यासांत वाङ्मयाभि-

रुचीचा त्यांनीं चांगलाच विकास केला होता. त्यामुळें त्यांच्या लिहिण्याच्या व बोलण्याच्याही भाषेंत अर्थगांभिर्याबरोबरच एक प्रकारचा चपखल असा आवेशांही निर्माण झाला आहे. लहान लहान सुटसुटीत आणि परिणामकारक असे वाक्यप्रयोग हा त्यांच्या भाषेचा विशेष होय. प्रतिपक्षावर आघात करतांना आपल्या लहानशा वाक्यांतही जसा जिव्हारी लागण्यासारखा मर्मभेदकपणा ते उत्पन्न करूं शकतात, तसाच कित्येक प्रसंगीं सहृदय अंतःकरणाच्या ठिकाणीं सुखसंवेदना उत्पन्न करण्याचें कविमनास साजेसें लालित्यही ते निर्माण करूं शकतात. त्यांच्या अंगचा हा वाङ्मयीन गुण त्यांनीं फारसें प्रकट लिखाण केलेलें नसल्यामुळें तितक्या ठळकपणें लोकांच्या दृष्टिसमोर आलेला नाहीं. तथापि, सुमारें पांच वर्षें (१९२६ ते ३० पर्यंत) नरकेसरी अभ्यंकर यांच्या नेतृत्वाखालीं चालविण्यांत आलेल्या 'तरुण भारत' पत्रांतून कधीं संपादक या नात्यानें तर कधीं टोपण नांवावर त्यांनीं लिहिलेले अनेकविध लेख, व याच कालांत मध्यप्रांत कौन्सिलचे सभासद म्हणून त्यांनीं केलेलीं भाषणें, काळजीपूर्वक वाचणाऱ्यांना डॉ. खरे यांच्या ठिकाणचा हा वाङ्मय-गुण चित्तवेधक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. भविष्यकालीं प्रकट झालेल्या त्यांच्या या गुणविशेषांचा याच ठिकाणीं निर्देश करण्याचें कारण असें कीं, त्यांचा खरा आविष्कार विद्यार्थिदशेपासूनच व्हावयास लागला होता हें वाचकांच्या निदर्शनास आणावें. एका विशिष्ट सीमेपर्यंत त्यांच्या या गुणानें त्यांच्या ठिकाणीं विनोदबुद्धीचाही परिपोष केलेला आहे. परंतु हाच गुण त्या विशिष्ट सीमेच्या पलीकडे जातांच त्याचे उपहास, दुराग्रह व अभिनिवेशांधता यांत रूपांतर होणें अनिवार्य असतें व तसें तें डॉ. खरे यांच्या ठिकाणीं कधीं कधीं दृष्टोत्पत्तीस येतें. एवंच, रुक्ष वैद्यकव्यवसाय व ललित वाङ्मयकला, नम्र विनोद व उग्र उपहास, सहकाऱ्यांशीं समरसतेनें वागणें पण प्रसंगविशेषीं आपल्या विशिष्ट मतांचा आग्रह न सोडणें, इत्यादि अनेक परस्परविरुद्ध गुणांचें व गुणविशेषांचें मिश्रण त्यांच्या स्वभावांत विशिष्ट परिस्थितिसापेक्ष अशा विद्यार्थीजीवनानेंच उत्पन्न केलें आहे. आणि म्हणूनच डॉ. खरे हा एक मोठा 'Paradox' आहे असें पुष्कळांना वाटतें.

# सेवाकाण्ड

१९०७ च्या जुलै महिन्यांत पंजाब युनिव्हर्सिटीच्या एम.बी.च्या परीक्षेंत डॉ. खरे यांचा नंबर पहिला आल्यानें साहजिकच सरकारी नोकरीचें फार मोठें दालन त्यांच्यापुढें खुलें झालें होतें. यापुढील त्यांचा सुमारें दहा वर्षांचा जीवनवृत्तांत सेवाकाण्ड या नांवानें ओळखतां येईल. प्राचीन संस्कृत वाङ्मयांत काण्ड हा शब्द प्रकरणवाचक अर्थानें वापरला असला व तोच अर्थ आम्हासही एकपरीनें येथें अभिप्रेत असला, तरी ब्रिटिश राजवटींत त्यावर एक काळाकुट्ट मुलामा चढलेला आहे. उदाहरणार्थ, १९१९ सालचें पंजाबचें हत्याकाण्ड. हा शब्दप्रयोग उच्चारल्याबरोबर आपल्यासमोर अत्याचार, जुल्म, जबरदस्ती इत्यादिकांची प्रणालिका उभी रहते. डॉ. खरे यांच्या यापुढील सुमारें दहा वर्षांच्या जीवनवृत्तांतास सेवाकाण्ड ही संज्ञा देत असतांना त्यांच्या जीवनग्रंथांतील एक प्रकरण हा अर्थ तर आम्हांस अभिप्रेत आहेच; पण, त्याबरोबरच अखंड दहा वर्षे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अरेरावीविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध जी अखंड झुंज त्यांना द्यावी लागली, तिची सकृतदर्शनींच कल्पना यावी म्हणून ह्या कालावधीस सेवाकाण्ड ही संज्ञा आम्ही बुद्धिपुरःसर वापरली आहे.

प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झालेल्या डॉ. खऱ्यांना मध्यप्रांत सरकारनें तावडतोब ऑगष्ट महिन्यांतच सब-डिव्हिजनल मेडिकल ऑफिसरची जागा देऊन वऱ्हाडांत खामगांव येथें त्यांची नेमणूक केली. बुद्धिमान, होतकरू व कर्तबगार हिंदी तरुणांना नोकरीच्या मोहपाशांत बद्ध करून टाकण्याच्या कुटिल ब्रिटिश राजनीतीच्या नित्याच्या प्रथेस अनुसरूनच मध्यप्रांत सरकारचें हें कृत्य होतें. जित प्रदेशांतील लोकांची बुद्धिमत्ता व कर्तबगारी अशा रीतीनें विकत घेऊनच जेत्यांचा साम्राज्यशकट नेहमीं हांकला जात असतो यांत शंका नाहीं. परंतु, असा प्रश्न विचारणें शक्य आहे कीं, डॉ. खरे यांच्या-सारख्या स्वाभिमानी, बंडखोर व स्वतंत्रवृत्तीच्या तरुणानें या नोकरीच्या मायापाशांत त्यावेळीं कां पडावें? या प्रश्नाचें उत्तर असेंच देतां येईल कीं, हा कालप्रवाह आहे! सरकारी नोकरी करूनही अस्सल शंभर नंबरी देशभक्ति

करतां येते, असा आदर्श त्या काळांत न्या. मू. रानड्यांसारख्या थोर विभूतीनें व हिंदी राष्ट्रीय सभेच्या एका संस्थापकानेंच घालून दिलेला होता. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आपण चाललों तर 'नृपति जनपदानां दुर्लभ: कार्यकर्ता' अशी ख्याति आपणांस कमावितां येईल, अशा प्रकारची उमेद त्या काळांतील राष्ट्रीय वृत्तीच्या तरुणांस वाटली असल्यास ती स्वाभाविकच होती. नोकरी अथवा दास्य ही एक जबरदस्त शृंखला आहे आणि तिचीं बंधनें सांभाळूनही देशभक्तीची कांटेरी तारेवरील कसरत करतां येते हें जरी खरें असलें तरी तें सामर्थ्य न्या. मू. रानडे यांच्यासारख्या एकाद्याच थोर विभूतींच्या अंगीं असूं शकतें. त्याहून भिन्न श्रेणीच्या लोकांना सेवाजीवनांतील कांटे पदोपदीं बोंचून रक्तबंबाळ करतात किंवा स्वार्थाच्या आगींत स्वाभिमानाचा संपूर्ण होम करून गुलामगिरीचें जिणें तरी त्यास जगावें लागतें, अथवा ह्या संघर्षांतूनच स्वाभिमानाच्या प्रखर ज्वाला निर्माण होऊन त्या गुलामगिरीचे रज्जू जाळून भस्म करतात.

## पुढील जीवनाची पूर्वतयारी

डॉ. खरे यांनीं आपल्या गृहस्थाश्रमी जीवनाच्या प्रारंभीं जरी सेवा-वृत्तीच्या रूढ व परंपरागत मार्गाचाच अवलंब केला असला, तरी उर्मट, अरेराव, जुलमी व गैरइनसाफी अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर त्यांचे जे प्रतिक्षणीं खटके उडाले व ज्या खटक्यांचें वर्णनच या सेवाकाण्डांत करावयाचें आहे, त्या खटक्यांतून—त्या संघर्षांतून—त्या विषम द्वंद्वांतूनच त्यांच्या खऱ्या व्यक्तिमत्वाचा उदय झाला आहे, हेंही विसरून चालणार नाहीं. 'तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम्' या न्यायानें त्यांच्या मूळच्या स्वाभिमानाच्या स्फुल्लिंगावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं केलेल्या अन्यायांचें व अरेरावीचें इंधन रचलें गेलें नसतें, आणि देशांत सभोंवार लो. टिळकांसारख्या महान पुढाऱ्यानें उठविलेल्या राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रभंजनानें त्याच इंधनाचा अग्नि भडकून उठला नसता तर पुढील प्रखर राष्ट्रीयजीवनाशीं समरस होण्यासारखी मनोवृत्ति त्यांच्या ठिकाणीं तयारच झाली नसती. आणि म्हणूनच 'ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड' या इंग्रजी म्हणीप्रमाणें डॉ. खरे यांची ही

सुमारें दहा वर्षांच्या सरकारी नोकरीची कारकीर्दही भूषणास्पदच झाली असें म्हणावें लागतें. स्वाभिमानास तिलांजलि देऊन व गुलामी मनोवृत्तीशीं समरस होऊन इतर हजारों राजनिष्ठांप्रमाणें डॉ. खरे सरकारी नोकरींतच कायम राहिले असते तर एव्हांना एकाद्या प्रांताच्या आय्. जी. ऑफ सिव्हिल हॉस्पिटल्स किंवा त्याहून वड्या हुद्याच्या जागीं त्यांची खचित बढती झाली असती; आणि सुमारें तीन हजार रुपये पगारावरील पेन्शन खात इतर अनेक गतानुगतिक लोकांप्रमाणें तेही आज सुखाचें व आरामाचें जीवन व्यतीत करीत सुखेनैव बसले असते. शिवाय, परोपकारी स्वभावास अनुसरून आपल्या डॉक्टरी विद्येचा गोरगरीबांस विनामूल्य लाभ ते देत राहिले असते. म्हणजे चार चौघांच्या दृष्टीनें सज्जन व परोपकारी गृहस्थ असा सार्वत्रिक लौकिकही त्यांना प्राप्त झाला असता. परंतु हा गतानुगतिक मार्ग झिडकारून नोकरीचा कांटा पायांत बोचूं लागतांच निर्दयतेनें तो तात्काळ उपटून फेंकण्याची धमक त्यांनीं दाखविली म्हणूनच ते 'आजचे डॉ. खरे' बनले आहेत.

**सन १९०८**

१९०८ साल हें हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय इतिहासांत अत्यंत महत्वाचें गणलें जातें. त्या काळांत लो. टिळकांचा कर्तृत्वरवि ऐन मध्याकाशांत तळपत होता व त्याच्या चंडप्रतापी किरणांनीं होरपळून निघालेली ब्रिटिश नोकरशाही त्राही त्राही करीत होती. ह्या काळांत राष्ट्रीय उद्धाराचा मार्ग चोखाळणाऱ्या लोकांचे दोन प्रमुख गट पडले होते. एक रक्तपाताचा व क्रांतीचा, अथवा हिंदुराष्ट्रपति स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर म्हणत असत त्याप्रमाणें शस्त्राचाराचा, मार्ग अवलंबून आपला देश स्वतंत्र करूं पाहणाऱ्या लोकांचा वर्ग. ह्या वर्गांत समाविष्ट होणाऱ्या तरुणांची संख्या जरी फारच थोडी असली व त्यास आज दहशतवादी (Terrorist) अशी संज्ञा देण्यांत येत असली, तरी त्यावेळीं सामान्य जनता त्यांना प्राय: क्रांतिकारक (Revolutionaries) या नांवानेंच ओळखीत असे. त्यांच्याइतकें धाडस, त्याग व पराक्रम करण्याची जनतेची जरी तयारी नसली व त्यामुळेंच त्यांच्या मार्गाचें अनुसरण करणारे फारच थोडे लोक सामान्य जनतेंतून पुढें येत असले, तरी त्यांच्या देशप्रीतीनें,

निःसीम त्यागवृत्तीनें, कोणत्याही क्षणीं मातृभूमीच्या चरणीं आपलें शिरकमल अर्पण करण्याच्या तयारीनें आणि सर्वत्र भीतीचा आतंक पसरविणाऱ्या, बलाढ्य नोकरशाहीलाही निधड्या छातीनें व बेडर वृत्तीनें आव्हान देऊन तिच्याशीं सतत झुंज खेळत राहण्याचा त्यांच्या लढाऊ मनोवृत्तीनें, त्यांच्याविषयीं बहुजनसमाजाच्या मनांत एक प्रकारचें निःसीम कौतुकाचें, परमोच्च आदराचें व अढळ मानाचें स्थान प्राप्त झालें होतें. हिंदी मनुष्य, मग तो नोकरींत असो किंवा व्यापारधंद्यांत असो, त्यांच्याकडे अशा प्रकारच्या कौतुकमिश्र आदरानेंच पाहत होता. आणि ह्या सार्वत्रिक भावनेची छाया डॉ. खरे यांच्यासारख्या उपजतच स्वातंत्र्यप्रिय तरुणाच्या मनावर पडणेंही साहाजिकच होतें. राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांचा दुसरा गट म्हणजे ब्रिटिशांच्या सद्बुद्धीवर व लोकशासनप्रियतेवर विश्वास ठेवून कायद्याच्या बंधनांत राहील अशा प्रकारची सनदशीर चळवळ करीत राहणें हाच मार्ग ज्यांना श्रेयस्कर वाटत होता अशा लोकांचा होय. हिंदुस्थानचा ब्रिटिश लोकांशीं आलेला संबंध ही एक दैवी घटना (Divine Dispensation) आहे, तिच्यांतूनच आमचें अंतिम हित साधणार आहे या जाणीवेनें ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या अंतःस्थ सद्बुद्धीला जागृत करून तिच्या द्वारां आपल्या राष्ट्राचें कल्याण साधत राहणें इष्ट व शक्य आहे असा ह्या लोकांचा आंतरिक विश्वास होता. पुढच्या काळांत जहाल व मवाळ अशा दोन स्पष्ट कंपूंत विभागलेले हे लोक येथपर्यंत एकाच गटाचीं डावीं व उजवीं अंगें म्हणून वावरत होते. लो. टिळकांच्या पुढारीपणाखालीं, सनदशीर चळवळींतही जेत्यांना भेदरून सोडण्याइतकें सामर्थ्य उत्पन्न करतां येतें, ही गोष्ट जनतेच्या निदर्शनास नुकतीच येऊं लागली होती. शस्त्राचाऱ्यांचा उर्फ क्रांतिकारकांचा मार्ग सामान्य जनतेच्या आटोक्यापलीकडील असल्यानें त्यांच्याविषयीं निःसीम आदर मनांत बाळगूनही जनता त्यांच्या मार्गाशीं तद्रूप होऊं शकत नव्हती. परंतु राज्यकर्त्यांविरुद्ध तिच्या मनांत इतके दिवस धुमसत असलेला असंतोष लोकमान्यांच्या चळवळीच्या रूपानें आकारास येऊं लागलेला पाहून तिच्याकडे बहुजनसमाज खऱ्याखुऱ्या आत्मीयतेच्या दृष्टीनें पाहूं लागला होता; व प्रत्येक जण आपापल्या

परीनें तिला हातभार लावण्यांत थोडेंफार भूषणही मानूं लागला होता.

राज्यकर्त्यांविरुद्धचा जनमनांतील असंतोष क्रांतिकारकांच्या दहशतवादी कृत्यांनीं प्रकट होत असला तरी सामान्य जनतेला उघडपणें त्यांत भाग घेतां येत नव्हता. परंतु तोच असंतोष कायद्याच्या कक्षेंत राहून लोकमान्यांच्या जाहीर व्याख्यानांच्या रूपानें जेव्हां प्रकट होऊं लागला, तेव्हां सभांना हजर राहून आपणही यांत भागीदार होऊं शकतों व अशा रूपानें आपला असंतोष उघडपणें प्रदर्शित करूं शकतों, असें साहजिकच जनतेला वाटूं लागलें व म्हणूनच लोकमान्यांच्या सभेला हजारोंच्या झुंडींच्या झुंडी जमूं लागल्या. सभेला हजर राहण्याच्या रूपानें आपल्या देशभक्तीला व स्वातंत्र्यप्रीतीला वाव देण्याचें कमींत कमी समाधान सरकारी नोकरही मिळवीत होते. अशा परिस्थितींत लोकमान्यांचा दौरा जेव्हां वऱ्हाडांत आला व खामगांवास त्यांचें व्याख्यान झालें, तेव्हां डॉ. खऱ्यांसारखा हाडाचा राष्ट्रीय तरुण सरकारी नोकरींत असला, तरी लोकमान्यांच्या सभेला अनुपस्थित राहणें कसें शक्य होतें?

## 'हुजुर, मेरेकु जरा काम तो सीखलाइये'

प्रारंभीं डॉ. खरे यांना १३० रु. पगार होता. खामगांवच्या दवाखान्यावर त्यावेळीं हॉस्पिटल असिस्टंट म्हणून एक म्हातारा मुसलमान गृहस्थ होता. डॉक्टर त्यावेळीं अगदींच तरुण असले तरी या म्हाताऱ्याचे वरिष्ठ अधिकारी होते. तथापि, आपल्या वयोवृद्धतेचा फायदा घेऊन दवाखान्यांत येणाऱ्या लोकांना हा म्हातारा सांगे, 'ये तो बच्चा है, सरकारने इसकू हमारे हातके नीचे काम सीखनेके लिये भेजा है.' म्हाताऱ्याचे हे उद्गार कर्णोपकर्णी डॉक्टरांना कळले. कांहीं दिवसांनीं ज्या लोकांसमोर हा म्हातारा असें बोलला होता, ते लोक एके दिवशीं दवाखान्यांत आले असतां, त्या म्हाताऱ्याला डॉक्टर म्हणाले, 'हुजुर, मेरेकु जरा काम तो सीखलाईये.' डॉक्टरांचे हे उद्गार ऐकून बिचारा म्हातारा चांगलाच खजील झाला.

थोड्याच दिवसांनीं वर लिहिल्याप्रमाणें खामगांवला लो. टिळकांचें व्याख्यान झालें. या व्याख्यानाला सरकारी नोकर असूनही डॉक्टरसाहेब हजर

राहिले, याचा त्या व्याख्यानाला जमलेल्या लोकांना व पोलीसांनाही मोठा अचंबा वाटला. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे त्या वेळीं खामगांवलाच वकीली करीत होते. लोकमान्यांच्या व्याख्यानाच्या वेळीं ते उच्चासनावर बसले होते. डॉक्टरांचा त्यांच्याशीं चांगला परिचय झाला होता. डॉक्टर व्याख्यानाला आलेले पाहून, त्यांना मोठें कौतुक वाटलें. त्यांनीं लगेच डॉक्टरांना आपल्या-जवळ उच्चासनावर येण्याचा आग्रह केला. डॉक्टरसाहेबही राजरोसपणें तेथें जाऊन बसले. त्याच दिवशीं सकाळीं लोकमान्य खामगांवला आले, तेव्हां त्यांची मोठी मिरवणूक काढण्यांत आली होती. डॉक्टरसाहेब मिरवणुकीला गेले नव्हते. परंतु त्यांच्या परवानगीनें त्यांचा असिस्टंट मात्र गेला होता. आश्चर्याची गोष्ट ही कीं, याच असिस्टंटनें पुढें लोकमान्यांच्या व्याख्यानाला डॉक्टरसाहेब हजर राहिल्याची सिव्हिल सर्जनकडे चुगली केली. शिवाय, पोलीसांनींही आपला रिपोर्ट केला होताच. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, या सभेला हजर राहिल्याबद्दल बुलडाण्याच्या डेप्युटी कमिशनरनें सिव्हिल सर्जनमार्फत डॉक्टरांना एक लांबलचक पत्र पाठवून खुलासा मागितला. डेप्युटी कमिशनरनें आपल्या पत्रांत डॉक्टरांना पुढील आशयाचे प्रश्न विचारले होते.—

"(१) खामगांवला पुण्याच्या टिळक नांवाच्या एका गृहस्थाच्या व्याख्यानाला तुम्ही हजर राहिलां कीं नाहीं? (२) हें व्याख्यान राजद्रोह फैलावणारें होतें किंवा नाहीं? (३) या राजद्रोही व्याख्यानाचा निषेध न करतां तुम्ही तें शेवटपर्यंत ऐकत राहिलां कीं नाहीं? (४) सरकारी नोकर असतांनाही अशा राजद्रोह फैलावणाऱ्या व्याख्यानाला तुम्ही कसे गेलां? (५) या जाण्यानें तुम्ही सरकारी नोकरांबाबतच्या नियमांचें उल्लंघन केलें नाहीं काय?"

डेप्युटी कमिशनरची वरील प्रश्नावली डॉक्टरांनीं तेथील आपल्या कांहीं मित्रांना व अधिकाऱ्यांनाही दाखविली. नागपूरचे हल्लींचे रहिवासी रा. ब. हरिभाऊ मुंजे व रा. ब. जी. एच. गोखले त्यावेळीं खामगांवलाच होते. याशिवाय रामलाल दिनानाथ पांडे या नांवाचे एक सीनियर सबजज्जही तेथें होते. या सर्वांनीं तें पत्र पाहून, 'डॉक्टरांनीं आपली चूक कबूल करावी, निष्कारण भलत्याच भानगडींत पडूं नये,' असा अभिप्राय दिला. डॉक्टरांना

मात्र त्यांचा अभिप्राय पटला नाहीं. त्यांनीं सिव्हिल सर्जनमार्फत डेप्युटी कमिशनरला पुढील आशयाचें पत्र पाठविलें :— "मी लो. टिळकांच्या सभेला हजर राहिलों. सभेला हजर राहिल्यानें सरकारी नोकरांच्या नियमांचें मी उल्लंघन केलें, असें मला वाटत नाहीं. केवळ श्रोता म्हणून एकाद्या सभेला हजर राहिल्यानें राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेतल्यासारखें होत नाहीं. मी न्यायाधीश, वकील, मॅजिस्ट्रेट किंवा राजकारणीही नसल्यामुळें सदरहू व्याख्यान राजद्रोह पसरविणारें होतें किंवा नाहीं हें मी सांगूं शकत नाहीं. सभेंत त्या भाषणाचा मी निषेध कां केला नाहीं याचें कारण असें कीं, जर मी तसें केलें असतें, तर तें माझें करणें म्हणजेच मी राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेतल्यासारखें झालें असतें. तरी पण, ज्याअर्थी जाहीर सभांना सरकारी नोकरांनीं हजर राहणें, म्हणजे अधिकाऱ्यांची मोठीच गैरमर्जी ओढवून घेणें होय, त्याअर्थी जोंपर्यंत मला सरकारी नोकरी करावयाची आहे, तोंपर्यंत ही बाब मी अवश्य लक्षांत ठेवीन."

हें प्रकरण पुढें मिटलें. पण, तेव्हांपासून डॉक्टरसाहेब अधिकाऱ्यांच्या 'गुड बुकांत' राहिले नाहींत.

## इंग्रज डी.एस.पी.ला बिल पाठविलें!

बुलडाण्याचे डी. एस. पी. श्री. आर. मॅगील हे एकदां खामगांवला येत असतां मार्गांत शेगांव येथें त्यांची पत्नी आजारी पडली. तिला पाहण्याकरितां डॉक्टरसाहेबांना बोलावण्यांत आलें. आजच्याप्रमाणें त्याकाळीं मोटारींचा सुळसुळाट नसल्याकारणानें डॉक्टरांना बैलगाडींतून शेगांवला जावें लागलें. खामगांवाहून थोडें अंतर जातांच त्यांची गाडी उलटून ती नादुरुस्त झाली. तेव्हां त्याच रस्त्यानें जाणाऱ्या एका कापसाच्या भरतीच्या गाडींतून डॉक्टरसाहेब जाऊं लागले. हीही गाडी एक मैलाचें अंतर जातें न जातें तोंच उलटली. आतां काय करावें असा त्यांना मोठा पेंच पडला. शेवटीं खामगांवला परत जाऊन रेल्वेनेंच शेगांवला जावें, असें ठरवून त्याप्रमाणें त्याच रस्त्यानें खामगांवला जाणाऱ्या एका दमणीवाल्याच्या दमणींत ते बसले. परंतु चमत्कार

असा कीं, ही दमणीही भरधांव जात असतां, तिचे बैल एकदम उधळून उलटली. पुन्हा जुंपल्यावरही बैलांनीं दमणी उलटवलीच. अशा परिस्थितींत डॉक्टरसाहेब कसेबसे खामगांवच्या स्टेशनावर आले आणि रेल्वेंतून त्यांनीं शेगांवला प्रयाण केलें. शेगांवला उतरल्यावर त्यांच्याकरतां आलेल्या डी. एस.पी.च्या टांग्यांतून ते मुक्कामावर जाण्यास निघाले. हाही टांगा रस्त्यांत एकदां उलटलाच! असे एकूण डॉक्टरसाहेबांना त्या दिवशीं, पांच अपघात झाले. त्यामुळें डी.एस.पी.च्या मुक्कामावर पोहोंचावयास त्यांना बरीच रात्र झाली. डी. एस. पी. व त्याची पत्नी त्यावेळीं झोंपली होती. डॉक्टरांनीं डी.एस.पी.ला हांक मारून उठविलें. डी. एस. पी. त्याप्रमाणें उठून डॉक्टरांना म्हणाला, "माझी पत्नी नुकतीच झोंपली असल्यामुळें तिला मी आतां उठवीत नाहीं. तुम्ही उद्यां या." त्याप्रमाणें डॉक्टर खामगांवला परत आले व दुसरे दिवशीं डी.एस.पी.च्या सांगण्याप्रमाणें पुन्हा शेगांवला गेले. डॉक्टरांना पाहतांच डी.एस.पी.ची बायको म्हणाली, "हा काळा आदमी आहे, याला मी माझी तब्यत दाखविणार नाहीं." डी.एस.पी.नें तिची बरीच समजूत घातल्यानंतर ती कबूल झाली. डॉक्टरांनीं तिला तपासून औषधोपचार सुरू केले. थोड्याच दिवसांत ती खणखणीत बरी झाल्यावर आपल्या तपासणीबद्दल व औषधोपचाराबद्दल डॉक्टरांनीं डी.एस.पी.ला तेहतीस रुपयांचें बिल पाठविलें. बिल पाहतांच डी.एस.पी. आश्चर्यचकित झाला. आपण डी.एस.पी. असून आपल्याला बिल पाठविलें हा यानें आपल्याशीं मोठाच अतिप्रसंग केला, असेंच जणूं काय डी.एस.पी.ला वाटलें. खरें पाहिलें तर, डी.एस.पी.ची पत्नी सरकारी नोकर नव्हती. तिला पाहण्याकरतां रात्रीचा प्रवास करून व या प्रवासांत ८-१० मैलांच्या अंतरांतच पांच अपघात सोसून डॉक्टरसाहेब डी. एस. पी.च्या बंगल्यावर गेले. तेव्हां त्यांनीं आपल्या मेहनतीबद्दल डी एस.पी.ला बिल पाठविण्यांत वावगें तें काय केलें? परंतु डी.एस.पी.ला हा अपमान वाटून त्यानें ही गोष्ट बुलडाण्याच्या सिव्हिल सर्जनपर्यंत नेली. त्याला या बाबतींत कांहींच करतां येणें शक्य न झाल्यामुळें शेवटीं डी.एस.पी.ला बिल देणें भाग पडलें. तरीपण त्यानें पुरें बिल न पाठवितां २५ रुपयेच पाठविले.

**युरोपियन अधिकाऱ्यांशीं खटके**

याचा परिणाम पुढें लवकरच डॉक्टरांची तेथून ब्रम्हाणपुरला बदली होण्यांत झाला. खामगांवला आणखी एक दोन युरोपियन अधिकाऱ्यांशीं डॉक्टरांचे मोठे मजेदार खटके उडाले. डॉक्टरीच्या धंद्यानिमित्त मधूनमधून त्यांना बुलडाण्यास सेशन कोर्टांत साक्षी देण्यासाठीं जावें लागे. एकदां त्यांची गाडी चुकली. लागलीच त्यांनीं त्याप्रमाणें सेशन जज्जांना तारेनें कळविलें. या सेशन्स जज्जाचें नांव अलेक्झांडर सेंट जे. डी बार होतें. त्यांनीं, डॉक्टरसाहेब कोर्टांत गैरहजर राहिले म्हणून खास समन्स पाठवून तारीख दिली. त्या तारखेला डॉक्टर कोर्टांत हजर झाले. त्यांना पाहतांच सेशन्स जज्ज मोठ्या तावातावानें म्हणाले, "हें सेशन्स कोर्ट आहे, हें कांहीं तहसीलदाराचें कोर्ट नाहीं. समन्सप्रमाणें तुम्ही कोर्टांत वेळेवर हजर कां राहिला नाहीं?" डॉक्टरांनीं लगेच त्यांना उत्तर दिलें, "माझी गाडी चुकल्यामुळें कोर्टांत वेळेवर हजर राहूं शकणार नाहीं असें ताबडतोब तार करून मी कळविलें होतें." सेशन्स जज्जांना डॉक्टरांचें हें रास्त व सबळ कारण कसें पटणार? आपण एक बडे अधिकारी आहों, याची त्यांना हमखास जाणीव होती. ते लगेच डॉक्टरांना म्हणाले, "तें मी कांहीं जाणत नाहीं. तुम्ही आपल्या चुकीबद्दल माफी मागितली पाहिजे. नाहीं तर मी तुम्हांला ५०० रु. दंड करीन." त्यावर डॉक्टरांनीं त्यांना स्पष्ट उत्तर दिलें, "आपण खुशाल मला दंड करा. पण मी कांहीं आपली माफी मागणार नाहीं. आपल्या शिक्षेविरुद्ध वरिष्ठ कोर्टांत मला अपील करतां येईल." त्यांच्या या सडेतोड उत्तरानें जज्जसाहेब नरमावलेच. मात्र, अशा तऱ्हेच्या बाणेदार वागणुकीनें डॉक्टरसाहेब बहुतेक सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मर्जींतून उतरले.

एकदां असाच बुलडाण्याला त्यांचा मुक्काम असतांना तेथील कर्नल कोलंब नांवाच्या युरोपियन डेप्युटी कमिशनरनें त्यांना आपल्या बंगल्यावर भेटीला बोलाविलें. त्याप्रमाणें डॉक्टर त्यांच्या भेटीला गेले. या भेटींत कोलंब साहेबांनीं त्यांना एक भलें मोठें व्याख्यान ऐकवून शेवटीं असा इषारा दिला, "तूं स्वराज्यवाला आहेस हें मी पक्कें जाणून आहें. तूं जाहीर सभांनाही हजर राहतोस हेंही मी

ग्रं... ना...

विसरलों नाहीं. अरे, आम्हां इंग्रजानंतर हिंदुस्थानांत कोण राज्य करील असें तुला वाटतें ?"

यावर डॉक्टर त्यांना म्हणाले, "तुमच्या या शेवटच्या प्रश्नाचा मी विचारच केला नसल्यामुळें मी त्याचें उत्तर देऊं शकत नाहीं."

"तूं देत नाहींस तर मी देतों" असें म्हणून लगेच कोलंबसाहेब पुन्हां म्हणाले, "जपान हिंदुस्थानांत येण्याचा प्रयत्न करील. मला या जपान्यांच्या प्रत्येक गोष्टीची मनस्वी चीड येते. या देशांत स्वस्त माल पाठवून ते हिंदुस्थानची पिळवणूक करीत आहेत."

'तुम्हां इंग्रजांइतकी खास नाहीं' असें हळूच डॉक्टरसाहेब उद्गारले. तेव्हां तर साहेबांचा पारा चांगलाच वर चढला. आपल्या संतापाच्या भरांत ते पुन्हा म्हणाले, 'जपाननें नुकताच कोरिया घेतला. तेथील रहिवाशांना हे जपानी लोक लहानशीही नोकरी देत नाहींत, समजलास! हिंदुस्थानांत तशी परिस्थिति आहे काय?'

यावर डॉक्टरसाहेब त्यांना म्हणाले, "बरोबर आहे. तुम्ही हिंदी लोकांना 'बाबू' व चपराशाच्या नोकऱ्या मोठ्या उदारपणानें देतां!"

या वक्रोक्तीनें साहेब जास्तच गरम झाले आणि एकदम ते डॉक्टरांना म्हणाले, "ओ, यू आर पक्का स्वराज्यवाला." इतकें बोलूनच राजेश्री थांबले नाहींत; तर पुढें असेंही म्हणाले, "जर तुम्ही हिंदी लोक आमच्याविरुद्ध उठावणी कराल तर आम्ही तोफाबंदुकांनीं तुमचा फडशा पाडूं."

डॉक्टरसाहेबांनीं यावर त्यांना उत्तर दिलें, "जे कोणी स्वराज्याकरितां तुमच्याशीं झगडत असतील ते खात्रीनें यावर कांहीं तरी उपाय अवश्य शोधून काढतील." त्यांचें हे बोल ऐकून साहेबमजकूर स्तंभितच झाले!

याच्या तोंडीं लागण्यांत अर्थ नाहीं, असा शहाणपणाचा विचार करून ते डॉक्टरांना शेवटीं म्हणाले, "अरे तरुण मनुष्या! तूं या मुजोरीच्या गोष्टी सोडून दे. तुला अद्याप जगांत बरेच दिवस काढावयाचे आहेत. तुला अजून जगाचा अनुभव नाहीं."

या अनाहूत उपदेशाबद्दल डॉक्टरांनीं त्यांचे आभार मानून "जग येवढें अफाट आहे कीं, त्यांत माझ्यासारख्या क्षुल्लक प्राण्याची परमेश्वरानें अवश्य सोय लावलीच असेल. तेव्हां माझ्याबद्दल काळजी करण्याचें आपल्याला कारण नाहीं," असें रोखठोक उत्तर दिलें!

**साहेबाचा शिष्टाचार!**


खामगांवला असतांना असाच एक प्रसंग एका युरोपियन आय.सी.एस. अधिकाऱ्याच्या बाबतींत घडला. त्यांचें नांव कोर्टने ब्राउन असून तो तेथें एस. डी. ओ. होता. एके दिवशीं तो आजारी पडला असतां औषधोपचार करून डॉक्टरांनीं त्याला बरा केला. प्रकृति खडखडीत बरी झाल्यावर त्यानें डॉक्टरांना चिट्ठी पाठवून आपल्या भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें चिट्ठींत दिलेल्या वेळेवर डॉक्टरसाहेब त्याच्या भेटीला गेले. बंगल्याच्या खालच्या मजल्यावर त्याची कचेरी असून वरच्या मजल्यावर तो राहत असे. डॉक्टर-साहेब जिना चढून वर गेले व व्हरांड्यांत त्याच्या खोलीजवळ जाऊन उभे राहिले. त्यावेळीं तो अधिकारी एका नर्सबरोबर खोलींत चहा बिस्किटें घेत होता. डॉक्टरांना खोलीच्या दाराशीं पाहतांच स्वारी संतापानें लाल होऊन बाहेर आली व 'परवानगी शिवाय एकदम तूं घरांत कसा आलास? तुला कांहीं शिष्टाचार आहे कीं नाहीं?' असें त्यानें दरडावून विचारलें.

डॉक्टरही त्याला म्हणाले, "तुमच्या बोलावण्याप्रमाणें व तुम्ही दिलेल्या टाईमप्रमाणें मी येथें आलों. शिवाय हा व्हरांडा आहे. येथें कोणीही येऊ शकतो. तुम्ही मला शिष्टाचार शिकवूं शकत नाहीं. उलट, तुम्हालाच चांगले शिष्टाचार शिकवूं शकेन, इतके चांगले ते मी जाणतों. आतांच तुम्ही बिस्किटें चघळीत माझ्यासमोर आलां, हा कोणत्या जातीचा शिष्टाचार आहे?"

डॉक्टरांच्या या मर्मी घावानें तो चिडला आणि डॉक्टरांना अद्वातद्वा बोलूं लागला. तेव्हां 'सभ्य माणसासारखें जर तुम्हाला माझ्याशीं वागावयाचें नसेल, तर हा पहा मी येथून चालता होतों' असें म्हणून डॉक्टरसाहेब तडक तेथून निघाले. परंतु, त्या आय.सी.एस. अधिकाऱ्यानें लगेच त्यांना अडविलें

# नामदार डॉक्टर खरे यांची

## सायन भावचलित कुंडली




**टीप**—ही सायन भावचलित कुंडली आम्हांला आर्यांग्लहोरारत्न श्री. गजाननराव कुळकर्णी, फलज्योतिष-संशोधक, मु. पो. देऊळगांवराजा, जि. बुलडाणा (वऱ्हाड) यांचेकडून आली आहे. ही सायन भावचलित कुंडली पाठविल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

फलिताच्या दृष्टीनें या दोन्ही कुंडल्या कोणत्या दर्जाच्या आहेत, हें जिज्ञासूंनीं किंवा तज्ज्ञांनीं पारखून घ्यावें. आमच्या पुस्तकाचा मुख्य विषय तो नसल्यामुळें फलित येथें दिलें नाहीं.

लें०——ज. रा. जोशी.

# पु र स्का र

इंग्रजींत एक म्हण अशी आहे कीं, कोणत्याही मनुष्याच्या जीवन-चरित्रांतून एक सुंदर चरित्रग्रंथ सहज निर्माण होऊं शकतो. मग ना. डॉ. खरे यांच्यासारख्या असामान्य व्यक्तीच्या नानाविध चमत्कारिक घटनांनीं भरलेल्या जीवनचरित्रावर तर अत्यंत सुंदर ग्रंथ खात्रीनें लिहितां येईल. डॉक्टरसाहेबांचें चरित्र मनुष्याच्या अंगच्या चिकाटी, सहनशीलता, ऋजुता, धैर्य, इत्यादि गुण कसास लावणाऱ्या विविध प्रसंगांनीं सजलेलें आहे. तेव्हां त्यांचे चरित्रलेखक 'महाराष्ट्र'चे उपसंपादक श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी यांना उत्तम ग्रंथरचनेसाठीं अवश्य असलेलें बहुमोल साहित्य अनायासेंच भरपूर उपलब्ध झालें होतें. प्रश्न येवढाच होता कीं, चरित्रलेखक आणि चरित्रनायक यांचा संबंध अतिशय जवळचा आणि आपुलकीचा असल्यामुळें चरित्रलेखनाच्या किंवा चरित्रनायकाच्या गुणदोषचिकित्सेच्या बाबतींत लेखकाची वृत्ति असावयाला पाहिजे तितकी निःपक्षपाती राहील कीं नाहीं? प्रभावशाली लोकधुरीण ज्याप्रमाणें सहजा-सहजीं शत्रु उत्पन्न करतात, त्याचप्रमाणें अनुयायांच्या अकृत्रिम प्रेमाचें आणि अनन्य भक्तीचें अधिष्ठान होण्याचा मानही त्यांना मिळत असतो. विशेषतः ज्या प्रकरणामुळें डॉ. खरे यांचें नांव सबंध हिंदुस्थानांत सर्वतोमुखीं झालें, तें खरे-प्रकरण इतकें ताजें आणि इतकें वादग्रस्त आहे कीं, डॉक्टरसाहेबांचें चरित्र लिहित असतांना श्री. जोशी यांना बरीच अडचण भासली असल्यास नवल नाहीं. तथापि त्यांनीं आपली समतोल वृत्ति सहसा ढळूं दिली नाहीं, याबद्दल मला त्यांचें कौतुक करावेसें वाटतें.

'याच देहीं याच डोळां' आपल्या चरित्राचें चित्रण पहाण्याचा सुयोग फार थोड्या भाग्यवंतांना लाभतो. पण, तें पहातांना आपलें खरेंखुरें अंतरंग त्या शब्दचित्रांत प्रामाणिकपणें व्यक्त झालें पाहिजे अशी तळमळ या भाग्यवंतां-पैकीं फार थोड्यांना लागते. प्रस्तुत चरित्र-लेखकाचें सद्भाग्य हें कीं, त्याचे चरित्रनायक हे अशा अत्यंत विरळ कोटींतील मनस्वी निःस्पृह पुरुषांपैकीं एक आहेत.

वा. क्र.
ता.
ठाणे.



कुलगुरु ले. कर्नल डॉ. नानासाहेब
केदार, एम्. एल्. ए.

चरित्रग्रंथ लिहितांना चरित्रनायकाच्या चारित्र्यासंबंधींचे नाजूक आणि विकट प्रश्न लेखकाच्या मार्गांत अनेक विघ्नें उत्पन्न करितात. सुदैवानें डॉ. खरे यांच्या चारित्र्यांत संकोच वाटण्यासारख्या किंवा लपवून ठेवण्यासारख्या गोष्टी कांहींही नाहींत. लहान मुलासारखी खेळाडू-वृत्ति आणि सदा स्पष्ट किंवा फार झालें तर फटकळ थट्टेखोर स्वभाव, हे त्यांच्या उदार 'मानव्या' चे दोन प्रमुख विशेष आहेत.

ब्रिटिश राजकारणांत रंगलेले एक सुप्रसिद्ध मुत्सद्दी सर विल्यम हारकोर्ट यांच्या स्वभावासंबंधीं त्यांच्या चरित्रलेखकानें असे उद्गार काढले आहेत कीं, "ते निसर्गासारखे अकृत्रिम आणि शुद्ध व लहान मुलासारखे साधेभोळे होते. त्यांचें हृदय इतकें उघडें आणि स्पष्ट दिसत होतें कीं, जणूं काय त्यास आपल्या कोटाच्या अस्तनींवर धारण करूनच ते फिरत होते. तरी पण, तें हृदय किती तरी विशाल होतें! त्यांच्या हृदयाला सहजासहजीं चालना मिळे, आणि एकदा त्याला चालना मिळाली, म्हणजे बुद्धीचें नियंत्रण निघून जात असे. त्यांच्या हृदयांत जें कांहीं असेल नसेल, तें त्यावेळीं खळाळून बाहेर पडत असें. त्यांच्या मनोव्यापारांत बुद्धीची कुशाग्रता जशी नसे, तसेच तिचे लपंडावही पण नसत. हें सर्व, आणि त्यांचे इतरही स्वभावविशेष—त्यांची हजरजबाबी नर्मोक्ति, अवखळ विनोद, लढाऊ-वृत्ति, वादविवादाची हौस, असामान्य वक्तृत्व-शक्ती, मैत्री आणि झगडे – हे सर्व त्यांच्या व्यक्तित्वाचे सहज दिसणारे आविर्भाव होते; व त्यांच्या समकालीनांना ते जितके स्पष्ट जाणवले तितकेच भावी काळांतही स्पष्ट दिसतील. ते विलक्षण थट्टेखोर होते. आणि जनतेच्या मनावर ज्या कांहीं गोष्टींनीं, त्यांनीं जबरदस्त परिणाम केला, त्यापैकीं त्यांचा प्रतिभायुक्त विनोद, ही एक महत्वाची गोष्ट होती."

(मूळ इंग्रजी उतारा मुद्दाम येथें देत आहों.)

"He was natural and spontaneous elemental and singularly child-like. He wore his heart on his sleeve and it was a very big heart. It was easily moved and when it was moved, the calculations of the head went by the board. What was in his mind tumbled out pell-mell—

'He poured out all as plain
As down-right shiffen or as old montaign'

and there was as little subtlety as there was secrecy in his mental processes...... All this, and much else—his unfailing wit, his boisterous humour, his combative temperament, his love of debate, his rare power of speech, his friendships and his quarrels–lay on the surface of the man, plain alike to his time and to history...... He was a great jester and it was his comic genius that chiefly struck the general imagination."

डॉ. खरे यांच्या प्रत्यक्ष परिचयाचा लाभ ज्यांना घडलेला आहे, किंवा हा चरित्रग्रंथ वाचून त्यांच्या अंत:करणाची ज्यांना ओळख पटेल, त्यांना वरील वर्णन डॉ. खरे यांना किती लागूं पडतें, हें सांगावयास नको.

डॉ. खरे यांच्या चरित्रांतील कांहीं विशिष्ट प्रसंगांवर अनेक लोकांनीं निरनिराळीं मतें दिलीं आहेत. हे प्रसंग इतके अलीकडले आहेत कीं, त्यासंबंधीं जास्त चिकित्सा करण्याची आज गरज नाहीं. माझें स्वत:चें असें ठाम मत आहे कीं, त्या प्रसंगांतून डॉ. खरे हे बाणेदारपणानें आणि सन्माननीय रीतीनें बाहेर पडले. त्यांच्या आंगच्या लोकोत्तर गुणांनीं व त्यांच्या निर्भेळ चांगुलपणानें त्यांना या आणीबाणीच्या प्रसंगीं साथ दिली; व भावी इतिहास डॉ. खरे यांच्या उज्ज्वल चारित्र्याची ग्वाही देईल, याबद्दल मला मुळींच शंका नाहीं.

श्री. जोशी यांनीं आपलें चरित्रलेखनाचें अवघड कर्तव्य सहृदयतेनें आणि नि:पक्षपाती वृत्तीनें पार पाडल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतों. उदात्त चरित्रनायक, स्पृहणीय लेखनसामुग्री व प्रेमळ चरित्रलेखक या त्रिवेणी संगमांतून निर्माण झालेला हा सुरस ग्रंथ लोक गोडीनें वाचतील, याबद्दल मला संशय वाटत नाहीं. किंबहुना, या त्रिवेणी संगमांत, एकवार कां होईना, अवगाहन करणाऱ्या डॉ. खरे यांच्या कट्टया विरोधकांना सुद्धां थोडेसें पावित्र्य लाभेल, अशी आशा करावयाला हरकत वाटत नाहीं. निदान त्यांच्या मनावरील मालिन्य तरी, थोड्या प्रमाणांत कां होईना, झाडून टाकावयाला हा चरित्रग्रंथ

समर्थ होईल, अशी मला उमेद वाटते. येवढें जरी झालें, तरी श्री. जोशी यांच्या श्रमांचें चीज होईल व 'क्लेशः फलेनहि पुनर्नवतां विधत्ते' ही कविकुलगुरुंची उक्ति यथार्थ ठरेल.

नागपूर विद्यापीठ
२५ जुलै १९४३.

तु. ज. केदार.

# श्री. दादासाहेब ओगले यांचा आशीर्वाद

ना. डॉ. ना. भा. खरे या नागपूरच्या एका सुप्रसिद्ध व हल्लीं हिंदुस्थान सरकारांतील उच्च पदावर आरूढ झालेल्या एका प्रमुख नागरिकाचें लहानसें चरित्र माझे मित्र श्री. जोशी यांनीं लिहावयास घेतलें असें मला कळलें तेव्हां मला अत्यंत आनंद वाटला.

डॉ. खरे सरकारी नोकरी सोडून प्रथम नागपुरास १९१६ सालीं डॉक्टरीचा धंदा करण्यासाठीं येऊन राहिले. तेव्हांपासून त्यांचा माझा परिचय झाला व सार्वजनिक कामांत त्यांच्याशीं अनेक वेळां सहकार्य करण्याचे प्रसंग आल्याकारणानें त्या परिचयाचें लौकरच स्नेहांत रूपांतर झालें. डॉ. खरे नागपुरास आले, त्यावेळीं नागपुरांत 'राष्ट्रीय मंडळ' नांवाची सार्वजनिक कार्यकर्त्यांची स्वयंस्फूर्तीनें बनलेली एक संस्था होती. डॉ. मुंजे व कै. नीळकंठराव उधोजी हे त्या संस्थेचे पुढारी होते. श्री. नारायणराव अळेकर, कै. नारायणराव वैद्य, कै. धुंडिराजपंत ठेंगडी, डॉ. चोळकर, डॉ. परांजपे, श्री. भास्करराव पंडित वकील, कै. बॅरिस्टर मोरोपंत अभ्यंकर, बॅरिस्टर गोविंदराव देशमुख, हे या संस्थेचे सभासद व कार्यकर्ते होते. श्री. भवानीशंकर नियोगी, श्री. शिवदासपंत बारलिंगे व श्री. दप्तरी हेही या संस्थेंत कांहीं काळ समाविष्ट झाले होते. मीही त्या संस्थेचा एक सदस्य व अल्पस्वल्प कार्यकर्ता होतों. डॉ. खरे नागपुरास आल्यावर नरकेसरी अभ्यंकरांबरोबर राष्ट्रीय मंडळांत येऊं लागले व त्याचे सदस्य व कार्यकर्ते बनले. या राष्ट्रीय मंडळानें नागपुरांत अत्यंत बिकट परिस्थितींत राजकीय व इतर चळवळी कशा चिकाटीनें व धीटपणानें चालविल्या, याचा इतिहास पुढेंमागें लिहिला गेल्यास तो अत्यंत मनोरंजक व बोधप्रद होईल. हें राष्ट्रीय मंडळ १९२४ सालापर्यंत एकजुटीनें व एकमतानें वागून कार्य करीत होतें. पुढें त्यांत मतभेद झाले. आणि डॉ. मुंजे यांचा एक पक्ष व श्री. अभ्यंकरांचा दुसरा पक्ष, अशी त्या राष्ट्रीय मंडळाचीं दोन शकलें झालीं, व तीं दोन्ही आपापल्यापरी कार्य करूं लागलीं. या

विभागणींत डॉ. खरे नरकेसरी अभ्यंकरांच्या पक्षास मिळाले व मी डॉ. मुंजे यांच्या पक्षांत सामील राहिलों. पुढें या पोटपक्षांचीं, निवडणुकी व इतर चळवळी यांच्यासंबंधीं जीं भांडणें झालीं, त्यांत डॉ. खरे व मी यांच्यांत पुष्कळ वेळां जाहीर सभांतून व वर्तमानपत्रांतून पुष्कळ झटापटी झाल्या; व आम्ही दोघांनींही एकमेकांची पुष्कळ वेळां सडकून हजेरी घेतली. पण, आनंदाची व अभिमानाची गोष्ट ही कीं, सार्वजनिक प्रश्नावरील आमचे मतभेद कितीही तीव्र असले व त्यावरील वादांत आम्ही एकमेकांची कितीही खरड काढली असली, तरी त्यामुळें आम्हां दोघांमधील खाजगी स्नेह व परस्परांबद्दल आमच्या मनांत वसत असलेला प्रेमादर, यांत कधींही खंड पडला नाहीं. डॉ. खरे हे १९३६ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकींत नागपुरचे कॉंग्रेसपक्षीय पुढारी म्हणून निवडून आले. कै. अभ्यंकरांच्या मृत्यूनंतर या प्रांतांतील कॉंग्रेस पक्षाच्या पुढारीपणाची धुरा त्यांचे निकटवर्ति स्नेही व सहाय्यक म्हणून डॉ. खरे यांच्याच खांद्यावर येऊन पडली होती. हिंदी मध्यप्रांतांतील कॉंग्रेस पुढाऱ्यांत मोठींच खाजगी वितुष्टें व स्पर्धा सुरू असल्यामुळें असेंब्लींतील पुढारीपणाचा व कॉंग्रेसपक्षीय पंतप्रधान होण्याचा मान त्यापैकीं कोणालाच मिळण्यासारखा नव्हता. तो डॉ. खरे यांस सहजच मिळाला. डॉ. खरे यांची द्रव्यनिरपेक्षता व सच्चेपणा हे गुण त्यांच्या सहकारी कॉंग्रेसभक्तांस व त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांस व शत्रूसही निर्विवाद मान्य होण्याजोगे होते. यामुळें ते मुख्य प्रधान होण्यास लायक असे ठरले. पण, पुढें पुढें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांची अधिकारलालसा वाढत गेली व त्यांचीं परस्परांतील वितुष्टें वितळून जाऊन त्यांची एकी झाली व त्यानंतर एकवटलेल्या हिंदी मध्यप्रांतीयांस डॉ. खरे यांस पुढारीपणाच्या व पंतप्रधानपदाच्या सिंहासनावरून उतरविण्याचा प्रयत्न करणें सुलभ झालें. डॉ. खरे यांच्या लक्षांत आपल्या सोबत्यांचें कारस्थान वेळींच न आल्यामुळें व पुढेंही कॉंग्रेसश्रेष्ठी मंडळींशीं त्यांनीं कांहींसें धट्टपणाचें वर्तन केल्यामुळें, त्यांना कॉंग्रेसमधील या प्रांताचें पुढारीपण आणि या प्रांताच्या मुख्य प्रधानाची जागा सोडणें भाग पडलें, हें खरें; पण, महात्मा गांधी व कॉंग्रेसश्रेष्ठी यांच्यापुढें त्यांनीं केव्हांही आपलें शीर नमविलें नाहीं.

परंतु उलट काँग्रेस पुढाऱ्यांना व महात्मा गांधींना आपला स्पष्टवक्तेपणा सहन न झाल्याकारणानें ते आपणास पक्षपातानें व अन्यायानें वागवीत आहेत, अशी त्यांची खात्री पटतांच त्यांनीं त्या थोर पुढाऱ्यांशींही दंड थोपटून सामना देण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. त्यावेळीं हिंदुस्थानांत महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, बाबु राजेंद्रप्रसाद आणि मौ. आझाद यांचें वजन व लोकप्रियता इतकी मोठी होती कीं, त्यांनीं ज्याला शाप दिला असता त्याला डोकें वर काढणें शक्य झालें नसतें. तो कायमचा धुळीला मिळाला असता. पण डॉ. खरे यांना जरी त्यांनीं काँग्रेस संस्थेंतून बाहेर पडावयास भाग पाडलें, तरी सुद्धां डॉ. खरे यांच्या सच्चेपणाच्या, देशाभिमानाच्या व निरपेक्षतेच्या कीर्तीस ते धक्का पोंचवूं शकले नाहींत. त्यांनीं केलेल्या आरोपांस व घेतलेल्या आक्षेपांस 'अरे तर कारे' अशा बाण्यानें धीटपणानें व सणसणीत प्रत्युत्तरें देऊन त्या झगड्यांतून आपल्या स्वतंत्र बाण्याचें यशस्वी निशाण फडकवीत ते बाहेर पडले. समाजांतील त्यांची लोकप्रियता व त्यांची कीर्ति कायमच राहिली किंबहुना त्यांच्या धैर्याबद्दल व स्पष्टवक्तेपणाबद्दल त्यांची लोकांत अधिक वाहवाच झाली.

डॉ. खरे यांच्या सार्वजनिक चरित्रांत आरंभापासून अखेरपर्यंत हिंदी राजकारणी पुरुषांस व सार्वजनिक कार्यकर्त्यांस बोध घेण्यासारखे प्रसंग पुष्कळच घडले आहेत. त्यांच्या पूर्वचरित्रांतील अशा प्रसंगांचा निकट परिचय प्रस्तुत चरित्रलेखक श्री. जोशी यांस कितपत आहे हें मला सांगतां येत नाहीं. परंतु त्यांची गेलीं दहापांच वर्षें डॉ. खरे यांच्या सान्निध्यांत व निकट सहवासांत गेलीं असल्याकारणानें, चरित्रनायकाच्या चरित्राचें उत्तरार्ध मात्र त्यांना यथार्थपणें परिचित झालें आहे. तेवढें उत्तरार्ध जरी त्यांनीं आपल्या चरित्रग्रंथांत यथातथ्य रंगविलें, तरी सुद्धां त्यांनीं आपली कामगिरी उत्तमपणें पार पाडली असेंच मी समजेन. चरित्रलेखकाचा हा पहिलाच चरित्रग्रंथ यशस्वी होऊन लोकादरास पात्र होवो व त्याच्या हातून यापुढेंही थोर पुरुषांचीं चरित्रें लोकांना आदर्शभूत होण्यासाठीं लिहिलीं जावोत, असें मी चिंतितों.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्र. ........ ग्रं. ........
ता. ........
ठाणे.





लेखक

जगन्नाथ रामचंद्र जोशी

आणि म्हणाला, "हें पहा डॉक्टर, माझ्या बोलण्याचा तुम्ही राग मानूं नका. झाल्या प्रकाराबद्दल मला फार वाईट वाटतें. मी तुमच्याशीं अशा प्रकारें वागावयास नको होतें. मी तुम्हाला येवढ्याचसाठीं बोलाविलें कीं, विषमज्वरांतून तुम्ही मला नुकतेंच बरें केलेंत. मला माझें अंथरुण, चादर वगैरे सामान 'डिसइन्फेक्ट' करावयाचें आहे. त्यासाठीं मी काय करावें, येवढें विचारण्यासाठींच मी तुम्हाला मुद्दाम बोलाविलें आहे." डॉक्टरसाहेबांना आधींच संताप चढला होता. 'तें तूं जाळून टाक, मला त्याच्याशीं कांहींएक कर्तव्य नाहीं' असें म्हणून ते तडक तेथून चालते झाले.

नावडत्या नोकरास त्रास देण्याचा वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचा मामुली शिरस्ता म्हणजे त्याच्या वारंवार बदल्या करणें हा होय. खामगांव येथील डेप्युटी कमिशनर, डी.एस.पी., एस.डी.ओ., सि.एस., इत्यादि वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं नित्य झगडा करणाऱ्या ह्या तरुण डॉक्टराची लौकरच तेथून बदली झाली नसती तर तें एक आश्चर्यच समजलें गेलें असतें. अपेक्षेप्रमाणें त्यांची खामगांवहून बऱ्हाणपुरास बदली झाली. तेथें ते फक्त पांचच महिने राहिले. नंतर तेथून जबलपुरला त्यांची बदली झाली. जबलपुरला पूर्वीं डॉक्टरांनीं आपली विद्यार्थीदशा घालविली होतीच. तेथें विद्यार्थी असतांना मधून मधून त्यांना सरकारी दवाखान्यांत जावें लागत असे. त्यामुळें त्या दवाखान्यांतील चपराशी, डॉक्टर वगैरे मंडळी त्यांच्या परिचयाचीच होती. कॉलेजमध्यें असतांना ह्या दवाखान्याच्या आवारांतील फुलें डॉक्टर वरेच वेळां तोडीत व त्यामुळें तेथील एका म्हाताऱ्या माळ्याशीं त्यांचे एकदोन वेळां खटकेही उडाले होते.

## खुशाल रिपोर्ट करा!

डॉक्टरांची जबलपूरच्या दवाखान्यांत हाऊस सर्जन म्हणून नेमणूक झाली होती. त्यावेळीं तेथें ले. कर्नल अलेक्झांडर सिल्कॉक नांवाचे गृहस्थ सिव्हिल सर्जन होते. इंजक्शन देण्याच्या पिचकारीवरून एके दिवशीं डॉक्टरांची व त्यांची बाचाबाची झाली. 'तूं मला उलट उत्तरें देतोस? तुझा मी वाईट रिपोर्ट करीन' अशी त्या सिव्हिल सर्जननें डॉक्टरांना धमकी दिली. त्यावर डॉक्टर

त्यांना म्हणाले, "मी दिलेलीं उत्तरें वाईट नाहींत. याउपर तुम्हांला जर माझ्याविरुद्ध रिपोर्ट करावयाचा असेल तर खुशाल करा."

**सरकारचा पगार कशाबद्दल?**

या सिव्हिल सर्जननें पुढें डॉक्टरांना बराच त्रास देणें सुरू केलें. स्वभावानेंही तो जरा विचित्रच होता. एके दिवशीं वार्डमध्यें फिरतीवर आला असतां दोन भिंतींच्या जोडावर किंचित सांचलेला केर, आपल्या हाताच्या बोटानें भिंतीला घासून त्यानें डॉक्टरांना दाखविला आणि म्हणाला, 'तुम्ही स्वच्छता चांगली ठेवीत नाहीं.' डॉक्टर उत्तरले, "इतका केर तर मी तुमच्या येथील भिंतीवरही खास दाखवून देईन. ह्या भिंती केव्हांही झाडल्या, तरी दोन तासांच्या आंत त्यांच्यावर अशीच धूळ सांचलेली तुम्हास दिसून येईल." यानें त्याचें समाधान झालें नाहीं. तेव्हां डॉक्टरसाहेबांनीं त्या वार्डमधील झाडलोट करणाऱ्या भंग्याला असा कानमंत्र दिला, "मी तुला उद्यां तुझ्या झाडलोटीच्या हलगर्जीपणाबद्दल साहेबांपुढें उभा करीन. साहेब तुझ्यावर त्याबद्दल रागावला किंवा दंड केला, तर तूं घाबरूं नकोस. तुझा दंड मी देईन." याप्रमाणें दुसरे दिवशीं सिव्हिल सर्जन जेव्हां हॉस्पिटलमध्यें आले, तेव्हां डॉक्टरांनीं त्या भंग्याला त्याच्या झाडलोटीच्या हलगर्जीपणाबद्दलचा जबाब देण्यासाठीं साहेबापुढें उभें केलें. परंतु सिव्हिल सर्जननें त्याला जबाबदार न धरतां त्याच्या कामाबद्दल डॉक्टरांनाच जबाबदार धरलें. त्यावर डॉक्टर सिव्हिल सर्जनला म्हणाले, "मी जबाबदार कसा? झाडलोट भंगी करतो व त्याबद्दलची आपली चूकही तो कबूल करतो. तेव्हां त्याला जबाबदार न धरतां तुम्ही मलाच जबाबदार धरतां हें आश्चर्य नव्हे काय?"

त्यावर सिव्हिल सर्जन कांहीं एक न बोलतां तेथून निघून गेले. पुढें दोनचार दिवसांनीं ते पुन्हा दवाखान्यांत आले. तेथें टांगलेल्या तसबीरी व त्यांच्या दोऱ्या यांच्यामध्यें सांचलेलीं जळमटें पाहून त्यांनीं पुन्हा तीव्र नापसंती दर्शविली. ते डॉक्टरांना म्हणाले, "डॉक्टर, तुम्ही स्वच्छतेकडे मुळींच लक्ष देत नाहीं. तुम्ही कामचुकार आहां."

त्यावर " हें काम माझें नसून खोली झाडणाराचें आहे, " असा रोकडा जबाब डॉक्टरांनीं दिला.

सिव्हिल सर्जन लागलीच डॉक्टरांना म्हणाले, " छे: तें कांहीं नाहीं. तें काम तुमचेंच आहे. तुम्हीच तें केलें पाहिजे. तुम्हांला त्याबद्दल सरकार पगार देतें. मी उद्यां दवाखान्यांत येईन, तेव्हां अशी अस्वच्छता दिसली तर ती मी सहन करणार नाहीं. " दुसरे दिवशीं डॉक्टरांनीं मोठी गम्मतच केली. दवाखान्यांत आल्याबरोबर त्यांनीं चपराशाकडून दवाखान्यांत टांगलेल्या सर्व तसबिरा खालीं काढून आपल्या टेबलावर ठेवविल्या. त्यावेळीं दवाखान्यांत सुमारें शेंदीडशें रोगी येऊन बसले होते. त्यांच्यापैकीं ज्यांना तावडतोब औषध देणें जरूर होतें, अशा तीन चार रोग्यांना औषध देऊन बाकीच्या सर्वांना तसेंच ताटकळत ठेविलें. थोड्याच अवकाशांत सिव्हिल सर्जनची स्वारी ठरल्याप्रमाणें हॉस्पिटलमध्यें आली. ते दवाखान्यांत येत आहेत असें पाहतांच डॉक्टरांनीं आपल्या अस्तन्या वर सारून, एका फडक्यानें त्या तसबिरी जोरजोरानें घासण्यास सुरवात केली. सिव्हिल सर्जननें दवाखान्यांत पाऊल टाकतांच विचारलें, " डॉक्टर, हें काय करीत आहां ? हे सर्व रोगी अजून औषधाशिवायच बसले आहेत काय ? "

डॉक्टरांनीं उत्तर दिलें, " मी हें सरकारचें काम करीत आहें. ज्याबद्दल सरकार मला पैसे देतें असें काल तुम्ही म्हणालां, तेंच काम मी आज करीत आहें. या बिचाऱ्या रोग्यांचें काय ! ते बिचारे सरकारची मालमत्ता थोडीच आहे ? ह्या तसबिरी सरकारची मालमत्ता आहे ! तुमचा कालचा हुकूम मी अक्षरश: आज पाळीत आहें."

डॉक्टरांचें हें उपरोधिक बोलणें ऐकून तेथें ताटकळत बसलेल्या सर्व रोग्यांत एकदम हंशा पिकला. सिव्हिल सर्जन तर जागच्याजागींच गार झाले. त्यांना कळून चुकलें कीं, आज आपले दांत चांगलेच आपल्या घशांत गेले. डॉक्टरांचा सूड घेण्याचा त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. क्षुल्लक गोष्टींवरूनही ते आतां डॉक्टरांना त्रास देऊं लागले. आपल्या कैचींत

हा कसा सांपडेल, याचीच ते संधि पाहूं लागले. परंतु डॉक्टरांनीं त्यांना कधींच अवसर दिला नाहीं. जबलपूरला त्यांना खाजगी प्रॅक्टिस वरीच असूनही दवाखान्याच्या वेळांत त्यांनीं केव्हांही आपलें काम सोडून रोग्याकडे केवळ पैसा मिळतो म्हणून धांव घेतली नाहीं. त्यांचें चुकतें कोठें यासाठीं तर सिव्हिल सर्जन डोळ्यांत तेल घालून बसला होता. दररोज सारखी कटकट चालू होती. दोघांनाही एकमेकांचा कंटाळा आला होता. अशा स्थितींत सहा सात महिन्यांनीं डॉक्टरांची तेथून उमरावतीला बदली झाली.

**उमरावतीला बदली**

तेथें त्यांची गांठ बुकॅननसाहेबांशीं पडली. हे साहेब तर विचित्रच! एकदां त्यांच्या थिल्लरपणाबद्दल डॉक्टरांनीं त्यांना टेबलावरील रूळच दाखविला होता! 'मांजरावर तुझा विश्वास आहे कीं नाहीं' असा विचित्र प्रश्न प्रथम भेटींतच त्यांनीं डॉक्टरांना विचारला. 'या प्रश्नाचा अर्थच मला समजला नाहीं' असें डॉक्टर त्याला म्हणाले. त्यावर तो म्हणाला, "घरांत मांजर बाळगलें तर उंदीर नाहींसे होऊन प्लेगची भीति राहणार नाहीं." तेव्हां डॉक्टर त्याला म्हणाले, "जगाच्या आरंभापासूनच मांजर व उंदीर पृथ्वीच्या पाठीवर वावरत आहेत. तेव्हां मांजरापासून उंदरांची सबंध जातच जगांतून नाहींशी होईल या गोष्टीवर माझा विश्वास नाहीं."

"मांजरावर तुझा विश्वास नाहीं? पाहतों या महिन्याचा पगार तुला कसा मिळतो तें" असा बुकॅननसाहेबांनीं डॉक्टरांना दाट भरला. डॉक्टर हळूच त्याला म्हणाले, "ईश्वरकृपेनें माझा पगार तुमच्या हातांत नाहीं. मी गॅझेटेड ऑफिसर आहें. माझा पगार मी स्वतःच काढूं शकतों."

खालच्या अधिकाऱ्यांसमोर डॉक्टरांचा मुद्दाम अपमान करण्याची बुकॅननला मोठी द्वाड संवय होती. तसें पाहिलें तर तो मोठा भिरु होता. जरा कां डॉक्टरांनीं डोळा भिरकावला, तर स्वारी कावरीबावरी होई. तरी पण मूळ स्वभाव थोडाच जाणार! एके दिवशीं राजेश्री कांहीं लोकांसह दवाखान्यांत आले व लगेच डॉक्टरांना म्हणाले, "डॉ. खरे, तुमचा स्टेथॉस्कोप या कंपाउंडरला द्या. तो या रोग्याला तपासील." त्या कंपाउंडरचें नांव दावल

असून तो महार होता. आपला पाणउतारा करण्यासाठीं कांहीं तरी कारस्थान रचण्यांत आलें आहे हें डॉक्टरांनीं चटकन ओळखलें. त्यांनीं कंपाउंडरला तावडतोब स्टेथॉस्कोप दिला व आपण स्वस्थ गम्मत पाहत उभे राहिले. लागलीच बुकॅननसाहेब डॉक्टरांकडे वळून त्यांना म्हणाले, "डॉ. खरे, कंपाउंडरला शिकविणें फार सोपें आहे. परंतु सब-असिस्टंट सर्जनला शिकविणें कठीण; आणि असिस्टंट सर्जनला शिकविणें तर त्याहूनही कठीण आहे," असें बोलून मोठ्या विजयी मुद्रेनें ते डॉक्टरांकडे पाहत उभे राहिले. डॉक्टरांनींही लगेच मोठ्या व्याजोक्तीनें त्यांच्या प्रश्नाला होकारार्थी मान हलवून म्हटलें, "तर मग सिव्हिल सर्जनला शिकविणें हें किती कठीण महाकर्म असलें पाहिजे?"

डॉक्टरांच्या या भेदक उत्तरानें बुकॅनन साहेबांचा वर्फच बनला!

**साहेबाचें 'निदान' खोटें ठरविलें**

या भिषग्वर्यांच्या अगाध वैद्यकीय ज्ञानाचा तर डॉक्टरांनीं एकदां खूबच बोजवारा उडविला. एका प्लुरसीच्या रोग्याला त्यांनीं तपासून सांगितलें होतें कीं, विशेष आजार वगैरे कांहीं नाहीं; डिस्पेप्शियाचा किंचित संशय येतो. त्यांच्या या निदानाला डॉक्टरांनीं कसून विरोध केला व ही प्लुरसीची केस आहे असें ठांसून सांगितलें. त्यांनीं लगेच त्या रोग्याच्या छातीच्या दोन्ही भागांचें माप घेऊन ज्या भागांत पाणी झालें होतें तो भाग दुसऱ्या भागापेक्षां मापांत जास्त भरल्याचें दाखवून दिलें. इतकेंच नव्हे तर त्याच्या छातींत सुई खुपसून तींतून त्यांनीं पाणी काढून दाखविलें व आपलें निदानच खरें असल्याचें सिद्ध करून दिलें. सिव्हिल सर्जन साहेबांनीं यापुढें असल्या बाबतींत डॉक्टरांशीं बिलकुल विरोध करावयाचा नाहीं अशी आपल्या मनाशीं पक्की खूणगांठ बांधली. मात्र इतर बाबतींत, मग त्या कितीही क्षुल्लक कां असेनात, त्याबद्दल डॉक्टरांना त्रास देण्याच्या आपल्या व्रतांत बिलकूल खंड पडूं नये, याबद्दल ते सदैव जागरूक राहिले.

**हातघाईवर आलें**

एके दिवशीं आमनेरचा कोणी देशपांडे नांवाचा रोगी दवाखान्यांत आला असतां 'माझी सिव्हिल सर्जनशीं भेट करून द्या' असें तो डॉक्टरांना

म्हणाला. डॉक्टरांनीं त्याला सांगितलें, 'थोड्याच वेळांत सिव्हिल सर्जन येतील तेव्हां तुम्ही त्यांना भेटा. भेट करून देण्याला मी कांहीं कोणाचा दलाल नाहीं. येथें तीन डॉक्टर आहेत. त्यांपैकीं कोणालाही भेटून तुम्ही औषध घेऊं शकतां.' यावर 'तुम्हींच मला तपासाना', असें तो म्हणाला. त्याच्या म्हणण्याप्रमाणें डॉक्टरांनीं त्याला तपासलें व औषध देऊन हॉस्पिटलच्या नियमाप्रमाणें त्याच्या जवळून दोन आणे घेऊन त्याबद्दल त्याला पावती दिली. इतक्यांत सिव्हिल सर्जन तेथें आल्यावर देशपांडे यांनीं ही सर्व हकीकत त्यास सांगितली. त्यानें सिव्हिल सर्जनला, "औषधाबद्दल डॉक्टरांनीं आपल्या-जवळून दोन आणे घेऊन सिव्हिल सर्जनशीं भेट करून देण्याला आपण कांहीं कोणाचे दलाल नाहीं" असेंही सांगितलें. हें ऐकतांच सिव्हिल सर्जनला वाटलें, या डॉक्टरनें त्या रोग्याला जर आपल्याकडे आणलें असतें तर आपल्याला खाजगी प्रॅक्टिस मिळाली असती, ती यानें बुडविली. डॉक्टर त्यावेळीं पोस्टमॉर्टम रूममध्यें होते. तेथें हे राजेश्री पोचले व खोलीच्या दाराशीं उभे राहून मोठ्या अधिकारवाणीनें डॉक्टरांना म्हणाले, "डॉक्टर, या देशपांड्याला तुम्ही काय सांगितलें? येथें सिव्हिल सर्जनला प्रॅक्टिस नाहीं हें तुम्हांला माहीत नाहीं काय? त्या देशपांड्याला तुम्ही माझ्याकडे कां नाहीं आणलें? अशा माणसाकडून फक्त दोन आणे घेऊन तुम्ही त्याला औषध दिलें? काय हा तुमचा मूर्खपणा?"

"हां, तोंड सांभाळून बोला! असले अपमानकारक शब्द मी कदापि ऐकून घेणार नाहीं" डॉक्टरांनीं गंभीर शब्दांत बुकॅननला इशारा दिला.

"काय करणार आहेस तूं माझें?" असें मोठ्या ऐटीनें उद्गार काढून बुकॅननसाहेबांनीं आपल्या हाताच्या मुठी वळविल्या व ते डॉक्टरांच्या अंगावर चालून जाणार, तोंच अत्यंत संतापाच्या आवेशांत डॉक्टर त्यांना म्हणाले, "साहेब, जरा विचार करा. यावेळीं माझ्या हातांत शवच्छेदनशस्त्र (प्रेत कापण्याचा चाकू) आहे. तुमचा आघात मी या शस्त्रावर झेलीन. त्यामुळें तुम्हाला अपघात झाला तर त्याची जबाबदारी माझ्यावर नाहीं. या शस्त्राच्या क्षुल्लक जखमेच्या अति भयंकर परिणामाची तुम्हाला कल्पना असेलच."

या झणझणींत अंजनानें बुकॅननसाहेबांची खाडकन धुंदीच उतरली. त्यांनीं तडक तेथून मोठ्या शिस्तीनें माघार घेऊन 'य:पलाय' केलें.

**बुकॅननचा थिल्लरपणा**

बुकॅननसाहेब विचित्र खरेच! आपल्या टमटममधून ते एके दिवशीं दवाखान्यांत आले. डॉक्टरांना पाहतांच ते आपल्या सईसाला म्हणाले, "ये देखो मणी, ये डॉ. खरे मेरा कुछ सुनताहि नहि. तुम तोबी इसकु कुछ समझाव." मणी जरा मिस्किलच होता. आपला मालक कसा आहे याची त्यालाही चांगलीच जाणीव होती. त्यानें साहेबांच्या आदेशाप्रमाणें लगेच डॉक्टरांकडे वळून त्यांना सलाम केला व म्हटलें, "हुजूर, आपने भी जरा गम खाना चाहिये (आणि हळूच बुकॅननसाहेबांना ऐकूं न जाईल अशा आवाजांत व हंसून) और इन्होंने भी कुछ सोचना चाहिये."

मणीचा हा मिस्किलपणा पाहून डॉक्टर हंसलेच. ते बुकॅननला म्हणाले, "तुमचा हा साराच प्रकार मोठा थिल्लरपणाचा आहे. हा मणी माझें काय वांकडें करणार? तुम्हांलाच जें काय करावयाचें असेल तें खुशाल करा. मी कांहीं तुम्हाला भीत नाहीं. मला माहीत आहे, तुम्ही नंबर एकचे भीरु आहांत!"

**वडतर्फीचा घाट फसला**

या दररोजच्या कटकटींचा परिणाम पुढें असा झाला कीं, या दोघांचें संभाषण बंद होऊन लिखापढीनें सर्व व्यवहार सुरू झाला. डॉक्टरांशीं कांहींही काम पडो, बुकॅननसाहेबांनीं त्यांना चिठ्ठी पाठवावी व डॉक्टरांनींही त्याच चिठ्ठीवर आपलें उत्तर किंवा जें काय म्हणणें असेल तें, बुकॅननला लिहून पाठवावें. निराळ्या स्वतंत्र कागदावर डॉक्टरांनीं कधींही त्याला कांहीं लिहून पाठविलें नाहीं. असा क्रम जवळजवळ ५-६ महिने चालला. हा डॉ. खरे आपल्याला बिलकुल जुमानीत नाहीं हें शल्य बुकॅननला स्वस्थ बसूं देईना. त्यांनीं त्यावेळचे उमरावतीचे डे.कमि. मेजर फ्रँक रोलंड मेटकाफ चार्ल्स डी रिटिक मोडवी आणिं कमिशनर मि. फ्रँक स्लाय (नंतर या प्रांताचे गव्हर्नर) यांच्या कानीं लागून डॉक्टरसाहेबांच्या विरुद्ध एक कट रचून त्यांना वडतर्फ

करण्याचा घाट घातला. उमरावतीचे प्रसिद्ध नेमस्त पुढारी कै. रा. ब. मुधोळकर यांनीं ही बातमी डॉक्टरसाहेबांना दिली होती. या तिघांनीं डॉक्टरांच्या विरुद्ध एक नोट लिहून वरच्या अधिकाऱ्याकडे पाठविली. परंतु या वरच्या अधिकाऱ्यानें बुकॅननसाहेबांशीं डॉक्टरांचा झालेला सर्व पत्रव्यवहार पाहून त्यांच्याविरुद्ध कोणताच आरोप शाबीत होऊं शकत नाहीं, असा अभिप्राय व्यक्त केला आणि डॉक्टरांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई करण्याचें नाकारलें. अशा रीतीनें डॉक्टरसाहेबांना बडतर्फ करण्याचे या तिघां महाभागांचे प्रयत्न निष्फळ ठरले. स्लायसाहेबांचा शॉफर एकदां आजारी असतां त्यांनीं त्याला पाहण्याकरतां डॉक्टरांना दोनदां बोलाविलें होतें. त्यावेळीं बुकॅननसाहेब कांहीं दिवसांच्या रजेवर गेल्यामुळें डॉक्टरसाहेब त्यांच्या जागीं हंगामी सि. सर्जन झाले होते. त्यांनीं प्रत्येक 'व्हिजिट'चे १६ रु. प्रमाणें दोन व्हिजिटचे ३२ रु. बिल स्लायसाहेबांना पाठविलें. हेंच बहुधा डॉक्टरांच्या विरुद्ध कटांत सामील होण्याला स्लायसाहेबांना कारण झालें असावें!

बुकॅननसाहेब रजेवर गेल्यावर सुमारें १५ दिवसांनीं त्यांच्या जागीं मि. जेम्स चार्ल्स स्टुअर्ट ऑक्स्ले नांवाचे गृहस्थ सिव्हिल सर्जन म्हणून आले. हे साधारणतः सरळ स्वभावाचे गृहस्थ असल्यामुळें त्यांचें व डॉक्टरांचें सूत बरें जमलें. विशेष असा खटका कधीं उडाला नाहीं. सहा महिन्यानंतर बुकॅनन साहेब जेव्हां परत आले तेव्हां पुन्हा पूर्वीचीच कटकट सुरू झाली. एके दिवशीं नॉर्मल स्कूलच्या कांहीं विद्यार्थिनींना 'हेल्थ सर्टिफिकेटस' पाहिजे होतीं. सर्टिफिकिटें स्वतः सिव्हिल सर्जननेंच भरावीं असा दंडक असल्यामुळें डॉक्टरांनीं त्या विद्यार्थिनींना तपासण्याची गरजच नव्हती. परंतु "या मुलींना तूं कां तपासलें नाहींस? तूं आपल्या कर्तव्यांत कुचारपणा करतोस. अधिकाऱ्यांशीं कसें बोलावें हें तुला बिलकूल समजत नाहीं. तूं अगदीं मूर्ख आहेस," अशा तऱ्हेचें विद्यार्थिनी, नोकरलोक व इतर रोगी यांच्या देखत बुकॅननसाहेब अद्वातद्वा बोलूं लागले. त्यावेळची त्यांची एकूण भाषा मोठीच अपमानास्पद होती. डॉक्टरांनीं या असभ्य प्रकाराची मोजक्या शब्दांत जाणीव करून दिली व अत्यंत मनः-संतापांत ते निघून गेले. थोड्याच वेळांत बुकॅननसाहेबांचा चपराशी डॉक्टरांच्या खोलींत येऊन त्यांना म्हणाला, "हुजूर, साब सलाम कहते है."

**बुकॅननला रूळ दाखविला**

डॉक्टर संतापांतच होते. त्यांना वाटलें, आपला अधिक अपमान करण्याच्या हेतूनेंच बुकॅननने आपल्याला बोलाविलें आहे. आपण जर गेलों तर आपला राग अनिवार होऊन भलताच प्रसंग गुदरेल. म्हणून त्यांनीं रागानेंच त्या चपराशाला, 'तुमारे साबकी ऐशी तैशी' असें दरडावून सांगतांच तो तेथून तडक बुकॅनन साहेबांच्या खोलीकडे निघून गेला. परंतु थोड्याच वेळानें पुन्हां तो डॉक्टरांच्या खोलींत हजर झाला व म्हणाला, 'हुजूर, साब सलाम कहते है.' आतां मात्र डॉक्टरांचा राग अनिवार झाला. टेबलावर पडलेला रूळ घेऊनच ते आपल्या खोलीबाहेर पडले आणि बुकॅननच्या खोलींत दाखल झाले. डॉक्टरांची ती संतापानें लाल झालेली मुद्रा व हातांतील रूळ पाहून बुकॅननसाहेब चपापलेच. त्यांनीं खालच्या सुरांतच डॉक्टरांना, 'हा रूळ कशाला?' असें विचारलें. डॉक्टरांनीं तत्काळ त्यांना उत्तर दिलें, "आतांच थोड्या वेळापूर्वीं येथें घडलेला प्रकार मी विसरलों नाहीं. मघांशीं तुम्ही केलेला अपमान मी मोठ्या प्रयत्नपूर्वक गिळला. आतां मात्र तुम्ही तसल्या प्रकारचा एक शब्द उच्चारा, कीं त्याबरोबर या रूळानें तुमचें डोकें फुटलेंच म्हणून समजा. मग मला तुरुंगांत जावें लागलें तरी बेहेत्तर."

या निर्वाणीच्या धमकीनें बुकॅननसाहेबांना चांगलीच धडकी भरली. क्षणाचाही विलंब न लावतां आपली हॅट टेबलावरून उचलून तेथून त्यांनीं पोबारा केला.

**बुकॅननचें कारस्थान**

बुकॅननसाहेब स्वस्थ बसणारे माणूस थोडेच होते! त्यांनीं डॉक्टरांच्या विरुद्ध आय. जी. कडे तक्रार करून त्यांना बडतर्फ करण्याची शिफारस केली. या आय. जी. चें नांव कर्नल जी. डब्ल्यु. पी. डेनीस असें होतें. त्यांच्याकडे बुकॅननसाहेबांच्या विरुद्ध डॉक्टरांनींही एक निराळी तक्रार केली. परंतु योगायोग असा कीं, त्यावेळीं डेनीस रजेवर गेल्यामुळें हे बुकॅननच त्यांच्या जागीं हंगामी आय.जी. झाले. तेव्हां सदर तक्रार आतां अनायासेंच याच्या हातांत पडेल व त्यामुळें तिची वासलात कशी काय लागेल या विचारानें डॉक्टर जरासे

अस्वस्थच झाले. परंतु यावरही त्यांनीं एक तोड काढली. त्यावेळीं आय.जी. च्या ऑफीसमध्यें शेख फरीद नांवाचा एक मुसलमान कारकून होता. त्याला विश्वासांत घेऊन त्याच्याकडून डॉक्टरांनीं आपली तक्रार बुकॅननच्या हातांत पडण्यापूर्वींच हस्तगत केली.

**खुनी कोण ? चित्पावन कीं इंग्रज ?**

कर्नल डेनीस आय. जी. असतांना एकदां उमरावतीला हॉस्पिटलच्या तपासणीसाठीं गेले होते. त्यांनीं डॉक्टरांना आपल्या मुक्कामावर भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें डॉक्टर त्यांच्या भेटीला गेले. भेटींत प्रथम कुशल प्रश्न वगैरे झाल्यावर डेनीससाहेब म्हणाले ‘तुम्ही चित्पावन ब्राह्मण नाहीं असें मी समजतों.’ त्यावर ‘मी चित्पावन ब्राह्मणच आहें’ असें ठांसून सांगून ‘मला त्याबद्दल अभिमानही आहे’ असें डॉक्टरांनीं उत्तर दिलें.

डेनीससाहेब म्हणाले, “मला चित्पावन ब्राह्मण बिलकूल आवडत नाहींत. त्यांची मला मनापासून चीड आहे. मला त्यांच्यापेक्षां पंजाबी मुसलमानच अधिक बरे वाटतात.”

डॉक्टरांनीं ताडकन उत्तर दिलें, “बरोबरच आहे! तुम्हांला ते आवडणारच! कदाचित ते तुमचे बुटचाटे असतील! माझ्याकडून तशी चुकूनही अपेक्षा करूं नका.”

“अहो, सर्वच चित्पावन राजद्रोही आणि खुनीही पण आहेत.” असे डेनीस साहेबांनीं नंतर उद्गार काढले. ते पुढें म्हणाले, “कान्हेरे नांवाच्या एका चित्पावन तरुणानें नाशिकला नुकताच बिचाऱ्या जॅक्सनचा खून केलाच कीं नाहीं? चित्पावनांना असले खून करणें फार आवडतें.”

डेनीससाहेबांना डॉक्टरांनीं यावर मोठें मार्मिक उत्तर दिलें. ते म्हणाले, “तुम्ही म्हणतां तसलें कृत्य कान्हेरे नांवाच्या चित्पावन तरुणानें केलें हें मला माहीत आहे. पण, त्याच्या एकट्याच्या तसल्या कृत्याबद्दल तुम्ही सबंध चित्पावन समाजच खुनी ठरवूं पाहतां हें योग्य नव्हे. चित्पावन समाजांतील एकाददुसरा इसम खुनी असला म्हणजे सबंध मानवजातच खुनी आहे, असें म्हणण्यासारखेंच तुमचें हें विधान आहे.”

त्यावर डेनीससाहेब डॉक्टरांना म्हणाले, "तशा रीतीनें तुम्ही या प्रश्नाकडे पाहूं नका. चित्पावन ब्राह्मणांची सबंध जातच आम्हा इंग्रजांच्या विरुद्ध असून अशा तऱ्हेचे हीन प्रकार करण्यांत ती भूषण मानते, ही गोष्ट तुम्ही नाकारूं शकत नाहीं."

डेनीससाहेबांच्या याही विधानाच्या डॉक्टरसाहेबांनीं तात्काळ ठिकऱ्या उडविल्या. ते म्हणाले, "समजा, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें सबंध चित्पावन जात खुनी आहे असेंही गृहित धरलें तरी तें कांहीं अस्वाभाविक नाहीं. तुम्ही इंग्रज लोक या देशांत येण्यापूर्वीं या देशाच्या बऱ्याच मोठ्या भागावर चित्पावनांचाच—पेशव्यांचा—प्रत्यक्षाप्रत्यक्ष अम्मल होता. तेव्हां येवढ्या मोठ्या देशावरील आपली राजकीय सत्ता नाहींशी झाल्याबद्दल त्यांना जर विशाद वाटत असेल तर तें मनुष्यस्वभावाला धरून नाहीं काय ? तुमचा इंग्रजांचा इतिहास तरी काय सांगतो ? केवळ अडीचशें वर्षांपूर्वीं तुमच्या क्रॉम्वेलनें आपला राजा पहिला चार्ल्स् याचा भर रस्त्यांत शिरच्छेद करून त्याचें शिर वेशीला टांगल्याचें तुम्हाला माहीत आहेच. तेव्हां मी आतां असें म्हणावें काय कीं एकट्या क्रॉम्वेलच्या असल्या खुनी कृत्यावरून सबंध इंग्रज लोकच राजघातकी व खुनी आहेत ?"

डॉक्टरांच्या या बिनतोड उत्तरानें डेनीससाहेब निरुत्तरच झाले. ते डॉक्टरांना म्हणाले, "डॉक्टर, मला वाटतें मी तुम्हाला दुखविलें नाहीं."

**बिलासपुरला बदली**

उमरावतीला असतां डॉक्टरांची दोनदां दोन दोन महिन्यांसाठीं एलिचपुरला बदली झाली. बुकॅननसाहेब आय. जी. झाल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यांनीं आतां डॉक्टरांची बिलासपुरला बदली करून डॉक्टरांच्या व आपल्याही मागची पीडा टाळली. बिलासपुरला १९११ च्या सुरुवातीला डॉक्टरसाहेब आपल्या कामावर रुजू झाले. तेथें ते सुमारें तीन वर्षें होते. त्यावेळीं तेथें कर्नल टॉमस कॉरी रुदरफर्ड नांवाचे गृहस्थ सि. सर्जन होते. त्यांचे व डॉक्टरांचे आंकडे चांगले पटले. विशेष त्रास झाला नाहीं. उलट, बुकॅननने डॉक्टरांच्या विरुद्ध रचलेल्या कारस्थानाची गुप्त व महत्वाची माहिती त्यांनीं

डॉक्टरांना सांगितली. त्यांच्या या माहितीचा परिणाम पुढें असा झाला कीं, बुकॅननच्या शिफारसीवरून डॉक्टरांची होऊं घातलेली बडतर्फी जेथल्या तेथेंच जिरली. सि.सर्जन क.रुदरफर्ड आणि डॉक्टरसाहेब यांचे संबंध जवळ जवळ मित्रत्वाचेच होते. दोघेही नेहमीं निरनिराळ्या विषयांवर, राजकीय आणि स्वराज्याविषयींही, वादविवाद करीत. एका रोग्यावर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी एके दिवशीं नळावर हे दोघेही हात धूत असतां दवाखान्याच्या आवारांत कांहीं गुरें शिरलीं. त्यांच्यामागें त्यांची राखण करण्याकरितां हिंडत असलेल्या एका उघड्या नागड्या राऊताला पाहून रुदरफर्ड डॉक्टरांना म्हणाले, "डॉक्टर, तुम्हाला स्वराज्य पाहिजे काय? त्या गुराख्याकडे तर पहा. बिचाऱ्याचें जीवन ह्या गुरांपेक्षां अधिक चांगलें आहे काय?"

डॉक्टरांनीं लगेच उत्तर दिलें, "बरोबर आहे! तुमच्या पाटलोणीचे पैसे त्या बिचाऱ्याला द्यावे लागतात ना?"

डॉक्टरांच्या या खोंचदार वाक्यानें रुदरफर्ड चकीतच झाले. थोड्याच दिवसांनीं त्यांचेच जातभाई मानवी प्राण्यांबद्दल व विशेषत: हिंदी माणसाबद्दल किती बेगुमान व निष्काळजी असतात, याचें एक ढळढळीत उदाहरण डॉक्टरसाहेबांनीं रुदरफर्डच्या निदर्शनास आणलें.

**काळा गोरा!**

त्यावेळीं बिलासपुरला मि. वेस्ट नांवाचे एक डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफीसर होते. ते एका लॉर्डचे चिरंजीव असल्यामुळें त्यांना 'ऑनरेबल मि. वेस्ट' म्हणत. डॉक्टरसाहेब मात्र आपल्या मंडळींत त्यांना विनोदानें 'डिस्‌ऑनरेबल मि. वेस्ट' असें म्हणत. डॉक्टरांनीं दिलेलें हें नांव ऑनरेबल मि. वेस्ट यांच्या पुढील कृतीवरून खरोखरच सार्थ ठरलें. एके दिवशीं रात्रीं ऑनरेबल मि. वेस्ट आपल्या परिवारासह खाद्यपेयांत व पत्ते खेळण्यांत दंग होते. त्यावेळीं बी. एन्. रेल्वेचा मि. फिल्ब्रिक नांवाचा एक युरोपियन डॉक्टरही तेथें हजर होता. या गुलहौशी लोकांना एक म्हातारी हिंदी बाई पंखा ओढून वारा घालीत होती. पंखा ओढतां ओढतां बिचारीला मूर्च्छा येऊन ती बेशुद्ध झाली. ऑनरेबल मि. वेस्टनें तेथें असलेले डॉ. फिल्ब्रिक यांना त्या म्हाताऱ्या बाईला औषधोपचार करण्यास न

सांगतां आपल्या शिपायाला तेवढ्या रात्रीं बिनाकंदिलानें डॉक्टरांकडे पाठविलें. ती रात्र काळोखी होती. घरीं गाडी असूनही ती डॉक्टरांना पाठविण्याची त्यांनीं तसदी घेतली नाहीं! घरचा कंदील घेऊन डॉक्टरसाहेब त्या बाईला पाहण्यास गेले. ऑनरेबल मि. बेस्ट यांच्या दिवाणखान्यांत शिरतांच तेथील एकंदर दृश्य पाहून त्या म्हातारीच्या आजाराची डॉक्टरांना तत्काळ कल्पना आली. आवश्यक ते उपचार करून त्या म्हाताऱ्या बाईला त्यांनीं थोड्याच अवकाशांत शुद्धीवर आणलें व आपल्याच मजेंत मस्त असलेल्या तेथील सर्व मंडळींना 'गुडबाय' करून ते आपल्या घराकडे परतले. ज्या म्हाताऱ्या बाईच्या श्रमानें ही सारी मंडळी थंड वारा घेऊन मजा मारीत होती, त्या बाईच्या मूर्च्छावस्थेंत त्यावेळीं तेथें एक डॉक्टर हजर असूनही त्यानें तिला ताबडतोब उपचार करण्याची थोडीशीही कदर बाळगली नाहीं, याची डॉक्टरसाहेबांना मनस्वी चीड आली. गरीब काळ्या आदमीला गोरा डॉक्टर कसा पाहील!

पुढें ७-८ दिवसांनीं डॉक्टरसाहेबांनीं या रात्रीच्या 'व्हिजिट'बद्दल ऑनरेबल मि. बेस्ट यांना ८ रुपयांचें बिल पाठविलें. हें बिल पहातांच त्यांचें पित्त खवळलें. सामान्यतः चार रुपये डॉक्टराची फी असून आपल्याला आठ रुपये बिल करण्यांत आल्याबद्दल त्यांनीं डॉक्टरांच्या विरुद्ध सिव्हिल सर्जनकडे तक्रार केली. या तक्रारीची डॉक्टरांकडे चौकशी करतां सिव्हिल सर्जन क. रुदरफर्ड यांच्याजवळ डॉक्टरांनीं आठ रुपयांचें बिल केल्याचें कबूल केलें. तेव्हां तुम्ही आठ रुपयांचें बिल कां केलें असा सिव्हिल सर्जननें डॉक्टरांना प्रश्न केला. तेव्हां डॉक्टरांनीं त्यांना पुढीलप्रमाणें उत्तर दिलें—"तुम्ही स्वतः रात्रीच्या वेळीं व्हिजिटला गेलां म्हणजे १६ रुपयांऐवजीं ३२ रुपये बिल करतां, मग आम्ही तशाच परिस्थितींत ४ रुपयांऐवजीं ८ रुपये बिल केलें तर बिघडलें कुठें? शिवाय, ज्या ऑनरेबल मि. बेस्टकडे मी रोगी पाहण्यासाठीं गेलों, त्यांच्या येथें गाडी असूनही ती त्यांनीं पाठविली नाहीं. इतकेंच नव्हे तर चपराशाबरोबर कंदीलही पाठविला नाहीं. अहो, ज्या बाईला पाहण्यासाठीं मला तेथें बोलावण्यांत आलें होतें, ती बाई पंखा ओढून त्या लोकांना थंड वारा देत होती व हे सारे लोक मजा मारीत होते. त्यावेळीं तेथें डॉ. फिल्ब्रीक हे हजर

असूनही त्यांनीं त्या बाईला साधा प्रथमोपचारही केला नाहीं. ही तर या लोकांची माणुसकी! त्या बाईला तसेंच पडूं देऊन हे लोक स्वत: मजा मारीत बसले. ही तर तुह्मा गोऱ्या लोकांना आम्हा काळ्या लोकांबद्दल कदर आहे! अशा स्थितींत मी आठ रुपयांचें बिल पाठविलें तर त्यांत गैर तें काय केलें? त्याशिवाय आम्ही आपला संताप तरी कसा व्यक्त करावा?"

डॉक्टरसाहेबांचें हें सारें म्हणणें सिव्हिल सर्जनला पटलें. ते डॉक्टरांना म्हणाले, "डॉक्टर, तुमचें म्हणणें बरोबर आहे. ऑनरेबल मि. बेस्टचें हें कृत्य अगदीं गर्हणीय आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें डॉ. फिल्ब्रिकनें त्या बाईला ताबडतोब उपचार करावयास पाहिजे होता. तुमचें म्हणणें रास्त आहे, असेंच मी ऑनरेबल मि. बेस्ट यांना सांगणार आहें."

सिव्हिल सर्जननें पुढें ऑनरेबल मि. बेस्टला पत्र पाठवून कळविलें कीं, डॉ. खरे यांनीं पाठविलेलें आठ रुपयांचें बिल योग्य आहे.

ऑनरेबल मि. बेस्टकडून नंतर कांहीं दिवसांनीं डॉक्टरांना त्यांच्या बिलाचे आठ रुपये व त्याबरोबर एक पत्र आलें. या पत्रांत त्यांनीं डॉक्टर-साहेबांना "जगांत तुला अद्याप पुष्कळ दिवस काढावयाचे आहेत. अशा रीतीनें जर तूं वागलास तर तुला प्रॅक्टिस मिळणार नाहीं. तरी अशा तऱ्हेचें आपलें वर्तन तूं बदललें पाहिजे," असा मोठा मानभावीपणाचा उपदेश केला.

डॉक्टरसाहेबांनींही उलट त्यांना पत्र लिहून ८ रुपये पाठविल्याबद्दल व अनाहूतपणीं उपदेश केल्याबद्दल आभार मानले व त्याबरोबरच त्यांना असेंही कळविलें कीं, "जग अफाट आहे. आपण माझ्या प्रॅक्टिसबद्दल बिलकूल काळजी करूं नये!"

**हंगामी सिव्हिल सर्जन**

पुढें कांहीं दिवसांनीं मि. रुदरफर्ड यांनीं सहा महिन्यांची रजा घेतली. त्यांच्या जागीं युरोपियन आय्. एम्. एस्. अधिकारी येईपर्यंत डॉक्टरसाहेब तीन महिन्यांसाठीं बिलासपुरला तात्पुरते सि. सर्जन झाले. असिस्टंट सर्जनच्या जागीं दुसरा स्वतंत्र इसम नेमला नसल्यामुळें डॉक्टरसाहेबांना तेंही काम करावें

लागे. हें काम सांभाळून सिव्हिल सर्जन म्हणून आपण दवाखान्यांच्या तपासणी-साठीं जिल्ह्यांत दौरा करावा कीं नाहीं असें डॉक्टरांनीं आय्. जी.ला विचारलें. यावेळीं कर्नल बरातवाला हे गृहस्थ आय्.जी.च्या जागेवर होते. त्यांनीं, डॉक्टरांनीं सध्यांच दौरा करूं नये असें कळविलें. त्याप्रमाणें डॉक्टर दौरा करण्याच्या भानगडींत पडले नाहींत. पण, पुढें लौकरच बिलासपुर जिल्ह्यांत कटघोरा तहसिल नांवाचा नवीनच तहसिल निर्माण करावयाचा होता. तेथें नवीन नवीन सरकारी इमारती बांधावयाच्या होत्या. त्या इमारतींसाठीं जागेची निवड करण्याकरितां एक कमेटी नेमण्यांत आली. त्या कमेटींत डॉक्टरसाहेबही असल्यामुळें साहजिकच त्यांना कटघोरा येथें जावें लागलें. या प्रवासाचें प्रवासभत्ता बिल त्यांनीं आय्. जी. कडे पाठविलें. सध्यांच दौरा न करण्याबद्दल जरी पूर्वीं या आय्. जी.नें डॉक्टरसाहेबांना हुकूम दिला होता, तरी त्यांनीं डॉक्टरांच्या या प्रवासाचें बिल मंजूर केलें. पुढें अशाच कांहीं कामाकरितां डॉक्टरसाहेबांना दोन तीन वेळां दौरा काढावा लागला. याही दौऱ्यांचें प्रवासभत्ता बिल आय्.जी.नीं मंजूर केलें. पुढें जिल्ह्यांतील दवाखान्यांच्या तपासणीसाठीं डॉक्टरांनीं दौरा काढला व त्याही दौऱ्याच्या प्रवासभत्त्याचें बिल मंजूर झालें. त्यावेळीं बिलास-पुरच्या सिव्हिल सर्जनला जिल्ह्यांतील सरकारी दवाखान्यांव्यतिरिक्त जवळ-पासच्या हिंदी संस्थानांतील दवाखानेही तपासावे लागत. त्याबद्दल सिव्हिल सर्जनला ठराविक मुशाहिरा व प्रवासभत्ता मिळे. मात्र ही रक्कम वर्षाच्या शेवटीं डिसेंबरांत मिळत असे. अशा कांहीं दवाखान्यांची डॉक्टरसाहेबांनीं तपासणी केली होती व त्याबद्दल पुढें संस्थानच्या दप्तराकडून त्यांना मुशाहिरा व प्रवासभत्ता मिळावयास पाहिजे होता. पण, पुढें थोड्याच दिवसांत ज्या युरोपियन आय्.एम्.एस्. अधिकाऱ्याची सिव्हिल सर्जन म्हणून बिलासपुरला नेमणूक व्हावयाची होती तो अधिकारी कामावर रुजू झाला. त्याचें नांव मेजर आर.ए. लॉइड असें होतें. मे. लॉईड हा गृहस्थ लष्करी खात्यांतून मुलकीमध्यें नवीनच आल्यामुळें त्याला मुलकीमध्यें वारंवार गरज पडणाऱ्या शस्त्रक्रियांची संवय नव्हती. डॉक्टरांनीं त्याला मोतिबिंदु, मुतखडा वगैरे शस्त्रक्रिया करण्याच्या विशिष्ट पद्धतींची प्रात्यक्षिक माहिती दिली. लोकांच्या नजरेंतून ही गोष्ट सुटली

नसल्यामुळें साहजिकच त्यांच्या दृष्टीनें या नवशिक्यापेक्षां अशी शस्त्रक्रिया हे लोक डॉक्टरसाहेबांकडून करून घेत. ही गोष्ट पुढें त्याच्या लक्षांत आली. तो चिडला आणि 'मला काम मिळूं नये म्हणून तूं मुद्दाम अशी व्यवस्था करतोस' असा डॉक्टरांवर त्यानें आरोप केला. डॉक्टरांनीं 'हें साफ खोटें असून तुमच्या कच्चेपणा-चाच हा परिणाम आहे' असें त्यास चोख उत्तर दिलें. येथूनच दोघांच्या वैमनस्याला सुरवात झाली. याच सुमारास म्हणजे १९१३ डिसेंबरांत डॉक्टरसाहेब एम.डी.च्या परीक्षेकरितां कांहीं दिवसांची रजा घेऊन लाहोरला जाऊन राहिले. हा काळ वर्षअखेरीचा असल्यामुळें डॉक्टरांनीं पूर्वीं सिव्हिल सर्जन म्हणून ज्या संस्थानी दवाखान्यांची तपासणी केली होती, त्याबद्दलच्या मुशाहिऱ्याची आणि प्रवास-भत्त्याची रक्कम त्यांच्या नांवें आली. ते सिव्हिल सर्जन असतांना ज्या मुसलमान हेडक्लार्कवर त्यांनीं बरेच उपकार केले होते त्यानेंच डॉक्टरांनीं हुकुमाच्या विरुद्ध दौरे काढले व पैसे मिळविले अशी सिव्हिल सर्जनच्या कानाशीं चुगली लावली. त्यामुळें सिव्हिल सर्जनचें मन अधिकच कलुषित झालें. त्यानें डॉक्टरांना रजिस्टर पत्र पाठवून 'आय्. जी.च्या हुकूमाचा भंग करून तुम्ही दौरा कां काढला असा डॉक्टरांना जाब विचारला. डॉक्टर त्यावेळीं अभ्यासांत व्यग्र असल्यामुळें, आतांच कोण उत्तर देतो, पुढें बिलासपुरला गेल्यावर पाहूं, असें मनाशीं ठरवून ते स्वस्थ बसले. पण, सिव्हिल सर्जनला धीर कुठला! त्यानें लगेच तारेनें डॉक्टरांची कैफियत मागितली. उलट डॉक्टरांनींही त्याला तारेनें कळविलें, 'मी येथून कांहींही कैफियत देऊं शकत नाहीं. बिलासपुरला आल्यावर मला जें काय म्हणावयाचें आहे तें मी म्हणेन.'

### एम्.डी.ची परीक्षा उत्तीर्ण

पुढें थोड्याच दिवसांत डॉक्टर एम्. डी.च्या परीक्षेला बसले. तींत ते उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाले. परीक्षेच्या आधीं डॉक्टर लाहोरला १५-२० दिवस आजारी पडले. त्यांना काळजाचा विकार याच वेळीं प्रथम जडला. त्यावेळीं तेथें असलेल्या डॉ. हिरालालनीं त्यांना तपासून तेथून डॉक्टरांनीं ताबडतोब निघून जावें, परीक्षेच्या भानगडींत बिलकुल पडतां कामा नये असा स्पष्ट अभिप्राय दिला. परंतु परीक्षा दिल्याशिवाय आपण येथून हालणार नाहीं, एक

तर आपण परीक्षेला वसूं किंवा आपलीं हाडें रावीनदीच्या कांठीं जळतील, असे निर्वाणीचे बोल डॉक्टरांनीं डॉ. हिरालाल यांना ऐकविले!

पुढें कांहीं दिवसांनीं डॉक्टरांना आराम पडून त्यांच्या कृतनिश्चयाप्रमाणें परीक्षेला वसून ते ती उत्तीर्ण झाले. पंजाव विद्यापीठाचे ते पहिले एम्.डी. आहेत. त्या परीक्षेला डॉक्टरसाहेव हे एकटेच उमेदवार होते.

परीक्षा आटोपल्यावर डॉक्टरसाहेब बिलासपुरला परत येऊन आपल्या कामावर रुजू झाले. प्रथम मेडिकल मॅन्युअल व पत्रव्यवहार पाहून नंतर त्यांनीं सिव्हिल सर्जननें ते लाहोरला असतांना त्यांच्यापासून जी कैफियत मागितली होती ती पाठविली. या उत्तरांत त्यांनीं सिव्हिल सर्जनला कळविलें कीं, "तुम्ही जसे आज सिव्हिल सर्जन आहां तसाच तुमच्यापूर्वीं मीही सिव्हिल सर्जनच होतों. त्यावेळीं मी जें कांहीं बरेंवाईट केलें असेल त्याची जवाबदारी माझ्यावर असून तुम्ही त्याबद्दल मला जाब विचारूं शकत नाहीं. इच्छा असल्यास वरच्या अधिकाऱ्यांकडे तुम्ही खुशाल तक्रार करू शकतां. तुम्हाला मात्र मी कैफियत देणार नाहीं. आणि तुम्ही ती मागणें म्हणजे आपल्या अधिकाराचें तुम्ही अतिक्रमण करीत आहां हें मी तुमच्या स्पष्टपणें निदर्शनास आणून देऊं इच्छितों."

आपल्या या लिहिण्याचा परिणाम काय होईल हें डॉक्टरसाहेव जाणून होतेच. आय्. जी. वगैरे सर्वच अधिकारी सिव्हिल सर्जनचेच जातभाई असल्यामुळें आपल्यासारख्या यःकश्चित 'काळ्या अदमीला' न्याय मिळणार नाहीं याबद्दल त्यांना खात्रीच होती. परंतु अन्याय सहन करावयाचा नाहीं, त्याचा पराकाष्ठा करून प्रतिकारच करावयाचा, हा डॉक्टरांचा प्रथमपासूनच वाणा असल्यामुळें नोकरीचा विशेष असा लोभ त्यांनीं कधींच ठेविला नाहीं. शिवाय रोजच्या या कटकटीमुळें ते त्रासूनही गेले होते. या प्रकरणाचा एकदां काय तो सोक्षमोक्ष लावून घ्यावयाचा असा मनाचा निश्चय करूनच त्यांनीं सिव्हिल सर्जनला वरील आशयाची कैफियत पाठविली होती.

डॉक्टरसाहेबांच्या अपेक्षेप्रमाणेंच सिव्हिल सर्जननें त्यांच्या कैफियतीविरुद्ध आय्. जी.कडे तक्रार केली. उमरावतीला ज्या आय. जी.शीं डॉक्टरांचा

खटका उडाला होता तेच कर्नल डेनीस याही वेळीं आय्. जी. होते. या तक्रारी-विरुद्ध त्यांनीं डॉक्टरसाहेबांची कैफियत मागून त्यांना संस्थानी दवाखान्यांच्या तपासणीबद्दल जो २८५ रुपये मुशाहिरा व प्रवासभत्ता मिळणार होता तो देऊं नये असा हुकूम काढला. तेव्हां आपली बाजू सिद्ध करण्यासाठीं आय्.जी.शीं पत्रव्यवहार करून डॉक्टरांनीं पुढीलप्रमाणें सविस्तर कैफियत सादर केली.

## सडेतोड कैफियत

"जरी मी दौरा करूं नये असा पूर्वीच्या आय्. जी.चा मला हुकूम होता तरी ज्याअर्थी त्यांनीं माझ्या प्रवासभत्त्याचीं अनेक बिलें मंजूर केलीं त्याअर्थी तो हुकूम कागदावरच राहिला व त्यांनींच आपल्या कृतीनें तो रद्द केला असें सिद्ध होतें. जो हुकूम मुळांतच अमलांत नव्हता तो मी मोडला असें कसें होईल? तसेंच सि. सर्जनशीं मी उद्धटपणानें वागलों असा जो आरोप आपण माझ्यावर केला त्याबद्दल मी आपणाला कळवूं इच्छितों कीं, माझ्याकडून तसें वर्तन बिलकूल घडलें नाहीं; कारण, सिव्हिल सर्जननेंच आपल्या अधिकाराचें अतिक्रमण करून मजजवळ कैफियत मागितली. मी त्यावेळीं सिव्हिल सर्जन होतों, हें तो विसरला. त्याच्या उतावळेपणाबद्दल वास्तविक आपण त्यालाच जाब विचारावयास हवा होता. संस्थानांत दौरा करून पैसा मिळविण्याची हांव मला होती, या त्याच्या आरोपाला माझें उत्तर असें आहे कीं, एकादा माणूस ज्या हुद्यावर असेल त्या हुद्याच्या अंगभूत ज्या जबाबदाऱ्या त्याजवर असतात त्या तो उचलतो, त्यांपासून न्याय्य मार्गांनीं जे फायदे होत असतील किंवा होऊं शकतील तेही त्याला अवश्य मिळालेच पाहिजेत. यांत पैशाची हांव कोठें दिसून येते? अशा तऱ्हेचा आरोप कोणाही हुद्देदारावर करतां येईल! बरें, मी त्यावेळीं अनेक दौरे केले, त्यांतून आपण फक्त या एकाच विशिष्ट दौऱ्याबद्दल कैफियत मागतां आणि बाकीच्या दौऱ्यांबद्दल अवाक्षरही विचारीत नाहीं हें आश्चर्यच नव्हे काय! यावरून मला पैशाची गैरवाजवी हांव आहे हा आरोप माझ्यावर लागू होत नाहीं, तर त्याचा कांटा माझ्याकडून कैफियत मागणाराकडेच झुकतो. माझ्या या कैफियतीनें तुमचें जर समाधान होत नसेल तर माझी तुम्हांला अशी सूचना आहे कीं, माझ्या प्रवासभत्त्याबद्दल आणि मुशाहिऱ्याबद्दल मला मिळणारे २८५

१८२५७

रुपये तुम्ही कोणत्याही सत्कार्याकडे खर्च करा. ती सर्व रक्कम तुम्ही धर्मादायांत खर्च करा किंवा वाटल्यास माझ्याविरुद्ध आपल्याकडे तक्रार करणारे सिव्हिल सर्जन मेजर लॉइड यांनाही देऊन टाका. माझी त्याला बिलकुल हरकत नाहीं."

**अकोल्यास बदली**

डॉक्टरसाहेबांची ही सडेतोड व बिनतोड कैफियत आय.जी.च्या वर्मी चांगलीच झोंबली. डॉक्टरांविरुद्ध केलेला एकही आरोप सिद्ध झाला नाहीं आणि अखेर संस्थानी दवाखान्यांच्या तपासणीबद्दलचा मुशाहिरा व प्रवासभत्ता डॉक्टरांना तावडतोब मिळण्याचा नवीन हुकूम कर्नल डेनीस यांना काढावा लागला! मात्र, डॉक्टरसाहेबांचें व सिव्हिल सर्जन मेजर लॉइड यांचें यापुढें पटणार नाहीं म्हणून आय.जी.नें डॉक्टरसाहेबांची बिलासपुरहून वऱ्हाडांत अकोल्याला बदली केली. ही बदली म्हणजे आपल्याला एक प्रकारची शिक्षाच आहे, असें डॉक्टरांना निश्चित वाटलें व हाही अन्याय सहन करावयाचा नाहीं अशी त्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून लगेच त्याप्रमाणें त्यांनीं कारवाईही सुरू केली.

बिलासपुरहून डॉक्टरसाहेब अकोल्यास जाण्यास निघाले तेव्हां सिव्हिल सर्जन मेजर लॉइड यांनीं खेद व्यक्त केला! डॉक्टरसाहेबांनीं मोठ्या चतुराईनें त्यांचेकडून आपल्या कामाबद्दल सुंदर प्रशस्तिपत्र मिळविलें. या प्रशस्तिपत्रांत मेजर लॉइडनें "डॉ. खरे हे उत्तम डॉक्टर आणि कार्यक्षम सर्जन असून इंग्रज माणसाप्रमाणें ते उत्तम इंग्रजी बोलतात. त्यांच्याबरोबर काम करण्यास मला नेहमींच मौज वाटे," असा डॉक्टरांबद्दलचा आपला अभिप्राय व्यक्त केला होता.

**फाऊलरशीं चकमक**

अकोल्यास डॉक्टरसाहेब आपल्या कामावर रुजू झाले. त्यांचें सामान मात्र अजून आलेलें नव्हतें. तेथें गेल्याबरोबर सिव्हिल सर्जन कॅप्टन फाऊलर यांनीं त्यांना लगेच दौऱ्यावर जाण्यास हुकूम केला. तेव्हां डॉक्टर त्यांना म्हणाले, "मी नुकताच येथें आलों आहें. माझें सामानसुद्धां अद्याप यावयाचें आहे. शिवाय येथें माझी अजून राहावयाची सुद्धां जमावी तशी सोय जमली नाहीं.

म्हणून तुम्ही इतक्यांतच मला दौऱ्यावर न पाठविलें तर माझी तुम्हीं सोय पाहिल्यासारखें होईल." परंतु फाऊलरनें त्यांची विनंति मान्य केली नाहीं. त्यांनीं डॉक्टरांना तावडतोब दौऱ्यावर जाण्यास निक्षून सांगितलें. 'आपणास सध्यांच दौऱ्यावर पाठवूं नये' म्हणून पुन्हा डॉक्टरांनीं फाऊलर यास विनंति केली. परंतु याही विनंतीचा त्याच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. तेव्हां आपलें सामान आल्याशिवाय व सोईवार घर मिळाल्याशिवाय आपण दौऱ्यावर जाणार नाहीं असें डॉक्टरांनीं फाऊलर साहेबांना स्पष्ट व बिनदिक्कत सांगितलें. फाऊलरसाहेबांची अशी ख्याति होती म्हणतात कीं, जर कोणाला बदनाम करावयाचें असेल किंवा खूब त्रास द्यावयाचा असेल, तर त्याला फाऊलराच्या हाताखालीं पाठवावा. त्यांच्या या द्वाड स्वभावाची चुणूक प्रथम दिवशींच आल्यामुळें त्यांच्या हाताखालीं राहावयाचें नाहीं असा डॉक्टरसाहेबांनीं निश्चय केला आणि त्या अनुरोधानेंच पुढें त्यांनीं आपलें वर्तन चालू ठेवलें.

'तूं कांहीं एक काम न करतां दवाखान्यांत स्वस्थ बसून राहतोस, माझा असिस्टंट म्हणून येथें राहाण्यास तूं नालायक आहेस.' असा एके दिवशीं फाऊलरनें डॉक्टरसाहेबांना टोमणा मारला. 'मी आहे हा असा आहें, सुधारण्याची कांहीं आशा नाहीं' असा डाक्टरांनीं त्यांना रोकडा जवाब ऐकविला. 'मला येथें राहण्याची बिलकुल हौस नाहीं; वाटल्यास तुम्ही दुसरा असिस्टंट खुशाल बोलावून घ्या' असेंही डॉक्टरांनीं स्पष्ट सांगितलें.

ज्या आय्.जी.नें डॉक्टरसाहेबांची बिलासपुरहून अकोल्यास बदली केली होती त्यानें त्यांच्याविरुद्ध चीफ कमिशनरकडे गुप्त रिपोर्ट केला होता. त्या रिपोर्टांत त्यानें डॉक्टरसाहेबांविषयीं असें लिहिलें होतें, "एकंदरीनें हा मनुष्य आपल्या कामांत निपुण आहे. परंतु अति गर्विष्ठ असून स्वतःच्या मताबद्दल आग्रही असल्यामुळें आपला दर्जा काय हें त्याला वेळींच दाखवून देणें जरूर आहे."

## चीफ कमिशनरकडे कैफियत

डॉक्टरसाहेबांनींही या एकंदर प्रकाराबाबत चीफ कमिशनरकडे बिलासपुरचें २८५ रु. प्रकरण व आय. जी.शीं झालेल्या आपल्या पत्रव्यवहाराच्या

उताऱ्यासह एक लांबलचक कैफियत पाठविली. ही कैफियत पुढीलप्रमाणें होती: "आय. जी. हा पक्षपाती, अन्यायी आणि अप्रामाणिक आहे. तो या खात्यांत राहण्यास लायक नसल्यामुळें माझ्यावर गर्विष्ठपणाचे वगैरे त्यानें केलेले आरोप काढून टाकण्यांत येऊन माझी पुन्हा विलासपुरला बदली करण्यांत यावी. कारण, विलासपुरहून अकोल्याला करण्यांत आलेली माझी बदली ही, मी मला निष्कारण झालेली शिक्षाच समजतों. मला ही शिक्षा कां म्हणून ? बरें लाइडसाहेबांशीं माझें भांडण आहे म्हणून जर मला विलासपुरहून बदलण्यांत आलें असेल, तर त्याच लाइडसाहेबांनीं मला दिलेलें सर्टीफिकेट किती उत्तम आहे तें पहा. मी तें या कैफियतीबरोबर जोडलेंच आहे. माझी मागणी आपण मंजूर करीत नसाल तर माझा कोणताही अपराध दाखवून आपण मला बडतर्फ करावें अशी माझी मागणी आहे. कारण बदलीची शिक्षा फारच क्षुद्र असते असें माझें मत आहे."

डॉक्टरसाहेबांनीं ही कैफियत सिव्हिल सर्जन फाऊलरसाहेब यांच्या मार्फतच पाठविली होती. फाऊलर साहेबांनीं जेव्हां ही कैफियत वाचली तेव्हां कांहीं लोकांजवळ त्यांनीं असे उद्गार काढले म्हणतात, 'हा डॉ. खरे म्हणजे नुसती आग आहे!'

## नोकरीचा तिटकारा आला

ही सर्व खटाटोप करण्यांत आपल्याला कांहीं न्याय मिळेल अशी डॉक्टरांना चुकूनही आशा नव्हती. दररोजच्या कटकटींचा त्यांना आतां मनस्वी कंटाळा आला होता. या नोकरींत आतां कांहीं 'राम', नाहीं असें वाटून त्यांनीं ती सोडून देण्याचा निश्चय केला होता. एवींतेवीं आपल्याला नोकरी सोडावयाचीच आहे; तर जातां जातां लाथा तरी कां झाडू नये, या विचारानेंच चीफ कमिशनरकडे त्यांनीं ही लांबलचक व आपल्या विरुद्ध करण्यांत आलेला प्रत्येक आरोप निराधार ठरविणारी बिनतोड कैफियत पाठविली व ५-६ दिवसांची किरकोळ रजा घेऊन ते मुंबईला निघून गेले.

मुंबईला गेल्याबरोबर आपण आजारी असून तीन महिन्यांच्या सुटीची आपल्याला गरज असल्याबद्दल तेथील दोन एम. डी. डॉक्टरांचीं त्यांनीं

सर्टिफिकेटस् मिळवून ते अकोल्याला लगेच परत आले व सिव्हिल सर्जन मार्फत तीन महिन्यांच्या सुटीचा त्यांनीं आय. जी. कडे अर्ज केला. या अर्जा-सोबत त्यांनीं मुंबईच्या एम. डी. डॉक्टरांनीं त्यांना दिलेलीं सर्टिफिकेटस् मात्र मुद्दाम जोडलीं नव्हतीं. सुटीचा अर्ज पाहतांच सि. सर्जन फाऊलरनीं त्यांना तपासलें व आजारीपणाबद्दल सहा महिन्यांचें सर्टिफिकेट दिलें. हें सर्टिफिकेट मिळतांच ते फाऊलरला म्हणाले, "मी मुंबईला केवळ एम. डी. डॉक्टरांचें सर्टिफिकेट आणण्यासाठीं गेलों होतों. तुम्ही कदाचित मला सर्टिफिकेट देणार नाहीं असें मला वाटलें. परंतु ज्याअर्थीं तुम्ही मला माझ्या आजारीपणाबद्दल सर्टिफिकेट दिलें, त्याअर्थीं आतां मुंबईच्या डॉक्टरांच्या सर्टिफिकेटांची कांहींच जरूरी नाहीं," असें म्हणून त्यांनीं फाऊलरसाहेबांच्या समोरच तीं फाडून टाकलीं. कांहीं दिवसांनीं डॉक्टरांची रजा मंजूर होऊन आली. पण त्यांच्या जागीं काम करणारा इसम कामावर रुजू झाला नसल्यामुळें त्यांना तो येई-पर्यंत राहणें भाग पडलें.

डॉक्टरसाहेबांना यावेळीं काळजाच्या विकाराचा त्रासही बराच होऊं लागला. त्यामुळें तेथें राहून आपलें काम रेटणें त्यांना शक्य नव्हतें. म्हणून आपल्याला लवकर मोकळें करावें अशी त्यांनीं सिव्हिल सर्जन कॅप्टन फाऊलर-साहेबांना निकड लाविली. यामुळें पुन्हा उभयतांत खटका उडाला. "यापुढें आपण येथें राहणार नाहीं, औषधोपचारासाठीं आपल्याला कोठें तरी गेलेंच पाहिजे" असें सांगून डॉक्टरसाहेबांनीं आपल्या खिशांतील किल्ल्या फाऊलर-साहेबांच्या अंगावर भिरकावून देऊन ते दवाखान्याबाहेर पडले व त्याच दिवशीं संध्याकाळच्या गाडीनें महाबळेश्वरास त्यांनीं प्रयाण केलें. तेथें त्यांची प्रकृति लवकरच सुधारून पाऊस सुरू होण्याच्या सुमारास महाबळेश्वरहून निघून इकडे तिकडे थोडाफार फेरफटका करून ते वाशीमला त्यांच्या नवीन नेमणुकीच्या गांवीं दाखल झाले. तेथें ते सब-डिव्हिजनल ऑफिसर असल्यामुळें स्वतंत्रच होते. तेथें असतांना दोन तीन महिन्यांच्या अवधींत त्यांना चीफ कमिशनर-कडून त्यांनीं पूर्वीं पाठविलेल्या कैफियतीचें उत्तर आलें. त्यांत चीफ कमिशनरनें पुढीलप्रमाणें शेरे मारले होते. "आपल्याच खात्यांतील मुख्य अधिकाऱ्याविरुद्ध

गंभीर स्वरूपाचे आरोप करण्याला श्री. खरे यांच्या दर्जाच्या अधिकाऱ्यानें प्रवृत्त व्हावें हें पाहून मला आश्चर्य वाटलें. यापुढें असले प्रकार चीफ कामिशनर सहन करणार नाहीं हें श्री. खरे यांनीं ध्यानांत ठेवावें. या प्रकरणीं चीफ कमिशनर कोणत्याही प्रकारें पडूं इच्छित नाहीं."

**नोकरीचा पाश तोडण्याचा निश्चय**

ज्यावेळीं चीफ कमिशनरचें वरील उत्तर डॉक्टरांच्या हातीं आलें तो काल १९१५ चा असून त्यावेळीं महायुद्ध जोरांत सुरू होतें. औषधांच्या किंमती त्यावेळीं अत्यंत महागल्या होत्या. नोकरीचा राजीनामा देण्याचा डॉक्टरसाहेबांचा निश्चय तर जवळजवळ पक्काच ठरला होता. परंतु, धंदा करण्यास हा काळ प्रतिकूल आहे असा सल्ला डॉक्टरांच्या स्नेह्यांनीं दिल्यावरून त्यांनीं राजीनामा देण्याचा बेत तात्पुरता रहित केला. वाशिमलाहीं त्यांच्या मागची कटकट चुकली नाहीं.

**"तुम्ही खुशाल खुशामत करा"**

एकदां अकोला जिल्ह्यांत चीफ कमिशनरचा दौरा निघाला. त्यावेळीं श्री. काशीनाथ श्रीराम जठार (नागपूरचे कर्नल जठार यांचे बंधु) हे अकोल्याला डेप्युटी कमिशनर होते. त्यांनीं डॉक्टरांना वाशीमहून बोलावून सांगितलें, "चीफ कमिशनरचा आपल्या जिल्ह्यांत दौरा असल्यामुळें तुम्ही आसपासच्या खेड्यांत जाऊन तेथील विहिरींचें पाणी शुद्ध करण्यासाठीं त्यांत पोटॅशियम परमँगॅनेट टाका." डॉक्टरांनीं उत्तर दिलें, "हें काम माझ्याच्यानें होणार नाहीं. तें इतकें क्षुल्लक आहे कीं, एकादा चपराशीही तें सहज करील." डॉक्टरांच्या या बोलण्याचा जठारसाहेबांना फारच राग आला आणि या उभयतांत पुढीलप्रमाणें चकमक झडली :—

जठार:—कांहो, तुम्ही आमचें ऐकत कां नाहीं ?

डॉक्टर:—'मी तुमचें ऐकणार नाहीं. तुम्ही कांहीं माझे अधिकारी नाहीं. तुमचा हा हुकूम मला तुम्ही सिव्हिल सर्जन मार्फत पाठवा, मग तो पाळावा किंवा नाहीं तें मी पाहीन. दुसरें असें कीं तुम्ही या साहेब लोकांच्या पुढें आमच्या सारख्यांना नाचवून आमचा बळी कां देतां ? वाटल्यास तुम्ही खुशाल खुशामत करून आपला फायदा करून घ्या."

डॉक्टरसाहेबांच्या सडेतोड बोलण्यानें जठारसाहेब स्तंभितच झाले! डॉक्टरांशीं चकार शद्बही न बोलतां ते आपल्या खोलींत निघून गेले.

**कटकटींचा कंटाळा आला**

वाशीमला जेम्स मे नांवाचा एक एस.डी.ओ. अधिकारी होता. सर्व हिंदी अधिकाऱ्यांनीं त्याला तो कोठेंही भेटला तरी उठून उत्थापन द्यावें अशी त्याची नेहमी अपेक्षा असे. ता. ४ ऑगस्ट १९१५ हा त्या वेळच्या युद्धाचा वार्षिक दिन होता. तो दिन या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालीं वाशीमला साजरा होणार होता. हा अधिकारी सभेला येईल त्यावेळीं त्याला उत्थापन द्यावयाचें नाहीं असें डॉक्टरसाहेबांनीं आगाऊच ठरविलें होतें. त्या प्रमाणें तो जेव्हां सभास्थानीं आला, तेव्हां त्याच्या सन्मानार्थ डॉक्टरांखेरीज करून बाकी सर्व लोक उठून उभे राहिले. अर्थात ही गोष्ट जेम्स मे साहेबाच्या चटकन लक्षांत आलीच. त्याला डॉक्टरांच्या या कृत्याबद्दल फार चीड आली. दुसरे दिवशीं डॉक्टरांना त्यानें हटकलेंच व शिस्तीचा धडा द्यावयास सुरवात केली. डॉक्टरांनीं पुढीलप्रमाणें खुलासा केला: "तुम्ही ज्यावेळीं सभास्थानीं आलां, त्यावेळीं अध्यक्ष झालां नव्हतां. त्यावेळीं तुम्हाला उत्थापन देण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. त्यावेळीं तुम्हीही नागरिक व मीही नागरिक होतों. शिवाय, तुम्ही आम्हाला शिस्त शिकवावयाला नको. आमची संस्कृति तुमच्या-पेक्षां किती तरी उच्च आहे." डॉक्टरसाहेबांच्या या बोलण्याचा मि. जेम्स मे यांना फार राग आला. त्यांनीं डॉक्टरांना चांगलाच त्रास देण्यास सुरवात केली. मे साहेब वाशिमच्या म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष असून डॉक्टरसाहेब आरोग्याधिकारी होते. तेव्हां या दोघांत कांहींना कांहीं कारणावरून नेहमीं खटके उडत. दोघेही एकमेकांच्या विरुद्ध नेहमीं रिपोर्ट लिहीत असत. या सर्व कटकटींचा शेवटीं डॉक्टरांना कंटाळा आला. त्यांनीं अकोल्याचे सिव्हिल सर्जन डॉ. जॉर्ज डी. सिल्व्हा (आतांचे कांग्रेसमन) यांचे पाशीं सहा महिन्यांची रजा मागितली. रजा देण्यास ते अनमान करूं लागले. तेव्हां अकोल्यास स्वतः जाऊन डॉक्टर-साहेबांनीं 'मी आजारी आहे कीं नाहीं हें तुम्हीच तपासून पहा' असें त्यांस हटकलें. तेव्हां डॉ. डी. सिल्व्हा यांनीं डॉक्टरांना तपासलें व सहा महिन्यांची

रजा मंजूर केली. लगेच डॉक्टर वाशीमला परत गेले व आतां पुन्हा येथें परत यावयाचेंच नाहीं या निश्चयानें त्यांनीं सर्व आवराआवर केली व तेथून ते नागपूरला आले.

**स्वतंत्र दवाखान्यास सुरवात व नोकरीचा राजीनामा**

ता. ८ मार्च १९१६ रोजीं त्यांनीं नागपुरला सितावर्डीवर महाराज वाग रोडवरील बुटींच्या चाळींत १४ रुपये महिना भाडें असलेल्या एका ब्लॉकमध्यें आपला स्वतंत्र दवाखाना उघडला. तो आज तागायत तेथेंच असून त्या ब्लॉकचें डॉक्टरसाहेब आज १०२ रु. भाडें देतात. डॉक्टर खरोखरच इतके भाग्यवान कीं पहिल्याच महिन्यांत त्यांना १२०० रु.चें उत्पन्न झालें. उत्तरोत्तर त्यांची आपल्या धंद्यांत चांगली भरभराटच होत गेली. सहा महिन्यांची रजा संपतांच त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. अशा रीतीनें नऊ वर्षें सरकारी नोकरी करून अखेरीस त्यांनीं मोठ्या धैर्यानें तिच्या रुपेरी शृंखलांतून स्वतःची मुक्तता करून घेतली.

# धंदा व लोकसेवा

**स्वतंत्र कर्तृत्वाचे बीजांकुर**

यांप्रमाणें नऊ वर्षांचें सेवाकाण्ड संपून डॉक्टर खरे यांच्या स्वतंत्र कर्तृत्वास प्रारंभ झाला. स्वतंत्र कर्तृत्वाचा बीजांकुर ज्या ज्या ठिकाणीं वास करतो त्या त्या ठिकाणीं तो केव्हां ना केव्हां तरी आपल्या सभोंवतालचीं जाचक बंधनें तटातट तोडून आणि बिकट परिस्थितीचे दुर्भेद्य खडकही फोडून काढून वर उसळी मारून आल्याशिवाय राहत नाहीं. कर्तृत्वशील पुरुष खडकाळ जमिनीच्या खोल गर्भांतून वाहणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणें आपल्यास अनुकूल अशी कर्तव्यकक्षा नेहमींच शोधीत असतो; आणि भूगर्भांतला तो प्रवाह ज्याप्रमाणें अखेरीस एखाद्या ठिकाणीं सुंदर जलाशयाच्या किंवा वेगवान नदीच्या रूपानें प्रकट झाल्याशिवाय राहत नाहीं, त्याचप्रमाणें कर्तृत्वशील पुरुष देखील स्वतःस अनुकूल असलेल्या कर्मभूमीवर केव्हांना केव्हां तरी आविष्कार पावल्या-खेरीज राहत नाहीं. डॉ. खरे यांच्याही बाबतींत असाच प्रकार घडला. त्यांचें कर्तृत्व, वाव मिळण्याची संधि अजूनपर्यंत पाहत होतें. 'जीवना वेगळी। जैसी मासोळी तळमळी' अशी त्या कर्तृत्वाची स्थिति झाली होती. परंतु सरकारी नोकरींत त्यांच्या कर्तृत्वाला किंवा स्वतंत्र बुद्धीला वाव मिळणें अशक्य होतें. त्यांच्या स्वतंत्र बुद्धीची टोंचणी किंवा आत्मसंमानाची प्रखर जाणीव जेव्हां त्यांस असह्य होऊं लागली तेव्हां त्यांनीं नोकरीला लाथ मारली, सरकारची गुलामगिरी झुगारून दिली व लोकसेवा शिरोधार्य केली. त्यांच्या लोकसेवेस प्रारंभ झाला.

डॉक्टरांनीं नागपूरसारख्या राजधानीच्या शहरीं स्वतंत्र धंद्यास सुरवात करावी हेंच याचें निश्चित गमक होय. वस्तुतः जबलपूर, उमरावती व अकोला हीं शहरें नोकरीच्या निमित्तानें त्यांना आधींच परिचित असल्यामुळें, त्यांच्या कर्तृत्वाची ओढ केवळ द्रव्यार्जनाकडेच असती तर परिचितपणाचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें त्यांनीं ह्यापैकींच एकादें शहर स्वतंत्र धंद्याकरितां पसंत केलें असतें. परंतु तसें न करतां नागपुरसारख्या अनोळखी परंतु राजधानीच्या शहरांतच स्वतंत्र धंदा करण्याचें त्यांनीं पसंत केलें.

नागपूर हें राजधानीचें शहर असलें तरी मोठी वकाल वस्ती आहे. ज्याला आपण औपचारिक सभ्याचार समजतों अथवा ढोंगी सभ्याचाराचें अवास्तव थोतांड म्हणून ज्यांचें वर्णन करतां येईल तसले प्रकार नागपुरच्या लोकांत सहसा आढळून यावयाचे नाहींत. गोंड संस्कृतींतून उदय पावलेलें हें शहर जरी पुढें भोसल्यांची राजधानी बनलें आणि पुढें भोसलेशाही नष्ट होऊन इंग्रजांच्या कुटिल कारस्थानांच्या हालचालींचें तें केंद्र वनलें, तरा नाजूक व शाही सभ्याचारांचा शिरकाव येथील जीवनांत कधींच होऊं शकला नाहीं. किंवहुना नागपुरची ख्याती अशीच आहे कीं, नागपुर हें नेहमीं नागपुरच राहिलें. त्यानें इतर वडेजावी शहरांचें मिथ्या अनुकरण कधींच केलें नाहीं. वाहेर ठिकाणचे अनेक कर्तृत्ववान लोक निरनिराळ्या व्यवसायानिमित्त नागपुरास येऊन स्थायिक झाले. पण त्यांनांही नागपुरचें पाणी वदलतां येणें शक्य झालें नाहीं. उलट, नागपुरशीं ते स्वतःच तदाकार झाले—थोड्याच अवधींत ते पूर्ण 'नागपुऱ्ये' बनले.

अलीकडे कांहीं वर्षांपासून महाराष्ट्र संघटनेच्या चळवळीचें प्रवर्तन झालें असून तिला वऱ्हाड-नागपुरच्या प्रमुख पुढाऱ्यांनींही आपापल्या परीनें पाठिंवा दिला आहे. ओघानें आलें म्हणूनच येथें हें सांगणें अवश्य वाटतें कीं, एकंदर महाराष्ट्रीय राजकारणांत असो अथवा अखिल भारतीय राजकारणांत असो, वऱ्हाड-नागपुरची भूमिका एकप्रकारची मध्यवर्ति अशीच राहिलेली आहे. या प्रांताच्या भौगोलिक परिस्थितीची छाया त्याच्या राजकारणावरही पडणें अनिवार्य होतें व आहे. नागपुरास राजधानी असलेला वऱ्हाडचा राजा भोसले हा पेशवाईचा अंकित सरदार असला तरी पूर्वेस वंगाल, पश्चिमेस गुजराथ, दक्षिणेस निजाम आणि उत्तरेस मोंगल या सर्वांवर त्याला सारखीच गरुडदृष्टि टाकतां येण्यासारखी त्याची परिस्थिति असल्यामुळें मोंगल वादशाही व पेशवाई यांच्या राजकारणांत त्याला एकप्रकारें मध्यवर्ति व मानाचें स्थान आपोआप प्राप्त झालें होतें. महाराष्ट्र संस्कृतीचें मध्यभारतीय केंद्र म्हणून तर नागपुरला महत्व आहेच; पण, त्यावरोवरच हिंदी, वंगाली व मुसलमानी संस्कृतींचेही विशेष, दीर्घकालीन संसर्गामुळें, नागपुरनें आत्मसात केलेलें असल्याकारणानें नागपुरी

संस्कृति ही एक स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण व लज्जतदार बाब बनली आहे. अशा या बहुरूपी, बहुरंगी, बहुगुणी, बहुभाषी व म्हणूनच कांहींशा खडबडीत व बंडखोर संस्कृतीशीं तादात्म्य पावण्यासारखाच डॉ. खरे यांचाही स्वभाव वरून खडबडीत पण आंतून मृदु, बाह्यतः अहंकारी पण वस्तुतः गुणग्राहक असल्यामुळें नागपुरास येऊन राहिल्यावर थोड्याच अवधींत तेही इरसाल 'नागपुऱ्ये' बनले असल्यास तें अत्यंत साहजिकच होतें.

### धंद्याकरितां आर्थिक सहाय्य

नऊ वर्षें नोकरी करूनही डॉक्टरांनीं जवळ कांहींच माया शिल्लक ठेवली नव्हती. म्हणून नागपुरला स्वतंत्र दवाखाना उघडण्याला त्यांना पंचाईतच पडली. वाशीमला जवळचें कांहीं फर्निचर वगैरे विकून त्यांना ५००-६०० रु. मिळाले होते. इतक्यावर भागणार नाहीं म्हणून देऊरवाड्याचे त्यांचे एक निःसीम चहाते, श्री. गोपाळ बाळकृष्ण शिंगोरे यांच्याकडून प्रॉमिसरी नोटवर त्यांनीं ५०० रु. कर्जाऊ घेतले होते. डॉक्टरसाहेब उमरावतीला असतांना हे 'इन डोअर पेशंट' होते. जवळजवळ असाध्यतेच्या कोटींत गेलेला त्यांचा आजार डॉक्टरसाहेबांनीं सुधारला होता, म्हणून ते डॉक्टरसाहेबांचे विशेष उपकार मानीत. नागपुरला डॉक्टरांचें चांगल्या रीतीनें स्थिरस्थावर झाल्यावर ते वर्षांतून एकदोन वेळां मुद्दाम डॉक्टरांच्या भेटीला नागपुरला येत. त्यांचा हा क्रम त्यांनीं आतांआतांपर्यंत म्हणजे आपल्या निधनापर्यंत चालू ठेवला होता.

सुरवातीला डॉक्टरसाहेबांनीं पांचसहाशें रुपयांचीं जुजबी औषधें घेऊन शिंगोऱ्यांकडून कर्जाऊ घेतलेले ५०० रुपये मुद्दाम शिल्लक ठेवले होते. याशिवाय त्यांच्या वडील बंधूंकडूनही त्यांना कमीजास्त लागणाऱ्या पैशांबद्दल आश्वासन मिळालें होतेंच. पहिल्याच महिन्यांत १२०० रुपये मिळाल्यामुळें त्यांना चांगलेंच प्रोत्साहन मिळून मोठा धीर आला. पुढें त्यांची प्रॅक्टिस उत्तरोत्तर वाढतच गेली. चारपांच महिन्यानंतर त्यांनीं शिंगोऱ्यांचें कर्ज फेडावें असा विचार करून दर महिन्याला ते ५० रुपयांचा हप्ता त्यांना पाठवूं लागले. शिंगोऱ्यांना काय वाटलें कोण जाणे, त्यांनीं डॉक्टरसाहेबांनीं पाठविलेली

पहिल्याच हप्त्याची मनीऑर्डर डॉक्टरांकडे परत केली व दोन तीन दिवसांच्या आंतच डॉक्टरांनीं त्यांना लिहून दिलेली प्रॉमिसरी नोटही फाडून ती डॉक्टरांकडे पाठविली. सोबत एक पत्र पाठवून त्यांनीं कळविलें कीं, "मला तुमच्या-जवळून पैसे घ्यावयाचे नाहींत. तुम्ही पैसे न पाठविण्यानेंच मला ऋणी करून ठेवाल. तुम्ही माझी ही विनंति मान्य करावी."

## निरलस लोकसेवा

पुढें नागपुरला डॉक्टरसाहेबांचें बस्तान चांगलेंच बसूं लागलें. लेंढरा वस्तींतील जी. रामस्वामी (पापय्या), रंगनाथम् अय्या आणि मि. गिमी (एक पारशी गृहस्थ) या तिघांनीं, त्यांना जो कांहीं डॉक्टरसाहेबांचा त्यावेळीं अनुभव आला त्यावरून, सबंध नागपूर शहरांत डॉक्टरसाहेबांची चांगलीच प्रसिध्दी केली. त्यामुळें डॉक्टरांना प्रॅक्टिसही चांगली मिळूं लागली. पापय्याची आणि डॉक्टरसाहेबांची थोडी जुनी ओळखही होती. बाकीच्या दोघांची मात्र बिलकुल ओळख नव्हती. सुरवातीलाच म्हणजे १९१६-१७ सालीं नागपूरला प्लेग झाला. त्यावेळीं डॉक्टरसाहेब आपल्या दवाखान्याजवळच हल्लीं डॉ. डोंगरे यांचा दवाखाना जेथें आहे, त्या ठिकाणीं दरमहा १० रु. भाड्याच्या घरांत राहत असत. तेथून प्लेगमुळें ते लेंढऱ्यावर पापय्याच्या बंगल्यांत त्यांच्याच आग्रहावरून राहावयास गेले. तेथून ते सायकलनें किंवा कधीं कधीं पायींच सितावर्डीवर दवाखान्यांत येत. सकाळ संध्याकाळ रोज नियमानें दवाखान्यांत येऊन गांवांतील प्लेगच्या बऱ्याच केसेस त्यांनीं मोठ्या काळजीनें व लक्ष घालून दुरुस्त केल्या. यामुळें लोकांत त्यांच्याबद्दल एक प्रकारचा आदर व आपुलकी हळूहळूं वाढूं लागली. पुढें १९१८ च्या भयंकर इन्फ्लुएंझाच्या सांथींत तर डॉक्टरसाहेबांनीं शहरांतील शेकडों रोग्यांची—नव्हे खुद्द नागपूर शहराचीच म्हणणें अधिक योग्य होईल—जी निरलसपणें स्वतः झीज सोसून सेवा केली, त्यामुळें तर नागपूरवासीयांच्या हृदयांत त्यांनीं जें स्थान पटकावलें तें आजपर्यंत, नानातऱ्हेचे मनःक्षोभ निर्माण होऊनही, अढळच राहिलें आहे. या इन्फ्लुएंझाच्या साथीनें शहरांतील हजारों लोकांना पछाडलें होतें. डॉक्टरांनीं त्यावेळीं शहराच्या निरनिराळ्या भागांत स्वतःच्या खर्चानें

औषधपाण्याचीं केंद्रें स्थापून तेथें रोग्यांसाठीं धानाच्या लाह्या, साबुदाण्याची पातळ खीर आणि उकळलेलें पाणी यांची व्यवस्था करून दिवसभर शेकडों रोग्यांच्या सेवेंत त्यांनीं आपला काळ घालविला व आपल्या चतुर औषधयोजनेनें बऱ्याच रोग्यांना जीवदान दिलें. कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवतां त्यांनीं यावेळीं नागपूर शहराची जी निरलसपणें सेवा केली, त्या सेवेच्या तपश्चर्येचीं गोड फळें त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यांत चाखावयास मिळालीं यांत आश्चर्य कसलें !

**मनोनिग्रह**

१९१६-१७ च्या प्लेगमध्यें डॉक्टरसाहेब लेंड्यावर पापय्याच्या बंगल्यांत राहावयास गेले होते. त्यावेळीं तेथें जवळच डॉक्टरांचे एक घरोब्याचे मित्र श्री. जनार्दनपंत टकले (हे सोलापुरला, डॉक्टरांचे बंधू अण्णासाहेब यांच्याकडे आपल्या धाकट्या बंधूसह शिकत असत) राहत असत, त्यांच्यामुळें डॉक्टरसाहेबांचा पापय्याशीं आणखी दाट परिचय झाला. दवाखान्यांत दिवसभर काम करून ते जेव्हां थकून आपल्या घरीं म्हणजे पापय्याच्या बंगल्यावर जात, तेव्हां पापय्या त्यांना ब्रँण्डी, विस्किटें, चहा वगैरे रोज देत असे. असा क्रम सुमारें १०–१२ दिवस चालला. एके दिवशीं डॉक्टर नित्याप्रमाणें दवाखान्यांतून घरीं आले, तों पापय्या घरीं नसल्याचें त्यांना आढळून आलें. अर्थात रोजच्या प्रमाणें डॉक्टरसाहेबांना त्या दिवशीं ब्रँडी, विस्किटें, चहा, वगैरे कांहीं मिळालें नाहीं. त्यामुळें त्यांना कांहीं तरी चुकल्या चुकल्या सारखें वाटूं लागलें. त्या दिवशीं त्यांना कांहीं तरी उणीव भासूं लागली. ग्लासांतून ते दररोज जी वस्तु घेत, ती त्यांना हवीशी वाटूं लागली. त्यांना कळून चुकलें कीं, आपला हा क्रम जर असाच पुढें चालू राहिला तर आपण मदिरेच्या पूर्णपणें आहारीं जाऊं. त्यांच्या मनाला या विचारानें मोठा उद्वेग वाटला. लागलीच त्यांनीं या व्यसनाच्या आहारीं जावयाचें नाहीं असा निश्चय केला आणि दुसरे दिवशीं त्याप्रमाणें पापय्याला स्पष्टपणें सांगितलें, "पापय्या, यापुढें तूं मला दारू पिण्याचा आग्रह करूं नको. तुझ्या माझ्या मैत्रींत निष्कारण बिघाड येऊं नये म्हणून मी तुला आज हें निक्षून सांगत आहें. मला या व्यसनाच्या आहारीं मुळींच जावयाचें नाहीं."

यावर 'ठीक आहे, यापुढें आपण तुम्हांला दारू पिण्याचा मुळींच आग्रह करणार नाहीं' असें पापय्यानें डॉक्टरांना अभिवचन दिलें. त्या दिवशीं मात्र पापय्याच्या शेवटच्या विनंतीवरून डॉक्टरांनीं ब्रँडी घेतली. नंतर मात्र मदिरेला ते चुकूनही शिवले नाहींत व पापय्यानेंही पुढें त्यांना कधीं आग्रह केला नाहीं.

### मिनफचा खेळ : ५०० रुपये हरले

दारूप्रमाणेंच तीन पत्त्यांच्या (मिनफ) खेळाचाही पगडा डॉक्टरसाहेबांवर एकेकाळीं विलक्षण बसला होता. जबलपुरला विद्यार्थीदशेंत असतांना तेथील एकंदर वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. तेथें चांगले चांगले लोकही मिनफचा खेळ निदान त्यावेळीं तरी सर्रास खेळत असत. डॉक्टरसाहेबांनाही तेथील स्नेह्यांच्या संगतींत हा नाद लागून ते पट्टीचे मिनफ-खेळाडू बनले. त्यांचा तो नाद ते नागपुरला स्वतंत्र रीतीनें प्रॅक्टिस करी-पर्यंत सुटला नव्हता. आपल्या दवाखान्याचें काम आटोपलें कीं पत्त्याच्या अड्यावर ते हजर व्हावयाचेच! एके दिवशीं या खेळाचा मोठाच अड्डा जमला होता. मोठमोठे रथी महारथी त्या अड्डयावर जमले. त्या दिवशींच्या खेळांत एक रुपया बोट लावून खेळ चालला होता. त्या खेळांत केवळ २-२॥ तासांत डॉक्टरसाहेब ५०० रुपये हरले. खेळ संपल्यावर ते घरीं आले व मनाशीं सचिंतपणें विचार करूं लागले. अशा रीतीनें पैसे लावून पत्ते खेळणें हें वाईट आहे, संसारी माणसाचें हें काम नाहीं, ही करमणूक आपल्याला फार महाग पडते, यापुढें पैसे लावून जुवा खेळायचा नाहीं असा त्यांनीं मनाचा निर्धार केला. क्वचित दिवाळीला एकदोन दिवस स्नेही मंडळींत ते खेळतही. पण, या पांचसात वर्षांत तर ते पत्त्यांना शिवलेही नाहींत.

### 'ज्ञानकोशा'चे डायरेक्टर

डॉक्टरीच्या धंद्यांत चांगल्या तऱ्हेनें स्थिरस्थावर झाल्यावर डॉक्टरसाहेब नागपुरांतील निरनिराळ्या सार्वजनिक कामांत थोडेंबहुत लक्ष घालूं लागले. याच सुमारास ज्ञानकोशकार डॉ. केतकर नागपुरास आले होते. ज्ञानकोश तयार करण्याचें काम नागपूरासच सुरू करावें असें त्यांनीं ठरविलें व त्या

दिशेनें त्यांनीं प्रयत्नांस सुरवातही केली. एके दिवशीं ते डॉक्टरसाहेबांकडे आले व आपली ज्ञानकोशाची योजना त्यांनीं डॉक्टरांना समजावून दिली. या कामासाठीं आपण एक लिमिटेड कंपनी स्थापणार आहोंत असें सांगून त्यांनीं डॉक्टरसाहेबांस त्या कंपनीचे डायरेक्टर होण्यास विनंति केली. डॉक्टरांनीं त्यांची विनंति मान्य केली. पुढें डॉक्टरसाहेब या कंपनीचे अध्यक्षही झाले. या कंपनीचें काम कांहीं दिवस सुरळीत चाललें. पण, पुढे मिस् कोहन या जर्मन ज्यू युवतीवरून या कंपनीच्या डॉयरेक्टर मंडळींत थोडी मतभिन्नता झाल्यामुळें कंपनीच्या कामांत किंचितकाळ अडथळा निर्माण झाला.

मिस् कोहनला नागपुरला आणावयाचें ही डॉ. केतकरांची सूचना डायरेक्टरांच्या सभेंत पास झाली. त्याप्रमाणें ती येथें येऊन ज्ञानकोशाचें काम करूं लागली पुढें डॉ. केतकर आणि मिस् कोहन यांचें लग्न ठरलें. या घटनेवरून पुढें कांहीं डायरेक्टरांच्या मनांत विकल्प आला. डॉक्टरसाहेबांनीं मात्र या प्रकरणीं मध्यस्थाची भूमिका पत्करली. त्यांच्यावरील विश्वासामुळें म्हणा किंवा इतर कांहीं कारणानें म्हणा हें प्रकरण नंतर मिटलें व ज्ञानकोशाचें अडलेलें तारूं पुन्हा गतिमान झालें. जर हें प्रकरण त्यावेळीं कोर्टांत गेलें असतें तर कंपनीचे त्याच वेळीं 'बारा वाजून' आज लोकांना ज्ञानकोश कदाचित दृष्टीस पडला नसता !

## राष्ट्रीय मंडळ

डॉक्टरसाहेब नागपुरास १९१६ सालीं आले, त्यावेळीं येथें राजकीय कार्य करणारी कांहीं मंडळी होती. त्यांचा एक 'राष्ट्रीय मंडळ' नांवाचा पक्ष होता. या पक्षांत डॉ. मुंजे, कै. बॅरिस्टर अभ्यंकर, श्री. नीलकंठराव उर्फ दादासाहेब उधोजी, डॉ. परांजपे, ॲड्. मनोहरपंत बोबडे, बॅ. गोविंदराव देशमुख, गोपाळराव ओगले, डॉ. चोळकर, कै. नारायणराव वैद्य, केशवराव अंबेकर, श्री. नारायणराव अळेकर, कै. भास्करराव पंडित, कै. बापूसाहेब भवाळकर, बापुसाहेब ठेंगडी ही मंडळी असून कै. श्रीमंत गोपाळराव बुटी हेही आंतून या पक्षाबद्दल सहानुभूति दाखवून आपल्या संपत्तीचा या पक्षाच्या विविध कार्यासाठीं सढळ हातानें विनियोग करीत असत. डॉ. मुंजे त्यावेळीं बरेच प्रसिध्दीस आले होते

त्यामुळें साहजिकच डॉक्टर प्रथम त्यांच्याकडे आकर्षिले गेले. बॅरि. अभ्यंकर एके दिवशीं हाताला कांहीं इजा झाल्यामुळें उपचार करण्यासाठीं डॉक्टरसाहेबांच्या दवाखान्यांत आले होते. त्यावेळीं ते नखशिखांत युरोपियन पोशाखांत होते. डॉक्टरसाहेबांची व त्यांची हीच पहिली भेट होय. अभ्यंकरांची नागपुरी ठसक्यांत—रेकून बोलण्याचालण्याची ऐट पाहून डॉक्टरसाहेबांना त्यांच्याबद्दल एकप्रकारचा तिटकाराच आला. डॉक्टरसाहेबांचें मत त्यावेळीं त्यांच्याबद्दल मोठेसें अनुकूल झालें नाहीं. हा एक अगदींच 'बहकलेला बॅरिस्टर' असावा असेंच त्यांना वाटलें! मात्र, पुढें अभ्यंकरांशीं जसजसा परिचय होत गेला व उभयतांच्या अधिकाधिक भेटीगांठी होत गेल्या तसतसा हा मनुष्य वरून जरी खडबडीत दिसत असला तरी मनाचा सच्चा व साफ आहे हें लक्षांत येऊन त्यांचें मत अभ्यंकरांविषयीं अनुकूल होत चाललें.

एकदां बॅरिस्टरसाहेब दवाखान्यांत येऊन डॉक्टरांना म्हणाले, "कांहो खरें, नुसता पैसाच मिळविणार काय? कांहीं देशवीश?"

डॉक्टरांनीं उत्तर दिलें, "केवळ पैसा मिळविणें माझें ध्येय नाहीं व केव्हांही नव्हतें. पाहूं पुढें. जशी बुद्धि सुचेल तसें करूं. आतांच घाई नाहीं."

तेव्हां बॅ. अभ्यंकर डॉक्टरांना म्हणाले, "येथें राष्ट्रीय मंडळ नांवाचा एक पक्ष असून डॉ. मुंजे त्याचे अध्वर्यू आहेत. तुम्ही त्या पक्षांत सामील व्हावें असें मला वाटतें."

**बोबडे-केळकरांचा सवता सुभा**

या राष्ट्रीय मंडळांतील बोबडे, केळकर, गोपाळराव देव, डॉ. हेडगेवार, मंडलेकर आणि चोरघडे वकील या मंडळींनीं आपण कांहीं निराळें काम करावें म्हणून बोबडे, केळकर हे जरी राष्ट्रीय मंडळांत होते तरी त्यांच्याच नेतृत्वाखालीं 'नागपूर नॅशनल युनियन' नांवाची त्यांनीं एक निराळी राजकीय संस्था काढिली. तिच्यांत सामील व्हावें म्हणून या मंडळींनीं डॉक्टरांना बराच आग्रह केला. डॉक्टर पुढें या दोन्हीही संस्थेंत (म्हणजे राष्ट्रीय मंडळ आणि नागपूर नॅशनल युनियन) सामील झाले. कांहीं दिवसांनीं नागपूर नॅशनल युनियन आपोआपच मरण पावली. राष्ट्रीय मंडळांत मात्र डॉक्टरसाहेब अखेरपर्यंत होते. या राष्ट्रीय मंडळानें नागपुरांत राजकीय जागृति

नि:संशय केली. या प्रांतांत कांग्रेसमार्फत जें जें कांहीं राजकीय कार्य घडवून आणावयाचें असेल तें तें प्रथम या राष्ट्रीय मंडळांतच ठरत असें.

**काँग्रेसला नागपूरचें निमंत्रण**

स्वतंत्र नागरीक म्हणून डॉ. खरे यांनीं आपल्या जीवनास जेव्हां प्रारंभ केला, त्यावेळचा नागपुरच्या राष्ट्रीय चळवळीचा काळ मोठा नमुनेदार होता. वऱ्हाड-नागपूर हा प्रांत लोकमान्यांच्या राजकारणाचा बालेकिल्ला म्हणून प्रसिद्ध होता. डॉ. मुंजे, बॅ. अभ्यंकरादि नागपूरकर मंडळी आणि कै. ना. दादासाहेब खापर्डे, लोकनायक अणे, वीर वामनराव जोशी, तपस्वी बाबा-साहेब परांजपे इत्यादि वऱ्हाडकर मंडळी असा या उभय प्रांतांतील लोकमान्यांचा अनुयायीगण त्यावेळीं मोठ्या एकोप्यानें कार्य करीत होता. या अनुयायांची पूर्वींची सहकार्य करण्याची वृत्ति पाहतां पुढें कालांतरानें त्यांच्यांत फूट पडून या प्रांतांतील राजकारणाचीं शकलें उडतील, असें त्यावेळीं कोणाच्या स्वप्नांत देखील आलें नसेल. अशा या लोकमान्यांच्या अनुयायी गणांत डॉ. खरे आपल्या सहज प्रवृत्तीनेंच ओढले गेले असणें स्वाभाविक आहे. नोकरीच्या सुरवातीसच, सरकारी नोकर या नात्यानें खामगांव मुक्कामीं लोकमान्यांच्या व्याख्यानाला उपस्थित राहून त्यांनीं जणूं काय राष्ट्रीय जीवनाची दीक्षा घेतली. त्यानंतर बरोबर दहा वर्षांनीं वऱ्हाड-मध्यप्रांतांत लोकमान्यांचा दुसरा दौरा झाला. मागील दौऱ्यापेक्षांही हा दौरा विशेष संस्मरणीय झाला आणि त्यांत अवघ्या १५ दिवसांच्या अवधींत वऱ्हाड-नागपूरच्या, चिखलीपासून भंडाऱ्यापर्यंत पसरलेल्या जनतेनें सुमारें सव्वा लाख रुपयांची थैली लोकमान्यांना अर्पण करून त्यांच्यावरील आपली निस्सिम निष्ठा व्यक्त केली होती. वऱ्हाड-नागपूर हा खरोखरच आपल्या राजकारणाचा बालेकिल्ला होय याबद्दल लोक-मान्यांचीही त्यावेळीं खात्री पटली. खामगांव येथें डॉ. खरे यांचा लोकमान्यांच्या व्याख्यानानें जसा दीक्षाविधी झाला, तसाच नागपूरच्या राजकीय जीवनांत लोकमान्यांच्या शुभागमन प्रसंगानेंच एकापरीनें डॉ. खरे यांचा खराखुरा प्रवेश झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, त्यांना थैली अर्पण करण्याचा समारंभ डॉ. खरे यांच्याच हस्तें श्री. लालुभाऊ गाडगीळ यांच्या सीताबर्डीवरील

दिवाणखान्यांत पार पडावा हें वरील विधानाच्या सत्यतेचेंच निदर्शक नव्हें काय? आणि तेव्हांपासूनच या प्रांताच्या राष्ट्रीय जीवनाशीं आज तागायत डॉ. खरे हे एकरूप झालेले आहेत.

लोकमान्यांचा या प्रांतांतील दौरा संपल्यानंतर लौकरच १९१९ च्या अमृतसर कांग्रेसला डॉ. खरे हे बॅरि.अभ्यंकर व नारायणराव वैद्य यांच्याबरोबर गेले होते. तेथेंच नागपूरकर मंडळींनीं आपल्या प्रांतातर्फे नागपूरला पुढील कांग्रेस भरविण्याचें निमंत्रण दिलें होतें. वस्तुतः १९०८ सालीं सुरत येथें भरलेलें कांग्रेसचें अधिवेशन नागपूरासच भरण्याचें ठरलें होतें. परंतु नागपुरास कांग्रेस भरू देणें म्हणजे ती सर्वस्वीं जहाल गटाच्या उर्फ राष्ट्रीय पक्षाच्या हातीं सोंपविणेंच होय, हें ओळखून कांग्रेसमधील नेमस्ताग्रणींनीं नागपूरांतून तिला अलगत उचलून सुरतेस नेऊन बसविलें. परंतु तेथेंही मवाळ पुढाऱ्यांचा बोजवारा उडालाच. कांग्रेसचीं शकलें झालीं, लोकमान्य तुरुंगांत गेले आणि त्यांचा अनुयायी गण किंकर्तव्यमूढ स्थितींत लोकमान्यांच्या मुक्ततेची प्रतीक्षा करीत बसून राहिला. लोकमान्यांनीं सहा वर्षांच्या कारावासांतून सुटून आल्यावर पुन्हा आपलें दल संघटित केलें, कांग्रेसमध्यें प्रवेश केला आणि अखेरीस कांग्रेस काबीज केली. अशा परिस्थितींत १९०८ सालीं नागपूरास भरूं न शकलेली कांग्रेस पुन्हा नागपूरासच निमंत्रित करण्याचा नागपूरकर मंडळींचा उपक्रम न्याय्यच होता.

**'कांहो खरे, कसली गडबड आहे ही?'**

या अमृतसरच्या प्रवासांत व पुढें दोन तीन महिन्यांनीं नागपूरावरून आपल्या कुटुंबासहित महाबळेश्वरला जातांना डॉक्टरसाहेबांना रेल्वेच्या डब्यांत व रेल्वे स्टेशनवर कांहीं युरोपियनांच्या उन्मत्तपणाच्या वागणुकीचे मोठे मजेदार अनुभव आले. या दोन्ही प्रसंगीं डॉक्टरसाहेब कसे बाणेदारपणानें वागले, याची येथें मुद्दाम वाचकास ओळख करून देणें इष्ट वाटतें.

कै. नरकेसरी अभ्यंकर, नारायणराव वैद्य व डॉक्टरसाहेब हे तिघेही अमृतसरला जातांना दुसऱ्या वर्गाच्या रिझर्व डब्यांत बसले होते. कांहीं वेळानें हे तिघेही झोपले. पुढें एका स्टेशनवर दोन तीन युरोपियन आपल्या सामाना-

सहित या तिघांच्या डब्याजवळ येऊन खिडकींतून आपलें सामान डब्यांत कोंबण्याचा प्रयत्न करूं लागले. डॉक्टरसाहेब लगेंच जागे झाले व 'हा डबा रिझर्व आहे' असें सांगून डब्यांत शिरणाऱ्या त्या युरोपियनांना त्यांनीं अडथळा केला. लगेंच त्यांची बाचाबाची सुरू झाली. हा गोंगाट ऐकून बॅरिस्टर अभ्यंकर खडबडून जागे झाले व 'कांहो खरे, कसली गडबड आहे ही' असें म्हणून ते ताडकन उठून बसले व पाहतात तों डॉ. खरे व हे दोन तीन युरोपियन्स यांच्यांत डब्याच्या दाराशीं झटापट सुरू आहे. बॅरिस्टरसाहेब लागलीच खालीं उतरले व मोठ्या आवेशानें त्या युरोपियनांच्या सामानाला त्यांनीं अशी जोराची ठोकर मारली कीं, त्यासरसें त्यांचें सर्व सामान प्लॅटफॉर्मवर अस्ताव्यस्त उधळलें गेलें. हा प्रकार पाहून त्या डब्याभोंवतीं दोनतीनशें माणसांचा घोळका जमला. ते युरोपियन अद्वातद्वा बोलूं लागले, तेव्हां मोरूभाऊंनीं आपल्या पहाडी आवाजांत त्यांना असा दाट भरला कीं, मोरूभाऊंच्या त्या सिंहगर्जनेनें भयभीत होऊन त्यांनीं तात्काळ तेथून धूमच ठोकली. डबा अगोदरच रिझर्व करून ठेवण्यांत आल्यामुळें या युरोपियनांनीं नंतर रेल्वे अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असतांही अर्थात तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

### मी या देशाचा मालक आहे

महाबळेश्वरला जातांना डॉक्टरसाहेब मेलच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत आपलें सामान लावून वर्तमानपत्र वाचीत पाय पसरून कोचावर पडले होते. गाडी सुटण्याच्या सुमारास त्याच डब्यांत चारपांच लष्करी अधिकारी शिरले. डॉक्टरांना पाहतांच ते म्हणाले, "तुमच्यासारखे आणखी किती भिकारी या डब्यांत येणार आहेत?"

यावर डॉक्टरांनीं त्यांना ताडदिशी उत्तर दिलें कीं, "या देशांत माझा जन्म झाला असल्यामुळें मी या देशाचा मालक आहें. उलट, परदेशांतून केवळ आपलें पोट जाळण्यासाठीं या देशांत आलेले तुमच्यासारखे लोकच भिकारी आहेत."

"आम्हीं सर्व येथें बसणार आहोंत, तुम्ही येथून दुसरीकडे जा." असें त्या लष्करी अधिकाऱ्यांनीं डॉक्टरांना फर्मांविलें. "मी येथून बिलकूल हलणार नाहीं. वाटल्यास तुम्हीच दुसऱ्या डब्यांत जा" असा रोकडा जबाब डॉक्टरांनीं

त्यांना दिला. त्यावर संतापून ते डॉक्टरांना म्हणाले, "विनाकारण मुजोरी कां करतोस? या बंदुकीशीं गांठ आहे हें लक्षांत ठेव."

"वा:! नुकतांच तुम्ही शस्त्रास्त्रांनीं जर्मनीवर विजय मिळविला आहे, आतां माझ्यासारख्या नि:शस्त्र माणसावर तुम्ही आपल्याजवळील बंदुकीनें हा जो दुसरा विजय मिळवाल, त्यानें सबंध जगांत तुमची फारच वाहवा होईल." असा डॉक्टरांनीं त्यांना लगेंच टोमणा मारला. डॉक्टरांच्या या टोमण्यानें ते खजील होऊन आपलें आतां कांहींच चालत नाहीं असें पाहून स्वस्थ बसले. तरी पण त्यापैकीं एकानें आपले बुटाचे पाय डॉक्टरांच्या पायाशीं भिडवितांच डॉक्टरांनींही ताडकन आपल्या बुटाचे पाय त्याच्या नितंबबिंबाला भिडवितांच तो शुद्धीवर आला. त्यानें हळूच आपले पाय आखडले. डॉक्टरांनींही आपले पाय नंतर आखडून घेतले. हा प्रकार पाहून त्या डब्यांतील इतर लष्करी अधिकाऱ्यांत खूप हंशा पिकला. पुढें हे सर्व जण डॉक्टरांशीं मोठ्या सभ्यतेनें वागले. त्यांनीं आपल्या जवळील बिस्किटें, फळें आणि चहा डॉक्टरसाहेबांनीं घ्यावा म्हणून त्यांच्यापुढें केला, परंतु, जे लोक आपल्याला भिकारी समजतात, त्यांच्यापासून कोणतीही वस्तु स्वीकारण्यास आपण तयार नसल्याचें डॉक्टरांनीं त्यांना स्पष्ट सांगितलें.

## सामाजिक व औद्योगिक कार्याकडे लक्ष

राजकीय कार्याबरोबरच सामाजिक व औद्योगिक कार्यांतही डाक्टर-साहेब मोठ्या आस्थेनें आतां लक्ष घालूं लागले. देशी उद्योगधंद्यांची भरभराट व्हावी व त्यांच्या उत्पादकांना उत्तेजन मिळावें म्हणून नागपुरांत निघणाऱ्या बहुतेक नवीन कंपन्यांचे ते खुषीनें डायरेक्टर होत असत. निरनिराळ्या कंपन्यांचे डायरेक्टर राहून केवळ पैसा मिळविण्याची त्यांनीं कधींच हांव धरली नाहीं. कोणत्याही कंपनींत डॉक्टर असावयाचेच. यावरून बॅरिस्टर अभ्यंकर त्यांना नेहमीं थट्टेनें म्हणत, 'हा डॉ. खरे नागपूरचा सर भालचंद्र आहे.' या पायीं डॉक्टरांना फायदा न होतां उलट हजारों रुपयांचें नुकसानच सोसावें लागलें.

नॅशनल स्टोअर्स अँड ट्रेडिंग नांवाची एक कंपनी नागपूरला स्थापन झाली होती. डॉक्टरसाहेब त्या कंपनीचे एक डॉयरेक्टर होते. कंपनीच्या

मॅनेजिंग डायरेक्टरानें पैशाची कांहीं अफरातफर केल्याची डॉक्टरांना गुणगुण लागली. लगेच डॉक्टरांनीं त्या गृहस्थाला त्याबद्दल जाब विचारून वहीखात्याप्रमाणें शिल्लक दाखविण्यास सांगितलें. त्यानें समाधानकारक उत्तर न दिल्यामुळें डॉक्टरांचा संशय जास्तच दुणावला व त्यांनीं सरळ कंपनीचें सबंध दप्तर कोतवालींत नेऊन दाखल केलें. पुढें या प्रकरणीं सदरहू मॅनेजिंग डायरेक्टरला कोर्टांतून शिक्षा झाली. याच कंपनीचे डॉक्टरसाहेब पुढें अध्यक्षही झाले. या शिक्षा झालेल्या मॅनेजिंग डायरेक्टरचा त्या कंपनींत एक मित्र होता. त्यानें, केवळ आकसानें डॉक्टरांनीं खोटा बॅलन्सशीट पास करून घेतला या आरोपावरून डॉक्टर व त्यांचे बंधु अण्णासाहेब हे त्या कंपनीचे ऑडिटर होते ) यांच्या विरुद्ध कंपनी मुंबईला नोंदविली गेल्यामुळें, तेथील कोर्टांत खटला भरला. नऊ महिने हा खटला चालला. नागपूरचे श्रीमंत राजाबाळसाहेब चिटणवीस हे या कंपनींचे एक शेअरहोल्डर होते. त्यांनीं त्यावेळीं येथें निघत असलेल्या 'स्वातंत्र्य' नांवाच्या दैनिकांत डॉक्टरांच्या विरुद्ध कांहीं बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध केला. त्या 'स्वातंत्र्या' च्या मॅनेजिंग कमेटीचेही डॉक्टरसाहेब अध्यक्ष होते. तेव्हां डॉक्टरांनींही श्रीमंत राजाबाळसाहेब चिटणवीस यांच्या विरुद्ध नागपूरच्या कोर्टांत फिर्याद दाखल केली. पुढें मुंबईच्या खटल्यांतून डॉक्टरसाहेब आणि त्यांचे बंधू निर्दोष सुटले; पुढें नागपूरच्या कोर्टांतही श्रीमंत राजाबाळ चिटणवीसांनीं भरकोर्टांत खेद व्यक्त करून नुकसानभरपायीदाखल डॉक्टरांना हजार रुपये दिले. श्री. राजाबाळसाहेबांचे स्नेही श्री. दामुपंत देशमूख यांनीं डॉक्टरसाहेबांचें मन वळवून हें प्रकरण अशा रीतीनें आपसांत मिटविण्यांत बरेच परिश्रम घेतले. या खटल्यांत डॉक्टरसाहेबांना श्रीमंत राजाबाळसाहेबांची स्वदस्तुरची सही कोर्टांत सिद्ध करून दाखवावयाची होती. याच सुमारास डॉक्टरांचे एक चाहते श्री. माधवरावजी उळाभाजे नांवाचे एक गृहस्थ राजाबाळसाहेबांकडे नोकर असून त्यांना नोकरीवरून बसविण्याचा किंवा आपल्या इस्टेटींत दुसऱ्या गांवीं बदलण्याचा हुकूम राजाबाळसाहेबांच्या सहीचाच होता. याच सहीचा डॉक्टरसाहेबांना त्यावेळीं कोर्टांत उपयोग झाला.

# राष्ट्रीय जीवनाशीं तादात्म्य

## नागपुरची कांग्रेस

१९२० सालीं नागपुरास भरलेलें कांग्रेसचें अधिवेशन हिंदी राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत अत्यंत संस्मरणीय असें झालें यांत शंका नाहीं. महात्मा गांधींच्या सुप्रसिद्ध असहकारितेचा ठराव येथेंच मंजूर झाला. अशा या क्रांतिपूर्ण राष्ट्रीय सभेच्या स्वागत समितीच्या कार्यकारी मंडळाचा सभासद होण्याइतकी आणि कांग्रेस अधिवेशनाच्या आरोग्य खात्याची स्वतंत्र जबाबदारी घेण्याइतकी डॉ. खरे यांची सार्वजनिक जीवनांत त्यावेळीं प्रगति झाली होती. कॉंग्रेसच्या राजकारणाशीं—किंबहुना महात्मा गांधीप्रणीत कांग्रेसच्या राजकारणाशीं असें म्हणणेंच बरोबर होईल—डॉ. खरे यांचें त्या निमित्तानें जें तादात्म्य झालें, तें १९३८ च्या ऑगस्टमध्यें पंतप्रधानकीवरून कॉंग्रेसश्रेष्ठींनीं त्यांना पदच्युत करीपर्यंत तसेंच कायम होतें. स्वतः गांधीशींही त्यांची व्यक्तिगत घनिष्ठता सारखी वाढतच होती. आणि शेवटीं शेवटीं महात्माजींनीं याच प्रांतांत वास्तव्य केल्यानंतर तर ती इतकी वाढली कीं, गांधीजींच्या प्रकृतिस्वास्थ्याचे डॉ. खरे हेच संरक्षक बनले. महात्मा गांधींचा हिंदुस्थानांतील ज्या फारच थोड्या डॉक्टरांच्या वैद्यकीय ज्ञानावर विश्वास असेल त्यांतच डॉ. खरे यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे.

## असहकारितेची प्रचंड लाट

नागपूर कांग्रेसच्यानंतर हिंदी राष्ट्रीय जीवनसमुद्रावर असहकारितेच्या आंदोलनाची प्रचंड लाट उसळली. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय इतिहासांत सामान्य जनतेचा येवढा प्रचंड प्रक्षोभ, स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर, याच वेळीं प्रथम दिसून आला. प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी व कर्तृत्ववान मनुष्याच्या अंतर्यामांत सुप्त असलेल्या कर्तृत्वाच्या उर्मी या चळवळीनें खळाळून सोडल्या. प्रांतांतील हजारों विद्यार्थ्यांनीं शाळाकॉलेजें सोडलीं, वकीलांनीं वकील्या सोडल्या, परदेशी मालाच्या होळ्या पेटविण्यांत आल्या. सभा, परिषदा, मिरवणुकी यांचा तुफान

दर्या उफाळू लागला आणि शस्त्रविहीन स्थितींत देखील बलाढ्य साम्राज्यशाहीच्या मकरदाढेंत सांपडलेलें आपल्या स्वराज्याचें माणिक आपण प्राप्त करून घेऊं शकतों—आपल्या स्वतःच्या कर्तृत्वानें, स्वावलंबनानें व परकीय नोकरशाहीशीं कोणत्याही प्रकारचें सहकार्य करण्याचें नाकारून आपण स्वराज्य प्राप्त करून घेऊं शकतों—असा आंतरिक विश्वास प्रत्येक हिंदी मनुष्यास त्यावेळीं वाटू लागला. या आंतरिक विश्वासानेंच त्यांच्या ठिकाणच्या सर्व सुप्त शक्ती खडबडून जाग्या केल्या.

**पुढाऱ्यांच्या विश्वासाचें स्थान**

नागपूर कांग्रेसच्या वेळेपासूनच राष्ट्रीय जीवनाच्या लाटेवर आरोहण करूं लागलेले डॉ. खरे यांच्या ठिकाणच्या स्वाभाविक आवेशाला असहकारितेच्या आंदोलनाचें तुफान स्वरूप पाहून अधिकच स्फुरण चढलें असल्यास नवल नाहीं. एक वर्षांत स्वराज्यप्राप्तीच्या महात्मा गांधींच्या घोषणेवर काडी इतकाही विश्वास नसतांना, केवळ शिस्तीखातर एक वर्षभर आपल्या व्यवसायाकडे यत्किंचितही लक्ष न देतां या प्रांतांतील चळवळीच्या अनेकविध अंगांचें पोषण करण्यास त्यांनीं कै. नरकेसरी अभ्यंकर यांना मनोभावें मदत केली. मात्र, चरखा चालवा व सूत कांता म्हणजे स्वराज्य मिळेल, या महात्माजींच्या शिकवणुकीबाबत डॉक्टरसाहेबांनीं सभा-परिषदांतून किंवा इतर कोणाजवळही चुकूनसुद्धां कधीं उच्चार केला नाहीं. डॉ. खरे यांच्या कर्तृत्वाचा या वेळेपासूनच अधिकाधिक परिपोष होत गेला आणि यानंतर कांग्रेस व कांग्रेसचें राजकारण यांच्याशीं त्यांचा उत्तरोत्तर अधिकाधिक जबाबदारीचा संबंध येत गेला. यशस्वी डॉक्टर या नात्यानें आतां नागपूरच्या सर्व आबालवृद्धांना, रावरंकांना व स्त्रीपुरुषांना ते पूर्णपणें परिचित झाले होतेच. पण त्याशिवाय एक उदयोन्मुख कार्यकर्ता या नात्यानेंही नागपूरची जनता त्यांच्याकडे विशेष कौतुकानें व आपुलकीनें पाहूं लागली होती. अद्यापपावेतों कोणत्याही नव्या कार्याचें प्रस्थान ठेवण्याची जबाबदारी त्यांनीं पत्करलेली नव्हती ही गोष्ट खरी असली, तरी अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या ज्यांच्या अंगावर टाकतां येतील अशा विश्वासाचें एक महत्वाचें ठिकाण या नात्यानें मोठी पुढारी मंडळी

त्यांच्याकडे निश्चितपणें पाहूं लागली होती. त्यांनीं आणून टाकलेलें काम चोख रीतीनें बजावणें येवढेंच आपलें कर्तव्य आहे, असें डॉक्टर खरेही स्वत: समजत होते. या काळांत आपण होऊन कोणतेंही नवीन काम त्यांनीं सुरू केलें नाहीं. पण सोंपविण्यांत आलेलें काम पार पाडण्यांत त्यांनीं कधीं कुचराईही केली नाहीं.

## स्वराज्य पक्षाची स्थापना

अशा रीतीनें त्यांच्या कर्तृत्वाचा विकास होत असतांना असहकारितेच्या चळवळीचा भर ओसरला, महात्माजींना तुरुंगांत डांबण्यांत आलें, गांधी पक्षांत फेरवादी व नाफेरवादी असे दोन गट उत्पन्न होऊं लागले आणि १९२२ च्या गया येथील कांग्रेसच्या अधिवेशनांत या मतभेदाचें खडाजंगींत रूपांतर होऊन पं. मोतीलाल नेहरू व देशबंधु चित्तरंजनदास ह्यांच्या नेतृत्वाखालीं फेरवादी लोकांचा स्वराज्यपक्ष स्थापन झाला. नागपूरचे बॅरिस्टर अभ्यंकर व डॉ. मुंजे ही जोडगोळी अर्थातच या स्वराज्यपक्षांत सामील झाली. स्वराज्यपक्षाच्या खटपटीनें कौंसिल बहिष्काराचा कार्यक्रम अप्रत्यक्षरीत्या कॉंग्रेसनें रद्द केला आणि तिचा आशीर्वाद मिळवूनच १९२३ च्या कायदे मंडळाच्या निवडणुकी लढविण्याचें स्वराज्य पक्षानें ठरविलें.

## निवडणुकीच्या आखाड्यांत

या ठिकाणीं हें नमूद करणें अत्यावश्यक आहे कीं, पं. मोतीलाल नेहरू यांचा बॅरिस्टर अभ्यंकर यांचेवर अत्यंत विश्वास असे. आणि म्हणूनच कांहीं महत्वाच्या जागांच्या निवडणुकीसाठीं उमेदवारांचीं नांवें सुचविण्याची जबाबदारी मोतीलालजींनीं मोरूभाऊंच्यावर टाकिली होती. खास नागपूर शहरातर्फे खात्रीचा उमेदवार सुचविण्याचा प्रसंग बॅरिस्टर अभ्यंकरांवर होता. नागपुर शहरातर्फे दोन उमेदवार प्रांतिक कायदे मंडळांत निवडून द्यावयाचे होते. आणि प्रांतातर्फे एक मध्यवर्ति कायदे मंडळांत पाठवावयाचा होता. अर्थात मध्यवर्ति कायदे मंडळासाठीं पं. मोतीलालजींनीं मोरूभाऊंचीच निवड केली. तसेंच प्रांतिक कायदेमंडळाच्या नागपुर शहरातर्फेच्या दोन जागांपैकीं एक डॉ. मुंजे यांनाच मिळणें अवश्य होतें. अशा रीतीनें या दोन अव्वल दर्जाच्या

पुढाऱ्यांत दोन जागांची विभागणी झाल्यानंतर प्रांतिक कायदेमंडळांतील नागपुर शहरविभागातर्फेची दुसरी जागा अजून रिकामी होती. तिच्याकरितां तसाच पट्टीचा तुल्यबळ व खात्रीनें निवडून येईल अशा विश्वासाचा उमेदवार पाहिजे होता. निवडणुकीसाठीं उमेदवाराचें संशोधन करण्याचें काम वधू संशोधनासारखेंच बिकट असतें. कारण, अयोग्य उमेदवाराची निवड केल्यास त्याच्या अपयशाचें काजळ त्याची निवड करणाऱ्या पक्षाच्या तोंडास तर फासलें जातेंच. पण त्याशिवाय ज्या बहुसंख्य जनतेच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं त्यास निवडून पाठवावयाचें असतें, तिच्याही हितसंबंधांची हानि झाल्याशिवाय राहत नाहीं. म्हणून प्रामाणिक, विश्वासू, निर्भिड, धैर्यवान, लांचलुचपतीस बळी न पडणारा आणि आपल्या पक्षाशीं एकनिष्ठ राहून पक्षाचें मत, पक्षाचा कार्यक्रम आणि पक्षाचें धोरण, धडाडीनें पुढें मांडणारा उमेदवार पसंत करणें अवश्य असतें. त्यांतून डॉ. मुंजे यांच्यासारखा अखिल भारतीय प्रसिध्दी पावलेला एक उमेदवार नागपूर शहरातर्फे उभा राहण्यास स्वराज्य पक्षाला मिळाला असतांना, त्याच्या तोडीचा दुसरा उमेदवार स्वराज्य पक्षाला मिळवून देणें हें काम किती जोखमीचें व महत्वाचें होतें याची कल्पना येईल. परंतु महत्वाची जोखीम एखाद्यावर सोपविण्याचा प्रसंग जेव्हां जेव्हां बॅरिस्टर अभ्यंकर यांच्यावर यावा, तेव्हां तेव्हां त्यांना सर्वांत प्रथम डॉ. खरे यांचीच आठवण व्हावी हें स्वाभाविक होतें. वरील आणीबाणीच्या वेळीं डॉ. मुंजे यांचा जोडीदार शोधण्यासाठीं आपल्या तीक्ष्ण दृष्टीनें मोरूभाऊ ज्यावेळीं इकडे तिकडे पाहूं लागले, तेव्हां सर्व साधकबाधक विचार केल्यावर त्यांची दृष्टि डॉ. खरे यांच्यावरच स्थिरावली आणि डॉ. खरे यांनींही मोरूभाऊंच्या म्हणण्यावरून केवळ प्रसंगप्राप्त कर्तव्य-बुद्धीनेंच आपली अनुमति दिली. मोरूभाऊंची ही निवड किती यथार्थ होती हें डॉ. खरे यांच्या पुढील कायदे मंडळांतील कर्तबगारीनें तर शाबीत केलेंच; पण, जणूं काय भविष्यकाळांतील प्रांताचा उदयोन्मुख पंतप्रधानच आपण निवडीत आहोंत, अशा भावनेनें नागपूरच्या जनतेनें डॉ. मुंजे यांच्यापेक्षांही अधिक मतें देऊन डॉ. खरे यांच्या विकसनशील कर्तृत्वावरील आपला विश्वास प्रकट केला.

**कायदेमंडळांत प्रवेश**

१९२४ सालीं नागपूरच्या कायदेमंडळांत डॉ. खरे यांनीं प्रवेश केला, तेव्हांपासून १९२९ च्या डिसेंबरांत कॉँग्रेसच्या लाहोर येथील अधिवेशनाकडून कायदेमंडळांतील कॉँग्रेस सदस्यांना राजीनामा देण्याचा आदेश मिळेपर्यंत डॉ. खरे प्रांतिक कायदेमंडळाचे अखंड सभासद राहिले. यानंतर पुन्हां १९३६ सालीं नवीन सुधारणान्वयें झालेल्या निवडणुकींत ते केवळ यशस्वी रीतीनें निवडून आले येवढेंच नव्हे, तर प्रांताचे पंतप्रधानही झाले. या निवडणुकींत अ. भा. कांग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य आणि मध्यप्रांत-वऱ्हाड कॉँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें नवीन निवडणुकी जिंकण्यासंबंधीं व तेणेंकरून प्रांतांत कॉँग्रेसची इभ्रत वाढीस लावण्यासाठीं त्यांनीं जीवापाड मेहनत करून आणि कांग्रेसच्या फंडांतून एकही पैसा न घेतां स्वतःच्या खर्चानें सबंध वऱ्हाड-मध्यप्रांतांतून सतत दौरा काढून कायदेमंडळांत कॉँग्रेसला निर्भेळ बहुमत मिळवून दिलें. त्यांच्या या अविश्रांत श्रमांचें पारितोषिक म्हणूनच कीं काय कायदेमंडळांतील कॉँग्रेस पक्षानें डॉ. खरे यांना एकमतानें आपला पुढारी नेमून कॉँग्रेस मंत्रिमंडळाच्या पंतप्रधानकीचीं वस्त्रेंही त्यांनाच अर्पण केलीं. मध्यंतरी २ जानेवारी १९३५ सालीं बॅरिस्टर अभ्यंकरांच्या निधनामुळें रिकाम्या झालेल्या मध्यवर्ति कायदेमंडळाच्या जागेसाठीं डॉ. खरे हे कांग्रेस उमेदवार म्हणून उभे राहिले व बिनविरोध निवडून आले. अशा रीतीनें प्रांतिक व मध्यवर्ति कायदेमंडळाचे सदस्य व प्रांताचे पंतप्रधान ह्या नात्यानें डॉ. खरे यांच्या आयुष्यांतील १२ वर्षे आतांपर्यंत खर्ची पडलीं.

**नागपुरांतील तीन सत्याग्रह**

राजकीयदृष्ट्यां अवलोकन करितां १९२३-१९२४ पासून २८-२९ पर्यंतचा डॉ. खरे यांचा काळ प्रांतिक कौंसिलांतील कामगिरी बजावण्यांतच व्यतीत झाला हें लक्षांत ठेवलें पाहिजे. या काळांत नागपूर शहरानें आपल्या कर्तबगारीनें अखिल भारताचें लक्ष वेधून घेतलें होतें. या काळांत नागपुरास ज्या अनेक असाधारण घटना घडल्या, त्यांत दिंडी सत्याग्रह, सेनापती अवारी यांचा शस्त्रसत्याग्रह आणि झेंडा सत्याग्रह या गोष्टींची गणना अत्यंत प्रामुख्यानें करावयास पाहिजे. नागपुरच्या दिंडी सत्याग्रहामुळें नागपुरांतील

समस्त हिंदु जनतेचें तेज, ऐक्य, सामर्थ्य आणि निग्रहानें सरकारशीं लढा करण्याची तत्परता जितकी दिसून आली तितकी यापूर्वी केव्हांच दिसली नसेल. कै. राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसल्यापासून तों टिळक विद्यालयाचे प्रिन्सिपॉल श्री. अप्पाजी तिजारे यांच्यापर्यंत नागपुरांतील सर्व लहानथोर सरदार-दरकदार, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, हिंदु पुढारी सरकारी आज्ञेचा निषेध करून तिचा भंग करण्यासाठीं अहमहमिकेनें दिंडी सत्याग्रहांत भाग घेण्यासाठीं, कोणी आपल्या गळ्यांत ढोल बांधून तर कोणी तंबोरी अडकवून, कोणी टाळ-मंजिऱ्या घेऊन तर कोणी झांज-खंजिरी घेऊन पुढें सरसावले होते. सरकारच्या अन्याय्य आज्ञेचा भंग करण्याचा प्रसंग, तशांत सर्व नागपूर शहर सत्याग्रहासाठीं लोटलेलें; मग अशा ठिकाणीं डॉ. खरे यांच्यासारखा हिंदु समाजांतला तडफदार तरुण पुढारी नसेल हें कसें शक्य आहे? अर्थात डॉ. खरे यांनींही ह्या हिंदु-हितसंरक्षणार्थ सुरू झालेल्या सत्याग्रहांत उडी घेतली होती हें सांगणें नकोच. त्याचप्रमाणें गणेशपेठेंतील मशिदीसमोरून वाद्यें वाजविण्याचा आजवर अबाधित राहिलेला नागपूरच्या जनतेच्या हक्कास प्रतिबंध करण्यांत आला असतांना तो प्रस्थापित करण्यासाठीं पुन्हां एकवार सरकारशीं जो झगडा झाला—सत्याग्रह करण्यांत आला—त्यांतही डॉ. खरे सामील होतेच.

### नागपुरचा झेंडा सत्याग्रह

दिंडी सत्याग्रहानंतर महत्वाची घटना म्हणून ज्याचा वर निर्देश करण्यांत आला, त्या नागपूरच्या झेंडा सत्याग्रहाला एक विशिष्ट अशी पार्श्वभूमि असल्या-मुळें तिचेंही येथें संक्षेपतः वर्णन करणें इष्ट होईल. १९२१ च्या असहकारितेच्या चळवळीचें क्रमशः पर्यवसान ज्या करबंदीच्या चळवळींत होणार होतें व जिचें प्रस्थान मुख्यतः गुजराथेंतील बार्डोली व आनंद या दोन तालुक्यांत ठेवण्यांत आलें होतें, ती चळवळ, उत्तरेस गोरखपुर जिल्ह्यांत चौरीचौरा येथें पोलीस ठाणें जाळून लोकांनीं अहिंसाव्रताचा जो भंग केला, त्यामुळें महात्मा गांधींनीं तहकूब केली होती. वस्तुतः या सबंध चळवळीचे प्रणेते महात्माजीच असल्यामुळें आणि त्यांनींच करबंदीची चळवळ मागें घेतली असल्यामुळें त्यांच्याविरुद्ध शस्त्र उपसण्याचें सरकारला कांहींच कारण नव्हतें. परंतु चळवळ मागें घेतल्यानंतरच

सरकारनें त्यांना अटक केली. अशा रीतीनें सेनापतीनें मोहीम तहकुब केली आहे आणि खुद्द सेनापतीस प्रतिपक्षाकडून अटक झाली आहे, अशी परिस्थिती असतांना देखील देशांतील असंतोषाचें वातावरण व सत्याग्रहाच्या रूपानें सरकारशीं प्रत्यक्ष झुंज घेण्याची लोकांची मनोवृत्ति अद्यापि शमलेली नव्हती. महात्माजींना अटक झाल्यानंतर कायदेभंग हा व्यवहार्य आहे कीं नाहीं याचा विचार करण्यासाठीं कांग्रेसनें कै. देशबंधु दास, पंडित मोतीलाल नेहरू, इ. पुढाऱ्यांची एक कमेटी नेमली होती. आणि त्या कमेटीनें जरी देशभर दौरा करून कायदेभंगाच्या विरुद्ध आपलें मत नमूद केलें होतें, तरी झुंजार मनोवृत्तीच्या लोकांच्या आवेशाला कोठें तरी वाव देणें हें अवश्य झालें होतें. या भूमिकेंतूनच नागपुरचा झेंडा सत्याग्रह जन्मास आला होता. आणि म्हणूनच सर्व हिंदुस्थानांतील लढाऊ बाण्याच्या सत्याग्रहानुकूल लोकांचे जत्थेच्या जत्थे त्या सत्याग्रहासाठीं नागपुरास येऊं लागले होते. किंबहुना, हिंदी जनता व बलाढ्य ब्रिटिश साम्राज्य सरकार, यांच्यातील चांचपणीची चकमक या दृष्टीनें या सत्याग्रहाला सबंध देशांत अपूर्व महत्व प्राप्त झालें होतें. या सत्याग्रहाच्या बाबतींत ब्रिटीश सरकारचे प्रतिनिधीभूत असलेल्या मध्यप्रांत सरकारशीं हिंदी जनतेतर्फे कै. विठ्ठलभाई पटेल यांनीं तडजोड घडवून आणण्यासाठीं जी खटपट केली व त्याकरितां खास नागपुरास मुक्काम ठोकून जीं अनेक पडद्यामागील राजकारणाचीं कारस्थानें शिजविलीं, त्यांच्याशीं कै. मोरूभाऊ अभ्यंकर यांचा व अनुषंगानें डॉ. खरे यांचाही किती निकटचा संबंध आला असेल याची चाणाक्ष वाचक सहज कल्पना करूं शकतील.

**हिंदी राष्ट्राला राष्ट्रीय ध्वज-प्राप्ति**

हिंदी जनता व ब्रिटिश सरकार यांच्यामधील सलामीची पहिली चकमक या दृष्टीनें तर नागपूरच्या या झेंडासत्याग्रहाला अपूर्व महत्व आहेच; पण, त्याशिवायही त्यामुळें हिंदी राष्ट्रीय सभेला व हिंदी राष्ट्राला असा एक ध्वज मिळाला कीं, ज्याच्या इभ्रतीसाठीं, ज्याच्या मानासाठीं, ज्याच्या संरक्षणा-साठीं, ज्याला अभिवादन करण्यासाठीं भारताच्या हजारों तरुणांनीं आणि तरुणींनीं, किंबहुना सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं आपल्या प्राणांचेंही बलिदान

करण्याची तयारी दाखवून अनन्वित अत्याचार सहन केला व आत्यंतिक धैर्य व स्वार्थत्याग व्यक्त केला. "हिंदी जनतेच्या सर्व सुप्त व वांच्छित आकांक्षांचें व गौरवाचें—फार काय, तिच्या मूर्तिमंत स्वातंत्र्याचें—प्रतीक हाच झेंडा बनलेला आहे," हे त्यानंतर १४ वर्षांनीं प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे यांनीं विदर्भ प्रांतिक परिषदेच्या शेंदुर्जनाघाट येथील अधिवेशनांत झेंडावंदनाच्या वेळीं जे उद्गार काढले ते ध्यानांत घेतां, ह्या राष्ट्रीय ध्वजाचा जन्म ज्या नागपूरच्या झेंडा सत्याग्रहाच्या चळवळींत झाला तिचें वास्तविक मूल्य केवढें मोठें आहे, हें विशद करून सांगण्याची आतां जरूरी उरली असेल असें वाटत नाहीं.

१९२४ च्या नागपुरांतील झेंडा सत्याग्रहानंतर १९२६ सालीं झालेल्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकींचे व तींतही व्यक्तिशः डॉ. खरे यांना मिळालेल्या यशाचें वर्णन पूर्वी केलेंच आहे. ह्यानंतर १९३० च्या जानेवारीपर्यंत डॉ. खरे यांची कामगिरी मुख्यतः प्रांतिक कायदेमंडळांतच घडली असली तरी २९–३० सालीं ज्या विशिष्ट घटनांशीं डॉ. खरे यांचा निकटचा संबंध आला, त्यांचें स्वरूप नीट लक्षांत येण्यासाठीं राष्ट्रीय परिस्थितीचा थोडासा आढावा घेणें जरूर आहे.

**सायमन सप्तग्रहींचा भारतांत संचार**

१९१९ चा घटना कायदा मंजूर करतेवेळीं हिंदुस्थानला दर दहा वर्षांनीं राजकीय सुधारणांचा हप्ता देण्यांत येईल व अशा रीतीनें हप्तेबंदीनें साम्राज्यांतर्गत स्वराज्याचें दान हिंदी जनतेच्या पदरांत टाकण्यांत येईल असें आश्वासन ब्रिटिश सरकारकडून देण्यांत आलें होतें. त्यामुळें १९२९ हें साल जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी जनतेची या बाबतींतली उत्कंठा अधिकाधिक प्रज्वलित होऊं लागली होती. तशांत निरनिराळे हिंदी पुढारी याच संधानास विलायतची यात्रा करून परत येऊं लागले आणि त्यांच्याबरोबरच भावी सुधारणांच्या अंदाजांविषयीं अफवांचें पेवच हिंदुस्थानांत फुटल्यासारखें झालें. दशवार्षिक सुधारणांचा नवीन हप्ता कसा व कोणत्या प्रकारें द्यावयाचा, ह्याचा विचार करण्यासाठीं बादशहाकडून लौकरच एक कमिशन नेमल्या जाण्याचा

संभव आहे, ही बातमी विलायतेहून परत येणाऱ्या पुढाऱ्यांच्या बरोबरच हिंदुस्थानांत येऊन पोंचली. परंतु लौकरच हिंदी लोकांना जेव्हां असें आढळून आलें कीं, ह्या कमिशनचें अध्यक्षपद तर दूरच राहो; पण साधें सदस्यत्व देखील कोणत्याही हिंदी पुढाऱ्याला देण्यांत येणार नसून त्यावर सर्वच्या सर्व गोरेच काम करणार आहेत, तेव्हां हिंदी लोकांचा असंतोष अधिकच प्रक्षुब्ध झाला असल्यास नवल नाहीं. अखेरीस चिरोल प्रकरणीं लो. टिळकांच्यातर्फे प्रिव्ही कौंसिलच्या समोर वकीली केल्यामुळें प्रसिद्धीस पावलेले, पण सदर कमिशनचे अध्यक्ष म्हणून हिंदुस्थानांत आल्यानंतर आतां अत्यंत कुप्रसिद्ध झालेले सर जॉन सायमनसाहेब, आपल्या सप्तग्रहासह जेव्हां मुंबईच्या प्रवेशद्वारांतून हिंदुस्थानच्या-भूमीवर पदक्षेप करते झाले, तेव्हां त्यांच्या निषेधाची एक प्रचंड लाट सर्व हिंदुस्थानभर उसळली. खुद्द मुंबई शहरांत तर श्री. के. एफ. नरिमन यांच्या नेतृत्वाखालीं मुंबईतील तरुण विद्यार्थ्यांनीं सायमनसाहेबांची रेवडी उडवलीच. पण, मुंबई सोडून हिंदुस्थानांत जेथें जेथें ही सायमन प्रमुख सप्तग्रही सरकारच्या कडेकोट बंदोबस्तांत फिरली, त्या त्या प्रत्येक ठिकाणीं निषेध प्रदर्शक निदर्शनांच्या तुफान वावटळी उठल्या. ह्या वावटळींची छाया नागपूरसारख्या धडाडीच्या शहरावर पडणें अपरिहार्यच होतें. सायमन कमिशन आपल्या खास गाडींतून जेव्हां नागपूर स्टेशनवर आलें तेव्हां त्याच्या निषेधासाठीं कै. बॅरिस्टर अभ्यंकर व डॉ. खरे यांनीं प्रचंड जमाव जमविला. स्टेशनाजवळच्या टेकडीवरील गणपतीच्या भव्य पटांगणांत सिताबर्डी किल्ल्याच्या पायथ्याशीं, हजारों लोकांच्या जमावानिशीं काळीं निशाणें घेऊन 'सायमन परत जा' अशा प्रचंड घोषणा करीत कै. अभ्यंकर व डॉ. खरे हे जातीनें हजर होते.

**कायदेमंडळाच्या सभागृहांत बॉंबचा स्फोट**

हेंच कुप्रसिद्ध सायमन कमिशन दिल्ली येथील केंद्रीय कायदेमंडळाच्या बैठकीस दर्शक म्हणून उपस्थित असतांना एक प्रचंड बॉंबचा स्फोट सभागृहांत झाला व त्यामुळें केवळ कायदेमंडळाचें सभागृहच नव्हे—केवळ हिंदुस्थानच नव्हे—तर सबंध ब्रि. साम्राज्य दरदरून हादरलें. "बहिऱ्यांना ऐकूं जाण्याकरितां" ह्या मथळ्यानें हिंदुस्थानांतील सर्व वर्तमानपत्रें भरून गेलीं. हुतात्मे भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनीं वरील मथळ्याच्या दिलेल्या आपल्या कैफियतीनें हिंदी

तरुणांना एक नवीनच संजीवन मिळाल्यासारखें झालें. सायमन कमिशनच्या आगमनामुळें आधींच ज्वालाग्राही पदार्थांचें कोठार हिंदी जनतेच्या मनांत भरून गेलेलें होतें. तशात सायमन कमिशनच्या निषेधासाठीं संघटित झालेल्या लाहोर येथील प्रचंड जनसमुदायावर सरकारी अधिकाऱ्यानें पोलीस व सार्जंट यांच्या सहाय्यानें जो अमानुप हल्ला चढविला व त्यांतच सँढर्सच्या निर्घृण लाठीप्रहारानें महनीय लाला लजपतराय यांना जें वीर मरण आलें, त्यामुळें या कोठारावर ठिणगी पडली आणि तिच्या परिणामस्वरूप हुतात्मा राजगुरु यानें सँढर्सचा खून करून घेतलेला बदला व दिल्लीच्या असेंब्लींत पडलेला बाँब हे दोन प्रचंड प्रस्फोट घडून आले.

**संपूर्ण स्वराज्याची घोषणा**

एतावता, १९२९ च्या डिसेंबरांत लाहोरास भरलेल्या काँग्रेसच्या सुप्रसिद्ध अधिवेशनाच्या सुमारास सबंध देशाची राजकीय मनोवृत्ति अत्यंत जाज्वल्यतेस पोंहचलेली होती. कलकत्ता काँग्रेसमध्यें एक वर्षाच्या आंत हिंदुस्थानला वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा देण्याचा ब्रिटिश सरकारला हिंदी जनतेनें पाठविलेला निर्वाणीचा संदेश मदोन्मत्त साम्राज्याधिकाऱ्यांनीं झिटकारला होता. गेल्या १० वर्षांत महात्माजींच्या अहिंसात्मक उपायांवरील वाढीस लागलेली हिंदी तरुणांची श्रद्धा आतां डळमळीत होऊं लागली होती. संपूर्ण स्वराज्याशिवाय आतां दुसरी कसलीही घोषणा शक्य नाहीं, याबाबत सर्व कर्तृत्वशील व ध्येयवादी हिंदी लोकांचें जरी पूर्ण मतैक्य होतें व त्यासाठीं जरूर पडेल तो संग्राम करण्यास त्यांची सिद्धता होती, तरी या संग्रामसाधनेंत हिंसा कीं अहिंसा ह्या प्रकारच्या मनोवृत्तींचें मात्र तुंबळ रण माजलें होतें. आणि ह्या वृत्ति-संग्रामाचा प्रतिध्वनि गगनभेदी अशा भगतसिंगाच्या जयजयकारांनीं लाहोर काँग्रेसच्या अधिवेशनांत उमटत असलेला दिसत होता. घरांघरांतून व दुकानादुकानांतून भगतसिंगाचीं छायाचित्रें टांगलेलीं दिसून येत होतीं व अखेरीस पं. जवाहरलाल यांचा पूर्ण स्वराज्याचा व महात्माजींचा स्वराज्य-संग्रामाचा ठराव पास झाला, तोही भगतसिंगाच्या प्रचंड जयजयकारांतच!

हें सर्व किंचित विस्तारानें येथें निवेदन करण्याचा विशेष हेतु असा

कीं, हिंसा व अहिंसा या दोन मनोवृत्तींचा जो अत्युग्र संघर्ष खुद्द कॉंग्रेस-मध्यें सुरू झाला होता, त्याला वाचा फोडण्याचें निमित्त व त्याचें वास्तविक स्वरूप व तीव्रता जगाच्या निदर्शनास आणून देण्याचें निमित्त डॉ. खरे यांनींच उपलब्ध करून दिलें होतें. तो प्रसंग असा :—

**महात्माजींच्या ठरावाला विरोध**

लाहोर अधिवेशनाच्या थोडेच दिवस अगोदर खुद्द व्हाइसरॉयची गाडी उलथून पाडण्याचा क्रांतिवाद्यांनीं फार मोठा व अत्यंत धाडसी प्रयत्न केलेला होता. हा प्रयत्न सरकारच्या सावधगिरीमुळें जरी अयशस्वी झाला, तरी मध्यवर्ति असेंब्लींत पडलेल्या बॉंबमुळें जेवढी खळबळ सबंध देशभर झाली, त्याहून अधिक मोठी खळबळ यामुळें लाहोर येथील कांग्रेसच्या अधिवेशनांत उडाली. क्रांतिकारकांच्या या कृत्याचा निषेध करणारा ठराव खुद्द महात्माजींनींच विषयनियामक कमेटींत मांडला असतांना डॉ. खरे यांनीं मोठ्या धैर्यानें उठून त्या ठरावाला विरोध केला होता. डॉ. खरे यांचें म्हणणें असें होतें कीं, असले प्रकार देशांत प्रत्यहीं घडत असतांना त्यांचा जर कांग्रेसनें आजवर निषेध केला नाहीं, तर ह्याच विशिष्ट प्रकाराचा आजच निषेध कां करावा? कॉंग्रेसनें एकदांच आपलें अहिंसा हें धोरण असल्याचें सांगून टाकलेलें आहे, व तेवढी गोष्ट कॉंग्रेसच्या मार्गासंबंधीं सरकारची खात्री पटविण्यास पुरेशी आहे. त्यामुळें या असल्या प्रकारांचा निषेध करण्याची जबाबदारी कॉंग्रेसवर पडतेच असें नाहीं व ती आपणावर पडते असें जर कॉंग्रेस समजत असेल, तर रोज उठल्याबसल्या असल्या कृत्यांचा निषेध करणें, येवढेंच एक काम कॉंग्रेसला होऊन बसेल. आपल्या या विरोधाच्या पुष्ठ्यर्थ डॉ. खरे यांनीं कॉंग्रेसच्या व्यास-पीठावरून सुमारें पाऊण तासपर्यंत अस्खलींत उर्दू भाषेंत जें भाषण केलें, त्यामुळें मोठमोठ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांचें व खास लाहोरमधील जनतेचें लक्ष तात्काळ त्यांच्या-कडे वेधलें गेलें. आम्ही वर सांगितलेंच आहे कीं, कॉंग्रेस पक्षाच्या एका विशिष्ट मनोवृत्तींत हिंसा व अहिंसेबद्दलचा संघर्ष ह्यावेळेस अत्यंत तीव्र स्वरूपास येऊन पोंचला होता. त्याला वाचा फोडण्यास डॉ. खरे हे निमित्त मात्र झाले. डॉक्टर-साहेबांच्या या भाषणाचा इतका परिणाम झाला कीं, महात्माजींच्या ठरावाला

११४ अनुकूल मतें पडलीं तर ११४ च सदस्यांनीं त्यावर प्रतिकूल मत दिलें; व अशा रीतीनें समान मतें पडल्यामुळें विषय-नियामक कमेटींत मोठा पेंचप्रसंग येऊन पडला व अखेरीस बैठक त्या वेळेपुरती तहकूब करावी लागली. त्यानंतर पुन्हां दुपारीं बैठक भरली असतांना पुन्हा मतें घेण्यांत आलीं व त्यावेळीं लाहोरचे डॉ. सत्यपाल हे महात्माजींच्या ठरावास अनुकूल झाल्यामुळें ११५ मतें अनुकूल व ११३ प्रतिकूल पडून जेमतेम मूळ ठराव पसार झाला. डॉ. खरे यांच्या निर्भिडतेबद्दल व समर्पक भाषणाबद्दल त्यांचें सगळीकडून अभिनंदन करण्यांत आलें आणि डॉ. सत्यपाल यांना काँग्रेसच्या वर्किंग कमेटींत प्रवेश मिळाला!

# १९३० चा शांति-संग्राम

**महात्माजींच्या चळवळीचें विशिष्ट तंत्र**

लाहोर काँग्रेसचें अधिवेशन हें हिंदी स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं संस्मरणीय झालें. असहकारितेच्या काळांतील बार्डोलीस ठांसून भरण्यांत आलेला कायदेभंगाचा वार उडविणें महात्माजींना ह्यावेळीं अवश्य वाटलें. महात्माजींच्या स्वभावाचा एक विशेष असा आहे कीं, ज्यावेळीं राष्ट्रांतील जनतेची भावना अत्यंत भडकलेली असते आणि परिस्थितीचा जोर अनिवार होऊन आटोक्याबाहेर जाऊं लागतो, त्यावेळीं महात्माजी स्वत:च जहालांतील जहाल घोषणा करून लढ्याचें रणशिंग फुंकतात; युयुत्सु वृत्तीच्या लोकांना आपली दमछाट करून घेण्यासाठीं रणांगण खुलें करून देतात, आणि बलाढ्य साम्राज्य सत्तेच्या आघातानें जनता जेरीस येऊं लागलेली पहातांच, पुन्हा युद्धाचीं सूत्रें आवरतीं घेतात. कुशल सेनापतीची खरी प्रशंसा वस्तुत: ह्या एकाच गोष्टीमुळें करण्यांत येत असते कीं, जशी आपल्या इच्छित पवित्र्यावर त्यास लढाई सुरू करतां आली पाहिजे, तशीच आपल्याच इच्छेप्रमाणें युध्यमान शक्तींना आवरून धरण्याचें व युद्ध समाप्तीस नेण्याचें सामर्थ्यहि त्याच्याच हातीं असलें पाहिजे. पुष्कळ वेळां सार्वजनिक स्वरूपाचे जनतेचे हे लढे सुरू करून देण्यास पुढारी कारणीभूत होत असतात; परंतु, एकदां त्यामुळें जनतेमधील ज्या निरनिराळ्या शक्तींना व सामर्थ्यांना चेतना व चालना मिळते त्यांतील कित्येक सामर्थ्यें आपल्या पुढाऱ्यालाही झुगारून देऊन स्वत:च प्रबळ होऊन बसतात; आणि मग युद्धाची अपेक्षित दिशा नाहींशी होऊन रंगाचा बदरंग झाल्याशिवाय रहात नाहीं. जनता-संग्रामाचा उपक्रम व उपसंहार करण्याचें महात्माजींचें हें कौशल्य—स्वशरीरांतून सूक्ष्म तंतु काढून त्याचें मोठें मनोरम जाळें विणणाऱ्या व परत तें सर्व जाळें क्रमश: आपल्याच शरीरांत अंतर्भूत करून घेणाऱ्या ऊर्णनाभी-प्रमाणें – कोळ्याप्रमाणें – अप्रतिम आहे. महात्माजींचें हें कौशल्य आजपर्यंत त्यांच्या नेतृत्वाखालीं हिंदी जनतेनें केलेल्या प्राय: प्रत्येक संग्रामाच्या वेळीं प्रगट झालेलें आहे. त्यांतून १९३० चा त्यांच्या नेतृत्वाखालीं झालेला संग्राम हा तर अपूर्वच होता. त्यांच्या मिठाच्या सत्याग्रहासाठीं झालेल्या 'दांडी मार्च' नें दर-

दिवशीं हिंदी लोकांच्या अंत:करणांत नवा जोम, नवें चैतन्य, नवें स्फुरण, नवें सामर्थ्य आणि नवा आत्मप्रत्यय उत्पन्न केला. वऱ्हाड-मध्यप्रांतांतील जनतेच्या उत्साहासही त्यावेळीं अपूर्व भरतें आलेलें होतें. कै. बॅरिस्टर अभ्यंकर, वीर वामनराव जोशी, सेठ गोविंददास इत्यादि तिन्ही प्रांतांतील प्रमुख कॉंग्रेस नेत्यांचें वऱ्हाड-मध्यप्रांताकरितां संयुक्त युद्धमंडळ बनविण्यांत आलें होतें आणि त्याची धुरा मध्यवर्ति ठिकाण म्हणून नागपुरच्या बॅरिस्टर अभ्यंकरांच्या खांद्यावरच पडली होती. परंतु उमरावती येथील एका व्याख्यानाच्या वेळीं मोरुभाऊ व वीर वामनराव या दोघांनाहि सरकारनें अटक केली आणि पुन्हा वऱ्हाड-नागपूर व महाकोशल या तीन प्रांतांत तीन स्वतंत्र युद्धमंडळें काम करूं लागलीं. मोरूभाऊंच्या पश्चात् नागपूर युद्धमंडळाची सर्व जबाबदारी अर्थात डॉ. खरे यांच्यावर पडली. डॉ. खरे यांच्या चरित्रवर्णनाच्या ओघांत पार्श्वभूमि या नात्यानें, नागपूर प्रांतांतील १९३० च्या संपूर्ण स्वातंत्र्यसंग्रामाचें वर्णन करणें जरी फारसें अप्रस्तुत होणार नाहीं, तरी विस्तारभयास्तव संक्षेपानेंच त्याचा निर्देश करणें आम्हांस अधिक उचित वाटतें.

**नाशिकास सत्याग्रह केला**

१९३० च्या मे महिन्यांत नाशिकास हवापालट करण्यास गेले असतांना डॉक्टरसाहेबांनीं आपली मुलगी व पत्नी यांच्यासह मिठाच्या पुड्या बेकायदा विकून पहिला कायदेभंग केला. परंतु तेथें मुंबई सरकारनें हे परप्रांतीय म्हणून कदाचित् त्यांस अटक केली नसावी. नाशिकाहून नागपुरास परत आल्यानंतर त्यांस येथील परिस्थिति मोठी विचित्र दिसून आली. कै. मोरूभाऊ तुरुंगांत गेल्यानंतर येथील प्रमुख कॉंग्रेस कार्यकर्त्यांत बरेच मतभेद उत्पन्न होऊन ते विकोपास जाऊं लागले होते. कायदेभंगाच्या संग्रामासाठीं लागणारी कणखर संघटना निर्माण होण्याऐवजीं विघटनेचेंच भेसूर वातावरण पसरूं लागलें होतें. शस्त्र-सत्याग्रह, दिंडी-सत्याग्रह, झेंडा-सत्याग्रह इत्यादि पूर्वोक्त लढ्यांनीं स्वातंत्र्यसंग्रामांतील आघाडीचें ठिकाण या नात्यानें नागपुरला जें गौरवाचें व मानाचें स्थान सर्व भारतवासीयांच्या दृष्टीनें प्राप्त झालें होतें, तें नाहींसें होईल कीं काय असें भय वाटण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली

होती. परंतु डॉ. खरे यांनीं नाशकाहून परत आल्यावर मोठ्या कौशल्यानें कांग्रेस पक्षांतील सर्व मतभेद मिटविले आणि त्यांची प्रभावी संघटना करून स्वातंत्र्यसंग्रामाची सिद्धता चालविली.

**जंगल सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक**

वऱ्हाड-मध्यप्रांत हा प्रदेश समुद्रकिनाऱ्यापासून शेंकडों मैल लांब असल्यामुळें मिठाच्या सत्याग्रहाच्या घोषणेनें अथवा लांबच्या समुद्रांतील पाणी आणून त्यापासून मीठ तयार करण्यानें अथवा बेकायदा मिठाच्या पुड्या विकण्यानें येथील जनतेचा हुरूप समाधान पावण्यासारखा नव्हता. कायदे-भंगच करावयाचा तर तो अशाच कायद्याचा करावयास पाहिजे कीं, जो कायदा जनतेच्या हृदयांत शल्यासारखा सतत बोचत राहिला असेल, ज्यानें जनतेला जिची रोज जाणीव होत राहील अशा प्रकारची अडचण उत्पन्न केली असेल आणि जो नाहींसा झाला तर आपल्या सुखांत, आपल्या सोयींत व आपल्या प्रापंचिक जीवनांत निश्चितपणें अधिक कांहीं तरी भर पडली आहे, असें जनतेला वाटूं लागेल अशाच कायद्याचा भंग करण्याचें ठरविलें तर जनतेच्या उत्साहसमुद्रास जोराचें भरतें येण्याचा संभव आहे; याची जाणीव या प्रांतांतील पुढाऱ्यांना नव्हती असें नाहीं. वस्तुतः वऱ्हाडांतील कांहीं भाग, तसेंच नागपूर प्रांत यांत जंगलांच्या रूपानें उमोप चारावैरण येथील गुराढोरां-करितां असतांनाही त्यांची सरकारनें मुद्दाम लादलेल्या वनचराईच्या करामुळें घोर उपासमार होत होती. आणि हें शल्य—हें गाऱ्हाणें—वेशीवर टांगण्याचा सनदशीर प्रयत्न १५-२० वर्षांपासून यवतमाळ येथील डिस्ट्रिक्ट असोसिएशन-सारख्या संस्थेनें चालविलाही होता. परंतु, कायदेभंगाच्या लढ्यांत हाच कायदा मोडून आपण पुष्कळ दिवसांच्या गाऱ्हाण्यास जबरदस्त वाचा फोडूं शकतों, अशी कल्पना काढून त्याप्रमाणें जंगल सत्याग्रहाचा यथासांग कार्यक्रम आंखण्याची कल्पना डॉ.खरे यांनींच प्रथम काढली. लोकनायक बापूजी अणे व त्यांची डिस्ट्रिक्ट असोसिएशन यांनीं तर कित्येक वर्षांपासून हें गाऱ्हाणें उचलून धरलेंच होतें. त्यामुळें त्यांनींही वऱ्हाडांत याच कल्पनेचा पुरस्कार करावा हें अत्यंत स्वाभाविक होतें. आणि वऱ्हाड—नागपूरसारखीच एका परीनें दक्षिणेस महाराष्ट्राचीही

परिस्थिति असल्यानें तिकडेही याच कल्पनेचा पुरस्कार व्हावा हेंही साहजिक होतें. अशा रीतीनें पुण्यापासून तों भंडाऱ्यापर्यंतच्या बृहन्महाराष्ट्रांत एक-समयावच्छेदेंकरून जें जंगलसत्याग्रहाचें रान उसळलें, त्यामुळें इकडील चळवळ मिठाच्या सत्याग्रहाच्या चळवळीच्या बरोबरीची होऊं शकली.

## गुंड ठरवून अटक केली

जंगल सत्याग्रहाची सगळीकडे सिद्धता होत असलेली पाहून सूत्रधाराचें कार्य करणाऱ्या प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांना सरकारनें अटक करण्याचें ठरविलें. प्रत्यक्ष कायदेभंग करण्याच्या आधींच अथवा जनतेकडून साक्षात् उठावणी होण्याच्या आधींच पुढाऱ्यांना अटक करून चळवळीचा अंकूर मूळांतच खुडून टाकावा असें धोरण साम्राज्य सरकारनें अनेक वेळां स्वीकारलें आहे व तेंच यावेळींही स्वीकारलें जाणें साहजिक होतें. अर्थात नागपूर भागापुरतेंच बोलावयाचें तर, सरकारी दडपशाहीची ही कुऱ्हाड डॉ. खरे यांच्यावरच पहिल्यानें पडणें अपरिहार्य होतें. ब्रिटीश साम्राज्य सरकार आणि प्रतिपक्षाबद्दल आदर अथवा सन्मानाची बुद्धि, या दोन गोष्टींचा मेळ क्वचितच बसलेला आढळून येतो. कारण तसें नसतें तर हजारों जनसमुदायाच्या समोर दिवसाढवळ्या सरकारला आगाऊ सूचना देऊन पुसदच्या जंगलांतील मूठभर गवत कांपणाऱ्या लो. बापूजी अण्यांवर चोरीच्या कलमाचा आरोप; आणि आपल्या वैद्यकांतील कसबाच्या जोरावर अक्षरशः हजारों रुपयांची दरमहा प्राप्ती करून सढळ हातानें देणगीच्या रूपानें हजारों रुपयांचें दान देणाऱ्या डॉ. खरे यांच्यावर उडाणटप्पूपणाचा आरोप सरकारनें ठेवला असता काय? परंतु ब्रिटीश सरकारची नीति ही अशीच कांहीं अगम्य आहे. तिनें एरव्हीं उडाणटप्पू लोकांना लावण्यांत येणाऱ्या पीनल कोडाच्या १०८ कलमाखाली डॉ. खरे यांच्याकडून एक वर्षाच्या चांगल्या वर्तणुकीचा जामीन मागितला आणि डॉ. खरे यांनीं आपल्या बाणेदार स्वभावास अनुसरून तो देण्याचें नाकारल्यामुळें त्यांची एक वर्षासाठीं नागपुरच्या तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. डॉ. खरे यांना सरकारनें 'ए' क्लास दिला हें तरी मोठें सरकारचें सौजन्यच समजावयास पाहिजे! तुरुंगांत त्यांच्या 'ए' क्लासचाही हिरस करणारे लोक नव्हते असें नाहीं. अस्तु.

### तुरुंगांतील जीवन

१९३० सालीं नागपुरच्या तुरुंगांत वऱ्हाड-मध्यप्रांतांतील व महाकोशल-मधील निवडक पुढाऱ्यांचा मेळाच जमला होता. ए व बी क्लासचे मिळून सुमारें ६०-६५ नामांकित पुढारी अनायासें सरकारनें एकत्र जमविले होते. तुरुंगाचें जीवन कितीही सुखाचें असलें तरी अखेरीस तुरुंग तो तुरुंगच असतो हें विसरून चालत नाहीं. कोणत्या क्षणीं स्वाभिमानी कैदी, आणि कठोर व अतिरिक्त कर्तव्यदक्ष तुरुंगाधिकारी यांच्यांत भांडणाची ठिणगी पडेल याचा नियम नसतो. किंबहुना तुरुंगशासनाची तलवार बंद्यांच्या, विशेषत: राजबंद्यांच्या, डोक्यावर नेहमींच लटकलेली असते. विशेषत:, हिंदुस्थानांतील तुरुंगाधिकाऱ्यांना राजबंद्यांशीं सन्मानानें व सभ्यतेनें वागण्याची संवय नसल्यामुळें, तुरुंगांतील चोर, दरोडेखोर, खुनी व डाकू कैद्यांप्रमाणेंच राजकीय कैद्यांशींही त्यांची वर्तणूक असते. आणि ह्याच गोष्टींतून राजबंदी व तुरुंगाधिकारी यांचे खटके वारंवार निर्माण होत असतात. नागपुरच्या तुरुंगांत असतांना डॉ. खरे यांनीं आपल्या स्वभाववैशिष्ट्यानें अशा प्रकारच्या अनेक भांडणांच्या वेळीं यशस्वी मध्यस्थी करून तीं सामोपचारानें मिटविलीं आणि राजबंदी व तुरुंगाधिकारी या दोघांचेही धन्यवाद संपादन केले. केवळ राजबंद्यांच्याच नव्हे तर इतर सामान्य कैद्यांच्याही जीवनाचा डॉ. खरे यांना ह्या वेळीं जो अनुभव मिळाला—त्यामुळेंच आणि तो अनुभव सात वर्षें लक्षांत ठेवून मध्यप्रांताचें प्रधान मंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांनीं पहिलें कार्य कोणतें केलें असेल तर तें म्हणजे तुरुंगखातें स्वत:च्या अधिकारांत घेणें व तुरुंगसुधारणेचें बिल प्रांतिक कायदेमंडळासमोर आणणें आणि त्या सुधारणा प्रत्यक्षपणें अमलांत आणून दाखविणें हें होय.

### सेठ भरुकांना जीवदान दिलें

तुरुंगांत असतांना डॉ. खरे यांच्या कर्तृत्वाचा व अनुभवाचा अशा रीतीनें जो लाभ इतरेजनांना मिळाला तो तर महत्वाचा आहेच; पण, त्या शिवाय त्यांच्या वैद्यकीयज्ञानाचा सुद्धां केवढा मोठा फायदा राजबंद्यांना मिळत होता, याचें एकच ठळक उदाहरण नमुन्यादाखल येथें दिलें असतां पुरेसें होईल.

तें असें:—डॉ. खरे यांच्या मंत्रीमंडळानंतर पं. शुक्ला यांच्या मंत्रीमंडळांत समाविष्ट झालेले श्री. छगनलालजी भरूका हेही १९३० सालीं नागपूर तुरुंगांतच 'ब' वर्गांत होते. त्यांच्या कांखेंत एक फोड होऊन त्याचा विषारी ताप त्यांना येऊं लागला होता. दुखणें प्रारंभापासूनच बलवत्तर आहे हें ओळखून सुरुवातीलाच कांहीं विशिष्ट इंजेक्शनें देण्याची डॉ. खरे यांनीं त्यावेळचे नागपुरच्या तुरुंगाचे सुपरिंटेन्डन्ट रा. सा. इंद्रदत्त गुप्ता यांना शिफारस केली होती. परंतु गुप्तासाहेबांची स्वत:च्या वैद्यकीयज्ञानाची घमेंड भारी ! त्यांनीं आपल्या हाताखालील एका कैद्यानें केलेली वैद्यकीय सूचना मानली असती तर त्यांची इभ्रत रसातळासच पोंचली नसती काय ? अधिकारधर्माप्रमाणें अर्थात त्यांनीं डॉ. खरे यांच्या सूचनेकडे दुर्लक्ष केलें व श्री. भरूकाजींना स्वत:च्या कल्पनेप्रमाणें उपचार सुरू केले. त्यांचा कांहीं एक उपयोग न होऊन श्री. भरूकाजींचा फोड वाढतच गेला व त्यांना प्राणांतिक वेदना होऊं लागल्या. अखेरीस आजार विकोपास जात आहे असें पाहून डॉ. खरे यांनीं सुपरिंटेन्डन्टसाहेबांची निक्षून हजेरी घेतली व सांगितलें, "मी म्हणतों तसे उपचार न झाल्यास रोगी दगावण्याचा संभव आहे व दुर्दैवानें तसें घडल्यास त्याची सर्व जबाबदारी तुमच्यावरच राहील." सुपरिंटेन्डन्टसाहेबांना प्रसंगाचें गांभीर्य ओळखलें व मनांत जळफळत कां होईना, पण डॉ. खरे यांनीं सुचविलेले उपचार केले तेव्हांच भरूकाजी रोगमुक्त होऊं शकले.

**एक कठीण पेंच**

याच सुमारास या प्रांतांतील सुप्रसिद्ध धनिक रा. ब. डी. लक्ष्मीनारायण हे अत्यवस्थ स्थितींत आजारी होते. पूर्वीं बरेच वेळां डॉक्टरसाहेबांनीं त्यांची नाजूक प्रकृति सुधारली होती. तेव्हां याही वेळीं डॉक्टरांची त्यांना आठवण होणें स्वाभाविकच होतें. आपले सल्लागार बॅरिस्टर एस. आर. पंडित यांना त्यांनीं डॉक्टरसाहेबांची भेट घेण्यासाठीं तुरुंगांत पाठविलें; या भेटींत बॅरिस्टर पंडितांनीं डी. लक्ष्मीनारायणांची इच्छा डॉक्टरांना निवेदन केली. त्यावर "माझी कांहीं हरकत नाहीं, सरकारनें जर परवानगी दिली किंवा वाटल्यास कामठीला मला नेण्यांत आलें तर आपण प्रकृति पाहूं" असें डॉक्टर-

साहेबांनीं बॅरिस्टर पंडितांना उत्तर दिलें. त्याप्रमाणें बॅरिस्टर पंडितांनीं नंतर गव्हर्नरांची मुलाखत घेतली व डॉ. खरे यांना डी. लक्ष्मीनारायणांची प्रकृति तपासण्यासाठीं मोकळें सोडावें अशी विनंति केली. परंतु, गव्हर्नरांनीं त्यांची विनंति मान्य केली नाहीं. ते म्हणाले "डॉ. खरे हे या प्रांतांत एक नामांकित डॉक्टर असल्यामुळें बऱ्याच आजारी लोकांना त्यांनीं आपली प्रकृति तपासावी अशी सहजच इच्छा होईल. तुमच्या विनंतीप्रमाणें मी जर आज डॉ. खरे यांना मोकळें सोडलें, तर उद्यां तुमच्यासारखीच इतरांनींही जर विनंति केली तर मला ती नाकारतां येणार नाहीं. मात्र, 'आपण यापुढें असल्या चळवळींत पडणार नाहीं' असें डॉ. खरे यांनीं नुसतें तोंडीं जरी आश्वासन दिलें, तर मग तुमच्या विनंतीप्रमाणें त्यांना मोकळें सोडण्यास माझी हरकत राहणार नाहीं." बॅरिस्टर पंडितांनीं गव्हर्नरांचें हें सर्व बोलणें डॉ. खरे यांना कळविलें. डॉ. खरे यांनीं गव्हर्नरांची अट मान्य करण्याचें साफ नाकारलें व अशा रीतीनें एका बाजूला मध्यप्रांत सरकारची कठोर नीति व दुसऱ्या बाजूला डॉ. खरे यांचा निरामिष स्वाभिमान, यांच्या झुंजींत बिचारे डी. लक्ष्मीनारायण शेवटीं कालवश झाले.

**सरकारचा कुटिल डाव**

रावबहादुरांची प्रकृति पाहण्यासाठीं डॉक्टरांना मुक्त करण्याचें निमित्त करून सरकार त्यांच्यावर कांहीं मानहानिकारक निर्बंध लादूं इच्छित होतें. परंतु त्या मानहानिकारक अटी झिटकारून डॉ. खरे यांनीं आपल्या निःस्वार्थ वृत्तीचें चांगलेंच निदर्शन केलें. कोणतीही शर्त मान्य करण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. पुढें थोड्याच दिवसांनीं काळजाच्या विकारानें बेजार झालेल्या डॉ. खऱ्यांची मध्यप्रांत सरकारनें बिनशर्त मुक्तता केली. सरकारच्या या कृत्यानें डॉ. खरे यांच्या प्रकृतीस आराम मिळून आपला हृदयविकार पुढें ते बराच आवाक्यांत आणूं शकले ही गोष्ट खरी असली, तरी हीच गोष्ट सरकारनें जर यापूर्वी सुमारें दोन महिने अगोदर केली असती, तर या प्रांतांतील एका उदार धनिकाचे प्राण वांचविण्यासाठीं थोडाफार प्रयत्न करून पाहण्याचें समाधान डॉ. खरे यांस लाभलें नसतें काय? पण, सौजन्य आणि साम्राज्य-सत्ता यांचें सख्य असलेलें आजवर कधींतरी व कोठेंतरी आढळून आलें काय!

**गांधी-इर्विन करार**

अशा रीतीनें तुरुंगांतून बिनशर्त मुक्तता झाल्यानंतर डॉ. खरे यांनीं कांहीं काळ प्रकृतिस्वास्थ्य संपादन करण्यांत घालविला. त्यानंतर लवकरच कॉंग्रेस आणि ब्रिटीश सरकार यांच्यांत तडजोड घडवून आणण्यासाठीं सप्रु-जयकरांची मध्यस्थी सुरू झाली आणि तिला यश येऊन सुप्रसिद्ध गांधी-इर्विन करारनामा अस्तित्वांत आला. कर्तुम्अकर्तुमन्यथाकर्तुम् अशा सामर्थ्याच्या महा-बलाढ्य व सत्तामदांध अशा साम्राज्य सरकारच्या राजप्रतिनिधीनें (व्हॉइसरॉयनें) जनतेचा पाठिंबा व प्रेम हेंच जिचें बळ व शक्तिसर्वस्व आहे अशा हिंदी राष्ट्रीय सभेच्या एकमेव पुढाऱ्याबरोबर म्हणजे महात्मा गांधींबरोबर बरोबरीच्या नात्यानें एका टेबलाशीं बसून दोन स्वतंत्र राष्ट्रांत व्हावा त्यासारखा तहनामा केला. ही गोष्ट हिंदी राष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत पहिल्यानेंच घडली व म्हणूनच तिला अत्यंत संस्मरणीय असें महत्व प्राप्त झालें. हा तहनामा झाल्याबरोबर हिंदुस्थानांतील तुरुंगांचीं द्वारेंही खुलीं करण्यांत आलीं व अशा रीतीनें सर्व राजकीय कैद्यांची सुटका झाली.

**अकल्पित घटनांचें वर्ष**

१९३१ हें वर्ष हिंदुस्थानच्या राष्ट्रीय इतिहासांत अत्यंत धामधुमीचें व महत्वाचें गेलें. महात्माजींना दिलेल्या वचनाचा भंग करूनही पंजाबांतील नोकरशाहीच्या दुराग्रहावरून भारत सरकारनें भगतसिंगास फांसावर लटकविलें, व त्यामुळें तरुणवर्गांत तीव्र असंतोषाची प्रचंड लाट उसळणें, कराची येथें भरलेलें कॉंग्रेसचें अधिवेशन, त्यांत मंजूर झालेला जनतेच्या मूलभूत हक्कांचा ठराव, लॉर्ड इर्विनसाहेबांचें विलायतेस गमन, व त्यांच्या जागीं लॉर्ड विलिंग्डन यांचें आरोहण, प्रांतोप्रांतीच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं गांधी-इर्विन करार-नाम्याच्या शर्ती मोडणें व शर्तींचें पालन नीट प्रकारें होत नाहीं, अशा प्रकारच्या हजारों तक्रारी प्रत्यहीं प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें जनतेचा असंतोष अधिकच विकोपास जाऊं लागणें, संयुक्तप्रांत, वऱ्हाड-मध्यप्रांत, मुंबई इलाखा इत्यादि भागांत शेतसाऱ्यासाठीं सुरू झालेला सरकारी अधिकाऱ्यांचा जुलूम व त्याच्या प्रतिकारा-साठीं जनतेचे ठिकठिकाणीं सुरू झालेले प्रयत्न, दुसऱ्या गोलमेज परिषदेचें अधिवेशन व त्यासाठीं आपले अद्वितीय प्रतिनिधी म्हणून हिंदी राष्ट्रीय सभेनें

केलेली महात्मा गांधींची निवड, इंग्लंडांत ठिकठिकाणीं झालेला महात्माजींचा सन्मान व खुद्द बकिंगहॅमच्या राजप्रासादांत हिंदुस्थानच्या या अर्धनग्न फकीराची बादशहांनीं घेतलेली भेट, गोलमेज परिषदेंतील महात्माजींचें दणदणीत भाषण व त्याचा जगाच्या सर्व भागांत दुमदुमलेला प्रतिध्वनि, इत्यादी अनेकानेक मनोरम, अद्‌भुत, चमत्कृतिपूर्ण घटनांनीं हें वर्ष समृद्ध आहे.

**सरकारची ताठरवृत्ति**

गोलमेज परिषदेंत हिंदी राष्ट्राची मागणी ब्रिटिश साम्राज्य सरकारनें झिडकारली. पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या आत्मचरित्रांत सूचित केल्याप्रमाणें गांधी–इर्विन करार घडून आला त्यावेळची ब्रिटीश साम्राज्याची आर्थिक अडचणीची परिस्थिति आतां नाहींशी झाली होती. 'गांधी–इर्विन करारनामा होऊन हिंदुस्थानांत शांतता स्थापन झाली नसती तर ब्रिटिश साम्राज्य सरकारचें संपूर्णपणें आर्थिक दिवाळें वाजलें असतें' असें तत्कालीन परिस्थितीचें पंडित नेहरूंनीं वर्णन केलें आहे व त्यावरूनच तिचें गांभीर्य ध्यानीं येण्यासारखें आहे. परंतु, हा करारनामा झाल्याबरोबर त्यावेळचे ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनीं स्वतः अमेरिकेस जाऊन अमेरिकन सरकारच्या कर्जाबाबत 'मोरॅटोरियम' घडवून आणला आणि पक्षघाताचें व तत्वभ्रष्टतेचें पातक पदरीं घेऊनही आर्थिक दिवाळखोरीपासून ब्रिटिश राष्ट्राचा बचाव केला. अशा रीतीनें आंतरराष्ट्रिय परिस्थितींत अनुकूल बदल घडून येतांच हिंदी जनतेच्या मागणीला ठोकर मारण्याचें ब्रिटीश मुत्सद्यांनीं ठरविलें व शेवटीं गोलमेज परिषदेंतून महात्माजींना रिक्तहस्तानें परत यावें लागलें.

**पुन्हा युद्धाच्या रणभेरी झडूं लागल्या**

१९३१ सालांतील राष्ट्रीय परिस्थितीचें वर्णन संक्षेपानें मागील एका परिच्छेदांत केलेंच आहे. त्यावरून वाचकांच्या हें ध्यानांत येईलच कीं, महात्माजींच्या प्रत्यागमनाच्या वेळीं देशांतील परिस्थिति पुन्हा अतिशय चिघळली होती. गांधी-इर्विन करारनाम्यामुळें कांग्रेसला जी आंतर्राष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, ती नेस्तनाबूद करून टाकण्याचा चंग ब्रिटिश सरकारनें बांधलेला आहे हें स्पष्ट दिसत होतें. लढाईच्या रणांगणांत हिंदी जनतेला ओढून पार चोपून काढण्याचा सरकारनें पक्का इरादा केला होता. आणि म्हणूनच

कदाचित् आपल्या चिडवण्यानें हिंदी जनतेला चिडूं न देतां शांत राहण्याचा महात्माजी उपदेश करतील हें जाणून त्यांचें गोलमेज परिषदेहून मुंबईस आगमन होण्यापूर्वीच संयुक्तप्रांत सरकारनें पंडित जवाहरलाल नेहरूंस अटक करून एक प्रकारची अपरिहार्य परिस्थिति निर्माण केली होती. जवाहरलालजींची अटक हें ब्रिटीश सरकारनें हिंदी जनतेच्या समोर फेंकलेलें युद्धाचें जबरदस्त आव्हानच होतें व तें नाकारणें महात्माजींना किंवा काँग्रेसला अशक्य होतें. म्हणूनच महात्माजींच्या सत्कार समारंभाच्या वेळीं एका बाजूनें मंगलमय मंजुळवाद्यें वाजत असतांना त्याच वेळीं दुसऱ्या बाजूनें युद्धाच्या रणभेरी झडतांना दिसत होत्या. संग्राम अनिवार्य झाला, काँग्रेस व महात्मा गांधी यांनीं सरकारचें आव्हान स्वीकारण्याचें ठरवून जनतेला संग्रामाचा आदेश दिला. एक वर्षाच्या अवधींतच, गांधी-इर्विन तहनाम्यावरील शाई वाळण्यापूर्वीच, पुन्हा दुसरा संग्राम सुरु झाला.

### १९३२ च्या चळवळीचे सूत्रचालक

१९३० च्या संग्रामाच्या अनुभवावरून व ब्रिटीश सरकारच्या या नव्या मनोवृत्तीवरून हिंदी पुढाऱ्यांना हें कळून चुकलें होतें कीं, हा आतां साक्षात् काँग्रेसच्या अस्तित्वावरच घाला आलेला आहे. बेकायदा ठरलेल्या काँग्रेस संस्थेला गूढ गुप्त स्थितींत राहूनच आपला लढा लढावा लागला. तसेंच या लढ्याचें तंत्रही मागील लढ्याच्या वेळींच जनतेनें बऱ्याच प्रमाणांत हस्तगत केलें होते. आणि म्हणूनच 'शाडो कॅबिनेट' च्या स्वरूपाचीं अनेक गूढ युद्धमंडळें यावेळीं अस्तित्वांत आलीं होतीं. नागपूर प्रांतापुरतेंच बोलावयाचें झाल्यास ह्या प्रांतांतील १९३२ च्या चळवळीचें सर्वच सूत्रसंचालन पडद्यामागें राहून डॉ. खरे यांनींच केलें होतें असें निःशंकपणें म्हणतां येईल. हें सूत्रसंचालन करीत असतांना कोणत्याही प्रकारें अन्य ठिकाणाहून मदत न घेतां चळवळीसाठीं लागेल तो सर्व पैसा डॉ. खरे यांनीं स्वतःच्या पदरचाच खर्च केला. निरनिराळ्या ठिकाणच्या काँग्रेसकार्यकर्त्यांना गुप्तपणें पैशाची मदत करणें, चळवळीचें सूत्र व काँग्रेसचें अस्तित्व कायम ठेवण्यासाठीं पुढें येणारे कार्यकर्ते संघटित करणें, जागोजागीं कायदेभंगाचे व निरोधनाचे कार्यक्रम घडवून आणणें, तुरुंगांत गेलेल्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांच्या चरितार्थाची सोय लावणें, डोळ्यांत तेल घालून सरकार

अधिकारी दडपशाही करण्यासाठीं तयार होऊन बसले असतांही ठिकठिकाणीं बेकायदा ठरविलेल्या परिषदा सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेंकून यशस्वी रीतीनें घडवून आणणें आणि पकडल्या गेलेल्या लोकांची व सर्वाधिकाऱ्यांची जागा भरून काढण्यास नवीन कार्यकर्त्यांचा व सर्वाधिकाऱ्यांचा सतत पुरवठा करीत राहणें, इत्यादि अनेक प्रकारें जोखमीचीं व बिकट असलेली कामगिरी स्वतः नामानिराळे राहून डॉ. खरे यांस पार पाडावी लागली. ही सर्व कामगिरी बजावीत असतांना समर्थ रामदास स्वामींनीं म्हटल्याप्रमाणें

"जैशास तैसा जेव्हां भेटे तेव्हां मजालसी थाटे ।
इतुके होता परि धनी कोठें । दृष्टीस पडेना" ॥

स्वतःचें अस्तित्व व कर्तृत्व कायम राखूनही सरकारी अधिकाऱ्यांच्या दृष्टिपाशांत न गवसण्याची कुशलता डॉ. खरे यांस प्रकट करावी लागली. नागपूर प्रांतांत ह्या चळवळीचें सूत्रसंचालन त्यांनीं ज्या कुशलतेनें व चातुर्यानें केलें, त्याची जाणीव कॉंग्रेसश्रेष्ठींपर्यंत जाऊन पोंचल्याविना राहिली नाहीं. त्यावेळीं कॉंग्रेसच्या मध्यवर्ति सत्तेचें सूत्रसंचालन ज्यांच्या हातीं होतें, असे अनेक लोक मुंबईहून नागपुरास येऊन डॉ. खरे यांस भेटून गेले. 'पैसा हवा असल्यास आम्ही मुंबईहून लागेल तितका पैसा पुरविण्यास तयार आहोंत. परंतु चळवळ थंड पडूं देऊं नका' असें या श्रेष्ठींनीं म्हटलें असतां डॉ. खरे यांनींही तितक्याच झोकांत त्यांना उत्तर दिलें होतें कीं, "हा डॉ. खरे बाहेर असेपर्यंत पैशाच्या अभावीं या प्रांतांतील चळवळ कधींही अडून बसणार नाहीं." डॉ. खरे यांचा लौकिक कॉंग्रेसच्या अंतर्मंडळांत यावेळीं इतका पसरलेला होता कीं, लोकनायक बापूजी अणे यांच्यामागून कॉंग्रेसच्या हंगामी अध्यक्षपदासाठीं त्यांचाच अनुक्रम लावण्यांत आलेला होता. परंतु, ब्रिटिश सरकारच्या जातीय निवाड्यांत हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ मिळाल्यामुळें महात्माजींनीं केलेल्या प्राणांतिक उपोषणामुळें चळवळीची सर्वच दिशा बदलली व त्यांची सुटका होऊन पुण्यास लोकनायकांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें कन्व्हेन्शन भरून परिस्थितिसापेक्ष असा वैयक्तिक सत्याग्रह व हरिजनोद्धार यांचा दुहेरी कार्यक्रम आंखण्यांत आला आणि त्यापैकीं हरिजनोद्धाराच्या कार्यक्रमास डॉ. खरे यांनीं स्वतःस वाहून घेतलें.

# महात्माजींचा हरिजन दौरा

## अन्यायाची जाणीव

यानंतरचा डॉ. खरे यांच्या जीवनांतील अत्यंत महत्वाचा व संस्मरणीय प्रसंग म्हणजे महात्मा गांधींचा हरिजनोद्धाराच्या चळवळीसाठीं मध्यप्रांतांत झालेला दौरा होय. वाचकांच्या हें लक्षांत असेलच कीं, बालपणीं स्पर्शास्पर्श इत्यादि बाबतींत डॉ. खरे यांच्या मनावर अत्यंत सनातनी वृत्तीचे संस्कार झालेले होते. परंतु विद्यालयीन जीवनांत जसजसा त्यांच्या बुद्धीचा व सामाजिक दृष्टिकोनाचाही विकास होत गेला, तसतसा अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव त्यांच्या मनांत अधिकाधिक प्रमाणांत होऊं लागली असली पाहिजे हें उघड आहे. हिंदुसमाजांतील एकतृतीयांश लोकसंख्येच्या ह्या महान त्यागी समाजावरील अन्याय नाहींसा करावा ह्या हेतूनें आसेतुहिमाचल चळवळ करण्याचें कंकण बांधून महात्माजींनीं जेव्हां आपला सुप्रसिद्ध हरिजन दौरा ता. ८ नोव्हेंबर १९३३ रोजीं प्रथम मध्यप्रांतांपासून सुरु केला, तेव्हां या प्रांतापुरती तो दौरा पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. खरे यांनीं आपल्या शिरावर घेतली होती. डॉ. खरे स्वतः महात्माजींच्या ह्या दौऱ्याला व तत्संबंधीं स्वतः पार पाडलेल्या कामगिरीला आपल्या आयुष्यांत अत्यंत महत्वाचें स्थान देतात. व असें त्यांना वाटणें हेंही तितकेंच स्वाभाविक आहे. कारण, या बाबतींतले त्यांचे लहानपणचे पूर्वोक्त संस्कार ध्यानांत घेतां, आजवर त्यांच्या अंतःकरणांत सांठवलेली सर्व प्रतिक्रिया आणि हरिजनांवरील अन्याय निवारण करण्यासंबंधीं त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागलेल्या उत्कट भावनांचे उद्रेक, या दोहोंचें मूर्तिमंत प्रतिबिंब याच दौऱ्यांतील स्वतःच्या कामगिरींत त्यांना पहावयास सांपडतें.

## ह्या दौऱ्याविषयीं देशांतील लोकमत

वस्तुतः महात्माजींनीं ह्याच वेळीं-१९३३-३४ सालीं-अंगिकारलेला हरिजनोद्धाराच्या चळवळीचा हा कार्यक्रम बहुजनसमाजांत सामान्यतः आणि कॉंग्रेस कार्यकर्त्यांत विशेषतः दोन कारणांसाठीं अत्यंत अप्रिय होण्यासारखा

होता. याचें एक कारण असें कीं, स्पृश्य व सवर्ण हिंदूंची अस्पृश्य व मागसलेल्या समजल्या जाणाऱ्या समाजाबरोबर आजपर्यंत होत आलेली वागणूक अन्यायाची आहे व हा अन्याय दूर होणें अवश्य आहे, याविषयीं मूठभर शिक्षित व बुद्धिवान लोकांची मनोमय खात्री पटली असली तरी ते सुद्धां हा अन्याय निवारण करण्यासाठीं प्रत्यक्ष व्यवहारांत एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाण्यास तयार नव्हते. बुद्धिमान व विचारशील अशा शिक्षित लोकांची जर ही स्थिति तर अशिक्षित, अडाणी, रुढी, परंपरा, दुर्ज्ञानमूलक आंधळ्या धर्म-भावना, हजारों वर्षांच्या सामाजिक चालीरीती व त्यांनाच मिळालेलें धार्मिक अधिष्ठान इत्यादि बंधनांनीं जखडलेला व भ्रामक धर्मभावनांनीं पछाडलेला असा खेड्यापाड्यांतून पसरलेला जो असंख्य बहुजनसमाज, त्याच्याविषयीं तर बोलावयासच नको. महात्माजींचें राजकीय नेतृत्व त्यास आंधळेपणानें मान्य असलें तरी आपल्या धार्मिक व सामाजिक भावनांवर महात्माजींकडून सुद्धां हें अतिक्रमणच होत आहे, जशा प्रकारची बहुजनसमाजाची सर्वसाधारण समजूत असली तर तिच्याबद्दल त्याला फारसा दोषही देतां येत नाहीं. स्वतः महात्माजींनीं आपल्या आश्रमांत हरिजनांना ठेवून त्यांच्याबरोबर सहपान, सहभोजन इ. गोष्टी नित्य केल्या असल्या तरी, त्यांच्याइतक्या थरास ह्या बाबतींत जाण्याची खुद्द काँग्रेसकार्यकर्त्यांचीही तयारी नव्हती. पण, त्यांच्या ह्या कार्यक्रमा-बाबत व दौऱ्याबाबत काँग्रेसजनांतील बऱ्याच मोठ्या वर्गाचा जो असंतोष होता, त्याचें कारण निराळेंच होतें. त्यांना असें वाटत होतें कीं, १९३२ सालीं सुरू झालेल्या स्वातंत्र्य-संग्रामाची गाडी हरिजनोद्धारासारखी भलतीच चळवळ मध्यंतरीच उपस्थित करून महात्माजींनीं मुद्दामच निराळ्या रूळावर नेऊन टाकिली आहे. एक प्रकारें सरकारनें दिलेल्या आव्हानावर महात्माजींनीं ही पड तर खालीच आहे; पंण, त्याबरोबरच स्वातंत्र्यसंग्रामाची चळवळ नेटानें चालविणाऱ्या व अजून चालवूं इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांचा महात्माजींनीं उत्साहभंगही केला आहे. सरकारनें काँग्रेसची संस्था बेकायदा ठरविल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनीं मोठ्या कौशल्यानें आपली चळवळ गूढपणें व गुप्तपणें चालविण्याचे जे निरनिराळे उपाय अवलंबिले होते, त्याचाही धिःकार नुकताच

महात्माजींनीं केलेला असल्यामुळें त्या सर्वांना आपला विश्वासघात झाल्या-सारखें वाटत होतें. त्यामुळें महात्माजींसारख्या लोकनेत्यानें स्वतः आपलें जीवित पणास लावून उभारलेल्या हरिजनोद्धाराच्या ह्या चळवळीशीं त्यांची आंतरिक सहानुभूति असली तरी, महात्माजींवर वरील कारणासाठीं त्यांचा रुसवा झालेला असल्यामुळें ते सर्व लोक ह्या कार्यक्रमापासून अलिप्त राहूं इच्छित होते—त्यांत भाग घेण्यास तयार नव्हते.

**महात्माजींना आपल्या मांडीवर निजवीत**

अशा तऱ्हेनें बहुजन समाज, शिक्षित व बुद्धिमानवर्ग, आणि कॉंग्रेस कार्यकर्त्यांतील उत्साही व कर्तृत्वशील अशा लोकांचा फार मोठा वर्ग, इतक्या सर्व लोकांत अप्रिय होऊं पहाणाऱ्या, किंबहुना अप्रिय होणारच असें भय निर्माण झालेल्या, महात्माजींच्या ह्या दौऱ्याची सर्व जोखीम स्वतःच्या अंगावर घेऊन तो पार पाडून दाखविण्यास जे थोडेसेच धैर्यवान लोक यावेळीं पुढें सरसावले, त्यांत मध्यप्रांत विभागापुरती तरी डॉ. खरे यांची गणना अग्रभागींच करावी लागेल. डॉ. खरे यांनीं केवळ महात्माजींचा दौरा पार पाडण्याचीच जबाबदारी अंगावर घेतली असें नव्हे, तर त्यांच्या स्वास्थ्यसंरक्षणाचीही जबाबदारी त्यांनीं पत्करली. आणि अशा तऱ्हेची अत्यंत जोखमीची, अत्यंत बिकट, अत्यंत जिकीरीची ही जबाबदारी डॉ. खरे यांनीं मोठ्या यशस्वी रीतीनें पारही पाडून दाखविली. ह्या दौऱ्याच्या वेळचा त्यांचा स्वतःचा उत्साह 'कुच और'च होता. स्वतः काळजाच्या विकारानें पीडित असूनही ह्या प्रसंगीं त्यांनीं अवर्णनीय उत्साह प्रगट केला. इतकेंच नव्हे तर अत्यंत दगदगीचा, जिगजिगीचा, कष्टाचा आणि अविश्रान्त परिश्रमाचा हा दौरा यशस्वी रीतीनें पार पाडतांना तोळामासा असलेली महात्माजींची प्रकृति तर त्यांनीं उत्तम रीतीनें सांभाळलीच; पण, त्याबरोबरच स्वतःचें हृदयविकारजर्जर असें शरीरप्रकृतिमानही त्यांनीं अत्यंत काबूंत ठेविलें. आणि ही सर्व किमया, त्यांच्या मनाचीच आंतरिक ओढ अत्यंत तीव्रतेनें नसती तर त्यांना कधींच साध्य झाली नसती. वस्तुतः ह्या सबंध दौऱ्यांत त्यांचें शरीर जरी महात्माजींबरोबर मोटारींत फिरत होतें, तरी त्या मोटारीपेक्षांही अनिवार वेगानें त्यांचें मन व त्यांचा उत्साह पुढेंपुढेंच धांवत

होता. एकंदर परिस्थितीची दृश्यमान होणारी प्रतिकूलता, महात्माजींचा वज्र-निश्चय, दौऱ्याचा वेग आणि कार्याचें महत्व, हें सर्व जाणून डॉ. खरे यांनीं आपल्या परीनें गांधीजींचा हा दौरा यशस्वी करून दाखविण्यास रतिमात्र कसर बाकी ठेवली नाहीं. नुकत्याच उपवासांतून उठलेल्या महात्माजींचें अति क्षीण झालेलें प्रकृतिमान ध्यानांत घेऊन प्रवासाचा त्यांचा शीण यावच्छक्य कमी व्हावा म्हणून, या दौऱ्यासाठीं डॉ. खरे यांनीं ६००० रुपयांची एक नवी करकरीत ब्यूक मोटार विकत घेतली. या एकाच गोष्टीवरून या बाबतींतील त्यांच्या उत्साहाची कल्पना करतां येण्यासारखी आहे.

**महात्माजींच्या आरोग्याचे रखवालदार**

पूर्वीं निवेदन केल्याप्रमाणें फार थोड्या मुदतींत जास्तींतजास्त ठिकाणीं हा दौरा करावयाचा होता. त्याचें सविस्तर वर्णन देणें जरी मनोरंजक असलें, तरी विस्तारभयास्तव आम्ही तें आटोपतें घेत आहोंत. दौऱ्याचा कार्यक्रम अगोदर ठरवून तो तंतोतंत अमलांत आणणें, यास मोठी संघटनकुशलता लागते. ती डॉ. खरे यांच्या ठिकाणीं किती उच्च दर्जाची आहे, याचा प्रत्यय महात्माजींनाही याच प्रसंगानें येऊ शकला. प्रांतांतील चांदा, वर्धा, नागपूर व भंडारा या चारही जिल्ह्यांत हा दौरा काढण्यांत आला. दौऱ्यांत महात्माजींना घेऊन मोटारच्या मागच्या बाजूला स्वत: डॉ. खरे बसत आणि त्यांना विश्रांतीची आवश्यकता जाणून स्वत:च्या मांडीवर त्यांचें डोकें घेऊन ते महात्माजींना निजवीत. एखाद्या नाजुक फुलाप्रमाणें अथवा तळहातावरील फोडाप्रमाणें महात्माजींची सर्व बरदास्त डॉ. खरे यांनीं ठेवली होती. किंबहुना महात्माजींच्या शद्बांत सांगावयाचें तर, महात्माजींचा दौरा व आरोग्य या दोहोंचेंही ‘ कस्टोडियन ’ ( रखवालदार ) डॉ. खरे हेच होते.

**दौऱ्याची सांगता**

अत्यंत अप्रिय व बहुजन समाजाला अरुचिकर असा कार्यक्रम हातीं घेऊन तो देखील अत्यंत लोकप्रिय करून दाखविण्याचें अलौकिक सामर्थ्य महात्माजींच्या ठिकाणीं ह्यावेळीं जसें दिसून आलें, तसेंच अत्यंत भरारीचा आणि दगदगीचा दौरा आणि महात्माजींसारख्या वंदनीय पुढाऱ्याच्या उतरत्या वयांतील

उपवासानें खालावलेलें प्रकृतिमान आपल्या हातीं घेऊन त्यांचा दौरा जास्तींत जास्त व्यापक प्रमाणांत व अधिकाधिक कुशलतेनें सफल करून दाखविण्याचें डॉ. खरे यांचेंही सामर्थ्य आणि आत्मविश्वास याच वेळीं उत्तम रीतीनें प्रगट झाला. दररोजचा शेंकडों मैलांचा प्रवास, दररोज चार चार, सहा सहा गांवांचा कार्यक्रम, महात्माजींच्या दर्शनास येणाऱ्या हजारों आबालवृद्ध, गरीब, शेतकरी, सवर्ण व अस्पृश्य लोकांच्या झुंडी, अशांतूनही महात्माजींना बचावून नेणें, प्रत्येक ठिकाणीं निर्वेधपणें त्यांचें व्याख्यान पार पाडणें, सर्व ठिकाणीं त्यांचें पथ्य-पाणी सांभाळून खाण्यापिण्याची व्यवस्था करणें आणि इतक्या गडबडींतूनही मोठ्या तत्परतेनें त्यांना पुरेशी विश्रांति मिळवून देणें, त्यांच्या हरिजन निधीसाठीं वर्गण्या गोळा करून देणें, इत्यादि अनेकानेक कामें डॉ. खरे यांस ह्या वेळीं करावीं लागलीं; व तीं करीत असतांना थकल्याचें अथवा कंटाळ्याचें कोणतेंही चिन्ह स्वतःच्या ठिकाणीं त्यांनीं दिसूं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर प्रतिक्षणीं त्यांचा उत्साह, त्यांची हौस आणि त्यांची भावनोत्कटता वाढत होती असाच प्रत्यय महात्माजींनाही येत गेला. महात्माजींचा हा दौरा यशस्वी रीतीनें पार पाडल्यावर डॉ. खरे यांनीं स्वतः हरिजन निधीला रोख सहा हजार रुपयांची देणगी दिली आणि अशा रीतीनें जणूं काय दौऱ्याबाबतच्या व्रताचें त्यांनीं यथासांग पारणें फेडलें.

**सनातन्यांचा हट्टाग्रह**

ह्या दौऱ्यांतील अनेक उपद्रवांत एक महत्वाचा उपद्रव म्हणजे वर्णाश्रम स्वराज्य संघाच्या एका सनातनी जथ्यानें ठिकठिकाणीं महात्माजींच्या मोटारी-समोर आडवे पडून केलेला 'सत्याग्रह' हा होय. 'कंटकेनैव कंटकम्' या न्यायानें सत्याग्रहाच्या उपायानेंच सत्याग्रहशास्त्राच्या महान प्रणेत्यास जेरीस आणण्याची ह्या लोकांची कल्पकताही मोठीच प्रशंसनीय होती असें म्हटलें पाहिजे! पण, त्यापेक्षांही अधिक प्रशंसनीय कल्पकता त्यांचा बंदोबस्त करण्याच्या बाबतींत डॉ. खरे यांनीं व्यक्त केली होती. ह्या कामासाठीं डॉक्टरसाहेबांनीं एक स्वतंत्र रिकामी लॉरी आपल्या बरोबर घेतली होती. सनातन्यांचा हा जत्था महात्माजींच्या मोटारीसमोर आडवा पडला म्हणजे त्यांतील सर्व लोकांना अलगत

उचलून सडकेच्या बाजूला ठेवणाऱ्या स्वयंसेवकांचें पथक ह्या लॉरींतून डॉ. खरे यांनींही आपल्याबरोबर घेतलें होतें. अस्तु.

अशा रीतीनें डॉ. खरे यांनीं महात्माजींचा हा दौरा पार पाडण्यासाठीं जे परिश्रम घेतले, जी संघटनकुशलता दाखविली, जी शारीरिक व आर्थिक झीज सोसली आणि हरिजनोद्धाराच्या बाबतींतली जी आपली आंतरिक तळमळ व्यक्त केली, त्यामुळें आपल्या हरिजन पत्रांतून महात्माजींनीं डॉ. खरे यांचा पुढील शब्दांत गौरव केला :— " डॉ. खरे व हरिजन कमेटीनें केलेली व्यवस्था व कार्यक्रम अभिनंदनीय होता. डॉ. खऱ्यांना नेहमींच्या हृद्रोगानें पछाडलें असूनही, त्यांनीं घेतलेली मेहनत व त्यांच्या सहकाऱ्यांनीं केलेलें सहाय्य, यामुळेंच ठरलेला कार्यक्रम पार पडूं शकला. या प्रसंगीं केलेल्या श्रमाबद्दल डॉ. खरे व त्यांच्या अनुयायांचें आम्ही अभिनंदन करितों."

# कृष्णार्जुनाची जोडी फुटली

## मोरूभाऊंचे एकनिष्ठ अनुयायी

यानंतरची डॉ. खरे यांच्या जीवनांतील महत्वाची घटना म्हणजे बॅरिस्टर अभ्यंकर यांचा मृत्युही होय. वाचकांच्या हें ध्यानांत आलेंच असेल कीं, डॉ. खरे यांनीं सरकारी नोकरी सोडल्यावर नागपुरास वास्तव्य केल्यापासून सार्वजनिक जीवनांत जो प्रवेश केला, तो विशेषेंकरून मोरूभाऊंच्याच प्रेरणेनें होय. आणि तेव्हांपासून सुमारें १७-१८ वर्षें त्यांचा संबंध अधिकाधिक घनिष्ठच होत गेला. प्रथम साधा परिचय, नंतर परिचयाचें स्नेहांत रूपांतर आणि स्नेहांतून पुढारी-अनुयायी हें नातें, अशा क्रमानें त्यांचा हा संबंध विकसित होत गेला. कै. अभ्यंकर यांची दांडगी व्यक्तिमत्ता, त्यांचा प्रचंड आत्मविश्वास, आत्यंतिक स्वार्थत्याग, कॉंग्रेसवरील अढळ निष्ठा, निर्भीड स्पष्टवक्तेपणाचा बाणा, प्रचंड देहयष्टी, पहाडी आवाज, लोकभाषेचा अभ्यास, राजकारणाचें मार्मिक ज्ञान, ब्रिटिश राज्याविषयींचा जळजळित विद्वेष, लढाऊ वीरवृत्ति, अनिवार स्वातंत्र्यप्रेम, इत्यादि गुणांची डॉ. खरे यांना चिरसहवासानें जसजशी जाणीव होत गेली, तसतसें त्यांच्या प्रभावी पौरुषाकडे व प्रखर व्यक्तिमत्वाकडे डॉ. खरे अधिकच आकर्षित होत गेले. आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, मोरूभाऊंच्या हयातींत डॉ. खरे यांनीं स्वत:कडे पुढारीपणाची भूमिका कधींच घेतली नव्हती. ते स्वत:ला मोरूभाऊंचे एकनिष्ठ अनुयायीच समजत. किंबहुना मोरूभाऊ नेमून देतील तेवढी कामगिरी शक्य तितकी उत्तम रीतीनें बजावणें, यांतच ते आपली इतिकर्तव्यता मानीत. एका मोठ्या वृक्षाच्या सावलींत दुसऱ्या वृक्षाचा परिपोष होऊं शकत नाहीं, अशी सर्वसाधारण समजूत आहे व ती खरीही आहे. परंतु मोरूभाऊ व डॉ. खरे यांचे विशिष्ट संबंध लक्षांत घेतां, त्यांस हा दाखला लागू करतां येण्यासारखा नाहीं. दृष्टान्तानेंच वर्णन करावयाचें तर, तें असें करतां येईल कीं, एखाद्या कुशल माळ्यानें आपणास प्रिय असलेल्या फळाचें लहानसें रोपटें आपल्या नाजुक हातानें आपल्या बागेंत लावावें आणि

ग्रं. १०१ ता.

नंतर मोठ्या ममतेनें व काळजीपूर्वक त्यास दररोज खतपाणी घालून व सर्वतोपरीनें त्याची शुश्रुषा करून तें रोपटें वाढवावें, आपल्या हयातींतच त्याचा फुलापानांनीं डवरलेला वृक्ष झालेला पहावा आणि त्यास मधुर फळ येऊं लागलेलें पाहून आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानावी ! असाच कांहींसा प्रकार मोरूभाऊंचाही झालेला आहे. नागपूरच्या सार्वजनिक जविनांत त्यांनीं अनेकपरीनें लोकसंग्रह केला, नानाप्रकारचे लोक नानाविध कारणांस्तव त्यांच्या सहवासांत आले, 'अयोग्यःपुरुषोनास्ति योजकस्तत्रदुर्लभः' या न्यायानें आपल्या जवळ आलेल्या प्रत्येक मनुष्याचा आपल्या कार्यासाठीं त्यांनीं शक्य तितका उपयोगही करून घेतला हें सर्व खरें. पण, त्यांच्या वागण्यांतली एक विशेष हातोटी अशी असे कीं, त्यांच्या सहवासांतील प्रत्येक मनुष्याला आपणच खास मोरूभाऊंच्या विश्वासांतलें आहोंत असें वाटें आणि हा गुण त्यांनीं बहुधा लोकमान्य टिळकांपासूनच उचलला होता. पुढाऱ्यांची अशीही एक जात वाचकांना परिचित असण्याचा संभव आहे कीं, जिच्या बाबतींत वरीलपेक्षां उलटाच अनुभव येतो. अशा पुढाऱ्यास कितीही अनुयायी असले, तरी त्यांपैकीं कोणाही एका अनुयायास आपण आपल्या पुढाऱ्याच्या खास विश्वासास पात्र आहोंत असें वाटतच नाहीं. किंबहुना आपला पुढारी प्रतिपदीं आपणाकडे संदेहाच्या व अविश्वासाच्या भावनेनें तर पहात नाहींना, अशी जाणीव ह्या अनुयायांच्या मनांतून केव्हांही नाहींशी होत नाहीं. औरंगजेब बादशहाची अशा प्रकारची ख्याति प्रसिद्धच आहे. आपल्या दाढीच्या खालच्या टोंकापासून जमीनीचा पृष्ठभाग नेहमींच चार साडेचार फूट अंतरावर असला पाहिजे अशी दक्षता तो बाळगीत असे. त्याचप्रमाणें आपल्या बैठकीपासून आपल्या कोणाही निकटवर्ती माणसाचें आसन त्यानें पांच फुटाच्या आंत येऊं दिलें नाहीं. अशा प्रकारच्या नित्य संशयग्रस्त व अनुयायांच्या दानतीवर अविश्वास ठेवणारे पुढारी मोरूभाऊंच्या समकालांत नव्हते असें नाहीं. परंतु, आम्ही वर म्हटल्याप्रमाणें मोरूभाऊंची जात ही मूलतःच त्यांच्याहून वेगळ्या स्वरूपाची होती आणि म्हणूनच त्यांच्या सहवासांत आलेल्या प्रत्येक मनुष्यास आपणच मोरूभाऊंच्या खऱ्या विश्वासास पात्र आहोंत, असा विश्वास वाटत असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

**मोरूभाऊंची लोकसंग्रहकुशलता**

मोरूभाऊंची लोकसंग्रहकुशलता ह्या प्रांतांतील त्यांच्या समकालीन अन्य पुढाऱ्यांपेक्षां किती उच्च दर्जाची होती, याची यावरून कल्पना करतां येण्यासारखी आहे. आपल्या सर्व अनुयायांकडे ते समदृष्टीनें पहात असले तरी, कमीअधिक महत्वाच्या कामगिरीसाठीं कमीअधिक योग्यतेचा मनुष्य कोण हें ओळखून काढण्यांत त्यांची दृष्टि विशेषच वाकबगार होती यांत शंका नाहीं. रोगी या नात्यानें डॉ. खरे यांच्या दवाखान्यांत जाऊन पहिल्याच भेटींत "काहो, डॉक्टर खरे, नुसता पैसाच मिळविणार आहांत, का कांहीं देशाबिशाही पहाल" अशी आपल्या नित्याच्या खास कमावलेल्या खडबडीत भाषेंत त्यांनीं डॉ. खरे यांच्या ठिकाणच्या अंतर्हित देशाभिमानाला जी कळवळून हांक मारली, तिचा डॉक्टरांच्या मनावर—त्यांच्या अंतर्मनावर—चांगलाच गंभीर परिणाम झाला आणि तेव्हांपासूनच एका परीनें त्यांच्या आत्म्यानें मोरूभाऊंच्या पुढारीपणाखालीं देशसेवेच्या व्रताची दीक्षा घेतली. आणि त्यानंतरच्या काळांत एकाहून एक अधिक महत्वाची कामगिरी पार पाडण्याच्या बाबतींत डॉ. खरे यांच्या कर्तृत्वाचा जो विकास मोरूभाऊंनीं अवलोकन केला, त्यामुळें उत्तरोत्तर आपल्या अंतिम विश्वासाचें ठिकाण या दृष्टीनेंच ते डॉक्टरसाहेबांकडे पाहूं लागले. अती परिचयामुळें अवज्ञा उत्पन्न होते ही म्हण ह्या दोघांनींही परस्पराच्या बाबतींत मिथ्या ठरविली. उलटपक्षीं भाजावें तितकें सोनें अधिक कान्तवर्ण होतें, तोडावा तितका ऊस अधिक गोड लागू लागतो, घासावें तितका चंदनाचा सुगंध अधिक वाढत जातो आणि हिऱ्याचे जितके अधिक पैलू पाडावेत, तितकी त्याची तेजस्विता वृद्धिंगत होत जाते, हाच न्याय मोरूभाऊ व डॉ. खरे यांच्या पारस्परिक संबंधांच्या बाबतींत अधिक प्रकट झाला. आणि म्हणूनच परिचयाचें स्नेहांत, स्नेहाचें अनुयायित्वांत—आणि अनुयायित्वाचेंही एकनिष्ठ सेवकत्वांत असें म्हटलें तरी चालेल—जसजसें रूपांतर होत गेलें, तसतसा त्यांचा एकमेकांविषयींचा आदर व विश्वास अखंड वाढतच गेला. आणि ह्या गोष्टीची सर्वसामान्य जनतेला व मोरूभाऊंच्या पारिपार्श्वद्गणांनाही इतकी जाणीव झालेली होती कीं, त्यांनींही

मोरूभाऊंच्या पश्चात् आपल्या पुढारीपणाचा ताज एकमुखानें डॉ. खरे यांच्याच शिरावर ठेवला. ही सर्व परिस्थिति ध्यानांत घेतां, मोरूभाऊंचा मृत्यु म्हणजे आपल्या आयुष्यांतील सर्वांत मोठी दुर्घटना होय, असें जें डॉ. खरे वारंवार म्हणत असतात, त्यांतील रहस्य सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

## मोरूभाऊंचें स्मारक

अर्थात मोरूभाऊंच्या निधनाचा आघात केवढाही मोठा असला तरी, मोरूभाऊंच्याच पाऊलावर पाऊल ठेवून पुढें जावयाचें तर तो सहन करणें भागच होतें. डॉ. खरे यांनींही मोठ्या धैर्यानें हा आघात सहन करून मोरूभाऊंच्या राजकारणाचा व समाजकारणाचा गाडा पुढें रेटण्यासाठीं कंबर बांधली. आपल्या पुढाऱ्याच्या ऋणांतून उतराई होण्याच्या स्वार्थीबुद्धीनें नव्हें तर त्याच्यापासून सर्व जनतेस अखंड स्फूर्ति होत रहावी म्हणून, प्रांतांतील कॉंग्रेस जनांनीं त्यांचें एक स्मारक करविण्याचें योजिलें. त्याप्रमाणें 'अभ्यंकर स्मारक समिति' श्री. जमनलाल बजाज यांच्या अध्यक्षतेखालीं बनविण्यांत आली. स्वर्गस्थ पुढाऱ्यांच्या बाबतींतही राजकारणांतील पारस्परिक स्पर्धा बाधक झाल्याशिवाय राहत नाहीं, असा ह्या दुर्दैवी देशांत इतर अनेक ठिकाणीं आलेला अनुभव नागपुरांतही आला नसता तरच आश्चर्य झालें असतें. अभ्यंकर स्मारक समितीच्या कामकाजाचा कसा खेळखंडोबा झाला, कै. सेठ बजाज प्रभृति नामांकित लोकही त्यांतून हळूहळू कसे बाहेर पडले, स्मारकाच्या निश्चित योजनेबाबत समीतींत कसकसे मतभेद झाले, स्थाननिर्णयालाही कोणकोणते अडथळे आले, इत्यादि प्रकरणांचा उद्वेगकारक इतिहास सांगून वाचकांच्या मनाला शीण आणण्याची आमची इच्छा नाहीं. डॉ. खरे हा सर्व प्रकार पहात होते आणि स्मारक योजना अनिश्चित कालाच्या मुदतीवर ढकलली जात असल्याचें त्यांस दिसत होतें. या सर्व प्रकारांमुळें त्यांस अतिशय विशाद वाटला. अखेरीस मोरूभाऊंचा एक विशाल पुतळा स्वतःच्या खर्चानें तयार करून घेऊन तो टाऊनहॉलच्या समोर मोठ्या समारंभानें सुप्रतिष्ठित करविला. याही बाबतींत डॉ. खरे यांची अभिजात योजकता व कल्पकता उत्तम प्रकारें निदर्शनास आली. शुक्रवार तळ्याच्या कांठावर शहराच्या द्वाराकडे अभिमुख असा लोकमान्यांचा पुतळा आपल्या

नित्याच्या आवेशपूर्ण व्याख्यानाच्या पवित्र्यावर उभा आहे. त्याच्याबरोबर समोर शुक्रवार दरवाजाच्या आंत महाल रस्त्याच्या पलीकडच्या टोंकास अशा मोक्याच्या ठिकाणीं मोरूभाऊंचा पुतळा उभारण्यांत आला कीं, जेथून लोकमान्य व मोरूभाऊ यांची नित्य व अखंड दृष्टादृष्ट होत रहावी. ह्या पुतळ्याचा अनावरण समारंभ लोकनायक बापूजी अणे यांच्या हस्तें करण्यांत आला. लोकमान्यांचे पट्ट शिष्य बापुजी अणे व मोरूभाऊंचे पट्ट शिष्य डॉ. खरे, ह्या दोघांच्या हातूनच अखेरीस लोकमान्यांचे कट्टर अनुयायी असलेले मोरूभाऊ अभ्यंकर, यांच्या स्मारक प्रतिमेची प्रतिष्ठापना व्हावी, हाही मोठा रम्य योगायोगच म्हटला पाहिजे. अर्थात येथें हें लक्षांत टेवलें पाहिजे कीं, ह्या समारंभाचे वेळीं डॉ. खरे प्रांताच्या प्रधानमंत्रीपदावरून अधिकारभ्रष्ट झालेले होते. आणि तरीही आपली अभ्यंकरनिष्ठा यत्किंचितही ढळू न देतां पुतळा उभारण्याच्या कामांत स्वार्थत्यागपूर्वक त्यांनीं घेतलेला पुढाकार पाहिला, म्हणजे उत्कर्षाचा अथवा अपकर्षाचा कोणताही काल असला तरी, त्यांत अभ्यंकरांसंबंधीच्या त्यांच्या भावनांत किमपि न्यून उत्पन्न होत नाहीं हेंच सिद्ध होतें.

**मध्यवर्ति असेंब्लींतील अविरोध निवडणूक**

मोरूभाऊंच्या मृत्यूमुळें मध्यवर्ति असेंब्लींतील त्यांची जागा आतां रिकामी झाली होती. या जागेसाठीं मोरूभाऊ अभ्यंकर व डॉ. मुंजे ह्यांच्यांत केवढा अटीतटीचा व चुरशीचा सामना झाला होता, हें ध्यानांत घेतलें आणि असेंब्लींत निवडून जाण्याची डॉ. मुंजे यांना त्यावेळीं वाटत असलेल्या उत्कट आवश्यकतेची कल्पना केली, म्हणजे मोरूभाऊंच्या अनायासें रिकाम्या झालेल्या ह्या जागेसाठीं पुन्हा डॉ. मुंजेच उभे राहतील असेंच सर्वांना वाटत होतें. मध्यवर्ति असेंब्लीच्या ह्या निवडणुकी कॉंग्रेसनें आपलें खास पार्लमेंटरी बोर्ड निर्माण करून त्याच्या नियंत्रणाखालीं लढविल्या होत्या. डॉ. मुंजे हे आतां उघड उघड कॉंग्रेसविरोधी राजकारणाचे पुरस्कर्ते बनलेले होते. ह्या निवडणुकीनें कॉंग्रेसला मध्यवर्ति कायदेमंडळांत हुकमी बहुमत मिळवून दिलेलें नसलें तरी 'सर्वांत मोठा व सर्वांत प्रभावी पक्ष या नात्यानें अत्यंत मानाचें व महत्वाचें स्थान प्राप्त करून दिलेलें होतें. कॉंग्रेसच्या तिकिटा-

वर उभे न राहतां स्वतंत्रपणें उभे राहून निवडून आलेले लोकनायक बापुजी अणे, कॉंग्रेसपक्षानें मुद्दाम सहानभूतिपूर्वक आपल्या जागेकरितां उमेदवार लढविला नाहीं हें कृतज्ञतापूर्वक स्मरून आपल्या कॉंग्रेस राष्ट्रीय पक्षाच्या सर्व अनुयायांसह असेंब्लींतील कॉंग्रेसपक्षाचीच पूर्ण साथ देत होते. यामुळें तर कॉंग्रेसपक्षाचें तेज व बळ अधिकच उग्रतेनें सरकारला बोंचत होतें. असेंब्लीची ही निवडणूक म्हणजे निवडणुकीच्या आखाड्यांत पहिल्यानेंच उतरलेल्या कॉंग्रेसचा दणदणीत विजय होता आणि असेंब्लींतील सरकारी सभासद व सरकारनियुक्त बाहुलीं, यांची संख्या वगळतां कॉंग्रेसपक्षच निर्विवाद बहुमतांत निवडून आलेला होता. एवंच, कायदेमंडळांतील राजकारणाच्या कर्तृत्वाच्या दृष्टीनें ह्या वेळच्या असेंब्लींतील कॉंग्रेसपक्षाचें स्थान कोणाच्याही सहज डोळ्यांत भरण्याइतकें तेजस्वी होतें यांत शंका नाहीं. आणि हें स्थान त्याला प्राप्त करून देण्यास ज्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या भुलाभाई देसाई प्रभृति पुढाऱ्यांचें व्यक्तित्व व कर्तृत्व कारणीभूत झालेलें होतें, त्यांतच मोरूभाऊ अभ्यंकर यांचीही गणना होत होती. परंतु, दुर्दैवानें अशा गौरवपूर्ण परिस्थितींत असेंब्लीच्या पहिल्या अधिवेशनास उपस्थित राहण्याचा योग मोरूभाऊस येऊ शकला नाहीं. मधुमेहाच्या विकारानें त्यांचा बळी घेतला. असेंब्लींतील कॉंग्रेसपक्षाचा एक मोठाच आधारस्तंभ ढासळला आणि त्यांची जागा भरून काढण्यासाठीं त्याच तोडीचा दुसरा उमेदवार उभा करण्याची कॉंग्रेसपक्षावर पाळी आली. आम्ही मागें म्हटल्या प्रमाणें डॉ. मुंजे यांचा पुनरपि उभे राहण्याचा संभव असल्यामुळें त्यांच्याशीं सामना झाला तरीही जो उमेदवार हमखास निवडून येऊं शकेल, अशालाच उभें करणें अवश्य होतें आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसच्या पार्लमेंटरी बोर्डानें अशा महात्वाच्या कामगिरीसाठीं आणि अशा आणीबाणीच्या वेळीं डॉ. खरे यांचीच मोरूभाऊंच्या गादीवर निवड केली हें ध्यानांत घेतलें म्हणजे मोरूभाऊंच्या हयातीपासूनच कॉंग्रेसश्रेष्ठींना डॉ. खरे यांच्या महत्वाची व कर्तृत्वाची जाणीव होऊ लागली असली पाहिजे हें स्पष्ट आहे. लोकसमजुतीच्या विरुद्ध डॉ. मुंजे ह्या निवडणुकीस उभे न राहिल्यानें डॉ. खरे

यांची कॉंग्रेस तिकीटावर बिनविरोध निवडणूक झाली आणि ते मध्यवर्ति कायदेमंडळाचे आमदार बनले.

**मध्यवर्ति कायदेमंडळांतील कामगिरी**

मध्यवर्ति कायदेमंडळांतील त्यांच्या कामगिरीवर थोडासा प्रकाश टाकणें अवश्य आहे. मागें वर्णन केल्याप्रमाणें मध्यवर्ति कायदेमंडळांत निवडून गेल्यापासून त्यांना सुमारें २॥–३ वर्षें तेथें काम करण्याचा योग आला आणि त्यानंतर कांग्रेसपक्षाच्या आज्ञेवरून प्रांतिक कायदेमंडळांत निवडून आल्यावर त्यांना मध्यवर्ति असेंब्लींतील आपली जागा सोडावी लागली. दिल्लीच्या असेंब्लींत २५ फेब्रुवारी १९३५ ला केलेल्या भाषणानें त्यांच्या कारकीर्दीचा उपक्रम झाला असें म्हटलें, तर १२ मार्च १९३७ रोजीं फिनान्स बिलावरील भाषण करून त्यांनीं आपल्या ह्या कारकीर्दीचा उपसंहार केला असें म्हणता येईल. ह्या कारकीर्दींत त्यांनीं एकूण पांच भाषणें केलीं. आणि त्या पांचही भाषणांतून त्यांनीं आपला प्रखर देशाभिमान व जळजळीत ब्रिटिश-विद्वेष फारच उत्तम रीतीनें प्रगट केला असें म्हणतां येईल. मध्यवर्ति असेंब्लींत असतांना डॉक्टरसाहेबांनीं ‘ आर्य मॅरेज व्हॅलिडेशन ॲक्ट ’ या नांवाचा एक कायदा पास करून घेतल्यामुळें आर्यसमाजी लोकांची धार्मिक विवाहाचे बाबतींतील अडचण दूर झाली. पूर्वीं आर्यसमाजी लोकांस आपलीं समाजपद्धतीनें केलेलीं लग्नें सिव्हिल मॅरेज ॲक्टखालीं नोंदावीं लागत असत. ही अडचण डॉक्टरसाहेबांच्या या नव्या कायद्यानें दूर झाली.

ज्या ज्या ठिकाणीं जाऊन ब्रिटिश राज्याची इभ्रत व गौरव यांचे वाभाडे काढतां येतील, तें प्रत्येक ठिकाण हिंदी राष्ट्राभिमानी मनुष्यानें काबीज केलेंच पाहिजे, असें डॉ. खरे यांचें प्रथमपासून मत असलें व सांप्रत ह्याच मतांतील सुसंगतीचा अत्युच्च बिंदु त्यांनीं गांठलेला असला, तरी राष्ट्राचें अंतिम प्राप्तव्य जें स्वातंत्र्य, तें प्राप्त करण्याच्या दृष्टीनें ह्या सनदशीर मार्गाचा फारसा उपयोग आहे, असें त्यांस केव्हांच वाटलें नाहीं. धृतराष्ट्राच्या दरबारांत पांडवांतर्फे शिष्टाई करण्यास भगवान श्रीकृष्ण गेले असता दुर्योधनाच्या मुखांत चंपुकारांनीं एक मोठें मार्मिक वचन घातलें आहे. दुर्योधन श्रीकृष्णास उद्देशून म्हणतो—

"राज्यं नाम नृपात्मजैः सहृदयैर्जित्वा रिपून्भुज्यते ।
तल्लोके न तु याच्यते न च पुनर्दीनाय वा दीयते ॥"

याचा अर्थ असा कीं, पराक्रमशाली व स्वाभिमानी राजपुत्रांनीं शत्रूला जिंकूनच राज्य मिळवावयाचें असतें; तें याचना करून कोणास मिळत नसतें. आणि दीनदुबळ्या भिकाऱ्यांना त्याचें दानही कोणी करीत नसतो. स्वातंत्र्यप्राप्तीच्या उपायांच्या बाबतींत डॉ. खरे यांची धारणा हुबेहुब याच प्रकारची आहे. आणि ह्याच धारणेचा प्रतिध्वनी त्यांच्या असेंब्लींतील भाषणांत उमटलेला आपणास दिसून येतो. उदाहरणार्थ १२ मार्च १९३६ रोजीं अंदाजपत्रकावर केलेल्या भाषणांत त्यांनीं काढलेले पुढील उद्गार अत्यंत मनन करण्यासारखे नाहींत असें कोण म्हणेल? ते म्हणाले, "ह्या देशांत सशस्त्र क्रान्तिवाद्यांचा बराच बागुलबुवा करण्यांत आला आहे. सशस्त्र क्रांतिवाद हा सैतानी आहे हें मीही जाणतों. परंतु, निर्विकारबुद्धीनें आपण ह्या गोष्टीकडे पहाल तर आपणास काय दिसतें? सरकारनेंच उत्पन्न केलेल्या परिस्थितीची ती प्रतिक्रिया आहे. आणि असें असूनही तिचीच सबब पुढें करून सरकार आमच्यावर दडपशाही गाजवीत आहे आणि तथाकथित कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याचें निमित्त करून नानाप्रकारच्या पीडा निर्माण करीत आहे. पण, सशस्त्र क्रांतिवाद अथवा दहशतवाद (Terrorism) म्हणजे तरी काय? जीविताचा तरी अर्थ काय आहे? शास्त्रीयदृष्ट्यां विचार केला तर, परिस्थितीशीं जुळतें घेणें अथवा उत्तेजनाची (Stimulii) प्रतिक्रिया म्हणजेच जीवित होय. ह्या देशांतील प्रत्येक मनुष्य, मग तो राजनिष्ठ असो कीं क्रांतिवादी असो, कोणत्याही उत्तेजनास प्रतिक्रिया देतोच. म्हणूनच सरकार त्याचेविषयीं नाक मुरडतें. कारण, जें सरकारच्या ताब्यांत आहे तेंच वस्तुतः आपल्या ताब्यांत मिळावें अशीच त्याची इच्छा असते. आणि ह्या दृष्टीनें पहातां राजनिष्ठ मनुष्य व दहशतवादी क्रांतिकारी यांच्यांत सरकार फरक करूं शकत नाहीं. राजनिष्ठानें, आपण सरकारचे आवडते आहोंत अशी समजूत करून घेण्याचें मुळींच कारण नाहीं. जेव्हां जेव्हां आम्ही ह्या क्रांतिवाद्यांविषयीं बोलतों किंवा प्रश्न विचारतों, तेव्हां तेव्हां आमच्या मनांत त्यांच्याविषयीं सहानुभूतिच आहे असें सरकारला

वाटतें. पण, सभागृहांत मला मुद्दाम असें सांगावेसें वाटतें कीं, खुद्द सरकार आणि सरकारचे अत्युच्च पदाधिकारी यांच्या मनांत सुद्धां क्रांतिवाद्यांविषयीं एक प्रकारचा आदरच वसत असतो. मरहूम लॉर्ड मोर्ले हे कांहीं काळापूर्वी भारतमंत्री होते. त्यांनीं त्यावेळचे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांस लिहिलेल्या एका पत्रांत असें म्हटलें आहे कीं, सनदशीर चळवळ करणाऱ्या लोकांच्या मुर्वतीखातर 'मोर्ले-मिंटो सुधारणा' देण्यांत आलेल्या नाहींत; तर या सुधारणांच्या रूपानें बंगाल्यांत पडलेल्या बॉंबगोळ्यांविषयींची मुर्वत प्रगट होत आहे."

"सरकार कितीही दडपशाही करीत असलें तरी अखेरीस नमतें घेतेंच. आतां ह्या नमतें घेण्यांतही सौजन्याचा भाग नसतो ही गोष्ट वेगळी. म्हणून मला ह्या सभागृहास हेंच सांगावयाचें आहे कीं, सरकार जें नमतें तें तुमच्या सनदशीरपणासमोर नव्हे. तर अशा कांहीं मार्गांसमोर सरकार नमतें कीं, ज्याचें वर्णन सनदशीर या शब्दानें मुळींच करतां येणार नाहीं."

**ब्रिटिश सरकारला घरचा अहेर**

डॉ. खरे यांच्या भाषणांतील वरील उतारा किंचित विस्तृत असला तरी त्यांच्या स्वत:च्या मनोरचनेवर आणि सनदशीर भासणाऱ्या उपायांचा अवलंब करीत असतांनाही त्या उपायांच्या उपयुक्ततेविषयीं त्यांना वस्तुत: कितपत विश्वास वाटतो, या गोष्टीवर स्वच्छ प्रकाश टाकणारा असल्यामुळेंच तो आम्ही उध्दृत केला आहे. ब्रिटिश लोक व साम्राज्य चालविणारी ब्रिटिश जाती, यांच्या विषयींचा आपला अभिप्राय सुविख्यात बर्नार्ड शॉचें एक सुप्रसिद्ध वचन उध्दृत करून याच भाषणांत डॉ खरे यांनीं बोलून दाखविला आहे. "आम्हां इंग्रजांचें राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवरील सर्वांत दुष्ट लोकांचें राष्ट्र होय. आणि आमचा विजय म्हणजे केवळ नीतीचा नायनाट होय." वरील वचन उध्दृत करून डॉ. खरे यांनीं केला तितका घरचाच अहेर परत करण्याचा अधिक सन्मानार्ह प्रकार दुसरा कोणतां असूं शकेल ?

दडपशाहीच्या उपायांचा सरकार अवलंब करते म्हणून पुष्कळ लोकांना मोठा विषाद वाटत असतो. परंतु, आपल्या ह्याच भाषणाच्या समारोपांत डॉ. खरे यांनीं आपल्या देशबांधवांना उद्देशून मोठे मार्मिक उद्गार काढले

आहेत. ते म्हणाले, "सरकार कोणत्या उपायांचा अवलंब करतें याचा विचार करण्याचें आपणांस कांहीं प्रयोजन नाहीं. आपण स्वतःच शक्तिमान बनलें पाहिजे. दुष्टपणाचें उच्चाटण होणार हा सृष्टीचा कायदाच आहे व तो अमलांत आल्याखेरीज रहाणार नाहीं. आणि मग जनता गाऊ लागेल

"India was India
when England was a pup,
India will be India
when England will be broken up."

**विनोदाचे फवारे**

आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, १२ मार्च १९३७ रोजीं फिनान्स बिलावर डॉ. खरे यांनीं केलेलें भाषण त्यांच्या मध्यवर्ति कायदेमंडळांतील कामगिरीच्या समारोपाच्या भाषणासारखें होतें. आणि येथील आपलें हें शेवटचेंच भाषण आहे, असा निर्देश डॉक्टरसाहेबांनींही आपल्या भाषणाच्या प्रारंभींच केलेला आहे. यापुढें आपलें कर्तृत्वक्षेत्र आपल्या प्रांतापुरतेंच मर्यादित राहणार हें जाणून जणूं काय मध्यवर्ति ब्रिटिश सत्तेसमोर आपल्या मनांतील सर्व जळजळीत भावना ओकून टाकण्याचाच त्यांनीं प्रयत्न केला असें म्हटलें पाहिजे. ह्या भाषणांत ब्रिटिश सत्ता व तिचा राज्यकारभार, हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारची फौज व इंडियन सिव्हिल सर्व्हिस हे तिचे दोन मुख्य आधारस्तंभ इत्यादि गोष्टींविषयीं त्यांनीं आपल्या अंतःकरणाचें प्रतिबिंब उत्तम रीतीनें उमटवून दाखविलें. हें भाषण करतांना ते आपल्या मनाच्या अगदीं उचंबळत्या स्थितींत होते असें स्पष्ट दिसतें. सरकार व सरकारी धोरण यांच्यावर खुसखुशीत प्रहार करीत असतांना त्यांनीं विनोद व उपरोध या दोन्ही शस्त्रांचा मोठा मार्मिक उपयोग करून दाखविला. 'फिनान्स बील' 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,' 'व्हिलेज अपलिफ्ट,' 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस,' इत्यादि शब्दांवर त्यांनीं ह्या भाषणांत केलेल्या एकेका कोटीमुळेंही त्या त्या वस्तूंचें अंतरंग जितकें उघडें होऊं शकलें, तितकें दुसऱ्या एखाद्या राणा भीमदेवी आवेशांत केलेल्या तासभराच्या व्याख्यानानेंही कदाचित हें कार्य झालें नसतें. उदाहरणार्थ 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' याचा अर्थ सांगतांना इतर देशांतील सरकारांना ब्रिटिश गव्हर्नमेंट

फ्रेंच गव्हर्नमेंट, अफगाण गव्हर्नमेंट अशा नामाभिधानानें पुकारण्यांत येतें. असें असतां हिंदुस्थानच्या सरकारलाच मात्र 'इंडियन गव्हर्नमेंट' न म्हणतां 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' असें कां म्हणतात असा प्रश्न उपस्थित करून डॉ. खरे म्हणतात, "ह्या शब्दांत पछाडण्याची (Possess) भावना आहे आणि तो असें दाखवितो कीं, हिंदुस्थानला ब्रिटनच्या भूतानें पछाडलें आहे."

**'जगिं धन्या धत्तुरा गड्या मलीदा मिळतो'**

हिंदुस्थानांतील सर्व मलिदा ब्रिटिश लोक कसें खातात आणि वस्तुतः हिंदी लोकच या देशाचे खरेखुरे धनी असतांना 'जगिं धन्या धत्तुरा गड्या मलीदा मिळतो' या न्यायानें हिंदी लोकांच्या हातांत मात्र धत्तुराच कसा देण्यांत येतो, याचें वर्णन करतांना त्यांनीं धनगर व मेंढीची यथार्थ उपमा दिली. धनगर मेंढ्या राखतो याचें कारण मेंढीविषयीं त्याला मोठें प्रेम असतें म्हणून नव्हे, तर तिच्या अंगावरील लोकर वरचेवर कांपतां यावी व तिच्या रूपानें आपला खिसा गरम करतां यावा म्हणून होय. हिंदुस्थानांत शांतता व सुव्यवस्था राखणाऱ्या हिंदुस्थान सरकारची हीच धनगरी मनोवृत्ति आहे. ह्या वृत्तीवर 'इंडियन फिनान्स बिलाचें' 'इंडियन फ्लीसिंग बील' असें वर्णन करून डॉ. खरे यांनीं किती विदारक प्रकाश पाडला, हें वाचकांच्या सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

'इंडियन सिव्हिल' सर्व्हिसचेंही 'इंडियाज कुकिंग सर्व्हिस' असा मार्मिक उपालंभ मारून त्यांनीं वर्णन केलें आहे. कारण आपल्या ब्रिटिश प्रभुकरितां हिंदुस्थानचा खाना हेंच लोक पकवीत नसतात काय? आणि हिंदुस्थानचा उत्तमोत्तम मलीदा आपल्या ब्रिटिश प्रभूच्या घशांत हेच लोक भरवीत नसतात काय?

ब्रिटिश सैन्यव्यवस्थेवरही त्यांनी असेच कोरडे ओढले आहेत. ते म्हणाले,—

"हे सैन्य म्हणजे तरी काय चीज आहे? तें कोणतें काम करतें? त्याला हिंदुस्थानी सैन्य असें म्हणण्यांत येतें. पण, वस्तुतः तें हिंदुस्थानी सैन्य मुळींच नव्हे. तें खरोखर जिंकलेला प्रदेश ताब्यांत ठेवण्यासाठीं नेमलेलें सैन्य आहे. जित लोकांना अधिक गुलामगिरींत डांबण्यासाठीं दहशत उत्पन्न करतां यावी आणि तिच्या आडोशानें हिंदुस्थानचा मलीदा लांबविण्याचें कार्य

सुखासमाधानानें कायमचें करतां यावें आणि ब्रिटिश लोकांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून हें सैन्य आहे. ह्या सैन्यांतील भेदांचें तरी किती वर्णन करावें! त्याची सर्वच व्यवस्था कपट आणि भेदनीति यांवर आधारली आहे. लढाऊ व बिनलढाऊ असे हिंदी लोकांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. मी स्वत: ह्यापैकीं कोणत्या वर्गांत मोडतों हें मला माहिती नाहीं. मी मराठा आहे. पण, मला हें निश्चित माहीत आहे कीं, मी जर सैन्यांत भरती झालों तर भाडोत्री म्हणून भरती होणार नाहीं. आणि माझ्या तथाकथित धन्याच्या हुकुमावरून माझ्याच हाडामांसाच्या व रक्ताच्या देशबांधवांवर गोळ्या तर कधींच झाडणार नाहीं. आपल्याच देशबांधवांवर गोळीबार करण्यांत मला कधींही अभिमान वाटणार नाहीं."

ह्या भाषणांत हिंदुस्थान सरकारचें Poggy ह्या शब्दानें डॉ. खरे यांनीं मोठें मजेदार वर्णन केलें आहे. अर्थात त्यांनीं स्वत:च म्हटल्याप्रमाणें हा शब्द कोणत्याही कोषांत सांपडण्यासारखा नाहीं. Peace, Order आणि Good Government ह्या चार शब्दांतील आद्याक्षरें घेऊन व त्यास शेवटीं 'y' हें विशेषणवाचक उपपद लावून त्यांनीं Poggy हा मजेदार शब्द बनविला; आणि ह्या एका शब्दांत हिंदुस्थान सरकारचें अंत:स्वरूप पूर्णपणें चित्रित करून दाखविलें.

**ब्रिटिश सरकारला गंभीर इषारा**

मध्यवर्ति कायदेमंडळांतील आपल्या या शेवटच्या भाषणाचा समारोपही डॉ. खरे यांनीं असाच मजेदार रीतीनें करून दाखविला आहे. आणि तो करींत असतांना ब्रिटीश सरकारला एक गंभीर इषारा देण्यासही ते विसरले नाहींत. ते म्हणाले, "सरकार आमच्यावर अशीच दडपशाही करीत राहील; दडपशाही हा त्यांचा स्वभावच होऊन बसेल. पण, त्याचा परिणाम काय होईल? त्यामुळें ह्या देशांत खरी शांतता कधींच नांदणार नाहीं. नांदलीच तर स्मशानशांतताच नांदेल. पण आमचा त्याला कांहीं इलाज नाहीं. कारण, आमच्या विरुद्ध बांकांवर बसलेले लोक हे द्रव्याच्या थैलीप्रमाणें जड बुडाचे आहेत आणि आम्ही वाऱ्यानें भरलेल्या थैलीप्रमाणें हलके आहोंत. त्यामुळें आम्ही

कांहीं त्यांना त्यांच्या जागेपासून ढळवूं शकत नाहीं. परंतु, त्याबरोबरच मला त्यांना असा इशारा द्यावासा वाटतो कीं, सामान्य वाऱ्यांत कांहीं सामर्थ्य नसेल; पण, जेव्हां त्याच वाऱ्याचें तुफानी वाऱ्यांत रूपांतर होतें, तेव्हां तो त्यास आडव्या येणाऱ्या प्रत्येक वस्तूस उडवून लावल्याशिवाय राहत नाहीं. सरकारनें हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, असाही एक दिवस उजाडल्यावांचून राहणार नाहीं कीं, जेव्हां कोणत्याही देशांतील नोकरशाही अंत नसलेल्या दडपशाहीचा अंगिकार करते, तेव्हां इतिहास हेंच सांगतो कीं, त्या दडपशाहींतून अखेरीस त्या नोकरशाहीचाच अंत झालेला दिसून येतो. आणि येथेंही तसेंच झाल्याशिवाय राहणार नाहीं."

**अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा ठराव**

मध्यवर्ति असेंब्लींत डॉ. खरे यांनीं असेंब्लीचे अध्यक्ष सर अब्दुल रहीम यांच्याविरुद्ध एकदां अविश्वासाचा ठराव कॉंग्रेस पक्षाचे नेते श्री. भुलाभाई देसाई यांना न विचारतांच पाठविला. याचें कारण, सरसाहेबांनीं एका भाषणांत कॉंग्रेसवर बरेंच तोंडसुख घेतलें होतें. तें डॉ. खरे यांना सहन झालें नाहीं. कॉंग्रेसपक्षाचे नेते श्री. भुलाभाई देसाई व प्रतोद बॅरिस्टर असफ़अल्ली हे नेहमींच बड्या बड्या अधिकाऱ्यांचे उंबरठे झिजवीत दिसतांना पाहूनही त्यांना त्यांच्याबद्दल बराच संताप आला होता. या एकूण सर्व प्रकारांवर 'अमृतबझार पत्रिके'चा सिमला येथील बातमीदार ता. २१ सप्टेंबर १९३८च्या 'पत्रिके'च्या अंकांत लिहतो, "सिमल्याच्या जगाला डॉ. खरे हे अपरिचित नाहींत. मध्यवर्ति असेंब्लींत डॉ. खरे हे पिछाडीचे शिलेदार (Back-bencher) होते, ही गोष्ट खरी. पण, पिछाडीला राहूनही त्यांनीं आपली दुर्दम स्वतंत्र वृत्ति अनेकदां प्रगट केली व मध्यवर्ति असेंब्लींतील कॉंग्रेसपक्षाच्या शिस्तीच्या दंडुक्याला कधींही जुमानलें नाहीं. विशेषतः श्री. भुलाभाई देसाई आणि डॉ. खरे यांच्यांत खटक्यांचे प्रसंग अनेकदां उद्भवले. मी एकच प्रसंग वर्णन करतों. १९३६ च्या सिमला येथील बैठकींत अध्यक्ष सर अब्दुल रहीम यांच्या एका निर्णयाचा निषेध करण्यासाठीं कॉंग्रेस आणि राष्ट्रीय हे दोन्ही पक्ष असेंब्लींतून उठून गेले व अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याचीही

दाट बोलावा होती. पण, दुसरा दिवस उजाडेपर्यंत अध्यक्ष आणि कॉंग्रेस-पक्षाचे पुढारी श्री. भुलाभाई देसाई यांच्यांत दिलजमाई होऊन वातावरण अगदीं थंडगार होऊन गेलें. इतक्यांत श्री. भुलाभाई देसाई यांना कोणी येऊन सांगितलें कीं, कॉंग्रेसपक्षाच्या एका सभासदानें अध्यक्षाविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याची नोटीस दिली आहे. भुलाभाईंना सर अब्दुल रहीम यांना दुखविण्याची मुळींच इच्छा नव्हती. त्यांनीं ताबडतोब अध्यक्षांकडे धांव घेतली; व तेथें जाऊन पाहतात तों डॉ. खरे यांनीं तो अविश्वासाचा ठराव मांडला होता. भुलाभाईंनीं तो ठराव आपल्या नेत्याच्या अधिकारांत, तेथल्या तेथेंच परत घेतला; व डॉ. खरे यांच्या अवखळपणाबद्दल अध्यक्षांची क्षमा मागितली "

मात्र, अध्यक्ष सर अब्दुल रहीम यांनीं कॉंग्रेस व राष्ट्रीय पक्ष यांच्यावर आपल्या भाषणांतून जें तोंडसुख घेतलें होतें, त्याबद्दल श्री. भुलाभाईंना असेंब्ली-सभागृहांतील आपल्या भाषणांत ठराव परत घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशीं सर साहेबांच्या भाषणाचा खासा परामर्श घ्यावा लागला व अशा रीतीनें त्यांना डॉक्टरांची एक प्रकारें समजूत काढावी लागली.

# बिहारचा भूकंप

## शेतकऱ्यांची अन्नान्नदशा

मध्यवर्ति ॲसेंब्लींतील कामगिरीच्या परामर्षाच्या निमित्तानें जरी आपण १९३७ सालच्या मार्च महिन्यापर्यंत पुढें सरकलों, तरी डॉ. खरे यांच्या आयुष्यांतील महत्वाचा व खऱ्या कर्तबगारीचा भाग जाणून घेण्याच्या दृष्टीनें आपणांस पुनश्च १९३४–३५ सालाइतकें मागें गेलें पाहिजे. १९३३–३४ चा महात्माजींचा सुप्रसिद्ध हरिजन दौरा झाल्यानंतर थोड्याच अवधींत आणखी एका अत्यंत भूतदयात्मक चळवळीशीं डॉ. खरे यांचा संबंध आला होता. अलीकडील काळांत अभूतपूर्व असा प्रचंड भूकंप विहारमध्यें यावेळीं झालेला होता. आणि त्याच्या धक्क्यानें मोंघीर, गया, पाटणा इत्यादि बिहार प्रांतांतील मोठमोठीं शहरें व हजारों एकर जमीन उध्वस्त झाली होती. चौदा वर्षांच्या वनवासानंतर लंकेहून सीतेला घेऊन प्रभु रामचंद्र परत येत असतांना त्यांना ज्याप्रमाणें पूर्वीच्या सुभग सलील नदीप्रवाहाच्या ठिकाणीं वाळवंटें निर्माण झालेलीं दिसलीं असें ‘पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम्’ असें कवीनें वर्णन केलें आहे, त्याचप्रमाणें बिहार प्रांतांतही भूकंपाच्या धक्क्यानें नद्यांचे जुने प्रवाहच्या प्रवाह गायब झाले व त्या ठिकाणीं नवे नदीप्रवाह उत्पन्न झाले, शेंकडों मैलांची जमीन फाटली आणि तिच्या भेगांत गांवेंच्या गांवें गडप झालीं आणि जणूं काय ज्याप्रमाणें धरित्रीमातेनें सीतेचें पावित्र्य सिद्ध करण्यासाठीं तिला आपल्या उदरांत ग्रहण केलें होतें, त्याचप्रमाणें हिंदभूमातेनें देखील आपल्या बिहारमधील हजारों सत्पुत्रांना आपल्या उदरांत कायमचें स्थान दिलें होतें. सुपीक जमीनीची या भूकंपामुळें रेताड व नापीक जमीन बनवून टाकिली होती. हजारों शेतकऱ्यांच्या तोंडचा शेतीचा घांस निघून गेला होता. हजारोंची अन्नान्नदशा झाली होती.

## सरकार व जनता यांच्यांत स्पर्धा

सारांश, येवढी मोठी आपत्ति हिंदुस्थानच्या कोणत्याही एका भागावर आजपर्यंत कधींही आलेली नव्हती. ह्या आपत्तीशीं तोंड देण्यासाठीं एका बाजूनें

हिंदुस्थान सरकारनें जसे आपले प्रयत्न सुरू केले, तसेंच दुसऱ्या बाजूनें देशप्रिय राजेंद्रबाबूंच्या पुढारीपणाखालीं कॉंग्रेसनेंही भूकंप-आपत्ति-निवारणनिधी व स्वयंसेवक पथकें, वैद्यकीय उपचार पथकें इत्यादि सहाय्य संघटित करण्याचा महान प्रयत्न चालविलेला होता. अर्थात डॉ. खरे हे मध्यप्रांतातर्फे साहजिकच ह्या प्रयत्नांत सहभागी होण्यासाठीं पुढें सरसावले होते. हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांतून ह्या कार्यासाठीं अतिशय झपाट्यानें मदत गोळा झाली व व्हॉईसरायच्या बरोबरीनेंच राजेंद्रबाबूंनीं उभारलेला भूकंप पीडानिवारण निधीही जमा होऊं शकला. यावरूनच सत्ताविहीन राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या हांकेला सत्ताधारी व्हाइस-रायच्या हांकेपेक्षां जनता किती तत्परतेनें साथ देते, याची आणखी एकवेळ साक्ष पटली.

ह्या भूकंपपीडितांच्या साह्यासाठीं कॉंग्रेसतर्फे जी एक 'अखिल भारतीय बिहार भूकंपपीडित सहाय्यक कमिटी' बनविण्यांत आली होती, तिच्यावर मध्यप्रांतातर्फे डॉ. खरे यांचीही नेमणूक झालेली होती.

मध्यप्रांतांतून ह्या कामासाठीं आटोकाट प्रयत्न करून डॉ. खरे यांनीं शक्य तितका निधी गोळा करून दिला होता व स्वयंसेवकांचीं पथकेंही बिहारमध्यें पाठविलीं होतीं. सरकारतर्फे होत असलेले प्रयत्न आणि जनतेतर्फे होत असलेले प्रयत्न यांचें अंतिम उद्दिष्ट जरी एकच असलें—तें म्हणजे भूकंपपीडित लोकांची आपत्ति निवारण करणें हें होय—तरी सरकार व जनता यांच्या ह्या प्रयत्नांचे दोन स्पष्टपणें स्वतंत्र व भिन्न प्रवाह वहात असलेले दिसूनच येत होते. आणि जरी परस्परांशीं शक्य तितकें सहकार्य करण्याचें उभयतांचें धोरण होतें—विशेषतः सरकार आपली नेहमींची बडेजावी व ताठरवृत्ति सोडून लोकनेत्यांच्याबरोबर ह्या प्रसंगापुरतें खेळीमेळीनें व बरोबरीनें वागण्यास आपण तयार आहोंत असें दाखवित होतें—तरी आपापलें सामर्थ्यप्रदर्शन करण्याची अंतस्थ चुरस दोन्हीही पक्षांत नव्हतीच असें म्हणतां येणार नाहीं.

**सरकारबद्दल महात्माजींना उमाळा**

हें सांगण्याचा प्रस्तुत प्रकरणीं संबंध असा कीं, वरील अखिल भारतीय भूकंपपीडित सहाय्यक समितीची बैठक पाटणा येथें भरली असतांना तींत

सरकारच्या बरोबर जनतेनेंही सहकार्य करावें, अशा आशयाचा एक ठराव स्वत: महात्माजींनीं त्या बैठकींत पुढें मांडला होता. आणि ह्या ठरावांत ह्या सहकार्याला 'आदरयुक्त' असें विशेषण महात्माजींनीं योजलें होतें. प्रसंगोपात्त ब्रिटिश सरकारकडून एखाददुसरी जनहिताची गोष्ट होत असली तरी, ४० कोटी लोकांच्या ह्या देशाला कायमचें गुलामगिरीत डांबून ठेवणें, हा जो घोर अन्याय त्यानीं केला आहे, त्यामुळें सरकारच्या हातून एखाददुसरें सत्कृत्य घडत असतांना देखील सामान्य जनतेच्या मनांत त्यांच्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न होऊं शकत नाहीं. परंतु, महात्माजींची सर्वच गोष्ट मुलखावेगळी किंवा असामान्य असते! ते सरकारशीं भांडावयाला उठतात तेव्हां सैतानी शद्वाचा दंडुका हातीं घेऊन उभे राहतात. पण, जेव्हां क्वचित् ते सरकारशीं सहकार्य करूं इच्छितात, तेव्हां लगेच त्याच सैतानी सरकारबद्दल आदराच्या भावनेनें ते बोलूं लागतात. ह्या आपल्या स्वभावास अनुसरूनच त्यांनीं आपल्या ठरावांत 'आदरयुक्त सहकार्य' असे शब्द योजलेले होते. आणि उगीच शब्दांचा कीस काढण्याच्या मनोवृत्तींत नसलेले कमिटीचे सभासद मुकाट्यानें ते शब्द मान्यहि करीत होते. वस्तुत: त्यापैकीं किती लोकांच्या मनांत सरकारविषयीं आदर वसत होता, हें सांगणें कठीणच आहे. बहुसंख्य लोकांच्या मनांत तरी तो खास वसत नसला पाहिजे. परंतु, त्यांतील एकही जण महात्माजींच्या ह्या 'आदरयुक्त' शद्वास विरोध दर्शविण्यास पुढें आला नाहीं.

**महात्माजींना खडा सवाल**

डॉ. खरे यांच्या ठिकाणचा खरा स्वभाव अशाच प्रसंगानें अनेक वेळीं प्रगट झालेला आहे. त्यांनीं निर्भीडपणें भरसभेंत उठून महात्माजींना बजाविलें कीं, आपणास ह्या सरकारविषयीं यत्किंचितही आदर वाटत नसल्यानें ठरावांतील 'आदरयुक्त' हे शब्द गाळण्यांत यावे. परंतु अशा उपसूचना ऐकल्या तर मग ते महात्माजी कसले! डॉ. खरे यांनीं आपल्या उपसूचनेवर महात्माजींशीं बराच वाद घातला आणि "एक तर तुम्हीच पूर्वीं ह्या सरकारला लावलेलें सैतानी हें विशेषण मागें घ्या व मग आदरयुक्त सहकार्याची भाषा बोला अथवा त्या सहकार्याच्या मागचें आदरयुक्त हें विशेषण काढून टाका आणि जरूर तेथें, 'प्रसंग-

विरोधी ' अथवा ' प्रतियोगी ' अशा विशेषणांनीं आपलें सहकार्य मर्यादित करा किंवा पूर्वी मी या सरकारला सैतानी म्हटलें होतें; पण, आतां तें सरकार सैतानी राहिलें नाहीं, असें तरी तुम्ही म्हणा" असा महात्माजींना त्यांनीं रोकडा सवाल केला. डॉक्टरांच्या कोटीक्रमानें महात्माजी निरुत्तर झाले असले, तरी त्यांनीं आपला आग्रह सोडला नाहीं. उलट, सर्व मंडळी डॉ. खरे यांनींच आपली उपसूचना परत घ्यावी, असा आग्रह धरूं लागली. त्यावेळीं डॉ. खरे यांनीं स्पष्टपणें बजावलें कीं, उपसूचना परत घेतली तर मला मूळ ठरावाच्याच विरुद्ध मत द्यावें लागेल. कारण, ठरावाप्रमाणें आपण सरकारशीं सहकार्य केलें तरी त्यांत आदराचा अंश लवमात्र असणार नाहीं. बोलून दाखविल्याप्रमाणें अखेरीस त्यांनीं एकट्यानेंच ठरावाच्या विरुद्ध आपलें मत नोंदविलें.

बिहारच्या भूकंपाची ही मध्यंतरीच आकस्मिक उठलेली घटना व त्या बाबतींत डॉ. खरे यांचें महात्माजींबरोबर झालेलें चहाच्या कपांतील वादळ, यांचा निर्देश केल्यानंतर चरित्रवर्णनाच्या अनुसंधानांत आपणांस आतां १९३५ च्या घटनाकायद्याकडे व त्याच्या अनुसार हिंदुस्थानांत झालेल्या निवडणुकीकडे आणि वरील दोहोंबाबत डॉ. खरे यांनीं बजावलेल्या कामगिरीकडे वळणें जरूर आहे.

# १९३५ चा सुधारणा कायदा

**सरकारचें कालहरणाचें धोरण**

१९२९ सालीं सायमन कमिशन नेमल्यापासून हिंदी सुधारणांच्या बाबतींत सरकारनें एकप्रकारचें दिरंगाईचें व कालहरणाचें धोरण पत्करलें होतें. 'आशां कालवतीं कुर्यात् कालं विघ्नेनयोजयेत्' अशी सरकारची नेहमींचीच नीति असते. सुधारणा देतो देतो म्हणण्यांत कांहीं काळ घालवावा, नंतर त्यांची योजना तयार करण्यासाठीं मोठें अवडंबर उभें करावें, ह्या अवडंबरांतूनही अखेरच्या घटकेस योजनेची काटछाट करावी आणि भरीव हक्क देण्याचें सर्व सोंग बाह्यत: निर्माण करून वास्तविक हक्कांचा एक कणही लोकांच्या हातीं कसा पडणार नाहीं, याच्या युक्तया योजींत रहावें हें ब्रिटिश सरकारचें धोरण आतां सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. १९१९ च्या मांटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांच्या कायद्याप्रमाणें जर खरोखर १९२९ सालींच दुसरा सुधारणेचा हप्ता हिंदुस्थानच्या पदरांत टाकण्याच्या बाबतींत ब्रिटिश सरकार प्रामाणिक असतें, तर त्या सुधारणांची योजना सिद्ध करण्यास १९२५ सालापासूनच त्यांनीं आरंभ करावयास नको होता काय?

**गोलमेज परिषदांचा गोंधळ**

पण नाहीं. १९२९ साल उजाडलें तेव्हां सायमन कमिशन नेमण्यांत आलें. त्यानंतर ३०, ३१ व ३२ हीं तीन वर्षें गोलमेज परिषदांचा गोंधळ घालण्यांत आला, त्यानंतर सुधारणांचा कच्चा खर्डा तयार करण्याचें काम जॉईंट पार्लमेंटरी कमिटीकडे सोंपविण्यांत आलें. ह्या कमिटीच्या शिफारसींवरून नंतर हिंदी सुधारणेचें बिल तयार करण्यांत आलें. या बिलाचाही पार्लमेंटांत काथ्या कुटण्यांत आला आणि इतक्या सात पदरी कापडांतून कपडछान होऊन गाळून घोटून तयार झालेला सुधारणा कायदा बादशहा सलामतच्या सहीशिक्यानें जेव्हां मंजूर झाला, तेव्हां त्यांतही कोणत्या दिवसापासून त्यांतला कोणता भाग अमलांत यावयाचा, याच्या तारखा ठरवून देण्यांत आल्या. सारांश काय तर १९१९ च्या नंतर जो सुधारणांचा हप्ता १९२९ सालांतच

हिंदी जनतेच्या पदरांत पडावयास पाहिजे होता, तो प्रत्यक्ष अंमलांत येण्यास १९३६-३७ साल उजाडलें! सात आठ वर्षांचा कालावधी तर अशाप्रकारें हांहां म्हणतां सरकारनें पार पाडला. आणि हिंदी लोक विचारे आशेवर टांगूनच राहिले.

## सरकारचा कुटिल कावा

१९३५ चा हा सुधारणा कायदा तयार करण्याच्या कामांत ब्रिटीश साम्राज्य सरकारनें इंग्लंडमधील नामांकित व अनुभवी मुत्सद्यांची सर्व बुद्धिमत्ता कामास लावली होती. कॉंग्रेसच्या दिवसेंदिवस वर्धमान होत चाललेल्या बलशालित्वाचा प्रत्यय सरकारला आलेला होता. म्हणून स्वराज्याचे हक्क दिल्यासारखें तर दिसावें पण प्रत्यक्ष उपभोगास मात्र ते हिंदी जनतेला कदापि मिळूं नयेत, असा कुटिल कावा ह्या सुधारणा तयार करीत असतांना बुद्धिमान ब्रिटीश मुत्सद्यांनीं वापरला होता. हिंदुस्थान हा एकजिनसी, भेदातीत व एकपंथीय देश असता तर वास्तविक स्वराज्याचे हक्क त्यास उपभोगण्यास मिळूं शकण्याइतके हक्क ह्या कायद्यांत ग्रथित करण्यांत आले होते. पण, खरी 'ग्यानबाची मेख' येथेंच होती ! नाना भाषा, नाना जाती, नाना पंथ, नाना धर्म आणि नाना भेद, यांनीं नानात्वाप्रत पावलेल्या हिंदुस्थानच्या पदरांत ह्या कायद्याचें स्वरूप वरीलसारखें असल्यामुळें 'ना' 'ना' चाच पाढा पडणार होता.

## मतदार संघाची खिचडी

हिंदुस्थानांत कोणताही एक पक्ष, कोणत्याही कायदेमंडळांत निर्विवाद बहुमतामध्यें निवडून येऊं शकणार नाहीं, अशा प्रकारची धूर्त सावधगिरी हिंदी जनतेचे मतदार संघ बनवीत असतांना ह्या कायद्यांत वापरण्यांत आली होती. ब्रिटिश सरकारचा पक्का समज होता कीं, हिंदुस्थानांतील भेद, पंथ व दुही यांच्या मूलभूत स्वरूपाचें संपूर्ण आकलन करूनच आपण हा कायदा बनविला असल्यामुळें कोणत्याही एका पक्षाला कोणत्याही ठिकाणीं निर्विवाद बहुमत मिळवून ह्यांतील अधिकारांचा उपयोग हिंदी जनतेच्या हिताकडे अथवा ब्रिटिश सरकारच्या विरोधासाठीं केव्हांच करतां येणार नाहीं. त्यांतून जातीय निर्णयाच्या रूपानें मुसलमान मतदार संघ वेगळा फोडून काढल्यानंतर आणि

हिंदु, पारशी, ख्रिस्ती, जैन, बौद्ध इत्यादि समाजांची एका मुसलमानेतर मतदार संघांत खिचडी शिजविल्यानंतर कोणताच पक्ष प्रभावी राहूं शकणार नाहीं.

ह्या सुधारणांचें हें स्वरूप ओळखून कांग्रेसनें हा सुधारणा कायदा मोडून पाडण्याचें ठरविलें. परंतु पूर्वीप्रमाणें कायदेमंडळावर बहिष्कार घालून नव्हे, असहकारिता पुकारून नव्हे, कायदेमंडळापासून दूर राहून नव्हे तर त्यांत शिरून अधिकाराचीं सूत्रें हातीं घेऊन लोककल्याणाच्या योजना पुढें मांडून अशा रीतीनें सुधारणांचा फोलपणा जनतेच्या निदर्शनास आणण्याचें धोरण कांग्रेसनें अंगिकारिलें.

**कॉंग्रेसनें निवडणुकी लढविल्या**

सुधारणान्वयें झालेल्या १९३६ च्या प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकी कांग्रेसनें लढविल्या. कालप्रवाह असा जबरदस्त आहे कीं, धुरंधर व महाबुद्धिमान ब्रिटिश मुत्सद्यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून ह्या कायद्याची योजना केली व त्यांत कालत्रयीही जी गोष्ट घडून येणार नाहीं अशी आपल्या मनाशीं पक्की खूणगांठ बांधली तीच अखेरीस घडून आली. ब्रिटिश मुत्सद्यांच्या बुद्धिमत्तेचा गर्व नित्य प्रगतिमान काळानें मिथ्या ठरविला आणि त्यांच्या सर्व अपेक्षांना झिटकारून त्यांनाही अगम्य व अनाकलनीय वाटेल असा तडाखा त्यांच्या राजनीतिज्ञतेवर मारला. १९३६ च्या निवडणुकींत हिंदुस्थानांतील ११ पैकीं ६ प्रांतांत कॉंग्रेसला निर्विवाद बहुमत मिळालें. आणि ह्या एका गोष्टीनेंच ब्रिटीश मुत्सद्यांच्या डोळ्यासमोर पहिल्यांदां काजवे चमकले. ह्यानंतर आसाम व सरहद्द प्रांत या प्रांतांतही कॉंग्रेसला प्रभावी मत मिळाल्यामुळें आणि सिंधमधील अल्पसंख्य कॉंग्रेस सदस्य आपल्या विशिष्ट परिस्थितीमुळें प्रभावी होऊं शकल्याकारणानें अखेरीस पंजाब व बंगाल हे दोन प्रांत वगळून बाकीच्या सर्व प्रांतांत म्हणजे एकूण ११ पैकीं ९ प्रांतांत बहुमताच्या अथवा प्रभावी मताच्या जोरावर कॉंग्रेसचेंच अधिराज्य स्थापन होऊं शकलें. प्रांतिक निवडणुकींच्या ह्या सामन्यांत ज्या प्रांतांत कॉंग्रेसला निर्विवाद बहुमत मिळालें, त्यांत वऱ्हाड-मध्यप्रांत हा सर्वांत अग्रभागी होता—ह्या प्रांताइतकें प्रचंड बहुमत मद्रासखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्रांतांत कॉंग्रेसला मिळालें नव्हतें. आणि कॉंग्रेसला

हें इतकें उज्ज्वल यश मिळवून देण्याचें श्रेय परोक्ष व अपरोक्ष अशा दोन्ही रीतींनीं डॉ. खरे यांना प्राधान्येंकरून दिलें पाहिजे.

**काँग्रेस व लोकशाही स्वराज्य पक्षाचें ऐक्य**

काँग्रेसनें स्वतःच्या नांवाखालीं प्रथमतःच लढविलेल्या ह्या निवडणुकींच्या बाबतींत घडून आलेला वऱ्हाड-मध्यप्रांतांतील एक स्पृहणीय विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. वस्तुतः काँग्रेसनें कौंसिल-बहिष्काराबाबत आजपर्यंत जें धोरण पत्करलेलें होतें, त्याला विरोध असल्यामुळें प्रतिसहकार पक्ष अथवा लोकशाही स्वराज्य पक्ष असले कौन्सिलवादी पक्ष अस्तित्वांत आलेले होते. कौन्सिलबहिष्काराचा हा एक महत्वाचा मतभेद सोडला तर इतर बहुतेक सर्व बाबतींत त्यांचें काँग्रेसशीं मतैक्यच होतें. किंबहुना ते आपणाला काँग्रेसवादी म्हणविण्यांतच ह्यावेळेपर्यंत तरी भूषण मानीत होते. त्यामुळें आतां जेव्हां काँग्रेसनें स्वतःच निवडणुकी लढविण्याचें ठरविलें, तेव्हां आपलें स्वतंत्र अस्तित्व विसरून त्यांनीं काँग्रेसमध्यें समाविष्ट होऊन जाणेंच श्रेयस्कर होतें. परंतु, कौन्सिलबहिष्काराचा वाद अशा तऱ्हेनें मिटला असला तरी काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणांत दुसराच एक वाद उत्पन्न झाला होता आणि स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीस पक्षसंघटना, शिस्त, बहुमताचा आदर इत्यादि गोष्टींपेक्षां अधिक महत्व देणाऱ्या लोकांना ह्या नव्या बाबतींतही आपल्या सदसद्विवेकबुद्धीस स्मरून काँग्रेसशीं मतभेद दर्शविणें अनिवार्य झालें होतें. ही महत्वाची बाब म्हणजे ब्रिटिश सरकारनें दिलेल्या जातीय निवाड्याबद्दल (कम्यूनल अवार्ड) काँग्रेसनें धारण केलेली "ना हम इधरके ना हम उधरके" अशी (Neither reject nor accept) वृत्ति होय. जातीय निवाडा जरी काँग्रेसनें स्वीकार्य मानला नाहीं तरी सर्वस्वी त्याज्यही मानला नव्हता. तथापि, वैयक्तिकदृष्ट्या जातीय निवाड्याच्या विरुद्ध मतप्रचार करण्यास काँग्रेसनें काँग्रेस सदस्यांना, इतकेंच नव्हे तर काँग्रेसच्या वर्किंग कमेटीच्या सदस्यांनाही मोकळीक दिली होती. परंतु, इतकें असूनही महामना पंडित मदनमोहन मालवीय व लोकनायक बापूजी अणे हे दोघे काँग्रेसच्या वर्किंग कमेटींतून बाहेर पडलेच. यांच्या उलट डॉ. गोपाळराव देशमुख व डॉ. खरे यांनीं वरील सवलतीचा फायदा घेऊन काँग्रेसमध्येंच राहून

जातीय निवाड्याच्या विरुद्ध मतप्रचार केला होता. तसें पाहिलें तर प्रतिसहकार पक्ष काय किंवा लोकशाही पक्ष काय, किंवा जातीय निवाड्याबाबत सद्-सद्विवेकबुद्धिवादी पक्ष काय, हे सर्व प्रामुख्यानें वऱ्हाड-मध्यप्रांत व महाराष्ट्र याच भागांत प्रामुख्यानें दिसून येत होते. प्रांतिक कायदेमंडळांत मत देत असतांना जातीय निवाड्याबाबत मत देण्याचा स्वतंत्र अधिकार आपणास राहणार असेल व त्याबाबत पक्षाच्या शिस्तीचें बंधन बाधक होणार नसेल, तर सर्व जुन्या कॉंग्रेस-वाल्यांनीं एकोप्यानें निवडणुकीचा लढा लढण्यास हरकत नाहीं, असाच अभिप्राय श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं स्वतःच्या सहीनें 'केसरीं'त लेख लिहून प्रकट केला होता. आणि तोच वऱ्हाड-मध्यप्रांतांतील लोकशाही स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांसही मान्य होता. तात्यासाहेबांसारख्या वजनदार पुढाऱ्यानें हें मत प्रकट रीतीनें प्रतिपादन केलें असतांही पुण्यास व महाराष्ट्रांत निवडणुकीच्या बाबतींत जुन्या कॉंग्रेसवाल्यांचें ऐक्य साधूं शकलें नाहीं. नागपुरासही 'महाराष्ट्र'चे संपादक श्री. गोपाळराव उर्फ दादासाहेब ओगले यांनीं, या प्रांतांतील कॉंग्रेस-पक्षाचे अध्वर्यू म्हणून डॉ. खरे यांस पत्र लिहून वरील भूमिकेवरून समेटाचें वातावरण निर्माण करण्याविषयीं आपली उत्सुकता दर्शविली. डॉ. खरेही या गोष्टीस तयार झाले. इतकेंच नव्हे तर ते स्वतः श्री. दादासाहेब ओगले यांच्यासह अधिक व्यवहार्य बोलणें करण्यास डॉ. मुंजे यांच्या घरीं गेले. डॉ. मुंजे यांनींही डॉ. खरे यांचें या समेटाबाबत स्वागत केलें. परंतु, पुढें कुठें माशी शिंकली कोणास ठाऊक या प्रांतांत तरी हा समेटप्रयत्न पुण्याप्रमाणेंच सफल होऊं शकला नाहीं. उलट, वऱ्हाडांत मात्र लो. बापूजी अणे, वीर वामनराव जोशी व सेठ ब्रिजलाल बियाणी यांचें ह्या बाबतींत सहकार्य घडून येऊं शकलें. मध्यवर्ति असेंब्लीच्या निवडणुकीच्या वेळींही कॉंग्रेसनें लोकनायक अणे यांची जागा निर्द्वंद्व सोडली होती आणि प्रांतिक निवडणुकींच्या वेळीं लोकशाही पक्षाशीं समेट करून एकूण सहा जागा त्या पक्षाच्या उमेदवारांस देण्याचें कबूल करण्यांत आलें व सर्वांनीं मिळून एकोप्यानें निवडणुकीची दंगल लढविली व तींत ते यशस्वीही झाले.

## निवडणुकीची जबाबदारी

निवडणुकीची ही मोहीम लढविण्यासाठीं कॉंग्रेसनें एक अ. भा. कॉं. पार्लमेंटरी बोर्ड नेमलें होतें. या बोर्डावर वऱ्हाड-मध्यप्रांतातर्फे डॉ. खरे यांचीही नेमणूक झाली होती. ह्या बोर्डानें प्रांतोप्रांतीं आपलें काम चालविण्यासाठीं प्रांतिक पार्लमेंटरी बोर्डे अस्तित्वांत आणलीं होतीं. वऱ्हाड-मध्यप्रांताच्या प्रांतिक पार्लमेंटरी बोर्डाचे डॉ. खरे हेंच अध्यक्ष नेमले गेले होते. कॉंग्रेसच्या अखिल भारतीय यशाचें श्रेय अखिल भारतीय कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें जसें सरदार पटेल यांना देण्यांत येतें, तसेंच वऱ्हाड-मध्यप्रांतांतील पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें कॉंग्रेसच्या ह्या प्रांतांतील निवडणुकींच्या प्रचंड यशाचें श्रेय डॉ. खरे यांसच द्यावयास नको काय ? राजनीतिशास्त्रांतलें पुढील वचन सुप्रसिद्धच आहे कीं—

> ' न गणस्याग्रतो गच्छेत् सिद्धे कार्ये समं फलम् ।
> यदि कार्य-विपत्तिश्चेत् मुखरस्तत्रहन्यते ॥ '

ह्या न्यायानें समजा जर ह्या प्रांतांत प्रचंड बहुमत तर राहोच, पण, मुंबई अथवा ओरिसासारखें जेमतेम बहुमतही कॉंग्रेसला मिळालें नसतें तर ह्या अपयशाचें खापर प्रांतीय बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें डॉ. खरे यांच्याच माथ्यावर फोडण्यांत आलें नसतें काय ? आणि हें जर खरें, तर मग यशाचेंही श्रेय त्यांनाच देणें श्रेयस्कर नाहीं काय ? अर्थात ' मारे शिपाई नाम सरदारका ' हाही न्याय येथें विसरण्याचें प्रयोजन नाहीं. प्रांतांतील अनेकविध कार्यकर्त्यांनीं अनेक ठिकाणीं केलेल्या ज्ञात व अज्ञात परिश्रमांचें हें संकलित फळ आहे व तें परोक्षतेनेंही डॉ. खरे यांसच चिकटतें, याबद्दल कुणीही मतभेद दर्शविणार नाहींत. आणि अशा तऱ्हेनें शेंकडों कॉंग्रेसकार्यकर्त्यांनीं जीवापाड मेहनत करूनच निवडणुकींतील हें यश आपल्या पदरांत टाकलें आहे—आपण एकटेच त्याचे सर्वस्वी भागीदार नाहींत, याची स्वत: डॉ. खरे यांनाही जाणीव नाहीं असें नाहीं.

## सेठ भिकूलाल चांडक यांची माफी

या निवडणुकींत डॉ. खरे यांच्या स्वाभिमानाच्या दृष्टीनें एक विचित्र

घटना घडून आली आणि त्यामुळें आखिल भारतीय काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष सरदार पटेल व डॉ. खरे यांच्यांत मराठी मध्यप्रांतांतील काटोल-सावनेर या मतदार संघातर्फे निवडण्यांत आलेल्या प्रांतिक असेंब्लीच्या निवडणुकीच्या उमेदवाराबाबत लहानसा खटका उडाला. डॉ. खरे यांनीं या मतदारसंघातर्फे सावनेरचे प्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते व नागपूरच्या माजी 'तरुण-भारता'चे संपादक श्री. पी. डी. हरकरे वकील, यांना उमेदवार म्हणून निवडलें व त्यांच्या नांवाला सरदार पटेलांनीं प्रथम संमतिही दिली. परंतु, लगेच केळोदचे काँग्रेस कार्यकर्ते सेठ भिकूलाल चांडक यांनीं डॉक्टरांच्या पश्चात सरदारांकडे वर्णी लावून श्री. हरकरे यांच्या ऐवजीं आपलेंच 'नॉमिनेशन' करून घेतलें. पुढें फैजपूर काँग्रेसच्या वेळीं डॉ. खरे यांनीं भिकूलालजींचा शिस्तभंग सरदारांच्या नजरेस आणून हें प्रकरण इरेस घातलें. अखेरीस सरदारांच्या सांगण्यावरून भिकूलालजींना डॉक्टरसाहेबांची माफी मागावी लागली व यापुढें 'डॉक्टरसाहेबांची अवज्ञा करून मी वागणार नाहीं' असें कबूल करावें लागलें, तेव्हां कोठें हें चहाच्या कपांतील वादळ शांत झालें.

**डॉ. रावांना गव्हर्नर करण्यांत सरकारचा उद्देश**

या प्रांतांतील निवडणुकीच्या बाबतींत मिळालेलें हें यश अधिक उठावदार आहे असें आम्ही जेव्हां म्हणतों तेव्हां त्यालाही विशेष कारणें आहेत व तीं ध्यानांत घेतल्याशिवाय हें यश मिळवून दाखविणें म्हणजे केवढी मोठी कामगिरी बजावणें होय याची कल्पना वाचकांना येणार नाहीं. ह्या देशांतील त्या काळां-तील राजकारणाचे अंत:प्रवाह ज्यांना विदित असतील त्यांच्या न सांगतांही हें ध्यानांत येण्यासारखें आहे कीं, सरकारनें काँग्रेसला निवडणुकींत यश मिळूं नये यासाठीं प्रथमपासूनच कडेकोट तयारी चालविली होती. पंजाबमध्यें पै.वा. सर शिकंदर हयातखान व ह्या प्रांतांत कै. डॉ. राघवेंद्रराव यांची त्या कामीं सरकारनें मुद्दाम योजना केली होती असें म्हणतां येतें. त्या दोघांनाही गृहमंत्रिपदावरून प्राय: एकाच वेळीं प्रांताधीशाच्या (गव्हर्नरच्या) पदावर चढविण्यांत आलें होतें. मुस्लीम बहुसंख्य असलेल्या पंजाब प्रांतांत काँग्रेस व मुस्लीम लीग ह्यांपैकीं कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत न मिळूं देण्याची कामगिरी सर शिकंदर

यांचेवर पडलेली होती, तर मध्यप्रांतांत कॉंग्रेसला बहुमत न मिळावें ही कामगिरी कै. डॉ. राघवेंद्रराव यांना पार पाडावयाची होती. हंगामी गव्हर्नर या नात्यानें त्या दोघांनाही ब्रिटिश सरकारनें मुद्दाम दिलेली बढती त्या पदावरून त्यांनीं आपापल्या प्रांतांत केलेला संचार व दौरे, ह्या दौऱ्यांना एरव्हीं दुर्लभ असलेली 'टाइम्स ऑफ इंडिया' सारख्या निमसरकारी पण वजनदार पत्रांतून देण्यांत आलेली आत्यंतिक प्रसिद्धी, ठिकठिकाणीं त्यांचे करण्यांत आलेले सत्कारसमारंभ, त्यांना देण्यांत आलेलीं रसभरित मानपत्रें आणि त्यांच्या कर्तृत्वाचे जोरजोरानें वडविण्यांत आलेले ढोल, इत्यादि सर्व गोष्टी ध्यानांत घेतां, त्यांच्या हातून अपेक्षित कामगिरी पार पडावी म्हणून आपलें सर्व सामर्थ्य सरकारनें त्यांच्या पाठीशीं कसें घातलें होतें याची सहज कल्पना येऊं शकते.

**अभिवचनांची खैरात**

मध्यप्रांतापुरतेंच बोलावयाचें झाल्यास कै. डॉ. रॉव आपला डाव अत्यंत कुशलतेनें खेळत होते असें कबूल करणें भाग आहे. गव्हर्नरपदावरून महाकोशल, नागपूर व वऱ्हाड या तिन्ही भागांत त्यांनीं भरारीचे दौरे केले होते. ह्या दौऱ्यांतून ह्या प्रांतांतील जमीनदार, वतनदार, मालगुजार, इजारदार, व्यापारी, कारखानदार, शेठसावकार इत्यादि भरीव हितसंबंधांच्या (vested interests) लोकांच्या पृथक पृथक संघटना ब्रिटिश सरकारच्या छायाछत्राखालीं घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला होता. कोणाचे हक्क, कोणाचे अधिकार, कोणाच्या सवलती, कोणाचें कांहीं कोणाचें कांहीं सरकारकडून सुरक्षित ठेवण्यांत येतील, अशा अभिवचनांची खैरात वाटण्यासाठीं लागणाऱ्या अधिकाराचें बळ यासाठींच सरकारनें त्यांना प्राप्त करून दिलें होतें. ऑनररी मॅजिस्ट्रेटस् असोसिएशनसारख्या 'मश्रुम' संस्थांचें पीक ह्याच काळांत ह्या प्रांतांत कां व कसें आलें होतें, हें वरील मीमांसा लक्षांत घेतां सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. अस्पृश्य, ब्राम्हणेतर, मराठे, जमीनदार, वतनदार, मालगुजार, व्यापारी, कारखानदार इत्यादि निरनिराळ्या जातीय अथवा व्यावसायिक लोकांनीं आपापले स्वतंत्र संघ बनविले व त्यांच्या तर्फे उमेदवार उभे केले म्हणजे कॉंग्रेसला कोण विचारणार अशी कै. डॉ. राव यांची कल्पना होती.

**कै. डॉ. राव यांची फजीति**

पण, काळाचा तडाखा असा जबरदस्त होता कीं, इतक्या कडेकोट बंदोबस्तांतूनही ११२ सदस्यांच्या कायदेमंडळांत ७२ सदस्य कांग्रेसच्या तिकिटावर निवडून येऊं शकले. डॉ. राव यांचा वस्तुतः हा पराभव नव्हता, तर त्यांना हातीं धरून सर्व सूत्रें हलविणाऱ्या प्रांतांतील ब्रिटिश नोकरशाहीचा तो पराभव होता. आणि हा पराभव प्रामुख्यानें डॉ. खरे यांनींच घडवून आणला म्हणून डॉक्टरांच्यावर त्यांचा अतिशय राग होता. हाच राग पुढें एकदां प्रांतिक ॲसेंब्लींत 'असंतुष्ट असिस्टंट सर्जनचें सरकार' (Disgruntled Assistant Surgeon's Government) असल्या हीन अभिरुचीच्या उद्गारांनीं त्यांनीं कसा बोलून दाखविला व त्याबद्दल एक दिवसाकरतां त्यांची कायदेमंडळाबाहेर असेंब्लीचे स्पीकर ना. घनश्यामसिंग गुप्ता यांनीं कशी हकालपट्टी केली होती, इत्यादि वृत्तांत वाचकांच्या स्मरणांतून अद्यापि गेला नसेलच.

वरील विवरणावरून मध्यप्रांतांतील निवडणुकींचें विशिष्ट महत्व काय होतें व कोणत्या विकट प्रतिपक्षाशीं सामना देऊन ह्या निवडणुकी प्रां. पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें डॉ. खरे यांना जिंकावयाच्या होत्या व अखेरीस त्या त्यांनीं जिंकून दाखविण्यामध्यें कॉंग्रेसची या प्रांतांत केवढी अपूर्व प्रतिष्ठा वाढविली हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

# कॉंग्रेसनें मंत्रिपदें स्वीकारलीं

## प्रांतीय वैचित्र्य व भिन्नता

ह्याप्रमाणें निवडणुकीची दंगल तर आटोपली. निवडणुकींतील अपूर्व यशामुळें वऱ्हाड-मध्यप्रांत व महाकोशलमधील सर्वच कॉंग्रेस कार्यकर्त्यांना निरतिशय आनंद झाला असणें स्वाभाविक आहे. ह्या आनंदातिशयांत क्षणकाल त्यांच्यांतील मतभेद विलयास गेल्यासारखे वाटले तरी पुन्हा लवकरच ते डोकें वर काढू लागले. मतभेद कोणांत असत नाहींत! मतभेद नाहींत अशी एक तरी संस्था पृथ्वीच्या पाठीवर सांपडेल काय? पण, प्रामाणिक मतभेद असूनही त्यांना एका विशिष्ट मर्यादेची आवर घालणें हेंच त्या संस्थेंतील सदस्यांच्या बुद्धिमत्तेचें लक्षण असतें. कॉंग्रेसमध्येंही अनेक प्रकारचे मतभेद होते व आहेत. ह्या प्रांतापुरतेंच बोलावयाचें झाल्यास नॉन रेग्युलेशनच्या सदराखालीं मध्यप्रांताचें टिगळ जेव्हां महाकोशलसारख्या हिंदीभाषी प्रांतास जोडण्यांत आलें व पुढें निजामाकडून घेऊन वास्तविक भोंसल्यांचा असलेला वऱ्हाडप्रांत वहिवाटीसाठीं ब्रिटिश सरकारनें आपल्या अमलाखालीं घेतला व राज्यकारभाराच्या दृष्टीनें हाही एक तुकडा मध्यप्रांताच्या या विभागास जोडण्यांत आला, तेव्हां साहजिकच हा प्रांत म्हणजे तीन मोठमोठ्या तुकड्यांचें एक वस्त्र बनवावें तसा बनला. आणि अनेक भिन्न हितसंबंधांची खिचडी या प्रांतामध्यें निर्माण झाली. हिंदी भाषी लोकांचा गट या नात्यानें हिंदी विभागाचे हितसंबंध वऱ्हाड-नागपूरच्या आठ जिल्ह्यांतील मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या हितसंबंधाहून निराळे असावे हें साहजिक आहे; पण, मराठी बोलणाऱ्या विभागांतील सर्वच लोकांचे हितसंबंध अथवा हिंदी विभागांतील सर्वांचे हितसंबंध तरी एकसारखे कोठें आहेत? वऱ्हाड आणि नागपूर ह्यांतील लोकांतही हितसंबंधांच्या दृष्टीनें भिन्नता आहेच. तशीच छत्तीसगड व नर्मदा विभागांतील लोक अथवा नेमाडसारख्या गुजराथ, खानदेश व वऱ्हाडच्या सरहद्दीवरील जिल्ह्यांतील लोक व महाकोशलचे इतर लोक यांचे हितसंबंध तरी एकसारखे कोठें आहेत? अशा तऱ्हेनें मौलिक हितसंबंध भिन्न असल्यामुळें ह्या प्रांतांत सार्वजनिक हिताचा विचार करणाऱ्या लोकांच्या दृष्टिकोनांतही या भिन्नतेचें प्रतिबिंब उमटणें स्वाभाविक आहे. अर्थात कॉंग्रेसमध्येंही त्या भिन्न दृष्टिकोनाचे लोक एकत्र झाले होते व आहेत, यांत शंका नाहीं.

**हंगामी मंत्रिमंडळें**

परंतु जोंपर्यंत केवळ परकी सत्तेशीं भांडणें येवढाच समान उद्देश सर्वांच्या समोर होता, तोंपर्यंत 'अन्यैःसह विरोधे तु वयं पंचाधिकं शतम्' ह्या न्याया-प्रमाणें ते एकजुटीनें वागून ब्रिटिश सरकारशीं भांडले आणि त्यांत निवडणुकीच्या रूपानें त्यांनीं आपल्या समान शत्रूला पराभूत करून अभूतपूर्व असें यशही मिळवून दाखविलें. पण, नंतर जेव्हां अधिकाराचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हां पुन्हा हे मतभेद डोकें वर काढूं लागलेंच. कॉंग्रेसश्रेष्ठींनीं नवीन सुधारणांच्या सर्व बाबतींत आपलीं सूत्रें मोठ्या कुशलतेनें हालविलीं यांत शंका नाहीं. महात्माजींच्या वर्चस्वाखालीं असलेली कांग्रेस पूर्वीप्रमाणेंच निवडणुकीच्या दंगली-पासून अलिप्त राहील असा असलेला सार्वत्रिक समज प्रथम खोटा ठरला. खुद्द महात्माजींनींच 'Parliamentary mentality has come to stay' अशी निःसंदिग्ध घोषणा करून सामान्य जनतेचीं मतें सत्ताकेंद्रापासून जीं पराङ्मुख झालीं होतीं, तीं स्वतःच्या हातानेंच अभिमुख करून दिलीं. परंतु, ह्यानंतर कॉंग्रेसनें जरी निवडणूक लढविली असली व तींत तिला असामान्य यशही मिळालें असलें तरी जो कायदा मोडून पाडण्याचं कंकण तिनें बांधलें होतें, त्यानेंच निर्माण केलेल्या कायदेमंडळांतील अधिकाराच्या जागा राबविण्या-बाबत आपल्या मनाचा कल कॉंग्रेसश्रेष्ठींनीं प्रारंभीं बिलकूल लागूं दिला नाहीं. अधिकारपदें घ्यावींत कीं घेऊं नये ह्याविषयीं एक मोठें वादळ देशांत प्रथम उठूं देण्यांत आलें आणि नंतर आकस्मित रीतीनें मंत्रिमंडळें बनविण्याचे आदेश सोडण्यांत आले. गव्हर्नरांकडून अडथळा न येतां मंत्रिमंडळाला प्रांतिक स्वायत्ततेचा निर्वेधपणें उपयोग करतां येईल अशा प्रकारचें आश्वासन ब्रिटिश सरकारकडून खुद्द महात्माजींनीं मागितलें व हें आश्वासन येईपर्यंत सुमारें तीनचार महिने मंत्रिमंडळाचा डाव तसाच कुजत ठेवला. सरकारनेंही शक्य तितकें ताणून धरण्याचा प्रयत्न केला. हंगामी मंत्रिमंडळें तर त्यांनीं बनविलींच. आपल्या हातांतील कळसूत्रीं बाहुलीं ह्या मंत्रिमंडळावर सरकारनें बसविलीं. त्यांच्या हातूनही देशहिताचीं कामें होऊं शकतात असे देखावे निर्माण केले. परंतु, ह्या देखाव्यांनीं जनता बिलकुल भाळली नाहीं.

कायदेमंडळांतील बहुमताच्या विरुद्ध बनलेलीं मंत्रीमंडळें हीं जनतेचीं प्रातिनिधिक नव्हत; म्हणून त्यांच्या निषेधप्रदर्शक सभांचा देशभर एकच कल्लोळ उठला. ह्या प्रांतांतही अशा प्रकारच्या सभा सर्व ठिकाणीं झाल्या. खुद्द नागपुरास टौन हॉलच्या पटांगणांत डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखालीं प्रचंड जाहीर सभा भरून तींत सर मोरोपंत जोशी यांच्यासारख्या प्रांतांतील मवाळ पक्षाच्या अध्वर्युनींही भाग घेऊन मंत्रीमंडळाचा निषेध केला. हंगामी मंत्री-मंडळांतील सदस्य कै. डॉ. इ. राघवेंद्रराव, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. रिझवी आणि अहेरीचे जमीनदार राजे धर्मराव भुजंगराव हे होते. परंतु त्यापैकीं कोणासच सामान्य जनतेचा तर पाठींबा मिळवितां आला नाहींच; पण, कायदे-मंडळाची बैठक भरून त्यांस त्यांना तोंडही देतां आलें नाहीं.

मध्यंतरीच्या काळांत आपण मंत्रीपदांचा स्वीकार करणार किंवा नाहीं या वादाच्या परिणामस्वरूप काँग्रेसश्रेष्ठींनीं प्रांतोप्रांतींच्या कायदेमंडळांत आपल्या पक्षाच्या पुढाऱ्याची निवड करण्यांत यावी असें फर्मान काढलें आणि नागपूर येथें कायदेमंडळांतील काँग्रेस सदस्यांची सभा होऊन डॉ. खरे यांची पुढारी म्हणून निवड करण्यांत आली.

**काँग्रेस आमदारांचा मेळावा**

प्रांताप्रांतांतून निवडून आलेले कायदेमंडळांतील काँग्रेस सदस्य हे काँग्रेसशीं, काँग्रेसच्या ध्येयाशीं, काँग्रेसच्या धोरणाशीं व काँग्रेसश्रेष्ठी पार्लमेंटरी बोर्डाच्या मार्फत वेळोवेळीं जे आदेश सोडतील त्यांशीं, एकनिष्ठ रहावें म्हणून दिल्लीस त्या सर्वांचें एक कन्व्हेन्शन भरविण्यांत आलें. वस्तुतः ह्या सर्व सदस्यांना कायदेमंडळाच्या पहिल्या बैठकीस हजर राहतांनाच राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागणार होती. परंतु आपल्या सामर्थ्याचें व भारताच्या कारभाराची केंद्रीय सत्ता यापुढें काँग्रेसमध्येंच अंतर्हित आहे, ह्या विशिष्ट गोष्टीचें निदर्शन करण्यासाठीं म्हणूनच मुद्दाम हा मेळावा भरविण्यांत आला होता असें म्हटलें तरी चालेल. दिल्लीच्या ह्या मेळाव्याचा सर्वच सोहळा मोठा गंभीर व उद्बोधक झाला यांत शंका नाहीं. पण, ह्या ठिकाणीं त्याचा विशेष निर्देश करण्याचें प्रयोजन असें कीं, कायदेमंडळांतील कांग्रेसपक्षाच्या प्रांतोप्रांतीच्या पुढाऱ्यांना कांहीं

खास गुप्त आदेश (Instrument of Instructions) देण्याचेंही याच वेळीं योजण्यांत आलें होतें. ह्या असल्या आदेशान्वयेंच बादशहा आपल्या गव्हर्नरांना सत्ताप्रदान करीत असतो. त्याचप्रमाणें काँग्रेसनेंही जनतेच्या पाठिंब्यावर मिळविलेली सत्ता दिल्लीसारख्या राजधानीच्या नगरींतच वरील आदेशान्वयें प्रत्येक प्रांतांतील काँग्रेसपक्षाच्या पुढाऱ्याच्या हातांत देण्याचें गंभीर व परिणामकारक निदर्शन घडवून आणलें होतें. मध्यप्रांतातर्फे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हातून काँग्रेसश्रेष्ठींचे हे गुप्त आदेश ग्रहण करण्याचें कार्य अर्थात डॉ. खरे यांच्यावर पडलें हें न सांगतांही कळण्यासारखें आहे; आणि त्यांनींही ह्या गंभीर विधीची दीक्षा तितक्याच गंभीरपणानें ग्रहण केली.

**सरकारनें महात्माजींची मागणी मंजूर केली**

मंत्रीमंडळांच्या कारभारांत गव्हर्नरांनीं उठल्याबसल्या, हस्तक्षेप करूं नये ही महात्माजींची मागणी अखेरीस मंजूर करणें ब्रिटिश सरकारला भाग पडलें. ब्रिटिश सरकार तर्फे हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं त्याप्रमाणें एक विस्तृत पत्रक काढून अशा प्रकारचा हस्तक्षेप करण्यांत येणार नाहीं असें स्पष्टपणें जाहीर केलें. परंतु त्यापूर्वीं दिल्लीचें कन्व्हेन्शन झाल्यानंतर प्रांतोप्रांतींच्या कायदेमंडळांतील बहुमतवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यांना त्या त्या प्रांताच्या गव्हर्नरानें आपल्या भेटीस बोलाविलें होतें आणि ते मंत्री-मंडळ बनवितील काय अशी पृच्छा केली होती. सर्व हिंदुस्थानांत मध्यप्रांताच्या गव्हर्नरनें प्रथम डॉ. खरे यांस आपल्या भेटीस बोलाविलें; परंतु, त्या भेटींत डॉ. खरे यांनीं गव्हर्नर सर हाइड गोवन यांना काँग्रेसश्रेष्ठींच्या आदेशानुसार असा खडखडीत जबाब दिला कीं, माझ्या कारभारांत तुमच्याकडून कोणत्याहि प्रकारचा हस्तक्षेप होणार नसेल तरच मी मंत्रीमंडळ बनवीन. अर्थात् जोंपर्यंत वरिष्ठ सरकारचें या बाबतींत फर्मान सुटलें नव्हतें तोंपर्यंत कोणत्याही प्रांताचा गव्हर्नर झाला म्हणून तो तरी काय करू शकणार? म्हटलेंच आहेना— 'नृत्यति पिनाकपाणौ नृत्यन्ति अन्येपिभूत वेतालाः' म्हणजे शंकरानें स्वतः डमरू हातांत घेऊन नृत्य सुरू केलें म्हणजेच त्याचे भूत, वेताळ इत्यादि गणही नाचू लागतात. अर्थात् खुद्द व्हॉइसरॉयनेंच जेव्हां वरील अभिवचनाची घोषणा

केली तेव्हां प्रांतोप्रांतीच्या गव्हर्नरांनींही ह्या अभिवचनांची खैरात मांडली व परिणामत: कॉंग्रेसचीं मंत्रीमंडळें सर्वत्र बनूं शकलीं. कॉंग्रेसचें पहिलें मंत्रीमंडळ सर्वांत आधीं बनविण्याचा मान या प्रांतांत डॉ. खरे यांनींच मिळविला.

**डॉ. खरे यांना पाचारण**

मध्यप्रांत कायदेमंडळांतील बहुसंख्य पक्षाचे पुढारी या नात्यानें मंत्रीमंडळ बनविण्याची जबाबदारी वस्तुत: डॉ. खरे यांचेवरच पडत होती. आणि सनदशीर पद्धतींतील हें तत्व ओळखून गव्हर्नरांनींही त्यांसच आपल्या भेटीस बोलावून हें कार्य पार पाडण्यास सांगितलें होतें. परंतु, ह्या प्रांताचा वैधानिक चळवळीचा इतिहासच असा कांहीं विचित्र आहे कीं, इतरत्र रूढ वैधानिक पद्धतीहून निराळ्या प्रकारचीं उदाहरणें या प्रांतांत घडून आलीं आहेत. बहुमतवाल्या पक्षाच्या पुढाऱ्यानेंच मंत्रीमंडळ बनविलें पाहिजे हा सनदशीर कार्यपद्धतींतील संकेत ह्या प्रांतांत पूर्वीं तंतोतंत पाळण्यांत आला नाहीं. त्यामुळें पक्षाचा पुढारी वेगळा आणि पक्षानें दिलेला मंत्री वेगळा असे देखावे या प्रांतांत निर्माण झाले होते. उदाहरणार्थ नायडू पंजाबराव मंत्रीमंडळ कोलमडून पडल्यानंतर जें मंत्रीमंडळ बनविण्यांत आलें, त्यांत शेतकरी पक्षातर्फे त्या पक्षाचे पुढारी, डॉ. पंजाबराव देशमुख हे असूनही श्री. विठ्ठल बंधुजी चौबळ यांची मंत्रीपदीं योजना होऊं शकली होती. वरीलसारखे दाखले या प्रांताच्या कायदेमंडळाच्या इतिहासांत घडलेले असल्याकारणानें कॉंग्रेसचें मंत्रीमंडळ बनविण्याचा प्रसंग जेव्हां प्रत्यक्ष येऊन ठेपला, तेव्हां प्रधानमंत्री-पदासाठीं हपापलेल्या व्यक्तींकडून व त्यांच्या अनुयायांकडून हेच दाखले पुढें करून असें म्हणण्यांत येऊ लागलें कीं, कायदेमंडळांत कॉंग्रेसपक्षाचे पुढारी म्हणून डॉ. खरे यांनींच रहावें. पण, मंत्रीमंडळ बनविण्यास मात्र कोणास सांगावें याबद्दल पक्षाचा पुनरपि आदेश घ्यावा. हा वाद उपस्थित झाला नसता तरी निरनिराळे मंत्री, कायदेमंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, पक्षाचे चिटणीस इत्यादि पदांवर पक्षातर्फे निवडणुकी करण्यासाठीं पक्षाची सभा भरविणें अपरिहार्यच होतें.

**कॉंग्रेसपक्षाची सभा**

त्याप्रमाणें नागपुरास डॉ. खरे यांच्या बंगल्यावरच कॉंग्रेसपक्षाची सभा

बोलावण्यांत आली. ही सभा जरी वस्तुतः निव्वळ कायदेमंडळांतील काँग्रेस सदस्यांचीच असावयास पाहिजे होती, तरी काँग्रेसच्या विशिष्ट घटनेमुळें कायदे-मंडळाबाहेरील इतर अनेक प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांनाही ह्या सभेच्या कामकाजासाठीं बोलावणें क्रमप्राप्त झालें होतें. वऱ्हाड, नागपूर व महाकोशल या तिन्ही प्रांतांचे मिळून कायदेमंडळाच्या कामकाजासाठीं जरी एकच पार्लमेंटरी बोर्ड बनविण्यांत आलेलें असलें, तरी या तीन प्रांतांच्या तीन स्वतंत्र प्रांतिक काँग्रेस कमिट्या असल्यानें त्या कमिट्यांचे अध्यक्षही पार्लमेंटरी बोर्डावर आपला थोडाफार अधिकार सांगू लागले होते. शिवाय, प्रांतिक कांग्रेस कमिटीच्या अध्यक्षांच्याही पलीकडे लोकप्रिय असलेले असे कांहीं लोकविख्यात पुढारी होतेच. आणि त्यांनाही या बाबतींत वगळतां येण्यासारखें नव्हतें. अशा तऱ्हेनें काँग्रेसच्या विशिष्ट घटनेमुळें कायदेमंडळाबाहेरील प्रभावी काँग्रेसपुढाऱ्यांचे हितसंबंध ह्या सभेशीं निगडित झालेले होते. वस्तुतः विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी हे वगळले तर वीर वामनराव जोशी, सेठ गोविंददास, सेठ जमनालालजी बजाज इत्यादि प्रांतांतील प्रमुख काँग्रेसनेतेही पक्षाच्या पुढाऱ्यानेंच मंत्रीमंडळ बनवावें ह्या गोष्टीस अनुकूल होते. वस्तुतः एका परीनें डॉ. खरे यांची स्थिति मोठी चमत्कारिक होती. तसें म्हटलें तर ब्राह्मणेतर मंडळींचा त्यांस पाठींबा मिळण्यासारखा नव्हता. मारवाडी सदस्यांनीं (ह्यांचीही संख्या कांहीं कमी नव्हती) श्री. बियाणी सांगतील त्या उमेदवारास पाठींबा दिला असता तर त्यांसही कोणी फारसा दोष दिला नसता. हिंदी लोकांचें तर जाणूनबुजून म्हणणें असेंच होतें कीं, ज्याअर्थी सबंध कायदेमंडळांतच नव्हे तर काँग्रेसपक्षांत देखील आमच्याच प्रांतांतील सदस्यांचें बहुमत आहे, त्याअर्थी प्रधानमंत्रीपदाची माळ महाकोशलीय पुढाऱ्याच्या गळ्यांत पडणेंच रास्त होय. आणि हें त्यांचें म्हणणें अगदींच अयुक्तिसंगत होतें असें लोकशाहीप्रधान राजकारणाचा परिचय असलेला इसम तरी म्हणणार नाहीं. ह्या दृष्टीनें पाहतां डॉ. खरे यांच्या पाठीमागें कितीसे व कोणते अनुयायी उरले असते ? शिवाय अनुयायी पैदा करण्याच्या बुद्धीनें त्यांनीं कधींच अनुयायी मिळविले नव्हते. परंतु, अशाच मोक्याच्या परिस्थितींत

ते बसलेले होते कीं, पक्षाच्या पुढारीपणाची माळ आपोआपच त्यांच्या गळ्यांत येऊन पडलेली होती. आणि एकदां याप्रमाणें त्यांना पुढारी निवडल्यानंतर, प्रांतांतील पूर्वीचे दाखले कसेही असले तरी लोकशाहीच्या सिद्धान्ताला अनुसरून पक्षाच्या पुढाऱ्याकडेच प्रधानमंत्रीपदाचा मान गेलाच पाहिजे, असा आग्रह धरण्याइतका नि:पक्ष समंजसपणा वीर वामनराव जोशी, सेठ गोविंददास इत्यादि पक्षाबाहेरील काँग्रेस पुढारी व बॅरिस्टर रामराव देशमुख, पं. द्वारकाप्रसाद मिश्रा, इत्यादि पक्ष सदस्य यांनीं व्यक्त केला होता.

**प्रधानमंत्रीपदाची निवडणूक**

काँग्रेसच्या राजकारणांत अद्यापि मतभेदांतूनही संस्थेचें हित पाहण्याची दृष्टि नाहींशी झालेली नव्हती. आणि म्हणूनच अर्ध्या तासापूर्वी प्रधानमंत्रीपदासाठीं स्वत: उमेदवार असलेले व त्याप्रमाणें खटपट चालविलेले रायपुरचे वयोवृद्ध पुढारी पं. रविशंकर शुक्ला यांनींही अखेरच्या घटकेला आपला आग्रह बाजूला सारून पक्षाच्या सभेंत स्वत: डॉ. खरे यांनाच प्रधानमंत्री निवडण्याला संमति दिली व तो ठराव एकमतानें टाळ्यांच्या गजरांत मंजूरही झाला. अशा रीतीनें पक्षाचा पूर्ण पाठिंबा मिळवून डॉ. खरे प्रधानमंत्रीपदावर ता. १४ जुलै १९३७ रोजीं आरूढ झाले. त्यांनीं यानंतर जबलपुरचे पं. द्वारकाप्रसाद मिश्रा, शिवनीचे पं. दुर्गाशंकर मेहता, रायपुरचे पं. रविशंकर शुक्ला, उमरावतीचे बॅरिस्टर रामराव देशमुख, अकोल्याचे श्री. दादासाहेब गोळे आणि नागपुरचे बॅरिस्टर युसफ शरीफ या सहा जणांना आपले सहकारी निवडले.

आशेप्रमाणेंच सत्तेचीही 'यथाबद्धा: प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पंगुवत्' अशीच स्थिति आहे. सत्तेच्या शृंखलेनें बद्ध झालेलें हिंदुस्थानचें राजकारण पुढें जाऊं शकेल; पण, या शृंखलेपासून मुक्त असलेलें म्हणजेच असहकाराचें राजकारण स्थगित होईल अशी परिस्थिति देशांत निर्माण झाल्यामुळेंच सत्ताग्रहणाच्या या कार्यक्रमास काँग्रेसनें हात घातला व महात्माजींनींही त्यास आपला आशीर्वाद दिला. परंतु परकी सत्तेशीं असहकारितेच्या किंवा कायदेभंगाच्या रूपानें झगडा, ही जोंपर्यंत फक्त त्यागाची, कष्टाची, फटक्यांची अथवा तुरुंगवासाचीच बाब होती, तोंपर्यंत एकजिनसी व अनन्यस्वातंत्र्यप्रिय अशा लोकांतील

मनुष्यस्वभावसुलभ अशा हलक्या भावनांना डोकें वर काढण्यास फारसा अवकाश नव्हता. स्पर्धा, असूया इत्यादि विकारांना त्यांत फारसा अवकाश मिळूं शकत नव्हता अथवा मिळालाच तर अधिक त्याग कोण करतो, अधिक कष्ट कोण सोसतो, अधिक देहदंड कोण भोगतो, असल्याच बावतींत मिळण्यासारखा होता. त्यामुळें ही स्पर्धा देशहिताला बाधक न ठरतां साधकच ठरण्यासारखी होती.

**सत्ताग्रहणाचा उद्देश**

परंतु राजकारणाचें हें स्वरूप पालटून जेव्हां परकी सत्तेनें निर्माण केलेलीं सत्ताकेंद्रें—ग्रामपंचायतीपासून प्रांतिक मंत्रिमंडळापर्यंतचीं यच्चयावत सत्ताकेंद्रें—परकी सत्तेवर हल्ला चढविण्याच्या माऱ्याचे बुरुज म्हणून काबीज करण्याचा आणि त्याबरोबरच आणा दोन आणे कां होईना, पण ह्या सत्तेचा उपयोग करून जनहित साधण्याचा प्रसंग प्राप्त झाला तेव्हां अर्थातच काँग्रेसमधील सर्वच देशभक्तांच्या खऱ्या कसोटीची परीक्षा उत्पन्न झाली. सत्तेचें आमिष समोर दिसूं लागल्यानंतर मनुष्यस्वभावास अनुसरून अनेक आशाळभूतांच्या तोंडास पाणी सुटलें असल्यास नवल नाहीं. आजपर्यंत तुरुंगाच्या कोठडींत दडून बसलेला काँग्रेसजनांचा स्वार्थ सत्ताग्रहणाच्या ह्या कार्यक्रमांत बऱ्याच दिवसांच्या उपाशी असलेल्या खादाड माणसाच्या भूकेप्रमाणें फोफावेल आणि त्यामुळें परिणामत: परकी सत्तेशीं लढण्यासाठीं काँग्रेसचें बळ वाढण्याऐवजीं तें उलट क्षीण मात्र होईल असाही एक धोका या सत्ताग्रहणांत होताच. परंतु जर देहदंड, तुरुंगवास, असहकारिता, कायदेभंग इत्यादि मार्गांचें अंतिम उद्दिष्ट स्वातंत्र्यसंपादन म्हणजेच आपल्या देशाची सत्ता आपल्याच देशांतील लोकांच्या हातीं मिळवून देणें हें असेल, तर केव्हांना केव्हां सत्ताग्रहणाचा हा प्रयोग करून पहाणें आणि सत्ता राबविण्याच्या कामाचें आपल्या देशबांधवांना शिक्षण देणें, ही गोष्ट मिळविलेलें स्वराज्य राखण्याच्या आणि स्वराज्यही सुराज्य बनविण्याच्या दृष्टीनें आवश्यकच होतें. हा प्रयोग करून पहिल्याशिवाय काँग्रेसभक्तांतील कलदार रुपये कोणते व बद्दू कोणते ह्याचाही प्रत्यय आला नसता. आणि ह्या दृष्टीनें स्वराज्याची अंतिम पायरी गांठण्याच्या पूर्वीच केव्हां तरी हा प्रयोग होऊन जाणें इष्ट व आवश्यकही होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. काँग्रेसच्या सत्ताग्रहणाचा

अल्पकालीन कां होईना पण इतिहास पहिला म्हणजे मनुष्यस्वभाव—ज्याचे बरेवाईट गुण सर्वत्र सारखेच असतात—ध्यानांत घेऊनहि अधिक चांगल्या रीतीनें सत्ता कशी राबवावी ह्याचा उत्तम अनुभव मिळाला असेंच म्हटलें पाहिजे. अर्थात् ह्या कार्यक्रमांतील खांचखळगे कॉंग्रेसलाही लागलेच व ते ओलांडूनच तिला पुढें जावें लागलें. अशा प्रकारच्या खांचखळग्यांतूनच प्रस्तुत चरित्रनायकाचें नांव ज्यामुळें सर्वतोमुखीं झालें, त्या 'खरे प्रकरणा'चा उगम झालेला आहे.

उपरिनिर्दिष्ट 'खरे प्रकरणा'वर एकदमच उडी मारण्यापूर्वी प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे यांनीं केलेल्या कामगिरीचाही संक्षेपतः परामर्श घेणें अवश्य आहे.

## स्वायत्त कायदेमंडळाचें पहिलें अधिवेशन

भारतवर्षांतील निम्याहून अधिक भागांत प्रांताप्रांतांतून कॉंग्रेसचीं मंत्रीमंडळें स्थापन झाल्यामुळें हिंदी जनतेच्या हृदयसागराला अलोट प्रेमाचें प्रचंड भरतें आल्याचा देखावा सर्व ठिकाणीं दिसूं लागला. आपल्या प्रांतांत कॉंग्रेसनें राज्यशासनाचे वाग्दोर हातीं घेतलेले आहेत आणि कॉंग्रेस मंत्री-मंडळाच्या राजवटींत आपलें साक्षात् असें फारसें कल्याण न झालें, तरी आपल्या निःसीम प्रेमाचें निधान असलेली कॉंग्रेस राज्यपदावर आरूढ होऊं शकते, ह्या एकाच कल्पनेनें वऱ्हाड-मध्यप्रांतांतील समस्त नागरीक हर्षोत्फुल्ल झालेले दिसत होते. ३० जुलै १९३७ रोजीं दुपारीं २ वाजतां वऱ्हाड-मध्यप्रांताच्या स्वायत्त कायदेमंडळाचें कॉंग्रेस राजवटींतील पहिलें अधिवेशन बोलावण्यांत आलें होतें. आणि ह्याच वेळीं जनतेच्या वरील हर्षोत्फुल्ल भावनेस अभिव्यक्त स्वरूप प्राप्त होणें स्वभाविक होतें. सर्वत्र प्रांतांतून निवडक निवडक व उत्साही कार्यकर्ते आपल्या मंत्र्यांचें सभागृहांतील उपनयन पाहण्यास जमलेले होते. जनतेचा उत्साह एकदां उचंबळून आला म्हणजे सागरास मिळणाऱ्या गंगामुखाप्रमाणें हजारों हातांनीं, हजारों मुखांनीं व हजारों मार्गांनीं तो प्रगट होऊं लागतो. असें म्हणतात कीं, परमेश्वराची स्तुति सहस्रमुख शेष आपल्या हजारों मुखांनीं करतो तरी ती पुरी होत नाहीं. एका दृष्टीनें जनतेचें 'पांचा-

मुखीं परमेश्वर' या न्यायानें परमेश्वराशींच साम्य आहे. ईशस्तवनाप्रमाणें जनताजागृतीचें कार्यही प्रथम सहस्र मुखानेंच व्हावें लागतें. हजारों नि:स्वार्थ कार्यकर्त्यांचे देह जेव्हां चंदनाप्रमाणें झिजूं लागतात आणि त्यांच्या हजारों जिव्हा जेव्हां शेषनागाप्रमाणें सहस्रावधि प्रकारांनीं जनताजनार्दनाची आळवणी करतात, तेव्हांच जनतारूपी परमेश्वरही जागृत होऊन प्रसन्न होतो. एकदां जनता अशा रीतीनें जागृत झाली म्हणजे तिच्या जोमाचा, तिच्या उत्साहाचा, तिच्या कर्तृत्वाचा, तिच्या आकांक्षांचा आणि तिच्या सामुदायिक क्रियाशीलतेचा जो प्रचंड परिस्फोट वडून येतो, त्याच्या धक्क्यानें शेंकडों वर्षांचीं वद्धमूल असलेलीं साम्राज्यसिंहासनें सुद्धां डळमळूं लागतात आणि त्या सिंहासनावर अधिष्ठित असलेले साम्राज्याधिपति स्वत:विषयींच्या भविष्यकाळाच्या चिंतेनें ग्रस्त झालेले दिसूं लागतात. जनजागृतीचा हा प्रचंड कल्लोळ १९२० किंवा ३० सालच्या सामुदायिक चळवळीच्या रूपानें जितका दिसून आला, तितकाच किंवहुना त्याहून कांकणभर अधिकच तो १९३६ च्या निवडणुकींत व त्या नंतर काँग्रेस मंत्र्यांच्या अधिकारग्रहणाच्या प्रथम दिवशीं सुद्धां दिसून आला.

**कायदेमंडळ सदस्यांची प्रचंड मिरवणूक**

काँग्रेसच्या अधिकारग्रहणामुळें हर्षभरित झालेल्या जनतेनें ता. ३० जुलै रोजीं स्वायत्त कायदेमंडळाच्या पहिल्या अधिवेशनास हजर होणाऱ्या काँग्रेससदस्यांची व मंत्र्यांची प्रचंड मिरवणूक काढली. नागपुरच्या ह्या मिरवणुकीचा सोहळा ज्यांनीं त्यावेळीं स्वत: अवलोकन केला असेल ते तो कधींही विसरूं शकणार नाहींत. ही मिरवणूक प्रधानमंत्री डॉ. खरे यांच्याच बंगल्यावरून सुरू झाली. प्रथमत: डॉ. खरे यांच्या पत्नीनें त्यांस पंचारतिपूर्वक ओवाळून कुंकुमाक्षता लावल्या आणि नंतर ते मिरवणुकींत येऊन दाखल झाले. मिरवणुकीच्या अग्रभागीं काँग्रेस स्वयंसेवक दलाचे कप्तान श्री. भय्याजी सहस्रबुद्धे अश्वारूढ होऊन काँग्रेसचा तिरंगीध्वज फडकवीत चालत होते. त्यांच्यामागें ध्वजधारी सायकल स्वारांचें पथक, त्याच्या मागें टिळक विद्यालयाचा बँड, त्याच्यामागें खादीवस्त्रधारी देशसेविकांचें पथक याप्रमाणें बिनीची रचना होती. मधोमध प्रधानमंत्री डॉ. खरे व त्यांचें संपूर्ण मंत्रीमंडळ आणि नागपूर

नगर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. गजाननराव ढवळे, नंतर सर्व आमदार मंडळी व त्यांच्या पाठीमागें अफाट जनसमुदाय अशा प्रकारची ही मिरवणूक सजलेली होती. स्वायत्त कायदेमंडळाचें पहिलें अधिवेशन आणि कॉंग्रेस मंत्रीमंडळाचें पहिलें अधिकारग्रहण या निमित्तानें त्या दिवशीं नागपुरांतील सर्व सरकारी व निमसरकारी शाळांकॉलेजांना सुटी देण्यांत आलेली होती. मिरवणूक जसजशी कायदेमंडळाच्या सभागृहाकडे जाऊं लागली तसतसा जनसमुदाय अधिकाधिक वाढत गेला. वाटेंत ठिकठिकाणीं प्रधानमंत्री डॉ. खरे व त्यांचे सहकारी यांना पुष्पहार समर्पण करून त्यांचा सत्कार करण्यांत आला.

## कायदेमंडळाच्या प्रांगणांत राष्ट्रीय ध्वज

कायदेमंडळाबाहेरील विस्तीर्ण प्रांगणांत ही मिरवणूक जाऊन पोंचल्यावर त्या ठिकाणीं प्रधानमंत्री डॉ. खरे ह्यांनीं तिरंगी राष्ट्रीय ध्वज उभारून त्यास अभिवादन केलें. त्याच वेळीं श्री. पी. एम. नायडू यांनीं डॉक्टरसाहेबांच्या कोटावर तिरंगी निशाण लावलें व ह्या समयोचित घटनेचा प्रचंड टाळ्यांचा गजर करून जनतेनेंही मोठा आदर केला. ध्वजाभिवंदन झाल्यानंतर त्याच ठिकाणीं मिरवणुकीचें प्रचंड जाहीर सभेंत रूपांतर करण्यांत आलें. ह्या सभेचे अध्यक्ष या नात्यानें नागपूर नगर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. गजाननराव ढवळे यांनीं नागपुरास घडलेल्या पूर्वोक्त झेंडा सत्याग्रहाच्या संस्मरणीयतेची जनतेस आठवण करून दिली. ते म्हणाले, "हा तिरंगी ध्वज आहे. एकेवेळीं यास अभिवंदन करणाऱ्या लोकांस तुरुंगांत जावें लागत असे. आज तोच ध्वज त्याच सरकारनें निर्माण केलेल्या कायदेमंडळाच्या सभागृहासमोर फडकत असलेला आपणास दिसत आहे. लवकरच तो समुद्रवलयांकित भारतभूमीच्या चतु:सीमांवर फडकत असलेला दिसून येईल. आजच्या प्रसंगीं आमचा हा पवित्र व आदरणीय ध्वज आम्ही कॉंग्रेसमंत्र्यांच्या व कायदेमंडळ सदस्यांच्या स्वाधीन करीत आहोंत. त्याचा मान राखणें हें यापुढें सर्वस्वी त्यांच्याच स्वाधीन आहे."

## वंदेमातरंनें अधिवेशनास प्रारंभ

सभागृहाबाहेरील दृश्याप्रमाणेंच अधिवेशनास प्रारंभ होतांना सभागृहाच्या आंतील दृश्यही मोठें गंभीर व भावनोत्पादक होतें. प्रारंभीं आमदार सौ.

अनुसूयाबाई काळे यांनीं वंदेमातरम् हें राष्ट्रगीत ध्वनिक्षेपक यंत्रावर म्हटलें. त्यावेळीं कायदेमंडळांतील हिंदु, मुसलमान, इसाई इत्यादि सर्व धर्मांचे, पंथांचे, मतांचे व पक्षांचे सभासद आदरपूर्वक उभे राहिले होते. प्रांतांतून निरनिराळ्या ठिकाणांहून आलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांनीं व काँग्रेसप्रेमी सज्जनांनीं प्रेक्षकांचा सज्जा चिकार भरला होता. सत्ताग्रहणाचें तेज प्रत्येकाच्या मुखावर विलसत होतें. हंगामी मंत्रीमंडळांत समाविष्ट झालेले पण काँग्रेसनें पदग्रहण केल्यावरोवर आपल्या अधिकारासनावरून नुकतेच कोलमडून पडलेले माजी मंत्रीही आपल्या चेहऱ्यावरील नाटकी हास्य कायम ठेवीत असलेले पाहून गॅलरींतील प्रेक्षकांना मोठी मौज वाटत होती. स्वायत्त कायदेमंडळाच्या पहिल्या अधिवेशनाचा हा उद्‌घाटन समारंभ इतक्या विस्तारानें मुद्दाम वर्णन करण्याचें कारण येवढेंच कीं, हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासांत त्यास एक अपूर्व महत्व प्राप्त झालेलें आहे. अस्तु.

**अधिकारग्रहणाचीं प्रतीकें**

अधिकारग्रहण करण्यामध्यें काँग्रेसची भूमिका कोणती होती याचे प्रसंगोपात्त निर्देश यापूर्वीं येऊन गेलेले आहेतच. तथापि अधिकारग्रहणाचा वरील सोहळा वर्णन केल्यानंतर या भूमिकेचें थोडेसें तरी विशद विवेचन केल्याशिवाय काँग्रेस मंत्रीमंडळाच्या कारकिर्दी जशा घडल्या तशाच त्या कां झाल्या आणि विशेषत: डॉ. खरे यांच्या एक वर्षाच्या राजवटींत कांहीं विशिष्ट गोष्टीच आग्रह-पूर्वक कां करण्यांत आल्या, याचा बोध होणार नाहीं. आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, १९३५ चा घटना कायदा किती टाकाऊ आहे व त्यांतून भरीव लोककल्याण साधणें कसें अशक्य आहे आणि म्हणूनच तो मोडून पाडणें कां आवश्यक आहे, हें दाखवून देण्यासाठींच काँग्रेसनें अधिकारग्रहण केलेलें होतें. परंतु, त्यावरोबरच शक्य असेल तेथें व तेव्हां जें काय आणा अर्धाआणा लोक-हित करून दाखवितां येईल तेंही करून दाखवावें असाही त्यांत हेतू होताच. पण, त्यापेक्षांही अधिकारग्रहणाचा फायदा घेऊन काँग्रेसचीं प्रतीकें लोकप्रिय करावीं किंवहुना काँग्रेसचीं प्रतीकें म्हणजेच लोकराज्याचीं प्रतीकें होत, ही जनतेच्या मनांत निगूढ असलेली कल्पना अधिक प्रकट व दृढ करावी हा उद्देश अधिकार-ग्रहणाच्या मुळाशीं प्रामुख्यानें वसत होता. आमच्या अन्नवस्त्र स्वावलंबनाचें

प्रतीकत्व खादीला मिळालेलें आहे आणि आमचा तिरंगी ध्वज हा जातीय ऐक्य व राष्ट्रीय आकांक्षा यांचा प्रतीक बनलेला आहे, खादीचेंही प्रतीकात्मक सारसर्वस्व खादीच्या पांढऱ्या टोपींत सांठलें आहे आणि ह्या दोन प्रतीकांत अंतर्भूत असलेली जनतेची भावना ही ब्रिटिश सरकारला नेहमींच विरोधाची व अनिष्ट वाटत आलेली आहे. आजपर्यंत ज्या ज्या वेळीं जनता व सरकार यांचा संघर्ष उत्पन्न झाला त्या त्या प्रत्येक वेळेस सरकारनें जनतेच्या पुढाऱ्यांबरोबरच खादी—खादी टोपी व तिरंगी ध्वज यांवरही दडपशाहीचा हल्ला चढविलेला आहे. गांधी टोपी वापरण्याबद्दल कित्येकांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या, कित्येक ठिकाणचीं खादी-भांडारें व खादी उत्पादन केंद्रें सरकारनें उध्वस्त केलीं आणि तिरंगी ध्वज उभारणें हा गुन्हा ठरविण्यांत आला. जनतेनेंही परकी सरकार-विरोधाचें प्रतीक याच भावनेनें ह्या दोन्ही गोष्टींकडे पाहिलें आणि म्हणूनच गांधी टोपी व तिरंगी ध्वज यांच्या इभ्रतीसाठीं हजारों लोकांनीं सरकारचा छळ व नानाप्रकारचा देहदंड सोसला. एवंच, अशा तऱ्हेनें राष्ट्राचें प्रतीक बनलेल्या ह्या दोन गोष्टींचा बोलबाला कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केल्यानंतर सर्वांत प्रथम केला जाणें अपरिहार्य होतें.

**गव्हर्नरांस खादीचा अहेर**

कॉंग्रेसचे प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे जनतेच्या मनांतील ह्या भावना पूर्णपणें ओळखून होते. आणि म्हणूनच कांहीं प्रतीकात्मक अशा गोष्टी करण्याचें त्यांनीं मुद्दाम योजिलें व त्या त्यांनीं अमलांतही आणून दाखविल्या. कायदेमंडळाच्या सभागृहासमोरील पटांगणांत राष्ट्रीय ध्वजाचें अभिवंदन ही त्यांतलीच एक बाब होती. कॉंग्रेस मंत्रीमंडळाच्या कारकीर्दींत जिल्हा कौन्सिलें, लोकल-बोर्डें, म्यु. कमेट्या, ग्रामपंचायती, सॅनिटेशन कामिट्या, सहकारी पतपेढ्या इत्यादि शेंकडो निमसरकारी संस्थांच्या इमारतींवर आणि शेंकडों खाजगी संस्था व निम-सरकारी शाळा, यांच्याही इमारतींवर हा ध्वज फडकला. प्रथमतः कॉंग्रेसमंत्र्यांनीं आपापल्या बंगल्याच्या आवारांत मोठ्या समारंभपूर्वक राष्ट्रीय ध्वज आरोपित केला आणि काल त्यास विरोध करणारे, त्यास जप्त करणारे, तो फाडून त्याच्या चिंध्या करून टाकणारे पोलीस अधिकारीही, आज त्याच ध्वजापुढें

आदरानें मस्तक नम्र करूं लागले. या तिरंगी ध्वजाप्रमाणेंच काँग्रेसमंत्र्यांनीं सरकारी कामकाजाच्या वेळेचा आपला गणवेश शुभ्र खादीचा योजला आणि सर्वजण खादी टोप्या घालूनच गव्हर्नराच्या भेटीस जाणें, कायदेमंडळाच्या अधिवेशनांत बसणें, सरकारी कचेऱ्यांत काम करणें इत्यादि गोष्टी करूं लागले. खादीस आजपर्यंत ब्रिटिश सरकारनें जो विरोध केला होता, त्याच ब्रिटिश सरकारच्या खास प्रतिनिधीकडून जणुं काय परिमार्जन करण्यासाठींच आपल्या अधिकारग्रहणाच्या पहिल्याच महिन्यांत प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे यांनीं खादीभांडारांतून खादीचीं दोन ठाणें खरेदी करून तीं स्वतः मध्यप्रांताचे गव्हर्नर सर हाइड गोवन यांस भेट म्हणून ता. १३ ऑगस्ट रोजीं अर्पण केलीं. परकी सत्तेच्या कोण्या प्रतिनिधीस आपल्या पूर्वकर्मानें अशा रीतीनें आपला सूड घ्यावा ही गोष्ट पसंत पडेल ? परंतु इंग्रज लोक सभ्याचारांच्या बाबतींत मोठे नाटकी व दिखाऊ आहेत. काँग्रेसमंत्र्यांच्या दैनंदिन कारभारांत हस्तक्षेप करण्यांत येणार नाहीं असें अश्वासन वरिष्ठ सत्तेनें दिलें असल्यामुळें एका-परीनें आट्यापाट्यांच्या खेळांतील 'भावी' प्रमाणें प्रांतोप्रांतीच्या गव्हर्नरानांही कांग्रेस मंत्र्यांची 'भावी' बनून राहणें भागच पडलें. आणि एकदां 'भावी'चें नातें कबूल केल्यानंतर मग प्रधानमंत्र्यानें अर्पण केलेला खादीचा अहेर हंसत-मुखानें नाटकी प्रसन्नता दाखवून त्यांनीं स्वीकारला आणि त्याच खादीचे कपडे अंगावर घालून गव्हर्नरांची स्वारी मंत्रीमंडळाच्या बैठकीला हजर राहिली, हेंही क्रमप्राप्तच होतें. दिसायला ही बाब जरी सापेक्षतः क्षुल्लक दिसत असली, तरी दोन युद्धमान प्रतिस्पर्ध्यांच्या ज्या भावना तिच्यांत सामावलेल्या आहेत, त्या ध्यानांत घेतल्या म्हणजे गव्हर्नरांस खादी अर्पण करण्याच्या बाह्यतः क्षुल्लक दिसणाऱ्या ह्या गोष्टीचेंही रहस्य आकलन होऊं शकतें.

### दडपशाही मनोवृत्तीचें उन्मूलन

खादी व तिरंगी ध्वज याप्रमाणेंच परकी राजसत्तेला बोंचू शकेल अशी जी तिसरी गोष्ट प्रांतोप्रांतीच्या काँग्रेस मंत्रिमंडळांनीं केली, ती म्हणजे दडपशाही मनोवृत्तीचें उन्मूलन हें होय. डॉ. खरे यांना नोकरशाहीची ही मनोवृत्ति पूर्णपणें परिचित होती. त्यांनीं मध्यप्रांत ॲसेंब्लींत केलेल्या एका भाषणांत

स्पष्ट उद्गार काढले आहेत कीं, “ नोकरशाहीचीं चक्रें असलेले हे अधिकारी असे असतात कीं, ज्यांना स्वत:च्या देशांतील राजकीय परिस्थितीचा यत्किंचितही अनुभव नसतो. केवळ हिंदुस्थानांत नोकरी करण्यासाठींच शाळेंतून बाहेर पडल्याबरोबर त्यांना भरती करण्यांत आलेलें असतें. त्यांना ज्या लोकांवर अधिकार गाजवावयाचा असतो त्यांच्या भाषा व स्वभावविशेष यांचाही परिचय नसतो. त्यांना एकच गोष्ट माहीत असते आणि ती म्हणजे दंडुकेशाहीचा उपयोग कसा करावा ही होय. आणि हा उपयोग करतांना मात्र त्यांचा उत्साह मोठा प्रखर असतो.” नोकरशाहीची ही जी दडपशाही मनोवृत्ति, तिचें उन्मूलन करण्याचा प्रयत्न करणें हें कॉंग्रेस मंत्रीमंडळांचें अत्यंत महत्वाचें कार्य होतें. डॉ. खरे यांच्या मंत्रीमंडळानें कायदेमंडळांतून देशी भाषेंतून वादविवाद करण्याची प्रथा पाडून नोकरशाहीला देशी भाषा शिकावयास लाविलें. खादी वापरणाऱ्या नोकरांची प्रतिष्ठा वाढीस लावली, पोलीस इत्यादि खात्यांतून खादी वापरणें, जनतेशीं नम्र व सेवाभावानें वागणें इत्यादि प्रकारच्या अनेक सूचना व हुकूम काढले त्यांचा तरी इत्यर्थ हाच होता. आपल्या विनोदी भाषेंत डॉ. खरे यांनीं एका जाहीर सभेंत ब्रिटिश नोकरशाहीचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. ते म्हणाले, “ नोकरशाही अथवा सरकारी अधिकारी हे शचीप्रमाणें म्हणजे इंद्राणीप्रमाणें आहेत. स्वर्गाच्या अधिराज्यावर कितीही इंद्र बदलले तरी इंद्राणी कायमच राहते. त्याप्रमाणेंच ब्रिटिश राज्यांतील मंत्रीमंडळें बदललीं तरी नोकरशाही-रूपी इंद्राणी कायमच असते. आणि जो कोणी इंद्र बनून येईल त्याचा पति-भावानें स्वीकार करणें हें काम ती एकनिष्ठेनें करते.”

**इंद्र बदलले तरी इंद्राणी कायमच**

डॉ. खरे हें जाणून होते कीं, थोडें रुबाबानें घेतलें, थोडी स्वातंत्र्याची चमक दाखविली, थोडी बदलत्या काळाची जाणीव करून दिली म्हणजे कालपर्यंत ब्रिटिश सरकारच्या हुकुमावरून जनतेवर जुलुमजबरदस्ती करणारी व अरेरावी गाजवणारी हीच नोकरशाही जनहिताच्या गोष्टी करण्यास व आपण जनतेचे नोकर आहोंत अशा भावनेनें काम करण्यास प्रवृत्त होईल. नोकर-शाहीला जाहीर सभेंत इंद्राणीची मार्मिक उपमा देण्यांतला त्यांचा हेतू तरी

हाच होता. पूर्वीं आपल्या ब्रिटिश धन्यांच्या हुकुमावरून नोकरशाहीनें ज्या ज्या दडपेगिरीच्या गोष्टी केल्या असतील त्या त्या तिच्याच हातानें बदलविण्यास लावणें हा तिला वरील प्रकारची जाणीव करून देण्याचा उत्तम मार्ग होता. शिवाय, काँग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें तर पूर्वीं आपण त्याच मंत्र्यावर जे अत्याचार व जुलूम केले असतील त्यांचा सूड घेतल्याशिवाय काँग्रेसमंत्री राहणार नाहींत अशी धास्ती नोकरशाहीच्या मनांत डाचत होती. परंतु काँग्रेसमंत्री इतक्या हलक्या भावनेचे नाहींत. ते ओळखून आहेत कीं, सरकारी नोकर हे पोटाचे गुलाम असल्यामुळें वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हुकूम मान्य करणें त्यांना भाग पडलें, त्यांच्या ठिकाणीं सुद्धां देशाभिमानाचा स्फुल्लिंग असूं शकतो व त्याला अवकाश दिला तर त्याच सरकारी नोकरांच्या हातून देश-प्रेमाचीं कामें घडूं शकतात आणि ही जाणीव सरकारी नोकरांच्या मनांत उत्पन्न व्हावी व त्यांच्या मनांतील सूडाची धास्ती नाहींशी व्हावी म्हणून मुद्दाम सरकारी नोकरांना डॉ. खरे यांनीं शचीची उपमा दिलेली होती. शिवाय, त्यांच्या म्हणण्याचा हेतू असाही होता कीं, जर खरोखर नोकरवर्गाच्या मनांत एक वेळ देशप्रेम उत्पन्न झालें तर काँग्रेस मंत्रीमंडळाची राजवट बदलली तरीही सरकारी नोकरवर्ग कायमच राहत असल्यामुळें तो आपलें देशप्रेमाचें व्रत थोड्याफार अंशानें तरी पुढें चालवीलच. डॉ. खरे यांची ही कल्पना अगदींच विफल ठरली नाहीं. काँग्रेसनें अधिकार सोडल्यानंतर आतांपावेतों ह्या प्रांतांत आपल्या अत्युच्च नोकरीवर लाथ मारून व सरकारी नोकरीचा पाश तोडून श्री. एच. व्ही. कामत व श्री. आर. के. पाटील यांच्यासारखे दोन आय. सी. एस. हुद्देदार राष्ट्रीय जीवनक्रमांत समाविष्ट झाले यावरूनच दिसून येण्यासारखें आहे.

### जप्त वाङ्मयावरील बंदी उठविली

दडपशाही मनोवृत्तीच्या उन्मूलनाचा जो कार्यक्रम काँग्रेस मंत्रीमंडळानें हातीं घेतला होता, त्यांतलाच एक भाग म्हणजे जप्त झालेल्या वाङ्मयावरील बंदी उठविणें हा होता. मुद्रणस्वातंत्र्याची गळचेपी करीत असतांनाच ब्रिटिश सरकारनें उत्तम वाङ्मयांत जमा होण्यासारखीं अनेक पुस्तकें जप्त करून त्यांवर बंदी घातली होती. जेणेंकरून लोकांचा देशाभिमान प्रज्वलित होईल, त्यांच्या

स्वातंत्र्यप्रेमाला वाचा फुटेल, त्यांची देशभक्ति रंगरूप धारण करू लागेल, त्यांच्या अंतःकरणांतील भावना क्रियाशील बनतील आणि परकी सत्तेच्या विरुद्ध बंडखोरीची मनोवृत्ति त्यांच्या नसानसांतून सळसळूं लागेल अशा प्रकारचें जिवंत वाङ्मय कोणतेंही परकी सरकार जित राष्ट्रांत निर्माण होऊं देत नाहीं. सरकारी निर्बंधांचीं कांटेरी कुंपणें ओलांडून चुकून माकून असा एकादा ग्रंथ प्रसिद्ध झालाच तर दडपशाहीचा काळा कायदा त्याची मुस्कटदाबी करण्यास तयार असतोच. सामान्यतः हिंदी साहित्याच्या इतिहासांत आणि विशेषतः मराठी साहित्याच्या इतिहासांत निर्माण झालेले किती तरी उत्तमोत्तम ग्रंथ सरकारी दडपशाहीमुळें आजपर्यंत वंदीवासांत लोळत पडलेले होते. ह्या ग्रंथांवरची वंदी उठवून साहित्याच्या पवित्र क्षेत्रांतील दडपशाहीचा हा कलंक नाहींसा करणें हेंही कॉंग्रेसमंत्र्यांचें एक प्रधान कर्तव्य होतें. ता. २१ ऑगष्ट रोज़ीं मुंबईचे सुप्रसिद्ध साहित्यिक व विद्वान टीकालेखक प्राध्यापक न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखालीं विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमानें विदर्भ साहित्य संमेलनाचें सातवें अधिवेशन भरलें होतें. त्याचें उद्घाटन करण्यासाठीं प्रधानमंत्री डॉ. खरे यांस निमंत्रित करण्यांत आलें होतें. ह्या प्रसंगाचा फायदा घेऊन महाराष्ट्रांत प्रथमतःच आक्षिप्त वाङ्मयावरील बंदी उठविण्याची घोषणा करण्याचें त्यांनीं ठरविलें. यासाठीं दोन दिवंगत लेखक आणि तीन विद्यमान लेखक निवडण्यांत आले. कॉंग्रेस सर्व पक्षांच्या लोकांना मुद्रणस्वातंत्र्य देऊं इच्छिते हें दाखवून देण्यासाठीं विद्यमान लेखकांपैकीं एक कांग्रेसभक्त, एक कामगार पुढारी आणि एक हिंदुसभेचा अध्वर्यू अशीं तीन माणसें निवडण्यांत आलीं. ज्या चौदा पुस्तकांवरील बंदी उठविल्याची घोषणा प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे यांनीं यावेळीं केली तीं येणेप्रमाणें :— (१) आमच्या देशाची स्थिति ( निबंधमाला—कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ) (२) जोसेफ मॅझिनीचें चरित्र ( ले. हिंदुराष्ट्रपति बॅ. वि. दा. सावरकर ) (३) काळांतील निवडक लेख ( १० भाग, ले. कै. शि. म. परांजपे ) (४) गुन्हेगार ( ले. लालजी पेंडसे ) (५) पत्री ( काव्य-संग्रह ले. साने गुरुजी ).

ही घोषणा करीत असतांना विदर्भ साहित्य संघाचे उद्घाटक या नात्यानें डॉ. खरे यांनीं जें भाषण केलें, त्यांत ते म्हणाले, "वरील सर्व पुस्तकांवर प्रथमत: मुंबई सरकारनें बंदी बसविली होती व नंतर मध्यप्रांत सरकारनें त्याचेंच अनुकरण केलें. परंतु आतां दोन्ही प्रांतांत काँग्रेसचीं सरकारें स्थापन झालीं असल्यामुळें दोन्ही ठिकाणीं त्या पुस्तकांवरील बंदी उठण्यास प्रत्यवाय उरला नाहीं. खरे व खेर यांच्यांत फक्त एका मात्रेचाच फरक आहे. म्हणून मध्यप्रांताप्रमाणेंच मुंबई प्रांतांतही या पुस्तकांवरील बंदी लौकरच उठेल असा मला विश्वास आहे."

**गांधी-बादशाहा यांच्या भेटीचा चित्रपट**

दडपशाहीची मनोवृत्ति परकीय सरकारच्या अंत:करणांत कोणत्या थरास जाऊं शकते याचें एक उत्तम प्रदर्शन यावेळीं नुकतेंच घडून आलें होतें. दुसऱ्या गोलमेज परिषदेला महात्मा गांधी हिंदी राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून गेले असतांना त्यांची व इंग्लडचे राजे व हिंदुस्थानचे बादशहा पांचवे जॉर्ज यांची जी मुलाखत झाली तिचा व महात्माजींच्या इतर हालचालींचा एक चित्रपट घेण्यांत आला होता. वस्तुत: गोलमेज परिषद ब्रिटिश सरकारनेंच बोलाविली होती, त्यांनींच महात्माजींना निमंत्रित केलें होते, त्यांनींच बादशहांशीं महात्माजींची मुलाखत घडवून आणली होती आणि गांधी-इर्विन करारनाम्याच्या अनुसार त्यांनींच एखाद्या स्वतंत्र राष्ट्राच्या प्रतिनिधीस शोभेल अशा इम्रतीनें महात्माजींची बडदास्त ठेवली होती. आणि इतकें असूनही पुढें जेव्हां काँगेसचें व ब्रिटिश सरकारचें विनसलें तेव्हां हिंदुस्थान सरकारनें अत्यंत खुनशीपणानें वरील चित्रपटावर हिंदुस्थानांत बंदी घातली होती. विदर्भ साहित्य संमेलनांतील घोषणेच्या पाठोपाठ ता. २४ ऑगस्ट रोजीं या चित्रपटावरील बंदी उठविण्याचें श्रेयही डॉ. खरे यांनीं संपादन केलें. त्याचप्रमाणें जबलपुरचे सेठ गोविंददास यांनीं लिहिलेल्या कथानकानुसार तयार झालेल्या 'दलितकुसुम' नांवाच्या चित्रपटावरही सरकारनें बंदी घातली होती. तसेंच शिवाजीच्या चरित्रावर उभारलेल्या आणखी एका चित्रपटावर, त्यांत काँग्रेसच्या झेंडावंदनासारखाच प्रसंग घातलेला आहे; म्हणून बंदी घालण्यांत आली होती. महात्मा गांधींच्या चित्रपटाप्रमाणेंच ह्या दोन्ही

चित्रपटांवरील बंदीही डॉ. खरे यांनीं उठविली. सारांश, पूर्वीच्या राजवटींत ज्या ज्या मार्गानें दडपशाहीचा वरवंटा फिरला आणि लोकांवर जुलूम व अत्याचार करण्यांत आले, त्या त्या मार्गांतील दडपशाही मनोवृत्तींचें अशा रीतीनें उच्चाटण करण्यांत डॉ. खरे यांनीं चांगलेंच यश मिळविलें यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें प्रांतांतील कांहीं वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करण्यासाठीं त्यांच्यावर रावशाहींत जे जमानतींचें जोखड लादण्यांत आलें होतें, तेंही डॉ. खरे यांनीं काढून टाकलें व अशा रीतीनें वृत्रपत्रव्यवसायांतील लोकांचेही डॉ. खरे यांनीं धन्यवाद संपादिले.

**स्वातंत्र्यदिनाची सुटी**

कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केल्याचें प्रतीक जनमनावर आरूढ करण्याचा आणखी एक उत्तम मार्ग डॉ. खरे यांनीं शोधून काढला होता. तो म्हणजे २६ जानेवारी रोजीं सर्व सरकारी कचेऱ्यांना व शाळांना स्वातंत्र्यदिनाची सुटी देणें हा होय. वस्तुत: २६ जानेवारीच्या स्वातंत्र्यदिनीं १९३० सालापासून ब्रिटीश सरकारनें हिंदी जनतेवर अनेक प्रकारचे अत्याचार केले होते. ह्या दिवशीं पूर्ण स्वराज्याची शपथ घेण्याचा हिंदी जनतेचा समारंभ दडपून टाकण्यांत आलेला होता. आणि तो साजरा करण्याच्या धृष्टतेबद्दल अनेक देशभक्तांना लाठीमार व तुरुंगवासही सहन करावा लागला होता. त्यामुळें पूर्ण स्वराज्याची कॉंग्रेसची शपथ अत्यंत लोकादरास पात्र झाली होती. ही सर्व परिस्थिति ध्यानांत घेऊनच २६ जानेवारीच्या दिवशीं दरवर्षी सर्व सरकारी कचेऱ्यांना व शाळा-कॉलेजांना सुटी देण्याचें डॉ. खरे यांनीं योजिलें होतें. दडपशाही मनोवृत्तीचें उच्चाटन करण्याच्या कार्यक्रमांतलाच हाही एक भाग होता. डॉ. खरे यांनीं केलेला खादीचा अहेर कृत्रिम हास्य करून स्वीकारणाऱ्या गव्हर्नराचा ह्या योजनेमुळें अत्यंत जळफळाट झालेला होता. त्यास असें वाटत असावें कीं, ब्रिटिश सत्तेचें प्रतीक म्हणून मी येथें जिवंत असतांना माझा प्रधानमंत्री स्वातंत्र्याचें प्रतीक म्हणून २६ जानेवारीची सुटी घोषीत करूं इच्छित आहे, ही माझ्या दृष्टीनें केवढी लांच्छनास्पद गोष्ट आहे! डॉ. खरे यांनीं आपल्या ह्या योजनेस कॉंग्रेसश्रेष्टींचा पाठींबा मिळविण्याचीही खटपट

केली. परंतु दुर्दैवानें तो त्यांस मिळाला नाहीं. ह्या बावतींत काँग्रेसश्रेष्टींनीं आपलें म्हणणें आजपर्यंत पुढें मांडलेलें नसल्यामुळें स्वातंत्र्यदिनाच्या सुटीची डॉ. खरे यांची ही योजना त्यांनीं कां उचलून धरली नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा तिला पाठिंबा होता हें मात्र निश्चित. तथापि पंडितजींनींच असें म्हटल्याचें समजतें कीं, मद्रास प्रांताचे प्रधान-मंत्री श्री. राजगोपालाचार्य यांचा ह्या योजनेला मुळांतच विरोध आहे. राजाजीं-च्या विरोधाचींही कारणें आजपर्यंत बाहेर आलेलीं नसल्यामुळें टीकाटिप्पणी अथवा तर्कवितर्क करणें व्यर्थ आहे. तथापि येवढें मात्र खरें कीं, डॉ. खरे यांची ही योजना त्यांच्या अस्सल स्वातंत्र्यभक्तीस शोभेशीच होती आणि ती जर अमलांत आली असती, तर नोकरशाहीच्या मनावर हिंदी राजकारणाच्या दृष्टीनें एक निराळाच परिणाम झाला असता.

**गव्हर्नराच्या कोठीवर पेशवाई भोजन**

अधिकारग्रहण केल्यानंतर हिंदी भाषा, हिंदी चालीरीती, हिंदी रिवाज, हिंदी वैशिष्ट्यें, हिंदी पद्धती, इत्यादिकाची छाप नोकरशाही व तिचे मोठमोठे गोरे अधिकारी यांच्या मनावर पाडण्याची एकही संधी डॉ. खरे यांनीं वाया जाऊं दिली नाहीं. अशी संधी जर अनायासें आली नाहीं तर तिला मुद्दाम ओढून आणण्याचा ते प्रयत्न करीत. याचें एकच नमुनेदार उदाहरण सांगितलें असतां पुरें होईल. डॉ. खरे यांनीं गव्हर्नराच्या कोठीवर एक खाना देण्याचें योजिलें. गव्हर्नमेंट हौसवर अशा प्रकारचे खाने वारंवार होत असतातच. परंतु ह्या खान्याच्या प्रसंगीं दक्षतापूर्वक इंग्रजी सभ्याचार व रीतीरिवाज यांचेंच पालन करण्यांत येतें. खाद्यपदार्थ तर पाश्चात्य पद्धतींचे असतातच. ह्या पद्धतींत आजपर्यंत कधींही कोणत्याही गव्हर्नमेंट हौसमध्यें बदल करण्यांत आला नाहीं. जणूं काय ब्रिटिश राजप्रतिनिधींच्या खास राखीव अधिकाराचाच तो एक भाग आहे आणि साम्राज्यसत्तेच्या सामर्थ्यप्रदर्शनाचें तें एक ठराविक प्रतीक आहे! परंतु, डॉ. खरे यांनीं गव्हर्नमेंट हौसवर जी मेजवानी केली ती गोऱ्या अधिकाऱ्यांच्या इच्छेची, भावनांची व रीतीरिवाजांची कोणतीही पर्वा न करतां, संपूर्ण हिंदी पद्धतीनें तिचा कार्यक्रम त्यांनीं पार पाडला. सोंवळें नेसलेल्या

तेलंगी ब्राह्मणाच्या हातून जिलबीचा साग्रसंगीत पेशवाई स्वयंपाक त्यांनीं करवून घेतला आणि अशा रीतीनें संपूर्ण हिंदी पद्धतीनें मेजवानीचा प्रसंग पार पाडला. गोऱ्या अधिकाऱ्यांच्या मनांत त्यामुळें केवढी खळवळ उडाली असेल आणि आपल्या चालीरीतींवरील ह्या आक्रमणाचा त्यांनीं मनांतल्या मनांत केवढा जळफळाट केला असेल याची कल्पनाच करणें बरें! ह्या मेजवानीला थेट गव्हर्नरापासून झाडून सर्व मोठमोठे सरकारी अधिकारी हजर होते हें लक्षांत घेतलें म्हणजे वरील परिस्थितीची वाचकांना अधिक सुस्पष्ट कल्पना येऊं शकेल.

**असेंब्लींत घटना समितीचा ठराव**

ज्या मूळ उद्देशानें काँग्रेसनें अधिकारग्रहण केलेलें होतें तो उद्देश जनतेच्या दृष्टीसमोरून नाहींसा होऊं नये म्हणून स्वायत्त हिंदुस्थानाची घटना तयार करण्यास योग्य असलेल्या घटना-समितीच्या निर्मितीचा ठराव प्रांतो-प्रांतीच्या कायदेमंडळांतून काँग्रेसश्रेष्ठींनीं पास करून घेतला. काँग्रेसच्या घटना समितीच्या मागणीच्या मागें बराच अर्थ भरलेला होता. १९३५ चा कायदा हिंदी लोकांनीं तयार केलेला व मंजूर केलेला नव्हता, हें तो नाकारण्याचें आद्य कारण होतें. अनेक विषबीजें त्यांत भरलेलीं होतीं. त्यामुळें जातीय वैमनस्याचा विषवृक्ष फोंफावणार होता, इत्यादि कारणांस्तव तर तो त्याज्य होताच; पण, स्वतःच्या देशाची घटना ठरविण्याचा खरा अधिकार लोकशाहीच्या सिद्धान्ता-नुसार त्याच देशांतील लोकांना असतो, तो इतरांना असत नाहीं, हिंदुस्थान-चीही घटना हिंदी लोकांनींच ठरविली पाहिजे, ती ठरविणारें ब्रिटीश पार्लमेंट कोण? उपटसुंभासारखा त्यानें हा अधिकार कां बळकावा? हा प्रश्न घटना-समितीच्या मागणीच्या मुळाशीं गर्भित होता. १९३५ ची घटना त्याज्य आहे—सर्वस्वी टाकाऊ आहे-असें म्हणत म्हणत त्याच घटनेच्या अन्वयें मिळालेले अधिकार काँग्रेसनें ग्रहण केले; याचा अर्थ घटना-समितीची मागणी आतां काँग्रेसनें सोडली आहे असा कोणीही करूं नये, अशा भावनेंतून प्रांतोप्रांतीच्या कायदे-मंडळांत मांडल्या गेलेल्या ह्या घटना-समितीच्या ठरावाचा जन्म झालेला होता. ह्या ठरावांत प्रारंभींच असें स्वच्छ म्हटलें होतें कीं, "हिंदी राष्ट्रीय सभेच्या

ठरावांत हिंदी जनतेच्या ज्या भावनांना अभिव्यक्ती देण्यांत आली आहे, त्यांना अनुसरून १९३५ चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट तावडतोब रद्द करण्यांत यावा व त्याचे जागीं घटना-समितीनें बनविलेली हिंदी राज्यघटना अमलांत यावी. प्रांतांतून काँग्रेसनें मंत्रीपदांचा स्वीकार केला आहे याचा अर्थ असा नाहीं कीं, घटना समितीची मागणी तिनें सोडून दिली आहे."

**डॉ. खरे यांचें भाषण**

हा ठराव मध्यप्रांत असेंब्लींत २१ सप्टेंबर १९३७ रोजीं मांडतांना पंतप्रधान डॉ. खरे यांनीं जें भाषण केलें ते अत्यंत महत्वाचें होतें. ह्या भाषणांत हा देश जिंकण्याबद्दल फ्रेंच व इंग्रज या दोन युरोपियन राष्ट्रांत १८ व्या शतकाच्या पूर्वार्धापासून कशी चढाओढ चालली होती याचा मजेदार वृत्तांत त्यांनीं सांगितला. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दींत कोर्ट ऑफ डायरेक्टर्स-च्या "Superintendence, Direction and Control" खालीं हिंदुस्थानचा कारभार कसा चालत असे आणि आतां ह्या कोर्टाच्या जागीं भारतमंत्र्याची सत्ता कशी आली, इत्यादि वृत्तांत सांगून १७७३ सालच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या ॲक्टांतील वरील तीन शब्दांपैकीं डायरेक्शन हा शब्द १९३५ च्या कायद्याच्या १४ व्या कलमांत कसा आलेला आहे, हेंही त्यांनीं निवेदन केलें. ह्या व्यापारी कंपनीनें हिंदुस्थानची अतोनात लूट केली आणि तिच्या नोकरांनींही आपल्या धन्याच्या पावलावर पाऊल टाकून कसा गडगंज पैसा मिळविला आणि त्यांची श्रीमंती पाहून इंग्लंडांतील मेकॉले सारखे लोक त्यांना 'इंडियन नबाब' ही संज्ञा थट्टेनें कसे देत असत, हेंही सांगितलें. भारतमंत्र्याच्या अधिकारावर मार्मिक हल्ला चढवीत असतांना सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणाऱ्या या इसमाच्या हातांत अमर्याद सत्ता कशी देण्यांत आलेली आहे, ह्यावर लार्ड डलहौसीच्याच पुढील शब्दांत त्यांनीं मोठा विदारक प्रकाश पाडला. लॉर्ड डलहौसी म्हणतो, "अकबर किंवा औरंगजेब या हिंदुस्थानच्या बादशहाइतकीच एकतंत्री सत्ता भारतमंत्र्याच्या हातांत आहे. फरक इतकाच कीं, मोंगल बादशहा खुद्द हिंदुस्थानांत राहून राज्य करीत, तर भारतमंत्री दहा हजार मैलांवरून तेंच काम करितो." डॉ. खरे

पुढें म्हणाले, "जोंपर्यंत हिंदुस्थानचें सरकार भारतमंत्र्याला जबाबदार राहील तोंपर्यंत कोणत्याही प्रकारच्या स्वायत्ततेचा देखावा देखील या देशांत निर्माण होऊं शकणार नाहीं. प्रस्तुतच्या कायद्याची भाषा कशीही असो आणि Instrument of Instructions मध्यें कांहींही म्हटलेलें असो, येवढी गोष्ट मात्र निश्चित कीं, जोंपर्यंत हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरल व गव्हर्नर्स हे खास ब्रिटिश रक्तामांसाचे असतील तोंपर्यंत ते येथें इंग्लंडच्या हिताच्या दृष्टीनेंच आमच्याशीं भांडतील. हिंदी हिताच्या दृष्टीनें कोणतीच गोष्ट करतां येणें शक्य नाहीं. सर जेम्स वेस्टलँड—हिंदुस्थानचे एकवेळचे अर्थमंत्री—यांनीं 'जोपर्यंत व्हाइट हॉलचे हुकूम मानणें आम्हास भाग आहे, तोंपर्यंत कॉटन एक्साइज ड्युटी अ‍ॅक्ट १८८२ सारखे कायदे अगतिक रीतीनें करणेंच आम्हाला प्राप्त आहे' असें स्पष्ट म्हटलें नाहीं काय?"

**वसाहतीचें स्वराज्य व स्वातंत्र्य**

याच भाषणांत संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय हिंदुस्थानचें समाधान कसें होऊं शकणार नाहीं, हें दाखवीत असतांना डॉ. खरे म्हणाले, "वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदुस्थान लुटण्याचा लोभ इंग्लंडला सोडवत नाहीं. आणि हिंदी राष्ट्रीय सभेची अशी पक्की धारणा झालेली आहे कीं, ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें स्टॅटयूट ऑफ वेस्टमिन्स्टरप्रमाणें वसाहतीच्या स्वराज्याच्या गोंडस नांवाखालीं देखील हिंदी हितसंबंधांचें खरें संरक्षण होणें शक्य नाहीं. कांहीं किरकोळ फायदे होतील. पण आर्थिक दृष्टया हिंदुस्थान परतंत्रच राहील आणि जोंपर्यंत इंग्लंडवर हिंदुस्थान आर्थिक दृष्टया अवलंबून राहील तोंपर्यंत हिंदी लोकांना ब्रिटिश भांडवलवाल्यांचे 'पाणक्ये किंवा लांकुडतोडेच' बनावें लागेल. कीथ-साहेबांच्या शद्बांत बोलावयाचें तर हिंदुस्थानवरील ब्रिटनचें शासन एका व्यापारी कंपनीपासून सुरू झालें आणि ह्या व्यापारी कंपनीचा इतिहास असा मजेदार आहे कीं, हिंदी जनतेंत खराखुरा राजकीय भाव उत्पन्न होण्याच्या ब्रिटिश शासनाचा हा राजकीय उगमच आड येत आहे. म्हणून कॉंग्रेसनें आपल्या जन्मसिद्ध हक्काची म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्याची मागणी मोठ्या धैर्यानें केली आहे आणि त्या मागणीचा अर्थ असाच आहे कीं, आमची घटना

आम्हीच बनवूं—आमचे लोक बनवतील—आम्ही सार्वत्रिक मतदानाच्या पद्धतीवर निवडून दिलेले आमचे प्रतिनिधी बनवतील. त्यासाठीं घटना समितीची मागणी आम्ही करीत आहोंत. ”

## हिंदु-मुसलमानांचे दंगे

अनेक लोकांचा अपेक्षाभंग करून काँग्रेसनें अधिकारग्रहण केल्यामुळें ज्यांचा ज्यांचा अपेक्षाभंग झाला त्या सर्वांना स्वाभाविकच अत्यंत विषाद वाटला. अशा विषाद वाटणाऱ्या संस्थांत मुस्लीम लीग हीच अग्रगण्य होती, हें कांग्रेस मंत्र्यांनीं राजीनामे दिल्यानंतर जनाब जिनांच्या फर्मानानुसार ठिकठिकाणीं मुस्लीम लीगतर्फे जो ‘ मुक्तिदिन ’ साजरा करण्यांत आला त्यावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. काँग्रेसकारभाराच्या विरुद्ध मुस्लीम लीगच्या असंतोषाला कोणत्या ना कोणत्या रूपानें व्यक्तता मिळणार असें दिसतच होतें. राजकारणांत मुस्लीम लीगची जेव्हां जेव्हां पिछेहाट किंवा कुचंबणा झालेली असते तेव्हां तेव्हां हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांना ऊत येऊं लागतो, असा ह्या देशांतील राजकीय घडामोडींच्या इतिहासाचा दुर्दैवी अनुभव आहे. प्रथमत: काँग्रेसनें मंत्रीमंडळें बनवतांना मुस्लीम लीगशीं संगनमत करूनच तीं बनवावींत अशी जनाब जिनांची अपेक्षा होती. परंतु, लोकशाही घटनात्मक राजकारणाला अनुसरूनच ज्या ज्या प्रांतांत स्वत:चें निर्भेळ बहुमत असेल त्या त्या प्रांतांत काँग्रेसनें आपलींच मंत्रीमंडळें बनविलीं व त्यांत कांहीं वावगें झालें असेंहि म्हणतां येणार नाहीं. स्वत:च्या पक्षाचीं मंत्रीमंडळें बनवीत असतांनाही काँग्रेसनें मुस्लीम लीगचे नसले तरी मुसलमान मंत्री, मंत्रीमंडळावर घेण्यास प्रत्यवाय दाखविला नाहीं. परंतु, येवढ्यानें मुस्लीम लीगचें समाधान होण्यासारखें नव्हतें. काँग्रेस-मंत्रीमंडळाच्या विरुद्ध असंतोष पसरविण्याचा मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांनीं जो प्रयत्न केला त्याचा परिणाम असो अथवा इतर कोणत्याही कारणास्तव असो, डॉ. खरे यांच्या कारकिर्दीच्या प्रारंभींच या प्रांतांत हिंदु-मुसलमानांच्या दंग्याची एक जबरदस्त उसळी मारली गेली. विजयादशमीच्या आसपास म्हणजे १९३७ च्या आक्टोबर महिन्यांत जबलपूर, सागर, मंडला, खंडवा, नरसिंगपूर, बऱ्हाणपूर इत्यादि अनेक ठिकाणीं हे दंगे घडून आले आणि नागपूर, उमरावती,

हुशंगाबाद इत्यादि ठिकाणीं ते होतां होतां टळले. ह्या सर्व दंग्यांत जबलपुरच्या दंग्याला विशेष महत्व असल्यामुळें त्याचा थोडा स्वतंत्र निर्देश करणें अवश्य आहे.

## जबलपूर येथील दंगा

विजयादशमीच्या दिवशीं जबलपूर येथें दरसाल काली मातेची मिरवणूक निघत असते. सालाबादप्रमाणें १९३७ सालीं १४ आक्टोबरला ती निघाली. मिरवणूक हनुमानतालाकडे जात असतांना मिलोनीगंज मशीदींत जमलेल्या मुसलमानांनीं तिच्या पिछाडीवर हल्ला केला आणि अशा रीतीनें दंग्यास सुरुवात झाली. ह्या दंग्यांत सुमारें १०० इसम जखमी झाले. १४४ कलमाचा अंमल जारी करण्यांत आला. दंग्याची हकीकत तारेनें नागपुरास आल्याबरोबर प्रधान-मंत्री डॉ. खरे हे स्वत: कायदेमंत्री श्री. शरीफ व स्थानिक स्वराज्यमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्यासह तडक जबलपुरला गेले. जबलपूर येथील दंग्याचें वातावरण बरेंच दिवस टिकलें आणि १४४ कलमाचा अंमल जारी झाल्यानंतर-ही कित्येक दिवस चोरट्या हल्ल्यांचे प्रकार सुरुच होते. वरील मंत्र्यांसह डॉ. खरे जबलपुरास जाऊन पोंचल्याबरोबर त्यांनीं हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांच्या भेटीगांठीं घेऊन वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला. ह्या दंग्याची चौकशी करण्याचें काम पुढें प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे यांनीं स्वत:कडेच घेतलें. हिंदु-मुसलमानांचे संबंध परस्परांशीं चांगले रहावेत म्हणून डॉ. खरे यांनीं आपल्यापरीनें अत्यंत खटपट केली.

## अंदमानांतील कैद्यांची मुक्तता

हिंदु-मुसलमानांचे संबंध सलोख्याचे रहावे याविषयीं खरोखरच डॉ. खरे यांना अतिशय तळमळ वाटत होती, यांत शंका नाहीं. १९२७ सालीं नागपुरांत हिंदु-मुसलमानांचा जो अत्यंत भीषण दंगा झाला होता, त्या दंग्यांत शिक्षा पावलेले व ती अजून अंदमानच्या काळ्या पाण्यावर भोगीत असलेल्या हिंदु-मुसलमान कैद्यांना त्यांनीं आपल्या कारकिर्दीच्या प्रारंभींच मुक्त केलें होते व त्याबद्दल त्यांची सर्वत्र प्रशंसाही झाली होती. अर्थात हिंदु-मुसलमानांचे संबंध सलोख्याचे ठेवण्याच्या बुद्धीनेंच त्यांनीं हा उपक्रम केला होता हें उघड आहे.

### जाफर हुसेन प्रकरण

हिंदु-मुसलमानांच्या प्रकरणीं अनुषंगानेंच आलें म्हणून ह्या ठिकाणीं जातां जातां जाफर हुसेन प्रकरणाचाही निर्देश करणें अवश्य आहे. जाफर हुसेन हा मध्यप्रांतांतील शाळाखात्यांत इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्सच्या हुद्यावर असलेला अधिकारी होता. वर्धा येथील डाक बंगल्यांत आपल्या दोन सोबत्यांसह तो उतरलेला असतांना एका अल्पवयी बालिकेवर जबरीसंभोगाचा अत्याचार केल्याच्या आरोपावरून त्याचेवर खटला भरण्यांत आला होता व त्यांत त्यास तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली होती. कॉँग्रेस मंत्री-मंडळाच्या कारकिर्दीच्या प्रारंभींच न्यायमंत्री या नात्यानें ना. शरीफ यांचे समोर जाफर हुसेन याचा दयेचा अर्ज आलेला होता. आणि त्यांत आपली उरलेली शिक्षा माफ करण्यांत यावी अशी विनवणी करण्यांत आली होती. त्या अर्जाचा विचार करून जाफर हुसेन यास माफी देण्यांत आली. ही माफी देणें यांत कांहीं विशेष गैर होतें अशांतला भाग नाहीं. वस्तुतः इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्सच्या हुद्यावरील या बड्या अधिकाऱ्याची सर्वत्र चांगलीच नाचक्की होऊन चुकली होती. न्यायकोर्टांत जबरीसंभोगाच्या आरोपावरून त्यास शिक्षा झाली ही गोष्टही "संभावितस्यचाकीर्तिर्मरणादतिरिच्यते" ह्या वचनाप्रमाणें जाफर हुसेन यास मरणापेक्षांही निपटारें करून टाकण्यास पुरेशी होती. तशांत आपल्या पतीच्या तुरुंगवासामुळें जाफर हुसेनची बिबी हाय खाऊन मरण पावली आणि कॉलेजमध्यें शिक्षण घेणाऱ्या त्याच्या मुलीचीही वाताहत झाली. ह्या दृष्टीनें पाहतां जाफर हुसेन यास एकंदरींत फारच मोठा फटकारा बसलेला होता. आणि मानवी व ईश्वरी न्यायालयांतून इतकी मोठी शिक्षा झाल्यानंतर त्याच्यावर दयेची मेहरबानी करणें हें कॉँग्रेस-मंत्र्यांच्या न्यायबुद्धीस धरूनच झालें होतें. परंतु, ह्यांत एकच गफलत झाली आणि ती अशी कीं, ना. शरीफ यांनीं केवळ स्वाधिकारांतच जाफर हुसेनचा दयेचा अर्ज मंजूर करून टाकला. आपले पुढारी प्रधानमंत्री व इतर सहकारी मंत्री यांचाही सल्ला घेण्याची पर्वा केली नाहीं. त्यामुळेंच अखेरीस हें प्रकरण कॉँग्रेसश्रेष्ठींपर्यंत जाऊन पोंचलें. कॉँग्रेसश्रेष्ठींनीं ह्या प्रकरणाची चौकशी करण्याचें काम बंगालचे माजी हायकोर्ट

जज्ज कै. सर मन्मथनाथ मुकर्जी यांच्याकडे सोंपविलें व त्यांच्या निर्णयानुसार अखेरीस ना. शरीफ यास मंत्रीमंडळांतून राजीनामा देऊन बाहेर पडावें लागलें. ह्या जाफर हुसेन प्रकरणाला कॉंग्रेस पक्षाच्या सभेंत तोंड फोडण्याचें श्रेय मध्यप्रांत असेंब्लीच्या डेप्युटी स्पीकर सौ. अनुसूयाबाई काळे यांस न देऊन कसें चालेल? कारण, त्यांनीं पक्षाच्या सभेंत आपल्या स्त्रीस्वभावसुलभ शस्त्राचा उपयोग करून सभासदांना खडबडून जागें केलें नसतें, तर कदाचित् जाफर हुसेन प्रकरणाला वाचाही फुटली नसती. रमणी-नेत्रांतील अश्रूंनीं दगड सुद्धां जर पाझरतात तर मध्यप्रांत कायदेमंडळांतील कॉंग्रेस सदस्यांना पाझर फुटला असल्यास नवल काय!

# विधायक कामगिरी

## शेतकऱ्यांबद्दल अधिक सहानुभूति

घटना मोडून टाकण्याच्या बुद्धीनें कॉंग्रेसमंत्र्यांनीं अधिकारग्रहण केलेलें असलें तरी त्यांतल्या त्यांत लोककल्याणाच्या गोष्टी करण्याचा त्यांचा प्रयत्न नव्हताच असें नाहीं. डॉ. खरे यांच्या कारकीर्दींत अशा रीतीनें ज्या विधायक लोककल्याणाच्या गोष्टी करण्यांत आल्या, त्यांत तुरुंगांची सुधारणा, रुपयाला दोन आणे शेतसारा कमी करणें आणि मद्यपानबंदी, ह्या तीन प्रमुख गोष्टी होत यांत शंका नाहीं. ह्या तिहींतही खुद्द महात्माजींचा आद्य कटाक्ष मद्य-पानबंदीवर होता, तर डॉ. खरे यांना स्वतःला शेतकऱ्यांचा प्रश्न हा अधिक जिव्हाळ्याचा वाटत होता. मद्यपानबंदीचा प्रश्न त्यांना गौण वाटत होता असा याचा अर्थ नाहीं. मद्यपानबंदी तर त्यांना हवीच होती. ह्या प्रश्नांतील महात्माजींचा जिव्हाळा ओळखून मध्यप्रांतांतील कित्येक विभाग त्यांनीं 'कोरडे' करून टाकले होते. मद्यपानबंदीचा प्रचार करण्यासाठीं अबकारी खात्याचे मंत्री ना. दादासाहेब गोळे यांच्याप्रमाणेंच त्यांनीं स्वतः ठिकठिकाणीं दौरेही केले होते. परंतु, मद्यपानबंदीचा प्रश्न अधिक मौलिक असला तरी शेतकऱ्यांचा प्रश्न प्रासंगिकतेच्या दृष्टीनें अधिक जिव्हाळ्याचा व तात्कालिक होता.

## शेतकऱ्यांना सवलती

शेतसारा वसूलीबद्दल रावशाहींत व तत्पूर्वीं नानाप्रकारचे जुल्म झाले होते आणि त्यांना ठिकठिकाणीं कॉंग्रेसजनांनींच वाचा फोडली होती. कॉंग्रेसचें अधिकारग्रहण शेतकऱ्यांच्या हिताचेंच होतें आणि ते सिद्धकरण्यासाठीं शेतकऱ्यां-च्या जिव्हाळ्याचे प्रश्न हातीं घेणें, सारावसुलीसाठीं होत असलेली जुलुमजबरदस्ती थांबविणें, शेतकऱ्यांवरील करांचा बोजा हलका करणें, तकावीच्या रूपानें कर्ज देऊन शेतकऱ्यांना मदत करणें, वनचराई माफ करून गुरांकरतां वैरणीचा सुकाळ करणें, इत्यादि अनेक गोष्टी ताबडतोब करणें अवश्यच होतें व त्या यावच्छक्य प्रमाणांत डॉ. खरे यांनीं घडवूनही आणल्या. रुपयामागें दोन आणे शेतसारा माफ करण्यांत आला, वनचराइचे कायदे सैल करण्यांत आले आणि सारावसुलीमध्यें खालच्या अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या जुलुमांना

बराच आळा घालण्यांत आला. वस्तुत: शेतकऱ्यांचें गाऱ्हाणेंच येवढें मोठें आहे आणि कॉंग्रेसपासून ते अपेक्षित असलेल्या गोष्टीही इतक्या मोठ्या आहेत कीं, असल्या किरकोळ सुधारणांनीं त्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें. मंत्रीमंडळाच्या विरुद्ध म्हणून नव्हे तर मंत्रीमंडळाकडून आपण कोणत्या अपेक्षा करतों हें दाखविण्याच्या हेतुनें ता. १३ डिसेंबर १९३७ रोजीं नागपूर, भंडारा, बालाघाट, वर्धा इत्यादि जिल्ह्यांतील किसानांचा एक मोर्चा असेंब्लीच्या सभागृहावर चाल करून आला. प्रधानमंत्री डॉ. खरे यांनीं आपल्या परिवारासह सभागृहांतून बाहेर येऊन किसानांच्या समोर जें भाषण केलें, तें शेतकऱ्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन विशद करणारें असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग येथें देणें उचित होईल. प्रारंभींच ते म्हणाले, "आपणांस येथें येण्याची तसदी घडली याबद्दल मला खरोखरच वाईट वाटतें. आपणां सर्वांची चौकशी करणें हें आमचें कर्तव्यच आहे. जनता हीच आमची मालक आहे व आम्ही तिचे सेवक आहोंत. कॉंग्रेसच्या आज्ञेनें आम्ही मंत्रीपदें स्वीकारलीं तीं कांहीं तुमच्यावर जुलुमजबरदस्ती करण्यासाठीं नाहींत. आपल्या इच्छेविरुद्ध आपल्यावर जो सुधारणा कायदा लादला गेला आहे, त्यानें आम्हाला पुरेसे अधिकार दिलेले नाहींत, हें आमच्याप्रमाणें आपणही जाणतांच. तरी पण आहे त्या परिस्थितींत तुमचें जेवढें अधिक कल्याण करतां येईल तेवढें करण्याची आम्ही जरूर खटपट करूं. आम्ही अधिकारस्वीकार करण्यापूर्वीं जें हंगामी मंत्रीमंडळ अस्तित्वांत होतें, त्यानें आपला एक कार्यक्रम प्रसिद्ध केला होता. त्यानें शेतसारा अधिक नाहीं असें म्हटलें होतें. शेतसारा वाढवावा असा त्याचा अर्थ आहे. आम्ही तुमच्यावरील शेतसारा वाढवावा असें म्हणणार नाहीं. उलट, आम्ही प्रांतांतील लहान लहान शेतकऱ्यांना म्हणजे सुमारें शेंकडा ५० शेतकऱ्यांना रुपयांत दोन आणे सूट दिली आहे. सबंध हिंदुस्थानांत ही गोष्ट इतरत्र कोठेंही झालेली नाहीं. हल्लींची आपली शेतकऱ्यांची परिस्थिति हें अनेक वर्षांचें फळ आहे. ती परिस्थिति चटकन बदलणें शक्य नाहीं, हें आपण जाणतांच. तरी पण आपलें कल्याण करण्याची आम्ही शक्य तेवढी खटपट करूं; व जेव्हां आमच्यानें कांहीं होणार नाहीं, किंवा आपणां सर्वांची

मुख्य संस्था जी कॉंग्रेस, ती हुकूम देईल तेव्हां आम्ही बाहेर पडूं; किंवा आपणाला आमची सेवा पसंत नसेल तरीही आम्ही बाहेर पडूं."

**ब्रिटिश राजवटींतील तुरुंगव्यवस्था**

१९३० सालच्या सत्याग्रहाच्या चळवळींत डॉ. खरे तुरुंगांत गेले असतांना तेथील अनुभवांचा फायदा प्रधानमंत्री झाल्यावर तुरुंगाच्या सुधारणा करण्याच्या कामीं त्यांनीं कसा करून घेतला, याचा सहजगत्या निर्देश तत्प्रकरणीं आलेला वाचकांच्या लक्षांत असेलच. इतर स्वतंत्र देशांत तुरुंगांची कोणती पद्धति असेल ती असो, सोव्हिएट रशियांतले तुरुंग हे कैदखाने नसून माणसांतून उठलेल्या गुन्हेगार व्यक्तींच्या ठिकाणीं पुनरपि माणुसकी प्रस्थापित करून, शिवाय चरितार्थाचें एक उत्तम साधन उपलब्ध करून देणारीं उद्योगमंदिरें, असें स्वरूप त्यांना आलेलें असल्याची ग्वाही, एका सुप्रसिद्ध जर्मन लेखकानेंही दिलेली आहे. पण हिंदुस्थानांत ब्रिटिश राजवटीची परिस्थिति मात्र थेट याच्या विपरीत असलेली दृष्टीस पडते. हिंदुस्थानांतील तुरुंगांत गेलेला मनुष्य — तुरुंगांत जाण्यापूर्वी त्याच्या अंगीं जर कांहीं माणुसकीचा अंश शिल्लक असेल, तर तो, तोही गमावून बसतो. तुरुंगांत जाण्यामुळें गुन्हेगारीची प्रवृत्ति कमी होण्याऐवजीं उलट ती वाढतच जाते असाच येथील अनुभव आहे. आणि ह्याला कारण ब्रिटिश राजवटींतील हिंदुस्थानांत निर्माण करण्यांत आलेली तुरुंग-व्यवस्था ही होय. अत्यंत क्रूर व रानटी अशा प्रकारची ही व्यवस्था आहे. मानस-शास्त्राचा अथवा मनुष्य-स्वभावाचा तींत यत्किंचितही विचार करण्यांत आलेला नाहीं. जनावरापेक्षांही निपटाऱ्या पद्धतीनें कैद्यांना वागविणारा अधिकारी ब्रिटिश तुरुंगखात्याला भूषणभूत वाटतो. नालायक, क्रूर, अशिक्षित, पाशवी आणि महामूर्ख अशा अधिकारपदावर चढलेल्या व्यक्तींचें जर एकाद्यानें प्रदर्शन भरविण्याचें योजिलें, तर हिंदुस्थानांत तरी त्यास अशा व्यक्तींचा शोध करण्याचे परिश्रम फारसे घ्यावे लागणार नाहींत. केवळ तुरुंगाधिकाऱ्यांचा एक 'जलसा' भरविल्यानेंही त्याचें कार्य सिद्ध होईल. अशा प्रकारची ही तुरुंगपद्धति अनुभवानें डॉ. खरे यांस चांगलीच आकलन झाली असल्यास नवल नाहीं.

**तुरुंगांतील भेदभाव**

राजकीय कैद्यांचा उपसर्ग तुरुंगाला पोंहोचेपर्यंत हिंदुस्थानांतील तुरुंग

हे बाह्य जगापासून सर्वथा अलिप्त व गुप्त असें स्वतंत्र जगत् समजलें जात होतें. 'तुरुंगलोक' हाही एक लोक असला तरी त्याची नरक-लोकाशींच विशेष स्पर्धा होती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पुष्कळांच्या मनांत तुरुंगाच्या सुधारणा म्हणजे राजबंद्यांना विशेष सवलती येवढाच अर्थ उभा राहतो. हिंदुस्थानच्या आजच्या गुलामगिरीच्या परिस्थितींत राजबंदी हाही एक कायमचा तुरुंगवासी बनलेला असला तरी एकंदर व्यापक दृष्टीनें पाहतां तुरुंग ही वसाहत गुन्हेगारांचीच समजली पाहिजे. आणि गुन्हेगार झाले म्हणून काय तीं माणसें नव्हत? काय त्यांना हर्षामर्ष, मानापमान असत नाहींत? काय तुरुंगाच्या बाहेरील मनुष्याच्या गरजांहून तुरुंगाच्या आंतील माणसांच्या गरजा भिन्न असतात? तेव्हां, केवळ आपले कोणी नातलग, इष्टमित्र अथवा आदरणीय पुढारी तुरुंगांत डांबले जातात या संकुचित भावनेनें तुरुंगांची सुधारणा करण्याकडे लक्ष देण्यापेक्षांही अधिक व्यापक, मानव्यतेच्या भावनेनें, मानवी सहृदयतेनें तुरुंगसुधारण्याच्या प्रश्नाकडे पाहणें अत्यवश्यक असतें.

**तुरुंग सुधारणेचें बिल**

पूर्वानुभवामुळें स्वतःच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली ही मानवी सहृदयता डॉ. खरे यांनीं प्रधानमंत्री झाल्यावर सुद्धां जागृत ठेविली होती यांत शंका नाहीं. आणि ह्याचें उत्कृष्ट प्रत्यंतर, म्हणजे तुरुंगाचें खातें स्वतःकडे घेऊन त्यांनीं स्वतः तुरुंगसुधारणेचें जें बिल लिहिलें, मध्यप्रांत कायदेमंडळांत पास करून घेतलें आणि प्रतिकूल असलेल्या नोकरशाहीकडून ह्या सुधारणा अमलांत येतात कीं नाहीं हें दक्षतापूर्वक तुरुंगाच्या कारभाराकडे लक्ष लावून पाहिलें; ही गोष्ट होय. त्यांनीं ह्या बिलांत राजबंद्यांचे पूर्वीं तुरुंगांत होत असलेले कष्ट व छळ कमी करण्याचा तर प्रयत्न केलाच; पण त्या बरोबरच सामान्य गुन्हेगार, कैद्यांच्या गरजा, भावना, संवयी, व्यसनें व सुधारण्याजोग्या बाबी यांचेकडे विशेष अवधान पुरविलें. आणि त्यांतच ह्या बिलाची मानवी सहृदयता दिसून येते. सामान्य गुन्हेगार कैद्यांना देखील 'कोल्हु' अथवा 'घाणी' यांच्यासारखीं अतिकष्टाचीं कामें देण्यांत येऊ नये, त्यांनाही अधिक विश्रांति मिळावी, विडी, तंबाखू इत्यादि शहाजोग मनुष्य समाजांतील व्यसनें त्यांना असणारच. तीं

अंशत: तृप्त करण्याची सोय करण्यांत यावी, मनोरंजन, करमणूक यांची भूक त्यांच्याही मनाला लागते म्हणून फुटबॉलसारखे खेळ खेळण्याची मुभा व सोय त्यांना देण्यांत यावी आणि मनुष्य-शरीराला पोषक अशा प्रकारचें खाणें—निदान निश्चितपणें मारक नव्हे अथवा विघातक नव्हे—असें खाणें—त्यांना देण्यांत यावें, आपल्या गाऱ्हाण्यांची तक्रार थेट वरिष्ठांपर्यंत—वरिष्ठांतल्याही वरिष्ठांपर्यंत नेऊन पोंचविण्याचा हक्क त्यांना असावा व स्वेच्छेप्रमाणें त्यांना तो बजावतां यावा, दरवेशाच्या अस्वलाप्रमाणें किंवा मदारीच्या चिमा बंदराप्रमाणें हास्यास्पद दिसेल असा व केवळ लज्जारक्षणोपयोगी असा पोषाख त्यांना नसावा; तर पर्जन्य, शीत इत्यादिपासून शरीररक्षण करूं शकणारा पोषाख त्यांनाही मिळाला पाहिजे, शरीर-स्वच्छतेच्या सोयी—तेल, साबण वगैरे—यांची त्यांनाही इतरेजनांइतकीच आवश्यकता आहे, इत्यादि अनेक मानवतामूलक सुधारणा तुरुंग-खात्यांत घडून येणें आवश्यक होतें व आहे. सर्वांशानें नसलें तरी अंशत: कां होईना पण ह्या सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न आपल्या प्रस्तुत बिलान्वयें डॉ. खरे यांनीं केला व त्याबद्दलही ते अत्यंत धन्यवादास पात्र आहेत. परंतु दुर्दैवानें मद्यपानबंदीसारखीही सुधारणा कॉंग्रेसमंत्रीमंडळें निघून गेल्यानंतर जेथें गव्हर्नरांच्या सरकारांनीं टिकू दिली नाहीं, तेथें डॉ. खरे यांनीं केलेल्या तुरुंग-सुधारणांचा बराचसा भाग उडवून लावला असल्यास नवल काय?

**कैद्यांची मुक्तता**

तुरुंगांची येवढीच सुधारणा करून डॉ. खरे थांबले नाहींत. तर प्रांतांतील सरसकट सर्व कैद्यांना दोन महिन्यांची शिक्षा माफ करून आतां पूर्वीची राजवट बदलली आहे, कॉंग्रेसचें नवें मन्वंतर सुरुं झालें आहे, याची जाणीव तुरुंगखात्यालाही त्यांनीं करून दिली. ह्या माफीमुळें ज्यांची शिक्षेची मुदत बहुतेक भरत आली होती अशा शेंकडों कैद्यांची तुरुंगांतून सुटका झाली व त्यांनींही आपल्या अनपेक्षित मुक्ततेबद्दल डॉ. खरे यांस दुवा दिला असेल यांत शंका नाहीं.

**आयुर्वेदाचें पुनरुत्थान**

देशी विद्या, शास्त्र व कला ह्यांनाच जनतेनें आश्रय दिला पाहिजे अशी शिफारस हिंदी राष्ट्रीय सभेनें आजवर अनेक वेळेला केली आहे. विशेषत:

१९२० सालच्या नागपूर काँग्रेसपासून स्वावलंबन, असहकारिता व सत्याग्रह ह्या तीन शस्त्रांचा काँग्रेसनें अंगीकार केल्यापासून परदेशी औषधांच्या उपयोगावर बहिष्कार घालून आयुर्वेदशास्त्र व देशी औषधें ह्यांचाच जनतेनें उपयोग करावा असे ठराव काँग्रेसनें अनेक वेळां पसार केले आहेत. ह्याचा अर्थ असा कीं, हातीं सत्ता येतांच आयुर्वेदाला आश्रय देऊन त्या शास्त्राचें पुनरुत्थान करण्यासाठीं काँग्रेस बांधलेली होती. स्वराज्य नष्ट झाल्यापासून राजाश्रयाच्या अभावीं व सुशिक्षित लोकांची हेटाळणी सहन करूनही आयुर्वेद अद्यापि तगून राहिलेला होता. आणि काँग्रेस अधिकारारूढ झाल्याबरोबर वैद्यवर्गाची प्रतिष्ठा व आयुर्वेदाचें महत्व वाढविण्याचा कार्यक्रम हातीं घेणें काँग्रेसमंत्र्यांना क्रमप्राप्तच होतें.

### डॉ. खरे ह्यांची भूमिका

पंतप्रधान डॉ. खरे हे स्वत: वैद्यक व्यवसायी व नामांकित डॉक्टर असले तरी इतर अनेक डॉक्टरांप्रमाणें त्यांचा स्वाभिमान व आयुर्वेदाभिमान नष्ट झालेला नव्हता. प्राचीन शास्त्राभिमानी घराण्यांत त्यांचा जन्म झालेला असल्यामुळें आनुवंशिक रीतीनेंच प्राचीन शास्त्रांचा अभिमान त्यांच्या ठिकाणीं वसत आलेला आहे. जुन्या मॉंटफर्ड सुधारणांच्या कौन्सिलांत सदस्य या नात्यानें भाषण करतांना आयुर्वेदावरील आपल्या विचारांना एके प्रसंगीं पूर्वींच त्यांनीं अभिव्यक्ति दिलेली होती. नागपूर येथील मेडिकल स्कूलमध्येंच आयुर्वेदाचेही दोन विषय शिकविण्यांत यावे अशी सूचना एका सदस्यानें आणली असतां "आयुर्वेदाला इतकें दुय्यम स्थान देऊं नका, आयुर्वेदाचीं स्वतंत्र विद्यालयें काढा व तीं चालवा" असा डॉ. खरे यांनीं त्याच वेळीं जबाब दिला होता. यावरून आयुर्वेदाचें स्वतंत्रपणें व स्वत:च्या अधिष्ठानावर उत्थान होणें आवश्यक आहे, ही त्यांची भूमिका त्याच वेळीं स्पष्ट झालेली होती. आणि ह्या भूमिकेस अनुसरूनच आपल्या प्रधानमंत्रीपदाच्या राजवटींत आयुर्वेद-प्रगतीला चालना देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

### देशी वैद्यक समितीची स्थापना

डॉ. खरे यांच्या वरील भूमिकेस बरीचशी अनुकूल अशीच वैद्यक मंत्री

ना. मिश्रा यांचीही भूमिका होती. त्यामुळें देशी वैद्यकाला प्रांतिक सरकार-मार्फत कशा प्रकारें व कोणत्या बाबतींत आश्रय द्यावा याचा विचार करण्यासाठीं एक देशी वैद्यक समिती स्थापन करण्यांत आली. ह्या समितीचे अध्यक्ष जरी आय. जी. ऑफ सिव्हिल हॉस्पिटल्स हे असले तरी तिच्यावर वैद्य–हकीमांचेंच निर्भेळ बहुमत देण्यांत आलेलें होतें. आणि तिला विचारकक्षेचे म्हणून दिलेले विषय (Terms of reference) तितकेच व्यापक होते. नऊ महिने ह्या कमिटीचें कामकाज चाललें आणि तिनें केलेल्या शिफारसींचा बहुतेक भाग प्रांतिक सरकारनें मान्य केला होता. मुंबई, संयुक्तप्रांत इत्यादि प्रांतांप्रमाणें वैद्यांच्या नोंदणीचा कायदा विधिपूर्वक ह्या प्रांतांत पास होण्यापूर्वींच मंत्रीमंडळानें राजीनामे दिल्याकारणानें डॉ. खरे यांनीं प्रधानमंत्री या नात्यानें उपक्रमित केलेली ही सुधारणा अर्धवटच राहीली.

## आयुर्वेद विद्यालयांना भेटी

आपल्या प्रधानमंत्रीपदाच्या कारकीर्दींत डॉ. खरे यांनीं प्रांतांतील व प्रांताबाहेरीलही अनेक आयुर्वेद विद्यालयांना भेटी दिल्या. नागपूर, उमरावती, पुणें इत्यादि ठिकाणीं भिषक्केसरी पं. गोवर्धन शर्मा छांगाणी, वैद्यभूषण पुरुषोत्तम शास्त्री हिर्लेकर, वैद्यभूषण नानल शास्त्री इत्यादि नामांकित वैद्यांनीं हीं विद्यालयें मोठ्या परिश्रमानें चालविलेलीं होतीं. वऱ्हाडांतील आयुर्वेदीय विद्यालयांना व चळवळींना निझाम सरकारकडून चांगलें साह्य होण्यासारखें आहे हें जाणून त्यांनीं उमरावतीचे वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री यांना स्वतःचें पत्र देऊन सर अकबर हैदरी यांचेकडे जाण्यास प्रोत्साहन दिलें होतें. विशेषतः ता. २२ डिसेंबर १९३७ रोजीं पुणें येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सुप्रसिद्ध आयुर्वेद महाविद्यालयाचा वार्षिक समारंभ डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखालीं संस्मरणीय रीतीनें पार पडला. ह्या महाविद्यालयाच्या नवीन इमारतीची कोनशीला डॉ. खरे यांच्याच हस्तें बसविण्यांत आली. त्याप्रसंगीं डॉ. खरे यांनीं आयुर्वेदासंबंधीं पुन्हा एकवार आपले विचार प्रगट करणारें भाषण केलें. ते म्हणाले, “ आयुर्वेद-शास्त्र हें फार पुरातन काळापासून आपणाकडे चालत आलेलें आहे. सर्व रोगांचा परिहार आयुर्वेदशास्त्रानें होणें शक्य आहे. आपल्यांतील आयुर्वेदशास्त्राची

माहिती अरबांनीं पाश्चात्य देशांत नेली. हेमगर्भ ही मात्रा आपली आहे आणि त्यापासूनच सोनें हें 'टॉनिक' आहे व क्षयरोगावर तें उपयोगी पडतें, ही गोष्ट पाश्चात्य डॉक्टरांना समजली. खेड्यापाड्यांतील गरीब लोकांना आयुर्वेदाचाच जास्त उपयोग होणार आहे."

**योगशास्त्र व निसर्गोपचार यांचा पुरस्कार**

आयुर्वेदाप्रमाणेंच आपल्या पंतप्रधानकीच्या कारकिर्दींत डॉ. खरे यांनीं योगशास्त्र व निसर्गोपचार यांचाहि पुरस्कार केलेला आढळून येतो. लोणावळें येथील स्वामी कुवलयानंद ( पूर्वाश्रमींचे श्री. बाळासाहेब गुणे ) यांनीं स्थापन केलेल्या सुप्रसिद्ध कैवल्यधाम नामक योगाश्रमांत शिक्षण घेऊन आलेले नागपुरचे डॉ. गोविंद रामचंद्र डोंगरे यांनीं यौगिक व्यायाम व निसर्गोपचार यांच्या साह्यानें रोग्यांना उपचार करणारी आरोग्यधाम नांवाची संस्था नागपुरास त्यावेळीं नुकतीच स्थापन केली होती. ह्या संस्थेचा दुसरा वार्षिकोत्सव डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १७ जुलै १९३८ रोजीं झाला होता. या प्रसंगीं त्यांनीं योगशास्त्राबद्दलची प्राचीन महती वर्णन करून पुढील उद्गार काढले होते. ते म्हणाले, "इतर कशासाठीं नाहीं तरी निदान शरीरसंवर्धनासाठीं तरी योगासनांचा उपयोग खात्रीनें होतो. योगासनांनीं आत्मबळ वाढतें. आपण सामान्य माणसांनीं नुसतें शरीरसंवर्धन व त्यासाठीं व्यायाम हेंच ध्येय डोळ्या-समोर ठेवून पद्धतशीर असा योगासनांचाच व्यायाम घेतल्यास त्यापासून आपला कदाचित् दुहेरी फायदाही होण्याचा संभव आहे."

**मातृभाषेचा अभिमान**

याच समयीं संस्थेचे चालक डॉ. डोंगरे यांनीं संस्थेचा अहवाल व प्रास्ताविक भाषण इंग्रजींतून केलें होतें. डॉक्टर खरे यांनीं त्यांच्या या इंग्रजी भाषणाला उद्देशून त्यावेळीं पुढील उद्गार काढले होते. ते म्हणाले, "आतांच संस्थाचालकांनीं आपला अहवाल इंग्रजी भाषेंत वाचून दाखविला. परंतु मी मात्र माझें भाषण मराठींतून करणार. कारण आपला प्रांत हा मराठी भाषा-भाषी प्रांत आहे. तेव्हां अर्थात मराठी ही आपली मातृभाषा आहे व तीच आपण नेहमी व्यवहारांत उपयोगांत आणली पाहिजे. माझें असें मत आहे कीं, प्रत्येक

मनुष्याला कमीत कमी तीन भाषा अवगत असाव्या. प्रथम मातृभाषा आपल्या नेहमींच्या व्यवहाराला, दुसरी हिंदी किंवा हिंदुस्थानी ही आंतरप्रांतीय व्यवहाराकरतां व तिसरी इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय व्यवहाराकरितां, अशा या तीन भाषा जर आपणाला चांगल्या अवगत असल्या तर सामान्यतः आपलें कोठेंही अडणार नाहीं."

**निशाणबाजीचें शिक्षण**

डॉ. खरे यांच्या कारकीर्दींत घडलेल्या विधायक घटनेमध्यें वर्धा येथील ऋॅडॉक हॉयस्कुलमधील विद्यार्थ्यांना निशाणबाजीचें शिक्षण घेण्याची परवानगी त्यांनीं दिली, ह्या गोष्टीला बरेंच प्राधान्य दिलें पाहिजे. महात्माजीप्रणीत अहिंसेविषयीं चुकीचे ग्रह करून घेणाऱ्या अनेक लोकांना असें वाटतें कीं, महात्माजी अहिंसावादी असल्यामुळें स्वसंरक्षणाच्या शिक्षणाच्या ते विरुद्ध असावेत. पण वस्तुस्थिती तशी नाहीं. १९२५ सालचें 'यंग इंडियाचें' फाईल चाळणारांना उमरावतीच्या हनुमान व्यायाम मंडळांत महात्माजींनीं केलेल्या भाषणाचा अधिकृत वृत्तांत वाचावयास मिळेल. त्या भाषणांत गांधीजींनीं स्पष्ट सांगितलेलें आहे कीं, "हत्यारांचा कायदा हा हिंदी जनतेला मिळालेला ब्रिटिश राजशासनाचा सर्वांत मोठा अभिशाप होय. तो रद्द झालाच पाहिजे. शस्त्र वापरण्याची कला शिकून ज्यानें हस्तगत केली आहे, तोच मनुष्य जर निग्रह करील तर त्याच्या निग्रहालाच अहिंसा हें नांव शोभूं शकेल. जाती, धर्म व पंथ यांच्या निरपेक्ष सर्वांना समानतेनें स्वसंरक्षणाचें शिक्षण देणाऱ्या हनुमान व्यायाम मंडळासारख्या संस्था जितक्या अधिक निघतील तितक्या त्या या देशांत हव्याच आहेत." महात्माजींचा हा दृष्टिकोन डॉ. खरे यांनाही पूर्णपणें परिचित होता. आणि म्हणूनच महात्माजींच्या वास्तव्यस्थानानिकट म्हणजे वर्धेला निशाणबाजीचें शिक्षण देण्याची परवानगी त्यांनीं दिली. ह्या स्तुत्य उपक्रमाबद्दल हिंदुराष्ट्रपती स्वातंत्र्यवीर बॅरि. सावरकर आणि डॉ. मुंजे यांनीं डॉक्टरसाहेबांना पुढीलप्रमाणें अभिनंदनपर पत्रें पाठविलीं.

**स्वातंत्र्यवीरांचें पत्र**

"खऱ्याखुऱ्या बंदुकांनीं निशाणबाजीचें शिक्षण देण्याला व लष्करी शिक्षणाचा

आरंभ करण्याला सरकारची परवानगी मिळविण्यास तुमच्या प्रांतांतील शाळा-कॉलेजांना आतां अडचण उरली नाहीं, हें पाहून आनंद वाटतो. आपण व आपलें सरकार यांनीं प्रगतिपथावर जें हें धडाडीनें पुढें पाऊल टाकलें आहे, त्याबद्दल हिंदुमहासभेतर्फे मी आपलें अभिनंदन करतों."

याच पत्रांत स्वातंत्र्यवीरांनीं डॉक्टरसाहेबांना मध्यप्रांतांत युद्धशास्त्राचें सप्रयोग ज्ञान देणारें व केवळ सैनिकच नव्हेत तर अधिकारीही तयार करणारें अव्वल दर्जाचें एक लष्करी कॉलेज काढण्याची सूचना केली होती.

### डॉ. मुंजे यांचें पत्र

सरदारगृह, मुंबई २
ता. २५ जून १९३८

"प्रिय डॉ. खरे,

आपल्या प्रांताचे मुख्य प्रधान या नात्यानें आपण वर्धा येथील ऋॅडॉक हायस्कूलमध्यें निशाणबाजीचा वर्ग काढावयाला परवानगी दिली, असें मला कळतें. मी अद्याप याविषयीं वृत्तपत्रांतून कांहीं वाचलेलें नाहीं. पण माझा या बाबतींतील माहीतगार विश्वसनीय असून, ही बातमी बरोबर आहे, असें मी समजतों. ही बातमी ऐकून मला फार आनंद झाला; व मी या उपक्रमाबद्दल आपलें मन:पूर्वक अभिनंदन करितों."

× × × ×

### 'महाराष्ट्रां'तील अग्रलेख

"हिंदुस्थानांत जागोजाग लष्करी शाळा स्थापन व्हाव्या व शाळां-कॉलेजांतून निशाणबाजीची सक्ती करण्यांत यावी, याबद्दल डॉ. मुंजे यांचे प्रयत्न सर्वत्र कसे चालले आहेत, हें सर्वश्रुतच आहे. तेव्हां, ना. डॉ. खरे यांच्यासारख्या आपल्या जुन्या स्नेह्यानें प्रांताचीं राज्यसूत्रें हातीं येतांच हाय-स्कुलांतून निशाणबाजीचें शिक्षण देण्याचा उपक्रम केला, या गोष्टीचा डॉक्टर-साहेबांना आनंद व्हावा आणि त्यांनीं मुख्य प्रधानांना धन्यवाद द्यावे, यांत नवल नाहीं" अशा अर्थाची डॉ. मुंजे यांच्या अभिनंदनपर पत्रावर 'महाराष्ट्र'चे संपादक, श्री. दादासाहेब ओगले यांनीं टिप्पणी लिहून ता. २६ जून १९३८ च्या

'महाराष्ट्रां 'त लिहिलेल्या अग्रलेखांत डॉ. खरे यांच्या या धैर्यशाली उपक्रमाबद्दल डॉक्टरसाहेबांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. या अग्रलेखांत ते म्हणतात, "....कालाच्या प्रतिकूलतेमुळें १९२५ सालीं जी गोष्ट डॉ. मुंजे घडवून आणूं शकले नाहींत, तीच गोष्ट आज १९३८ सालीं डॉ. मुंजे यांचेच त्यावेळचे एक सहकारी व मित्र डॉ. खरे, मुख्य प्रधानाच्या पदावरून घडवून आणूं शकले आहेत. त्याचा फायदा या प्रांतानें आज घ्यावा; व इतर प्रांतांतील मंत्रीमंडळांना ही सुधारणा घडवून आणण्याचा कित्ता घालून द्यावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे. ...."

**नागरिक संरक्षक दल बिल**

विद्यार्थ्यांनीं नुसतें बंदुकीचें शिक्षण घ्यावें येवढ्यावरच डॉ. खरे संतुष्ट नव्हते. त्यांची इच्छा नागरिकांमध्यें लष्करीवृत्ति वाढावी व नागरिकांनीं स्वसंरक्षणक्षम व्हावें आणि लष्करी शिक्षण घेऊन गांवोगांवीं तरुण लोक हौसेनें या कामासाठीं पुढें यावे म्हणून त्यांनीं सिव्हिक गार्ड बिल ( नागरिक संरक्षक दल ) कायद्यानें उभारण्यांत यावें अशी योजना केली होती. थोडक्यांत या बिलाचा मथितार्थ असा होता कीं, जिल्हानिहाय दोन हजार तरुण तरी सर्व तऱ्हेनें लष्करी शिक्षण घेऊन तयार व्हावे व या दलाची सर्व व्यवस्था जिल्ह्यांतील म्युनिसिपालिटींनीं निवडलेल्या एका समितीकडे असावी व तिचा अध्यक्ष बिन-सरकारी इसम असावा. हें बिल जर पास झालें असतें तर असें दल उभारण्याचें म्युनिसिपालिटींना कायद्यानेंच भाग पडलें असतें. डॉक्टरसाहेबांनीं हें बिल आपल्या पक्षापुढें ठेवलें. परंतु त्यावेळच्या वातावरणांतील बजबजपुरी आणि त्यांच्या वाढत्या कीर्तिमुळें पक्षांतील त्यांच्या कांहीं सहकाऱ्यांमध्यें उत्पन्न झालेला मत्सर, यामुळें असेंब्ली कॉंग्रेसपक्षांत असा मतप्रचार करण्यांत आला कीं, हें बिल पास करणें म्हणजे सरकारच्या हातीं लोकांच्या विरुद्ध उपयोग करण्याकरितां पोलीससारखी आणखी एक संस्था निर्माण करण्यासारखें आहे.

हा आरोप किती पोकळ आहे हें विषद करून सांगण्याची गरज नाहीं. पोलीस खातें जर मंत्री आपल्या हातीं घेऊं शकतात तर हें बिनसरकारी नागरीक संरक्षक दल उत्पन्न करून त्याचा उपयोग करण्याला काय हरकत होती?

सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, पोलीस खातें आपणाला मिळावें म्हणून ज्यांनीं अनेक खटपटी लटपटी केल्या, त्यांनींच या बिलाला विरोध करावा हें विचित्रच नव्हे काय ?

हें बिल जर पक्षानें पास केलें असतें तर नोकरशाहीकडून त्याला विरोध आला नसता ही गोष्ट बहुतेकांना माहीत होती. हें बिल घेऊन मे १९३८ मध्यें ज्या वेळीं वर्किंग कमिटीची व प्रांतोप्रांतींच्या प्रधानांची मुंबईला सभा भरली होती, त्यावेळीं डॉक्टरसाहेबांनीं सदरहू बिल कॉंग्रेसश्रेष्ठींना दाखवून त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न केला; परंतु कॉंग्रेसश्रेष्ठी त्यांना पदभ्रष्ट करण्याच्या कारस्थानांत गुंतली असल्यामुळें त्यांच्या दृष्टीनें असल्या किरकोळ बाबींकडे लक्ष देण्याला त्यावेळीं त्यांना फुरसत कुठली असणार ! देशाचें दुर्दैव दुसरें काय !

# ' खरे-प्रकरणां 'तून धांवता प्रवास

दडपशाही मनोवृत्तींचें उन्मूलन व विधायक कामगिरी ह्या दोन्ही दृष्टींनें पंतप्रधान डॉ. खरे ह्यांच्या कारकिर्दीचा आतांपर्यंत परामर्ष घेतल्या-नंतर आपण ' खरे प्रकरण ' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रकरणापर्यंत येऊन पोंचतों. एका हातानें टाळी वाजत नाहीं, या मराठी म्हणीप्रमाणें जर असें गृहीत धरलें कीं, डॉ. खरे यांच्या हातून कांहीं तांत्रिक प्रमाद घडले असतील, तर वरील न्यायाला अनुसरूनच असेंही गृहीत धरलें पाहिजे कीं, त्यांचे प्रतिस्पर्धी पं. शुक्ला व पं. मिश्रा व त्यांचेही पाठीराखे असे जे कॉंग्रेस-श्रेष्ठी हे देखील असल्या प्रमादापासून सर्वथा अलिप्त राहू शकत नाहींत. ' खरे प्रकारणां 'तील गुणदोषमीमांसा करण्याचें आम्ही मुद्दाम टाळीत आहोंत. कारण, त्याविषयीं ह्याच ग्रंथांत नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु ले. क. श्री. नानासाहेब केदार हे आपल्या अधिकारवाणीनें या विषयाचा परामर्ष घेणारच आहेत व तो आम्हांला सर्वस्वी मान्यही आहे. तथापि, ह्या प्रकरणांत घडलेल्या मुख्य मुख्य घटनांचा निर्देशही न करितां पुढें जाणें, चरित्रानुसंधानाच्या दृष्टीनें योग्य होणार नाहीं, म्हणूनच केवळ त्यांचा धावता उल्लेख करणें अवश्य होत आहे.

**मंत्रीमंडळांतील बेबनाव**

मागें वर्णिल्याप्रमाणें डॉ. खरे यांची प्रधानमंत्री या नात्यानें कारकीर्द जमूं लागली असतांना प्रांतांतील राजकीय क्षितीजावर वादळी मेघ जमा होऊं लागल्याचें दृश्य दिसूं लागलें होतें. प्रधानमंत्री व त्यांचे सहकारी यांच्यांत अनेक लहानसहान गोष्टींवरून मतभेद निर्माण होऊन ते विकोपास जात असल्याची कुणकुण प्रांतभर ऐकूं येत होती. शरीफ प्रकरणापासूनच ही कुणकुण वाढूं लागली होती आणि तिला १९३८ च्या उन्हाळ्यापर्यंत बरेंच तोंड फुटलें होतें. अखेरीस ३८ च्या मे महिन्यांत पं. रविशंकर शुक्ला, पंडित द्वारकाप्रसाद मिश्रा व पं. दुर्गाशंकर मेहता या महाकोशलीय मंत्रीत्रयांनीं आपले राजीनामे प्रधानमंत्र्याच्या स्वाधीन केल्यामुळें पेंचप्रसंग निर्माण झाला. डॉ. खरे यांनीं हे राजीनामे स्वीकारून त्याच वेळीं दुसरे मंत्री नेमले असते तर त्यांचें तें कृत्य

सर्वस्वी स्वाधिकारांत व लोकशाही घटनानुकूलच झालें असतें यांत शंका नाहीं. पण, आपल्या सहकाऱ्यांच्या बाबतींत एकदम इतकें विकोपास जाणें योग्य नाहीं, आपण अद्यापिही त्यांच्याशीं जमवून घेऊन खेळीमेळीनें प्रांताचा कारभार हांकूं शकूं असें वाटल्यामुळें म्हणा अथवा भविष्य काळांत ह्याच प्रकारांतून प्रचंड वादळ उत्पन्न होऊं शकेल अशी अटकळ न आल्यामुळें म्हणा, डॉ. खरे ह्यांनीं ह्या राजीनाम्यांच्या बाबतींत सामोपचाराचें धोरण स्वीकारून तें कॉंग्रेसश्रेष्ठींच्या समोर ठेवलें. मुंबई येथील कॉंग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीच्या वेळीं कॉंग्रसश्रेष्ठींच्या सांगण्यावरून पंडितमंत्र्यांनीं आपले राजीनामे परत घेतले आणि यापुढील घटना सुरळीत रीतीनें बसविण्यासाठीं पचमढी येथें लौकरच मध्यप्रांत कायदेमंडळांतील कॉंग्रेस सदस्यांची सभा भरविण्यांत यावी व तिला पार्लमेंटरी बोर्डातर्फे मौ. अब्दुल कलाम आझाद व सरदार वल्लभभाई पटेल यांनीं उपस्थित रहावें असें ठरलें.

**पचमढी येथील सभा**

वरील योजनेप्रमाणें डॉ. खरे यांनीं पक्षाचे पुढारी या नात्यानें कॉंग्रेस पंक्षाची सभा ता. २४ मे १९३८ रोजीं पचमढीस बोलाविली. पचमढीसारख्या सह्याद्रीच्या शिखरावर एकांतवासांत जरी ही सभा झाली असली, तरी एकंदर प्रांतीय राजकारणांत तिच्यामुळें परिणामतः अत्यंत मोठी खळबळ उडाली. पचमढीस असाही एक बूट निघाला होता कीं, विवादमान अशा दोन्ही पक्षांना मंत्रीमंडळांतून अजीबात बाहेर काढून पक्षानें आपला निराळाच पुढारी निवडावा व त्याच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र मंत्रीमंडळ बनविण्यांत यावें. याच प्रकरणीं कॉंग्रेसश्रेष्ठींतील कांहीं व्यक्तींकडून लो. बापूजी अणे यांनीं पक्षाचे पुढारी व प्रधानमंत्री बनावे अशी सूचना पुढें आली होती. परंतु या सभेंत अखेरीस खातें-विभागणीच्या बाबतींत कांहीं तात्विक तडजोड मान्य करण्यांत आली व अशा रीतीनें अत्यंत प्रक्षोभजनक परिस्थितींत भरलेली पचमढीची ही सभा, मंत्री-मंडळाचें हें तारूं मतभेदाच्या खडकावर आपटून न फुटतां एकदांची पार पडली.

**भंगलेली कांच**

घड्याळाची कांच एकदां भंग पावली म्हणजे ती पुन्हा सांधली जात

नाहीं, असें फरुखसियर बादशहा व त्याचे मंत्री सय्यदबंधू यांच्या बेबनावाच्या बाबतींत एका उर्दू कवीनें काढलेले उद्गार या ठिकाणींही लागू पडण्यासारखे आहेत. मनुष्य अनेक गोष्टींचा त्याग करू शकतो. परंतु अंत:करणांत उत्पन्न झालेलें मनोमालिन्य सहसा दूर करूं शकत नाहीं. डॉ. खरे व पंडितमंत्री यांच्याही बाबतींत असेंच घडलें. दोष कोणाचाही असो, पण त्यांच्या एकोप्याची कांच पचमढीच्या सभेपूर्वींच भंग पावली होती. तिला जोड देऊन प्रांताचें राजकारण पुढें धकविण्याचा कॉंग्रेसश्रेष्ठींचा प्रयत्न वृथा ठरला. लौकरच मंत्रीमंडळांतील बेबनावाचा हा भुजंग पुन्हा फणा उभारू लागला. खातेंविभागणीच्या बाबतींत पचमढीस ठरलेली तात्विक तडजोड केव्हांच खरीखुरी अमलांत आली नाहीं. ऐक्यमय राजकारणाचें सुंदर सरोवर अधिकच ढवळून निघालें व त्यामुळें प्रांतभर जिकडे तिकडे मनोमालिन्य व कलुषितपणा यांचा चिखल पसरला. डॉ. खरे आपल्या परीनें आटोकाट प्रयत्न करून प्रांतिक राजकारणांतील ही घाण दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत होते. या बाबतींत त्यांच्या मुंबई-पुण्याकडील दौऱ्यांत वृत्त-पत्र प्रतिनिधींनीं त्यांना विचारलेले प्रश्न, त्यांस त्यांनीं दिलेलीं उत्तरें हीं वाचलीं असतां अथवा 'टाइम्स ऑफ इंडियां'त ता. १४ ऑक्टोबर १९३७ रोजीं त्यांनीं प्रसिद्ध केलेलें पत्र वाचलें असतां, आपल्या परीनें प्रांतांतील ही घाण प्रांतांतच छपवून ठेवण्याचा ते कसा प्रयत्न करीत होते, याची कल्पना येऊं शकेल.

### विस्फोट

पंडितमंत्र्यांशीं आपलें इतउत्तर जमणें शक्य नाहीं अशी खात्री पटल्यानंतर डॉ. खरे यांनीं तिन्हीही मंत्र्यांनीं राजीनामे द्यावे म्हणजे आपण नवे मंत्री घेऊन मंत्रीमंडळ बनवूं असा विचार केला. परंतु ह्या वेळेस पंडितमंत्र्यांनीं आपण डॉ. खरे यांस राजीनामे देण्यास बांधलों नाहीं, आपण पार्लमेंटरी कमिटी सांगेल तर केव्हांही राजीनामे देऊं, असें म्हणण्यास सुरुवात केली. पूर्वी आपले राजीनामे प्रधानमंत्री या नात्यानें डॉ. खरे यांच्या स्वाधीन करणाऱ्या पंडितमंत्र्यांच्या मुखांतून या वेळेला निघणारी ही भाषा बरीच मनोरंजक होती. ह्याच वेळीं हेंही ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, वऱ्हाडचे

दोन्ही मंत्री ना. दादासाहेब गोळे व बॅ. रामराव देशमुख यांनीं आपले राजीनामे डॉ. खरे यांच्या स्वाधीन केले होते. पंडितमंत्री बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या सल्ल्या-वरून राजीनामे देण्यास तयार नाहींत असें पाहिल्यावर डॉ. खरे यांनीं स्वत:च्या राजीनाम्यासह वऱ्हाडच्या दोन्ही मंत्र्यांचे राजीनामे ता. २० जुलै १९३८ रोजीं गव्हर्नराकडे पाठवून दिले. बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं पंडितमंत्र्यांना राजीनामा न देण्याचा हा जो सल्ला दिला तो त्यांनीं कोणत्या आधारावर दिला? असा गैरकायदेशीर सल्ला देऊन त्यांनीं स्वत:च शिस्तभंग केला नाहीं काय? आपल्या पुढाऱ्याविरुद्ध बंड करण्याला राजेंद्रबाबूंनींच पंडितमंत्र्यांना प्रोत्साहन दिलें नाहीं काय? गव्हर्नरनेंही या राजीनाम्यांचा स्वीकार करून राजीनामे न देणाऱ्या तीनही महाकोशल पंडितमंत्र्यांना बडतर्फ करून अशा रीतीनें जुनें मंत्रीमंडळ विसर्जित करून टाकलें आणि डॉ. खरे यांस पुनश्च पाचारण करून नवीन मंत्रीमंडळ बनविण्यास सांगितलें.

**डॉ. खरे यांचें दुसरें मंत्रीमंडळ**

गव्हर्नरांच्या सांगण्याप्रमाणें जुनें मंत्रीमंडळ बरखास्त झालें असल्यामुळें डॉ. खरे यांनीं पक्षाचे पुढारी या नात्यानें लगेच म्हणजे ता. २१ जुलै रोजीं नवीन मंत्रीमंडळ बनविलें व त्यांत महाकोशलतर्फे रायपुरचे ठाकूर प्यारेलालसिंग आणि हर्दाचे तरुण हरिजन कॉंग्रेस आमदार श्री. अग्निभोज आणि वऱ्हाडतर्फे श्री. दादासाहेब गोळे व बॅरिस्टर रामराव देशमुख यांनाच पुन्हा आपल्या नवीन मंत्रीमंडळांत समाविष्ट करून घेतलें. मागील मंत्रीमंडळांत हरिजनांचा कोणी प्रतिनिधी नव्हता. परंतु ती उणीव या खेपेस डॉ. खरे यांनीं भरून काढली. श्री. अग्निभोज हे तरुण हरिजन पुढारी असून हे ह्यावेळीं नुकतेच नागपूर विद्यापीठाचे पदवीधर झाले होते व येथील लॉ कॉलेजांत कायद्याचा अभ्यास करीत होते.

**वर्किंग कमेटीची इतराजी**

डॉ. खरे यांनीं अशा रीतीनें मंत्रीमंडळाची खांदेपालट केली आहे हें कळल्यामुळें कॉंग्रेस वर्किंग कमिटीची त्यांच्यावर अतिशय इतराजी झाली. इकडे डॉ. खरे नवीन मंत्रीमंडळ बनवीत असतांना तिकडे महाकोशलचे तीनही पंडित-

मंत्री आपलें गाऱ्हाणें घेऊन महात्माजींचा सल्ला घेण्यासाठीं वर्धेस गेले. पण महात्माजींनीं सल्ला न दिल्यामुळें तेथेंच त्यावेळीं जमलेल्या वर्किंग कमिटीच्या सदस्यांजवळ जाऊन ते पोंहोंचले. वर्किंग कमिटीकडे अथवा पार्लमेंटरी बोर्डा-समोर हें प्रकरण न आणतां डॉ. खरे यांनीं परस्पर नवें मंत्रीमंडळ बनवावें ही गोष्ट वर्किंग कमिटीच्या श्रेष्ठींनीं पसंत केली नाहीं. त्यांनीं तावडतोब डॉ. खरे यांस या बाबतींत भेटीस बोलावलें. नव्या मंत्रीमंडळाच्या घटनेबाबत बराच वाद-विवाद व चर्चा होऊन असें ठरलें कीं, डॉ. खरे यांनीं आपल्या सर्व सहकाऱ्यांसह राजीनामा द्यावा, पक्षाची सभा पुनरपि बोलावण्यांत यावी आणि पक्षानें पुन्हां आपला पुढारी निवडावा व ह्या पुढाऱ्यानें नंतर आपलें मंत्रीमंडळ बनवावें.

## दुसऱ्या मंत्रीमंडळाचेंही विसर्जन

हा वेळपावेतों डॉ. खरे पार्लमेंटरी बोर्ड व कांग्रेस वर्किंग कमिटी यांच्या नियंत्रणानुसारच वागत होते. वर्किंग कमिटीच्या सांगण्यावरून आपण दुसरें मंत्रीमंडळ बरखास्त करीत आहोंत, असेंही त्यांनीं गव्हर्नरांस सरदार पटेल व राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांच्या समोर टेलिफोनवरून कळविलें आणि पाठो-पाठ आपला लेखी राजीनामाही ता. २२ जुलै रोजीं गव्हर्नरकडे रवाना केला. डॉ. खरे यांच्या ह्या दुसऱ्या मंत्रीमंडळाच्या सुमारें एक तासच अगोदर डॉ. खरे यांनीं आपल्या या सर्व प्रकरणाची निःपक्षपातानें चौकशी करण्यांत यावी, अशी मागणी केली. त्यावर मौलाना अबुल कलम आझाद यांनीं डॉक्टरसाहेबांना असें स्पष्ट आश्वासन दिलें होतें कीं, डॉक्टरसाहेबांनीं जर या दुसऱ्या मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला तर 'सब रास्ता साफ हो जायगा.' मौलानांचे हे उद्गार म्हणजे डॉक्टरसाहेबांच्या चौकशीच्या मागणीला होकारार्थी आश्वासनच नव्हतें काय? आणि मौलानांच्या या आश्वासनावर विसंबून बॅरिस्टर रामराव देशमूख आणि श्री. दादासाहेब गोळे यांनीं डॉ. खरे यांना या दुसऱ्या मंत्रीमंडळाचा राजीनामा देण्याचा आग्रह केला. डॉक्टर खरे यांचा मात्र मौलानांच्या आश्वासनावर विश्वास बसला नाहीं. व त्याप्रमाणें त्यांनीं रामराव देशमूख व दादासाहेब गोळे यांना स्पष्ट सांगितलेंही होतें. पण, या दोघांनींही डॉक्टरसाहेबांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून त्यांना राजीनामा देण्याचाच आग्रह केला. बॅरिस्टर रामराव

देशमुखांना तर डॉक्टरसाहेबांनीं एकांतांत आग्रह करून परोपरीनें समजून सांगितलें. परंतु त्यांची समजूत पटली नाहीं. अखेर नाइलाजास्तव डॉक्टरसाहेबांना वर म्हटल्याप्रमाणें आपल्या दुसऱ्या मंत्रीमंडळाचा राजीनामा द्यावा लागला. राजीनामा दिल्यानंतर डॉक्टर खरे यांच्या अंदाजाप्रमाणें खरोखरच पुढें मौलानांनीं दिलेल्या चौकशींचें आश्वासन हवेंतच विरलें! या सबंध प्रकरणाची पुढें वर्किंग कमिटीकडून किंवा ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडून केव्हांही चौकशी झाली नाहीं. मौलानांच्या या असत्य आश्वासनाचा परिस्फोट पुढें बॅरिस्टर रामराव देशमूख यांनीं आपल्या राजीनाम्याबाबत असेंब्ली-सभागृहांत जेव्हां वक्तव्य केलें तेव्हां, 'Dr. Khare was right and I was wrong' अशा मोजक्या शब्दांत करून एक प्रकारें मौलाना आझाद यांच्यावर फसवेगिरीचाच आरोप केला नाहीं काय?

**महात्माजींचा मसुदा घेऊन नागपुरास आले**

पुढें पक्षाची सभा बोलावण्यांत येऊन नवीन पुढारी निवडण्याची व्यवस्था करण्यांत आली. ह्या सभेंतील निवडणुकीबाबत आणि कालपर्यंत घडलेल्या घटनांबाबत राष्ट्राध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस यांस डॉ. खरे यांनीं एक पत्र पाठविलें. दुसरें मंत्रीमंडळ विसर्जित केल्यानंतर डॉ. खरे यांनीं आपण हें मंत्रीमंडळ बनविण्यांत चूक केली होती असें कबूल करावें असें त्यांस वर्किंग कमिटीकडून सांगण्यांत आलें. एतद्विषयक एक कच्चा खर्डा डॉ. खरे यांनीं तयार केला व तो महात्माजींना दाखविला. डॉक्टरसाहेबांच्या मूळ मसुद्यापेक्षांही सुमारें दीड पटीनें अधिक मजकुराच्या दुरुस्त्या महात्माजींनीं आपल्या हातानें त्यांत केल्या असल्यामुळें तो आपणास पसंत असल्याचा जबाब डॉ. खरे महात्माजींना देऊं शकले नाहींत. त्यांनीं तो खर्डा आपल्या जवळ ठेवून विचारासाठीं वेळ मागितला आणि तो घेऊन ते नागपुरास परत आले.

**राष्ट्राध्यक्षास पत्र**

यापुढील हकीगत संक्षेपतः डॉ. खरे यांच्याच शब्दांत दिली असतां ती अधिक उद्बोधक होईल. ता. २६ जुलै १९३७ रोजीं नागपुरहून डॉ. खरे यांनीं बॅरिस्टर रामराव देशमुख यांच्या हस्तें पत्र पाठवून राष्ट्राध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस यांस कळविलें कीं, "एकंदर प्रकरणाचा मीं खोल विचार केला. ह्या

बाबतींत माझे मित्र व सहकारी यांच्याशींही विचारविनिमय केला. ज्या मसुद्याची पक्की प्रत करून मी द्यावी असें तुम्ही म्हणतां, तो मसुदाच मला मान्य नाहीं. माझ्या हातून कांहीं शिस्तभंग झाला, ही गोष्टच मुळांत मला मान्य नाहीं. तसेंच मला हेंही मान्य नाहीं कीं, माझ्या कृतीमुळें कॉंग्रेसच्या इभ्रतीला धक्का बसला. कॉंग्रेसमध्यें विश्वासाची व जबाबदारीची जागा घेण्याच्या पात्रतेच्या बाबतींत कांहीं निराधार हेत्वारोप देखील ह्या मसुद्यांत महात्माजींनीं माझ्यावर केले आहेत. ते हेत्वारोपही मला मान्य नाहींत.” ह्यानंतर मंत्रीमंडळाची कॉंग्रेस हायकमांडशीं जबाबदारी सामुदायिक असावी कीं व्यक्तिगत असावी, याची चर्चा करून डॉ. खरे या पत्रांत म्हणाले कीं, “एकएक मंत्री पृथक पृथकपणें कॉंग्रेस हायकमांडला जबाबदार असणें ही लोकशाही राज्यपद्धतीच्या सर्वस्वी विरुद्ध असलेली गोष्ट आहे असें मी समजतों. पक्षानें अमुक पुढारी निवडावा किंवा निवडूं नये, असें वर्किंग कमिटीनें किंवा पार्लमेंटरी कमिटीनें सुचविणें याही गोष्टीच्या मी विरुद्ध आहे. आपला नेता निर्वंधपणें व स्वतंत्रपणें निवडण्याचा अधिकार पक्षालाच असला पाहिजे. आणि पक्ष ज्याला पुढारी निवडील, त्या पुढाऱ्यालाच निर्वंधपणें आपले सहकारी निवडतां आलें पाहिजे. याउपर वर्किंग कमिटीला जर असें वाटत असेल कीं, मी पुढारीपणाच्या निवडणुकीसच उभे राहूं नये, तर तिनें त्या अर्थाचा स्पष्ट हुकूम मला द्यावा आणि एक सचोटीचा शिस्तप्रिय या नात्यानें, त्या हुकुमाचें मी आनंदानें पालन करीन.”

**वर्किंग कमिटीचा ठराव**

डॉ. खरे यांनीं सदर पत्र पाठविल्यानंतर व चुकीच्या कबुलीचा खर्डा महात्माजींनीं दुरुस्त केला त्याप्रमाणें मान्य करून तो सही करून न पाठविल्यामुळें वर्किंग कमिटीनें मध्यप्रांतविषयक प्रकरणावर एक स्वतंत्र ठराव करून त्यांत मध्यप्रांताच्या गव्हर्नरावर कॉंग्रेस पक्षांत फूट पाडण्याचा आरोप केला व डॉ. खरे यांच्यावर आपल्या सहकाऱ्यांविरुद्ध गव्हर्नराशीं संगनमत केल्याचा आरोप ठेवला. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या या ठरावामुळें सर्व देशभर अत्यंत प्रचंड खळबळ उडाली. हिंदुस्थानांतील प्रायः सर्वच जबाबदार वृत्तपत्रांनीं या बाबतींत डॉ. खरे

यांचीच बाजू उचलून धरली. वस्तुतः घटनेच्या व कायद्याच्या दृष्टीनें डॉ. खरे हे राजीनामा देणें अथवा घेणें याबाबत सर्वस्वी गव्हर्नरालाच जबाबदार होते. परंतु, कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या विशिष्ठ भूमिकेमुळें कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या प्रांतोप्रांतींच्या मंत्रीमंडळांना एका परीनें दोन सासवांच्या सुनेसारखी वागणूक ठेवावी लागत होती. कॉंग्रेस वर्किंग कमिटी ही त्यांची सख्खी सासू होती, तर गव्हर्नरांचा अधिकार घटना कायद्यानें घटित असल्यामुळें ते सावत्र सासूसारखे असले तरी, प्रत्यक्षांत त्यांचाच सासुरवास प्रतिदिन त्यांना भोगावा लागत होता. कॉंग्रेसचा सासुरवास, प्रेम व जनतेचा पाठींबा ह्या दोन गोष्टींवर अधिष्ठित होता, तर गव्हर्नरांचा सासुरवास कायदा व साम्राज्यसत्तेचा पाठिंबा, यांच्यावर अधिष्ठित होता. मंत्रीमंडळें कॉंग्रेसनें स्वतःच्या पसंतीचीं नेमून गव्हर्नरांवर लादलीं असल्यामुळें तीं वर्किंग कमिटीला आवडतीं व गव्हर्नरांना तितकींच नावडतीं असणें अत्यंत स्वाभाविक होतें. परंतु नावडतीं असलीं तरी त्यांना नांदविल्याशिवाय गव्हर्नरांना गत्यंतर नव्हतें. ह्या विशिष्ठ परिस्थितीमुळें मंत्रीमंडळें अथवा एखाद्या प्रांताचा प्रधानमंत्री यांचा व कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा मतभेद उत्पन्न झाल्यास एक प्रकारची अडचण व नाजूक परिस्थिति उत्पन्न होत असे. 'खरे प्रकरणीं' डॉ. खरे हे कॉंग्रेसचे पंतप्रधान असल्यामुळें त्यांच्यावर शिस्तभंगाचा आरोप लादीत असतांना 'वर्किंग कमिटीची अशीच 'अडचणी'ची (awkward) व 'नाजूक' (delicate) परिस्थिति झाली होती' असे उद्‌गार जॉन गंथरसारख्या आंतरराष्ट्रीय विख्यातीच्या ग्रंथकारानें देखील आपल्या 'इनसाइड एशिया' नामक सुप्रसिद्ध ग्रंथांत काढलेले आहेत, हेंही प्रस्तुत प्रकरणीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

**'मी कॉंग्रेसमधील मार्टिन ल्यूथर आहें'**

अशा रीतीनें डॉ. खरे यांच्यावर खुद्द कॉंग्रेसश्रेष्ठींचीच इतराजी झाल्यानंतर वरिष्ठांच्या मर्जीकडे पाहून वागणाऱ्या व डॉ. खरे यांस पुढारीपणाच्या जागेवर उमेदवार म्हणून उभे राहण्यास केलेला मज्जाव पाहून पक्षांतील बोटचेप्या सभासदांचीं मतें त्यांच्या विरुद्ध गेलीं असल्यास नवल नव्हतें. कॉंग्रेस पक्षाच्या सभेंत कॉंग्रेसश्रेष्ठींच्या ह्या दृष्टिकोनाचा असर पडून पंडित रविशंकर शुक्ल हे

बहुमतानें पक्षाचे पुढारी निवडून येणेंही स्वाभाविकच होतें. यानंतर झालेली पत्रापत्री, वादावादी अथवा वर्तमानपत्री वक्तव्यें यांचा पल्लवित विस्तार आम्ही ह्या ठिकाणीं मुद्दामच करूं इच्छित नाहीं. मुद्याची गोष्ट अशी कीं, ह्यानंतर वर्किंग कमिटीनें डॉ. खरे यांचेवर शिस्तभंगाचा आरोप लावून त्यांना कॉंग्रेसच्या बाहेर हांकललें. तथापि, कॉंग्रेस संस्थेविषयीं जनतेंत अनादर उत्पन्न व्हावा असें त्यांचें धोरण नव्हतें. त्यांनीं आपल्या अनेक जाहीर भाषणांत हा मुद्दा विशद करून सांगितला कीं, कॉंग्रेस ही आम्हाला व जनतेला मंदिरासारखी पवित्र आहे. हें मंदिर जरी आम्ही पवित्र मानीत असलों तरी मंदिराचे पुजारी अन्यायी आहेत. म्हणून त्यांना दूर करणें हें जनतेचें कर्तव्य आहे. कारण कॉंग्रेस ही जनतेचें पवित्र मंदिर आहे. मार्टिन ल्यूथर यानें ख्रिस्ती धर्मांत सुधारणा सुचविली अथवा पोपशाहीचें बंड मोडून काढलें म्हणून तो धर्मभ्रष्ट ठरत नाहीं. त्याप्रमाणें मी देखील कॉंग्रेसमधील मार्टिन ल्यूथरच आहें. मला कॉंग्रेस हवी आहे. पण सुधारलेली कॉंग्रेस हवी आहे. यापुढें कित्येक दिवसपर्यंत डॉ. खरे स्वतःला 'Protestant Congress-man' म्हणजे 'सुधारक-कॉंग्रेसजन' म्हणवीत असत. आणि महात्मा गांधी, राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र बोस आणि देशांतील इतरही ब-याच प्रमुख कॉंग्रेस पुढाऱ्यांनींही डॉ. खरे यांची देशभक्ति अथवा कॉंग्रेसप्रेम यांबद्दल संदेह व्यक्त केला नाहीं. उलटपक्षीं, त्यांचा आंतरिक मोठेपणा त्यांनीं नेहमीच मान्य केला आणि प्रसंगविशेशीं त्यांच्या गुणांची प्रशंसाही मुक्तकंठानें केली.

**ऑ. इं. कॉंग्रेस कमिटींत 'खरे-प्रकरण'**

वर्धा येथील वर्किंग कमिटीनें केलेल्या ठरावाचा मंजुरीच्या रूपानें फेर-विचार, तिच्यावरील ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत होणें अपरिहार्यच होतें. या कमिटीची बैठक ता. २५ सप्टेंबर १९३८ रोजीं दिल्ली येथें भरली असतांना डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांनीं वर्किंग कमिटीचा मूळ ठराव ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीसमोर मांडला. त्यावर कानपुरचे पं. बाळकृष्ण शर्मा यांनीं अशी उपसूचना आणली कीं, डॉ. खरे यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यांत यावी. या उपसूचनेच्या विरुद्ध डॉ. सन्याल यांनीं अशी दुसरी उपसूचना आणली कीं,

'खरे-प्रकरणा' ची जाहीर व नि:पक्षपाती चौकशी करण्यांत यावी. मूळ ठरावावर डॉ. पट्टाभी यांचेप्रमाणेंच श्री. शंकरराव देव यांचेंही भाषण झालें. ठरावाच्या विरुद्ध भाषण करून लोकनायक बापूजी अणे यांनीं डॉ. खरे यांची बाजू अत्यंत जोरदार रीतीनें कमिटीपुढें मांडली.

**लो. बापूजी अणे यांचें भाषण**

लो. बापूजी अणे म्हणाले, "डॉ. खरे यांनीं निर्णयप्रमाद कबूल केल्यानंतर वर्किंग कमिटीनें हें प्रकरण संपवावयास हवें होतें. तसेंच डॉ. खरे यांना एकदां मुख्य प्रधानकीचा राजीनामा द्यावयास लावल्यावर त्यांना परत पक्षाच्या पुढारी-पणासाठीं उभे राहूं देण्यास हरकत घेण्याचा अगर पक्षाचा पुढारी निवडण्याच्या बाबतींत पक्षाच्या सभासदांवर वजन पडेल असें वर्तन करण्याचा, वर्किंग कमिटीला अधिकार नव्हता. डॉ. खरे यांची चूक त्यांनीं कबूल केलेल्या निर्णयप्रमादापेक्षा भयंकर होती अगर त्यांनीं गव्हर्नराशीं कट केला असें वर्किंग कमिटीला वाटत होतें, तर कमिटीनें त्यांच्याकडून प्रधानपदाचा राजीनामा घेण्यापूर्वीं तसें त्यांना सांगावयास हवें होतें. डॉ. खरे यांचें वर्तन विश्वासघाताचें झालें असें म्हणण्यास वर्किंग कमिटीजवळ काय पुरावा आहे?"

**'महाकोशल मंत्रीच बंडखोर आहेत'**

बापूजी पुढें म्हणाले, "मुख्य प्रधानांच्या हुकुमाप्रमाणें तिघा महाकोशल मंत्र्यांनीं राजीनामा देण्याचें नाकारलें तेव्हां तेच खरे बंडखोर आहेत. मुख्य प्रधानांच्या हुकुमाला धाब्यावर बसवून राजीनामे देऊं नका असा सल्ला देण्याला बाबू राजेंद्रप्रसाद यांना काय अधिकार होता?" असा सवाल करून या प्रकरणांत वर्किंग कमिटीनें सूडबुद्धीनें वागूं नये, अशी बापूजींनीं या भाषणांत शेवटी कळकळीची विनंति केली होती.

वरीलप्रमाणें आलेल्या दोन उपसूचनांपैकीं पं. बाळकृष्ण शर्मा यांची उपसूचना कमिटीस मंजूर झाली आणि १५१ विरुद्ध ६१ मतें पडून ह्या उप-सूचनेसह मूळ ठराव पसार झाला. परंतु ह्या मतमोजणीच्या रूपानें एक गोष्ट स्पष्टपणें दिसून आली. ती ही कीं, ज्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत ही चर्चा झाली, तिच्यांतील एक तृतीयांश लोकमत दणदणीतपणें डॉ. खरे यांच्या बाजूचें होतें.

**शुक्ला मंत्रीमंडळ व हरिजनांचा सत्याग्रह**

अशा रीतीनें डॉ. खरे यांस काँग्रेसमधून हद्दपार केल्यानंतर लौकरच प्रांतांत पं. रविशंकर शुक्ला यांच्या नेतृत्वाखालीं नवीन मंत्रीमंडळ स्थापन झालें. या मंत्रीमंडळांत उमरावतीचे श्री. संभाजीराव गोखले, नागपुरचे सेठ छगनलाल भरुका, आणि पूर्वीच्या खरे मंत्रीमंडळांतील महाकोशलमधील पं. मिश्रा व पं. दुर्गाशंकर मेहता हे चार इसम पं. शुक्ला यांनीं आपल्या मंत्रीमंडळांत (बहुधा काँग्रेस-श्रेष्ठींच्या आज्ञेवरून) घेतले. या मंत्रीमंडळांत हरिजनांपैकीं कोणीही इसम मंत्री म्हणून घेण्यांत आला नसल्यामुळें नागपुरचे प्रसिद्ध हरिजन पुढारी श्री. हेमचंद्रराव खांडेकर यांनीं महात्माजींना पत्र पाठवून शुक्ला मंत्रीमंडळांत एकही हरिजन उमेदवार घेण्यांत न आल्यामुळें आपली तीव्र नापसंति दर्शविली. इतकेंच नव्हे तर हरिजनांवर झालेल्या या अन्यायाचें परिमार्जन होईपर्यंत सेवाग्राम येथील गांधीजींच्या आश्रमापुढें सत्याग्रह करण्याचीही त्यांनीं महात्माजींना धमकी दिली. या प्रांतांत मुसलमानांपेक्षां हरिजनांच्या लोकसंख्येचें प्रमाण किती तरी अधिक असूनही त्यांच्यापेक्षां मुसलमानांचें कोडकौतुक करण्यांत व त्यांचे हट्ट पुरे करण्यांत महात्माजी सदैवच कसे तत्पर असतात, यासंबंधींही श्री. खांडेकर यांनीं आपल्या पत्रांतून स्पष्टपणें उद्गार काढले होते. परंतु त्यांच्या या सर्व खटाटोपीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. शेवटपर्यंत शुक्ला मंत्रीमंडळांत हरिजन इसम घेण्यांत आला नाहीं.

**काँग्रेसमध्यें येण्याचें डॉ. महमूद यांचेकडून निमंत्रण**

काँग्रेसमधून डॉ. खरे यांना हद्दपार केल्यावरही त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र बोस, वर्किंग कमेटीच्या सदस्य सौ. सरोजिनी नायडू, मद्रास काँग्रेस मंत्रीमंडळाचे मजूर-मंत्री बॅरिस्टर गिरी यांनीं डॉक्टरसाहेबांच्या घरीं जाऊन त्यांच्या भेटी घेतल्या आणि आपल्या खाजगी मित्रत्वाच्या नात्यास या प्रकरणानें यत्किंचित्-ही बाध आला नसल्याचेंच जणूं काय त्यांनीं जनतेच्या निदर्शनास आणलें. १९४२ मध्यें वर्धा येथील वर्किंग कमिटीची सभा आटोपून तिचे एक सदस्य पाटण्याचे डॉ. सय्यद महमूद यांनीं तर मुद्दाम नागपुरास मुद्दाम डॉक्टरसाहेबांच्या घरीं जाऊन त्यांची मुलाखत घेतली. या मुलाखतींत त्यांनीं पूर्वीचें झालें गेलें

सर्व विसरून, पुन्हा काँग्रेसमध्यें यावें, अशी डॉक्टरांना कळकळीची विनंति केली. तसेंच नागपुरांत भरलेल्या जाहीर सभेंतही भाषण करतांना डॉ. महमूद यांनीं, 'डॉक्टरसाहेबांनीं पुन्हा काँग्रेसमध्यें सामील होऊन देशाची सेवा करावी' असे जाहीर उद्गार काढले होते.

## 'खरे-प्रकरणा'चा प्रतिध्वनी

डॉ. खरे प्रधानमंत्री असतांनाच नागपूर म्युनिसिपल कमिटीची निवडणूक काँग्रेसपक्षातर्फे लढविण्यांत आली होती. आणि तींत काँग्रेस पक्ष पूर्ण विजयी होऊन म्युनिसिपल कमिटीचे अध्यक्षोपाध्यक्ष अनुक्रमें श्री. गजाननराव ढवळे, वीर हरकरे आणि श्री. ए. श्री. पटवर्धन हे निवडून आले होते. परंतु हे तिघेही डॉ. खरे यांचे अनुयायी असल्यामुळें त्यांनाही डॉ. खरे यांचेवरील काँग्रेसश्रेष्ठींच्या इतराजीचें प्रायश्चित्त भोगावें लागून म्युनिसिपल कामिटींतील आपल्या अधिकारांचा त्याग करावा लागला. पैकीं, वीर हरकरे यांना डॉ. खरे यांच्यातर्फे त्यांनीं ठिक-ठिकाणीं प्रचार केला म्हणून प्रांतिक काँग्रेस कमिटीनें त्यांचेजवळून उपाध्यक्ष-पदाचा राजीनामा मागीतला व तो त्यांनीं दिलाही. श्री. ढवळे आणि पटवर्धन यांना 'इत:पर प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळाच्या परवानगीशिवाय काँग्रेसचे सभासद होण्याचीही परवानगी देण्यांत येऊ नये,' अशा अर्थाचा निर्णय, स्वर्गीय सेठ जमनलाल बजाज यांनीं, या प्रकरणीं त्यांना लवाद नेमण्यांत आलें असतांना आपल्या निकालांत दिला आहे. या प्रकरणीं त्या वेळच्या काँग्रेस मंत्रीमंडळानें म्युनिसिपल कमिटीच्या या पदाधिकाऱ्यांना अधिकारा-वरून काढण्यास दोन तृतीयांश मताचा म्युनिसिपल कायद्याचा नियम धाब्यावर बसविला. या तीन इसमांना अधिकारावरून काढून टाकण्यासाठीं स्वतःला कट्टर काँग्रेसजन म्हणविणाऱ्या म्युनिसिपालिटींतील कांहीं सदस्यांनीं कशा किळसवाण्या कारवाया केल्या, त्यांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे.

# महायुद्धाच्या वणव्यांत

## 'खरे-प्रकरणां'बाबत जनतेची उत्सुकता

प्रधानमंत्रीपदाचा त्याग केल्यानंतर डॉ. खरे यांचा सुमारें एक वर्षाचा काळ, वर्किंग कमिटीशीं झालेल्या वादावादीची धामधूम, उत्तरें प्रत्युतरें आणि संबंध महाराष्ट्रांत केलेले लांबलांबचे दौरे व व्याख्यानें, यांच्यांत खर्ची पडला असें म्हटलें तरी चालेल. महात्मा गांधी व कॉंग्रेस वर्किंग कमिटी यांनीं जाणून बुजून आपणास अन्याय केला आहे, या जाणीवेनें त्यांचें चित्त अत्यंत व्यथित झालें. एका बाजूला कॉंग्रेससुधारणावादाचा व आपणावरील अन्यायाचा मोठ्या धूमधडाक्यानें व निग्रह-कठोरवृत्तीनें त्यांनीं प्रचार चालविला असला, तरी दुसऱ्या बाजूला, त्यांच्या अंत:करणास झालेल्या जखमाच इतक्या खोल होत्या कीं, त्यांचा त्यांच्या मनावर व शरीरावरही परिणाम झाल्याशिवाय राहिली नाहीं. आधींच हृदयाची व्यथा मधून मधून बळाऊ लागलेली होती. तशांत कॉंग्रेस वर्किंग कमिटी व महात्माजींसारख्या बलाढ्य, सर्वसत्ताधारी आणि विश्वविख्यात व्यक्ति व संस्था यांचेशीं एकाकी स्थितींत त्यांनीं जी झुंज घेतली आणि स्वत:च्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून प्रधानमंत्रीपद व कांग्रेसचें सदस्यत्व यांची बरखास्ती स्वत:वर ओढून घेतली; पण, आपल्या मनानें उचित ठरविलेल्या गोष्टींचा आग्रह सोडला नाहीं. त्यांमुळें त्यांचेविषयीं सर्व भारतवर्षांतील जनतेंत एक प्रचंड संवेदनेची लाट उसळली. कांहीं ठिकाणीं ही संवेदना अनुकूल असेल तर कांहीं ठिकाणीं ती प्रतिकूलही असेल. परंतु, एवढी गोष्ट खरी कीं, त्या काळांत कित्येक महिनेपर्यंत 'खरे-प्रकरण' हा एकच विषय हिंदुस्थानच्या सर्व आबालवृद्धांच्या मुखांत खेळत होता. अनुकूल संवेदनेमुळें ज्यांच्या मनांत डॉ. खरे यांचेविषयीं सहानुभूति व सहानुकंपा वसत होती, त्या हजारों ठिकाणचे लोक आपल्या मनांतील भावनेच्या उत्कटतेला अभिव्यक्ति देण्यासाठीं डॉ. खरे यांना आपापल्या भागांत, आपापल्या गांवीं बोलावूं लागले होते. कॉंग्रेसमध्यें असतांना भारतवर्षांतीलच काय, पण खुद्द मध्यप्रांतांतील देखील जनतेनें त्यांना पहाण्याबद्दल अथवा त्यांचें व्याख्यान ऐकण्याबद्दल जितकी

उत्सुकता दर्शविली नसेल त्याच्या सहस्रपटीनें अधिक सबंध हिंदुस्थानांतील जनता 'खरे-प्रकरणा'नंतर डॉ. खरे यांना पहाण्यास व त्यांचें म्हणणें ऐकण्यास आतुर व उत्सुक झाली होती.

**'कॉंग्रेससुधारणावादा'चा प्रचार**

शेंकडों ठिकाणच्या हजारों कार्यकर्त्यांचीं व्यक्तिगत निमंत्रणें स्वीकारणें जरी डॉ. खरे यांना शक्य नव्हतें, तरी बहुतेक मोठमोठ्या ठिकाणचीं निमंत्रणें तेथील लोकांच्या अत्याग्रहावरून स्वतःचें प्रकृतिमान बरोबर नसतांनाही त्यांना स्वीकारावीं लागलीं आणि सबंध महाराष्ट्रभर दौरा करून कॉंग्रेससुधारणावादाचा प्रचार करावाच लागला. ह्या दौऱ्यांतील व्याख्यानांना हजारों लोकांची गर्दी जमत असे. आणि ठिकठिकाणीं गांधीवादी लोकांचा विरोध असूनही डॉ. खरे यांचा अनेक संस्थांच्यातर्फे व व्यक्तींच्यातर्फे जो सहृदय गौरव व सत्कार, मानपत्रें इत्यादि रूपानें करण्यांत येत असे, त्यावरून तरी त्यांच्या लोकप्रियतेनें त्यावेळीं केवढा उच्चांक गांठला होता, याची कल्पना येऊं शकते. जनता-जनार्दनाचा पाठिंबा हेंच जर न्यायाचें गमक मानलें, तर वर्किंग कमिटी व डॉ. खरे यांच्या वादांत न्याय डॉ. खरे यांच्याच बाजूला होता असें, ज्यांनीं डॉ. खरे यांचे हे दौरे पाहिले असतील, त्यांच्या व्याख्यानांना जमणारा अफाट लोकसमुदाय अवलोकिला असेल, ठिकठिकाणच्या प्रचंड जनसंमर्दांनीं प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटांत त्यांचें केलेलें स्वागत ऐकलें असेल आणि 'डॉ. खरे की जय' अशा जयजयकाराचा ध्वनी ज्यांच्या हृदयांत भिनला असेल— त्यांना तरी वाटल्यावांचून खास राहणार नाहीं. अर्थात ह्या दौऱ्यांची दगदग त्यांना फारच जाणवली आणि तिचा त्यांच्या प्रकृतिस्वास्थ्यावरही अतिशय परिणाम झाला यांत शंका नाहीं. त्यामुळें पुढें कित्येक महिनेपर्यंत नितांत विश्रांतिपूर्वक आपली प्रकृति सुधारण्याकडेच त्यांना आपलें सर्व लक्ष द्यावें लागलें. बाकी ही गोष्ट कोणासही नाकारतां येणार नाहीं कीं, हिंदुस्थानच्या राजकीय जीवनांत आजपर्यंत जितक्या खळबळी झाल्या आणि कॉंग्रेसच्या अंतर्गत कारभारांत ज्यामुळें अत्यंत मोठें वादळ झालें, अशा सर्व प्रकरणांत अथवा घटनांत 'खरे-प्रकरणा' ची घटना अधिकच गाजली. आणि गाजलीही

अशी कीं, तिचें विस्मरण आज पांच वर्षें झालीं तरी लोकांना पडूं शकलें नाहीं आणि आणखीही कित्येक वर्षें तें पडणार नाहीं.

**आंतर्राष्ट्रीय परिस्थिति**

ह्या कालांत एकंदर देशांतील व काँग्रेसच्या अंतर्गत काळांतीलही सामान्य परिस्थिति बरीच चिघळत गेली. इकडे आशियाखंडांत जपाननें चीनवर आक्रमण करून युद्धाचा वणवा वर्षादीडवर्षापासून भडकून दिलेला होताच. तिकडे आफ्रिका खंडांत मुसोलिनीसारख्या हुप्या हुकुमशहानें अबिसिनीया-सारखा मागासलेला देश गिळंकृत करून राष्ट्रसंघाच्या राज्यकारणांत प्रचंड वादळ उत्पन्न केलें होतें. आणि खुद्द युरोपांत स्पेनमधील गृहयादवीनें वर्ग-युद्धांचें रूप धारण करून युद्धाची ठिणगी पाडली होती. आणि जणूं काय निरनिराळ्या राष्ट्रांतील पुढाऱ्यांना आपापले स्वयंसेवक, सैनिक, शस्त्रास्त्रे, रणगाडे, हवाई जहाजें इत्यादि पाठवून आपापल्या सामर्थ्याची परीक्षा घेण्याची प्रयोग शाळा म्हणून उपयोगी पडावी, असा स्पेनच्या या गृहयुद्धाचा योगायोग होता. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका ह्या बड्या धेंडांची सहानुभूति जरी स्पेनच्या लोक-पक्षाकडे असलेली दिसत होती, तरी ती केवळ ओंठापासूनची होती, पोटा-पासूनची नव्हती. अखेरीस ह्या गृहयुद्धांत फ्रँकोसारखा हुकुमशहा विजयी होऊन लोकपक्षाचा पराभव झाला. अशा रीतीनें स्पेनचें गृहयुद्ध समाप्त झालें तरी त्यानेंच दुसऱ्या युरोपीय महायुद्धाचा सूत्रपात करून ठेवला असेंच म्हटलें पाहिजे. कारण ह्यानंतर लवकरच नात्झी जर्मनीचा प्रणेता हेर हिटलर यानें डुरकाळ्या फोडण्यास प्रारंभ केला. आणि आपल्या सामर्थ्याच्या बळावर रुहर, अल्सास-लोरेन, सुडेटन, ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया इत्यादि प्रदेश विना लढाइनेंच गिळंकृत करण्यास सुरुवात केली. सोव्हिएट रशियाशीं मैत्री करण्याचें नाटक ब्रिटिश सरकारनेंही चालू ठेवलेंच होतें. पण, ह्या नाटकाच्या पडद्या-मागेंही दुसऱ्याच एका नाटकाचा बनाव घडून येऊन एकमेकांचे कट्टर शत्रू समजल्या जाणाऱ्या सोव्हिएट रशिया व नाझी जर्मनी या दोन राष्ट्रांत मैत्रीचा करारनामा घडून आला.

### राष्ट्रीय परिस्थिति

याच काळांत हिंदुस्थानांत काँग्रेस, ११ पैकीं सहा प्रांतांवर निर्विवाद बहुमताचें राज्य करीत होती. आसाम व सरहद्दप्रांत यांत काँग्रेसच्याच नेतृत्वाखालीं काँग्रेसच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणारीं संयुक्त मंत्रीमंडळें अस्तित्वांत आलीं होतीं. आणि सिंधप्रांतीय कायदेमंडळांत मूठभर असलेले काँग्रेस सदस्य आपल्या विशिष्ट पासंगामुळें मंत्रीमंडळाचा तराजू हवा तसा नाचवीत होते. जरी मंत्रीमंडळांच्या दैनंदिन कारभारांत गव्हर्नर हस्तक्षेप करणार नाहींत, असें आश्वासन ब्रिटिश साम्राज्यसत्तेतर्फें व्हाइसरॉयनीं महात्मा गांधींना दिलें होतें आणि प्रारंभीं प्रारंभीं ठिकठिकाणच्या गव्हर्नरांनींही हें आश्वासन इमानेंइतबारें पाळलें, तरी पुढेंपुढें त्यांचे व मंत्रीमंडळांचें खटके उडण्याचे अनेक प्रसंग उत्पन्न होऊं लागले होते. मंत्रीमंडळांच्या मार्फत जनहिताच्या अधिक मूलग्राही प्रश्नांना हात घालण्याचा काँग्रेसश्रेष्ठींचा इरादा आहे, अधिकारग्रहणामुळें जनतेच्या मनावरील आपली पकड अधिक बळकट करण्यासारखी परिस्थिति काँग्रेसला उपलब्ध झाली आहे आणि ब्रिटिश सरकारचा दबदबा हिंदुस्थानच्या खेड्यांपाड्यांतूनही उत्तरोत्तर कमी होत चालला आहे, हें पाहून साम्राज्यकर्त्यांच्या अंतःकरणांत मोठींच चलबिचल उडूं लागलेली होती. आणि कोणतें ना कोणतें खुसपट काढून काँग्रेसचा कांटा कसा उपटून फेंकतां येईल, याबद्दलच्या त्यांच्या इच्छेच्या पोटींच गव्हर्नर व मंत्रीमंडळें यांच्यांतील बेबनावांचा जन्म होऊं लागलेला होता.

### राष्ट्राध्यक्ष सुभाषबाबूंची कारकीर्द

हरिपुरा काँग्रेसच्या वेळेपासून गव्हर्नर व मंत्रीमंडळें यांच्यांतील बेबनाव दृश्यमान होऊं लागला होता. जागतिक महायुद्धाच्या मेघांनीं राजकीय नभोमंडळ धूसर वर्णाचें झालेलें होतें. आणि हरिपुरा येथील अधिवेशनांतच साम्राज्यशाही युद्धाच्या विरुद्ध व दलित राष्ट्रांच्या बाजूनें काँग्रेसनें आपली भूमिका घोषित केलेली होती. हरिपुरा येथें पहिल्यांदांच काँग्रेसच्या इतिहासांत देशगौरव सुभाषचंद्र बोस हे काँग्रेसचे अध्यक्ष निवडून आलेले होते. सुभाषबाबू नुकतेच युरोपीय देशांतून प्रवास करून आलेले असल्यामुळें

तिकडील परिस्थितीच्या अनुभवजन्य ज्ञानावर काँग्रेसला ते एक विशिष्ट प्रकारचें मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करीत होते. ब्रिटीश साम्राज्य सरकारशीं साक्षात असा लढा जरी काँग्रेसनें थांबविला होता, तरी काँग्रेसच्याच नेतृत्वाखालीं देशभर संस्थानी जनता अरेराव संस्थानिकांच्या विरुद्ध आपापल्या हक्कांचे लढे लढण्यास प्रयुक्त झाली होती. हा सुभाषबाबुंच्या कारकिर्दीचा अत्यंत महत्वाचा विशेष होय. परंतु, सुभाषबाबूंचें हें विशिष्ट मार्गदर्शन व आंतरराष्ट्रीय परिस्थितीबाबत, तसेंच राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाबाबत काँग्रेसला ते देत असलेला दृष्टीकोन, महात्मा गांधी व त्यांचा दृष्टीकोन आणि धोरण मान्य असलेले वर्किंग कमिटींतील प्रमुख सदस्य, यांना संमत नव्हता. 'खरे-प्रकरणां'तही डॉ. खरे यांच्या विरुद्ध सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखालींच वर्किंग कमिटीनें आपले निर्णय घेतले असले, तरी सुभाषबाबूंची आंतरिक सहानुभूति सर्वांशीं डॉ. खरे यांच्याकडेच होती ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे. एक वर्षपर्यंत काँग्रेसच्या राज्यशकटाचें धुरंधरत्व चालविल्यानंतर तें आणखीही कांहीं दिवस-निदान एक वर्ष तरी—आपल्याच हातीं असल्याशिवाय आपल्या विशिष्ट दृष्टी-कोनाचा प्रभावी उपयोग करतां येणार नाहीं हें जाणून, सुभाषबाबूंनीं दुसऱ्या खेपेसाठीं सुद्धां काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचा संकल्प केला.

**सुभाष व पट्टाभि यांचा सामना**

परंतु, महात्मा गांधी व त्यांच्या मताची काँग्रेसश्रेष्ठी यांना सुभाषबाबूंचा हा इरादा पसंत नसल्यामुळें त्यांनीं डॉ. पट्टाभिसितारामय्या यांना आपला जाहीर पाठिंबा देऊन काँग्रेसच्या अध्यक्षीय निवडणुकीसाठीं आपला उमेदवार म्हणून उभें केले होतें. सुभाषबाबू यांचीही लोकप्रियता यावेळीं कळसास पोंचली असल्यामुळें ते पट्टाभींबरोबर झुंज घेण्यास दंड थोपटून उभे राहिले होते. सुभाषबाबूंच्या ह्या निवडणुकीस डॉ.खरे यांनींही एक जाहीर पत्रक काढून आपला पाठींबा दर्शविला होता. ह्या पत्रकांत काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सहा सदस्यांनीं शिष्टसंमत नियमांचेंही उल्लंघन करून आपल्या सन्माननीय अध्यक्षाच्या विरुद्ध पट्टाभीसारख्या सापेक्षत: अल्प प्रसिद्ध उमेदवारासाठीं जी उघड पक्षपातबुद्धि दर्शविली होती, तिचा त्यांनीं झणझणीत निषेध केला होता. आणि 'कहां राजा

भोज और कहां भुजवा तेली' ह्या न्यायानें कोठें सुभाषचंद्र बोस आणि कोठें पट्टाभिसितारामय्या, अशीही तुलना मोठ्या मजेदार रीतीनें ह्या पत्रकांत डॉ. खरे यांनीं करून दाखविली होती. महात्मा गांधी व त्यांचें राजकारण यांचा प्रभाव आजपर्यंत सुमारें २० वर्षें अविच्छिन्नपणें हिंदी जनतेच्या मनावर पडलेला होता. आणि त्यांनीं पाठिंबा दिलेल्या उमेदवाराच्या विरुद्ध उभे राहण्यांत सुभाषबाबुंनीं निःसंशय मोठेंच धाडस दाखविलें होतें. ह्या निवडणुकींत पहिल्यानदांच असा देखावा दिसूं शकला कीं, कॉंग्रेसच्या राजकारणांत महात्मा गांधींचाही पराभव होऊं शकतो. 'सुभाषबाबुंचा जय व पट्टाभींचा पराजय म्हणजे आपलाच पराजय होय' ही गोष्ट ह्या निवडणुकीनंतर महात्माजींनीं स्वमुखानेंच कबुल केली. डॉ. खरे यांनीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या विरुद्ध देशभर दौरा करून जो कॉंग्रेससुधारणावादाचा प्रचार केला आणि सुप्रतिष्ठित पूर्वश्रेष्ठींच्या हातून कॉंग्रेसच्या राजकारणाचीं सूत्रें काढून घेऊन अधिक प्रगमनशील अशा सुधारणावाद्यांच्या हातीं तीं देणें कसें आवश्यक आहे, याबद्दल जी प्रचंड जनजागृति केली होती, तिचा सुभाषबाबुंच्या ह्या विजयाला बराचसा हातभार लागला नाहीं असें कोणी म्हणू शकेल काय?

### त्रिपुरी कॉंग्रेस

महाकोशलमध्यें जबलपुरच्या जवळ नर्मदातटाकीं त्रिपुरी सारख्या प्राचीनेतिहासप्रसिद्ध (आज उजाड असलेल्या) राजधानीच्या ठिकाणीं भरलेलें कॉंग्रेसचें हें ५२ वें अधिवेशन अनेक दृष्टींनीं संस्मरणीय असें झालें होतें. प्रस्तुत चरित्राच्या अनुषंगांत असलेली त्याची संस्मरणीयता अशी कीं, स्वतःच्या प्रांतांत कॉंग्रेसचें अधिवेशन होत असतांना देखील, कॉंग्रेसमधून बहिष्कृत झाल्यामुळें डॉ. खरे हे सार्वजनिक आयुष्यांत पहिल्यांदाच त्यास हजर राहूं शकले नाहींत. वस्तुतः त्यांच्याच पंतप्रधानकीच्या कारकिर्दींत त्रिपुरीच्या अधिवेशनाची तयारी सुरू झालेली होती. आपल्या राजवटींत आपल्याच प्रांतांत होऊ घातलेल्या कॉंग्रेसच्या या अधिवेशनाला यशस्वी करून दाखविण्याबद्दल त्यांनीं आपल्या मनांत केवढे भव्य मनोरे बांधले असतील, याची कोणाही सहृदय वाचकाला सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे.

सुमारें वीस वर्षांपूर्वी म्हणजे १९२० सालीं नागपुरास झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत स्वागत मंडळातर्फे आपल्या सार्वजनिक जीवनाचा तो प्रारंभकाल असतांही त्यांनीं केवढ्या उत्साहानें भाग घेतला होता, याचें पूर्वी वर्णन केलेंच आहे. त्यापेक्षांही ज्यावेळीं त्यांचा अत्युच्च भाग्योत्कर्ष झालेला होता, अशा आपल्या पंतअमात्यगिरीच्या वैभवशील कारकीर्दीत कॉंग्रेसचें अधिवेशन भरवून दाखविण्याचा सुयोग स्वप्रांतास आलेला असतांना, त्या बाबतींत त्यांच्या मनांत कसकशा भव्य आकांक्षा उसळल्या असतील हें कल्पनेनेंही सहज जाणतां येण्यासारखें आहे. जबलपूरपासून सात मैल अंतरावर असलेल्या त्रिपुरीला जाणारी मुख्य सडक सरकारी खर्चानें आणखी सहा फूट रूंद करावी, अधिवेशनासाठीं लागणारी सुमारें पंचवीस एकर जमीन स्वागत मंडळाच्या ताब्यांत देण्यांत यावी, 'सर्व सरकारी खात्यांनीं व त्यांच्या प्रमुखांनीं स्वागत मंडळाशीं सर्वतोपरीनें सहकार्य करावें, इत्यादि गोष्टींना चालना प्रधानमंत्री-पदावर असतांना डॉ. खरे यांनींच दिलेली होती. परंतु दैवदुर्विलास असा कीं, जें अधिवेशन यशस्वी करून दाखविण्यासाठीं आपल्या प्रयत्नांची, अधिकारबळाची, व औत्सुक्याची ते पराकाष्ठा करणार होते, त्याच अधिवेशनापासून त्यांना सर्वथा अलिप्त रहावें लागलें. याप्रमाणें अलिप्त रहात असतांना त्यांच्या अंत:करणास ज्या व्यथा झाल्या, जो पीळ पडला, तो त्यांच्या निकट परिचयाच्या लोकांना स्वानुभवानें माहीत आहे.

### राजकोट येथील महात्माजींचा उपवास

त्रिपुरी कॉंग्रेसच्या संस्मरणीयतेची दुसरी बाजू अशी आहे कीं, ज्या एका विशिष्ट कारणासाठीं डॉ. खरे यांना त्रिपुरी कॉंग्रेसमध्यें उपस्थित राहतां आलें नाहीं, त्याच्या थेट उलट कारणासाठीं महात्मा गांधी देखील या अधिवेशनास उपस्थित राहूं शकले नाहींत. आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, अध्यक्षीय निवडणुकींतील पट्टाभिसितारामाय्या यांचा पराजय महात्माजींनीं आपल्या जिवास फारच लावून घेतला होता. 'पट्टाभींचा पराजय म्हणजे खास आपला स्वत:चाच पराजय होय' ही गोष्ट त्यांनीं उघडपणें लिहून, नव्हे बोलून दाखविली होती. त्याच वेळीं राजकोट येथील प्रजामंडळाच्या गाऱ्हाण्यांचा

प्रश्न विशेष धसास लागला होता. आणि जणू काय, वरील पराजयाच्या वैतागाच्या भरांतच महात्माजी स्वतः राजकोटला निघून गेले होते आणिं जो विफल झाला अशी पुढें त्यांनीं स्वतःच कबुली दिली. तो सुप्रसिद्ध राजकोटचा उपवास त्यांनीं ऐन त्रिपुरी अधिवेशनाच्या सुमारासच सुरू केला होता. त्यांचे प्रतिस्पर्धी तर उघड उघड असें म्हणत होते कीं, सुभाषबाबुंच्या विजयामुळें आपलें नष्टप्राय झालेलें वजन कॉंग्रेसमध्यें पुन्हा प्रस्थापित करण्यासाठींच महात्माजींनीं हा उपवास प्रारंभिला आहे. हा आक्षेप जर खरा धरला तर कॉंग्रेसमधून बहिष्कृत झाल्यामुळें डॉ. खरे त्रिपुरीस जाऊ शकले नाहींत, तर याच्या उलट कॉंग्रेसमध्यें आपलें वजन अधिक वाढविण्यासाठीं महात्माजी त्रिपुरीस हजर राहिले नाहींत असें म्हणावें लागेल. महात्माजींच्या ह्या राजकोटच्या उपवासामागील हेतूवर अथवा त्यांच्या त्रिपुरी येथील अनुपस्थितीवर वरील सारखा आरोप त्या वेळीं अनेकांकडून घेण्यांत आला होता व त्याच दोन अनुपस्थितीमधील विरोधाभास व्यक्त करण्यासाठींच केवळ आम्ही येथें निर्देश केला आहे.

**त्रिपुरीनंतर**

गेल्या दोन वर्षांपासून युरोपांत महायुद्ध भडकणार आहे व त्यांत ब्रिटिश साम्राज्य सरकार स्वतःबरोबरच हिंदुस्थानलाही गुंतविणार आहे, असा अनुभवजन्य परिस्थितीचा कयास सुभाषबाबु देशासमोर मांडीतच होते. त्रिपुरीला, अशा प्रकारच्या युद्धांत ब्रिटिश सरकारनें हिंदी जनतेच्या परवानगी-वांचून हिंदुस्थानला गुंतवूं नये ह्या विषयाबाबत सर्व कॉंग्रेस पुढाऱ्यांचेंही मतैक्यच होतें. सुभाषबाबुंचा मतभेदाचा मुद्दा यापेक्षां निराळाच होता. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, युरोपांतील महायुद्ध भडकण्यास सहा महिन्यांपेक्षां अधिक विलंब लागणार नाहीं. आज ब्रिटिश साम्राज्य सरकार अत्यंत दुर्बळ परिस्थितींत आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर युद्धप्रयत्नांच्या नांवाखालीं आपली पकड अधिक मजबूत करण्यास त्यास वाव सांपडेल. तसा वाव ब्रिटिश सरकारला मिळण्यापूर्वींच आपल्या स्वातंत्र्याचा प्रश्न धसास लावण्याचा हिंदुस्थाननें प्रयत्न केला, तर तो यशस्वी होण्याचा अधिक संभव आहे. म्हणून आजच सहा महिन्यांची मुदत

देऊन स्वातंत्र्याची मागणी करणारा निर्वाणीचा खलीता (ultimatum) ब्रिटिश सरकारला देणें इष्ट व आवश्यक आहे. महायुद्धाची तारीख वर्तविण्याच्या दृष्टीनें सुभाषबाबुंचें भविष्य किती बिनचूक ठरलें हें आतां सर्वांच्याच प्रत्ययास आलें आहे. परंतु, साम्राज्यशाहीविरुद्ध युद्धपूर्वकाळांत अथवा युद्धारंभकाळांत लढा सुरू करणें हें कितपत श्रेयस्कर आहे, याबद्दल काँग्रेसच्या वर्किंग कमिटींतील इतर पुढाऱ्यांचा सुभाषबाबुंशीं मतभेद असल्यामुळें व 'सुभाषबाबुंचा विजय हा आपला पराजयच होय' अशी महात्माजींप्रमाणेंच त्यांचीही धारणा असल्यामुळें, सरदार वल्लभभाई, राजेंद्रबाबू प्रभृति पुढाऱ्यांनीं त्रिपुरी काँग्रेसच्या नंतर वर्किंग कमेटींतून राजीनामे दिले आणि सुभाषबाबूनें सर्वस्वी आपल्या मताशीं अनुकूल असलेली वर्किंग कमिटी बनवावी असा आग्रह धरला.

## सुभाषबाबूंचा राजीनामा

ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठीं सुभाषबाबूंनीं त्रिपुरी नंतर लौकरच कलकत्ता येथें ऑ. इं. काँग्रेस कमिटीची बैठक बोलाविली. वस्तुतः गेला चार पांच महिन्यांचा काळ प्रकृतीच्या दृष्टीनें सुभाषबाबुंना बराच अस्वस्थतेचा गेला होता. तशात काँग्रेसमधील वर्किंग कमेटीच्या जुन्या मुखंडांनीं निर्माण केलेल्या ह्या बेबनावाचाही त्यांच्या मनावर व शरीरावर बराच परिणाम झाला. कलकत्ता येथील ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनांत बहुमत आपल्या विरुद्ध आहे असें पाहून त्यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपल्या प्रमाणेंच सुभाषबाबूवरही एक दिवस राजीनामा देण्याचा प्रसंग येईल असें भविष्य डॉ. खरे यांनीं ता. २ जानेवारी १९३९ रोजीं नागपुरांत भरलेल्या एका जाहीर सभेंत भाषण करतांना वर्तविलें होतें. अखेरीस सुभाषबाबूंनाही अशा रीतीनें काँग्रेस-मधून बाहेर पडावें लागलें, याबद्दल डॉ. खरे यांनी सुभाषबाबूंना अभिनंदनाची तार पाठविली.

## हिंदुमहासभेचें अधिवेशन

ता. २८ डिसेंबर १९३९ रोजीं नागपुर येथें अखिल भारतीय हिंदु महासभेचें अधिवेशन स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर सावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें व थाटानें पार पडलें. १९२० चें नागपुरचें काँग्रेसचें दुसरें अधिवेशन

ज्याप्रमाणें सर्व दृष्टींनीं महत्वाचें झालें, त्याचप्रमाणें अखिल भारतीय हिंदु महासभेचें नागपुरचें हें दुसरें अधिवेशनही सर्व दृष्टींनीं अत्यंत महत्वाचें असें झालें. बॅरिस्टर सावरकर हे या अधिवेशनाला अध्यक्ष लाभल्यामुळें तर या अधिवेशनांत उत्साहाचा नुसता पूर लोटला होता. पहिल्या दिवशीं बॅरिस्टर सावरकर यांचें अध्यक्षीय भाषण ऐकण्यासाठीं महासभेच्या विस्तीर्ण मंडपांत सुमारें ३०–४० हजार लोक उपस्थित होते. बॅरिस्टर सावरकर यांच्या बद्दलची डॉ. खरे यांची गुणग्राहकता प्रसिद्धच आहे. हिंदु सभेच्या राजकारणाशीं डॉ. खरे यांचें आजपर्यंत मोठेंसें सख्य नांदत आलेलें नसलें, तरी बॅरिस्टर सावरकर यांच्या संबंधीच्या गुणग्राहकतेमुळेंच ते या अधिवेशनास उपस्थित राहिले. इतकेंच नव्हे तर अधिवेशनांत हैदराबादच्या लढ्याबद्दलचा ठराव पास होऊन नंतर त्यासाठीं स्वयंसेवकांची नोंदणी चालू असतां, या संकल्पित लढ्यासाठीं डॉ. खरे यांनीं सावरकरांना १०० रुपयाची देणगी दिली. बॅरिस्टर सावरकरांनींही लगेच उठून डॉक्टरसाहेबांची ही देणगी जाहीर करतांना "डॉ. खरे हे आतां मुख्य प्रधान नसले तरी, आम्ही त्यांना अजून मुख्य प्रधानच समजत आहों. आमच्या हृदयाचे पंतप्रधान अद्यापीही डॉ. खरेच आहेत" असे डॉक्टरसाहेबांबद्दल मोठे गौरवपर उद्गार काढले होते. या अधिवेशनाच्या प्रदर्शनाचें उद्घाटन करण्याचा मानही डॉ. खरे यांनाच देण्यांत आला होता.

**हिंदु संघटननिधीची कल्पना**

बंगालमध्यें डाक्का वगैरे ठिकाणीं याच सुमारास मुसलमानांकडून भयंकर अत्याचार झाले होते. मुसलमानांच्या या अत्याचारांचा संघटित रीतीनें प्रतिकार करण्यासाठीं एक हिंदु संघटननिधी उभारण्यांत यावा, अशी डॉ. खरे यांनीं मुद्दाम बॅरिस्टर सावरकरांच्या मुक्कामावर जाऊन त्यांना सूचना केली व लगेच तेथल्यातेथें ५० रुपयांची देणगी हातावर ठेविली. पुढें लौकरच बॅरिस्टर सावरकरांनीं अशा तऱ्हेचा निधी उभारण्याबद्दल एक जाहीर विनंतिपत्रक काढून त्यांत हा निधी उभारण्याची स्फूर्ति आपणाला डॉ. खरे यांच्यापासून मिळाली असें म्हटलें होतें.

## महायुद्धाची ठिणगी पडली

२५ ऑगस्ट १९३९ रोजीं ब्रिटिश वकील नेव्हिल हेंडरसन व जर्मन परराष्ट्र मंत्री फॉं रिबन्ट्रॉप यांच्यामधील पोलंड प्रकरणाचीं समेटाचीं बोलणीं बर्लिनमध्यें ज्या वेळीं मोडलीं, त्याच वेळीं तिकडे हेर हिटलरच्या हुकुमान्वयें प्रचंड यांत्रिक नात्झी फौजांनीं पोलंडच्या सरहद्दींत प्रवेश करून युद्धाचा पुकार केला होता. पोलंडवर जर्मनीनें आक्रमण केल्यास आपण पोलंडच्या साह्यास धावून गेल्याशिवाय राहणार नाहीं, अशी घोषणा इंग्लंडचे तत्कालीन पंत प्रधान मरहूम नेव्हिल चेंबर्लेन यांनीं ब्रिटिश पार्लमेंटांत केलेली होती. किंबहुना 'म्युनिकला हिटलरशीं संगनमत करून चेंबरलेन साहेबांनींच झेकोस्लोव्हाकियाच्या मारेकऱ्याचें काम केलेलें आहे,' या सार्वत्रिक आरोपामुळें लज्जित होऊन अनाहूतपणें चेंबर्लेननें वरील घोषणा केली होती, असें म्हणणेंच अधिक युक्त होईल. तरी पण पोलंडवर जर्मनीचें आक्रमण झाल्यावर सुमारें एक आठवड्या-नंतर म्हणजे ता. ३ सप्टेंबर १९३९ रोजीं ब्रिटिश सरकारनें जर्मनीच्या विरुद्ध युद्ध घोषित केलें आणि दुसऱ्याच दिवशीं ब्रिटिश सरकारच्या अंकित असलेल्या सर्व वसाहतींना देखील ब्रिटिश सरकारच्या हातास हात लावून "मम" म्हणावें लागलें. 'मम' म्हटलें नाहीं फक्त दोघांनीं. एक डी. व्हॅलेराच्या शासनाखालीं असलेला आयर्लंड व दुसरा वफद पक्षाच्या वजनाखालीं असलेला इजिप्त. हिंदुस्थान काय बिचारा! तो तर जाणून बुजूनच इतर वसाहतींपेक्षांही कनिष्ठ स्थितींत असलेला. त्याचें सर्व प्रभुत्व व्हाइसरॉयच्या हातीं. तेव्हां हिंदी जनतेस कोण विचारतो? इतर वसाहतींपेक्षांही अधिक तांतडीनें व्हाइसरॉय साहेबांनीं स्वाधिकारांतच हिंदुस्थानही जर्मनीच्या विरुद्ध युद्धांत सामील झाल्याचें घोषित केलें. हिंदुस्थानपासून सात हजार मैल लांब असेलल्या पोलंडमधील युद्धांत व्हाइसरॉयच्या एका कागदी घोषणेबरोबर चाळीस कोटींचें हें राष्ट्र सहभागी झालें!!

## राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याचा आग्रह

याप्रमाणें युद्धाची ठिणगी पडून हिंदुस्थानलाही युध्यमान राष्ट्रांत ब्रिटिश सरकारनें हिंदी जनतेला न विचारतांच सामील करून घेतल्यानंतर हिंदी राज-

कारणी लोकांच्यापुढें मोठाच अडचणीचा प्रसंग उभा राहिला. नाझी किंवा झोटिंग राष्ट्रांच्या वरवंट्याखालीं रगडल्या जाणाऱ्या दलित राष्ट्रांच्या बाजूनें हिंदुस्थानची आंतरिक सहानुभूति होती व आहे हें खरें; पण, स्वतः हिंदुस्थानच एक दलित राष्ट्र असल्यामुळें राष्ट्रीय सरकारचा पाठिंबा असल्याशिवाय त्यास आपल्या सहानुभूतीला प्रभावी व्यक्तता देणें शक्य नव्हतें. म्हणून राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेबाबत हिंदुस्थानांतील पक्षोपपक्षांनींही आग्रह धरला होता. प्रांतोप्रांतींच्या कायदेमंडळांतून कॉंग्रेस मंत्रीमंडळांनीं युद्धविषयक कॉंग्रेसचा दृष्टिकोन स्पष्ट करणारा ठराव मांडला होता. या ठरावावर मध्यप्रांत कायदे-मंडळांत भाषण करतांना डॉ. खरे यांनीं, "बहुमतवाल्या पक्षानें (कॉंग्रेस पक्षानें) असेंब्लीचे राजीनामे द्यावे" अशी उपसूचना आणली होती. या उपसूचनेच्या समर्थनार्थ केलेल्या भाषणांत त्यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले होते "आज पुनः कॉंग्रेस मंत्रीमंडळें राजीनामे देत आहेत. असेंब्ली-सदस्यत्वाचा राजीनामा कॉंग्रेस सदस्य देत नाहींत. यावरून चार दोन महिन्यांत कांहीं तरी समेट करून पुन्हा मंत्रीपदावर येण्याची कॉंग्रेसला आशा असावी, असें दिसतें. जर कॉंग्रेसला ब्रिटीश सरकारशीं कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें युद्धविरोधी चळवळ खरोखरच करावयाची आहे, तर असेंब्ली सदस्यांनांही तिनें राजीनामे देण्यास सांगितलें पाहिजे. मी असें जाहीर करतों कीं, जर युद्धविरोधासाठीं कॉंग्रेस असेंब्ली सदस्यांना राजीनामे देण्यास सांगेल व ते राजीनामे देतील तर मी देखील आपल्या जागेचा लगेच राजीनामा देईन."

**अंतर्मुख होऊन भूतकालावर नजर टाका**

ह्या उपसूचनेवर भाषण करतांना डॉ. खरे यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले होते—ते म्हणाले, "अत्यंत गंभीर हेतूनें मी ही उपसूचना मांडीत आहे. आजचा काळ अत्यंत आणीबाणीचा आहे. आमच्या राष्ट्राच्या भावी इतिहासाच्या दृष्टीनें तर तो विशेषच आणीबाणीचा आहे. भविष्य काळांत ह्या देशाचें काय होणार याबद्दल प्रत्येकाचें मन **भीतिग्रस्त किंवा आशान्वित** झालेलें आहे. एक हिंदुस्थानी आणि नव्य कॉंग्रेसवादी या नात्यानें मी असें बेधडक म्हणूं शकतों कीं, माझ्या प्रिय मातृभूमीच्या ज्या

अत्युच्च आकांक्षा असतील व जें अत्युच्च ध्येय असेल त्यांशीं माझी एकनिष्ठा, इतर कोणालाही हार जाणारी नाहीं. माझ्या आयुष्याचीं अधिक नसली तरी किमान वीस वर्षें मी आपल्या अल्प शक्तीनें मातृभूमीच्या सेवेसाठीं आजपर्यंत त्यागमय जीवन जगून समर्पण केलीं आहेत.'' ब्रिटिश सरकारनें कॉंग्रेसची राष्ट्रीय सरकारची मागणी झिडकारली याबद्दल डॉ. खरे आपल्या ह्याच भाषणांत म्हणाले, "इतर कोणाहीइतकेंच मलाही ह्याबद्दल वाईट वाटतें. पण, असें कां झालें? थोडें अंतर्मुख होऊन आणि भूतकालावर नजर टाकून आपण ह्या गोष्टिकडे पाहिलें पाहिजे, असें खुद्द महात्मा गांधींनींही म्हटलें आहे. ज्यावेळीं आर्डिनन्सेसना मध्यवर्ति कायदेमंडळांत कायद्याचें स्वरूप देण्यांत येत होतें, त्यावेळीं स्वत: गैरहजर राहून कॉंग्रेस सदस्यांनीं ते कायदे पास होऊं दिले. आज ते जनतेसमोर लढ्याची भाषा बोलतात. पण, लढ्याचा कार्यक्रम कोठें आहे? ब्रिटिश सरकारशीं विनशर्त सहकार्य करण्यांत यावें अशीच महात्मा गांधींचीही युद्धाबाबतची पहिली प्रतिक्रिया होती. पं. जवाहरलाल नेहरू, जे रंगूनहून विमानांत बसून हिंदुस्थानांत आले ते लोकशाही राष्ट्रें व ब्रिटन यांच्याशीं सहकार्य करीत युद्धाच्या धुमश्चक्रींत आपण घुसलें पाहिजे असा घोष करीतच आले.''

युद्ध-समींतीतील डॉक्टर खरे यांचें हें सडेतोड भाषण गव्हर्नर अध्यक्ष असतांनाच त्यांच्या समोर झालें. प्रांतोप्रांतींच्या युद्ध–समीतींतील कोणाही हिंदी सदस्यानें डॉ. खरे यांच्या इतकें सडेतोड भाषण गव्हर्नराच्या समोर छातीठोकपणें केलें असेल काय?

## युद्ध सहकार्य

महात्मा गांधी अथवा पं. नेहरू यांच्या उलट डॉ. खरे यांची युद्धाबाबतची प्रारंभीची प्रतिक्रिया होती. परंतु त्याबरोबरच देशांतील जनतेच्या संरक्षणासाठीं घेण्यांत येत असलेल्या उपायांबाबत जनतेनेंही सरकारशीं सहकार्य करावें, असेंही त्यांस वाटत होतें. तरी पण प्रांतिक कायदेमंडळांतील युद्धपरिस्थितीवरील आपल्या भाषणानंतर ते बरेच दिवस तटस्थ राहिले. पुढें आपणास न विचारतां गव्हर्नर्स आपल्या सेक्रेटरींच्या सहाय्यानें आर्डिनन्सचा अंमल गाजवीत आहेत व आर्डिनन्स जारी झाल्यानंतरही कॉंग्रेस मंत्रीमंडळांनीं सुमारें दोन महिनेपर्यंत सत्तात्याग केला

नाहीं हें पाहून "युद्धाच्या प्रश्नावर असेंब्लीच्या सर्व कॉंग्रेस सदस्यांनीं व कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे द्यावे आणि जर त्यांनीं राजीनामे दिले, तर आम्ही आपल्या असेंब्ली सदस्यत्वाचा राजीनामा देऊन कॉंग्रेसचा त्यानंतर जो कार्य-क्रम व जी चळवळ सुरु होईल, त्यांत आपला कॉंग्रेसशीं असलेला मतभेद विसरून आपण प्रथम उडी घेऊं" असें डॉ. खरे यांनीं असेंब्लींत त्याच वेळीं भाषण करतांना जाहीर केलें होतें.

या तारखेस केलेल्या भाषणांत ते स्पष्ट म्हणाले, "आज कॉंग्रेस गोंधळलेली आहे. निरनिराळे पक्ष उदासीन बनलेले आहेत. अशा वेळीं जनतेचेंही कर्तव्य स्पष्ट आहे. सर्व पक्षांच्या प्रतिनिधींचें राष्ट्रीय सरकार स्थापून हल्लींची राजकीय कोंडी फोडण्यासाठीं व राष्ट्रीय सरकारच्या द्वारां आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून हें युद्ध यशस्वी रीतीनें लौकर संपविण्यासाठीं व देशाचें संरक्षण करण्यासाठीं झटणें हें जनतेचें कर्तव्य आहे. निरनिराळ्या पक्षांनीं आपापले ध्येयवाद तूर्त तरी बाजूला ठेवून ब्रिटिश सरकारशीं बिनशर्त सहकार्य करणें अवश्य आहे. तसें केल्यानें ब्रिटिश जनतेच्या दृष्टींनेंही आपला नैतिक दर्जा फार उंच दिसू लागेल. आणि ब्रिटनला लाज वाटून आमच्या रास्त राजकीय मागण्या मान्य करणें त्याला भाग पडेल. साम्राज्यवाद आज निष्प्रभ होत चालला आहे, हें ध्यानांत ठेवणें अत्यंत महत्वाचें आहे. आणि अशा परिस्थितींत राज्यशासनाच्या व अधिकाराच्या महत्वाच्या जागा लायक हिंदी लोकांच्या हातीं असणें—मग ते कोणत्याही पक्षाचे असोत—अत्यावश्यक आहे. ह्याच मार्गानें हिंदुस्थानचा उज्ज्वल भविष्यकाल उजाडणार आहे. एरवीं मला भविष्यकाल अंधकारमय व रूक्ष दिसत आहे." डॉ. खरे यांची युद्ध सहकार्याबाबतची वास्तविक भूमिका वरील भाषणांत त्यांनीं स्वत:च स्पष्टपणें मांडलेली असल्यामुळें तिच्यावर अधिक प्रकाश पाडण्याचें कारण नाहीं.

### युद्धसमितीचें सदस्यत्व

वरील धोरणास अनुसरूनच प्रांतांत जेव्हां युद्ध-समितीची स्थापना झाली व तीवर जनतेचे प्रतिनिधी घेण्याचें ठरलें, तेव्हां वऱ्हाड-मध्यप्रांत युद्ध-समितीवर काम करण्यासाठीं प्रांताच्या गव्हर्नरांनीं डॉ. खरे यांसही निमंत्रित

केलें. आणि या निमंत्रणाचा स्वीकार करून डॉ. खरे यांनींही समितीवर काम करण्याचें कबूल केलें. युद्ध-समितीवर काम करीत असतां युद्ध-प्रयत्नांबावत सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारी हेळसांड, राष्ट्रीय आकांक्षांना ब्रिटिश सरकारचा असलेला विरोध, मतलबी ब्रिटिश पुढाऱ्यांचीं दुटप्पी भाषणें, सत्तात्याग करण्यासाठीं ब्रिटिश सरकारतर्फे पुढें करण्यांत येत असलेल्या स्वार्थी सबबी आणि हिंदी जनतेसमोर फेंकण्यांत येत असलेले आमिषांचे तुकडे, इत्यादि गोष्टींवर युद्ध-समितीच्या सभांतूनही त्यांनीं झणझणीत कोरडे ओढण्यास कमी केलें नाहींच. रशिया व ब्रिटन यांच्या दोस्तीबद्दल २६ जुलै १९४१ च्या सभेच्या भाषणांत ते म्हणाले, "जेव्हां कोणी असें म्हणतो कीं, अमुक आणि अमुक हे 'Allies' आहेत तेव्हां मला असें म्हणावेसें वाटतें कीं, ते सर्व 'All lies' आहेत." बाहेर देशांत प्रचार करीत असतांना युद्ध-प्रयत्नांबावत सरकार कसा मतलबी प्रचार करते, याबद्दल डॉ. खरे म्हणाले, "हिंदुस्थानी शिपायांच्या शौर्याची मोठी तारीफ करण्यांत येते. पण, फौजेंतील सैनिकांमधला काळा व गोरा हा भेद मात्र अजून नष्ट करण्यांत येत नाहीं. सांगण्यांत येतें कीं, आम्हांला सर्व हिंदुस्थानकडून युद्ध-प्रयत्नांत पाठिंबा मिळत आहे व पाठिंबा देणारे हे लोक जनतेचे प्रतिनिधी आहेत. इंग्लंडचें सरकार नेहमीं म्हणत असतें कीं, पहा शीख, मराठे, मुसलमान इत्यादि सर्वच हिंदी जमातींचे लोक हरतऱ्हेनें आमच्याकरितां रणांगणावर लढत आहेत; ते सर्व हिंदुस्थानचे प्रतिनिधी आहेत. पण, राजकीय हक्क देण्याचा प्रश्न निघाला, म्हणजे तेंच सरकार उलट्या तोंडानें असें बोलूं लागतें कीं, आम्हीं काय करावें? हिंदुस्थानांतील प्रमुख पक्षांचा आम्हांला पाठिंबा मिळत नाहीं. युद्ध-प्रयत्नांशीं हे सर्व पक्ष सहकार्य करीत नाहींत हीच तर त्यांच्या हातांत सत्ता देण्याच्या मार्गांतील मोठी अडचण आहे. सरकारची ही वृत्ति मोठीशी प्रामाणिकपणाची नाहीं. सरकारला जर इमानदारीनें असें वाटत असेल कीं, जे हिंदी लोक रणांगणावर ब्रिटिश साम्राज्यातर्फे आपलें रक्त सांडीत आहेत तेच खरोखर हिंदुस्थानचे—बहुसंख्य हिंदी जनतेचे—खरे प्रतिनिधी होत तर हिंदुस्थानचे हक्क बहाल करणें, हें सरकारचें कर्तव्य ठरतें. मेहरबानी करा व (काँग्रेस व मुस्लीम लीग हे) दोन

मुख्य पक्ष सरकारशीं असहकार करीत आहेत, या गोष्टींचें फालतू थोतांड माजवूं नका."

**खोट्या सबबी**

युद्धकाळांत घटनाविषयक प्रश्न कसा सोडवावा अशा तऱ्हेची जी सबब ब्रिटिश सरकारतर्फे नेहमींच सांगण्यांत येत असते, तिला उद्देशून युद्ध-समितींतील याच भाषणांत डॉ. खरे म्हणाले, "हे दोन प्रमुख पक्ष जेव्हां सरकारला विचारतात कीं, युद्ध व शांतता याबाबतच्या तुमच्या उद्देशांची स्पष्ट घोषणा करा, तेव्हां सरकार म्हणतें, 'छे, आतांच तें कसें करतां येईल? युद्ध लढणें व जिंकणें येवढाच आमचा प्रस्तुत उद्देश आहे.' आम्ही म्हणतों ठीक आहे. पण, शांततेच्या उद्देशाबद्दल तर बोलाल कीं नाहीं? ह्यावर सरकार घुम्यासारखें मूग गिळून बसतें आणि पुन्हा हिंदुस्थानांतल्या अडचणी अशा आहेत आणि तशा आहेत, ही रेंगरेंग सुरु करतें. पण, यापुढें तें बिलकुल चालावयाचें नाहीं. जेव्हां फ्रान्स जर्मनीच्यापुढें ऐन लोटांगण घालण्याच्या बेतांत आला होता, तेव्हां अँग्लो-फ्रेंच युनियनची व ब्रिटिश व फ्रेंच साम्राज्य एक करून दोघांचें मिळून सामान्य नागरिकत्व निर्माण करण्याची सूचना ब्रिटि-शांच्या तर्फेच अर्ध्या रात्रीं पुढें करण्यांत आली नव्हती काय? एका मिनिटांत जर तुम्ही अशी सूचना मांडूं शकतां व तिच्याबाबतचा निर्णय घेऊं शकतां तर मग हिंदुस्थानच्या बाबतींतच तुमचें घोडें पेंड कां खातें?"

**व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाची वाढ**

भारतमंत्री मि. अमेरी यांनीं ८ ऑगस्टच्या घोषणेची जी गर्भधारणा केली, तिचा अकालींच गर्भपात कसा झाला, याचें याच भाषणांत डॉ. खरे यांनीं मोठें मजेदार वर्णन केलें आहे. "एक वर्ष उलटून गेलें"—डॉ. खरे वर्णन करतात, "८ ऑगस्टची घोषणा गर्भपातजन्य बालकासारखी अजून पडून आहे. कदाचित् तिचें पहिलें श्राद्ध सिमल्यासच झालें असावें! आणि समजा, ८ ऑगस्टची घोषणा अमलांत आलीही असती तर कोणती परिस्थिति घडली असती? अगदी त्या घोषणेप्रमाणें दोन तीन हिंदी माणसें व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर नेमण्यांत आलींही असतीं व त्यांच्या ताब्यांत कांहीं खातींही

देण्यांत आलीं असतीं. तरी त्यामुळें हिंदी बहुजनसमाजाच्या ठिकाणीं मोठासा उत्साह निर्माण झाला असता असें मला मुळींच वाटत नाहीं. कारण ह्या माणसांचा बहुजन-समाजाशीं रोजचरोज असा कोणता संबंध येणार आहे ? वस्तुत: बहुजन-समाजाशीं प्रांतिक सरकारांचाच संबंध येतो. आणि प्रांतिक सरकारांचीं कार्यकारी मंडळें, गव्हर्नरांनीं म्हटल्याप्रमाणें, लोकप्रातिनिधिक अशीं सर्व प्रांतांतून बनलीं तरी तेवढ्याच एका गोष्टीनें बहुजन-समाजांत उत्साह उत्पन्न होईल असें मला वाटत नाहीं. 'वैल गेला व झोपा केला' अशी ब्रिटिश सरकारची नेहमीचीच नीति आहे."

**अमेरिकेचें सहाय्य**

अमेरिकेच्या सहाय्यावर विसंबिण्याबद्दल डॉ. खरे म्हणाले, "ब्रिटिश साम्राज्य अमेरिकन लोकशाहीच्या सहाय्यावर वरेंच अवलंबून राहिलें आहे. जरी, अमेरिकेचें हें सहाय्य व्हावयास पाहिजे तितकें होत नाहीं तरी थोडीफार मदत होत आहे यांतही शंका नाहीं. पण, तेंच जर तुम्ही युद्धापूर्वी किंवहुना युद्ध सुरु झाल्यावर तावडतोब जरी हिंदुस्थानची युद्धाच्या दृष्टीनें सर्वतोपरीनें तयारी करण्याचा प्रयत्न केला असतां तरी आज एक निराळाच देखावा नजरेस पडला असता. पण, ब्रिटीश सरकारचा हिंदी लोकांवर विश्वास कुठें आहे ? आणि आमच्यावर तुमचा विश्वास नाहीं हीच तक्रार मी मागच्या वर्षीं सुद्धां केली होतीना ? आमच्यावर विश्वास टाकला असतां तर आजच्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक सैनिक आम्ही तुम्हांस पुरविले असते. आणि तुम्ही हिंदुस्थानचें औद्योगीकरण केलें असतें तर आजच्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक यंत्रसामुग्री व रणसामुग्री हिंदुस्थानांतून तुम्हांला मिळाली नसती काय ?"

**बरोबरीच्या सहकार्याची भूमिका**

याच भाषणाच्या अखेरीस बरोबरीच्या नात्यानें इंग्लंडला अत्याचारी नाझींचा पराजय करण्यासाठीं हिंदुस्थानचें सहकार्य मिळविणें कसें शक्य आहे, याविषयीं डॉ. खरे यांनीं आपले विचार पुढील प्रमाणें प्रगट केले. ते म्हणाले, "सांडलेल्या दुधाबद्दल आतां शोक करण्यांत काय अर्थ ? सरकार यापुढें आपलें धोरण बदलील अशी मला उमेद आहे. संरक्षण सल्लागार मंडळ नेमून आपल्या

धोरणांतील हा बदल सरकारनेंही सूचित केलाच आहे. मला स्वतःला या कमेटीबद्दलही मोठासा उत्साह वाटत नाहीं. कारण, इतरांबरोबर माझेंही असें स्पष्ट मत आहे कीं, स्वदेशाच्या संरक्षणाचा संपूर्ण ताबा माझ्याच देशबांधवांच्या हातीं असला पाहिजे. कारण, तो माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तथापि, 'दगडा-पेक्षां वीट मऊ' या न्यायानें सरकार जें आजपर्यंत संरक्षण खात्याचीं कपाटें अगदीं बंद करून बसलें होतें, त्याऐवजीं त्याचीं दारें किंचित् किलकिलीं करून आम्हांस थोडें आंत पाहूं देत आहे. थोडासा विश्वास आमच्यावर टाकूं लागलें आहे त्याचेंच हें लक्षण होय. सरकारच्या साम्राज्यविषयक धोरणाच्या फलस्वरूप हिंदी लोकांना आजपर्यंत जे कष्ट व दुष्परिणाम भोगावे लागले, ते आज ह्याक्षणीं मी विसरूं इच्छितों व पुन्हा त्यांची आठवण होण्यासारखें सरकार कांहीं करणार नाहीं अशी उमेद बाळगतों. आजच्या ह्या कसोटीच्या प्रसंगीं इंग्लंड व हिंदुस्थान यांचें बरोबरीच्या नात्यानें सहकार्य होणें शक्य झालें पाहिजे आणि दोघांनीं मिळून नाझी अत्याचारांचा खात्मा करून टाकण्यांत यश मिळविलें पाहिजे." वरील भाषणावरून युद्धसहकार्याबाबतचा डॉ. खरे यांचा दृष्टिकोन कोणत्या बाजूनें विकसित होत होता, याची कल्पना येऊं शकेल.

**ए. आर. पी.**

याप्रमाणें युद्धप्रयत्नांशीं अधिकाधिक निकटचें सहकार्य करावें अशी त्यांची अधिकाधिक उत्कटता उत्तरोत्तर दिसून येत होती. स्थानिक हवाई हल्ला प्रति-बंधक योजनेंत त्यांनीं पूर्ण सहकार्य केलेलें होतें. ए.आर.पी. संघटनेचे नागपुरांतील त्यांना चीफ वार्डन नेमण्यांत आलें होतें. आणि चीफ वार्डन या नात्यानें या बाबतींत नागपुरस्थ जनतेचें अधिक उत्साही सहकार्य मिळविण्याचा त्यांनीं आपल्या परीनें कसून प्रयत्न केला. आपल्या विश्वासांतले म्हणून डॉ. बा. पां. दळवीं आणि श्रीमंत गणपतराव बुटी या दोन लोकप्रिय नागरिकांना त्यांनीं डेप्युटी चीफ वार्डन नेमविलें. परंतु जनतेंतील औदासिन्य व अनुत्साह कमालीचाच असल्याचा त्यांना प्रत्यय आला. आणि या औदासिन्याबद्दल ए. आर. पी. संघटनेंतील लोकांची एका जाहीर पत्रकाद्वारें त्यांना खडखडून हजेरी घ्यावी लागली. अस्तु.

**महाविदर्भ परिषद**

नागपूर प्रांत हा बृहन्महाराष्ट्राच्या उत्तरेकडील विभागाचें केंद्र असल्यानें तो, मराठी बोलणाऱ्या सर्व लोकांचा जेव्हां एक प्रांत होईल, तेव्हां त्याशीं म्हणजे मूळ महाराष्ट्राशीं जोडला जावा असेंच इतरांप्रमाणें डॉ. खरे यांना वाटतें. पण, ही भाषावार प्रांतरचना जोंपर्यंत अमलांत येत नाहीं, तोंपर्यंत निदान नागपुरचे चार जिल्हे व वऱ्हाडचे चार जिल्हे अशा आठ जिल्ह्यांचा महाविदर्भ नांवाचा एक स्वतंत्र प्रांत बनविण्यांत यावा, अशी मागणी आज बरेच दिवसांपासून लोकांच्या मनांत घोळत होती. ह्या मागणीला अधिक मूर्त स्वरूप देण्यासाठीं बॅरिस्टर रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं वर्धा येथें ता. १८ ऑगष्ट १९४० रोजीं पहिली महाविदर्भ परिषद बोलावण्यांत आली होती. या परिषदेंत डॉ. खरे यांनीं भाषण केलें होतें. त्यांनीं महाविदर्भाच्या निर्मितीची आवश्यकता आपल्या त्या भाषणांत सोपपत्तिक रीत्या प्रतिपादन केली होती. वस्तुत: या विषयावरील आपलें मत यापूर्वींच त्यांनीं बोलून दाखविलें होतें. भारतमंत्र्यांचे सल्लागार म्हणून कै. डॉ. राघवेंद्रराव यांची नेमणूक झालेली असतांना येथील प्रसिद्ध नागरिक श्रीमंत गणपतराव बुटी यांचेतर्फे त्यांना जी थाटाची मेजवानी देण्यांत आली होती, त्याप्रसंगीं जमलेल्या सुमारें पाऊणशें प्रमुख निमंत्रितांसमोर भाषण करतांना डॉ. खरे यांनीं हींच मतें बोलून दाखविलीं होतीं. या भाषणांत ते म्हणाले, "प्रांतांच्या भाषावार पुनर्घटनेचा प्रश्न आतां पुढें ढकलणें अनिष्ट ठरेल. मध्यप्रांत-वऱ्हाडांतील मराठी प्रदेश हा महाराष्ट्राला जोडून त्याचा वेगळा प्रांत बनविण्यांत यावा; महाकोशल हा युक्तप्रांताला जोडून देऊन गुजरात स्वतंत्र करण्यांत यावा. आपली स्वतंत्र प्रांतघटना करण्यासाठीं आंध्रांची जी चळवळ चालली आहे, तिच्याबद्दल आम्हांला सहानुभूति वाटते."

डॉ. खरे यांच्या या विचारसरणीला डॉ. राघवेंद्रराव यांनींही आपल्या उत्तरादाखल केलेल्या भाषणांत आपली संमति दर्शविली होती.

**रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष**

विश्वविख्यात क्रांतिकारक भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल

डेमॉक्रॅटिक पक्षाचें संमेलन ता. २१ डिसेंबर १९४० रोजीं मुंबई येथील सर कावसजी जहांगीर हॉलमध्यें भरलें असतांना त्याच्या उद्घाटनाचें भाषण करण्याचा मान डॉक्टरसाहेबांनाच मिळाला होता. यावेळच्या भाषणांतही त्यांनीं आपला युद्धसहकार्यविषयक दृष्टिकोन स्पष्ट केला होता. ते म्हणाले, "आम्ही कॉंग्रेसमधून फुटून बाहेर पडलों आणि आळशासारखे स्वस्थ बसून राहिलों तर काय उपयोग? राजकीय पुढारी या नात्यानें आमचे मार्ग व आमचे उपाय आमच्या देशबांधवांसमोर ठेवणें आमचें कर्तव्य आहे. आज कोणतीच देवाणघेवाणाची भाषा आम्ही बोलूं इच्छित नाहीं. शुद्ध देशहित व देशभक्ति यांचेकडे नजर ठेवूनच आम्ही युद्धांत मदत करूं इच्छितों. परंतु असें करीत असतांना आज इतके दिवस उराशीं बाळगलेलीं आमचीं अत्युच्च ध्येयें आम्ही विसरतों असा त्याचा अर्थ नव्हे. त्या ध्येयांच्याकरितां आजपर्यंत आम्ही अनेक वेळेला त्याग केलेला आहे व पुढेंही करूं."

**धर्मनिर्णय परिषद**

हिंदुधर्मातील परिवर्तनवादी महाराष्ट्रीय पंडितांची एक परिषद वर्धा येथें ता. १० एप्रिल १९४१ रोजीं भरली होती. या परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें डॉ. खरे यांनीं जें भाषण केलें, त्यांत हिंदुधर्मासंबंधीं त्यांनीं पुढील उद्गार काढले होते. ते म्हणाले, "धर्म हा डबक्यांतल्या पाण्याप्रमाणें स्थिर व कुजलेली वस्तु नव्हे. तर नदीप्रवाहाप्रमाणें धर्म ही देखील अखंड गतिमान व नित्य परिवर्तनशील बाब आहे. आणि म्हणून देशकाल परिस्थितीस अनुसरून धर्माचे नियम नित्य बदलीत रहाणें आवश्यक आहे. बुद्धि हेंच काय तें मनुष्याचें वैशिष्ट्य आहे. या बुद्धीचाच उपयोग करण्याचें आपण थांबविलें. धर्म हा परिवर्तनीय नाहीं हें म्हणणें चूक आहे. ज्यांनीं ज्यांनीं असा आग्रह धरला त्यांचा ऱ्हासच झाला. धर्माचें मुख्य काम समाजाचें धारण, सातत्य, स्थैर्य आणि प्रगमनशीलता चालविणें हें आहे. हें कार्य आज आमचा धर्म करीत नाहीं. म्हणून आज आम्ही मागें पडलों. धर्मांत पूर्वींच्या काळीं सुद्धां परिवर्तन झालें नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. बुद्धकाळांत वरींच अविवाहित कर्तीसवरतीं माणसें भिक्षु आणि भिक्षुकिणी बनत असत. हीं कर्तीसवरतीं माणसें जर अविवाहित

स्थितींत बुद्धधर्मांत गेलीं तर आपल्या धर्माचा ऱ्हास होईल—कारण लग्न झालेल्या माणसांना भिक्षु किंवा भिक्षुकिणी होतां येत नसे—म्हणून त्यांचीं लग्नें लौकर केलीं म्हणजे हीं विवाहित माणसें भिक्षु आणि भिक्षुणी होणार नाहींत. यासाठीं त्यांचीं लहानपणीं लग्नें करण्यांत येत. हें आपल्या पूर्वजांनीं हिंदुधर्मांत परिवर्तन केलें नाहीं काय? त्या काळच्या स्मृतिकारांनीं 'अष्टवर्षा भवेत् कन्या' हें वचन स्मृतींत घालून मुलींचीं लग्नें लौकर केलीं व त्यायोगें बुद्धधर्मांत बहुसंख्येनें भिक्षु आणि भिक्षुकिणी होण्यासाठीं जाणाऱ्या अविवाहित स्त्रीपुरुषांना धर्मांतर करण्यापासून परावृत्त केलें व आपल्या बुद्धीचा उपयोग करून हिंदुधर्माचा ऱ्हास टाळला हें खरें; पण, आज जर आपण तेंच वचन प्रमाण धरून बसलों तर आजच्या काळीं आठ वर्षांच्या मुलीला वर मिळणेंच कठीण जाईल. पूर्वींच्या काळीं धर्माचें परिवर्तन राजसत्ता व धर्मगुरु यांचेकडून होत असे. परंतु आज राजसत्ता विधर्मीयांची व आपले धर्मगुरु निःसत्व असल्यामुळें आतां हें परिवर्तनाचें काम समाजधुरीणांनींच हातीं घेतलें पाहिजे. आपल्या महाराष्ट्रांत हें कार्य धर्मनिर्णय मंडळ करीत आहे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे."

### आतां तरी अंधश्रद्धा व बुद्धिहीनता टाका

हिंदु जातींतील अंधश्रद्धा व बुद्धिहीनपणाबद्दल बोलतांना डॉक्टरसाहेब म्हणाले, "या मंडळानें मांडलेले प्रमुख सिद्धान्त सर्व बुद्धिवाद्यांना मान्य होण्यासारखेच आहेत. ते सिद्धांत सर्व हिंदु जनतेनें मानावे, म्हणजेच आपली प्रगति होईल. आपण जर अंधश्रद्ध व बुद्धिहीन बनलों तर ६०० वर्षांपूर्वीं महमंद घोरीनें मोठ्या धूर्तपणानें ज्याप्रमाणें आपल्या अंधश्रद्धेचा व बुद्धिहीनपणाचा फायदा घेऊन आपणाला गुलाम बनविलें, तसेंच याहीपुढें आपण गुलामच राहूं. तरी यापुढें आपण अधिकाधिक बुद्धिवादी बनण्याला शिकलें पाहिजे. परंपरा न न सोडतांही आपण अशा गोष्टी करूं शकतों कीं, ज्यायोगें आपण प्रगतिपथावर राहूं. तेव्हां मूळ परंपरा कायम ठेवून प्राप्त परिस्थितीला अनुसरून आपण परिवर्तन घडवून आणलें तर आपला खात्रीनें अभ्युदय होईल. आणि हेंच कार्य धर्मनिर्णय मंडळ आज करीत आहे."

# ऑगस्टमधील क्रांतियुद्ध

## जागतिक महायुद्ध व हिंदुस्थान

सर्व जगभर युद्धाचा डोंब उसळला असतांना आणि लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांचेकरितां आम्ही लढत आहोंत म्हणून आम्हांला या युद्धांत सर्व लोकशाहीवादी व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं मदत केली पाहिजे, असा अधिकार दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्दी वेळींअवेळीं आपल्या भाषणांतून सांगत असतात; पण, तींच लोकशाही व तेंच राष्ट्रीय स्वातंत्र्य यांचीं तत्त्वें हिंदुस्थानला लागू करण्याचा प्रश्न उत्पन्न झाला, म्हणजे मात्र ब्रिटिश मुत्सद्दी हजार सबबी सांगून टाळाटाळ करितात. इतकेंच नव्हे तर जो काय थोडाबहुत लोकशाहीचा देखावा प्रांतिक स्वायत्ततेच्या नांवाखालीं १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वयें सुरू करण्यांत आला होता, त्याचेंही स्वतःच्याच हातानें दफन करण्याची क्षिति ब्रिटिश मुत्सद्यांनीं बाळगिली नाहीं. १९३५ च्या कायद्यांतील केंद्रीय घटनेबाबतचा भाग रद्द करण्यांत आला आणि ही घोषणा हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयनीं निर्विकार मुद्रेनें केली. आणि त्यानंतर ब्रिटिश पार्लमेंटनें देखील युद्ध चालू असेपर्यंत, हिंदुस्थान व ब्रम्हदेशांत कायदेमंडळांच्या निवडणुकी न करण्याचें बिल तितक्याच बथ्थडपणानें पास करून टाकलें. हें बिल पास करतांना आपण आपल्याच हातानें लोकशाहीचें दफन करीत आहोंत याबद्दल तिळमात्र संकोच त्यांना वाटला नाहीं. तत्पूर्वीं अटलांटिक चॅर्टरच्या रूपानें लोकशाहीच्या संरक्षणाचीं कांहीं तत्त्वें विशद करून सांगण्यांत आलीं होतीं. परंतु त्यानंतर ताबडतोब हा 'अटलांटिक चॅर्टर' हिंदुस्थानला मुळींच लागूं करण्यात येणार नाहीं अशी घोषणा ब्रिटिश प्रधानमंत्री मि. चर्चिल यांनीं केली व जी काय थोडीबहुत आशा अटलांटिक चॅर्टरमुळें हिंदी जनतेच्या मनांत उत्पन्न झाली होती, तिच्यावरही पूर्ण विरजण पडलें. येथें जातां जातां हेंही उल्लेखनीय आहे कीं, अटलांटिक चार्टरच्या बाबतींत हिंदुराष्ट्रपति स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर यांनीं अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेन्ट रूझवेल्ट व ब्रिटनचे पंतप्रधान मि. चर्चिल यांना तार करून अटलांटिक चॅर्टर हा हिंदुस्थानला लागूं आहे कीं नाहीं, याबद्दल

स्पष्ट पृच्छा केली होती. ब्रिटिश सरकारच्या ह्या अकरणात्मक धोरणाचा डॉ. खरे यांनींही अनेक वेळां निषेध केला होता.

**क्रिप्स योजना टाकाऊ ठरविली**

लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांसारख्या अगडबंब तत्त्वांचा वारंवार उच्चार करूनही हिंदुस्थानच्या बाबतींत ब्रिटिश सरकारचें धोरण केवळ अकरणात्मकच नव्हे तर अत्यंत प्रतिगामी आहे, ही जाणीव जसजशी हिंदी जनतेच्या मनांत उत्पन्न होऊं लागली, तसतसा स्वतःच्या अगतिक व असहाय्य परिस्थितीचा असंतोष तिच्या मनांत अधिकाधिक खोल रुजत गेला. सर स्टॅफोर्ड क्रिप्स बादशहांची योजना घेऊन हिंदी लोकपक्षांशीं बोलणें करण्यास हिंदुस्थानांत आले; त्यावेळीं पुन्हां एकवार जनतेच्या मनांतील आकांक्षांना अंकुर फुटूं लागले होते. आपल्या आशा सफल होणार असें क्षणभर तीस वाटूं लागलें. परंतु सर्व हिंदी पक्षोपपक्षांनीं 'क्रिप्स योजना' फेंटाळून लावली, क्रिप्ससाहेब अधोवदन होत्साते आले तसेच, हात हालवीत निजधामास चालते झाले! तेव्हां मात्र घोर निराशेचा सर्वत्र प्रादुर्भाव झाला. सनदशीर अथवा सामोपचाराच्या उपायांनीं ब्रिटिश सरकार हिंदी जनतेचे न्यायमूलक हक्कही तिला देण्यास तयार नाहीं अशी हिंदी जनतेची खात्री पटली आणि जनतेचा हा असंतोष कोणत्या रूपानें व कोणत्या मार्गांनीं प्रगट होईल याची सर्वांनाच भीति वाटूं लागली.

**'ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून चालते व्हावें'**

याच वेळीं महात्माजींनीं 'ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून चालते व्हावें' अशी घोषणा 'हरिजन' पत्रांतून सुरू केली. निर्वाणीच्या व आणीबाणीच्या लढ्यास कॉंग्रेस तोंड फोडणार असें स्पष्ट दिसूं लागलें. ८ ऑगष्टच्या पूर्वी वर्धा येथें भरलेल्या कॉंग्रेस वर्किंग कमेटीनें हिंदी स्वातंत्र्याची मागणी ब्रिटिश सरकारनें तावडतोब मान्य न केल्यास पुन्हा एकवार हिंदी जनतेला सत्याग्रहाचें शस्त्र उपसावें लागेल असा ठराव पास केला होता. परंतु, जागतिक महायुद्ध ऐन रंगांत आलेलें असतांना आणि ब्रिटिश सरकार जीवन्मरणाच्या लढ्यांत गुंतलें असतांना ह्यावेळीं जर सामुदायिक सत्याग्रहाचा लढा सुरू केला

तर जबरदस्त दडपशाहीचें व अत्याचारी उपाय योजून सरकार तो लढा दडपून टाकल्याशिवाय राहणार नाहीं; जनतेचे त्यांत व्यर्थ हाल होतील आणि आशाभंग व शक्तिभंग झालेल्या जनतेंत पुन्हां डोकें वर काढण्याची वृत्ति उत्पन्न होणार नाहीं. म्हणून ह्या लढ्यापासून जनतेनें अलिप्त राहिलें पाहिजे असें डॉ. खरे यांचें या प्रकरणीं स्पष्ट मत होतें.

### डॉ. खरे यांचें पत्रक

हें आपलें मत वर्धा येथील वर्किंग कमेटीचा ठराव प्रकट झाल्याबरोबर एक खास पत्रक काढून डॉ. खरे यांनीं प्रसिद्ध केलें होतें. या पत्रकांत त्यांनीं स्पष्टपणें असें म्हटलें आहे कीं, "ह्या चळवळीपासून—जर ती सुरू करण्यांत आलीच तर—हिंदी जनतेनें सर्वथा अलिप्त रहावें. कारण, ह्या चळवळीमुळें स्वातंत्र्य तर मिळणार नाहींच; उलट, आम्ही स्वतःवर आपत्ति मात्र ओढवून घेऊं. कोणाही हिंदुस्थानी माणसाची—मग तो कोणत्याही पक्षाचा असो—ब्रिटनवर अथवा दुसऱ्या कोणत्याही सत्तेवर अवलंबून राहण्याची इच्छा नाहीं. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हा आतां जागतिक प्रश्न झालेला आहे आणि तें मिळविण्यासाठीं जागतिक रणांगणावर हिंदी शिपायी लढत आहेत. शंभरांत नव्वद हिस्से असा संभव आहे कीं, हिंदुस्थानचा स्वतंत्र दर्जा जागतिक राष्ट्राकडून युद्ध संपल्यानंतर मान्य करण्यांत येईल. आणि त्यावेळीं तसा तो मान्य करण्यांत न आला तर आम्ही स्वाभिमानी माणसें, शक्य असेल त्या सर्व उपायांनीं लढून हा दर्जा प्राप्त करून घेऊंच."

### अखेरीस भडका उडालाच

डॉ. खरे यांचा हा इशारा यथार्थ होता कीं अयथार्थ, याची चिकित्सा आम्ही करूं इच्छीत नाहीं. येवढें खरें कीं, मुंबई येथील बैठकींत ऑ. इं काँ. कमिटीनें ८ ऑगस्ट १९४२ रोजीं याबाबतचा आपला ठराव पास करून महात्माजींना व्हॉइसरॉयांना भेटून त्यांच्याशीं बोलणें करण्याचा व तें विफल झाल्यास स्वातंत्र्यासाठीं लढ्याची मोहीम चालविण्याचा सर्वाधिकार देण्यांत आला. महात्माजी व्हॉईसरॉयांना भेटणार होते व त्याबरोबरच त्यांनीं अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट रूझवेल्ट, चीनचे सेनाध्यक्ष मार्शल चँग-कै-शेक व सोव्हियट

रशियांचा प्रमुख भाई जोसेफ स्टॅलिन यांस पत्रें लिहून काँग्रेसची भूमिका विशद करून सांगितली होती. परंतु ह्यावेळीं ब्रिटिश नोकरशाहीनें पहिलाच हल्ला चढविण्याचें ठरविलें. ८ ऑगस्टच्या उत्तर रात्रीलाच मुंबई येथें महात्मा गांधी व वर्किंग कमिटीचे सदस्य यांना अचानक गिरफतार करण्यांत आलें. आणि त्यांच्या पाठोपाठ मुंबईस जमलेले ऑ. इं काँग्रेस कमिटीचे सदस्य व इत रप्रमुख काँग्रेस पुढारी यांनाही कैद करण्यांत आलें. हा दडपशाहीचा वरवंटा येथेंच न थांबतां सर्व देशभर फिरला. प्रांतोप्रांतीं, शहरोंशहरीं व गांवोंगांवीं लहानमोठ्या सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना जागोजाग अटक करण्यांत आली. सरकारचा असा समज होता कीं, पुढाऱ्यांना उखडून काढणें म्हणजे रोगाचें मूळच खोडून काढण्यासारखें होय. पण, सरकारचा हा समज सर्वथा चुकीचा ठरला. कारण रोगाचें मूळ पुढाऱ्यांच्या भाषणांत नव्हतें; त्यांनीं अजून कायदेभंगाचा कार्यक्रमही आंखला नव्हता; वर्ध्यास झालेल्या वर्किंग कमिटीच्या ठरावाची पुनरावृत्ति करण्यापलीकडे ऑ. इं. काँग्रेस कमिटीनें विशेष असें कांहींच केलें नव्हतें. विशेष केलें असेल तर तें इतकेंच कीं, समेटाचीं बोलणीं करण्यासाठीं व्हाईसरॉयच्या भेटीस जाण्याचा महात्माजींना विशेष अधिकार देण्यांत आला होता.

**हा भडका कां उडाला ?**

ह्या परिस्थितीवरून हें स्पष्ट होतें कीं, अद्याप सामोपचारानें प्रकरण मिटविण्याची काँग्रेसची वेडी आशा सुटली नव्हती. परंतु साप समजून भुई बडवावी, त्याप्रमाणें सरकारनें काँग्रेसला तडातड बडविण्यास प्रारंभ केला. पण, ह्यामुळें भडका उडण्याचें थांबलें नाहींच. म्हणूनच आम्ही वर म्हटलें आहे कीं, रोगाचें मूळ काँग्रेसच्या ठरावांत अथवा पुढाऱ्यांच्या भाषणांत नव्हतें, तें होतें युद्धजन्य विशिष्ट परिस्थितींत. सरकारच्या सत्तात्यागाबाबतच्या अकरणात्मक धोरणानें जनतेच्या मनांतील निराशा अत्यंत खोल रुजली होती. आणि तशांत अन्नवस्त्राची महर्घता व दुर्मिळता, ब्रम्हदेशांतून येणाऱ्या निर्वासितांची करुण कहाणी, युद्धप्रयत्नांच्या नांवाखालीं लहानमोठ्या अधिकाऱ्यांनीं शहरांतून काय व खेड्यांतून काय, गोरगरीब जनतेवर व शेठसावकारांवर, शेतकरी कास्तकारांवर व इजारदार-मालगुजारांवर चालविलेला जुल्म, प्रजाहिताच्या बाबतींत

सरकारची दिसून येत असलेलीं आत्यंतिक बेफिकीरी, सबंध देशभर लोकांना वाटूं लागलेली स्वतःच्या जीविताची व मालमत्तेची अशाश्वति; बंगाल, ओरिसा इत्यादि भागांत लोकांच्या चरितार्थाचीं नांवा, बोटी इत्यादि साधनें, सरकारी अधिकाऱ्यांकडून काढलीं जाणें, लष्करी शिपायांकडून गोरगरीबांवर व विशेषतः स्त्रियांवर होत असलेल्या खऱ्या अथवा खोट्या अत्याचारांच्या सर्वत्र प्रसृत होणाऱ्या अफवा, आणि बंगाल-ओरिसामध्यें झालेलीं प्रचंड वादळें व लक्षावधि लोकांचें झालेलें तज्जन्य नुकसान, इत्यादि अनेकविध कारणांची परंपरा, हीच वस्तुतः रोगाचें खरें कारण होती. त्यामुळें कॉंग्रेस पुढाऱ्यांना अटक करूनही रोगाचें मूळ नाहींसें होऊं शकलें नाहीं. उलट, आंतून व बाहेरून दोन्हींकडून वटवृक्षाच्या मूळाप्रमाणें व शाखांप्रमाणें रोग सर्व देशभर पसरलाच.

**भारतमंत्रीप्रणीत क्रांतीचा कार्यक्रम**

८ तारखेला उत्तर रात्रीस व ९ तारखेस कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या जागोजागीं झालेल्या सार्वत्रिक आकस्मिक गिरफदाऱ्यांमुळें देशांतील जनता कांहीं काल स्तिमितच झाली. पण, तिच्या स्तैमित्याला कृतिमान करण्याचें कार्य एका परीनें ब्रिटिश सरकारच्याच एका अत्यंत बड्या हुद्देदारानें केलें. भारतमंत्री मि. लिओ-पोल्ड अमेरी यांनीं ११ तारखेस एक पत्रक प्रसिद्ध करून त्यांत कॉंग्रेसच्या नांवावर आरोपित असा कायदेभंगाचा व क्रांतीचा एक सविस्तर कार्यक्रम प्रसिद्ध केला. या कार्यक्रमांत "तारा तोडणें, रूळ उखडणें, पूल मोडून टाकणें, सरकारी कोर्टकचेऱ्या जाळणें व ज्या ज्या ठिकाणीं ब्रिटिश सरकारच्या अधि-काराचें कोणतेंही चिन्ह दृश्यमान होत असेल, तें तें प्रत्येक ठिकाण नेस्तनाबूद करून टाकणें, सरकारी नोकर, पोलीस व लष्कर यांना फितवणें आणि एकंदर ब्रिटिश सरकारचें सर्व राज्ययंत्र बंद पाडणें, इत्यादि गोष्टी करण्याचें कॉंग्रेसनें ठरविलें होतें. या सर्व गोष्टी होऊं देणें म्हणजे युद्धप्रयत्नांना जबरदस्त अड-थळा येऊं देणेंच होय, म्हणून कॉंग्रेसला व तिच्या पुढाऱ्यांना हा कार्यक्रम अंमलांत आणण्यास कोणतीही फुरसत न देतां वेळींच दडपून टाकणें अवश्य आहे," अशा प्रकारचें सरकारी कृत्याचें समर्थनही भारतमंत्र्यांच्या या वक्तव्यांत करण्यांत आलें होतें.

येथें हीही गोष्ट नमूद केली पाहिजे कीं, मि. अमेरी यांच्या या वक्तव्यानंतर सुमारें १०–१२ दिवसांनीं महात्माजींच्या मराठी 'हरिजन' पत्रामध्यें आचार्य काका कालेलकर यांनीं मि. अमेरींनीं ११ तारखेच्या आपल्या वक्तव्यांत निर्देश केलेल्या कांहीं गोष्टी करण्याची या चळवळींत मुभा आहे, असें जाहीर केलें होतें.

भारतमंत्र्यांचें हें वक्तव्य आणि त्यानंतर सुमारें १०–१२ दिवसांनीं आचार्य काका कालेलकरांच्या वरील आशयाचा हरिजनमधील लेखानें एकपरी त्याला मिळालेला पाठींबा, यामुळें खरोखर कॉंग्रेसचा हाच कार्यक्रम असला पाहिजे अशी जनतेची समजूत होऊन तिनें एकाएकी उठून या कार्यक्रमाची अम्मलबजावणी करणें सुरु केलें.

### सर सी. पी. रामस्वामी यांचें वक्तव्य

अशा रीतीनें क्रियाप्रवण झालेल्या लोकांनीं सर्व हिंदुस्थानभर क्रांतियुद्धाचा एक प्रचंड डोंब उसळून दिला. शेंकडों ठिकाणीं पोलीस कचेऱ्या व तहसिल कचेऱ्या जाळण्यांत तरी आल्या अथवा त्यांवर कॉंग्रेसचें तिरंगी ध्वज उभारण्यांत आले; शेंकडों ठिकाणच्या तारा तोडण्यांत आल्या, शेंकडों ठिकाणीं रेल्वेचे रूळ उखडण्यांत आले व वाहतुक बंद पाडण्यांत आली आणि इतर ज्या ज्या उपायांनीं शक्य होतें, त्या त्या सर्व उपायांनीं जनतेनें आपल्या मनांतील असंतोष प्रकट करून दाखविला. कोर्टकचेऱ्या बंद पडल्या, शाळा–कॉलेजें ओस पडलीं, बाजारपेठा ओसाड बनल्या आणि क्षणभर या देशांतून जणूं काय ब्रिटिश सत्ता लयास गेली आहे, असा देखावा दिसूं लागला. 'ब्रिटिशांनों, चालते व्हा', 'करा अथवा मरा' यांसारख्या घोषणा सर्वंत्र देशभर करण्यांत आल्या. मोठमोठ्या जमावांनीं मिरवणुकी निघाल्या आणि आपण स्वतंत्र आहोंत, असें लोक बोलूं लागले. अर्थात हा सर्व प्रकार पंचहत्यारांनीं सुसज्ज असलेल्या ब्रिटिश सरकाराकडून सहन होणें शक्यच नव्हतें. आपल्या खास अस्तित्वाविरुद्धच हें युद्ध सुरुं झालेलें आहे, असें समजून सरकारनें आधुनिक युद्धांच्या पद्धतीनेंच हें 'बंड' दडपून टाकण्यासाठीं सर्व उपायांचा अवलंब केला. टिकठिकाणीं, गांवागांवांवर फौजा पाठविण्यांत आल्या, बंदुकी, तोफा व विमानें

यांचा उपयोग करण्यांत आला, जपानी शिपायांवर झाडण्यासाठीं निर्माण झालेल्या गोळ्या हिंदी प्रजेच्या शरीरांतून सूं सूं करीत आरपार निघून जाऊं लागल्या. ह्याच सुमारास व्हाइसरॉयच्या वाढलेल्या कार्यकारी मंडळावरील एक मंत्री सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देऊन त्रावण-कोरला गेल्यावर जें एक वक्तव्य प्रकाशित केलें त्यावरून, आमच्या वरील म्हणण्याची यथार्थता वाचकांच्या ध्यानांत येईल. सर सी. पी. रामस्वामी आपल्या ह्या वक्तव्यांत म्हणतात, "आजपर्यंत मी असें समजत होतों कीं, युद्ध हिंदुस्थानच्या बाहेर शेंकडों मैल लांब अंतरावर कुठें तरी चाललेलें आहे. पण, व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर दिल्लीहून त्रावणकोरास येतांना उत्तरे-पासून दक्षिणेपर्यंत मी जें दृश्य सर्वत्र पाहिलें, त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे कीं, युद्ध हिंदुस्थानांतही आलें आहे."

**'नागपूर बंडखोरांच्या हातांत'**

जे प्रकार सर्व हिंदुस्थानभर झाल्याचें मागें वर्णन केलें आहे, तेच प्रकार अधिक तीव्रतेनें नागपुरास घडले. ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या व वर्किंग कमेटीच्या पुढाऱ्यांना महात्माजींसह अटक झाल्याचें कळल्यावर ९ तारखेस नागपुरांत कडकडीत हरताळ पाळण्यांत आला आणि शहरभर लहानमोठ्या मिरवणुकी निघाल्या. संध्याकाळीं चिटणीसपार्कांत डॉ. चोळकर यांच्या अध्यक्षतेखालीं सर्वपक्षीय लोकांची प्रचंड जाहीर सभा भरून तींत सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यांत आला. या सभेच्या वेळीं सुमारें दोन अडीचशें सशस्त्र पोलीस उभे करून सरकारनें आपल्या सामर्थ्याचें जें प्रदर्शन केलें, त्यामुळें लोकांचीं मनें अधिकच प्रक्षुब्ध झालीं. १० ऑगस्ट रोजीं नागपुरांतील शाळा-कॉलेजें ओस पडलीं व मजुरांनीं हरताळ पुकारल्यामुळें गिरण्याही बंद पडल्या. गिरणीमजुर व विद्यार्थी यांच्या मोठमोठाल्या मिरवणुकी निघाल्या आणि पुन्हा संध्याकाळीं चिटणीसपार्कांत मजूर पुढारी श्री. रुईकर यांच्या अध्यक्षते-खालीं प्रचंड जाहीर सभा झाली. सभा भरून पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करण्यांत आली. ९ व १० या दोन्ही तारखांस नागपूर शहर पूर्णपणें शांततेनें वागत होतें. परंतु ११ तारखेच्या दुपारपासून सर्व रंग एकाएकी बदलला. पांच

वर्षांपासून तों १२–१४ वर्षांपर्यंतच्या लहान मुलांनीं मिरवणुकी काढून शहरांतील रस्त्यारस्त्यावरील विजेचे सर्व दिवे फोडून टाकले. १२ तारखेस अत्यंत मोठा डोंब उसळला. तारा तोडून टाकण्यांत आल्या, इतवारी रेल्वे स्टेशनच्या गोडाऊनला आग लावून देण्यांत आली, इतवारी पोस्ट ऑफीस जाळून खाक करण्यांत आलें, शहरांतील पोलीस चौक्या जळून भस्म झाल्या, जिल्हा कचेरीवर तिरंगी ध्वज फडकविण्यांत आला, जागोजागीं दगड, लांकडें, ह्यूमचे मोठमोठाले नळ आडवे टाकून रस्ते बंद करण्यांत आले, तोडलेल्या तारांची जाळीं आडवीं गुंफण्यांत आलीं, सरकारच्या तर्फे पोलीस बेकाम ठरले, व लष्कराचा सर्रास उपयोग करण्यांत आला. शुक्रवार दरवाजा, इतवारी, सितावर्डी, महाल इत्यादि अनेक ठिकाणीं रोज गोळीबारांच्या फैरी झडूं लागल्या. लष्कराची व सिव्हिल पायोनियर फोर्सची सर्व ताकद रस्ते मोकळे कसे राहतील व त्यांवरून लष्करी मोटारी फिरत्या कशा ठेवतां येतील, ह्या एकाच कामांत खर्च पडूं लागली. कोर्ट-कचेऱ्या अजीवात बंद पडल्या आणि सबंध नागपूर शहर लष्करी अधिकाऱ्याच्या अंमलाखालीं देण्यांत आलें. नागपुरांत झालेल्या प्रकारांचें यथार्थ वर्णन करणें या ठिकाणीं जरी शक्य नसलें तरी "सुमारें ७८ तास संपूर्ण नागपूर शहर सर्वस्वी बंडखोरांच्या ताब्यांत होतें" या मध्यप्रांताचे गव्हर्नर सर हेन्री ट्विनॅम यांनीं कांहीं दिवसांनंतर काढलेल्या उद्गारांवरून नागपुरच्या परिस्थितीची कल्पना करतां येण्यासारखी आहे.

## चिमूर, रामटेक, आष्टी व यावली

नागपुरसारखेच प्रकार कमीअधिक प्रमाणांत सबंध वऱ्हाड-मध्यप्रांतभर घडले. पण, विशेषतः चिमूर, रामटेक, आष्टी व यावली या ठिकाणीं झालेल्या उठावण्या अनेक कारणांस्तव लोकांच्या स्मरणांतून जाणें शक्य नाहीं. ह्या सर्व ठिकाणीं जनता व सरकारी अधिकारी यांच्या ज्या चकमकी झडल्या, त्यानंतर ह्या गांवांवर सरकारी लष्करानें जीं आक्रमणें केलीं आणि ह्या आक्रमणांतून जनतेवरील अत्याचाराच्या व विशेषतः स्त्रियांवरील अत्याचारांच्या ज्या कहाण्या प्रादुर्भूत झाल्या, त्यांचें सविस्तर वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि, वरील सर्व गोष्टींचा प्रस्तुत चरित्रांत निर्देश करण्याचें कारण असें कीं, ह्या घडामोडींतून

उद्भवणाऱ्या कांहीं अत्यंत महत्वाच्या प्रकरणाशीं डॉ. खरे यांचा प्रत्यक्ष संबंध आलेला आहे. चिमूर, आष्टी इत्यादि ठिकाणच्या लष्कराच्या ह्या तथाकथित अत्याचारांची निःपक्ष चौकशी व्हावी याबद्दलच्या मागणीनें संबंध हिंदुस्थानचें नभोमंडल कसें दुमदुमून गेलें होतें आणि ह्या मागणींतूनच हिंदी वृत्तपत्रें व सरकार यांचा झगडा कसा निर्माण झाला, इत्यादि वृत्तांत वृत्तपत्रांच्या वाचकांना सुविदीत आहेच.

**फांशीच्या शिक्षांचें सत्र**

डॉ. खरे यांनीं भविष्य वर्तविल्याप्रमाणें अखेरीस निःशस्त्र, निराधार व पुढारीविहीन असलेली जनता प्रचंड सामर्थ्यशाली ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध पुढारलेल्या या युद्धांत थकलीच. आणि जनता थकली आहे हें ओळखून सरकारनेंही आपलें दमनचक्र अधिक उग्रतेनें सुरुं केलें. हजारों लोकांना अटक करण्यांत येऊन बिनामुदत तुरुंगांत डांबून ठेवण्यांत आलें, विशेष अधिकाराचे न्यायाधीश ठिकठिकाणीं नेमण्यांत आले व त्यांच्या मार्फत लष्करी पद्धतीनें खटले भरण्यांत आले. आणि ह्या खटल्यांत सरकारी अधिकाऱ्यांचे प्राण घेणें, जाळपोळ व मोडतोड करणें आणि सार्वजनिक मालमत्तेचा विनाश करणें, इत्यादि सारखे गंभीर आरोप एकतर्फी पुराव्यावरून शाबीत धरून गटागटानें फांशीच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. प्रांतांतील आष्टी, यावली, चिमूर, इत्यादि ठिकाणच्या बऱ्याच लोकांना फांशीच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. परंतु त्या सर्वांत बैतुल येथील गोंडांचा पुढारी विष्णु गोंड यास झालेल्या फांशीच्या शिक्षेनें जनमनांतील असंतोष अधिक तीव्र झाला.

**विष्णु गोंडाची कथा**

विष्णु गोंड हा बैतुल जिल्ह्यांतील एक तरुण कार्यकर्ता. त्याच्यावर पुष्कळ दिवसांपासून सरकारी अधिकाऱ्यांचा डोळा होता. गोंडांमध्यें साक्षरतेचा प्रचार करावा, वाईट सामाजिक चालीरीतींचें उच्चाटण करावें, दारूच्या व्यसनापासून आपल्या जातिबांधवांना मुक्त करावें, सार्वजनिक सहकार्याची प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं निर्माण करावी व अशा रीतीनें या मागसलेल्या जातीची प्रगतिपर संघटना घडवून आणावी, यांसारख्या उद्देशानें प्रेरित होऊन

हा तरुण मनुष्य गोंड जातींत कार्य करीत असे. सार्वत्रिक आंदोलनाची ज्वाला बैतुल जिल्ह्यांतही भडकली आणि ती विझविण्यासाठीं आपल्या नव्या शिरस्त्याप्रमाणें लष्करी सैनिकांसह गोरे अधिकारी तेथें जाऊन थडकले. असें सांगतात कीं, एका विशिष्ट ठिकाणीं अफाट गोंड समुदायांत हे मूठभर गोरे अधिकारी सांपडले असतांना विष्णु गोंडाच्याच आत्यंतिक प्रयत्नामुळें गोंडाचा समुदाय शांततापूर्वक तेथून निघून गेला. पुढें लौकरच जाळपोळीच्या आरोपावरून त्याच्यावर खटला भरण्यांत आला. त्याच्याकडून कोणतीही प्राणहानी न होतां त्याला फांशीची शिक्षा देण्यांत आली. त्याच्या बायकोलाही त्याच आरोपाखालीं सात वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली.

**फांशीनिवारण समिति व डॉ. खरे**

या घातपाताच्या दंगलींत सामील असलेल्या विष्णु गोंड इत्यादि प्रमुख अशा सुमारें २५ इसमांना झालेली फांशीची शिक्षा रद्द करून घेण्यासाठीं नागपूर येथें फांशी निवारण समिति निर्माण करण्यांत आली व तिचें अध्यक्षपद डॉ. खरे यांनीं स्वीकारावें म्हणून त्यांना आग्रहाची विनंति करण्यांत आली. डॉ. खरे यांनींही नंतर मित्रांच्या आग्रहावरून त्या समितीचें अध्यक्षपद स्वीकारलें. आणि एकदां ही जबाबदारी पत्करल्यावर मोठ्या दक्षतेनें त्यांनीं या समितीचें कामकाज चालविलें. या समितीच्या कामासाठीं निधी संकलन करण्याकरितांही त्यांनीं जातीनें बरीच मेहनत केली. त्यांच्या नांवावर सर्व हिंदुस्थानांतून व विशेषत: या प्रांतांतून या निधीला जनतेनें उदार अंत:करणानें चांगली मदत केली. सुमारें २०–२१ हजार रुपये दोन तीन महिन्यांच्या अवधींतच या निधीकरितां गोळा झाले. वस्तुत: या निधीसाठीं २५ हजार रुपये लागतील असें प्रथमत: तत्संबंधीं काढलेल्या पत्रकांत म्हटलें होतें.

**संत तुकडोजी महाराजांची मुक्तता**

याच चळवळींत चांदा येथें सरकारनें संत तुकडोजी महाराजांना चिमूर येथें झालेल्या दंगलीशीं त्यांचा संबंध असल्याच्या संशयावरून अटक केली होती. त्यांची ही अटक रद्द करून त्यांना मुक्त करण्यांत यावें अशी खटपट करण्यासाठीं कुलगुरु श्री. नानासाहेब केदार यांना बरोबर घेऊन त्यांनीं

गव्हर्नरांचीही भेट घेतली. या भेटींत गव्हर्नरांनीं 'प्रांतांतील परिस्थिति निवळतांच मी तुमच्या सूचनेचा अवश्य विचार करीन' असें अश्वासन दिलें. पुढें लौकरच तुकडोजीबुवांची तुरुंगांतून सुटका करण्यांत आली. परंतु तुरुंगाच्या दारांतून बाहेर येतांच चारसहा तासांच्या अवधींतच वर्धा व चांदा या दोन जिल्ह्यांत प्रवेश करण्याची त्यांना बंदी करण्यांत आली. कारण चिमूर व आष्टी हीं गांवें याच दोन जिल्ह्यांत आहेत. डॉ. खरे व नानासाहेब केदार यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणें सरकारनें तुकडोजी बुवांची निर्विकल्प मुक्तता केली असती व तुरुंगांतून सोडल्यावर वर्धा व चांदा जिल्ह्यांत प्रवेश करण्याची बंदी करणारा हुकूम त्यांच्या मुक्ततेनंतर ताबडतोब खुनशीपणानें त्यांचेवर बजावला नसता तर काय बिघडलें असतें? पण, इतकें सौजन्य दाखवील तर तें ब्रिटिश सरकार कसलें! वस्तुत: सरकारच्या दृष्टीनें शारीरिक कृतीपेक्षांही मनोवृत्तीलाच अधिक महत्व असतें. आणि हें जर खरें तर तुकडोजीबुवांना केवळ चांदा व वर्धा जिल्ह्यांत जाण्यास प्रतिबंध करून सरकारनें काय मिळविलें? चिमूर व आष्टी हीं दोन्ही गांवें तुकडोजीबुवांच्या आरतीमंडळ नामक संस्थेचीं प्रमुख केंद्रें आहेत. ह्या दोन्ही गांवांवर जो दडपशाहीचा वरवंटा फिरला त्यांत बुवांचे अनेक शिष्य तुरुंगांत अडकले असतील, अनेकांना लांब मुदतीच्या व काळ्या पाण्याच्याही शिक्षा झाल्या असतील, तर फांशीची शिक्षा झालेल्या लोकांतही बुवांचे कांहीं शिष्य असू शकतील. आणि असें जर असेल तर सरकारनें शारीरिक प्रतिबंध केला तरी बोवांचें मन आष्टी व चिमूर येथेंच घोंटाळत नसेल काय? बुवांची मनोवृत्ति साफ आहे म्हणूनच आम्ही त्यांना सोडलें असें जर सरकार म्हणत असेल, तर मग आष्टी व चिमूरला जाण्यास त्यांस प्रतिबंध का?

# भन्साळी-प्रकरण

१९३८ च्या जुलैंत गांधीजी आणि त्यांचा परिवार यांच्याशीं सतत दीड तप असलेले सारे जिव्हाळ्याचे ऋणानुबंध तटातट तोडून टाकून त्यांचें पुन्हा तोंड न पहाण्याच्या निश्चयानें गांधीजींच्या आश्रमांतून बाहेर पडलेले मानधन डॉ. खरे हे पुन्हा त्या आश्रमांत पाऊल ठेवतील ही गोष्ट कोणाला तरी शक्य वाटली असती काय? पण, गुरुवार ७ जाने. १९४३ रोजीं डॉ. खरे हे वर्ध्यास गांधीजींचे एक पट्टशिष्य प्रो. भन्साळी यांची प्रकृति पहावयाला म्हणून गेले व त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळें हिंदी राजकारणाच्या अलीकडील इतिहासांत 'चिमूर हत्याकान्ड' या नांवानें गाजलेल्या प्रकरणाचा, प्रो. भन्साळींना समाधानकारक असा शेंवट झाला. हा चमत्कार कसा घडला हें पुढील वर्णना-वरून वाचकांच्या लक्षांत येईल.

### चिमूर हत्याकांडाची पार्श्वभूमि

चिमूर हें चांदा जिल्ह्यांतील सहा हजार लोकवस्तीचें एक ठळक गांव आहे. वरोड्यापासून तें ३२ मैलांवर असून त्याच्या सभोंवतीं चारी बाजूनें दाट जंगल पसरलें आहे. पण, हें गांव भोसल्यांच्या काळापासून प्रसिद्ध असून नाईक, वेगडे प्रभृति जुनीं नामांकित संपन्न घराणीं तेथें रहात असल्यामुळें, आर्थिक आणि राजकीय दृष्टींनीं तें चांगलें पुढारलेलें आहे. राष्ट्रसभा, हिंदुमहासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, यांच्या चळवळीं तेथें सतत चालू असतात. अशा या राष्ट्रीयवृत्तीच्या गांवांत ता. ९ ऑगष्ट रोजीं महात्मा गांधी प्रभृति पुढाऱ्यांना अटक झाल्यानंतर देशांत जो प्रचंड क्षोभ उत्पन्न झाला, त्याचा प्रतिध्वनी उमटावा यांत काय नवल? ता. १६ ऑगष्ट रोजीं म्हणजे नागपंचमी-च्या दिवशीं चिमूरच्या कांहीं कॉंग्रेस कार्यकर्त्यांना पोलीसांनीं अटक केली. त्या अटकेच्या निषेधार्थ जी मिरवणूक निघाली, त्या मिरवणुकीवर पोली-सांनीं लाठीहल्ला आणि गोळीबार असे दोन्ही प्रयोग केले. या अत्याचाराला किती लोक बळी पडले हें आज सांगतां येत नाहीं. पण, आपल्या जवळचा दारूगोळा संपेपर्यंत पोलीसांनीं निःशस्त्र जमावावर फैर चालविली होती येवढें

निश्चित. पण, पोलीसांचा हा अविचारी अत्याचारच त्यांच्या अखेरी आंगलट आला असें पुढील प्रकारावरून म्हणावें लागतें. कारण, पोलीसांजवळील दारू-गोळा संपला असल्याची कुणकुण लागतांच खवळलेल्या जमावानें पोलीसांवर उलटून हल्ला केला. या प्रतीहल्लयांत सब डिव्हिजनल ऑफीसर, सर्कल इन्सपेक्टर, नायब तहसिलदार आणि एक पोलीस कान्स्टेबल हे गारद झाले. त्यांचीं प्रेतेंही सरकारी इमारतींबरोबर लगेंच जाळून टाकण्यांत आलीं असें म्हणतात. अशा रीतीनें पोलीसांच्या अत्याचारांचा आपल्या कल्पनेप्रमाणें सूड घेतल्यानंतर जमावानें चिमूरहून वरोड्याला जाणाऱ्या हमरस्त्यावर मोठमोठीं झाडें तोडून टाकून जवळ जवळ दोन मैलपर्यंत तो रस्ता वाहतुकीला बंद करून टाकला. इतकेंच नव्हे तर त्या रस्त्यावरील ओढ्यावरला एक छोटा पूलही उध्वस्त करून जमावानें सारें दळणवळण अशक्य करून सोडलें.

चिमूर येथील दोहाती अत्याचारांची ही बातमी चांदा येथील तत्कालीन जिल्हा मॅजिस्ट्रेट श्री. सुब्रम्हण्यम् यांच्या कानावर जातांच ते ता. १७ ऑगस्ट रोजीं सशस्त्र पोलीसांची एक तुकडी घेऊन चिमूरला यावयाला निघाले. पण, रस्त्यांत मोठमोठे झाडांचे ओंडके टाकून तो बंद केलेला पाहतांच आणि त्याहीपेक्षां चिमूर येथें घडलेल्या भीषण प्रकाराची हकीकत ऐकतांच जिल्हा मॅजिस्ट्रेटचें अवसान वारगळलें व येवढी छोटी कुमक घेऊन आपण चिमूरला जाण्यांत धोका आहे असें वाटल्यामुळेंच कीं काय त्यांनीं परत चांद्याला जाऊन चिमूरच्या जंगलांत बंड झाल्याचा रिपोर्ट प्रांतिक सरकारकडे केला. इतकेंच नव्हे तर गोऱ्या फौजेच्या मदतीशिवाय चिमूरच्या जंगलांतील हें बंड मोडून काढतां येणार नाहीं, असेंही आपलें मत त्यांनीं सरकारला कळविलें.

**लष्कराची रवानगी**

जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या या हांकेला प्रांतिक सरकार धांवलें व ता. १९ रोजीं दोनशें गोरे सोजीर आणि ५० हिंदी शिपाई असलेली स्पेशल ट्रेन वरोड्यास येऊन पोंचली. या काळ्या-गोऱ्या कुमकेबरोबर लष्करी वाहनांची तरतूदही करण्यांत आली होती. लगेंच जिल्हा मॅजिस्ट्रेटही आपली ५० सशस्त्र पोलीसांची तुकडी घेऊन या नागपुराहून खास आवंतून आणलेल्या काळ्या-गोऱ्या भेंसळ

लष्कराला येऊन मिळाले व रस्ता साफ करीत हें लष्कर त्याच दिवशीं चिमूरला येऊन पोंहोचलें. या लष्करी पाहुण्यांच्या आगमनाची वर्दी गांवांत आधींच येऊन पोंचली होती. त्यामुळें चिमूरमधील भयभीत झालेले नि:शस्त्र लोक आपापल्या घरांत दारांना आडसर घालून दडी देऊन बसले. लष्कर ज्यावेळीं गांवांत शिरलें त्यावेळीं गांव ओसाड पडल्यासारखा त्याला दिसला. तेव्हां जिल्हा मॅजिस्ट्रेटनें लष्कराच्या मदतीनें नाईक, बेगडे वगैरे प्रमुख नागरिकांच्या वाड्याचे दरवाजे फोडले व नंतर इतरही लोकांच्या घरादारांची हीच अवस्था झाली. दारें फोडून घरांत घुसल्यावर काळ्या-गोऱ्या सैनिकांनीं घरांत सांपडलेल्या प्रत्येक लहान-थोर पुरुषाला बेदम चोपलें, बायकांची विटंबना केली आणि घरांतल्या सर्व सामानाचा विध्वंस केला. एकंदर १२० नागरिकांना जिल्हा मॅजिस्ट्रेटनें त्या दिवशीं अटक केली. अशा तऱ्हेचा पराक्रम करून थकलेल्या लष्कराचा यथास्तित पाहुणचार करणें हें जिल्हा मॅजिस्ट्रेटचें कर्तव्यच होतें व तेंही त्यानें नामी रीतीनें पार पाडलें. त्यानें पोलीसांना सांपडेल तेथून जरूर तें सामान आणण्याची पडत्या फळाची आज्ञा केली. तेव्हां पोलीसांनीं अटकेंत असलेल्या मातबर नागरीकांच्या वाड्यांतलीं कोठ्या-कपाटें फोडून गझनीच्या महमुदाप्रमाणें सांपडेल त्या मालाची लूट केली. या लूटमारीच्या प्रळयांत स्वयपांकघरांचे संडास झाले आणि देवघरांची दुर्दशा झाली. सैनिकांच्या तावडींत सांपडलेल्या एकट्यादुकट्या स्त्रीवर, ती अर्भक आहे, रजस्वला आहे किंवा गर्भवती आहे हें न पाहतां अमानुष बलात्कार करण्यांत आले. ही नादीरशाही दोन दिवस अहोरात्र चालू होती.

**सौ. दादीबाईचें धैर्य**

अखेर बेगडे घराण्यांतील एक वृद्ध बाई सौ. दादीबाई या सैनिकांच्या संगीनींना आणि पोलीसांच्या धमकावण्यांना न जुमानतां मोठ्या धैर्यानें आणि शिताफीनें जिल्हा मॅजिस्ट्रेट श्री. सुब्रम्हण्यम् यांच्याकडे येऊन पोंचल्या आणि त्यांनीं साहेबमजकुराला विचारलें, "साहेब, तुम्हांला स्वत:ला आई-बहीणी नाहींत काय?" तेव्हां जिल्हा मॅजिस्ट्रेटनें त्यांना बेगुमानपणें असा प्रश्न विचारला कीं, "तुमच्याच घरच्या पुरुषांनीं आपल्या अविचारी वर्तनानें हा प्रसंग आपल्यावर

ओढवून घेतला नाहीं काय ? तुमच्या कृत्यामुळें लष्कर येथें आलें आणि त्याचा ह्या स्वाभाविक परिणाम आहे." पण, दादीबाईच्या विनवण्यामुळें जिल्हा मॅजिस्ट्रेटचें मन द्रवल्याशिवाय राहिलें नाहीं व त्यानें लोकांना उपद्रव न देण्याचा सल्ला लष्करी अधिकाऱ्यांना दिला. अशा रीतीनें चिमूरमधील नादीरशाही जरी थांबली तरी ता. २६ ऑगष्ट रोजीं लष्कर तेथून जाईपर्यंत लोकांचें जीवीत व वित्त एकप्रकारें धोक्यांतच होतें. तोंच प्रांतिक सरकारनें एक लाख रुपयांचा जो जबर दंड चिमूरवर बसविला होता, त्याची झटपट वसूली तडकाफडकी करण्यांत आली. घरांतले कर्ते पुरुष सगळे तुरुंगांत डांबले गेलेले आणि घरांभोंवतीं लष्कराचा वेढा पडलेला, अशा स्थितींत बिचाऱ्या भीतीनें अर्धमेल्या झालेल्या गांवांतील स्त्रियांकडून दंड कशा रीतीनें वसूल करण्यांत आला असेल हें काय सांगावयाला हवें ! दंडाची वसुली झाल्यानंतर मग पकडलेल्या लोकांच्या गुन्ह्यांच्या चौकशीच्या नांवांखालीं गांवकऱ्यांचा पुन्हा कायदेशीर छळ सुरुं झाला.

चिमूरमध्यें झालेल्या ह्या हाहा:काराची बातमी जेव्हां सशस्त्र पोलीसांच्या नाकेबंदींतून निसटून बाहेरच्या जगाच्या कानावर आली, तेव्हां नागपुर प्रांतांतील जनता अत्यंत क्षुब्ध झाली. पण, ज्या भयंकर बातम्या सारख्या कानावर येत होत्या, त्यांच्या सत्यतेचा शहानिशा कसा करून घ्यावा किंवा चिमूर येथें घडलेल्या अत्याचारांविरुद्ध दाद कशी मागावी हें मात्र कोणालाच सुचेना. शिवाय चिमूरहून लष्करी पहारा हलून वरोडा आणि चिमूर यांच्यांतील मोटारचें दळणवळण पूर्ववत सुरू होईपर्यंत म्हणजे सप्टेंबर महिना उजाडेपर्यंत तेथें जाणेंही कोणाला शक्य नव्हतें. तथापि ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत चांद्याच्या बार असोसिएशननें एक विस्तृत ठराव सरकारकडे पाठवून चिमूर येथील अत्याचारांच्या चौकशीची मागणी केली. पण सरकारनें ती मागणी धुडकावून लावल्यामुळें व चिमूर येथें जावयाला असलेलीं अप्रत्यक्ष नियंत्रणें दूर करण्याचें नाकारल्यामुळें चिमूर हत्याकांडाबाबत ज्या एकंदर सुमारें ४०० नागरिकांना अटक करण्यांत आली होती, त्यांच्या बचावाची व्यवस्था कशी करावयाची आणि चिमूरमध्यें लष्करी नादीरशाहींत घडलेल्या अनन्वित प्रकारांना

तोंड कसें पाडावयाचें हा दुहेरी प्रश्न अधिकच बिकट झाला. तथापि, महात्मा गांधी यांचे प्रमुख अंतेवासी शिष्य आचार्य गो. रा. वाळुंजकर हे त्या दिङ्मूढतेच्या अवस्थेंतही चिमूर प्रकरणाला वाचा फोडण्याच्या उद्योगाला चिकाटीनें लागले. वर्धा, चांदा आणि नागपूर येथील निरनिराळ्या पक्षांच्या स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांना भेटून त्यांनीं चिमूरकडे त्यांचें लक्ष वेधलें.

**नागपुरच्या भगिनींची चौकशी**

आचार्य वाळुंजकर यांचे हे प्रयत्न यशस्वी होऊन अखेर नागपुरांतील तीन प्रमुख भगिनी सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. द्वारकाबाई देऊसकर, आणि कु. विमलाबाई अभ्यंकर या ता. १८ रोजीं नागपुरहून वरोड्याला गेल्या. प्रथम एक दिवस वरोड्यालाच मुक्काम करून चिमुरहून वरोड्याला आलेल्या लोकांकडून त्यांनीं शक्य ती सर्व माहिती मिळविली. ता. १९ रोजीं दुपारीं मोटारनें त्या चिमूरला जाऊन पोंचल्या. त्या मोटारींतून उतरतात न उतरतात तोंच तेथील मुसलमान सब-इन्स्पेक्टरनें त्यांना १४४ कलमाचा दंडुका दाखवून दमदाटी आरंभिली. त्याच्या उपमर्दकारक प्रश्नांना शांतपणें उत्तरें देऊन या तिघीही भगिनी श्री. नाईक यांच्या वाड्यांत गेल्या. पोलीस त्यांच्या मागें होतेच. त्यांनीं वाड्याभोंवतीं गराडा घातला व सब-इन्स्पेक्टरनें या भगिनींना असा निरोप पाठविला कीं, आमच्या परवानगीशिवाय तुम्हाला कोठें जातां अगर भेटतां येणार नाहीं. पण, सौ. विमलाबाई प्रभृतींनीं त्याला असें कळविलें कीं, आम्ही सायंकाळीं श्रीबालाजीच्या दर्शनाला जाणार आहोंत. त्याप्रमाणें सायंकाळीं त्या नाइकांच्या वाड्यांतून बाहेर पडल्या आणि बेगडे यांच्या वाड्याजवळ येऊन सौ. दादीबाई यांना त्यांनीं हांक मारिली. बालाजीच्या देवळांत गेल्यावर सौ. दादीबाई आणि चिमूरच्या इतर स्त्रिया यांनीं आपली करूण कहाणी नागपुरच्या या तिघा भगिनींना सांगितली.

त्याच दिवशीं म्हणजे ता. १९ रोजीं सायंकाळीं आचार्य वाळुंजकर हे सौ. रमाबाई तांबे आणि डॉ. दुर्गाताई वझलवार यांच्यासह चिमूरला येऊन पोंचले. नागपुरहून निघण्यापूर्वीं आचार्य वाळुंजकर आणि सौ. तांबे यांनीं जेव्हां नागपुर विभागाच कमिश्नर श्री. राऊ यांची भेट घेतली तेव्हां त्यांनीं या

भगिनींना असें स्पष्ट सांगितलें होतें कीं, चिमूरला जाणाऱ्या लोकांवर पूर्वीं किंवा आतां कोणत्याही प्रकारचा निर्बंध घातला नाहीं. पण सौ. तांबे आणि वाळुंजकर यांनीं श्री. राऊ यांच्याकडून चांद्याचे डेप्युटी कमिश्नर श्री. सुब्रह्मण्यम् यांना दाखविण्यासाठीं मुद्दाम एक पत्र आग्रहपूर्वक मागून घेतलें. तरीही चिमूर येथें येऊन पोंचतांच तेथील मुस्लीम सब-इन्स्पेक्टरनें याही मंडळीला आपल्या 'पोलीसी' अरेरावीचा थोडासा अनुभव दिलाच. पण कमिश्नर आणि डेप्युटी कमिश्नर यांचीं पत्रें दाखविल्यामुळें स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांचा निरूपाय होऊन त्यांना माणुसकीनें वागणें भाग पडलें. नंतर डॉ. दुर्गाताई वझलवार यांनीं चांदापुरा, तेलीपुरा आणि बल्हारीपुरा या सोजीरांच्या पाशवी अत्याचारांना बळी पडलेल्या या तीन ठिकाणांना जातीनें भेट देऊन आणि या तिन्ही पुऱ्यांतील घरोघरीं जाऊन अपमानित स्त्रियांची तपासणी केली आणि जबानीही घेतली. त्यांनीं आपल्या या पहाणींत एकंदर ११ लहान-मोठ्या स्त्रियांच्या—यांत पूर्ण नऊ मास भरलेल्या गर्भवतीपासून १५ वर्षांच्या कोंवळ्या मुलीपर्यंत सर्व प्रकारच्या स्त्रिया होत्या—ज्या जबान्या घेतल्या, त्या खरोखरीच अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. डॉ. दुर्गाताई वझलवार ह्या स्वतः नामांकित धन्वंतरी असल्यामुळें त्यांनीं घेतलेल्या जबान्यांना आणि केलेल्या तपासणींना कांहीं निराळेंच महत्व आहे हें सांगावयास नकोच! चिमूरहून नागपुरला परत आल्यावर या पांच भगिनींनीं जेव्हां चिमूरच्या असहाय स्त्रियांच्या अमानुष विटंबनेची अघोर कहाणी नागपुरच्या स्त्रीपुरुषांना सांगितली, तेव्हां सारें नागपूर दुःख आणि संताप यांनीं क्षुब्ध होऊन गेलें.

या भगिनींच्या प्रतिवृत्तापेक्षांही एकापरीनें डॉ. मुंजे आणि श्रीमंत बाबासाहेब घटाटे यांनीं त्यांच्या पाठोपाठ चिमूरला जाऊन प्रांतिक सरकारला सादर केलेल्या प्रतिवृत्ताचें महत्व विशेष आहे.

### डॉ. मुंजे यांचें प्रतिवृत्त

ऑगस्टमधील दंगलीनंतर ता. ४ सप्टेंबर रोजीं डॉ. मुंजे हे नागपूरला आले. त्याबरोबर रामटेक, आष्टी आणि चिमूर येथें घडलेल्या अघोर प्रकारां-संबंधीं अनेक प्रकारच्या हकिकती आणि गाऱ्हाणीं त्यांच्या कानावर आलीं,

तेव्हां ता. ९ रोजीं डॉ. मुंजे यांनीं ना. गव्हर्नरांना पत्र पाठवून रामटेक, आष्टी आणि चिमूर येथील परिस्थितीची प्रत्यक्ष पहाणी करण्याची आपली इच्छा त्यांना कळविली व त्या पत्रांत असेंही लिहिलें कीं, प्रांतिक सरकारनें जर आपला जबाबदार अधिकारी आपल्याबरोबर दिला तर ती गोष्ट सर्वथैव इष्टच होईल. सरकारनें त्यांच्या ह्या विनंतीला रुकार दिला. त्याप्रमाणें डॉ. मुंजे हे श्रीमंत बाबासाहेब घटाटे आणि नागपूरचे त्यावेळचे डेप्युटी कामिश्नर श्री. लेयर्ड यांच्यासह ता. १९ रोजीं दौऱ्यावर निघाले. ता. २६ रोजीं त्यांनीं चिमूरला भेट दिली. त्यावेळीं त्यांच्याबरोबर नागपुर विभागाचे कमिश्नर श्री. राऊ व चांद्याचे डेप्युटी कमिश्नर श्री. सुब्रह्मण्यम् हेही होते.

चिमूरला आल्यावर डॉ. मुंजे प्रभृतींनीं पोलिस-ठाण्याला भेट दिली. या पोलीस-ठाण्याच्या लहान लहान तीन चार खोल्या व जवळच्या सरकारी कोंडवाड्यांत पकडलेली एकंदर दीडशें माणसें कोंडून ठेवण्यांत आलीं होतीं असें त्यांना सांगण्यांत आलें. चांद्याच्या डेप्युटी कमिश्नरला ज्यावेळीं या प्रकाराबद्दल जाब विचारला, त्यावेळीं त्यानें असें उत्तर दिलें कीं, पकडलेल्या लोकांना ठेवावयाला दुसरी सोयीची जागा नसल्यामुळें आम्हाला त्यांना अशा रीतीनें कोंडून ठेवावें लागलें. हें मासलेवाईक उत्तर ऐकल्यावर डॉ. मुंजे प्रभृतींना कलकत्त्याच्या 'ब्लॅक-होल' (अंधारकोठडी) ची आठवण झाली असल्यास नवल नाहीं. नंतर डॉ. मुंजे प्रभृतींनीं सौ. दादीबाई बेगडे आणि चिमूरच्या इतर स्त्रिया यांची भेट घेऊन चिमूर येथें १३ स्त्रियांवर झालेल्या पाशवी अत्याचाराची करुण भीषण कहाणी त्यांच्या तोंडून ऐकली. डॉ. मुंजे यांच्या बरोबर नाईक, बेगडे, प्रभृति संपन्न नागरिकांच्या वाड्यांत जाऊन कमिश्नर आणि डेप्युटी कमिश्नर यांनीं त्या वाड्यांची काळ्या-गोऱ्या सोजीरांनीं केलेली नासधूम आणि लुटालूट प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिली. तो अनन्वित प्रकार पाहून थक्क झालेले डॉ. मुंजे तेथल्या तेथेंच उद्गारले, "हें काय ब्रिटिश राज्य आहे? कीं अजून आम्ही मोंगलाईंतच आहों?" त्याचप्रमाणें घरांतील कर्ते पुरुष सारे अटकेंत असतांना निराधार व भयभीत स्त्रियांना दमदाटी करून आणि त्यांच्या घरांतील सोनेनाणें मुसलमान व्यापाऱ्यांना मातीमोलानें

विकून दंड कसे जबरदस्तीनें वसूल केले, यांचीही माहीती डॉ. मुंजे यांना नागरिकांनीं दिली. डॉ. मुंजे यांनीं आपल्या पाहणीचें जें प्रतिवृत्त नंतर प्रांतिक सरकार आणि जनता यांना सादर केलें, त्यांत असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे कीं, "आष्टी येथील स्थानिक अधिकाऱ्याप्रमाणें चिमूरचे सब-डिव्हिजनल ऑफीसर वगैरे स्थानिक अधिकारी शहाणे आणि समयज्ञ नसल्यामुळें त्यांच्या कुरापतखोर वर्तनानें चिडलेला जनसमाज अत्याचाराला प्रवृत्त झाला व चांद्याचे डेप्युटी कमिश्नर श्री. सुब्रह्मण्यम् यांनींही लष्कराला कह्यांत ठेवण्याच्या कामीं आष्टी येथील अधिकाऱ्याप्रमाणें दक्षता न घेतल्यामुळें लष्करानें नादिर-शाही गाजविली."

### सरकारचें तोंड उघडलें

नागपुराहून गेलेल्या डॉ. दुर्गाताई वझलवार प्रभृति पांच भगिनी व डॉ. मुंजे आणि श्रीमंत घटाटे यांनीं चिमूर प्रकरणावर सरकारनें पाडलेला पडदा अशा रीतीनें दूर करून त्याचें अघोर स्वरूप लोकांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळें प्रांतिक सरकारला तोंड उघडणें प्राप्त झालें व ता. १६ ऑक्टोबर रोजीं एक लांबलचक पत्रक काढून त्यांनीं चिमूर येथील लोकांच्या तक्रारी ह्या बनावट असल्याचा बहाणा केला. सरकारी पत्रकांतील मुख्य मुद्दा हा होता कीं, ता. ६ सप्टेंबर रोजीं कमिश्नर श्री. राऊ हे स्वत: चिमूरला गेले असतां त्यांच्यासमोर बलात्कारासंबंधीं एकही तक्रार करण्यांत आली नव्हती व ता. १० सप्टेंबर रोजीं चांदा आणि वरोडा येथील वकिलांनीं जेव्हां हा प्रश्न हातीं घेतला, तेव्हांही ज्या लेखी तक्रारी कमिश्नरला सादर करण्यांत आल्या त्यांत बलात्काराची तक्रार फक्त एकच होती. सरकारनें आपल्या पत्रकाच्या शेवटीं सर्व तक्रारी फार उशीरां आल्या म्हणून अविश्वसनीय ठरवून त्यांची चौकशी करण्यास नकार दिला.

सरकारच्या ह्या पत्रकाला डॉ. मुंजे यांनीं ताबडतोब उत्तर दिलें. त्यांत त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, "चिमूर येथें ज्या तक्रारी आणि जबान्या नोंदण्यांत आल्या, त्या नोंदल्या जात असतां नागपुर विभागाचे कमिश्नर व चांदा आणि नागपुर येथील डेप्युटी कमिश्नर असे तिघेही वरिष्ठ अधिकारी हजर होते.

घरांतील कर्ते पुरुष हे अटकेंत डांबले गेले असतां आणि गांवांत लष्करी पहारा बसला असतां स्त्रियांनीं पुढें येऊन आपल्यावरील जुलमांच्या तक्रारी केल्या नाहींत यांत त्यांचा कांहींही दोष नाहीं, असें आमचें स्पष्ट मत आहे. चिमूरच्या अधिकाऱ्यांना बदनाम करण्यासाठींच आपल्यावर बलात्कार झाल्याचा किळस-वाणा कांगावा चिमूरच्या स्त्रिया करीत आहेत असें म्हणणाऱ्या सरकारला उलट आम्ही असें विचारतों कीं, मग रामटेक आणि आष्टी येथील स्त्रियांनीं अशा तक्रारी कां केल्या नाहींत? म्हणून सरकारनें खऱ्याखोट्याचा शहानिशा करण्यासाठीं चौकशी-कमेटी नेमणें अत्यंत आवश्यक आहे."

**बातम्यांची नाकेबंदी**

पण, प्रांतिक सरकारवर डॉ. मुंजे यांच्या या समर्पक टीकेचा कांहींएक परिणाम झाला नाहीं. उलट, चिमूर प्रकरणाची अशा रीतीनें दावादाबी चालविल्यामुळें प्रांतिक सरकारची सर्व हिंदुस्थानभर जी नाचक्की झाली तिनें चिडून जाऊनच कीं काय, चिमूरसंबंधीं कोणत्याही प्रकारची बातमी प्रसिद्ध करावयास सरकारनें बंदी घातली. अर्थात् सरकारच्या या सुलतानी कृत्यामुळें चिमूर-प्रकरणांत न्याय मिळण्याची आशा सर्वथैव नष्ट झाली.

**प्रो. भन्साळींचें अवतरण**

या भीषण निराशेच्या गडद अंधारांतून एक तपस्वी पुरुष आपल्या आत्मतेजाचा प्रकाश पाडण्याच्या ईर्षेनें अचानक पुढें सरसावला. हा तपस्वी म्हणजेच सेवाग्राम येथील महात्मा गांधी यांचे एक अंतेवासी शिष्य प्रो० जे. पी भन्साळी.

प्रो० भन्साळी यांचा ओझरता परिचय येथें करून देणें जरूर आहे. गेल्या पिढींतील प्रख्यात क्रांतिकारक पंडित शामजी कृष्ण वर्मा यांचे हे पुतणे आहेत. गांधीजींप्रमाणें तेही काटियावाडी असून ते मुंबई विद्यापीठाचे एम. ए. आहेत. त्यांनीं युरोप खंडाचा प्रवास केला असून मुंबई आणि अमदाबाद येथील कॉलेजांतून प्राध्यापकाचें कामही केलें आहे. पण, ऐन तारुण्यांत त्यांना एकाएकी उपरति झाली. त्यानंतर सर्व ऐहिक पाश तोडून हिमालय आणि गिरनार यांची त्यांनीं पायीं यात्रा केली. कांहीं दिवस लिंबाच्या पाल्यावरही ते

नग्नावस्थेंत राहिले होते. त्यानंतर त्यांनीं आपले ओंठ शिवून घेऊन संपूर्ण मौनव्रतही कांहीं वर्षे आचरलें. महात्माजींच्या सान्निध्यांत येऊन ते राहिल्यावर गांधीजींनीं आपल्या वत्सल अनुनयानें त्यांना हळूं हळूं देहस्थितीवर आणलें. त्यानंतर जरी ते मौन सोडून माणसांत आले, तरी रात्रंदिवस सुत कांतणें आणि भगवच्चिंतन करणें, या दोन गोष्टींशिवाय दुसऱ्या कशांतही त्यांनीं मन घातलें नाहीं. गांधीजींवर त्यांची गाढ श्रद्धा असली आणि ते सेवाग्रामच्या आश्रमांत रहात असले तरी विधायक कार्यक्रमापलीकडे गांधीजींच्या अन्य कोणत्याही व्यापांत त्यांना कधीं रस वाटला नाहीं. असा हा लोकोत्तर चारित्र्याचा धर्मशील तपस्वी पुरुष जेव्हां चिमूरच्या भगिनींवर झालेल्या अमानुष अत्याचारांची दाद लावून घेण्यासाठीं एकाएकी पुढें आला, तेव्हां चिमूर प्रकरणाचें मामुली राजकीय स्वरूप नाहींसें होऊन त्याला एकदम यज्ञकर्माची रोमांचकारी मंगलता प्राप्त झाली.

**आत्मबलिदानाची कहाणी**

ता. २५ नोव्हेंबर १९४२ रोजीं प्रो. भन्साळी यांनीं जें पत्रक आपल्या उपोषणासंबंधीं काढलें, त्यांत त्यांच्या या आत्मबलिदानाची हृदयस्पर्शी कहाणी त्यांनीं स्वतःच सांगितली आहे. ते म्हणतात,

"मी स्वभावतःच धर्मशील आहें. धर्मजीवनापलीकडे अन्य कशांतही मला रस नाहीं. गेले साडेतीन महिने देशांत चालू असलेल्या दडपशाहीचा धुमाकूळ पाहून व विशेषतः चिमूर आणि आष्टी येथें घडलेल्या प्रकारांच्या हकीकती ऐकून माझ्या मनाला धक्का बसला. या प्रकारांचा विचार करीत मी रात्रीच्या रात्रीं झोपेशिवाय तळमळत काढल्या व अशा तऱ्हेचीं अनन्वित कृत्यें करणाऱ्या सरकारच्या राज्यांत पाणी सुद्धां पिणें योग्य होईल कीं नाहीं, या कल्पनेनें मी बेचैन होऊन गेलों.

तोंच डॉ. मुंजे आणि नागपुरच्या कांहीं भगिनी यांचे चिमूरच्या स्त्रियांच्या विटंबनेबद्दलचे विचार माझ्या कानावर आले. त्यासंबंधीचें सरकारी पत्रकही मीं वाचलें. सरकारनें जरी स्वतःची गुळगुळीत तरफदारी केली होती, तरी त्यांनाही खऱ्या प्रकाराचा इन्कार करण्याची हिंमत झाली नाहीं. स्त्रियांवर सोजीरांना

मोकाट सोडून अशा तऱ्हेचीं अघोर कृत्यें केल्याचीं उदाहरणें हिंदुस्थानांत मला माहीत नाहीं. हिंदुस्थानानें राजकीय स्वातंत्र्य गमावलें असलें तरी आपल्या स्त्रियांची विटंबना मात्र कधींही सहन केलेली नाहीं. शेंकडों स्त्रियांनीं जोहार करून आपल्या पातिव्रत्याचें कसें रक्षण केलें याचे पोवाडे आमच्या शत्रूंनीं देखील गायिले आहेत. चिमूर येथें घडलेल्या प्रकारांनीं माझ्या धार्मिक आणि नैतिक भावनेला धक्का बसला. अशा कार्यासाठीं आपल्या प्राणाची आहुति द्यावी, हें आपलें कर्तव्य आहे असें मला वाटतें. खरोखरी या विचारानें मी वेडा होऊन गेलों. कांहीं लोक मला पूर्वीपासूनच वेडा समजत आले आहेत. पण, स्वातंत्र्यासाठीं आणि आपल्या भगिनींच्या प्रतिष्ठेसाठीं लोक वेडे कां होत नाहींत, याचें मला नवल वाटतें!

श्री. अणे यांना मी फार वर्षांपासून ओळखतों. भारतीय संस्कृति आणि धर्म यांच्यावरील त्यांची नितांत श्रद्धा मला माहित आहे. म्हणून मी दिल्लीला जाऊन त्यांना सर्व परिस्थितीची माहिती करून देण्याचें व त्यांच्या मार्फत स्वतंत्र चौकशी मिळविण्याचें ठरविलें. चिमूर हें त्यांचें स्वतःचें गांव वणी त्याच्या शेजारींच असून चिमूरच्या लोकांशीं त्यांचा निकटचा संबंध आहे. मला असेंही वाटलें कीं, आम्हां दोघांना तेथें जाऊन परिस्थितीची सर्व पहाणी करणें शक्य आहे. पण, श्री. अणे यांचा कांहींच करण्याचा उद्देश नव्हता. तें ऐकून मला आश्चर्य वाटलें. असल्या प्रकारांना प्रतिकार न करतां मान लवविणें म्हणजे आपल्या पौरुषाचा उपमर्द करणें होय असें मला वाटलें. मी श्री. अणे यांना असें सांगितलें कीं, त्यांना जर कांहीं करणें शक्य नसेल तर त्यांनीं निदान राजीनामा तरी द्यावा. व जर त्यांनीं तसें केलें नाहीं तर मी त्यांच्या पायाशीं देहत्याग करीन. हा प्रकार ता. १ नोव्हेंबर रोजीं सकाळीं घडला. माझ्या बाबतींत कसें वागावयाचें हें श्री. अणे यांनीं पूर्वींच ठरविलें असावें. त्यांनीं मला एक खोली दाखविली आणि ते निघून गेले. नंतर मी उपास सुरुं केला.

दुपारीं दिल्ली सोडून जाण्याचा माझ्यावर हुकूम बजावण्यांत आला. रात्रीं ९॥ वाजतां मला अटक करण्यांत आली. ता. ४ पासून मला जबरदस्तीनें नाकांतून अन्न घालण्यांत येऊ लागलें. ता. ६ रोजीं मला तुरुंगांतून काढून सेवाग्रामला ता. ७ रोजीं आणलें व तेथें मला मुक्त करण्यांत आलें.

नंतर पूर्वी ठरविल्याप्रमाणें मी उपवास सोडून दिला आणि स्वतःच चिमूरला जाण्याचें ठरविलें. अंगांत फार अशक्तता असतांही मी ता. १० रोजीं निघालों, आणि ता. ११ रोजीं तेथें जाऊन पोंचलों. तेथें श्रीबालाजीच्या देवळांत पुन्हा मी उपोषणाला सुरवात केली. निःपक्षपाती चौकशी करण्याची विनंति मीं डेप्युटी कमिश्नरला केली व त्याला अत्यंत विनयपूर्वक असें सांगितलें कीं, जर चौकशी सुरु करण्यांत आली नाहीं तर माझा उपवास चालू राहील. दिल्लीच्या प्रकाराची नंतर येथें पुनरावृत्ति झाली. तीन तासांत चिमूर सोडण्याचा हुकूम मजवर बजावण्यांत आला. नंतर अटक करण्यांत आली आणि ता. १३ रोजीं सेवाग्रामला नेऊन सोडून देण्यांत आलें.

मी उपास चालूंच ठेवला आणि परत सेवाग्रामला जाण्याचें ठरविलें. आपल्याला चिमूरला किंवा निदान चिमूरच्या वाटेवर तरी मरण यावें अशी माझी इच्छा होती. मी सेवाग्रामहून ता. १९ रोजीं निघालों आणि ता. २२ ला चिमूरला पोंचलों. माझा उपास अखंड चालूंच होता. अशक्ततेमुळें ६०–६२ मैलांचें अंतर तोडावयास मला ५६ तास लागलें. पण वाटेंत मला अनेक लोक भेटले, पोलीस अधिकारी सुद्धां भेटले. त्यांनीं मला पालखावर (स्ट्रेचर) घालून आगगाडींतून दुसऱ्या वर्गाच्या डब्यानें आणलें. डी. एस. पी. नें देखील ही गोष्ट कबूल केली कीं, चिमूर येथील कोठें कोठें बलात्काराचा प्रकार घडला असेल; त्यानें मला पाणी घेण्याचाही आग्रह केला. माझ्या उपोषणाचें महत्व आणि त्याची पार्श्वभूमि या दोहोंची त्याला जाणीव झाली होती.

आज ता. २६ रोजीं सकाळीं उपोषण चालू असतांही मी पुन्हा चिमूरला जावयास निघत आहें.

मी सेवाग्रामहून बापुंच्या आश्रमांतून निघत आहे. आजपर्यंत केवळ मलाच नव्हें तर इतर अनेक लोकांना हा आश्रम तीर्थक्षेत्र होऊन बसला आहे. पण, माझें तीर्थक्षेत्र मात्र आतां चिमूर हेंच होऊन बसलें आहे. मी ही शेवटची यात्रा पायीं आणि उपाशीं स्थितींत करीत आहे, तेवढेंच समाधान मला आतां आहे. माझी परमेश्वराला अशी नम्र प्रार्थना आहे कीं, आपल्या ह्या पवित्र

मातृभूमींत कोणत्याही स्त्रिर विटंबनेचा प्रसंग येऊ नये. मग माझ्यासारख्या कितीही लोकांना त्यासाठीं बलीदान करावें लागलें तरी चिंता नाहीं."

**लोकनायकांची समंजस भूमिका**

प्रो. भन्साळी यांचें हें पत्रक मुद्दामच इतक्या विस्तारानें दिलें आहे. कारण त्यांनीं चिमूर प्रकरण हातीं घेतल्यापासून त्यांचे या बाबतींतील मुख्य सहकारी श्री. कन्हैयालाल मुनशी आणि दिल्लीपासून मुंबईपर्यंतचीं कांहीं काँग्रेसवृत्तपत्रें यांनीं चिमूर प्रकरणाबद्दल जणुं कांहीं एकटे लोकनायक अणेच जबाबदार आहेत, असा बहाणा करून त्यांच्यासंबंधीं पद्धतशीर दुष्ट मतप्रचार करण्यास सुरुवात केली. तेव्हां खुद्द भन्साळी यांच्या स्वतःच्याच शब्दांत त्यांनीं दिल्लीस जाऊन केलेल्या प्रयत्नांचा इतिहास दिलेला बरा, अशा समजुतीनें त्यांच्या पत्रकांतील बहुतेक महत्वाचा भाग उध्दृत केला आहे. लोक-नायक अणे हे स्वतः भन्साळींबरोबर खाजगी रीतीनें चिमूरला जावयाला तयार होते. फक्त चिमूर हत्याकांडाला तीन साडेतीन महिने होऊन गेले असल्यामुळें आतां चौकशी करून कांहीं उपयोग होणार नाहीं असें त्यांचें मत होतें. ता. १५ डिसेंबर १९४२ रोजीं प्रो. भन्साळी यांना दिल्लीहून लोकनायकांनीं जें पत्र पाठविलें, त्यांत आपली ही भूमिका त्यांनीं स्पष्ट केली होती. या पत्रांत ते लिहितात,

"चिमूर येथील पीडितांचें सान्त्वन करण्यासाठीं आतां तेथें खाजगी रीतीनें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें माझें मत कायमच आहे. तरीसुद्धां चिमूर येथें जाण्याचें मी एवढ्याच आशेनें कबूल केलें कीं, मीं तेथें गेल्यानें आपल्याला उपोषण सोडणें शक्य होईल. पण, आतां हें निश्चित दिसतें कीं, चिमूर येथें बिन-सरकारी चौकशी करण्याचा आपला उद्देश आहे. डॉ. मुंजे यांनीं अशा प्रकारची चौकशी केली आणि ती करण्याच्या बाबतींत मध्यप्रांत-वऱ्हाडच्या सरकारनें त्यांना कांहीं सवलती दिल्या आहेत. त्यांनीं आपल्या चौकशीचें प्रतिवृत्त प्रांतिक सरकारला सादर केलें व नंतर त्यांनीं जें पत्रक प्रसिद्ध केलें, त्यांतही या प्रतिवृत्ताचा उल्लेख केला आहे. तें प्रतिवृत्त मी पाहिलें असल्याचें आपणांस पूर्वींच सांगितलें होतें. माझें असें ठाम मत आहे कीं, आतां याउपर चिमूर येथील

अत्याचारांची चौकशी करणें अनावश्यक आणि अनिष्टही आहे. म्हणून दिल्लीस जेव्हां चौकशी करण्यासाठीं चिमूरला जाण्याची सूचना आपण मला केली, तेव्हां मी आपल्याशीं सहमत होऊं शकलों नाहीं तीच माझी भूमिका अजूनही कायम आहे.

ता. १० च्या माझ्या तारेंत मी केलेली सूचना आपल्याला मान्य झाली नाहीं याबद्दल मला मन:पूर्वक खेद वाटतो. आपण जर आपला उपास निर्धारानें पुढें चालू ठेवला तर त्याचा परिणाम काय होईल याच्या कल्पनेनें माझ्या जिवाचा थरकाप होतो. परमेश्वरानें आपल्याला अधिक प्रकाश दाखवावा अशी मी त्याला प्रार्थना करतों."

लोकनायक अणे यांच्या या पत्रावरून त्यांच्या या प्रकरणांतलि एकंदर धोरणाची कल्पना येईल. तरी सुद्धां प्रो. भन्साळी यांच्या संतोचित बालवृत्तीचा फायदा घेऊन श्री. मुन्शी यांच्यासारखे कांहीं कॉंग्रेस पुढारी आणि वृत्तपत्रें यांनीं त्यांच्या पत्रकांचा आणि हालचालींचा दुरुपयोग करून आपला अप्रशस्त प्रचार चालूंच ठेविला. तो इतका कीं, प्रो. भन्साळी यांचा उपवास चालू असतां गांधीजींचे चिरंजीव—दिल्लीच्या 'हिंदुस्थान टाइम्स'चे संपादक—श्री. देवदास गांधी हे नागपुरास आले असतां भारत सेवक समाजाच्या दिवाणखान्यांत भरलेल्या वृत्तकारांच्या खाजगी सभेंत, मुंबईस अणे यांच्या संबंधीं प्रसिद्ध झालेल्या कांहीं खोडसाळ व्यंगचित्रांचा उल्लेख करून असा सरळ प्रश्न विचारला कीं, चिमूर प्रकरणाच्या बाबतींत लोकनायकांचे कळकळीचे प्रयत्न जारीनें चालू असतां त्यांच्या विरुद्ध कांग्रेसपक्षाच्या पत्रांनीं असा निंद्य प्रचार कां करावा? तेव्हां श्री. गांधी यांनीं या मतलबी प्रचाराविरुद्ध दिलगिरी प्रदर्शित करून त्याचा जोरदार निषेध केला.

**भन्साळी-अणे पत्रव्यवहार**

तथापि, ता. २५ नोव्हेंबर रोजीं प्रो. भन्साळी यांनीं चिमूरला जाण्याचा आपला संकल्प जाहीर केल्यापासून पुढें जे प्रसंग घडले आणि जो तारापत्रांचा व्यवहार त्यांचें उपोषण सुटेपर्यंत चालू होता, तो लक्ष्यांत घेतल्यास प्रो. भन्साळी यांची बालवृत्ति आणि त्यांच्या सल्लागारांचें कौटिल्य, या दोहोंचा

मेळ ह्या उपोषणपर्वांत कसा पडला होता याचें स्पष्ट चित्र वाचकांपुढें उभें राहील.

ता. २५ नोव्हेंबर १९४२ रोजीं काढलेल्या पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें प्रो. भन्साळी हे ता. २६ रोजीं सकाळीं चिमूरला जावयाला निघाले. पण, पोलिसांनीं त्यांना लगेंच पालखावर घालून सेवाग्रामला परत आणलें व त्यांच्यावर सेवाग्राम सोडून न जाण्याबद्दल हुकूम बजावण्यांत आला. पण प्रो. भन्साळी यांनीं तो हुकूम दुसऱ्याच दिवशीं मोडला आणि ते वर्ध्यास कै. जमनलालजी बजाज यांच्या बंगल्याच्या आवारांतील उपगृहांत येऊन राहिले. तेथें श्रीमती जानकीदेवी बजाज, श्री. कमलनयन बजाज आणि प्रो. भन्साळी यांचा आप्तपरिवार यांच्या सान्निध्यांत त्यांच्या उपोषणाची तपस्या शांतपणानें चालू झाली. या अवस्थेंतही लो. अणे यांच्याशीं त्यांचा पत्रव्यवहार चालू होता. तो तारापत्रांचा व्यवहार बहुतेक शब्दशः जसाचा तसाच पुढें दिला आहे.

ता. ५ डिसेंबर रोजीं लो. अणे यांनीं दिल्लीहून प्रो. भन्साळी यांना पुढील पत्र पाठविलें:– "काल मी आपल्याला पुढीलप्रमाणें तार केली–'उपवास सोडावा अशी प्रार्थना करतों. मला जें योग्य आणि शक्य वाटतें तें घडवून आणण्यासाठीं परमेश्वरावर श्रद्धा ठेवून मी करीत आहें.' माझ्या तारेंतील मनोभावना लक्षांत घेऊन आपण उपास सोडाल अशी आशा आहे. मला जें योग्य आणि शक्य वाटतें तें करण्याच्या बाबतींत मी यत्किंचित्‌ही कसूर करणार नाहीं, याबद्दल खात्री बाळगा."

या पत्राला ता. ६ रोजीं प्रो. भन्साळी यांनीं वर्ध्याहून पुढील उत्तर तारेनें पाठविलें:–"तारेबद्दल आभार. स्त्रियांच्या पातिव्रत्याचा मीं हातीं घेतलेला प्रश्न न्याय्य आणि पवित्र आहे. त्यासाठीं बलिदान करण्यांत मला गौरव वाटतो. माझें कार्य आणि जीवित हें मी परमेश्वराचे हातीं सोंपविलें आहेत. आपल्या प्रयत्नांना लौकर यश येवो. चिमूरला एकवार जाऊन तेथील दुःखपीडितांचें सान्त्वन करावें, अशी आपणाला विनंति करितों."

या तारेला ता. ९ रोजीं लोकनायकांनीं पुढील उत्तर पाठविलें— "माझ्या प्रयत्नांना यश चिंतिल्याबद्दल आभार. केवळ दुःखपीडितांचें सान्त्वन करण्यासाठीं चिमूरला खाजगी रीतीनें जाण्यांत कांहीं फायदा नाहीं असें मला वाटतें. तरी सुद्धां आपण जर ताबडतोब उपोषण सोडण्याचें आश्वासन देत असाल तर मी चिमूरला जाण्यासाठीं निघतों."

या तारेला ता. १० रोजीं प्रो. भन्साळी यांनीं पुढील उत्तर पाठविलें— "आपल्या तारेबद्दल आभार. आपण जरी खाजगी रीतीनें आलांत तरी आपण दोघे चिमूरला जाऊं. मी उपवास सोडीन आणि वस्तुस्थितीची चौकशी करूं"

या तारेला उत्तर म्हणून ता. १० रोजीं लो. ना. अणे यांनीं पुढील तार पाठविली—"आपल्या पूर्वीच्या तारेंत आपण मला चिमूरला जाऊन दुःखपीडितांचें सान्त्वन करण्याविषयीं सुचविलें होतें. ता. ९ च्या तारेंत मी आपल्याला असें कळविलें कीं, फक्त तेवढ्याच कामासाठीं खाजगी रीतीनें मी चिमूरला जाण्याचें ठरविलें आहे. मी एकटाच जाईन. आपल्याला बरोबर नेणार नाहीं. वस्तुस्थितीची शहानिशा करून घेण्यासाठीं चौकशीही करणार नाहीं. कारण, खाजगी चौकशी यापुढें अनावश्यक आणि अनिष्टही आहे. कृपा करून उपवास सोडा."

यानंतर ता. १५ डिसेंबर रोजीं पाठविलेल्या पत्रांत लो. अणे यांनीं यापुढें खाजगी चौकशीची आवश्यकता आपल्याला कां वाटत नाहीं हें स्पष्ट केलें होतें. तें पत्र पूर्वी दिलेलेंच आहे.

पण, प्रो. भन्साळी यांना लोकनायकांची ही सयुक्तिक भूमिका मान्य झाली नाहीं व त्यांनीं आपला उपास चालूच ठेवला. अर्थात या उपोषणाच्या निमित्तानें कॉंग्रेसपक्षीय पुढारी आणि वृत्तपत्रें यांनीं बापुजींच्या नालस्तीचा उद्योगही अव्याहत चालू ठेवला. तो इतका कीं, खुद्द प्रो. भन्साळी यांच्या एका मित्रानें त्यांना तार करून अशी तक्रार केली कीं, आपला हा उपवास लोकनायकांच्या विरुद्ध आहे असा समज कांहीं ठिकाणीं प्रसृत झाला असल्याचें आढळून येतें. तेव्हां प्रो. भन्साळी यांनीं आपल्या संतोचित वालवृत्तीला अनुसरून ता. २५ डिसेंबर रोजीं लोकनायक अणे यांना विस्तृत पत्र पाठवून या गैरसमजाबद्दल खेदपूर्वक खुलासा केला. त्या पत्रांतील महत्वाचा भाग पुढें दिला आहे.

प्रो. भन्साळी म्हणतात, “ एका मित्राकडून आलेल्या तारेवरून मला अशी माहिती मिळाली कीं, माझा उपवास हा आपल्या विरुद्ध आहे असा समज कांहीं ठिकाणीं झालेला आहे. माझ्या स्वतःच्या शब्दांनीं अगर कृतींनें जर असा ग्रह उत्पन्न झाला असेल तर वस्तुस्थिती तशी नाहीं अशी मी आपल्याला ग्वाही देतों. आपण मध्यवर्ति कायदेमंडळांतील मध्यप्रांताचे प्रतिनिधि असल्यामुळें आपल्यामार्फत सरकारकडून चौकशी करून घ्यावी किंवा तें न जमल्यास आपल्याला चिमूरला नेऊन वस्तुस्थितीची शहानिशा करून घ्यावी या उद्देशानें मी स्नेही म्हणून आपल्याकडे आलों होतों.”

“आपल्या आजच्या स्थितींत जें कांहीं आपल्याला करणें शक्य होतें तें सर्व आपण केलें आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. . . . . व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळांतील इतर सभासदांपेक्षां आपण मला आणि चिमूरलाही अत्यंत जवळचे असल्यामुळें या प्रकरणांत आपली मध्यस्थी आणि राजीनामा या दोहोंसाठीं मी खटपट केली. अर्थात माझें धोरण हें जितकें आपल्याला तितकेंच आपल्या इतरही सहकाऱ्यांना किंबहुना जें इतर हिंदी लोक या प्रकरणाची चौकशी दडपण्याच्या कामीं सरकारला मदत करीत आहेत, त्यांनाही लागू आहे. . . . आपण या बाबतींत माझ्याकडे जें लक्ष पुरविलेंत त्याबद्दल मी आपला आभारी आहें; व माझ्या उपवासानें जर आपल्याला कांहीं उपद्रव झाला असेल तर त्याबद्दल मला आपण क्षमा कराल अशी आशा आहे.”

प्रो. भन्साळी यांचें हें पत्र लोकनायक अणे यांना दिल्लीस जात असतां वाटेंतच मिळालें. त्याला पाठविलेल्या उत्तरांत बापुजींनीं असें म्हटलें आहे कीं “ आपल्या उपोषणानें जरी तूर्त मला त्रास होत असला तरी आपल्याबद्दल माझ्या अंतःकरणांत प्रीतियुक्त आदराच्या भावनेशिवाय दुसरें कांहीं नाहीं याबद्दल मी आपणास ग्वाही देतों. आपल्या उपोषणाचा हेतू मला उपद्रव देण्यासाठीं नाहीं किंवा व्यक्तीशः माझ्याविरुद्ध नाहीं आणि माझ्याविरुद्ध कोणत्याहि प्रकारची दुरिच्छा आपल्या ठिकाणीं नाहीं, याबद्दल मला आश्वासन देण्याची गरज नाहीं. उपोषणाचें हें दिव्य जोंपर्यंत आपल्याला चालू ठेवणें अवश्य वाटेल तोपर्यंत त्यांतून पार पडण्यासाठीं परमेश्वरानें आपल्यास सामर्थ्य

द्यावें अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे व मी अशी आशा करतों कीं, आपलें उपोषण शक्य तितक्या लौकर सुटावें असें स्वरूप त्या दयाघन परमेश्वरानें भावी घटनांना द्यावें."

या एकंदर पत्रव्यवहारावरून लोकनायक अणे यांची या प्रकरणांतील भूमिका किती सहृदयतेची आणि समंजसपणाची होती याची वाचकांना कल्पना येईल. इतकेंच नव्हे, तर डॉ. मुंजे प्रभृतींनीं चिमूरला बड्या सरकारी अधिकाऱ्यांसह भेट देऊन तेथें घडलेल्या प्रकारांसंबंधींचें आपलें प्रतिवृत्त जनता आणि प्रांतिक सरकार यांना सादर केल्यानंतर इतक्या उशीरानें पुन्हा चिमूरला जाऊन चौकशी करणें अवश्य किंवा इष्ट नाहीं असा जो अभिप्राय लोकनायकांनीं आपल्या तारापत्रांत वारंवार व्यक्त केला आहे, तोच पुढें अवघ्या १५ दिवसांच्या आंत प्रो. भन्साळी यांनीं डॉ. खरे यांच्या मध्यस्थीनें प्रांतिक सरकारशीं झालेल्या तडजोडींत मान्य केला ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. आतां या तडजोडीच्या मनोरंजक घटनांकडे वळूं.

**नागपुरच्या कार्यकर्त्यांचें प्रयाण**

प्रो. भन्साळी यांनीं कै. जमनलालजी बजाज यांच्या वर्धा येथील बंगल्याच्या आवारांत उपोषणाचें ठाण मांडल्यानंतर प्रांतिक सरकारनें चिमूर किंवा प्रो. भन्साळी यांच्यासंबंधीं कोणतीही बातमी वर्तमानपत्रांनीं छापू नये असा हुकूम काढला; व त्याच हुकुमाची व्याप्ती पुढें सर्व हिंदुस्थानला लागू करण्यांत आली. तथापि, सरकारच्या या दाबादाबीच्या प्रयत्नाला दाद न देतां वर्ध्याचे आचार्य वाळुंजकर आणि नागपुरचे वीर हरकरे यांनीं चिमूर नामसप्ताहाची चळवळ सुरू करून प्रो. भन्साळींच्या देहदंडनाचा संदेश सर्व प्रांतभर प्रसृत केला. कांहीं ठिकाणीं या नामसप्ताहालाही स्थानिक अधिकाऱ्यांनीं बंदी केली. पण, सार्वजनिक रीतीनें जेथें नामसप्ताह करणें अशक्य झालें तेथें घरांतून, मठांतून आणि मंदिरांतून खाजगी सप्ताह आणि सभा भरविण्यांत येऊन चिमूरची उद्वेगजनक कहाणी देवदैवतांच्या आणि स्त्रीपुरुषांच्या कानावर घालण्यांत आली. वीर हरकरे आणि त्यांचे धाकटे बंधू श्री. गोविंदराव उर्फ भय्याजी हरकरे यांनी गांवोगांव हिंडून चिमूर नामसप्ताहाचा प्रचार केला. किंबहुना डॉ. खरे यांच्या

मध्यस्थीनें पुढें जी या प्रकरणीं तडजोड घडून आली तिची भूमिकाही डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत प्रो. भन्साळी यांची भेट घेऊन वीर हरकरे यांनीं तयार केली असें म्हटल्यास तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. कारण वीर हरकरे यांच्याशीं या प्रसंगीं झालेल्या चर्चेंतच अव्वल दर्जाच्या पुढाऱ्यानें शिष्टाई केल्यास प्रो. भन्साळी हे तडजोडीला तयार होतील अशी आशा प्रथम दिसली.

वीर हरकरे हे वर्ध्याहून परत आल्यानंतर त्यांनीं आपले सहकारी श्री. ए. श्री. पटवर्धन यांना ही सर्व हकीकत सांगितली व या परिस्थितींतून कशा रीतीनें मार्ग काढता येईल याचा विचार नागपुरांतील मुख्यतः खरे पक्षाच्या कार्यकर्त्यांत सुरु झाला. तोंच सोमवार ता. ४ जानेवारी १९४३ रोजीं आचार्य गोपाळराव वाळुंजकर हे श्री. पटवर्धन यांना सायंकाळी चारच्या सुमारास नरकेसरी छापखान्यांत येऊन भेटले; व डॉ. खरे यांनी वर्ध्यास येऊन प्रो. भन्साळी यांची प्रकृति तपासावी अशी आपली इच्छा त्यांनीं पटवर्धनांजवळ व्यक्त केली. लगेच श्री. पटवर्धन हे आचार्य वाळुंजकर यांना घेऊन डॉ. खरे यांना भेटावयास त्यांच्या बंगल्यावर गेले. पण, डॉक्टरसाहेबांनीं पहिल्या सपाट्यालाच आचार्यांच्या विनंतीला नकार भरला. तथापि श्री. पटवर्धन यांनीं त्यांच्या या नकारानें नाउमेद न होतां त्यांना तेथल्या तेथेंच सांगितलें कीं, "आपला नकार अगर होकार आज आम्ही कांहींच निश्चित समजत नाहीं. आपल्याला यांनीं निमंत्रण दिलें आहे. आपण त्याचा विचार करा, कांहीं काळानें आम्ही आपलें उत्तर घ्यावयाला पुन्हा येऊं."

त्यानंतर ता. ६ रोजीं दुपारीं सौ. अनसूयाबाई काळे, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. गजाननराव माडखोलकर आणि श्री. माधवराव दातार हे वर्ध्याला जाऊन प्रो. भन्साळींना भेटले. त्यावेळीं आचार्य वाळुंजकर आणि श्री. कमल-नयन बजाज आणि खुद्द प्रो. भन्साळी यांच्याशीं त्यांचे जें बोलणें झालें, त्यावरून त्यांना असें दिसून आलें कीं, जबाबदार पुढाऱ्यांनीं या प्रकरणांत मन घालून मध्यस्थी केल्यास प्रो. भन्साळी हे उपोषण सोडावयास तयार होतील. त्याप्रमाणें नागपुरला परत आल्यावर ता. ७ रोजीं सकाळीं या चौघा जणांनीं डॉ. खरे आणि बॅरिस्टर गोविंदराव देशमुख यांची भेट घेऊन

त्यांना या कामीं शिष्टाई करण्याचा आग्रह केला; व त्यावरोबरच मुंबईचे ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर यांनाही त्यांनीं याच आशयाची विनंती करणारें पत्र घातलें. त्यानंतर ज्या गोष्टी घडल्या त्यांचें अधिकृत वर्णन श्री. ए. श्री. पटवर्धन यांनीं ता. ९ जानेवारी १९४३ रोजीं लो. अणे यांना पाठविलेल्या पत्रांत केलें आहे. त्या पत्रांतील महत्वाचा भाग पुढें देतों.

**अणे-पटवर्धन पत्रव्यवहार**

श्री. पटवर्धन हे या पत्रांत लिहितात, "प्रो. भन्साळी यांचा प्राणांतिक उपवास सुरु होऊन आजचा ६० वा दिवस आहे. प्रो. भन्साळी यांच्यावद्दलची मागील व आतांची माहीती आपणाला आहेच. आपला व त्यांचा नुकताच झालेला पत्रव्यवहार माझे पाहण्यांत आला आहे. दिल्लीला जातांना आपण प्रवासांत लिहिलेलें पत्र कालच त्यांना मिळालें तेंही माझ्या वाचण्यांत आलें.

सोमवार ता. ४ जानेवारी रोजीं वर्ध्याचे नालवाडी येथील श्री. गोपाळराव वाळुंजकर माझ्याकडे आले व डॉ. खरे यांनीं प्रो. भन्साळी यांची प्रकृति तपासावयाला यावें अशी गोष्ट काढली. लगेच ते व मी डॉ. खरे यांचेकडे गेलों व त्यांना वर्ध्याला प्रो. भन्साळींना तपासण्यासाठीं जाण्याची विनंति केली. गेल्या चार वर्षांपासून डॉ. खरे यांना महात्मा गांधी, त्यांचा परिवार व त्यांच्या संस्था यांवद्दल अत्यंत तिटकारा असल्यामुळें त्यांनीं हेंच कारण सांगून तेथें जाण्याचें स्पष्ट नाकारलें. त्यांचें मन वळविण्याचे त्यावेळीं प्रयत्न केले व अखेरीस यावद्दल निश्चित उत्तर न घेतां या प्रश्नावर विचारविनिमय करण्यास वेळ द्यावा असें मी त्यांना सांगितलें.

बुधवार ता. ६ जानेवारी रोजीं सौ. अनसूयाबाई काळे, श्री. माडखोलकर, श्री. माधवराव दातार व मी वर्धेला प्रो. भन्साळी यांना पहाण्यास गेलों. प्रो. भन्साळी यांचेशीं जें बोलणें झालें त्यावरून त्यांच्यासमोर जर एखादा मुद्दा ठेवला तर त्याचा ते विचार करण्यास तयार असल्याचें दिसून आलें. परंतु त्यांच्या आजूबाजूस दोन प्रकारचे लोक दिसतात. कांहींना त्यांचा उपवास सुटण्यास कांहींतरी मानाचा मार्ग निघावा असें वाटतें. कांहीं कट्टर लोकांना या उपवासापासून प्रो. भन्साळी परावृत्त झाले तर जगांत आपली किंमत कमी होईल अशी भीति वाटते. पण, दोन्ही पक्षांमधील लोकांना आपण येथें मित्रत्वाच्या नात्यानें

आलांत तरी परिस्थितींत फरक पडेल असें वाटत असल्याचेंहि दिसून आलें.

वर्धा येथील सर्व प्रकार डॉ. खरे व बॅरिस्टर गोविंदराव देशमुख यांचे समोर आम्ही मांडला व डॉ. खरे यांचें मन वळविण्याचा कसून प्रयत्न केला. अखेरीस आमचे प्रेमासाठीं मोठ्या जीवावर येऊन कां होईना ते वळले. त्याप्रमाणें डॉ. खरे, बॅरिस्टर गोविंदराव देशमुख, सौ. अनसूयाबाई काळे व मी काल शुक्रवार ता. ९ रोजीं त्यांच्याकडे वर्धेला गेलों. दुपारीं ११ पासून सायंकाळीं ३॥ पर्यंत स्वर्गीय जमनलालजींच्या बंगल्यावर मुक्काम केला. प्रो. भन्साळींची प्रकृति डॉ. खरे यांनीं तपासली. प्रकृतींत कोणत्याही तऱ्हेचा अजून विकार झाला नसून नाडी ८०-८४ ठोके देते. त्यांच्या मनालाही प्रसन्नता आहे. यानंतर त्यांच्यासमोर उपवास सोडण्याच्या दृष्टीनें निरनिराळे मुद्दे मांडण्यांत आले. बॅरिस्टर गोविंदराव देशमुख हे मध्यवर्ति असेंब्लींत याच विभागांतून प्रतिनिधी असल्यामुळें ते तेथें कांहीं तरी सेवा करू शकतील असें सुचविण्यांत आलें. तोंपर्यंत उपवास तहकूब करण्याची सूचना त्यांचेसमोर ठेवली. त्या प्रश्नाचा विचार अवश्य करण्याचें त्यांनीं वचन दिलें आहे. सरकारकडून चौकशीचें अभिवचन, न्याय वगैरे मागण्यासाठींच प्रायोपवेशन करण्यांत विशेष हांशील नाहीं. पण, बलात्काराचा प्रतिकार करण्यासाठीं संघटना व शक्ती समाजांत उत्पन्न व्हावी हा जर उद्देश असला तर तशा कांहीं योजनेचा लोकांना विचार करतां येईल व आपण तशा प्रकारें झालेली योजना मूर्त स्वरूपास आणण्याचा प्रयत्न करण्याकडे शक्तिसर्वस्व खर्च करावें व इतर लोकांनाही त्यांत यथाशक्ति भाग घेतां येईल. याही मुद्याचा विचार त्यांनीं करून कळविण्याचें कबूल केलें आहे. पुन्हा जरूर पडली तर आम्हीं येऊं असें डॉ. खरे यांनीं त्यांना अत्यंत प्रेमपूर्वक आश्वासन दिलें आहे.

आपणाला वरील हकीकत जशी झाली तशी कळविण्याचा प्रयत्न केला आहे. चिमूर प्रकरणांतील बलात्काराच्या ज्या कांहीं केसेस चौकशीलायक असतील त्याबद्दल फेरविचार करण्याचें ठरलें तर एवढ्या हालचालीचा परिणाम त्यांचा उपवास सोडण्यास मदत करील असें वाटतें."

ता. ११ जानेवारी १९४३ रोजीं श्री. पटवर्धन यांच्या या पत्राला

दिल्लीहून पाठविलेल्या उत्तरांत बापुजी लिहितात, "आपल्या ता. ९ च्या पत्राबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. प्रो. भन्साळी यांची प्रकृति पहाण्यासाठीं डॉ. खरे यांचें मन वळविण्यांत आपण मोठीच कामगिरी केली आहे. इतर सर्वांचे प्रयत्न जेथें विफल झाले तेथें डॉ. खरे यांचे प्रयत्न तरी यशस्वी होतील अशी मला दृढ आशा आहे. मी स्वत: प्रो. भन्साळी यांचा चिंताजनक उपवास सुटण्यासाठीं शक्य ते सर्व प्रयत्न करीतच आहे. तुम्हीं, डॉ. खरे आणि इतर मित्रमंडळी यांनीं तडजोडीचे जे मुद्दे प्रो. भन्साळी यांना सुचविले आहेत ते महत्वाचे असून आपलें उपोषण सोडण्यासाठीं आणि चिमूर येथील जनतेच्या दु:खनिवारणाला अनुकूल वातावरण उत्पन्न करण्यासाठीं प्रो. भन्साळी यांना ते सबळ वाटतील अशी मला आशा आहे. डॉ. खरे, माडखोलकर, दातार आणि सौ. काळे यांनाही माझे कळकळीचे आभार कळवावे."

### खरे-मुन्शी वाटाघाट

या दोन पत्रांवरून तडजोडीच्या प्रास्ताविक स्वरूपाची कल्पना येईल. शनिवारी सायंकाळीं ५ वाजतां प्रो. भन्साळी यांचे 'विश्वस्त' श्री. कन्हैयालाल मुन्शी हे आचार्य वाळुंजकर यांच्यासह डॉ. खरे यांना त्यांच्या घरीं येऊन भेटले. त्यावेळीं बॅ. गोविंदराव देशमुख, श्री. पटवर्धन, सौ. काळे प्रभृति मंडळी हजर होती. समेटाच्या वाटाघाटींना सुरुवात करतांनाच श्री. मुन्शी यांनीं लो. बापुजी अणे यांचा उल्लेख करून जेव्हां त्यांना दोष देण्याला प्रारंभ केला तेव्हां डॉ. खरे हे त्यांना सटकन म्हणाले, "या बाबतींत तुम्हीं एकट्या बापुजींनाच कां दोष देता? बापुजींपेक्षांही महात्माजींच्या जास्त सलगींत असलेले नलिनीरंजन सरकार हे एक बडे माजी कांग्रेसवाले व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळांत आहेत ना? त्यांनीं या बाबतींत कां तोंड उघडूं नये? तेव्हां दोष द्यावयाचाच असेल तर तो अण्यांबरोबर सरकारनाही द्या." त्यानंतर पुन्हा श्री. मुन्शी यांनीं बापुजींचा उल्लेख केला नाहीं.

### एक हृदयस्पर्शी प्रसंग

ही वाटाघाट चालू असतां जो एक हृदयस्पर्शी प्रसंग घडला, तो येथें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. डॉ. खरे आणि श्री. मुन्शी यांनीं संगनमतानें

तयार केलेला समेटाचा मसुदा पक्का करण्याचे दृष्टीनें डॉ. खरे हे तो तपासून पहात असतां व्हरांड्यांत एकाएकी रुदनस्वर ऐकू आला. त्याबरोबर डॉक्टर-साहेबांनी हातांतील मसुद्याचे कागद खालीं ठेवून समोर पाहिलें, तों हातांत तान्हें मूल घेतलेली एक तरुण स्त्री रडत रडत पुढें आली. तिच्या मागें उभी असलेली वृद्ध स्त्री डॉक्टरसाहेबांना पहातांच केविलवाण्या आवाजांत म्हणाली, "या बाळाला काय झालं आहे तें पहा हो साहेब." त्याबरोबर डॉक्टरसाहेब चटकन उठून व्हरांड्यांत आले व रडत असलेल्या त्या दोन्ही स्त्रियांना धीर देऊन त्यांना म्हणाले, "तुम्ही घाबरूं नका, मी बाळाला काय झालं तें पहातों." तें मूल बेशुद्ध स्थितींत होतें. डॉक्टरांनीं त्याला पाहून लगेंच कांहीं औषध दिलें व त्या स्त्रिया उठून चालू लागल्यावर ते उठून आंत आले. श्री. मुन्शी यांना तो प्रकार पाहून नवल वाटलें आणि ते उद्गारले, "हा काय प्रकार आहे?" तेव्हां तेथें बसलेल्या मंडळींपैकीं एकानें त्यांना चटदिशीं उत्तर दिलें, "येथें हे प्रकार नेहमींच चालतात. डॉ. खरे यांचें वैशिष्ट्य या प्रकारांतच आहे."

**खरे-गव्हर्नर वाटाघाटी**

शनिवारीं दोन तास चर्चा करून समेटाचा जो कच्चा मसुदा तयार झाला, तो रविवारी सकाळीं ९ वाजतां डॉ. खरे हे ना. गव्हर्नर यांच्याकडे घेऊन गेले. गव्हर्नरांशीं बोलणें करून ते १०॥ ला परत आले व लगेंच ११ ला श्री. मुनशी हे तो मसुदा घेऊन आचार्य वाळुंजकर यांच्यासह वर्ध्याला गेले. ते रात्रीं ७। ला वर्ध्याहून डॉ. खरे यांच्या बंगल्यावर आले व ८॥ पर्यंत पुन्हा खरे, देशमुख, पटवर्धन, काळे प्रभृति मंडळींची बैठक होऊन शेवटचा मसुदा तयार करण्यांत आला. त्यानंतर सोमवारीं सकाळीं १० ते ११। सायंकाळीं ४ ते ५ आणि पुन्हा ६॥ ते ७॥ डॉ. खरे यांनीं नामदार गव्हर्नरांशीं वाटाघाट केली; व सोमवारी रात्री गव्हर्मेंट हाऊसवरून परत आल्यापासून मंगळवारी दुपारीं १२॥ पर्यंत डॉ. खरे यांची फोनवर नामदार गव्हर्नर यांच्याशीं सारखी बातचीत चालू होती. दरम्यान दुपारीं १२॥ वाजतां डॉ. खरे यांनीं समेटाचा मसुदा मंजूर होण्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन

श्री. मुन्शी, आचार्य वाळुंजकर आणि सौ. काळे यांना वर्ध्याला आणविलें. कारण प्रो. भन्साळी यांनीं पाणी घेण्याचेंही सोडून दिल्याचा फोन सोमवारीं वर्ध्याहून आला होता. श्री. मुन्शी प्रभृति मंडळी वर्ध्याच्या वाटेस लागतात न लागतात तोंच नामदार गव्हर्नर यांचा डॉ. खरे आणि प्रो. भन्साळी यांच्या पत्रांना संमति दिल्याचा फोन एकच्या सुमारास आला; व सोमवारीं दुपारपासून अविश्रांत वाटाघाटी करीत असलेल्या डॉक्टरसाहेबांनीं समाधानाचा निःश्वास टाकला. प्रो. भन्साळी यांच्या पारण्याच्या वेळीं डॉ. खरे यांनीं हजर रहावें म्हणून श्री. मुन्शी प्रभृतींनीं त्यांना वर्ध्याला येण्याचा पुष्कळ आग्रह केला. पण डॉक्टरसाहेबांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें जातां आलें नाहीं. त्यांनीं आपल्यातर्फे सौ. काळे यांना श्री. मुन्शी यांच्याबरोबर पाठविलें.

### वर्धा येथील पारणें

श्री. मुन्शी, सौ. काळे, आचार्य वाळुंजकर, श्री. द्वारकादास डागा प्रभृति मंडळी दुपारीं २ ला वर्ध्यास पोंचली. तत्पूर्वींच डॉ. खरे यांनीं नामदार गव्हर्नर यांच्या मंजुरीची वातमी श्री. कमलनयन बजाज यांना फोननें कळविली होती. वर्ध्याला पोंचल्याबरोबर श्री. मुन्शी, सौ. काळे प्रभृतींनीं प्रो. भन्साळी यांना भेटून त्यांना समेटाचें स्वरूप समजावून सांगितलें व उपोषण सोडण्याची तयारी केली. त्याप्रसंगीं श्री. जानकीबाई बजाज, श्री. कमलनयन बजाज, वर्ध्याचे सिव्हिल सर्जन आणि इतर आश्रमीय मंडळी हजर होती. वर्ध्याचे डेप्युटी कमिश्नर श्री. मोने हेही अगदी आयत्या वेळीं सपत्नीक येऊन दाखल झाले. प्रथम प्रो. भन्साळी यांची पुतणी कु. नंदनबाला हिनें प्रार्थना केल्यावर श्री. मुनशी यांचें भाषण झालें. व नंतर बरोबर ४-२५ वाजतां श्री. जानकीबाई बजाज यांनीं प्रो. भन्साळी यांना मुसंब्याचा रस दिला. त्यानंतर श्री. मुन्शी, श्री. कमलनयन बजाज व सौ. काळे यांची प्रो. भन्साळी यांच्या गौरवपर व डॉ. खरे यांच्या आभारपर भाषणें झालीं. श्री. कमलनयन बजाज यांनीं प्रो. भन्साळी यांनीं ज्या ठिकाणीं उपोषणाला प्रारंभ केला, त्या ठिकाणाला 'भन्साळी कुटिर' असें नांव आपण देणार असल्याचें जाहीर केलें. अशा रीतीनें त्रेसष्टाव्या दिवशीं प्रो. भन्साळी यांचें प्रायोपवेशन सुटून हिंदी वृत्तपत्रांच्या गळ्याला लागलेला तांतही सुटला.

**समेटाची रूपरेषा**

आतां समेटासंबंधीचा अधिकृत पत्रव्यवहार पुढें देतों :—

प्रो. भन्साळींना ता. १२ जानेवारीला पाठविलेल्या पत्रांत डॉ. खरे म्हणतात, "मी ८ जानेवारीला तुमची भेट घेऊन तुमच्याशीं वाटाघाटी केल्या. त्यानंतर ना. गव्हर्नरांशीं चिमूर प्रकरणाबाबत मी मोकळेपणानें चर्चा केली. इतके दिवस उलटल्यामुळें अपराधी वगैरे यांची ओळख पटविणें ही गोष्ट कठीण आहे, ही गोष्ट लक्षांत घेतां चिमूर-स्त्रियांवरील अत्याचारांची जाहीर चौकशी करण्याचा आग्रह धरण्यांत येऊ नये.

मात्र, मी तुम्हाला खालील आश्वासन देऊं शकतों:—

(१) चिमूरच्या सर्वसाधारण स्त्री-समाजावर कोणताही हीन हेतू लादण्याचा आपला उद्देश नव्हता, सुव्यवस्था राखण्याच्या कामावर नेमलेले लष्कर व पोलीस यांच्यांतील शिस्तीला सरकार सर्वांत अधिक महत्व देतें व देत आलें आहे, तसेंच स्त्रियांच्या प्रतिष्ठेविषयीं आदर बाळगणें व त्यांच्या इभ्रतीचें संरक्षण करणें हें उत्तम शिस्तीचें पहिलें आवश्यक अंग आहे व राहील असेंच तें मानतें, अशा आशयाचें पत्रक मध्यप्रांत सरकार काढील.

(२) चिमूर व भन्साळी संबंधीचा वृत्तपत्रांवरील बंदीहुकूम उठविला जाईल.

(३) उपवास सुटतांना या पत्राबरोबर सरकारचें पत्रकही प्रसिद्ध होईल.

(४) चिमूरला जाणाऱ्यांवर सध्यां नियंत्रणें नाहींत असें समजतें. परंतु कांहीं असतील तर तींही उठतील.

चिमूरला तुमच्याबरोबर ना. अणे येतील व लोकांना भेट देतील; सरकार कांहींही नियंत्रणें घालणार नाहीं असेंही आश्वासन मी देऊं शकतों. तुमची इच्छा असेल तर तुमच्याबरोबर येण्यास माझीही हरकत नाहीं.

तुम्ही प्रचंड स्वार्थत्याग केला आहे; पण वरील गोष्टी ध्यानांत घेऊन तुम्ही आपला पराक्रमी उपवास सोडावा, अशी माझी विनंति आहे."

या पत्राला उत्तर म्हणून त्याच दिवशीं डॉक्टरसाहेबांना पाठविलेल्या पत्रांत प्रो. भन्साळी लिहितात, "तुमचें पत्र व तुम्ही चालविलेले प्रयत्न याबद्दल

आभार. तुम्ही सुचविल्याप्रमाणें पत्रक काढण्यास, चिमूर-वृत्तासंबंधीची वृत्त-पत्रांवरील बंदी उठविण्यास आणि चिमूरला जाणाऱ्यांवरील नियंत्रणें दूर करण्यास सरकार राजी आहे हें ऐकून मला आनंद वाटतो. तसेंच माझ्याबरोबर चिमूरला येऊन तेथलि लोकांची भेट घेण्यास व अशा रीतीनें माझी विनंति मान्य करण्यास श्री. अणे तयार आहेत याबद्दलही मला संतोष वाटतो. मी धार्मिक जीवनाला वाहिलेला माणूस आहे. आणि एखाद्या देखील स्त्रीच्या इज्जतीला धक्का लावणें हा नुसत्या समाजाविरूद्धच नव्हे तर परमेश्वराविरूद्ध गुन्हा आहे, असेंच मी मानीत आलों आहे. अगदी थोड्या प्रमाणांत कां होईना, माझी ही भावना इतरांतही संक्रमित करण्याची मला ही संधी मिळाली. स्त्रियांच्या प्रतिष्ठेसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सदसद्विवेकबुद्धि जागृत करण्याचें मला परमेश्वरानें साधन केलें याबद्दल मी परमेश्वराचा उपकृत आहे.

माझी प्रकृति पूर्ववत झाल्यावर श्री. अणे व तुम्ही यांच्या समवेत मी चिमूरला आनंदानें भेट देईन. तुम्ही दिलेलीं कारणें लक्षांत घेऊन चौकशीची मागणी सोडून देऊन उपवास सोडण्याचें मी कबूल करतों. उपवास सुटल्या-नंतर त्यासंबंधीं किंवा चिमूरच्या लोकांना मदत करण्यसाठीं मी भाषणें वगैरे ज्या कांहीं हालचाली करीन त्यांवर नियंत्रणें असूं नयेत.

### वृत्तपत्रांवरील बंदी उठली

प्रो. भन्साळी यांनीं उपोषण सोडण्याबाबत चालू असलेल्या वाटाघाटी समाधानकारक रीतीनें संपल्याबरोबर सरकारचे चीफ सेक्रेटरी श्री. जयरत्नम यांनीं तांतडीनें एक प्रेस कान्फरन्स बोलाविली व तींत भा. सं. कायद्याच्या नियम ४१ (१) खालीं बजाविण्यांत आलेला हुकूम सरकारनें मागें घेतला असल्याचें जाहीर केलें. हा हुकूम वृत्तपत्रांना, प्रो. भन्साळी आणि चिमूर या संबंधींचा उल्लेख करण्यास मनाई करणारा होता.

या प्रेस कान्फरन्समध्यें सरकारचे प्रकाशनाधिकारी श्री. मो. ज्ञा. शहाणे म्हणाले कीं, "चिमूर घटनेंतून उपस्थित झालेल्या अडचणी निवारण करण्या-साठीं जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांचें सरकार स्वागत करतें. चिमूरच्या सर्वसाधारण स्त्री–समाजावर हीन हेतू लादण्याचा सरकारचा हेतू नव्हता. शांततारक्षणाच्या

कामावर असलेले पोलीस आणि लष्कर यांच्या शिस्तीला सरकार पूर्वींही सर्वांत अधिक महत्व देत होतें आणि आतांही देत आहे व स्त्रियांच्या प्रतिष्ठेविषयीं आदर आणि इभ्रतींचें संरक्षण करणें हें चांगल्या शिस्तीचें उत्तम प्रकारें पालन करणें होय, असें सरकारला वाटतें."

**ना. गव्हर्नरांचे आभार**

भन्साळी प्रकरणाचा असा गोड शेवट झाल्यानंतर ता. १३ जानेवारी रोजीं ना. गव्हर्नर यांनीं डॉ. खरे यांना पुढील पत्र पाठविलें. "मुंबईला जावयास निघण्यापूर्वीं भन्साळींच्या उपोषणामुळें उत्पन्न झालेला पेंच सोडविण्याचे जे बिकट आणि चीज न होण्यासारखें काम आपण अंगावर घेतलें त्याबद्दल मला आपले आभार मानले पाहिजेत. हें प्रकरण समतोलबुद्धीनें आणि कुशलतेनें आपण मिटविलें, त्याबद्दल मला आपल्याविषयीं किती कृतज्ञता वाटते हें मी आपल्याला कळवीत आहे."

हें मूळ इंग्रजी पत्र मुद्दाम खालीं पुढें देत आहों : —

GOVERNOR'S CAMP
C. P. & BERAR
13th January 1943.

Dear Dr. Khare,

Before leaving for Bombay, I must write and thank you for undertaking the difficult and thankless task of solving the situation arising out of Bhansali's fast.

I want to convey to you how grateful I am for your balanced attitude of mind over this question and for the skill with which you handled it.

Yours Sincerely
(SD) HENRY TWYNAM.

**फांशीनिवारणाचे प्रयत्न**

भन्साळी–चिमूर प्रकरणांतूनच फांशीनिवारक समितीच्या स्थापनेची कल्पना निघाली असें म्हटलें तरी चालेल. बैतुलचे श्री. विष्णु गोंड यांना

ज्या वेळीं नागपुरास आणण्यांत आलें, त्यावेळीं त्यांनीं नागपुरचे वीर हरकरे यांना असा निरोप पाठविला कीं, "माझ्या मुलांचा सांभाळ आपण करा" या निरोपामुळें वीर हरकरे यांच्या मनांत फांशीची शिक्षा झालेल्या सर्वच व्यक्तींचा कायदेशीर बचाव करण्यासाठीं कांहीं तरी संघटित प्रयत्न करावा अशी कल्पना आली; व ता. २४ जानेवारी रोजीं आचार्य वाळुंजकर आणि श्री. माडखोलकर यांच्याजवळ त्यांनीं ती बोलून दाखविली. त्याच दिवशीं दुपारीं श्री. वाळुंजकर आणि श्री. माडखोलकर हे डॉ. खरे यांना भेटावयास गेले असतां, डॉक्टरसाहेबांनीं नागपुरांतील एका पोलीस कान्स्टेबलच्या खुनाबाबत फांशीची शिक्षा झालेला शंकर कुणबी प्रीव्ही कौंसिलकडे अपील करावयाला लागणारी रुपये ३०० ची रक्कम मुदतीपेक्षां थोडी उशीरा भरली गेल्यामुळें कसा फांशी गेला, याची उद्वेगजनक हकीकत त्यांना सांगितली. शंकर कुणबी याला वांचविण्यासाठीं स्वत: डॉक्टरसाहेबांनीं आदल्या रात्रीं मध्यस्थीचे शक्य ते सर्व प्रयत्न केले होते. पण, अपीलासाठीं लागणारी रक्कम वेळेवर भरली गेली नाहीं येवढ्या केवळ एका तांत्रिक मुद्यावर, डॉक्टसाहेबांनीं केलेली मध्यस्थी न मानतां त्याला दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. १९ जानेवारी रोजीं फांसावर लटकविण्यांत आलें. या निर्घृण प्रकारामुळें डॉक्टरसाहेब अत्यंत क्षुब्ध झाले होतें. म्हणून आचार्य वाळुंजकर आणि श्री. माडखोलकर यांना त्यांनीं असें निक्षून सांगितलें कीं, "माझ्यासारख्या माणसाला दर वेळीं मध्यस्थी करावयाला सांगण्यापेक्षां तुम्ही प्रमुख नागरिकांच्या सह्यांचें एक विनंतीपत्र काढून फांशीची शिक्षा झालेल्या लोकांना माफी देण्याची विनंति सरकारला करा व त्याबरोबरच त्यांच्या वतीनें प्रीव्ही कौंसिलपर्यंत दाद मागण्यासाठीं एक संस्थाही स्थापन करा."

डॉ. खरे यांच्या या सूचनेनुसार त्याच दिवशीं श्री. वाळुंजकर आणि श्री. माडखोलकर हे बॅ. गोविंदराव देशमुख यांना भेटले. व त्यांनीं देशमुखांकडून जाहीर विनंतीचा मसुदा तयार करून घेतला. त्यांत डॉ. खरे यांनीं योग्य ते फेरफार केल्यावर तें जाहीर पत्रक अनेक नागरिकांच्या सह्यांनीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालें. त्यानंतर वीर हरकरे, श्री. रामभाऊ मनोहर, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. प्र. के. तारे, श्री. भय्यासाहेब उधोजी आणि

श्री. माडखोलकर यांच्या प्रयत्नानें ता. ७ फेब्रुवारी रोजीं डॉ. खरे यांच्या बंगल्यावर निमंत्रितांची सभा भरून डॉक्टरसाहेबांच्या अध्यक्षतेखाली फांशी निवारक समितीची रीतसर स्थापना झाली. डॉ. खरे हे व्हाइसरॉयचे कार्यमंत्री झाल्यावर त्यांनीं या समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तथापि, त्यांच्या प्रेरणेनें चालू झालेलें हें भूतदयेचें कार्य सौ. अनसूयाबाई काळे, वीर हरकरे, श्री. उधोजी हे जोमानें पुढें चालवीत आहेत.

# व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळावर नेमणूक

**महात्माजींचा उपवास**

ता. ९ ऑगस्ट १९४२ नंतर ह्या देशांत झालेले दंगेधोपे, अत्याचार, गोळीबार, प्राणहानि इत्यादिबद्दलची जबाबदारी ब्रिटिश सरकारतर्फे वेळोवेळीं भाषणें करून भारतमंत्री व व्हाइसरॉय यांनीं महात्मा गांधी व कॉंग्रेस वर्किंग कमेटी यांचेवर टाकली होती. ह्या आरोपांचा एक तर इन्कार तरी करा किंवा जाहीर चौकशी करा, याबद्दलचा पत्रव्यवहार व्हाइसरॉयबरोबर महात्माजींनीं तुरुंगांतूनच चालविला होता. त्या दोहोंपैकीं कोणतीही गोष्ट करण्यास सरकार तयार नाहीं असें पाहून महात्माजींनीं ९ फेब्रुआरी १९४३ पासून २१ दिवसांचा आपल्या शक्तिमानास झेपेल असा उपवास करण्याची घोषणा केली होती. महात्मा गांधींच्या ह्या घोषणेमुळें सबंध हिंदुस्थानभर अत्यंत खळबळ उडाली. तिचा सर्वांत महत्वाचा परिणाम म्हणजे व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळावरील लो. बापुजी अणे, सर होमी मोदी व नलिनीरंजन सरकार या तीन सभासदांनीं एकदम राजीनामे देण्यांत झाला. बापुजी अणे तर दिल्लीहून निघाले ते थेट पुण्यास आगाखान पॅलेसमध्यें महात्मा गांधींच्या जवळ जाऊन पोहोचले. या उपवासांत २० तारखेपासून सुमारें तीनचार दिवस महात्माजींची प्रकृति अत्यंत चिन्ताजनक झाली होती यांत शंका नाहीं. आणि उपवास शक्तिमानास अनुसरून असल्यामुळें डॉ. बिधनचंद्र रॉय प्रभृति त्यांच्यावरील पर्यवेक्षक डॉक्टरांनीं मोसंबीचा रस पाण्यांतून पाजल्यामुळें ह्या अत्यंत बिकटावस्थेंतूनही महात्माजी पार पडले. वयाच्या ७४ व्या वर्षीं २१ दिवसांचा हा उपवास मोठ्या दृढ निश्चयानें त्यांनीं पार पाडला यांत शंका नाहीं. पण त्या संबंधीं डॉ. बिधनचंद्र रॉय यांनीं जें आध्यात्मिक गूढ (Mystic) वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला, त्याबाबत डॉ. खरे यांनीं एक खास पत्रक काढून त्यांत "अशा तऱ्हेचें गूढ वातावरण निर्माण करण्याची जरूरी नाहीं. मनुष्यमात्राच्या प्रकृतींत अशी गोष्ट होणें स्वाभाविक आहे," असें आपलें मत प्रदर्शित केलें होतें.

### ६२ वा वाढदिवस समारंभ

वस्तुत: डॉ. खरे यांच्या आयुष्यास दोन वर्षांपूर्वींच ६१ वें वर्ष लागलें होतें. आणि अलीकडे थोर पुरुषांना दीर्घायुष्य चिंतन करण्याचा एक प्रकार म्हणून त्यांच्या ६१ व्या वर्षगाठीचा समारंभ साजरा करण्याची महाराष्ट्रांत जी प्रथा पडली आहे, तिला अनुसरून त्या वेळींच डॉ. खरे यांचाही हा समारंभ व्हावयास पाहिजे होता. परंतु अनेकविध कारणांस्तव व त्यांच्या संमतीच्या अभावी हा समारंभ त्यावेळीं होऊ शकला नाहीं. जणुंकाय ही रुखरुख लागून राहिल्यामुळेंच त्यांच्या मित्रमंडळींनीं व चहात्यांनीं ता. २ एप्रिल १९४३ रोजीं हा समारंभ नागपुर येथील गीता-मैदानावर लो. बापुजी अणे यांच्या अध्यक्षतेखालीं घडवून आणला. जरी प्रारंभीं त्या समारंभाच्या कल्पनेस डॉ. खरे स्वत: प्रतिकूलच होते; तरी मित्रांची व चहात्यांची भीड ही अशीच वस्तु आहे कीं, जी अनेक थोरामोठ्यांच्या बाबतींत देखील दुर्लंघ्य ठरली आहे. या समारंभाच्या वेळीं प्रांतांतील व नागपुर शहरांतील अनेक प्रमुख संस्था व व्यक्ती यांचे तर्फे डॉ. खरे यांचा सत्कार करण्यांत आला. समारंभाचे स्वागताध्यक्ष, श्रीमंत गणपतराव बुटी यांनीं भारतभूमीचा एक सुंदर चांदीचा नकाशा उपायन म्हणून डॉ. खरे यांना नजर केला. तसेंच लोकनायक बापुजी अणे व डॉ. खरे यांना श्रीमंत बुटी यांनीं एक थाटाची मेजवानीही दिली. ह्या समारंभांत कुलगुरु नानासाहेब केदार, प्राध्यापक डॉ. शं. दा. पेंडसे, सौ. अनुसूयाबाई काळे, हरिजनांचे पुढारी श्री. गवई, हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. बाळशास्त्री हरदास इत्यादि वक्त्यांचीं प्रमुख भाषणें झालीं.

### खरे-गांधी समेटाची प्रस्तावना

ह्या समारंभाचे वेळीं बोलतांना कुलगुरु नानासाहेब केदार यांनीं डॉ. खरे व महात्मा गांधी यांचे संबध पुन्हा पूर्ववत प्रस्थापित होण्याच्या आवश्यकतेवर विशेष भर दिला. ते म्हणाले, "महात्मा गांधी पकडले जाण्यापूर्वीं थोडेच दिवस अगोदर मी त्यांना सेवाग्राम येथें भेटलों होतों. त्यावेळीं माझ्याजवळ डॉ. खरे यांच्याविषयीं त्यांनीं अतिशय कळकळीचे उद्‌गार काढले आणि डॉ. खरे यांना परत कॉंग्रेसमध्यें घेऊन या, असेंच त्यांनीं मला परोपरीनें सांगितलें. माझीही

डॉ. खरे यांना अशीच विनंति आहे कीं, महात्मा गांधी हे जगद्वंद्य विभूति आहेत. ते आज तुम्हांला परत आपल्या जवळ बोलावीत आहेत, तेव्हां तुम्हीही झालें गेलें सर्व विसरून महात्माजींवरोवर आपले संबंध पूर्ववत प्रस्थापित करा" ह्या ठिकाणीं हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, वर्धा येथील वर्किंग कमेटीच्या सभेसाठीं आलेले असतांना वर्किंग कमेटीचे सभासद, डॉ. सय्यद महमूद यांनींही मुद्दाम डॉ. खरे यांची त्यांच्या घरीं जाऊन भेट घेतली होती व तुम्ही कॉंग्रेस-मध्यें परत या अशी त्यांना विनंति केली होती. हीच विनंति नागपूर येथील जाहीर सभेंत जाहीर रीत्याही त्यांनीं केली होती. प्रस्तुत समारंभाचे वेळीं कुलगुरु नानासाहेब केदार यांच्या वरील सूचनेस सौ. अनसूयाबाई काळे यांनींही आपल्या भाषणांत अंत:करणपूर्वक पाठिंवा दिला होता.

**लो. ना. अणे यांचें भाषण**

ह्या समारंभाचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना लो. ना. बापूजी अणे यांनीं, आजपर्यंत अनेक वेळेला डॉ. खरे यांच्याविरुद्ध आपणास काय करावें लागलें, अजूनही आपण डॉ. खरे यांच्या कोणत्या मुख्य गुणास चाहतों हें विशद करून सांगितलें. ते म्हणाले, "मला डॉ. खरे यांच्या ठिकाणीं जो गुण विशेष महत्वाचा वाटतो तो असा कीं, कांहींही झालें तरी ह्या देशांतील सत्ता गोऱ्या नोकरशाहीच्या हातांत जाणें त्यांना बिलकुल पसंत वाटत नाहीं. म्हणूनच कॉंग्रेससारख्या बहुमतवाल्या पक्षानें मंत्रीमंडळाचा त्याग केल्यानंतर अल्प-मतांतील लोकांचें मंत्रीमंडळ बनविण्याचा डॉ खरे यांनीं प्रयत्न केला. हे अल्पमतांतले लोक कायदेमंडळांत अल्पमतांत असलें तरी जनतेनेंच त्यांनाही निवडून दिलें आहे. त्यामुळें जनतेचें प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार त्यांनाही पोंहचतोच. बहुमतपक्षानें कोणत्याही कारणास्तव कां होईना आपल्या हातांतली सत्ता सोडल्यानंतर ती सत्ता परत नोकरशाहीच्या हातांत जाऊं देऊन १९०८ च्या पूर्वीचीही निरंकुश प्रतिगामी परिस्थिति उत्पन्न होऊं द्यावी कीं, अल्पमतांतील लोकांनीं पुढें सरसावून ह्या प्रतिगामी परिस्थितीस आळा घालण्याच्या दृष्टीनें ती सत्ता आपल्या हातीं घ्यावी व जनतेचें प्रतिनिधित्व करण्याचें आपलें कर्तव्य बजावीत रहावें; असा हा मूलगामी प्रश्न आहे. आणि

ह्या प्रश्नाचें उत्तर नोकरशाहीच्या विरुद्ध व जनतेच्या वतीनें देण्याचा प्रयत्न डॉ. खरे यांनीं केला म्हणूनच मला ते विशेष अभिनंदनार्ह वाटतात. त्यांचा हा प्रयत्न फसला असेल ही गोष्ट वेगळी. पण, ह्या प्रयत्नाच्या रूपानें त्यांनीं आपलें कर्तव्य मात्र चोख बजावलें यांत शंका नाहीं".

## डॉ. खरे यांचें उत्तर

समारंभाच्या शेवटीं प्रत्युतरादाखल भाषण करतांना डॉ. खरे म्हणाले, "माझ्या मित्रांनीं प्रथम माझी करंगळी धरली व नंतर मनगट धरलें. त्यामुळें माझा नाइलाज झाला. वस्तुतः या असल्या समारंभांच्या मी मनापासून विरुद्ध आहें. माझ्या सत्काराचे मी प्रधानमंत्री असतांना यापेक्षांही कितीतरी मोठे समारंभ झालेले आहेत. त्यामुळें मला या समारंभाची कांहींच चाड नव्हती. परंतु ह्या निमित्तानें माझ्या साध्याभोळ्या बायकोचाही ह्या ठिकाणीं जो सत्कार झाला, त्याचेंच समाधान मला अधिक आहे. महात्मा गांधींचा मी द्वेष करतों अशांतला मुळींच प्रकार नाहीं. मी बिलकुल त्यांचा द्वेष करीत नाहीं. परंतु त्यांनीं मला अन्याय केला आहे, अशी मात्र माझी पक्की भावना आहे. मी मनुष्य आहें. आणि म्हणूनच मनुष्यस्वभावास धरून माझ्या मनांत महात्मा गांधींविषयीं सूडाची भावना उत्पन्न झालेली आहे हें मी कबूल करतों." आणि डॉ. खरे यांचें हें म्हणणेंही योग्यच नाहीं काय? महाभारतांतील संजय-विदुला संवादांत विदुलेनें संजयास उद्देशून —

"एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ।
क्षमावान्निरमर्षश्च नैव स्त्री न पुनः पुमान् ॥"

काढलेल्या वरील उद्‌गारांत ज्याला राग येतो व जो अन्यायाची क्षमा करीत नाहीं, तोच खरा पुरुष होय व ज्याला राग येत नाहीं व जो क्षमाही करतो तो पुरुष नव्हे व स्त्रीही नव्हे असाच भाव व्यक्त केलेला नाहीं काय? हाच भाव डॉ. खरे यांनींही आपल्या भाषणांत यावेळीं बोलून दाखविला.

## व्हाइसरॉयचें निमंत्रण

लोकनायक अणे प्रभृति तीन सदस्यांनीं राजीनामे दिल्यामुळें रिकाम्या झालेल्या व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळावरील जागा भरून निघण्यासंबंधीं देशांत

बरेच तर्कवितर्क सुरू झाले होते. बॅरिस्टर जमनादास मेथा, बॅरिस्टर रामराव देशमुख, श्री. बाबासाहेब खापर्डे इत्यादिकांचीं नांवें या जागेसाठीं पुढें करण्यांत येत होतीं. परंतु, हे सर्व अदमास अखेरीस चुकीचे ठरून लोकनायक अणे यांची रिकामी झालेली जागा स्वीकारण्यासाठीं व्हाइसरॉयकडून डॉ. खरे यांना निमंत्रण आलें. अधिकाराची जागा अथवा सत्ताकेंद्र कोणतेंही व कोठलेंही असो, तें गोऱ्या नोकरशाहीच्या हातीं राहण्यापेक्षां लोकप्रतिनिधींच्या हातीं राहणेंच अधिक श्रेयस्कर होय, असेंच डॉ. खरे यांचेंही मत असल्यामुळें त्यांनीं ह्या निमंत्रणाचा स्वीकार करण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें व्हाइसरॉयला कळविलें. देशांतील सर्वसाधारण राजकीय परिस्थितींत बदल घडून आला तर त्याच्या परिणामस्वरूप आपण ही जागा सोडण्यास तयार आहोंत, असें डॉ. खरे यांनीं एक वक्तव्य करून जाहीरपणें सांगितलें. कार्यकारी मंडळावरील ही जागा घेण्याची डॉ. खरे यांची भूमिका त्यांनीं आपल्या ता. ६ मे १९४३ च्या वक्तव्यांत प्रकट केली असल्यामुळें ते जसेंच्या तसेंच येथें उध्दृत करणें आम्हांस अवश्य वाटतें.

**डॉ. खरे यांचें पत्रक**

या वक्तव्यांत ते म्हणतात, "व्हाइसरॉयच्या मंत्रीमंडळावरील जागेची जडजोखीम मी १–२ दिवसांत स्वीकारणार, अशा आणीबाणीच्या वेळीं माझें अंत:करण आनंद व दु:ख यांच्या ऊर्मीनीं भरून गेलें आहे. आनंद अशासाठीं कीं, पांच वर्षांपूर्वी माझ्याच देशबांधवांनीं मला राज्यकारभार हांकण्यास नालायक ठरविलें होतें. मला नालायक ठरविण्यांत महात्मा गांधीं हेच प्रमुख होते. त्यांनीं माझा मानसिक तोल गेल्याचा आरोप मजवर केला होता. पण, आज निदान परकीय राज्यकर्त्यांनीं तरी राज्यकारभार चालविण्याची माझी लायकी मान्य केली. मला दु:ख होतें तें अशासाठीं कीं, नागपूर शहर व हा प्रांत मला सोडावा लागणार आहे. या प्रांताचा व विशेषत: नागपुरचा प्रतिनिधी म्हणून मला येथील लोकांनीं या प्रांताचा व शहराचा प्रतिनिधी म्हणून प्रांतिक व मध्यवर्ति कायदेमंडळावर निवडून देऊन माझ्यावर अनेक वर्षांपासून विश्वास व्यक्त केला आहे. म्हणून हें शहर सोडून जातांना मला दु:ख वाटणें साहजिक

आहे. मी माझें आयुष्य सरकारी अधिकारी म्हणून सुरु केलें व शेवटी शेवटी सरकारी अधिकारी म्हणूनच माझी कारकीर्द संपेल, असा माझ्या प्राक्तनाचा योग दिसतो. ही दैवाची लीला विचित्र आहे. तें कांहीं असो. पण, आजपर्यंत नेहमीं माझ्या देशाच्या हितसंरक्षणासाठींच शक्य तितकी दक्षता मी ठेवली, अशीच दक्षता मी यापुढेंही बाळगीन. मला चहूंकडून अनेक अभिनंदपर तारा व पत्रें आलीं आहेत. त्यामुळें मला धीर व उत्तेजन आलें आहे. या सर्व मित्रांचें मी जाहीरपणें आज आभार मानतों. या देशांत जर राजकीय तडजोड घडून आली आणि त्यामुळें हल्लीं मी स्वीकारीत असलेली जागा व जबाबदारी मला सोडावी लागली, तर त्यामुळें मला जितका आनंद होईल, तितका दुसऱ्या कोणासच होणार नाहीं."

**विलक्षण योगायोग**

अशा रीतीनें डॉ. खरे हे एका बाजूनें आपल्या आयुष्याच्या ढळत्या भागांत कां होईना पण अत्युच्च अशा राजाधिकार–पदावर ज्या दिवशीं विराजमान झाले, त्याच दिवशीं म्हणजे बरोबर ता. ७-५-१९४३ रोजीं अक्षय्य तृतीयेच्या सुमुहूर्तावर त्यांचे ज्येष्ठ बंधू ऑडिटर, मंत्रमहार्णव श्री. त्र्यंबकराव उर्फ अण्णासाहेब खरे हे शारदा-पीठाच्या गादीवर १००८ श्रीयोगेश्वरानंद तीर्थ महाराज जगद्गुरु श्रीशंकराचार्य म्हणून विराजमान होण्यासाठीं संन्यास ग्रहण करते झाले. एकाच कुळांत जन्म घेतलेल्या ह्या दोन बंधूंच्या नशीबीं अधिकारपदावर चढण्याचा योग खरा; पण, परस्परविपरीत दिशेकडील योगायोग चमत्कृतिजनक नाहीं काय ! वस्तुत: ह्या योगायोगाच्या मुळांत आणखीही दोन दिवसांचे योगायोग असेच रम्य आहेत. ते असे कीं, प्रथम ता. १५ एप्रिल १९४३ रोजीं व्हाइसरॉयाकडून दिल्लीहून डॉ. खरे यांना गुप्त खलीता आला, तर त्याच सुमारास पुरी पीठावरील श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्यांकडून द्वारका-पीठाचें आचार्यपद आपण स्वीकाराल काय, अशी पृच्छा करणारा खलीता श्री. अण्णासाहेब खरे यांस आला ! आणि ह्या दोघाही भावांची ह्या परस्पर विभिन्न अशा दोन अधिकारपदीं नेमणूक झाल्याच्या घोषणा ता. ७ मे १९४३ रोजीं म्हणजे एकाच दिवशीं करण्यांत आल्या. एकाच



**श्रीमत् जगद्गुरु १००८ श्रीयोगेश्वरानंद तीर्थ महाराज श्रीशंकराचार्य, पुरी पीठ**

( पूर्वाश्रमीचे ऑडिटर श्री. अणासाहेब खरे )

डॉ. ना. भा. खरे ह्यांचे ज्येष्ठ बंधु
अण्णा खरे
जन्म: १८६८ - मृत्यु २३-ऑगस्ट १९६९

मानस सरोवरापासून निघालेल्या गंगा व ब्रह्मपुत्रा ह्या दोन नद्यांचे प्रवाह जसे दोन भिन्न दिशांनीं वाहूं लागावेत त्याचप्रमाणें ह्या दोन बंधूंचें दोन भिन्न क्षेत्रांतील हें अधिकारग्रहण समजलें पाहिजे. परंतु ज्याप्रमाणें अखेरीस त्या दोन्ही नद्या एकाच ठिकाणीं एकाच सागरास जाऊन मिळाल्या, त्याप्रमाणेंच आज भिन्न दिसणारे ह्या दोन बंधूंचे हे कार्यप्रवाह एकाच राष्ट्रोद्धाराच्या सागरास जाऊन मिळाल्याशिवाय राहणार नाहींत. आणि त्यांच्या प्रयत्नांनीं अभ्युदय आणि निःश्रेयस ह्या दोन्ही प्राप्तव्यांची प्राप्ती आमच्या देशास होईल, अशी आम्ही मनःपूर्वक आशा करितों.

**परदेशस्थ हिंदी लोकांना मताधिकार**

डॉ. खरे यांनीं ज्या मुहूर्तावर अधिकारग्रहण केलें तो मुहूर्त परदेशस्थ खात्याच्या दृष्टीनें आणीबाणीचा असावा असें आतां म्हणावें लागतें. कारण त्यांच्या अधिकारग्रहणाच्या सुमारासच दक्षिण आफ्रिकेंतील मार्शल स्मटस् यांच्या युनियन सरकारनें दक्षिण आफ्रिकेंत स्थायिक झालेल्या हिंदी लोकांना गोऱ्या लोकांच्या वस्तींत कोणत्याही प्रकारची मालमत्ता, किंवा वसाहत अगर व्यापार व्यवहार करण्याची मनाई करणारा 'पेगिंग ॲक्ट' उर्फ काळा कायदा जारी केला. अर्थात या कायद्याविरुद्ध दक्षिण आफ्रिका आणि हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांतील हिंदी लोकमत खवळून उठलें व हिंदुस्थान सरकारनेंही या कायद्याविरुद्ध आपला तीव्र असंतोष व निषेध व्यक्त केला. या निषेधाचा प्रतिध्वनी सर्व ब्रिटिश साम्राज्यांत दुमदुमत असतांनाच डॉ. खरे यांच्या हातीं परदेशस्थ खात्याचीं अधिकारसूत्रें आलीं. त्यामुळें केवळ दक्षिण आफ्रिकेंतच नव्हे तर मुख्यतः ब्रिटिश साम्राज्यांतील आणि इतरही देशांतील हिंदी लोकांच्या हक्कांच्या आणि हितसंबंधांच्या प्रश्नाचा मूलग्राही विचार करण्याची जबाबदारी डॉक्टरसाहेबांवर येऊन पडली. या बाबतींत त्यांनीं स्वतः जो विचारपूर्वक प्रभावी उपाय आपल्या मनाशीं निश्चित केला आहे तो असा आहे कीं, मुख्यतः ब्रिटीश साम्राज्याच्या आणि इतरही देशाच्या ज्या ज्या भागांत हिंदी लोकांची बऱ्यापैकीं वस्ती किंवा वसाहत आहे, त्या त्या भागांत त्यांना नागरिकत्वाचे पूर्ण हक्क आणि विशेषतः मताधिकार मिळवून द्यावयाचा. त्यांची स्वतःची अशीच समजूत आहे कीं,

परदेशांतील हिंदी लोकांना जर मताधिकार मिळाला तर त्यांचें त्या त्या देशांतील राजकीय महत्व आपोआप वाढील लागून त्या प्रमाणांत त्यांची एकंदर परिस्थिति सुधारेल. या दृष्टीनें परदेशस्थ हिंदी लोकांच्या परिस्थितीची पहाणी करून त्यांना मताधिकार आणि नागरिकत्वाचे इतर हक्क मिळण्यासाठीं कोणत्या धोरणानें प्रयत्न केले पाहिजेत, याची सांगोपांग योजना तयार करण्याचा आदेश आपल्या खात्यांतील प्रमुखांना दिला असल्याचें समजतें. डॉ. खरे यांचा हा संकल्प जर सिद्धीस गेला तर परदेशस्थ हिंदी लोकांच्या भवितव्याचा प्रश्न उत्तम रीतीनें सोडविल्याचें श्रेय त्यांना मिळेल.

**खरे–परिषद**

या मूलग्राही प्रश्नाचा निकाल केव्हां लागेल तो लागो, पण दक्षिण आफ्रिकेंतील काळ्या कायद्याला कशा रीतीनें प्रतिकार करायाचा हा प्रश्न त्यांच्या पुढें दिल्लीस गेल्याबरोबर दत्त म्हणून उभा ठाकला व तो सोडविण्याच्या कामीं लोकशाहीच्या तत्वानुसार निरनिराळ्या पक्षांच्या आणि हितसंबंधाच्या पुढाऱ्यांचा सल्ला घेण्याचें ठरवून त्यांनीं ता. ७ जुलै रोजीं दिल्ली येथें एक छोटी पण प्रातिनिधिक परिषद बोलाविली. या परिषदेला श्री. भुलाभाई देसाई, श्री. जिना, प्रभृति कांहीं वड्या धेंडांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्याची सबब सांगून हजर राहण्याचें टाळलें. पण (१) सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास (२) सर जगदीश प्रसाद (३) मास्टर तारासिंग (४) सर रेझाअली (५) सर रिचर्डसन (६) सर फ्रेडरिक जेम्स (७) हुसेनभाई लालजी (८) डॉ. प्रमथ बॅनर्जी (९) श्री. रंगबिहारीलाल मेहता (१०) सेठ रामकृष्ण दालमिया व (११) श्री. पी. कोदंडराव ही माहीतगार मंडळी हजर होती. परिषदेच्या सुरुवातीला डॉ. खरे यांनीं जें प्रास्ताविक भाषण केलें तें माहितीनें परिपूर्ण व मुंबईच्या ‘ फ्री प्रेस ’ दैनिकाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे आपल्या बाणेदार स्पष्टोक्तीनें दिल्लीच्या नोकरशाही वातावरणांत खळबळ उडवून देणारें होतें. या परिषदेचे निर्णय अद्याप जाहीर झालेले नाहींत. पण, व्हाइसरॉयांच्या कार्यमंत्र्यानें आपलें धोरण ठरवितांना लोकमताचा पाठिंबा इतक्या पद्धतशीर रीतीनें मिळविल्याचा ‘खरे-परिषद’ हा बहुधा पहिलाच प्रसंग असावा.

**लोकनायकांची नेमणूक**

डॉ. खरे यांच्या कारकिर्दींतील दुसरी तितकीच महत्वाची गोष्ट म्हणजे सीलोनच्या एजंट-जनरलच्या जागेवर ता. ६ जुलै १९४३ रोजीं झालेली लो. ना. अणे यांची नेमणूक ही होय. लो. अणे हे परदेशस्थ खात्याचे मंत्री असतांना सीलोनचा हिंदुस्थानाशीं असलेला पुरातन संबंध व त्याहीपेक्षां त्याचें हिंदुस्थानाला असलेलें आरमारी महत्व लक्षांत घेऊन सीलोनमध्यें जो हिंदी प्रतिनिधी नेमावयाचा, तो स्वतंत्र दृष्टीचा आणि दर्जाचा राजकीय पुढारी असावा अशी योजना तयार केली होती. पण, त्यांनीं राजीनामा दिल्यापासून डॉ. खरे हे अधिकारारूढ होईपर्यंत मध्यंतरी जो काळ गेला, त्या काळांत परदेशस्थ खात्यांतील नोकरशाही अधिकाऱ्यांनीं लोकनायकांची ही योजना दप्तरीं गुंडाळून ठेवून आपल्या प्रभावळींतील एका निमसरकारी गृहस्थाला त्या जागीं नेमण्याचें ठरवून टाकलें व डॉ. खरे दिल्लीस पोंचल्याबरोबर या नेमणुकीसंबंधींचे कागदपत्र सहीसाठीं त्यांचे पुढें ठेविले. पण, डॉक्टरसाहेबांनीं या प्रश्नाचा फेरविचार करण्याची आपली इच्छा व्हाइसरायांना कळविली व लोकनायकांची नेमणूक त्या जागीं करण्याचें आपल्या मनाशीं ठरविलें. पण, बापूजी ही जागा स्वीकारतील कीं नाहीं याबद्दल त्यांना शंका होती. म्हणून आपल्या विश्वासांतील दोघां अंतेवासी सहकाऱ्यांना नागपुरला आल्यावर ता. ३० मे रोजीं यवतमाळला पाठवून त्यांच्याकडून आग्रहपूर्वक प्रथम बापुजींची संमति आणली व नंतर व्हाइसरॉयांचीही मंजुरी मिळविली. ही नेमणूक जाहीर झाल्यावर देशांतील लोकमतानें तिला पूर्ण पाठिंबा दिला. मुंबईच्या 'क्रॉनिकल' या कॉंग्रेसपक्षीय दैनिकानें या नेमणुकीविषयीं लिहितांना असें म्हटलें आहे कीं, "या जागेवर नेमावयाला यापेक्षां जास्त चांगली निवड करतां आली नसती. श्री. अणे हे परदेशस्थ हिंदी प्रश्नाचे मुरब्बी असून, त्यांच्याविषयीं सर्वांनाच आदर आणि विश्वास आहे. ते हिंदी लोकांच्या हितसंबंधांचें उत्कृष्ठ रीतीनें रक्षण करतील. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानाशीं भलेपणानें वागण्यांतच आपलें एकंदरींत कल्याण आहे, याचीही तीव्र जाणीव ते सीलोनच्या जनतेंत उत्पन्न करतील, अशी आम्हांला खात्री आहे." खुद्द कोलंबोच्या 'सीलोन टाइम्स'नें या नेमणुकीबद्दल लिहितांना

असें म्हटलें आहे कीं, "श्री. अणे यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या राजकीय मुत्सद्याला या जागीं नेमून हिंदुस्थान सरकारनें सीलोनचा बहुमान केला आहे." यापेक्षां डॉ. खरे यांच्या कारकीर्दींतील या पहिल्याच नेमणुकीची प्रशस्ती जास्त काय करतां येईल?

डॉ. खरे यांच्या नुकत्याच सुरू झालेल्या कारकीर्दीचीं खरे-परिषद आणि लोकनायक अणे यांची नेमणूक हीं दोन प्रसादचिन्हें आहेत. त्यावरून ही कारकीर्द त्यांच्या बाणेदार स्वभावाला आणि जाज्वल्य देशाभिमानाला अनुरूप अशीच होईल, अशी अपेक्षा करणें अयोग्य होणार नाहीं.

# डॉ. खरे यांचें व्यक्तिजीवन


**अंत:करणाचें प्रतिबिंब**

मनुष्याचें व्यक्तिजीवन हें त्याच्या एकंदर मनोविकासाचें व अंत:करणाच्या शुद्धाशुद्धतेचें खरें प्रतिबिंब असतें असें म्हणतां येईल. सार्वजनिक जीवनांतील कलुषितपणा व्यक्तिजीवनांत असण्याचें कांहींच कारण नसतें. सार्वजनिक जीवनाला जर महापुरांतील प्रचंड वेगवान व प्रवाही पण अतिशय गढूळ, कांटे, गोटे, चिखल, माती यांनीं मिश्रित अशा पाण्याची उपमा दिली, तर व्यक्तिजीवनाला किंवा कौटुंबिक जीवनाला शांत व प्रसन्न अशा पुष्क-रिणींतील निर्मलोदकाची उपमा देतां येईल. सार्वजनिक जीवनांत अनेक विसंवादी व्यक्ती, घटना, आणि परिस्थिति, यांच्या संघर्षामधून मनुष्याला जावें लागत असल्यामुळें व त्यांत सार्वजनिक नीतिमत्तेच्या भिन्न भिन्न सिद्धान्तानुसार मनुष्य वागत असल्यामुळें विशिष्ट व संदर्भनिरपेक्ष अशा त्याच्या व्यवहारावरून अथवा वागणुकीवरून त्याच्या वास्तविक अंत:करणाची अथवा मानसिक ठेवणीची कल्पना करणें फार कठीण असतें. सार्वजनिक नीतिमत्ता अगदींच नियमविरहीत आहे असें नाहीं. तथापि, सार्वजनिक नीतिनियम सदा सर्वकाळ सारखेच रहात आले असतील असेंही नाहीं. सार्वजनिक जीवनांत अनेक वेळां अनेक कारणांस्तव मनुष्याची वागणूक त्याच्या खऱ्या अंत:करण-प्रवृत्तीला सोडून झालेली असेल, तरी बहुजन-समाजाला ती तत्कालीन परिस्थि-तीप्रमाणें विशेष प्रिय असल्यानें तीबद्दल त्याची प्रशंसाच होईल; तर कित्येक वेळां आपले सहकारी, सोबती, पक्ष, संघटना, अथवा बहुजन-समाज यांना जें वाटतें, तें वास्तविक देशहिताचें नाहीं अशी पक्की धारणा झाल्यामुळें एखादा मनुष्य 'सतांहि संदेह पदेषु वस्तुषु प्रमाणमंत:करणप्रवृत्तय:' या न्यायानें जग कांहींही म्हणत असलें तरी आपल्या अंत:करणप्रवृत्तीलाच प्रमाण मानून लोकनिंदेची पर्वा न करतां वागेल आणि त्याबद्दल बहुजन-समाजाच्या परिवादास अथवा उपहासासही तो पात्र होईल. 'वृक्षीं रूढासि उचलावें। युद्धकर्त्यांसि ढकलून द्यावें' या समर्थोक्तीप्रमाणें सार्वजनिक जीवनांत

राजकारणासाठीं कधीं लायक माणसें दूर ढकलावीं लागतात तर कधीं नालायक वाजारबुणग्यांना डोक्यावर घेऊन नाचावेंही लागतें. अशा प्रकारचा विचित्र आणि परस्परविरोधी दिसणारा असा सार्वजनिक जीवनक्रम असल्यानें त्यांत मनुष्याच्या अंतःकरणाचें अथवा खऱ्या मनोभावनेचें प्रतिबिंब पाहणें व त्यावरून त्याच्या मानसिक व आध्यात्मिक विकासाची कल्पना ठरविणें अत्यंत दुर्घट कर्म आहे.

## कुटुंबीय जीवनांतील प्रसन्नता

व्यक्तिजीवनाची गोष्ट याहून निराळी असते. सार्वजनिक जीवनांतील गुंतागुंतीचे आडवेढभे धागेदोरे येथें असत नाहींत. घरांतल्या घरांत कुटुंबीय जनांशीं वागतांना मनुष्याचें अंतःकरण अगदीं मोकळें असतें. सार्वजनिक जीवनांत अथवा इतरत्र कोठेंही आपल्या कुटुंबीयांपासून लपविण्यासारखें कोणतेंही अपकृत्य आपण केलेलें नाहीं याबद्दल ज्याचें अंतःकरण प्रांजळ असतें तोच मनुष्य कुटुंबीय जीवनांत अधिक प्रसन्नपणें व निर्मळ चित्तानें वावरूं शकतो. डॉ. खरे यांच्या सार्वजनिक चरित्राबद्दल मागील प्रकरणांतून जें वर्णन आलेलें आहे त्यावरून हें दिसून येईल कीं, त्यांच्या अंतःकरणास आपण अपकृत्य केलें आहे, अशी टोचणी लागण्यासारखें कोणतेंही कृत्य त्यांच्या हातून घडलें नाहीं. त्यांच्या धोरणाबाबत मतभेद असतील, त्यांच्या मार्गाबाबतही मतभेद असतील, त्यांचीं मतें कित्येकांस ग्राह्य असतील अथवा नसतील, त्यांच्या मोठे-पणाचें प्रमाण कित्येकांस मान्य असेल अथवा नसेल; परंतु, अपकृत्य संज्ञेस पात्र होण्यासारखें त्यांच्या हातून कोणतेंच कृत्य घडलें नसल्यामुळें त्यांचें अंतःकरण नेहमीच प्रांजळ राहत आलेलें आहे. आणि म्हणूनच व्यक्तिजीवनांतील त्यांची सहृदयता व आबालवृद्धांशीं समरस होण्याची त्यांची वृत्ति, यांचा अवीट अनुभव त्यांच्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीस आलेला आहे. त्यांचा कुटुंबपरिवार बराच मोठा आहे. त्यांचीं स्वतःचीं तीन लग्नें झालीं. तिन्हीही कुटुंबांपासून त्यांस एकूण दोन मुलगे व सहा मुली झाल्या. अर्थात त्यांचा नातवंडपरिवारही तितकाच मोठा आहे हें सांगण्याची गरज नाहीं. त्यांचे वडील लहानपणींच निवर्तले. बालपणापासून त्यांचा प्रतिपाळ करणाऱ्या त्यांच्या मातोश्री श्रीमती भागिरथीबाई दोन वर्षांपूर्वीच निवर्तल्या. तथापि, त्या जिवंत होत्या तोंपर्यंत



खरे कुटुंबांतील मंडळी

'न मातुः परदैवतम्' या न्यायानेंच डॉक्टरसाहेबांची त्यांच्याशीं अत्यंत आदराची व श्रद्धेची वागणूक होती. आपल्या कुटुंबीय परिवारांत ते अत्यंत समरस होऊन राहतात व त्यांच्या कोणाही मुलास, मुलीस, नातवंडास, सुनेस, पुतण्यास अथवा जांवयास किंवा धाकट्या बंधूस त्यांचेबरोबर बसून अघळपघळ गप्पा मारतांना अथवा थट्टा-विनोद करतांना कधींही संकोच वाटत नाहीं. डॉक्टर म्हणूनच केवळ नव्हे तर कुटुंबाचे प्रणेते म्हणूनही आपल्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीच्या व नोकरांच्याही बारीकसारीक सुखसोयींकडे, शरीरस्वास्थ्याकडे, कपड्यालत्याकडे त्यांचें सतत लक्ष असतें व कोणाची कोणत्याही बाबतींत झालेली आबाळ अथवा हेळसांड त्यांना खपत नाहीं.

**समानशील आदर्श पत्नी**

डॉ. खरे यांच्या कौटुंबिक जीवनांतील या प्रसन्नतेचें श्रेय जितकें त्यांच्या स्वतःच्या उदार स्वभावाला तितकेंच त्यांच्या समानशील पत्नी सौ. इंदिराबाई यांच्या निरतिशय सौजन्यालाही दिलें पाहिजे. डॉक्टरसाहेबांचे घर म्हणजे तीन भावांचें संयुक्त कुटुंब असून त्या कुटुंबांतील दोन्ही पिढ्या सख्खे-सावत्र संबंध आहेत. याशिवाय डॉक्टरसाहेबांच्या औदार्यामुळें त्यांच्या आश्रयाला असलेला जो आप्तपरिवार आहे तो निराळाच. येवढ्या मोठ्या कुटुंबाचा भार दक्षतेनें, सहिष्णुतेनें आणि प्रेमळपणानें जसा डॉक्टरसाहेबांच्या मातोश्रींनीं आमरण वाहिला, तसाच त्यांच्या पत्नी सौ. इंदिराबाई याही आज वहात आहेत. त्या अत्यंत कष्टाळु, धर्मशील आणि मितभाषी असून धर्मकृत्यें आणि संसारकृत्यें यांत नेहमीं निमग्न असतात. त्यांच्या वृत्तींत कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसल्यामुळेंच खरोखरी डॉक्टरसाहेबांचा मोठा थोरला संसार इतक्या उत्तम रीतीनें चालला आहे. त्या दृष्टीनें डॉक्टरसाहेबांच्या परोपकार-परायण संसाराला जर श्रीएकनाथ महाराजांच्या संसाराची उपमा दिली तर सौ. इंदिराबाईंना नाथांच्या पत्नी सौ. गिरिजाबाई यांची उपमा द्यावी लागेल. १९३६-३७ आणि ३८ सालीं गांधीजींच्या दौऱ्याच्या वेळीं किंवा पुढें असेंब्ली कॉंग्रेस पक्षाच्या निवडणुकीच्या आणि सभांच्या वेळीं डॉक्टर-साहेबांच्या घरीं केव्हां केव्हां दीड दीडशें माणसें एकदम जेवावयाला असत.

पण, आपल्या पतीच्या सर्व प्रांतभर पसरलेला राजकीय प्रपंचाचा धवडगा सौ. इंदिराबाईंनीं मोठ्या आनंदानें आणि कर्तव्यबुद्धीनें सोसला आहे. डॉक्टर म्हणून, प्रांतिक पुढारी म्हणून, मुख्य प्रधान म्हणून किंवा व्हाईसरॉयचे कार्यमंत्री म्हणून डॉक्टरसाहेबांच्या घराला कायमचेंच चव्हाट्याचें स्वरूप आलेलें आहे. अशा सार्वजनिक स्वरूप आणि महत्व पावलेल्या त्यांच्या गृहाचें औदार्य आणि शुचित्व कायम ठेवणाऱ्या त्यांच्या गृहिणी सौ. इंदिराबाई याच खरोखरी त्यांच्या जीवनाची प्रतिष्ठा आहेत. त्या दृष्टीनें डॉ. खरे यांनीं आपल्या ६२ व्या वाढदिवशीं आपल्या ' साध्याभोळ्या बायको 'चा सद्‌गदित कंठानें जो उल्लेख केला तो अत्यंत उचित होता.

**डॉ. विद्याधरपंत**

डॉक्टर साहेबांचें सर्व कुटुंबीयांवर सारखेंच प्रेम असलें तरीही त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. विद्याधरपंत यांचेवर त्यांचें विशेष अपत्यप्रेम आहे यांत मात्र शंका नाहीं. एका परीनें आपल्या अतृप्त महत्वाकांक्षा भविष्यकाळांत हा केव्हां तरी तृप्त करून दाखवील, अशी उमेद विद्याधरपंतांबद्दल त्यांना वाटते. म्हणूनच कीं काय, त्यांनीं त्यांना मुंबईच्या ग्रँट मेडिकल कालेजांत एम. बी. बी. एस. च्या कोर्सचें संपूर्ण शिक्षण दिलें व आपला भरभराटीचा व्यवसाय त्यांच्या स्वाधीन केला. युद्ध सुरु झाल्यानंतर व स्वत: युद्धसहकार्याची भूमिका घेतल्या-नंतर विद्याधरपंत यांनींही त्यांच्या भूमिकेशीं सुसंगत रीतीनेंच सैन्यांतील वैद्यकीय खात्यांत सरकारनें त्यांना देऊं केलेलें काम पत्करलें. ईजिप्त, लिबिया व ट्यूनिशियाच्या रणांगणावर दोस्त फौजांचे जयापजय होत असतां त्या सर्व रणधुमाळींत विद्याधरपंत जातीनें हजर होते आणि अखेरीस अलेक्झांड्रियाच्या दरवाजापासून रोमेलला पिटाळून लावणाऱ्या ब्रिटिश सेनेबरोबरच सुमारें दोन हजार मैलांचा अत्यंत दगदगीचा व वेगाचा असा ट्यूनिशियापर्यंतचा कूच त्यांनाही करावा लागला आणि रोमेलचे ताबूत एकदांचे भूमध्य समुद्रांत थंड झाल्यानंतरच दोन महिन्यांची रजा घेऊन गेल्या जून महिन्यांत व्हाइसरॉयचे एक्झिक्युटिव्ह कौंसिलर झालेल्या आपल्या तीर्थरूपांना व पुरीपीठाच्या शंकराचार्यांच्या गादीवर आरूढ झालेल्या आपल्या चुलत्यांना भेटण्यास ते



ना. डॉ. खरे यांचे पुतणे व चिरंजीव

हिंदुस्थानांत आले आहेत. त्यांचा विवाह मंगळवेढ्याचे सरदार गणपतराव पटवर्धन यांच्या कन्येशीं १९३४ मध्यें झाला असून त्यांच्यापासून त्यांना धनंजय नांवाचें एक पुत्ररत्न आहे. त्यांच्या पत्नीचें नांव विजयादेवी असून त्याही दोन वर्षांपूर्वीच इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. संगीताची त्यांना अत्यंत आवड आहे. डॉ. विद्याधरपंत हे डॉक्टरसाहेबांच्या प्रथम पत्नीचें अपत्य.

विद्याधरपंत यांचा जन्म २ आक्टोबर १९०८ सालीं नागपुरला झाला. १९३३ सालीं ते मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून एम. बी. बी. एस. झाले. मुंबईस ते जे. जे. हॉस्पिटलमध्यें सहा महिने हाऊस सर्जन होते. तसेंच नागपुरच्या मेयो हॉस्पिटलांत सन्मान्य सर्जन होते. नंतर ए. आय. आर. ओ. मध्यें लेफ्टनंट झाले व आतां ते कॅप्टन झाले आहेत. घोड्यावर बसण्यांत ते पटाईत आहेत. डॉ. खरे यांच्या दुसऱ्या कुटुंबाचें नांव लक्ष्मीबाई असून त्या पुण्याचे कै. नरहरपंत चिंतामण काळे यांच्या कन्या आहेत. त्यांच्यापासून त्यांना उषाताई व यमूताई अशा दोन मुली झाल्या. दोघीही नागपूर विद्या-पीठाच्या पदवीधर आहेत. उषाताईंचा विवाह यवतमाळचे, श्री. रामचंद्रपंत दामले वकील यांच्याशीं १९३५ सालीं झाला. डॉक्टरसाहेबांचें तिसरें कुटुंब सौ. इंदिराबाई ह्या यवतमाळचे श्री. चिंतामणराव केळकर यांच्या कन्या आहेत. यांच्यापासून डॉक्टरसाहेबांना स्नेहलता, विमला, कुसुम, विजया, मीनाक्षी अशा पांच मुली व सूर्यकान्त नांवाचा एक मुलगा अशीं सहा अपत्यें झालीं आहेत. स्नेहलता ह्या इंटर झालेल्या असून पुण्याचे श्री. रामकृष्णपंत कर्वे, बी. ए. यांच्याशीं त्यांचा १९४० सालीं विवाह झाला. त्यांना सुमंत नांवाचें एक पुत्ररत्न झालें आहे.

**दिनचर्या**

डॉ. खरे यांची दिनचर्या कांहीं कांहीं बाबतींत अतिशय नियमित आहे असें म्हणतां येईल. ते दररोज सकाळीं ५ वाजतां नियमितपणें उठतात आणि शौचमुखमार्जनादि प्रातर्विधी आटोपून फिरावयास जातात. सुमारें तीनचार मैलांचा फेरफटका करून परत आल्यावर ते थोडा दूध व बिस्किटांचा उपाहार करतात. अलीकडे त्यांच्या काळजाचा विकार अधिकच बळावल्यापासून

सकाळीं फिरावयास जातांना सोबत म्हणून ते आपली पत्नी सौ. इंदिराबाई यांस बरोबर घेऊन जाऊं लागले आहेत. फिरण्यास जाण्याचा त्यांचा पोषाख नेहमीप्रमाणेंच अतिशय साधा असतो. पायांत वहाणा, धोतराचा काचा मारलेला, अंगांत मलमलीचा झिरझिरीत सदरा, डोक्यांत कधीं टोपी आहे कधीं नाहीं, हातांत बारीकशी वेताची छडी अशा थाटांत झपाझप पावलें टाकीत ते फिरण्याचा व्यायाम घेतात. फिरून आल्यानंतरचा उपाहार आटोपल्यावर धंतोली-वरील आपल्या बंगल्याच्या व्हरांड्यांत आरामखुर्चीवर कांहीं वेळपर्यंत वर्तमानपत्रें वाचीत बसतात व नंतर स्नान वगैरे आटोपून व गंधाचा टिळा लावून घरीं आलेल्या रोग्यांची तपासणी करणें, नंतर बोलावणें असलेल्या रोग्यांच्या घरीं जाणें, नंतर सिताबर्डीवरील आपल्या दवाखान्यांत जाऊन सुमारें एक वाजेपर्यंत घरीं परत येणें असा त्यांचा नागपूरं येथील मध्यान्हापर्यंतचा दिनक्रम असे. घरीं आल्यावर भोजन वगैरे आटोपून ते वामकुक्षी करितात. दररोज निदान २—२॥ तास दुपारची झोप ही त्यांच्या प्रकृतिस्वास्थ्याच्या दृष्टीनें अनिवार्य झालेली आहे. वामकुक्षी नंतर चहा पिऊन ते पुन्हां दुपारचीं वर्तमानपत्रें वाचीत आंतल्या खोलींत बसतात. याच वेळीं आल्यागेल्यांच्या भेटीगांठी होतात. त्यानंतर संध्याकाळच्या दवा-खान्याचाही क्रम सकाळप्रमाणेंच असतो. रात्रीं ८॥—९ च्या सुमारास दवा-खान्यांतून परत घरीं आल्यावर आसटसा पातळ भात थोडासा खाऊन ते बिछान्यावर जाऊन पडतात आणिं नंतर सुमारें १२॥—१ पर्यंत त्यांचें सारखें वाचन चालू असतें. वैद्यकीय व्यवसायांतील नवीन संशोधनात्मक वाङ्मय आणि राजकारणांतील गंभीर सिद्धान्तात्मक वाङ्मय यांचेंच वाचन प्राधान्येंकरून ते करतात. सर्वसाधारण दिनक्रम याप्रमाणें असला तरी सार्वजनिक धका-धकींच्या प्रसंगीं त्यांना आपल्या दिनक्रमांत अनेक वेळां बदल करावा लागतो. त्यांचें घर व दवाखाना हीं दोन्ही खरोखर काम असणाऱ्या व रिकामटेकडेपणीं गप्पा छाटणाऱ्या लोकांच्या बैठकीचा अड्डाच झालेलीं आहेत. कारणानें कोण येतो व विनाकारण गप्पाष्टकी करण्यास कोण येतो हें त्यांना पूर्णपणें माहीत असलें तरी त्यांचा स्वभाव इतका भिडस्त आहे कीं, आपल्या घरीं अथवा दवाखान्यांत आलेल्या कोणाही इसमास त्यांच्यानें नाराज करवत नाहीं. किंबहुना

फाजील भिडस्तपणा हा एकप्रकारें त्यांचा दुर्गुणच होऊन बसलेला आहे. त्यांच्या भिडस्तपणाचा फायदा घेऊन अनेक लोकांनीं आजवर त्यांचा उपयुक्त वेळ तर खाल्लाच; पण, शिवाय त्यांच्याजवळील पैसाही खाण्यास कमी केलें नाहीं. डॉक्टरसाहेबांचा स्वभावही जात्याच मनमिळाऊ, दिलदार, व गप्पाष्टकांत रमणारा असल्यामुळें लहानमोठा कोणीही गप्पिष्ट त्यांच्याकडे आला तर ते त्यांच्याशीं सारख्याच तन्मयतेनें व मोकळ्या मनानें गप्पा मारूं लागतात. आपण अशा रीतीनें आपला बहुमूल्य वेळ वराच फुकट गमावतों हें त्यांना कळत असलें, तरी लहानपणापासूनचा गप्पाष्टकींचा त्यांचा छंद अद्यापपर्यंत सुटलेला नाहीं. जसा मनुष्य येईल व तो ज्या प्रकारच्या गप्पा सुरूं करील त्याच्याशीं त्याच्या त्याच प्रकारच्या गप्पांत डॉक्टरही चटकन समरस होतात. त्यांच्या ठिकाणीं विनोदप्रियता ओतप्रोत असल्यानें त्यांच्या गप्पांच्या बैठकींत हास्यविनोदाचें तिमजली फवारे सारखे उडत असतात. पुष्कळ प्रसंगीं त्यांचा कोटीबाजपणा व विनोदप्रियता अश्लीलतेच्या थरासही जाऊन पोहचते. परंतु बाह्यत: हा सर्व हास्यविनोद करीत असतांना अंत:करणांतली गंभीरता ते कधींही ढळूं देत नाहींत. इतकेंच नव्हे तर ह्या हास्यविनोदांत व अश्लीलतेच्या काठांवर पोंचणाऱ्या कोटीबाजपणांत एकादा मनुष्य मर्यादातिक्रमण करूं लागेल तर तितकीच अश्लील पण झणझणीत कोटी करून त्यास त्याच्या मर्यादातिक्रमणाची जाणीव करून दिल्याशिवाय ते रहात नाहींत.

### आतिथ्यशीलता व सत्कारपरायणता

आतिथ्यशीलता व सत्कारपरायणता यांबद्दल डॉ. खरे यांची प्रसिद्धी सर्वत्र आहेच. आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यांचा त्यांच्या योग्यायोग्यतेचा विचार न करतां ते सारखाच आदरसत्कार करतात. आणि या त्यांच्या गृहस्थधर्माचा गैरवाजवी फायदा घेणारे लोकही नाहींत असें नाहीं. त्यांच्या आतिथ्य-परायणतेइतकीच त्यांची दानशूरताही प्रसिद्ध आहे. त्यांच्याकडे मागावयास गेलेला कोणताही इसम आजपर्यंत सहसा रिक्तहस्तानें विन्मुख परत आलेला नाहीं. त्यांनीं आजपर्यंत जीं दानें केलीं अथवा देणग्या दिल्या, त्यांचें तपशीलवार टिपण ठेवलेलें नसलें, तरी इतकें निश्चितपणें म्हणतां येईल कीं, त्यांची ही रक्कम

एक लाख रुपयापेक्षां खात्रीनें कमी भरणार नाहीं. किंबहुना असें म्हटलें तरी चालेल कीं, देणग्या देण्याची त्यांना एक प्रकारची हौसच आहे. त्यांच्या याही गुणाचा अनेकांकडून गैरवाजवी फायदा घेण्यांत येतो. परंतु, त्यास मर्यादा घातली तर चार कुपात्रांबरोबर एकाद्या सुपात्रासही एखादे वेळीं विन्मुख पाठविलें जाईल या भयानें ते मागण्यास येणाऱ्याच्या पात्रापात्रतेचा विचार न करतां यथाशक्ति त्यास दान-देणगी देतच असतात.

**व्यावसायिक नीतिमत्ता**

डॉ. खरे यांच्या व्यक्तिगत जीवनांतच त्यांच्या व्यावसायिक वर्तणुकीचाही बऱ्याच अंशानें समावेश करतां येईल. त्यांच्या दिनचर्येत त्यांच्या व्यवसायिक वेळांचाही जरी विशिष्ट निर्देश करण्यांत आला तरी त्याचा अर्थ असा नव्हे कीं, त्या विशिष्ट वेळांव्यतिरिक्त इतर वेळीं रुग्णचिकित्सेचें काम ते करीतच नसत. किंबहुना वैद्यकशास्त्र शिकलेल्या मनुष्यानें आपण वैद्य किंवा डॉक्टर आहोंत आणि आर्त रुग्णांच्या कामीं पडणें हा आपल्या व्यक्तित्वाशीं अविभाज्य असा धर्म आहे ही गोष्ट केव्हांही विसरतां कामा नये, अशीच डॉ. खरे यांची धारणा आहे. म्हणूनच स्वतःच्या प्रकृतीपेक्षां अवेळीं आलेल्या रोग्याची ते अधिक पर्वा करतांना आढळून येतात. त्यांच्या कुशल व यशस्वी चिकित्सेवर विश्वास असल्यामुळें लहानमोठ्या अनेकविध आर्त जनांची रीघ त्यांच्याकडे लागते यांत शंकाच नाहीं. पण, त्याबरोबरच कुशल व यशस्वी असले तरी तुसड्या स्वभावाचे, एककल्ली, अहंमन्य व रोग्यांची अधिकांत अधिक आर्थिक पिळणूक करण्याची वृत्ति असलेले जे अनेक डॉक्टर इतस्ततः दृष्टीस पडतात, त्यांच्याकडे अनन्यगतिक होऊन केवळ नाइलाजानें जाणाऱ्या रुग्ण परिजनांच्या भावनेंत आणि डॉ. खरे यांच्याकडे जाणाऱ्या रुग्ण परिजनांच्या भावनेंत जमीन-अस्मानचें अंतर आहे. डॉ. खरे यांच्याकडे जाणारे लोक ते एक कुशल व यशस्वी चिकित्सक आहेत म्हणून तर जातातच; पण, त्यावरोबरच ते एक सहानुभूतिपूर्ण हृदयाचे व कनवाळू वृत्तीचे डॉक्टर आहेत म्हणूनही जातात हें विसरून चालणार नाहीं. रोगी जर आसन्नमरण स्थितींत असेल व त्याचा आप्तजन डॉक्टरला बोलावण्यास गेला असेल तर त्याची शुल्क देण्याची ऐपत आहे किंवा

नाहीं याचा यत्किंचित् विचार न करितां डॉक्टरनें मरणोन्मुख रोग्याचे मदतीस गेलें पाहिजे असा 'न्याय-वैद्यका'चा (Medical jurisprudence) एक सिद्धान्त आहे. किंबहुना न्याय-वैद्यकानें, वैद्य किंवा डॉक्टर यांनीं कसें वागावें, याबद्दलचेही कांहीं कानू केलेले आहेत. डॉ. खरे यांच्या एतद्विषयक वागणुकीचा विशेष हा कीं, अर्थसाधनापेक्षांही वरील नियमपालनाकडे त्यांचें अधिक लक्ष असतें. आणि म्हणूनच रोग्यांना ते एखाद्या निकटच्या आत्मीय जनासारखे वाटतात. दवाखान्यांत बसले असतांना व इतर रिकामटेकड्या गप्पीदासांबरोबर गप्पाष्टकें चालू असतांनाही हातांत घेतलेल्या रोग्याच्या परिस्थितीचा अथवा संभाव्य अवस्थांतराचा त्यांना विसर पडत नाहीं. आणि गप्पांच्या ऐन रंगांत एकदम रुग्णस्थितीशीं तन्मय होऊन ते आपलें चिकित्सापत्र मध्येंच लिहून काढतात व पुन्हा गप्पांत समरस होतात. त्यामुळें इतक्या सार्वजनिक चळवळी करीत असतांना अथवा अनेकविध लोकांशीं संभाषणें करीत असतांनाही डॉक्टर आपली उपेक्षा करीत आहेत, असा समज त्यांच्या रोग्यांत केव्हांच निर्माण झाला नाहीं. उलटपक्षीं त्यांना नेहमींच असा विश्वास वाटत राहिला आहे कीं, अनेक व्यवसायांत व भानगडींत मग्न असले तरी, डॉक्टर आपली पूर्ण काळजी वाहतीलच. आणि म्हणूनच 'डॉक्टर प्रॅक्टिसला चिकटले नसून प्रॅक्टिस डॉक्टरांना चिकटली आहे' असे जे उद्गार त्यांच्या ६२ व्या वाढदिवस-समारंभाच्या सभेंत सौ. अनसूयाबाई काळे यांनीं काढले, ते अगदी यथार्थ आहेत यांत शंका नाहीं. डॉक्टर या नात्यानें डॉक्टर खरे यांचा दर्जा केवढा मोठा आहे, हें सांगणें म्हणजे 'काय सूर्याला दाविजे मशाला' असें करणेंच होय. त्यांच्या या विषयांतील अभिज्ञतेला हिंदुस्थानांतील डॉक्टर लोकांत तर मान आहेच; पण, पाश्चात्य अथवा युरोपीय डॉक्टरही त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाबद्दल आदर बाळगून आहेत, हीही गोष्ट अविस्मरणीय आहे. सार्वजनिक जीवनांत त्यांचे प्रतिस्पर्धी असलेल्या लोकांचाही त्यांच्या वैद्यकीय ज्ञानावर व वैद्यकीय नीतिमत्तेवर पूर्ण विश्वास असतो आणि इतरत्र त्यांचा विरोध करीत असतांनाही वैद्यकीय सहाय्यासाठीं निःसंकोचपणें ते डॉक्टरांच्याकडे जातात, हीं एकच गोष्ट त्यांच्या या बाबतींतल्या विशुद्ध दानतीवर उत्तम प्रकाश टाकणारी आहे. 'डॉ. खरे जवळ असल्यानंतर मला दुसऱ्या

कोणत्याही डॉक्टरच्या सहाय्याची गरज नाहीं,' अशा आशयाचे महात्मा गांधी यांनीं डॉ. खरे यांच्याविषयीं काढलेले उद्गार, हीच गोष्ट शाबीत करीत नाहींत काय? डॉक्टरी व्यवसायावरच दरिद्री स्थितींतून ते श्रीमंत झाले असले तरी, पैशासांठीं त्यांनीं रोग्याची अडवणूक केली आहे, असें उदाहरण शोधूनही सांपडणार नाहीं. श्रीमंत लोकांच्या जवळून त्यांनीं आत्मविश्वासपूर्वक पुष्कळ पैसा घेतला असला, तरी एकही पैसा न देणाऱ्या अनेक गरीब रोग्यांना तितक्याच काळजीपूर्वक व आत्मविश्वासानें त्यांनीं उपचार केलेले आहेत. या कारणामुळें व मिळविलेल्या संपत्तीचा दानधर्मासाठीं व सार्वजनिक कार्यासाठीं त्यांनीं सतत सढळ हातानें उपयोग केलेला असल्यामुळें, त्यांची श्रीमंती कधींही कोणाच्या डोळ्यांत खुपली नाहीं.

### अंतःकरणाची श्रीमंती

श्रीमंतीच्या मापानेंच मोजावयाचें झाल्यास कोट्याधीशांच्या मालिकेंत ते वसत नसले तरी लक्षाधीशांच्या बरोबरीनें ते सहज व लीलेनें वापरले आहेत. परंतु अर्थ-श्रीमंतीपेक्षां मनाच्या अथवा अंतःकरणाच्या श्रीमंतींत त्यांनीं लक्षाधीशांनाच काय, पण कोट्याधीशांनाही अनेक वेळां लाजविलें आहे. आपल्या अर्थ-श्रीमंतीचा योग्य अभिमान त्यांना जरी नेहमींच वाटत असला, तरी तिचा गर्व त्यांना कधींही बाधला नाहीं. आणि दरिद्रीजीवनांतील कष्टांची, श्रमांची व हालांची भावना ते कधींही विसरूं शकले नाहींत. म्हणूनच श्रीमंत समाजांत ऐटीनें मिरवून त्यांच्याशीं समरसतेनें वागतांना ते जसे दिसून येतात तसेच किंवा त्याहून अधिकच दरिद्री लोकांशीं ते समरस होऊं शकतात. आणि ही समरसताही इतकी उत्कट असते कीं, त्या दरिद्री इसमाला आपण एकाद्या श्रीमंत डॉक्टरच्या सहवासांत आहोंत, असें न वाटतां आपल्याच बरोबरीच्या गृहस्थाशीं आपण बोलत आहोंत असें वाटावें!

### साधी राहणी व स्वावलंबन

याचें कारण म्हणजे डॉक्टरसाहेबांच्या ठिकाणीं असलेला श्रीमंतीच्या बडेजावीचा पूर्ण अभाव हें होय. त्यांनीं श्रीमंतीचें वैभव सर्वतोपरीनें भोगलें असलें तरी साध्या रहाणींतली भव्यता व उदात्तता कधींही दृष्टिआड केली

नाहीं. पोषाख, चालीरीती, बोलणें-चालणें, सभ्याचार इत्यादि कोणत्याही बाबतींत स्वतःच्या व्यवहाराला आपल्या श्रीमंतीच्या बडेजावीची झिलई त्यांनीं लागू दिली नाहीं. ते आपल्या निल्याच्या व्यवसायांत डॉक्टर म्हणून वावरत असोत, सार्वजनिक जीवनांत पुढारी म्हणून वावरत असोत, प्रांताचे प्रधान मंत्री म्हणून वावरत असोत अथवा आतां व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे मंत्री म्हणून वावरत असोत, त्यांनीं आपल्या राहणींत, पोषाखादिकांत आचारविचारांत अथवा जेवणाखाणांत सहसा फरक केला नाहीं. अभिजात महाराष्ट्रीय वृत्तीशीं सुसंगत असा साधेपणा व स्वावलंबन हे दोन गुण त्यांचे ठिकाणीं कसल्याही अवस्थाभेदांत सारखेच वसत राहिले. शिफारसपत्रें मागण्यास येणाऱ्या तरुण मुलांना सुद्धां स्वत: उठून लिहिण्याच्या खोलींत जाऊन पत्र लिहून व तें लिफाफ्यांत घालून आपल्या हातानें त्यांनीं दिलें. पण, त्यासाठीं जवळच असलेल्या स्टेनोग्राफरला देखील त्यांनीं हांक मारली नाहीं. स्वावलंबन व साधेपणा यांचा हाच नमुना त्यांच्या प्रत्येक कृतींत दिसून येतो. आपल्या खाजगी जीवनांत त्यांनीं हे गुण इतक्या कसोशीनें पाळले आहेत कीं, श्रीमंतीजन्य वडेजावीची प्रतिष्ठा व तथाकथित वरिष्ठ श्रेणींतील सामाजिक रीतिभाती यांना सोकावलेल्या अथवा पाश्चात्यांच्या नकली व फाजील प्रतिष्ठितपणाच्या किंवा आत्मसंभावितपणाच्या चालीरीतींवर हुरळलेल्या अर्धवटांना डॉक्टर खरे यांच्याशीं वागतांना ते एक भुक्कड गृहस्थ आहेत, असाही कदाचित् भास होत असेल. पण, साधेपणानें वागणें म्हणजे स्वाभिमानावर तिलांजलि देणें नव्हे. डॉ. खरे यांचा स्वाभिमान अत्यंत जाज्वल्य आहे. त्यांच्या स्वाभिमानाची मर्यादा कधी कधीं विनयाच्या मर्यादा ओलांडून उद्धटपणाच्या सीमेवर पाऊल टाकण्याइतकी सुद्धां पुढें जाते. त्यांच्या ह्या पराकाष्ठेच्या स्वाभिमानासच कित्येक लोक अहंकार असें समजतात. वस्तुत: अहंकार म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव. ही कोणाच मनुष्याच्या ठिकाणीं नष्ट होऊं शकत नाहीं. तेव्हां ती डॉक्टरांच्या ठिकाणीं असली तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं! परंतु, त्याबरोबरच हेंही खरें कीं, जो मनुष्य डॉक्टर खरे यांच्या समोर आपला अहंकार व्यक्त करीत नाहीं, त्याला डॉ. खरे यांच्या अहंकाराचेंही कधींच दर्शन घडत नाहीं. परंतु,

जरा कां त्यांच्या स्वाभिमानास कोणी दुखावलें, कीं मग मात्र त्यांचा अहंकार पूर्णपणें आपला प्रक्षुब्धपणा दाखविल्याशिवाय रहात नाहीं. त्यांच्या ह्या स्वाभिमानमूलक अतिमानतेच्या वृत्तींतूनच त्यांनीं 'केसरी' विरुद्ध केलेली बेअब्रूची फिर्याद अथवा श्री. मसानी विरुद्ध केलेली अब्रुनुकसानीची फिर्याद उत्पन्न झाली होती. ह्या दोन्ही फिर्यादींत ते हरले. पण, त्याचा त्यांना विषाद वाटला नाहीं. उलट, योग्य मार्गानें न्याय मिळविण्याचा यथाशक्ती प्रयत्न आपण केला, याचेंच त्यांना समाधान वाटलें. असो.

## आयुष्यांतील शवटची महत्वाकांक्षा

वैद्यकीय व्यवसायाबाबत त्यांची निष्ठा व आदरबुद्धी पराकाष्ठेची आहे. विशेषत: ह्याच व्यवसायाच्या वळावर आपण रंकाचे राव झालों याची जाणीव त्यांच्या मनांत अखंड कायम असते. ह्या व्यवसायांतील आपल्या कौशल्याचें व करामतीचें समाजानेंही जें कौतुक केलें, त्याबद्दलची कृतज्ञताबुद्धि त्यांच्या मनांत निरंतर जागृत असते. व्यवसाय व समाज यांच्या ह्या ऋणांतून अंशत: मुक्त होण्याविषयीं त्यांनीं आपल्या मनाशीं एक योजना ठरवून ठेवलेली आहे. ती योजना म्हणजे सर्व साधनसामुग्रीनें युक्त अशा प्रकारचें एक मोठें धर्मार्थ रुग्णालय काढणें व आपल्या वृद्धापकाळीं सदरहू रुग्णालयाच्या मार्फत गोरगरीब आर्त जनांना आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा व अनुभवाचा विनामूल्य लाभ मिळवून देणें ही होय. ह्या संकल्पित रुग्णालयासाठीं येथील श्रद्धानंद अनाथालयाच्या जवळच त्यांनीं एक मोठी जागाही घेऊन ठेवलेली आहे. आणि प्रस्तुत महायुद्ध संपल्यावर पहिलें आवश्यक कार्य म्हणून ते या रुग्णालयाच्या उभारणीस प्रारंभ करणार आहेत. ह्या त्यांच्या योजनेस हार्दिक सहकार्य म्हणून आपले चिरंजीव डॉ. विद्याधरपंत यांचें सर्वतोपरीनें सहाय्य होईल असा त्यांना विश्वास आहे. नागपुरांत सरकारी धर्मार्थ इस्पितळें नाहींत असें नाहीं. पण, या धर्मार्थ इस्पितळांत जाऊन आलेल्या प्रत्येक रुग्णाचा अनुभव जर जमेला धरला, तर तीं इस्पितळें गोरगरीबांच्या सहाय्यासाठीं आहेत कीं पिळणुकीसाठीं आहेत हें समजणें कठीणच होईल. म्हणून तीं असून सुद्धां ज्यांत वस्तुत: गोरगरीबांच्या सुखसोयींकडे प्राधान्येंकरून लक्ष दिलें जाईल,

ज्यांत धर्म व परोपकार यांजवरील निष्ठेनें व स्वार्थत्यागाच्या बुद्धीनेंच काम करणारे सर्व लहानमोठे कार्यकर्ते असतील आणि ज्याच्याबद्दल सर्व बहुजन समाजांत एकप्रकारची आत्मीयता उत्पन्न होऊं शकेल, अशा प्रकारच्या लोकांनीं काढलेल्या व लोकांनींच चालविलेल्या व सरकारचा दरबारी हस्तक्षेप नसलेल्या स्वतंत्र रुग्णालयाची नागपुरास नितांत आवश्यकता आहे यांत शंकाच नाहीं. ही आवश्यकता ओळखूनच डॉ. खरे यांनीं आपल्या जीवनांतील प्रशांत चौथ्या प्रहरीं अशा प्रकारच्या लोकोपयुक्त व स्वतःच्या आवडीच्या कार्यास वाहून घेण्याचें योजिलेलें असणें, हें त्यांच्या आजपर्यंतच्या दानधर्मनिरत व परसेवापरायण वृत्तीस सर्वस्वी शोभेसेंच आहे.

### धार्मिक मनोवृत्ति

डॉ. खरे यांचा जन्मच अत्यंत धार्मिक मनोवृत्तीच्या घराण्यांत झाला असल्यानें त्यांच्या मनावरील धार्मिक संस्कार व स्वधर्मावरील त्यांची अभंग निष्ठा हीं अद्यापि कायम आहेत. त्यांचे ज्येष्ठ बंधु श्री. अण्णासाहेब हे आतां द्वारका येथील श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यांच्या पीठावर आरूढ झालेले असल्यानें खरे घराण्यांतील धर्मपरायणतेनें आतां आपला परमोत्कर्ष साधला आहे, असें निःसंशय म्हणतां येईल. ज्येष्ठ बंधू संपूर्ण सनातनी वृत्तीचे आहेत, तर त्यांच्या उलट डॉक्टरसाहेब हे पूर्ण सुधारक वृत्तीचे आहेत. पण म्हणून त्यामुळें त्यांच्या धर्मनिष्ठेस कधींही बाध आलेला नाहीं. कोणाही सनातनी माणसाइतकीच डॉ. खरे यांची धर्मनिष्ठा जाज्वल्य आहे. या बाबतींत ते जबलपूर येथील कॉलेजांत इंटरमिजिएटच्या वर्गांत असतांना घडलेला एक वृत्तांत येथें देण्यासारखा आहे. तो असा—जबलपूर येथील बाजारांत एक पाद्री दररोज व्याख्यानें देऊन हिंदु-धर्माची नालस्ती व ख्रिस्ती धर्माचा प्रचार करीत असे. डॉ. खरे—त्यावेळचे विद्यार्थी खरे—यांना त्याचें ते प्रयत्न पाहून एक धाडसी कल्पना सुचली. ते त्याचेकडे गेले व 'मला ख्रिश्चन व्हावयाचें आहे, उपदेश दे' असें सांगू लागले. पाद्र्यास मोठा आनंद झाला. चित्तपावन ब्राम्हण कुळांतील एक उच्चवर्णीय सुशिक्षित तरुण आपल्या कळपांत वश होत असलेला पाहून कोण्या पाद्र्यास आनंद होणार नाहीं! पाद्र्यानें त्यास आपल्या बरोबर चर्चमध्यें नेलें व ख्रिस्ती धर्माची

विधीपूर्वक दीक्षा घेण्यापूर्वी 'तूं आपलें जानवें तोडून टाकलें पाहिजेस व शेंडी छाटून टाकिली पाहिजेस' असें सांगितलें. त्यावर खरे म्हणाले, 'सुताचे तीन दोरे गळ्यांत राहिल्यानें अथवा केसांचा झुपका डोक्याच्या पुढच्या बाजूस न राखतां मध्यभागीं राखल्यानें धर्मविधींत विघाड कसा होतो? बायबलांत याविषयीं कांहीं अनुशासन असल्याचें मला दाखवाल काय?' या त्यांच्या प्रश्नावर पाद्री निरुत्तर झाला व 'मी तुला दीक्षा देत नाहीं' असें म्हणाला. अशा रीतीनें ख्रिस्ती धर्मग्रंथाधारेंच पाद्र्याची खुद्द ख्रिस्ती धर्ममंदिरांत फजीति करून खरे आपल्या घरीं परत आले.

**धार्मिक आचारविचार**

वरील गोष्टींत अंतर्भूत असलेली डॉ. खरे यांची हिंदुधर्मावरील निष्ठा आजही कायम आहे. ते सुधारक वृत्तीचे असले व आचारप्रधान सर्व धर्मनियमांचें पालन त्यांचेकडून होत नसलें, हिंदुधर्मांतील रूढिगत अनेक चालीरीती व व्यवहार यांना त्यांचा विरोध असला व अस्पृश्यतेसारखा हिंदुधर्माचा डाग पुसून टाकलाच पाहिजे असें त्यांचें मत असलें, तरी हिंदुधर्माच्या तात्विक श्रेष्ठतेबद्दल त्यांस परम आदर आहे. बालपणीं घडलेल्या अनेक धार्मिक संस्कारांचें प्रतिबिंब आजही त्यांच्या ठिकाणीं पहावयास सांपडतें. अनेक लहानमोठीं संस्कृत स्तोत्रें ते आजही घडाघड तोंडपाठ म्हणतात. त्यांच्या मातोश्रींना त्यांचें सुधारकी वर्तन पसंत नव्हतें. परंतु मातोश्रींच्या, ज्येष्ठ बंधूच्या अथवा आपल्या पत्नीच्याही सनातनी धर्मवृत्तीचा अनादर त्यांनीं केव्हांच केला नाहीं. इतकेंच नव्हे तर मातोश्री जिवंत असेपर्यंत त्यांच्या पूजेच्या खोलींत त्यांनीं चुकून देखील प्रवेश केला नाहीं. पूजागृहाच्या बाहेरच्या खोलींत एक पाट मांडून त्यावर स्नान करून आल्यावर कधीं एखादें स्तोत्र गुणगुणत ते येऊन बसत व गंधाचा टिळा लावून मातोश्रीस दुरूनच नमस्कार करीत. हा त्यांचा क्रम अखंडपणें चालू होता. आपल्या कुटुंबांतील इतर मंडळींच्या धर्मभावनेचा आदर करण्यासाठीं ते आपल्या घरीं सत्यनारायणापासून सर्व प्रकारचीं व्रतेंवैकल्यें व कुळकुळाचार होऊं देत आले आहेत व त्यासाठीं लागेल तो खर्चही त्यांनीं आनंदानें केला. पण, कधीं कोणाच्या धर्मभावनेस दुखविलें नाहीं. स्वतः अलीकडील आयुष्यांत

स्नानसंध्यादि कर्में अथवा देवदेवतादिकांचें अर्चन त्यांनीं केलें नाहीं. पण, तसें करणाऱ्या इतर कुटुंबियांना तसें करण्यापासून निवृत्त करण्याचा प्रयत्नही त्यांनीं कधीं केला नाहीं.

## देश व धर्मप्रेमाची सांगड

या त्यांच्या हिंदुधर्मावरील तात्विक निष्ठेंतूनच त्यांच्या देशप्रेमाचाही उगम झालेला आहे, असें एका परीनें म्हणतां येईल. हिंदुस्थानाच्या चार दिशांस असलेलीं चारहि आचार्य पीठें आणि हिंदुधर्मग्रंथांत वर्णिलेलें हिंदुस्थानांतील सर्वच नदनद्यांचें व पर्वतशृंगांचें धार्मिक माहात्म्य, यामुळें व एतत्सदृश इतर अनेक कारणांमुळें आसेतुहिमाचल भारतवर्ष हा एक अविभाज्य व अखंड असा ‘ धर्म-वर्ष ’ आहे, अशी त्यांची भावना झाली आणि धर्मनिष्ठेंतूनच त्यांच्या अखंड राष्ट्रनिष्ठेचा प्रादुर्भाव झाला असें म्हणतां येईल. स्वाभिमानाप्रमाणेंच धर्माभिमानांत व अखंड राष्ट्राभिमानांतही ते कोणास हार जाणार नाहींत. भारतवर्ष हेंच आपलें धर्मवर्ष आहे ही त्यांची भावनाच इतकी उत्कट आहे कीं, राजकारणांतील हिंदुस्थानचीं शकलें करणारी पाकिस्तानसारखी कोणतीही कल्पना प्रासंगिक लाभालाभाच्या दृष्टीनें व व्यावहारिक राजनीतिकुशलतेच्या दृष्टीनें इष्ट असल्याचें कोणी कितीही सांगितलें तरी तें त्यांस पटूं शकत नाहीं. त्यांचा हिंदुस्थानाच्या विच्छेदीकरणाचा विरोध व अखंड हिंदुस्थानावरील निष्ठा हीं जितकीं राजकीय आहेत, तितकींच धार्मिकही आहेत असें म्हटल्यास तें सत्यास सोडून होईल असें वाटत नाहीं.

## सामजिक बाबतींत सुधारणाभिमुख वृत्ति

धार्मिक सुधारक वृत्तीप्रमाणेंच डॉ. खरे यांची सामाजिक बाबतींतील वृत्तिही पूर्णपणें सुधारणाभिमुख अशी आहे. समाजास हानिकारक व समाजांतील पोटविभागास अन्यायकारक, समाजासमाजांत वैषम्य उत्पन्न करणाऱ्या व त्रितुष्टें वाढविणाऱ्या, लहानमोठा अथवा श्रेष्ठकनिष्ठ असा भेदभाव निर्माण करणाऱ्या आणि त्यामुळें सामाजिक व आर्थिक समतेस विरोधी असणाऱ्या, इत्यादि प्रकारच्या सर्व सामाजिक चालीरीतींचे ते कट्टर विरोधी आहेत. हा त्यांचा विरोध केवळ तात्विक अथवा परोपदेशेपांडित्यम् अशा स्वरूपाचा नसून स्वतःवर

प्रसंग ओढवला असतांही त्यांची हीच वृत्ति कायम असते. उदाहरणार्थ, हिंदु-समाजांतील कन्याशुल्काच्या अथवा हुंड्याच्या ते मनापासून विरुद्ध आहेत. त्यांचे चिरंजीव डॉ. विद्याधरपंत यांचा विवाह जमविणाऱ्या मध्यस्त मंडळींनीं कांहीं हजार रुपये हुंडा ठरविला व वधूच्या पित्यानें तो मोठ्या संतोषानें कबूलही केला, परंतु, डॉ. खरे यांस ह्याबद्दलची माहिती होऊं दिली नाहीं. पुढें जेव्हां ठरल्याप्रमाणें हुंड्याची रक्कम देण्यासाठीं डॉक्टरसाहेबांचे व्याही सरदार मंगळवेढेकर पटवर्धन हुंड्याची रक्कम घेऊन डॉक्टरसाहेबांकडे आले, तेव्हां त्यांस मोठें आश्चर्य वाटून त्यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें कीं, "हुंड्याच्या प्रथेच्या मी विरुद्ध आहे, तुमच्याजवळून हुंड्यासाठीं एक कपर्दिकही मी घेऊं इच्छित नाहीं." त्यांचें हें सडेतोड भाषण ऐकून सरदार पटवर्धन यांस मोठें आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. अशा रीतीनें घरांत चालत आलेला हुंडा, डॉ. खरे यांनीं झिटकारला, तरी विद्याधरपंतांचें लग्न मात्र आपल्या लौकीकास शोभेल अशा थाटानें त्यांनीं पार पाडलें.

### शरीरस्वास्थ्य व पोषाख

डॉ. खरे यांना काळजाचा विकार असल्याचा उल्लेख यापूर्वी अनेक वेळां आलेलाच आहे. ह्या विकारामुळें त्यांची प्रकृति बरीच ढासळली व रोगाचें पथ्यपाणी सांभाळूनच आपले सर्व व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी त्यांचेवर पडली. वस्तुतः लहानपणापासून त्यांची शरीरप्रकृति निरोगी व काटक अशीच होती. त्यांच्या बालपणाच्या वर्णनांत आम्हीं सांगितलेंच आहे कीं, त्यांनीं आपल्या शालेय जीवनांत व तरुणपणीं आखाड्यांत जाऊन कसरतीचा शोकही थोडाफार केलेला होता. प्रायः, सरकारी नोकरींत असतांना अथवा ती सोडल्यानंतरही कांहीं बाबतींतलीं नियमितपणाचीं सूत्रें त्यांनीं सोडलीं नव्हतीं आणि बाह्यतः दिसणाऱ्या धकाधकीच्या व धामधुमीच्या काळांतही प्रकृतिस्वास्थ्याला पोषक असा आहार, झोप इत्यादि बाबतींतला नियमितपणा त्यांनीं सांभाळला. जात्याच त्यांची प्रकृति काटक व श्रमसहिष्णु असल्यामुळें सार्वजनिक चळवळींत अविश्रांत श्रम करण्याच्या कोणत्याही प्रसंगीं ते डगमगले नाहींत. महात्मा गांधींच्या हरिजन-दौऱ्याच्या वेळीं स्वतः काळजाच्या विकारानें पीडित असूनही

गांधीजींचा हा भरगच्च कार्यक्रमाचा व धूमधडाक्याचा दौरा त्यांनीं स्वतः अंगमेहनतीनें किती यशस्वी रीतीनें पार पाडला; व त्यासाठीं अहोरात्र किती खटपट केली याचें वर्णन पूर्वी आलेंच आहे. जागरणें, उपासतापास, शारीरिक श्रम इत्यादि गोष्टींतूनही प्रसंगाप्रसंगानें त्यांनीं यशस्वी रीतीनें आपली प्रकृति टिकवून धरली. स्वतः कुशल डॉक्टर असल्यामुळें आपल्या काळजाचा विकारही त्यांनीं बराच आटोक्यांत ठेवला आहे. वार्धक्याबरोबर क्षीण होत जाणारे शारीरिक शक्तीचें परिमाण लक्षांत घेऊन त्यांनीं जिन्यावरून चढणें अलीकडे कांहीं वर्षांपासून सोडून दिलेलें आहे. रोगी तपासण्यासाठीं एकाद्याच्या घरीं माडीवर जाण्याचा प्रसंग आला तर त्यासाठीं ते मुद्दाम आपल्या घरची आरामखुर्ची व तीं उचलून नेणारीं माणसें बरोबर नेतात आणि आरामखुर्चीत वसून माडीवर जातात. अशाच प्रकारचीं खाण्यापिण्यांतलीं पथ्येंही ते कसोशीनें पाळतात आणि प्रसंगविशेष सोडून दिल्यास सामान्यत्वेंकरून दिवसां व रात्रीं मिळून सातआठ तासांची झोप हटकून घेतातच. एका सिगारेट शिवाय दुसरें व्यसन त्यांना नाहीं. तरुणपणीं कांहीं दिवस मद्यपानाचा छंद त्यांना लागला होता. परंतु, पुढें फारच लौकर त्यांनीं तो सोडला व तेव्हांपासून मद्य व मद्यार्क यांस त्यांनीं स्पर्श केला नाहीं. सिगारेट पिण्याचें व्यसन मात्र त्यांना बरेंच आहे असें म्हणतां येईल. सभा अथवा परिषदांच्या व्यासपीठावर बसूनही स्वच्छंदपणें ते सिगारेट ओढीत असतात. हें त्यांचें करणें अनेकांस बरें वाटत नाहीं. पण, सभापरिषदांतील या औपचारिक सभ्याचाराची फारशी तमा कधीं त्यांनीं बाळगली नाहीं. पोषाखाच्या बाबतींतही त्यांची वृत्ति अशीच आहे. महाराष्ट्रीय बाण्याचा पोषाख करण्यास व सरकार-दरबारांत अथवा छोट्याबड्या लाटांच्या घरीं तोच कायम ठेवण्यावर त्यांचा कटाक्ष आहे. काचा मारलेलें धोतर, सदरा, कोट व टोपी आणि पायांत चपला, ह्याशिवाय निराळा पोशाख केलेले डॉ. खरे फारसे कोणाच्या पाहण्यांत असतील असें वाटत नाहीं. पगडी तर विशिष्ट प्रसंगानें तरी त्यांनीं कधीं वापरली असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे.

**गहन कोडें**

वाचकांच्या ध्यानांत असेल कीं, मागे एके प्रसंगीं डॉ. खरे म्हणजें एक अजब ' पॅराडॉक्स ' आहे असें आम्ही त्यांचें वर्णन केलेलें आहे. कट्टर राष्ट्रीय वृत्तीचे असून सरकारी नोकरींत शिरणें, सरकारी नोकरींत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांची खुशामत न करणें; उलट, प्रसंग पडेल तेव्हां तडातडा त्यास बोलून बसणें, गुलामगिरींत नेहमीं दिसून येणाऱ्या स्वाभिमानशून्य जीवन जगण्याच्या परिस्थितींत स्वाभिमानाचीं स्फुल्लिंगें उडवीत राहणें, आकस्मिक रीतीनें सरकारी नोकरीवर लाथ मारणें, नागपूरसारख्या अनोळखी शहरांत येऊन डॉक्टरीचा धंदा सुरू करणें आणि तोही स्पृहणीय रीतीनें यशस्वी करून दाखविणें, धंद्याची ऐन चढती कमान असतांना व प्राप्तीचें प्रमाण वाढत असतांना धंद्याच्या प्रगतीला हानिकारक असे सार्वजनिक चळवळींचें लफडें स्वेच्छेनें गळ्यांत घालून घेणें; आणि पूर्व जीवनांत दारिद्र्याचा पूर्ण अनुभव असूनही भविष्यकाळाचा विचार न करतांना मिळत असलेल्या संपत्तीचा बेफामपणें सार्वजनिक कार्यांत व दानधर्मांत व्यय करीत राहणें, चळवळींच्या आत्यंतिक टोंकाला जाऊन व जहालपणाची कमाल मर्यादा गांठून पुन्हां अखेरीस आयुष्याच्या उतरत्या काळांत सरकारी सहकार्याच्या चळवळीवर येणें व व्हाइस-रॉयच्या कार्यकारी मंडळावरील मंत्रीपदाचा स्वीकार करणें, मधल्या काळांत महात्मा गांधींचें जीवन व त्यांनीं केलेल्या चळवळी यांचेशीं अभेद भावानें समरस होणें आणि नंतर तितक्याच चमत्कृतिजनक रीतीनें गांधीजी, त्यांचा परिवार व त्यांच्या चळवळी यांच्याशीं संपूर्णपणें फटकून वागणें, एका बाजूनें युद्ध-सहकार्याचा सर्व शक्तीनें पुरस्कार करणें, तर दुसऱ्या बाजूनें युद्ध-विरोधी चळवळ केल्याबद्दल फांसावर लटकणाऱ्या लोकांना वांचविण्याचा प्रयत्न करणें, इत्यादि अनेक प्रायः परस्परविरोधी भासणाऱ्या विलक्षण आश्चर्य निर्माण करणाऱ्या त्यांच्या जीवनांतील येथपर्यंत वर्णन केलेल्या घडामोडी पाहिल्या, म्हणजे डॉ. खरे यांचें चरित्र हें एक गहन कोडें आहे अथवा अजब पॅराडॉक्स आहे असेंच आम्हांस पुन्हा म्हणावेसें वाटतें. व्यक्तिजीवनांत ते औपचारिक नर्माचारांची फारशी पर्वा करीत नसले तरी दयार्द्रबुद्धि व प्रेमळपणा यांचा स्रोत

त्यांच्या अंतःकरणाच्या गूढ गर्भांतून अव्याहत वहात राहिला आहे. ते एकाद्यास टाकून बोलतील, नाहीं नाहीं म्हणतील, तरी अखेरीस त्याचें काम करतीलच. आपल्या पक्षाचे व परपक्षाचे कोण, हा भेदभाव ते नेहमीं करीत असले तरी परपक्षाचाही मनुष्य एखादें सहाय्य मागण्यास आला तर तें देण्यांत त्यांस विशेष आनंदच वाटतो. 'सेवाग्राम व तत्रस्थ आश्रमीय लोक यांचेशीं मला कांहींएक कर्तव्य नाहीं' असें ज्यावेळीं त्यांची जीभ फटकळपणानें बोलत होती, त्याच वेळीं त्यांचे पाय मात्र भन्साळी बाबाच्या कुटीकडे साक्षात् चालू लागलेले होते व 'मला कांहींएक कर्तव्य नाहीं' असें म्हणणाऱ्या त्यांनींच 'मला भन्साळीचे प्राण वांचविलेच पाहिजेत' असा मनोमन संकल्प सोडून तो पारही पाडून दाखविला. हें दृश्य, डॉ. खऱ्यांना गांधीजी व आश्रमवासी यांचे विरोधी समजणाऱ्या अनेकांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे.

**'डॉ. खरेने मुझे पदभ्रष्ट किया'**

डॉ. खरे यांच्या स्वभावांत जे हे विरोध एकवटलेले आहेत, त्या विरोधा-मुळें जरी त्यांचें चरित्र चमत्कृतिपूर्ण झालें असलें, तरी त्यांचें खरें सामर्थ्य हें मात्र केवळ त्यांच्या संतोचित निर्मल चारित्र्यांतच आहे. अध्यात्माच्या अंतिम पदवीला पोंहचलेल्या परमहंसांचीं जीं अनेक लक्षणें सांगतात, त्यापैकीं एक लक्षण अत्यंत निर्मल अशी बालवृत्ति हें आहे. डॉ. खरे यांच्या ठिकाणीं ही निरागस बालवृत्ति अतिशय मोहक स्वरूपांत आढळते. लहान मुलासारख्या त्यांच्या प्रांजळ आणि प्रेमळ स्वभावामुळेंच ज्यांच्या महात्मेपणाचा डंका आज सर्व जगभर गाजत आहे, त्या गांधीजींसारख्या जागतिक कीर्तीच्या पुरुषाच्या राजकीय कौटिल्याचा ते दंभस्फोट करूं शकले; व 'डॉ. खरेने मुझे पदभ्रष्ट किया' अशी केविलवाणी कबुली आपल्या एका अंतेवासी शिष्याजवळ देण्याचा प्रसंग डॉ. खरे यांनीं आपल्या निष्कलंक चारित्र्यानें त्यांचेवर आणला. डॉ. खरे हे रूढार्थानें धर्मशील नाहींत, तत्वज्ञानी नाहींत, किंवा सत्पुरुषही नाहींत. पण, त्यांच्या चारित्र्यांत या तिन्ही प्रकारच्या कोटींतील कांहीं उत्कृष्ट विशेषांचा मधुर मिलाफ झाला आहे. त्यांचें चारित्र्य हेंच त्यांचें सर्वस्व, हीच त्यांची अमोघ शक्ति आहे व त्यामुळें ते जरी आज कॉंग्रेसमधून निघून व्हाइसरॉयच्या मंत्री-

मंडळांत शिरले असले तरी त्यांच्यावर स्वार्थाचा किंवा देशाभिमानशून्यतेचा आरोप करावयाला त्यांना ओळखणारा कोणताही सुज्ञ माणूस धजत नाहीं.

**शत्रूशींही औदार्य**

६२ च्या वाढदिवस–सभारंभाच्या वेळीं भाषण करतांना त्यांनीं स्वतःच एका बाबतींत आपल्या स्वभावाचें मार्मिक वर्णन केलें आहे. ते म्हणाले, "साक्षात् परमेश्वर देखील स्तुतिप्रिय आहे. मग मी तर जाणून बुजून मर्त्य मनुष्य आहे. मला ही स्वतःची दुसऱ्यानें केलेली स्तुति आवडत असली तर त्यांत अस्वाभाविक काय आहे ? पण, परमेश्वर स्तुति करणारांचे एका शब्दानें देखील कधीं आभार मानीत नाहीं. मी मात्र माझ्या स्तुतिपाठकांचे उघडपणें आभार मानतों" या त्यांच्या वरील स्वकृत वर्णनांत फार मोठा सत्यांश भरलेला आहे. पाठीमागें त्यांची निंदा करणारे लोकही तोंडावर भाटगिरी करतात आणि ती ऐकून डॉक्टरसाहेबही आभारांचें प्रशस्तिपत्र त्यांना बहाल करतात. सदा-सर्वकाळ त्यांच्या सभोंवार राहणाऱ्या लोकांची वस्तुतः ही जबाबदारी असावयास पाहिजे कीं, डॉक्टरसाहेबांच्या हर्षामर्षाची पर्वा न करतां आपलें खरें मत असेल तें त्यांस सांगावें. परंतु, इतकी निस्पृहता फारच थोड्यांच्या अंगीं असते. मनुष्य कितीही बुद्धिवान असला व त्याची विवेचक–शक्ती कितीही सुतीक्ष्ण असली तरी सभोंवारचे लोक जर वारंवार त्याच त्या गोष्टींचा आघात त्याच्या मनावर करीत राहतील, तर त्या आघातांचा थोडाफार तरी परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. आणि त्यामुळें त्याच्या विवेचक–शक्तीची धार थोडी तरी बोथट होणारच. असाच कांहींसा प्रकार डॉक्टर खरे यांच्याही बाबतींत घडत असावा. राजकारणांतील अथवा सार्वजनिक जीवनांतील प्रासंगिक प्रतिस्पर्ध्यांशीं कालांतरानें दिलजमाई करण्याची त्यांस संवय नाहीं असें नाहीं. डॉ. मुंजे, कै. डॉ. राघवेंद्रराव इत्यादि अनेक प्रासंगिक प्रतिस्पर्ध्यांबरोबर त्यांची दिलजमाई झालेली आहे. 'एक असंतुष्ट सब-असिस्टंट सर्जन' इतक्या हीन तुच्छतादर्शक शद्बांनीं भर कायदेमंडळांत ते प्रधानमंत्रीपदावर असतांना कै. डॉ. राघवेंद्रराव यांनीं त्यांचा उपहास व उपमर्द केला होता. तथापि, त्यांचेशीं देखील त्यांनीं पुढें हस्तांदोलन केलेंच. इतकेंच नव्हे तर त्यांच्या मेजवान्या व

उपाहारासही ते हजर राहिले. त्यांच्या कर्तृत्वावर व योग्यतेवर येवढा घोर आघात करणाऱ्या कै. डॉ. रावांशींही जर त्यांची दिलजमाई होऊं शकली, तर महात्मा गांधींशींच ती कां न व्हावी हें समजणें कठीण आहे.

## गांधीजींविषयीं नितांत आदर

गांधीजींबद्दल एकाच बैठकींत नितांत आदराचें व आत्यंतिक उपहासाचें अशा दोन्ही तऱ्हेचे बोल त्यांच्या मुखांतून ऐकण्यास मिळतात. गांधीजींच्या सामुदायिक चळवळींना त्यांनीं पूर्ण पाठिंबा दिला; तर त्यांच्या १९४० सालच्या वैयक्तिक सत्याग्रहाची त्यांनीं थट्टा केली. त्यांच्या राजकारणाशीं सुमारें १८ वर्षें ते समरस होऊन वागले, तर प्रधान मंत्रीपदावर आल्यानंतर पहिल्याच सपाट्यांत बॉंबच्या खटल्यांत शिक्षा झालेल्या कैद्यांना बंधमुक्त करण्याचें पहिलें कार्य त्यांनी केलें. त्यामुळें त्यावेळीं गांधीजींना काय वाटेल याचा त्यांनीं विचारही केला नाहीं. गांधीजींच्या सहवासांत काढलेल्या काळाचें वर्णन जेव्हां ते स्वत:च करूं लागतात, तेव्हां कित्येक वेळां त्यांचा कंठ अवरुद्ध होत आहे, पांपण्या आर्द्र होत आहेत व अंत:करण गहिंवरून येत आहे कीं काय असाही भास होतो. त्यांच्या दवाखान्यांतील गांधीजींचा फोटो त्यांनीं अद्याप तसाच कायम ठेवला आहे. 'गांधीजींचें व तुमचें इतकें बिनसलें तर तुम्ही हा त्यांचा फोटो तरी येथें कशाला ठेवतां' असा प्रश्न कित्येकांनीं त्यांना विचारला, आणि प्रत्येक पृच्छकाला त्यांनीं असेंच उत्तर दिलें कीं, "गांधीजींचें व माझें बिनसलें असेल, पण म्हणून गांधीजींच्याबद्दल माझा आदर नष्ट झाला आहे काय? गांधीजींनीं माझ्या जीवनावर केलेला परिणाम विसरणें मला शक्य आहे काय?" त्यांच्या ह्या उत्तरांतील ही भावना व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर त्यांची नेमणूक झाल्यानंतरही कायमच असलेली दिसून आली. व्हाइसरॉयच्या मंत्रीपदावर आरूढ झाल्यानंतर नागपूर म्युनिसिपालिटीनें त्यांना मानपत्र दिलें. वस्तुत:, आजपर्यंत व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंत्र्यास लोकनियुक्त म्युनिसिपालिटीनें मानपत्र दिलें असल्याचा दाखला गेल्या दोन तीन वर्षांत कोठेंही दाखवून देतां येणार नाहीं असें वाटतें. परंतु, नागपूर म्युनिसिपल कमेटीचें मात्र या बाबतींतलें हें पहिलेंच उदाहरण होय. मानपत्रास उत्तर देण्यासाठीं भाषण करितांना नामदार डॉ. खरे यांनीं जाहीर रीतीनें आपल्या

उपरिनिर्दिष्ट भावनांना वाचा फोडली. ते म्हणाले, "माझा जीवनपथ घडविण्याच्या बाबतींत कै. लोकमान्य टिळक, कै. मोरूभाऊ अभ्यंकर व महात्मा गांधी ह्या तिघांनाच सर्व श्रेय दिलें पाहिजे. माझी मूळची स्थिति एकाद्या चिखलाच्या गोळ्यासारखी होती. परंतु ह्या तिघांनी ह्या चिखलाच्या गोळ्यांतूनच माझी ही सजीव मूर्ति घडविली आहे. अलीकडे महात्मा गांधींशीं माझा बेबनाव झाला असला तरी महात्माजींनीं देशाची अतिशय मोठी कामगिरी बजाविली आहे, ही माझी पूर्वीची भावना आजही मी विसरूं शकत नाहीं. राजकीय जागृतीचें लोण लोकमान्यांनंतर हिंदुस्थानच्या खेड्याखेड्यांतून पोंहोंचविण्याचें सर्व श्रेय महात्माजींनाच दिलें पाहिजे; हें म्हणत असतांना मला कोणताच संकोच वाटत नाहीं." या त्यांच्या जाहीर उद्‍गारांत गांधीजीं-विषयींच्या निष्ठेचा ओलावा त्यांच्या अंतःकरणांत कितपत कायम आहे याचें उत्तम प्रतिबिंब उमटलेलें आहे.

**मीलनाचा शुभदिन उगवो**

ही त्यांची निष्ठा व अगदीं अलीकडील त्यांचे वरील उद्गार ध्यानांत घेतां, कुलगुरु श्री. नानासाहेब केदार यांचे प्रमाणेंच आम्हांसही असा दृढ विश्वास वाटूं लागतो कीं, महात्माजी व डॉ. खरे यांचें मीलन होण्याचा सुदिन केव्हांना केव्हां तरी उगवल्याशिवाय राहणार नाहीं. ज्याप्रमाणें डॉ. खरे यांच्या मनांतील आंतरिक गांधीनिष्ठेला अद्यापि बाध आलेला नाहीं, त्याचप्रमाणें गांधीजींच्या मनांतील डॉ. खरे यांच्यावरील प्रेमाचा झरा देखील आटलेला नाहीं, असा आमचा पूर्ण विश्वास आहे. "डॉ. खरे यांनीं झालें गेलें सर्व विसरून पुनरपि कॉंग्रेसमध्यें यावें" अशी कळकळीची इच्छा कुलगुरु केदार यांच्याजवळ गांधीजींनीं व्यक्त केली आहे. दोघांच्याही ठिकाणची ही पारस्परिक आंतरिक सद्भावना लक्षांत घेऊनच आमचीही, हा ग्रंथ समाप्त करीत असतांना, श्रीनाथ-चरणीं अशी प्रार्थना आहे कीं, गांधी-खरे मीलनाचा हा शुभदिन लौकर उगवो; आणि आमच्या प्रांतांतील राजकीय किल्मिषांचें तिमीर नष्ट होऊन स्वराज्याचा उषःकाल दिनमण्डल सुशोभित करो !

इत्यलम्

# परिशिष्ट १

## खरे-प्रकरणाचें यथार्थ स्वरूप

जुलै महिन्यांत मध्यप्रांतीय मंत्रीमंडळाबाबद ज्या क्रांतिकारक घडामोडी झाल्या व ज्याबाबद कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें डॉ. खरे व गव्हर्नर यांना दोष देऊन डॉ. खऱ्यांना 'कॉंग्रेसमधील विश्वासाच्या व जबाबदारीच्या जागांना नालायक ठरविलें' त्याबाबद डॉ. खरे आपल्या कैफियतींत म्हणतात,

"कॉंग्रेस संघटनेच्या इतिहासातील अत्यंत दुःखद असा काळ या प्रांतानें नुकताच भोगला आहे. जुलै महिन्यांतील गोष्टींचें सिंहावलोकन करणें हें कांहीं आनंददायक कार्य नाहीं; कारण मी तसें कांहीं केलें कीं, कटु आठवणींना उजाळा मिळून ज्यांनीं आपलें सर्वस्व कॉंग्रेसला वाहिलें आहे, अशा अत्यंत आदरणीय व्यक्तींबद्दलहि लोकांच्या अनिष्ट अशा भावना कदाचित् होतील, याची मला जाणीव आहे. केवळ कर्तव्यबुद्धीनें मी ही कैफियत जनतेला सादर करीत आहे. तसें करतांना कॉंग्रेसची इभ्रत कमी होऊं नये याची जाणीव ठेवून, जर देशाला कशाचें बलिदान हवेंच असेल तर माझ्या मस्तकाचा व मला जें प्रिय आहे त्याचाच बळी दिला गेला पाहिजे हें मनांत बाळगूनच, मी आपली ही कैफियत सादर करीत आहे. निष्कपटपणें आणि सत्याची कांस न सोडतां, मी माझें हें कटु कर्तव्य करणार आहे.

**वर्किंग कमेटीच्या ठरावाचे दोन भाग**

ता. २५ जुलै रोजीं वर्किंग कमेटीनें जो ठराव केला, त्याचें मी प्रथम परीक्षण करतों. या ठरावाचे निर्णयप्रमादविषयक एक व बेशिस्त वर्तनासंबंधीं एक असे दोन भाग पाडतां येतात. मी (मंत्रीमंडळाचा) राजीनामा देईपर्यंतच्या व माझ्या सहकाऱ्यांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी करीपर्यंतच्या माझ्या सर्व कृत्यांचा पहिल्या सदरांत समावेश होतो. पूर्वसूचना झिटकारून मी जें धोरण अंगिकारिलें, गव्हर्नरचें आमंत्रण स्वीकारून (दुसरें) मंत्रीमंडळ बनविलें व अधिकारग्रहणाची शपथ घेतली या गोष्टी दुसऱ्या सदरांत मोडतात.

मी जर माझ्या सहकाऱ्यांचा राजीनामा मागूनच स्वस्थ बसलों असतों, तर वर्किंग कमिटीच्या मतें त्यांत बेशिस्तपणा कांहीं नव्हता, हें अगदीं स्पष्ट दिसतें. येथपर्यंतचें माझें कोणतेंहि कृत्य शिस्तभंगाचें आहे असें ते म्हणत नाहींत; पण मला दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून गव्हर्नरला मी माझा राजीनामा दिला हें घाईचें कृत्य झालें, व हा शिस्तभंग झाला असें वर्किंग कमिटीचें म्हणणें आहे. त्याचप्रमाणें नवीन मंत्रीमंडळ बनवून अधिकारग्रहणाची शपथ घेतली हेंही शिस्तीस सोडून झालें, असें तिचें म्हणणें आहे.

### निर्णय-प्रमाद झालाच नाहीं

पहिल्या निर्णय-प्रमादाच्या सदरांत येणाऱ्या कोणत्याही बाबतींत माझ्या हातून निर्णयप्रमाद झालेला नाहीं, असें मी आग्रहपूर्वक म्हणतों. माझ्या तीन सहकाऱ्यांबरोबर मी काम करूं शकत नाहीं व मंत्रीमंडळाचा राजिनामा अपरिहार्य आहे. या निर्णयास मी कां आलों याचीं कारणें व कोणत्या परि-स्थितीमुळें मला त्या निर्णयाला येणें भाग पडलें याची सविस्तर हकीगत पुढें देईन. मुख्य प्रधान या नात्यानें मी माझा राजीनामा देणें व सहकाऱ्यांचे राजीनामे मागणें हें माझ्या पूर्ण अधिकारांतलें होतें. माझ्या सहकाऱ्यांनीं सुरू केलेल्या व कॉंग्रेसच्या कांहीं वजनदार सदस्यांनीं उत्तेजन देऊन पोसलेल्या भांडणामुळें प्रांत आणि कॉंग्रेस यांचे जें हंसें होऊं लागलें होतें त्याला पायबंद घालून, जनतेचा कॉंग्रेसवर पुन्हा विश्वास संपादण्यासाठीं जालीम उपाययोजनेची आवश्यकता होती; व तो उपाय म्हणजे मी व माझ्या सहकाऱ्यांनीं राजीनामा देणें हा एकच लोकशाही मार्ग होता. तीन (महाकोशल) मंत्री मला बेइमान झाले होते; व ते मला अधिकारभ्रष्ट करण्यासाठीं बेफामपणें प्रयत्न करीत होते.

### बेशिस्त वर्तनाबद्दल पारितोषिक

पचमढीच्या करारानें जरी यांच्या या चाळ्यांना तात्पुरता पायबंद बसला होता, तरी त्यांनीं लवकरच आपले पूर्वीचे प्रयत्न अप्रतिहत जोमानें सुरू केले होते. या त्यांच्या प्रयत्नांना वर्ध्याहून प्रोत्साहन मिळालें व गांधीजींच्या खालो-खाल महत्व असलेल्या व्यक्तींच्या पाठिंब्यानें त्यांनीं माझ्याविरुद्ध उभा दावा

धरला. अशा परिस्थितींत सडका भाग कापून टाकणें एवढा एकच मार्ग मला उरला होता. मागाहून जे एकंदर प्रकार घडले, त्यावरून हें स्पष्टच झालें आहे कीं, आपल्या पुढाऱ्याच्या आज्ञेचा त्यांनीं जो बेपरवाईनें भंग केला त्याकडे कोणीच लक्ष दिलेलें नाहीं; एवढेंच नव्हे तर सरदार पटेल यांच्या मदतीनें त्यांची पूर्वपदावर प्रतिष्ठा करण्यांत येऊन, त्यापैकीं एकाला पक्षाचा नेता व मुख्य प्रधान बनविण्यांत आलें. मी राजीनामे मागण्यांत कसलाही शिस्तभंग केला नसतांना, माझ्या सहकाऱ्यांनीं राजीनामे देण्याचें कां नाकारावें, किंवा माझ्या मानीव (supposed) निर्णय–प्रमादानें त्यांच्या या नकाराचें समर्थन होऊं शकतें कीं काय, याचाहि कोणी विचार करतांना दिसत नाहीं. माझा मानीव निर्णय-प्रमाद हा हिमालयाएवढा ठरला, व माझ्या सहकाऱ्यांचें बेशिस्त वर्तन हा गुण ठरून, त्याबद्दल त्यांची केवळ स्तुतीच झाली असे नव्हे, तर त्यांना त्याबद्दल पारितोषिकहि देण्यांत आलें.

**राजेंद्राचा अनधिकृत इषारा**

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं दिलेल्या इषाऱ्याकडे मी दुर्लक्ष केलें, असा दुसरा आरोप मजवर आहे. पहिली गोष्ट अशी कीं, त्यांनीं स्वतः मला इशाराच मुळीं दिला नाहीं. डॉ. राजेंद्रांची जर खरोखरच इच्छा असती, तर, ते ज्याप्रमाणें फोनवर मेहताशीं बोलले त्याचप्रमाणें, माझ्याशीं फोनवर बोलूं शकले असते. त्यांनीं मला एक पत्र लिहिलें, व तें ठाकूर छेदीलालजींच्या हस्तें धाडलें असें म्हणतात; व माझ्या मुलानें ता. २० रोजीं रात्रीं तें पत्र घेण्याचें नाकारलें, असेंही म्हणण्यांत येतें. त्यासंबंधींच्या वादांत येथें न शिरतां मला असें विचारावयाचें आहे कीं, मला इशारा देण्याचा डॉ. राजेंद्रांना काय अधिकार होता? पार्लमेंटरी कमिटीच्या ता. ८-७-३७ च्या ठरावाप्रमाणें जरुरीच्या वेळीं, कमिटीच्या कक्षेंतील प्रश्नांचा निर्णय देण्याचा अधिकार सरदार पटेलांना आहे; डॉ. राजेंद्रांचें अधिकारक्षेत्र बिहार, ओरिसा व आसाम हें आहे. पार्लमेंटरी कमिटीचा एक सभासद या नात्यानें मध्यप्रांतीय मंत्रीमंडळाला इशारे देण्याचा त्यांना कायदेशीर अधिकार नव्हता. त्यांच्या वर्तनाचा चांगला अर्थ करावयाचा झाला तर त्याला फार तर सदुपदेश म्हणतां येईल, आणि मी जरी त्यांचा सल्ला मानला नाहीं, तरी शिस्तभंगाचा आरोप माझ्यावर येऊं शकत नाहीं.

### सरदार पटेल यांच्या सूचना

या उलट माझ्या मागणीप्रमाणें राजीनामा देऊं नका असा जो सल्ला त्यांनीं तीन दिवाणांना दिला ; या त्यांच्या वर्तनाची दखल मात्र कोणीच घेत नाहीं. मुख्य प्रधान आणि त्याचे मंत्री यांच्या व्यवहारांत ढवळाढवळ करून व मंत्र्यांना मुख्य प्रधानाचा हुकूम धुडकावण्याचा सल्ला देऊन डॉ. राजेंद्रांनीं शिस्तभंग केलेला नाहीं काय? ता. ३०-७-३७ रोजीं श्री. पटेल यांनीं ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्यावरून मुख्य प्रधानाचे महत्त्व व अधिकार यांची कल्पना येईल. त्या सूचना अशा :—

> “ मंत्रीमंडळाची सामाईक जबाबदारी आणि काँग्रेस पक्षाची सध्यांची परिस्थिती—जी साहजिकच मोठीशी मजबूत नाहीं—ही लक्षांत घेऊन गव्हर्नरला फक्त मुख्य प्रधानाशीं व्यवहार करण्याची विनंती करावी. गव्हर्नरांनीं व्यक्तिशः दिवाणांना बोलावण्याचा प्रघात पाडूं नये व (पडला असल्यास) त्याला उत्तेजन देऊं नये. एखाद्या खास प्रसंगीं, मुख्य प्रधानाच्या संमतीनें मंत्र्यांना गव्हर्नरनें बोलवावें.”

माझ्या मागणीप्रमाणें राजीनामा देऊन, नंतर हें प्रकरण वर्किंग कमिटी किंवा दुसरा एखादा काँग्रेस अधिकारी यांच्याकडे न्यावें, असा सल्ला राजेंद्राना त्या मंत्र्यांना देतां आला नसतां काय? मी माझ्या यातनांतून सुटण्यासाठीं काँग्रेस अधिकाऱ्यांकडे न जातां गव्हर्नरकडे गेल्याबद्दल गांधीजी मला दोष देतात; पण जरूर तर निषेधपूर्वक प्रथम राजीनामे देऊन व नंतर वरिष्ठांकडे दाद मागण्याचा मार्ग माझे सहकारी विसरले, याबद्दल त्यांना दोष दिला पाहिजे, हें मात्र गांधीजींना मुळींच सुचलें नाहीं.

### ‘मंत्री ही माझी बाहुलीं होतीं’

गेल्या मेमध्यें जेव्हां चार मंत्र्यांनीं राजीनामा दिला, तेव्हां शिरस्त्याप्रमाणें त्यांनीं मलाच राजीनामे सादर केले. हा शिरस्ता तीन दिवाण जुलैंत विसरले, आणि राजेंद्रांच्या अनधिकृत अधिकाराच्या पाठिंब्यानें ‘पश्चिमेंतील पार्लमेंटरी शिरस्ते हिंदुस्थानला लागूं नाहींत’ असें म्हणूं लागले ! ता. १९-७-३८

रोजीं श्री. मिश्रांनीं लिहिलेल्या पत्राशीं हें कसें विसंगत आहे तें पहा "एप्रिल (मे) मध्यें आम्ही वर्किंग कमिटीला न विचारतां राजीनामे दिले . . . कारण आमची नेमणूक तुम्ही केली होती व वर्किंग कमिटीकडे आम्हांला सरळ जातां येत नाहीं असें आम्हाला वाटलें; पण आपण तें सरदार पटेलापुढें ठेवाल अशी आमची अपेक्षा होती" ही कबुली असतांना सरदारांनीं त्याबद्दल वाद घालणें निरर्थक आहे. कॉंग्रेस असेंब्ली पक्षानें मला माझे सहकारी निवडण्याचा पूर्ण अधिकार दिला होता; व मी तो पक्षाचा नेता आणि मुख्य प्रधान या नात्यानें बजावला. मंत्री कोण निवडावेत याबद्दल हुकूम देण्याचा सरदाराला कायदेशीर अधिकार मुळींच नव्हता. मंत्री हीं माझीं बाहुलीं होतीं (were my creations, pure and simple) व दिवाणहि तसेंच समजत होते. त्यावेळींहि मी त्यांचे राजीनामे आपल्या अधिकारांत स्वीकारूं शकत होतों; आणि मे मध्यें करण्याचा मला जो अधिकार होता तोच जुलैंतहि कायम होता; कारण पक्षानें माझा तो हक्क हिरावून घेतला नव्हता.

### शिरस्त्याच्या पोकळ वाता

मंत्रीमंडळें बनविण्याचें सर्वसामान्य धोरण जोंवर कॉंग्रेसचें आहे, तोंवर कांहीं सहकारी काढणें व नवे घेणें हा सामान्य व्यवहार ठरतो; व नेत्याला त्यांत पुष्कळ वावहि आहे. नेत्यावर पक्ष कार्यक्षम निमंत्रण ठेऊं शकतो; आणि जोंवर नेत्याला पक्षाचा पाठिंबा आहे तोंवर वर्किंग कमिटी काय किंवा ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी काय नेत्याच्या निवडीला हरकत घेऊं शकत नाहीं. पार्लमेंटरी रिवाजाप्रमाणें जरी मला नवें मंत्रीमंडळ बनवून पुन्हां नव्यानें शपथ घ्यावी लागली असली, तरी वस्तुतः ती प्रधानमंडळाची पुनर्घटना होती; कारण नवे घेतलेले सहकारीही कॉंग्रेस पक्षांतलेच होते. तेव्हां वर्किंग कमिटीला विचारण्याचीही गरज नव्हती. माझ्यावर शिस्तभंगाचा आरोप करण्याला मी एकादा नियम स्पष्टपणें मोडला असायला पाहिजे. याबाबत कोणताही स्पष्ट नियम नाहीं हें वर्किंग कमेटीला ठाऊक आहे; व 'म्हणून मला माहीत असलेल्या शिरस्त्यावर' ती भिस्त ठेवीत आहे. पण कॉंग्रेसनें अधिकार-ग्रहण केल्यापासून, आपल्या बेइमान सहकाऱ्यांना काढण्याचा मुख्य प्रधाना-

वरील हा पहिलाच प्रसंग असल्यामुळेंच, वर्किंग कमिटी 'शिरस्त्या'च्या वाता कशी मारूं शकते?

**यांत शिस्तभंग कोठें आहे?**

काँग्रेसच्या अटी गव्हर्नरानें नामंजूर केल्यावर उद्भवलेल्या पेंचप्रसंगाला अनुलक्षून जर वर्किंग कमेटी तसें म्हणत असेल तर तो मुद्दा सर्वस्वी गैरलागू आहे आणि त्यावरच विसंबून जर वर्किंग कमिटी अशी वागली असेल तर तिनें आपली चूक सुधारावी. बिहार व युक्तप्रांत येथील (राजबंदी-मुक्ततेच्या) वांध्याचें उदाहरणहि गैरलागू आहे; कारण तेथें गव्हर्नर व मंत्रीमंडळ यांचें भांडण होतें; तर आमचें हें निव्वळ घरगुती भांडण होतें. तरी पण त्याहि प्रसंगीं मंत्रीमंडळानें वर्किंग कमेटीला न विचारतांच राजीनामे दिले हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. आमचे येथील भांडण खासगी होतें; व मंत्रीमंडळ सुधारण्याचा किंवा तोडण्याचा मुख्य प्रधानाला पूर्ण अधिकार होता. मग यांत शिस्तभंग आला कोठून?

**गव्हर्नरचा संबंध मुळींच नाहीं**

माझ्या वर्तनानें गव्हर्नरला म्हणे खास अधिकारांचा उपयोग करण्याची संधी मिळाली! खरेंच कां असें आहे? सुधारणा कायद्याच्या कलम ५१ प्रमाणें गव्हर्नराला मंत्री नेमण्याचे व काढण्याचे जे अधिकार आहेत ते सामान्य स्वरूपाचे आहेत; त्याला याबाबद कोणतेही खास अधिकार नाहींत. मुख्य प्रधानानें राजीनामा दिला कीं, मंत्रीमंडळ आपोआप मोडतें हा ब्रिटिश गृहस्थाच्या देशांतला शिरस्ता (जो काँग्रेसनें कधींच नामंजूर म्हटलेला नाहीं) त्याला माहित. कांहीं हटवादी मंत्री मुख्य प्रधानाला धाब्यावर बसवूं पाहतील; पण त्यांचा अधिकार मुख्य प्रधानाच्या अधिकाराबरोबरच संपुष्टांत येतो; आणि मुख्य प्रधानाच्या राजीनाम्यांत जी गोष्ट अंतर्भूत आहे, तेवढीच मग राजाच्या प्रतिनिधिला स्पष्ट करावी लागते. अर्थात मंत्री 'बडतर्फ' केले हें म्हणणें भ्रामक आहे. गव्हर्नरच्या पत्रकांतही 'मंत्र्यांच्या अधिकारांची समाप्ती केली' असेंच म्हटलें आहे. माझ्या कृत्यानें मी माझ्या स्वतःच्या व सहकाऱ्याच्या अधिकाराची समाप्ति केली. त्यांत गव्हर्नरचा काडीचाही संबंध येत नाहीं.

**धादांत सत्यापलाप**

वरील हकीगतीवरून स्पष्टपणें दिसून येईल कीं, मी कसलाही शिस्त-भंग केला नाहीं. ता. २० रोजीं मी राजीनामा दिला तो इशारे धुडकाऊन दिला नाहीं किंवा कोणताही शिरस्ता मोडला नाहीं; शिरस्त्याचें अस्तित्व केवळ काल्पनिक होतें. तरी पण इमानदार काँग्रेसमन या नात्यानें, ज्यांना मी मानतों त्या माननीय व्यक्तींनीं तसें करण्याबद्दल वजन टाकलें तेव्हां, पहिलें मंत्रीमंडळ घाईनें मोडून दुसरें बनविण्यांत मी निर्णयप्रमाद केला अशी कबुली दिली. माझ्यावर फार तर एवढाच (निर्णयप्रमादाचा) आरोप करतां येईल; पण मी शिस्तबाह्य वर्तन केलें असें म्हणणें हा धादांत सत्यापलाप होय.

**परस्परविरोधी आरोप**

इशाऱ्यांच्या मुद्याला सरदार पटेल फारसें महत्व देतांना दिसत नाहीं. त्यांचें स्वतःचें गाऱ्हाणें निराळेंच आहे. ता. ४ ऑगष्ट रोजीं पार्लमेंटरी कमेटीनें काढलेल्या पत्रकांत ता. १५ रोजीं मी घाइनें कांहींही कारवाई करणार नाहीं, असें आश्वासन देऊन त्यांना निर्धास्त करून चकविलें असें म्हटलें आहे. वर्किंग कमेटी म्हणतें मी घाई केली; तर त्यानंतर नऊ दिवसांनीं काढलेल्या पत्रकांत पार्लमेंटरी कमेटी म्हणते, आपल्याला अंधारांत ठेऊन कारवाई केली. हें म्हणणें परस्परविरोधी असून, पहिला आरोप टिकत नाहीं, असें दिसून आल्यावर बहुधा दुसरा आरोप करण्यांत येत आहे. वर्किंग कमेटेच्या सभपूर्वी ता. २६ जुलैपूर्वी सरदारांची ही भूमिका नव्हती हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

**खोटा आभास उत्पन्न केला**

माझ्या ता. १५ च्या सरदारांना लिहिलेल्या पत्रांतील आश्वासनाची सांगड आमच्यांत तोंपर्यंत समेट न झाल्याच्या मुद्याशीं अशी कांहीं कुशलतेनें घातली आहे कीं, त्यावेळीं राजिनामा देण्याचें माझे मनांत होतें, पण घाईनें मी कांहीं करणार नाहीं, असें त्यांना आश्वासन दिलें असा समज व्हावा. माझ्या त्या पत्रावरून (हें पत्र डॉक्टरांनीं आपल्या पत्रकांत दिलें आहे.) हीं कशी कल्पित कथा आहे हें स्पष्ट दिसून येईल. खोटा आभास उत्पन्न करून खऱ्या गोष्टी दडपण्याचें तें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ता. १८ रोजीं मी

जो मार्ग स्वीकारला, तो ता. १५ ला मी सरदारांना पत्र लिहिलें तेव्हां मला शिवलाही नव्हता, ही उलट वस्तुस्थिती आहे.

आतां मला राजीनामा देण्यास कारण झालेल्या गोष्टींकडे वळूं. पचमढी-पूर्वींच्या व नंतरच्या गोष्टी असें त्यांचे दोन विभाग पडतात.

**भांडण तत्वाचें नव्हे, व्यक्तींचें**

आमच्या प्रांतांतलें हें भांडण तत्वाचें नसून व्यक्तींचें होतें. १९३६ मध्यें ब्रिटिश प्रधान मंडळांतून श्री. आस्क्विथ यांची, त्यांच्या सहकाऱ्यांच्या कारस्थानांनीं जी हकालपट्टी झाली, त्याच्याशीं या प्रकाराचे पुष्कळच साम्य आहे. शुक्ल-मिश्रांचा पहिल्यानें बेबनाव होता; त्यांची गट्टी गेल्या डिसेंबर-जानेवारींत झाली व श्री. मेहता त्यांना मिळाल्यावर, मंत्रीमंडळांत, माझी हकालपट्टी करणाच्या उद्देशानें, एक गट बनविला गेला. माझ्याविरुद्ध, विशेषतः महाकोशल विभागांत, नालस्तीचा प्रचार सुरू झाला. त्या प्रचाराचें अधिष्ठान राजकारणाचें केंद्र महाकोशलमध्यें आलें पाहिजे हें होतें. अखेर त्यांचें धोरण नक्की ठरून ता. २९ एप्रिलला किंवा त्या सुमारास श्री. शुक्ला व मिश्रा सरदारांना मुंबईंत जाऊन भेटले. त्या भेटींत काय ठरलें हें समजण्यास मला मार्ग नाहीं. पण त्यानंतर स्वतः राजीनामे देऊन पेंचप्रसंग निर्माण करण्याच्या मागें ते लागले. या कामास ता. ५ मे ला प्रारंभ करून ता. ८ ला त्यांनीं माझ्या हातीं राजीनामे दिले. सरदारांचीं मुलाखत व राजीनामा यांत गेलेला अल्प काळ हा मोठाच सूचक आहे. नंतर वाटाघाटी झाल्यावर मंत्रीमंडळ मोडण्याचा आपला आग्रह नाहीं, पण हें प्रकरण सरदारांपुढें ठेवावें, असें त्यांनीं सुचविलें.

**पचमढीचें कारस्थान कां फसलें ?**

सरदारांपुढें हें प्रकरण ठेवण्यास ते कां सांगतात हें तेव्हां माझ्या ध्यानांत आलें नाहीं. त्यांचे राजीनामे स्वीकारून मी ते गव्हर्नरला सादर करूं शकत होतों. पण, त्यांनीं नरमपणा दाखविल्यामुळें व मंत्रीमंडळ मोडण्याची माझी इच्छा नसल्यामुळें सरदारांपुढें हें प्रकरण नेण्यांत मला हरकत दिसली नाहीं. मुंबईला गेल्यावर ता. १३ रोजीं मी सरदारांपुढें हें प्रकरण ठेवलें; पण माझ्या-मागें सरदार आणि शुक्ला-मिश्रा यांचें बोलणें होऊन सरदारांनीं तें प्रकरण वर्किंग

कमिटीपुढें मांडलें; व तिनें पचमढीला ता. २४ ला सभा बोलाऊन पक्षापुढें प्रश्न ठेवण्याची आज्ञा केली. ता. २२ मे रोजीं कटणीस एक परिषद होती, तिला धरून महाकोशल सदस्यांची ही परिषद भरवून माझ्याविरुद्ध मतें देण्यास त्यांना बनविण्याचा कांहीं महाकोशलस्थ मित्रांनीं प्रयत्न केला; पण बहुसंख्य सभासद माझ्या विरुद्ध कारवाया करण्यास, किंवा महाराष्ट्र वि. महाकोशल असें प्रादेशिक भांडण उभें करण्यास प्रोत्साहन देण्याच्या वृत्तींत नव्हते. म्हणून सारेंच 'ओम्फस्' झालें! प्रादेशिक वृत्तीला थारा न देणाऱ्या महाकोशलस्थ सदस्यांचें जाहीर आभार मानण्याची मी ही संधी घेतों. ता. २४ ला पक्षाची सभा होण्यापूर्वींच ६८ सभासदांपैकीं सुमारें ४४ सदस्यांच्या, श्री. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या सभेनें, सहाही मंत्र्यांनीं राहावें नाहींतर सर्व सहाही जणांनीं बाहेर पडावे असा ठराव केला; व सरदारांना या ठरावाची दखल दिल्यावर समेटाचें बोलणें होऊन समेट करविण्यांत आला. बहुमताचा देखावा करून माझी हकालपट्टी करण्याची माझ्या सहकाऱ्यांची उमेद अशा रीतीनें गेल्यावर पक्षापुढें मतभेद मांडून त्याला विश्वासांत घेण्यांत अर्थ नाहीं हें (त्यांना) उमगलें; आणि मंत्रीमंडळ कायम राहण्याला पक्षाचा विरोध नसल्यामुळें समेटाची सूचना पक्षानें सहजच मान्य केली. सहकारित्वाच्या नात्यानें मंत्र्यांनीं वागले पाहिजे ही समेटाची अट होती; व आमच्या जीवन-पुस्तकाचें नवीन पान सुरू होईल अशी आशा वाटत होती.

**या वार्ताहराचा स्फूर्तिदाता कोण?**

पण, समेटाची शाई वाळते न वाळते तोंच जबलपूरच्या एका बातमीदारानें हा समेट महाकोशल गटाचा विजय होय, अशी बातमी पसरविली. या बातमीदाराचा स्फूर्तिदाता कोण आहे हें नागडें गुपीत आहे. ही गोष्ट लगेच सरदारांच्या नजरेस आणली गेली. हिंदुस्थानच्या सर्व भागांतले वार्ताहर तेथें जमले होते; पण समेटांत महाकोशलचा विजय पहाणारा हा एकटाच वार्ताहर होता. गोष्ट लहानशीच आहे; पण सहानुभवाची वृत्ति लाथाडण्याचें पहिल्यापासूनच कसें ठरले होतें, तें मात्र यावरून स्पष्ट दिसलें.

**सरदारांच्या मनोवृत्तीवर प्रकाश**

खांडेकरांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या या गटाविरुद्ध ठाकूर छेदीलाल प्रभृतींनीं तक्रार केली व सरदारांनीं त्यावद्दल कानउघाडणी केली; पण पक्षांत गट स्थापणें हें जर आक्षेपार्ह, तर मंत्रिमंडळांत गट पडणें हें त्याहूनही वाईट हें मात्र ते विसरले. बहुमताच्या निर्णयामुळें तीन मंत्री जळफळत होते; (व त्यांची त्याबद्दल सर्व श्रेष्ठांकडून कानउघडणीही झाली!) खांडेकरांचा गट हा कांहीं जातीय किंवा प्रादेशिक नव्हता. सर्वच विभागांतले सदस्य त्यांत होते; व त्यांनीं प्रादेशिक धोरणाविरुद्ध निर्णयही दिला होता. या गटाची ही जी अयोग्य कानउघाडणी करण्यांत आली, त्यावरून सरदारांच्या मनोवृत्तीवर व माझ्या सहकाऱ्यांशीं असणाऱ्या त्यांच्या संबंधांवर चांगलाच प्रकाश पडतो. ज्या तीन मंत्र्यांनीं मंत्रीमंडळांत मुद्दाम गट स्थापला, त्यांना मात्र दोष दिला गेला नाहीं; हेंही लक्षांत घेण्यासारखें आहे.

**सरदारांच्या कारस्थानावर विरजण**

समेटानंतर सरदार पटेलांनीं एक पत्रक काढून मंत्रीमंडळावर वशीलेबाजीचा व राज्यकारभार चालविण्याच्या नालायकीचा उघड आरोप केला. तसें करण्याला कारण काय होतें हें कळत नाहीं; पण अंदाज करावयाचा झाला तर, मला राजीनामा देण्यास भाग पाडण्याचा त्यांचा हेतू होता, असा करतां येईल. सरदारांच्या नंतरच्या वर्तनामुळें त्यांच्या पोतडींतील बिल्ली बाहेर पडली व जो नुसता अंदाज होता ती वस्तुस्थिती ठरते. ता. ६ ऑगस्ट रोजीं मुंबईहून काढलेल्या पत्रकांत सरदार म्हणतात, “पार्लमेंटरी कमेटीनें त्यांच्यावर वशीलेबाजी व नालायकीचा जेव्हां आरोप केला तेव्हांही ते (डॉ. खरे) राजीनामा देऊं शकत होते.” म्हणजे त्यांच्या या पत्रकानंतर मी राजीनामा देईल असा संभव त्यांना वाटत होता; व कोणीहि निःपक्षपाती टीकाकारानें त्या पेंचप्रसंगावद्दल सरदारांना दोष दिला असता. पचमढीला सभा भरविण्यांत व तेथें येण्यांत परस्पर पक्षांकडून माझी हकालपट्टी झाली तर पहावी हाच त्यांचा हेतू होता हें यावरून स्पष्टच दिसतें. पण माझ्या महत्त्वाकांक्षी सहकाऱ्यांच्या आशेवर खांडेकर–गटानें जसें विरजण घातलें, तसेंच सरदारांच्याही घातलें.

**चौकशी कधींच झाली नाहीं**

हा जो तडाखा बसला, त्यानीं तें बदनामकारक पत्रक काढलें. वशिलेबाजीचा व नालायकीचा आरोप हा फक्त माझ्यावरच आहे, माझ्या सह-काऱ्यांवर नाहीं, अशी कदाचित् त्यांनीं आपल्या मनांत खूणगांठ बांधून तें पत्रक काढलें असेल. एरवीं, मला पदभ्रष्ट केल्यावर, माझे ते तीन सहकारी कसे लायक ठरतात याचा उलगडाच होत नाहीं. त्यांच्यावरील या आरोपांचें पुढें काय झालें याची कोणीच दखल घेत नाहीं. उलट, सरदार माझ्या ता. १५ च्या पत्रांतील ' पत्रक वस्तुस्थितिदर्शक व निःपक्षपाती ' असल्याच्या विधानाचा गाजावाजा करून, पत्रकांत वशिलेबाजीची पुढें अधिक चौकशी करण्याचें आश्वासन असल्यामुळें मी तसें लिहीलें, हें मात्र ते दृष्टिआड करतात. ही चौकशी पुढें कधींच झाली नाहीं. कारण ' हाय कंमाड'चे सदस्यही वशिले-बाजीच्या आरोपांतून सुटत नव्हते. जरूरच पडली तर, त्यांच्यापैकीं कांहीं जणांकडून आलेलीं मूळ पत्रेंच मी प्रसिद्ध करीन.

**सरदारांचा बागुलबोवा**

सरदार पटेल हे बागुलबोवा समजले जातात. आणि नरिमन-प्रकरणा-पासून तर ते कॉंग्रेसमधें सर्वश्रेष्ठच झाले आहेत. त्यांना दुखविण्याला सर्वजण कचरतात; कारण त्यांच्या लोहमुष्टीचा तडाखा या ना त्या रीतीनें बसण्याची त्यांना भीति वाटते. फैजपूर कॉंग्रेसच्या वेळीं, (शेठ भिकुलाल चांडक यांच्या) असेंब्ली सदस्यत्वाबाबद त्यांच्याशीं माझें स्पष्ट बोलणें झाल्यापासून, त्यांच्या ' काळ्या ' यादींत जाऊन पडण्याचें दुर्भाग्य मला लाभलें आहे.

**पक्षपाती कंट्रोल बोर्डाची पैदास**

असो! मुख्यत: माझ्या मानभंगासाठींच काढलेल्या पत्रकानें समाधान न झाल्यामुळें एका कंट्रोल बोर्डाचा उदय झाला. तीन प्रां. कॉं. कमिट्या या प्रांतांत असल्यामुळें, त्यांच्या कार्यांत एकसूत्रता आणून असेंब्ली-पक्षाचें कार्य सुकर करण्यासाठीं एकप्रकारचा दुवा जोडणारें एकादें मंडळ असावें अशा मताचा मीहि होतों; पण या बोर्डानें—जें उघड उघड महाकोशल पंडितांचें पक्षपाती होतें—स्वत:कडे मंत्रीमंडळाच्या नियंत्रणाचें काम लुबाडलें, हें करण्याला कशाचा

आधार होता, हें मला ठाऊक नाहीं. त्या बोर्डाच्या चळवळींचा एक मासला म्हणून ता. १०-७-३८ च्या 'हितवादां'तला उतारा मीं देतों. या उताऱ्यांत, "हें बोर्ड मुख्य प्रधानाकडून सर्व खातीं काढून घेऊन, मंत्रीमंडळाच्या एकसूत्रीपणाचें-co-ordination-कार्य, मुख्य प्रधानाकडे सोपविण्याची शिफारस करणार असल्याचें समजतें; असें म्हटलें आहे."

या बोर्डाचा उद्देश माझ्या विरूद्ध माझ्या तीन सहकाऱ्यांना बळकटी आणणें हा होता. बोर्डांत श्री. बियाणी, ठा. छेदीलाल व शेठ जमनलाल बजाज हे होते. पहिल्या दोघांनीं पचमढीचें कारस्थान रचण्यांत भाग घेतला होता, ही गोष्ट निर्विवाद आहे. शेठ जमनलालजींबद्दल मी काहींच बोलूं इच्छित नाहीं; पण ते झोन-डिक्टेटर सरदार पटेल यांचें दुसरें प्रतीकच आहेत. माझी अधिक मानखंडना करून, केवळ त्रासून तरी मी राजीनामा द्यावा, यासाठीं हें बोर्ड निर्माण केलें, येवढें म्हटलें म्हणजे पुरें आहे.

### श्री. गोळे यांचा गव्हर्नरपुढें अपमान

ता. १ जुलैनंतर माझ्या सहकाऱ्यांनीं खातें-बदलाचें बोलणें निकडीनें सुरू केलें. त्यापूर्वींही त्यांना सहभावानें कार्य करावयाचें नव्हतें. समेटानंतर सुमारें पंधरवड्यानंतरच श्री. गोळे यांनीं वऱ्हाडांतील २० एकरांपेक्षां कमी जमीन असणाऱ्या व ५० रु. पेक्षां कमी शेतसारा देणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमीनी ता. १ जून नंतर विकल्या जाऊं नयेत, अशी सूचना केली असतां गव्हर्नरच्या समोर त्यांनीं गोळ्यांची टवाळी केली; व मेथा व मिश्रा यांनीं त्यांच्यावर वऱ्हाडच्या पक्षपाताचा आरोप केला. याला वैतागून गोळ्यांनीं हें खातें दुसऱ्याला देण्याबद्दल मला लिहीलें. हें पत्र ता. २०-७ रोजीं मी, समेटभंगाला प्रारंभ त्यांनीं केला हें दाखविण्यासाठीं, सरदारांना दाखविलें; पण त्यांनीं त्याकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. (हें पत्र डॉ. खरे यांनीं पत्रकांत प्रसिद्ध केलें आहे.) या वृत्तीनें आमचें काय चाललें होतें! सरदारांचा त्यांना पाठिंबा असल्याखेरीज ते असें वागत असणें शक्य दिसत नाहीं.

### लोकनायकांनीं काढलेला निष्कर्ष

ता. २० जून रोजीं श्री. रामराव देशमुखांनीं कॉंग्रेसच्या मुख्य कचेरीला

एकंदर परिस्थिती कळविली. ता. २२ रोजीं ते पार्लमेंटरी कमिटीला भेटले; व तीन महाकोशल मंत्र्यांनीं त्यांच्या कानांत भरून ठेवलेल्या चुकीच्या कल्पना काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; पण त्यांत त्यांना फारसें यश आलें नाहीं. शेवटीं त्यांनीं श्री. अणे यांना, कार्य सुकर करण्याचे प्रयत्न करण्यासाठीं नागपुरास बोलाविलें. श्री. अणे यांनीं येऊन तसा प्रयत्न केला, व शेवटीं, अमुक एक खातें अमक्याकडे असावें असा वादाचा मुद्दा नसून, माझी नाचक्की ज्यानें होईल त्याप्रमाणें एकंदर व्यवस्था करावयाची हाच मुख्य डाव होता, असा निष्कर्ष त्यांनीं काढला.

## सर्वांच्या हेतूंवर स्वच्छ प्रकाश

माझीं सर्व खातीं—पोलिस खातें सुद्धां—माझ्याकडून काढून मला नुसता को-आर्डिनेटिंग मंत्री करण्याचा त्यांचा हट्ट हा, मला राजीनामा देणें भाग पाडण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचा आणखी एक पुरावा आहे. कंट्रोल बोर्डाच्या सदस्यांनीं त्यांचा या मागणीचा पाठपुरावा केला. पक्ष-वृत्तपत्रांनीं यांतील घाणेरडा डाव ओळखला; व 'डेली न्यूज' व 'हितवाद' यांनीं देखील नापसंती दर्शविली. ही मागणी कशी अयोग्य होती, व केवळ माझी नामुष्की करण्यासाठींच हा हट्ट कसा होता हें खुद्द शुक्लांच्या आतांच्या वर्तनावरूनच स्पष्ट होतें. स्वतः मुख्य प्रधान होताच त्यांनीं नुसता को-आर्डिनेटिंग मिनिस्टर राहण्याचें नाकारून, पोलिस व इतर खातीं स्वतःकडे ठेविलीं आहेत. शुक्ला, त्यांचें दोन सहकारी व कंट्रोल बोर्डांतील त्रिमूर्ति या सर्वांच्या हेतूवर यामुळें स्वच्छ प्रकाश पडला आहे. खातेंबदल करून सर्वांची फेरवांटणी करण्याची तयारी जेव्हां मी पचमढीला दर्शविली तेव्हां, ज्यानें माझी मुख्य प्रधान या नात्यानें नालस्ती होईल असें कांहींही करणार नाहीं हें स्पष्ट केलें होतें, हें विसरतां कामा नये. पण माझ्या तीन सहकाऱ्यांनीं माझी मानखंडना करण्याचें कंकणच बांधलें होतें; व त्यांनीं जनता व वृत्तपत्रें यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केलें व त्यामुळें कांहीं काळ तात्पुरता पेंचप्रसंगच निर्माण झाला.

## देशमुख-गोळयांनीं वैतागून राजीनामे दिले

माझे हे तीन सहकारी समेट मोडण्याच्या हट्टास पेटले आहेत हें

ओळखून व एकंदर परिस्थितीला कंटाळून ता. १३ जुलै रोजीं श्री. रामराव देशमुख यांनीं राजीनामा दिला. ता. १० जूनच्या अपमानाचें शल्य गोळ्यांनाही बोंचतच होतें; त्यांनींही राजीनामा दिला. (हे राजीनामेही पत्रकांत दिले आहेत) मी त्यांना राजीनामा परत घेण्यास व एकंदर जम नीट बसविण्याची मला संधी देण्यास विनंति केली. तेव्हां त्यांनीं सर्व माझ्यावरच सोपविलें व मी, त्यांचा राजीनाम्याचा आग्रह नाहीं असें धरून चाललों. आणि म्हणूनच ता. १५ ला सरदार पटेल यांना लिहिलेल्या पत्रांत त्यांचा उल्लेख केला नाहीं.

**पटेलांची परस्पर चौकशी**

पण, जातां जातां एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर दिसतें. श्री. रामराव देशमुखांच्या राजीनाम्याबद्दल सरदार पटेलांनीं फोनवर मेहतांकडे चौकशी केली; मला किंवा खुद्द देशमुखांना विचारलें नाहीं. सरदारांनीं मुख्य प्रधानाकडे विचारणा कां करूं नये हें कोडेंच आहे; पण त्या मानहानिकारक मागणीला सरदारांचा आशीर्वाद होता असें जर मानलें, तर तें कोडें राहत नाहीं. अर्थातच, मुख्य प्रधानाला न जुमानतां दुसऱ्या एका मंत्र्याशीं कां बोलणें करावें, हें सरदारांना कोणीच विचारूं शकत नाहीं!

**शुक्लांनीं बंडाचें निशाण फडकावलें**

ता. १३ जुलैनंतर मंत्रीमंडळ मोडलें असें धरूनच श्री. शुक्ला चालले असें दिसतें. श्री. मेहता व सरदार यांचें ता. १६ किंवा १७ ला फोनवर संभाषण झालें, व नंतर शुक्ला रायपूरला गेले. छत्तीसगड कॉलेजचें उद्‌घाटन ही त्यांना उघडच सबब होती; पण स्वतःच्या मुख्य प्रधानकीसाठीं पाठिंबा मिळविणें हाही त्यांचा दुसरा हेतू होता. आदल्या दिवशीं मेहता-सरदारांच्या संभाषणामुळें या दुसऱ्या हेतूला बळकटी आली कीं काय न कळे; पण जेव्हां ता. १७ रोजीं शुक्ला ठाकूर प्यारेलालसिंगांना भेटले, तेव्हां त्यांनीं ठाकूरसाहेबांना सांगितलें कीं, डॉ. खरे प्रधानपदाचा नक्की राजीनामा देणार, तेव्हां तुम्ही मला प्रधानपदासाठीं पाठींबा द्यावा. मी राजीनामा देणार व स्वतःसाठीं मतें मागण्याची वेळ आली आहे असें त्यांना एवढ्या ठामपणें कसें वाटलें नकळे!

मेहतांच्या मार्फत सरदारांचे त्यांना आश्वासन मिळालें होतें काय? हा प्रश्न साहजिकच उभा राहतो.

**शुक्लांच्या कारस्थाला पायबंद**

श्री. शुक्ला ता. १९ पर्यंत रायपूरला राहणार असल्यामुळें कांहीं तरी कपट असावें असा मला संशय आला; व एकंदर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठीं मी एका जबाबदार इसमाला पाठविलें. शुक्ला व ठाकूर प्यारेलालजी यांची मुलाखत झाल्यावर हे गृहस्थ ठाकूर प्यारेलाल यांना भेटले; व जरूर पडल्यास माझ्या मंत्रीमंडळांत येण्याला ते तयार आहेत काय, याची चौकशी त्यांनीं केली आणि होकार घेऊन परत आले. त्यानंतर ता. १९ रोजीं ठाकूर प्यारेलालसिंग यांचें पत्र आलें. त्यांनीं "तुमचा अपमान किंवा मानहानि ज्यानें होईल असें कांहींही होणार नाहीं हें मी पाहीन. तशीच जरूरी पडली तर मी तुमच्या मंत्रीमंडळांत सामील होईन" असें मला कळविलें. या-पत्रावरून निश्चित असें कांहीं ठरलें नसून, जरूरच पडली तर ठाकूर प्यारेलाल यांना विचारलें होतें हें दिसून येईल.

**पटेलांचा दाबादाबीचा प्रयत्न**

पार्लमेंटरी कमिटीनें त्यांना जेव्हां विचारलें तेव्हां त्यांनीं (ठा. प्यारेलालला) हीच हकीगत सांगितली. तरी पार्लमेंटरी कमिटीनें मात्र आपल्या पत्रकांत ठा. प्यारेलाल व शुक्ल यांच्या ता. १७ जुलैच्या—माझ्या दूताशीं बोलणें होण्यापूर्वी झालेल्या भाषणाचा उल्लेख गाळला आहे. कमिटीच्या पत्रकांतील माझ्यावरील गर्भित आरोप या दडपलेल्या हकीगतीनें धुऊन निघत नाहीं, किंवा पत्रकांतील माहितींत यामुळें भर पडत नाहीं असें म्हणण्याची सरदारांची छाती आहे काय? मी जोंवर मुख्य प्रधान होतो व प्रधानकीचा राजीनामा दिलेला नव्हता तोंवर स्वतःच्या प्रधानकीसाठीं मतें गोळा करणें हें शुक्लांचें वर्तन रास्त होतें काय? त्यांनीं हें 'हाय-कमांडशीं अगोदर ठरवून केलें कीं, वर्किंग कमिटी पुन्हां पक्षाची सभा बोलावील असा आपला त्यांनीं सहजतर्क बांधला? शुक्लांनीं जर मतयाचनेस प्रारंभ केला नसता तर माझ्या त्या दूताला ठा. प्यारेलाल यांना मंत्रीपद देऊं करण्याचें कारणच नव्हतें. पण, जोंवर सरदार पटेलांच्या हातांत

काँग्रेससूत्रें आहेत तोंवर हे तीन मंत्री निर्भयपणें वाटेल तो धिंगाणा घालूं शकतात! पार्लमेंटरी कमिटी म्हणते त्याप्रमाणें ठा. प्यारेलाल यांचें पत्र ता. १८ चें नसून १९ जुलैचें आहे.

**जगावें कीं मरावें?—हा प्रश्न**

शुक्लांचा प्रचार जोरांत सुरू झाला आहे व मुख्य प्रधानाशीं त्यांचा एक सहकारी बेइमानीनें वागत आहे याचा स्पष्ट पुरावा मिळाल्यावर, आतां वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं; बेइमान सहकाऱ्यांना शासन केलेंच पाहिजे, याची मला जाणीव झाली. शिवाय, माझ्या निर्धाराला सबलता येण्याचें आणखीहि एक कारण होतें. मौ. आझाद यांचें, बहुधा ता. १६ जुलैला मला पत्र आलें होतें. त्यावर ता. १४ जुलै ही आहे. (हें पत्र ता. २४ ऑगष्ट-च्या 'महाराष्ट्रां' त पृ. ५ वर दिलें आहे.) त्यांतील उतारा देऊन डॉ. खरे लिहितात—मध्यप्रांत काँग्रेसेतर प्रांत जाहीर करण्याची यांत स्पष्ट सूचनाच होती. अशी घोषणा व्हावी असे महाकोशल मंत्र्यांचे प्रयत्न चालू होते कीं काय हें मला माहीत नाहीं; पण मौ. आझादचें पत्र मिळाल्यावर ता. १७ पासून मला मात्र प्रांत काँग्रेसेतर म्हणून पुकारला जाण्याच्या भीतीनें खूपच पछाडलें. मला महात्मा गांधी व डॉ. राव यांच्या पत्रव्यवहाराची आठवण झाली; महाकोशल मंत्र्यांच्या कारवाया, प्रांताला कड्याच्या टोंकावर नेत असून तेथून जर प्रांत गलंडला तर तो काँग्रेसेतर मुलुखांतच जाऊन पडेल, हें मला उमगलें. त्यामुळें माझ्या मनांत वादळ उठलें व हॅम्लेट प्रमाणेंच माझ्याहीपुढें 'जगावें कीं मरावें' हा प्रश्न उभा राहिला. प्रांताला काँग्रेसेतरांच्या पंक्तीला जाऊं द्यावें कीं विरुद्ध पक्षावर शस्त्र चालवून त्याचा शेवट करावा असा मला प्रश्न पडला; व मी दुसरा मार्ग स्वीकारण्याचें ठरविलें. काँग्रेसचें (या प्रांतांतील) सरकारांतील स्थान राखावयाचें मी ठरविलें. निवडणुकींत मोठा विजय मिळविल्यावर, जन्मभर केलेले श्रम अशा प्रकारें मातींत मिळूं देण्याची कल्पनाही मला असह्य झाली.

तत्कालीन परिस्थितींत मी जर वर्किंग कमिटीपुढें हजर झालों तर प्रांत काँग्रेसेतर जाहीर होण्याची धमकी मौ. आझाद यांच्या पत्रांत तर

होतीच; पण, जर विद्यमान मंत्रीमंडळ माझ्या दृष्टीनें कार्यक्षम नसेल, तर तें सुधारण्याचाहि माझा हक्क त्यांत मान्य केला आहे—किंबहुना तसा जवळ जवळ आदेशच दिला आहे; व त्याप्रमाणें मला माहीत असलेल्या वैध मार्गानें ती सूचना अमलांत आणण्याच्या मार्गास मी लागलों.

### मिश्रांच्या पत्रांतील घाण

ता. १८ रोजीं मी राजिनामा देण्याचा माझा संकल्प कळविणारीं व राजीनामे देण्याची मागणी करणारीं पत्रें सर्व सहकाऱ्यांना धाडलीं. त्याच्या आदल्याच दिवशीं— जेव्हां श्री. मेहता मला भेटून लाघवी भाषण करून गेले त्यावेळीं-त्यांचे मुख्य सहकारी पं. शुक्ला माझ्याविरूद्ध प्रचार करीत होते.

ता. १९ रोजीं मेहतांचें मला उत्तर आलें. (त्यांत बरींच चुकीचीं विधानें होतीं.) ते लिहितात, "यानंतरहि जर तुम्ही हट्टानें गव्हर्नरकडे राजीनामा द्याल व मला द्यायला सांगाल तर मला खेदानें विरोध करावा लागेल." रायपुराहून परत आल्यावर शुक्लानेंही त्याचसारखें उत्तर दिलें. ता. १९ जुलैच्या तारखेचें एक लांबलचक पत्र पं. मिश्रांनींहि मला धाडलें. त्या पत्रांतील घाण मी उपसूं इच्छित नाहीं; फक्त शेवटचें त्यांचें वाक्य देतों. तें असें आहे—"आतां परिस्थिती बदलली आहे हें तुम्हांला समजलें पाहिजे; आणि आम्ही, तुम्हाला वर्किंग कमिटी किंवा पार्लमेंटरी कमिटी यांच्यापासून शक्यतोंवर पळून जाऊं देणार नाहीं." वर्किंग कमिटी आणि पार्लमेंटरी कमिटी यांचा निर्णय हमखास आपल्याच बाजूनें होणार, याचा केवढा हा विश्वास!! खरोखरच परिस्थिति बदलली होती; व मागाहूनच्या घटनांनीं निदर्शनास आणल्याप्रमाणें ती यांना अनुकूल अशी झाली होती.

### नीचपणाचा आरोप

राजीनामा देऊन बेइमान सहकाऱ्यांना गचांडी द्यावयाची आणि एक दिलाचें व एक विचाराचें नवें मंत्रिमंडळ बनवावयाचें असा अखेर मी ता. १८ ला निश्चय केला. या सर्व प्रकरणांत, मी देशाचा घात केला ही जी माझ्या तीन सहकाऱ्यांनीं व सरदार पटेलांनीं खोडसाळ ओरड केली, तिला गांधीजी बळी पडले, याचेंच फक्त मला वाईट वाटतें. सुदैवानें वर्किंग कमिटी तसें स्पष्ट किंवा

अस्पष्टपणें म्हणत नाहीं. देव आणि देश यांना स्मरून मी जाहीर करतों कीं, हा आरोप खोटा व नीचपणाचा आहे. हा जो पुकारा केला त्याचा हेतु हाच कीं, माझें म्हणणेंही लोकांनीं ऐकून घेऊं नये,. इतकी माझी जनता व देश यांना चीड यावी. पण ईश्वर हा सर्वशक्तीमान आहे. देशानें आपला तोल सोडला नाहीं; व बहुतेक एकमतानें, त्यानें मला अन्याय झाला असल्याची आपली जाणीव व्यक्त केली.

**मसुदा ९६ टक्के महात्म्याच्या हातचा**

श्री. देशमुख व गोळे यांनीं ता. १९ ला राजीनामे दिल्यावर माझा राजीनामा व त्यांचे राजीनामे मी गव्हर्नरला ता. २० ला दिले. त्यानंतर मी सरदारांना हें तारेनें कळविलें. त्याला त्यांचें दुसऱ्या दिवशीं असें उत्तर आलें— "आज आल्यावर काल रात्रीची तुमची तार, तुम्ही राजीनामा दिल्याबद्दलची, मिळाली. त्यामुळें बराच खेद व आश्चर्यही, विशेषत: पूर्वसूचनेशिवाय व वर्किंग कमिटीची सभा जवळ आली असतां तुम्ही राजीनामा दिलांत, याचें वाटलें."

**सरदारांवर विश्वास टाकणें अशक्य झालें**

एकंदर परिस्थितीचें स्वरूपच इतकें घृणास्पद होतें कीं, माझ्या तीन कारस्थानी सहकाऱ्यांपेक्षां सरदारांवर मी अधिक विश्वास टाकूं शकत नव्हतों असें जर मी म्हटलें तर त्याचें कोणालाच आश्चर्य वाटणार नाहीं. आणि यानंतर ज्या घटना झाल्या त्यांतही हा समज बदलावा असें कांहीं नाहीं. सरदारांना धाडली, तशीच तार मी सुभाषबाबूंनाही पाठविली; पण त्यांनीं उत्तर देण्याचीही पर्वा बाळगिली नाहीं. ता. १५ चें सरदारांना घातलेलें पत्र मी शक्य तेवढें नम्रतापूर्वक लिहिलेलें होतें; पण उत्तरादाखल त्यांनीं एक ओळही धाडली नाहीं. यापूर्वीं एकदोनदां मी गांधींजींकडेही सल्ल्यासाठी गेलों होतों. त्यांनींही पचमढीच्या सभेटापूर्वीं जरी मला एक दोनदां (एकदा तर अनाहूत-पणेंही) सल्ला दिला होता तरी—मंत्र्यांच्या या भांडणांत सल्ला देण्याचें त्यांनीं नाकारलें तेव्हां मला माझ्या बुद्धीप्रमाणें वागणें भाग पडलें; व मी माझे जे हक्क होते त्याप्रमाणें वागलों. तुटक गोष्टी घेऊन किंवा त्या जशा घडल्या

त्यापेक्षां निराळ्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहून माझ्या वर्तनाबद्दल जनतेनें निकाल देऊं नये, एवढीच माझी इच्छा आहे.

**राजेंद्रांनीं तयार केलेला मसुदा**

यानंतर डॉ. खरे यांनीं आपल्या पत्रकांत नवीन मंत्रीमंडळ बनविल्यापासून तों त्या मंत्रीमंडळाचा राजीनामा देईपर्यंतची हकीगत बॅ. रामराव देशमुख यांनीं त्या प्रसंगाचें जें वर्णन केलें आहे त्यासुद्धां सविस्तर दिली आहे. सरदार पटेल यांनीं पार्लमेंटरी कमिटीच्या पत्रकांत राजीनाम्याचा मसुदा ठा. प्यारेलालसिंग यांनीं केला असें जें म्हटलें आहे तें खरें नसून तो मसुदा, आपल्या आठवणीप्रमाणें सरदारांनीं तोंडानें सांगितला व बाबू राजेंद्रांनीं लिहिला असें सांगून डॉ. खरे यांनीं आपल्या पत्रकांत राजेंद्रांच्या हस्ताक्षरांतील राजीनाम्याच्या या मसुद्याचें छायाचित्र दिलें आहे. त्याचप्रमाणें ठा. प्यारेलालसिंग यांना ता. २२ रोजीं सरदारांचें जें पत्र वाचून दाखविलें तें पत्र म्युनिसिपल निवडणुकीसंबंधीं नसून मंत्रीमंडळ, त्याचा पुढारी व कॉंग्रेस कमिट्या यांच्या परस्पर संबंधासंबंधीं श्री. म. गं. दातार यांना त्यांनीं ता. २१ मे, ३८ रोजीं (सरदारांचा पत्रावरील Ref. No. 154 आहे) घातलेलें आहे. (हें पत्र पूर्वी महाराष्ट्रांत आलेच आहे.) हेंही तें पत्र छापूनच, डॉ. खरे यांनीं सिद्ध केलें आहे. या बाबतींतही पार्लमेंटरी कमिटीच्या पत्रकांत कसा खोडसाळपणा व जनतेला फसविण्याचा प्रयत्न आहे तें त्यांनीं दाखवून दिलें आहे. हा राजीनामा लिहून घेतांना मौ. आझाद यांनीं थापा देऊन आपली फसवणूकच केली, आणि डॉ. खरे यांचें या अवडंबराला बळी न पडण्याचें धोरणच बरोबर होतें, असेंच बॅ. रामराव यांनीं आपल्या वृत्तांतांत कबूल केलें आहे.

**'मृत्युपत्र' बनविण्यापूर्वीचा बनाव**

डॉ. खरे आपल्या पत्रकांत पुढें लिहितात—

"ता. २३ ला मला पुन्हां वर्ध्याला बोलाविलें. मी पुढारीपणाचा राजीनामा द्यावा असें हायकमांडचें म्हणणें होतें. निवडणुकीला पुन्हां उभें राहण्याचा माझा हक्क जर कायम राहत असेल तर मी त्याला तयार आहे असें सांगितलें. त्यावेळीं त्याला हरकत घेतली गेली नाहीं. ता. २४ रोजीं मी नागपुरला परत आलों व ता. २५ ला मला पुन्हां बोलावण्यांत आलें. शेठ जमनलाल यांच्या

घरीं श्री. भुलाभाई देसाई, सुभाषबाबू, मौ. आझाद, सरदार, जमनलालजी वगैरे लोकांना भेटलों. मी पुढारीपदाला उभे राहण्याचा आग्रह धरूं नये असें ते म्हणाले. मी त्यांना सांगितलें कीं, पक्षापुढें सर्व परिस्थिति मांडून त्याचा कौल घेणें हें माझें कर्तव्य आहे. त्यांनीं मला यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला व महात्मा गांधींना—मी वर्ध्यास पोंचण्यापूर्वी नुकतेच ते शेगांवाला निघून गेले होते—जाऊन भेटावयास सांगूं लागले. हायकमांडच्या या बदललेल्या धोरणाला मी कंटाळलों व गांधींना भेटण्यांत कांहीं अर्थ नाहीं, मी फेर निवडणुकीस उभा राहूं नये असें तुम्हांला वाटत असेल, तर मला तसा लेखी हुकूम द्या असें खोंचक उत्तर दिलें. त्यांनीं मला पुन्हां आळविलें व मोटारींत टाकून शेगांवला नेलें.

**घाणेरड्या आरोपांची परंपरा**

"गांधीजींपुढें मला नेल्यावर, सुभाषबाबूंनीं आपल्या पत्रकांत म्हटल्याप्रमाणें, त्यांनीं आपले भाव व्यक्त करण्यास सुरवात केली. गव्हर्नरबरोबर कट करून मी देशाचा घात केला, परकीयांना मी माझा देश विकला, मी अविश्वासू व बेभरवंशी आहे, असें ते मला म्हणाले. हे सर्व आरोप मी नाकारले तेव्हां त्यांनीं देशाच्या व माझ्या स्वतःच्या हितार्थ स्पष्ट कबूली देण्याचा मला उपदेश केला. प्रधानपदाचा राजीनामा देऊन नवीन मंत्रीमंडळ बनविण्याची घाई करण्यांत मी जो निर्णयप्रमाद केला त्याबाबत कोणतीही कबुली लिहून देण्यास तयार असल्याचें मी अगोदरच त्यांना सांगितलें. अशी कबुली देण्यापुरता तुम्ही म्हणाल त्याप्रमाणें वागण्यास तयार आहे असें मी त्यांना सांगितलें. त्यांनीं मला मसुदा तयार करण्यास सांगितलें; तेव्हां मला मसुदे चांगले तयार करतां येत नाहींत, तुम्हीच तो करा असें मी त्यांना म्हटलें." तेव्हां ते म्हणाले, "तुम्ही प्रयत्न तर करा, मी मागाहून पाहीन." यावेळीं सरदार पटेल व इतर मंडळीही, पत्रकांत जी भाषा समाविष्ट व्हावी अशी त्यांची इच्छा होती, ती भाषा वापरून मला उद्देशून बोलत होती. मी एक मसुदा खरडला व त्यानंतर गांधीजींनीं दुरुस्त्या करून त्यांत भर घातली. भर घातल्यानंतरचा मसुदा पुढें दिला आहे.

## महात्माजींनीं तयार केलेला मसुदा

वर्किंग कमिटी भरण्याच्या सुमाराला गव्हर्नरला आपला राजीनामा सादर करण्यांत माझ्या हातून झालेला निर्णयप्रमाद मी अगोदर मान्य केला आहे. (शिस्तभंगाचा दोष माझ्या हातून घडला हें मला कबूल आहे. जुना काँग्रेसमन या नात्यानें शिस्तीची किंमत मला कळावयास हवी होती.) आपल्या कायदेशीर अधिकारांत गव्हर्नर-कडून काँग्रेस-दिवाणांची वडतर्फी होण्यांत माझ्या हातून जी चूक झाली त्याचें महत्व मला उमगलें आहे. तोल गेल्यामुळें जें कांहीं घडलें, त्याबद्दल मला मन:पूर्वक वाईट वाटतें. (मी माझ्या वर्तनानें ज्या काँग्रेसच्या कार्याला संकटांत पाडलें तिच्यांतील विश्वासाच्या सर्व जागा) सोडून देणें हें मी माझें कर्तव्य समजतों. (मला जर सामान्य सैनिक म्हणून राहूं दिलें तर तसें राहण्यांत मी समाधान मानीन. (माझ्या वर्तनामुळें काँग्रेसची इभ्रत गेली आहे ती परत मिळविण्यासाठीं मी माझें स्वत्त्व व सर्वस्व वेंचीन. मला उमेद आहे कीं, एकजिनसी व मजबूत असें मंत्रीमंडळ स्थापण्याच्या वर्किंग कमिटीच्या प्रयत्नाला सर्व काँग्रेसवाले हातभार लावतील. प्रांतांत महाकोशल व महाराष्ट्र असे दोन तट पडत असल्याच्या अफवा उठत आहेत. मला उमेद आहे कीं, समजूतदारपणा प्रभावी ठरून महाराष्ट्र आणि महाकोशल अशा बुद्धीनें आपण विचार करणार नाहीं. दलबंदी किंवा फाटाफूट न होईल अशाबद्दल मी प्रयत्न करीन.)

पार्लमेंटरी कमिटी आणि महात्माजी यांनीं मी हा मसुदा माझ्या मतानें तयार केला असें जें सूचीत केलें आहे, तें चुकीचें आहे. गांधीजींच्या पत्रकांत मी आपणहोऊन त्यांना शेगांवला जाऊन भेटलों असें ध्वनित केलें आहे. मी असें ठांसून सांगतों कीं, मला शेगांवला नेण्यांत आलें, आणि पार्लमेंटरी कमिटीच्या पत्रकांनींही माझें हें म्हणणेंच सिद्ध होतें. महात्मा आणि पार्लमेंटरी कमिटी दोघेही

आपल्या पत्रकांत सूचित करतात कीं, मसुदा मी आपखुशीनें तयार केला आहे व गांधीजींनीं त्यांत कांहीं दुरुस्त्या करून भर घातली.

**पत्रकाचें भयंकर आत्मघातकी स्वरूप**

या विधानाचा आपण थोड्या बारकाईनें विचार करूं. मसुद्याच्या दोन पाव तुकड्यांतला एक सबंध पाव तुकडा गांधीजींच्या हातचा असून त्यांत अत्यंत अपमानास्पद अशा कबुल्या आहेत. "(१) शिस्तभंगाचा गुन्हा मी केला हें मला कबूल आहे. जुना कॉंग्रेसमन या नात्यानें मला शिस्तीची किंमत कळावयास हवी होती." याचा अर्थ असा कीं, शिस्तीचा गुन्हा माझ्या हातून झाला ही, मी माझ्या हातानें न दिलेली कबुली तर घ्यावयाचीच; पण हे शिस्तबाह्य वर्तन मी जाणून बुजून व मुद्दाम केलें अशीही कबुली घ्यावयाची. (२) मी असें खरडल होतें कीं "माझा गेलेला तोल परत येईपर्यंत मी कॉंग्रेसच्या हितार्थ हल्लींच्या जबाबदारींतून मुक्त व्हावें असें मला वाटतें." हें खोडून टाकून महात्म्यानें "माझ्या वर्तनानें ज्या कॉंग्रेसच्या कार्याला मी संकटांत पाडलें तिच्यांतील साऱ्या जागा (मी सोडून द्याव्या असें मला वाटतें). मला जरी साधा सैनिक राहूं दिलें तरी मी त्यांत समाधान मानीन," असें लिहिलें. याचा स्पष्ट अर्थ असा कीं, मी मुख्य प्रधान म्हणून राहण्याला नालायक आहे असें म्हणावयाचें. याच्या बुडाशीं मी माझ्या वर्तनानें कॉंग्रेसचा विश्वासघात केला ही कल्पना आहे. (३) "माझ्या वर्तनानें गेलेली कॉंग्रेसची इभ्रत परत प्रस्थापिण्याचा मी माझ्याकडून शक्य तेवढा प्रयत्न करीन." म्हणजे माझ्या वर्तनानें कॉंग्रेसची इभ्रत गेली अशी कबुली मला द्यावयाची होती. (४) "मजबूत एक जिनसी मंत्रीमंडळ स्थापण्याच्या वर्किंग कमिटीच्या प्रयत्नाला सर्व कॉंग्रेसवाले हातभार लावतील." याचा अर्थ असा कीं, वर्किंग कमिटीनें मला कसलाच अन्याय केलेला नाहीं, अशी मी कबुली द्यावयाची, व तिनें दिलेला निर्णय हा सर्वस्वी न्याय्य व प्रमादातीत आहे, असें जगानें मानावें. (५) "प्रांतांत महाराष्ट्र आणि महाकोशल असे तट पडल्याची अफवा आहे......दलबंदी आणि फाटाफूट ही न होऊं देण्याचा मी माझ्या हातून सर्व तो प्रयत्न करीन." यांत फाटाफुटीचें कारण मी असल्याचा गर्भित आरोप असून ती मी बंद केली पाहिजे असें ध्वनित केलें आहे.

**६६ टक्के मसुदा महात्म्याचा**

या कबुल्या देण्यांत कसलीच कां नामुष्की नाहीं? मी या ज्या गोष्टींना कबुल्या द्याव्या अशी अपेक्षा होती त्यांतली एकही गोष्ट नाहीं. माझ्या विरुद्ध कसलीच चौकशी झाली नाहीं आणि माझ्यावर केलेले आरोप खोडून काढण्याला मला संधी दिल्यानंतर कोणताही निर्णय दिला गेलेला नाहीं. आणि तरीही मी हा कबुलीजबाब द्यावा अशी अपेक्षा! पत्रकांतील शेंकडा ६६ टक्के भाग गांधीजींच्या स्वाक्षरींतला असून त्यांतील अत्यंत बदनामकारक कबुल्याही त्याच्यांतच आहे. आणि असें असूनही तयार केलेल्या मसुद्यावर माझी सही मागण्यांत आली, ही गोष्ट निराधार आहे, असें त्यांचें म्हणणें! मसुद्यांतील गांधींनीं केलेल्या सुधारणा व घातलेली भर ही काढून टाका व मग त्यांत काय उरतें तें पहा! मी पूर्वींच कबूल केलेल्या निर्णय-प्रमादाच्या कक्षेबाहेर कांहींही त्यांत उरत नाहीं, हें दिसून येईल.

**माझ्या मनाचें लिखाण नव्हे**

आणि माझ्या हातचा जो मसुदा आहे तो तपासला तरीही तें माझ्या मनाचें लिखाण नाहीं हें दिसून येईल. "आणि मला असें वाटतें कीं, तोल गेल्यामुळें माझें असें कर्तव्य आहे कीं," हें वाक्य अपुरेंच आहे. "आणि मला असें वाटतें कीं, त्याग करणें हें माझें कर्तव्य आहे" इत्यादि शब्द हे दुबार आले आहेत. हा गोंधळ कशामुळें झाला? माझ्या भोंवतालीं बसलेले लोक, ज्याला जें वाटेल तें मला उद्देशून बोलत होते, आणि मी जेव्हां विचार करण्यास थांबलों तेव्हां त्यांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्दच मी लिहीले. मसुद्यांतच इतका भरपूर अंतर्गत पुरावा आहे कीं, कोणाही पूर्वग्रहदूषित माणसाला मी लिहीलें तें मी माझ्या मनचें लिहिलें नाहीं याची खात्री पटूं शकेल. याचा एक निर्णायक पुरावाही आहे. माझ्या मनाचा "तोल गेला असून तो परत येईपर्यंत मी मुख्य प्रधान होण्यास नालायक आहे." अशी कबुली देण्याच्या भराला मी जाईल काय?

मसुद्याची कहाणी ही अशी आहे. ज्याचा उघड परिणाम माझें राजकीय अस्तित्व नष्ट होण्यांत, मी देशद्रोही आहे अशी निर्भत्सना होण्यांत

व मी वेडा मनुष्य आहे अशी स्वतःच कबुली देण्यांत होणार होतें. अशा या रात्रीच्या अंधारांत तयार केलेल्या मसुद्यावर मी सही करावी अशी, माझ्यावर वजन असणाऱ्या हिंदुस्थानांतील कांहीं थोर विभूतींची अपेक्षा होती. खुनाच्या कबुलीपेक्षांही ही कबुली अत्यंत वाईट होती. इतिहासाच्या न्यायासनासमोर नीतितत्त्वांचा खून करणारा म्हणून (moral assassin) व भावी पिढीसमोर एक देशघातकी म्हणून माझी धिंड काढण्यांत यावयाची होती.

### राष्ट्राध्यक्षांनीं दाखविलेलें आमिष

मी स्वतःच्या मृत्युपत्रावर सही करण्याचें नाकारल्यामुळें माझ्या सल्लागारांनीं मला वर्ध्याला परत आणलें. तो मध्यरात्रीचा सुमार होता व मला शेठ जमनलालजींच्या अतिथि-निवासाच्या एका खोलींत पडून रहावें लागलें. अशा त्या घातवेळीं श्री. सुभाष बोस हे माझ्याकडे आले. मी त्यावेळीं एकाकी होतों. महात्माजींचा उपदेश मान्य करून मसुद्यावर सही करा अशी ते माझी आळवणी करूं लागले. (आपल्या पत्रकांत सुभाषबाबूंनीं हा जो वृत्तांत दिला आहे तो उध्दृत करून डॉक्टरसाहेब पुढें लिहितात.) या वृत्तांतांत मी थोडीशी भर घालतों. त्यांनीं मला असें आमिष दाखविलें कीं, "मला मध्यप्रांत-वऱ्हाड पुरता एक प्रकारचा डिक्टेटर केलें जाईल. आणि महात्मा व वर्किंग कमिटी हे, नवीन मंत्रीमंडळाच्या वाटणीसुद्धां सर्व बाबतींत माझा सल्ला घेत जातील आणि ही गोष्ट तर तुम्हांला बहुमानास्पद अशीच आहे." मी त्यांच्या लगेच असें लक्षांत आणून दिलें कीं, काँग्रेस हायकमांडच्या परवानगीशिवाय साधा शिपायीही राहण्यास मी नालायक आहे; तर मी डिक्टेटर होण्याची आशा तरी कशी धरावी? त्यांच्या आळवणीचा माझ्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं.

### पुढील हकीगत

सुभाषबाबूही आपल्या पत्रकांत म्हणतात कीं, 'गांधीजींनीं पत्रकांत जी कांहीं थोडी भर घालून फिरवाफिरव केली, त्यामुळें डॉक्टरांनीं लिहिलेल्या मजकुरांत महत्वाचा फेरफार झाला नाहीं; फक्त त्यांत जें अध्याहृत होतें, तें त्यांनीं स्पष्ट केलें. आपल्या छातीवर हात ठेऊन कोणी तरी असें विधान करील

काय ? मी वर स्पष्टच केलें आहे कीं, माझी कबुली, घाईनें वागण्यांत जो निर्णयप्रमाद झाला असेल त्याच्या कक्षेबाहेर नाहीं. मी शिस्तभंग केला किंवा काँग्रेसशीं वेइमानी करून तिची इभ्रत कमी केली, अशी कबुली त्यांत कधींच नव्हती.

या पत्रकांचा विचार करून सही करण्यासाठीं म. गांधी व इतर सदस्य यांनीं मला दुसरे दिवशीं तीन वाजेपर्यंत मुदत दिली. नागपुरास आल्यावर मी माझ्या मित्रांचा व हितचिंतकांचा सल्ला घेऊन, या खोट्या कबुल्या द्यावयाच्या नाहींत, असें ठरविलें; व तसें उत्तर पाठविलें. तें त्यांना सायंकाळीं मिळालें. (हें पत्र ता. २७ च्या जुलैच्या महाराष्ट्रांत पृ. ५, कॉ. ५ वर दिलें आहे.)

**काँग्रेसमधील 'जनरल डायर'**

ता. २६ रोजीं सायंकाळीं वर्किंग कमिटीची सभा होऊन तिनें माझी निर्भर्त्सना करणारा व माझ्या माजी सहकाऱ्यांची स्तुति करून मला काँग्रेस-मध्यें कोणत्याही विश्वासाच्या व जबाबदारीच्या जागेवर निवडून येण्यास बंदी करणारा ठराव केला. माझ्या विरुद्ध जें काम करणें शक्य होतें तें सर्व वर्किंग कमिटीनें केलें. दुसऱ्याच दिवशीं वर्ध्यासच काँग्रेस असेंब्ली पक्षाची सभा भरणार आहे हें ठाऊक असूनही, त्यांना तिचा निर्णय होईपर्यंत दम धरवला नाहीं. श्री. दातार यांना वल्लभभाईनीं लिहिलेल्या पत्रांत (हें पत्र ता. १५ जूनच्या महाराष्ट्रांच्या अग्रलेखांत उद्धृत केलें आहे) मंत्रीमंडळाचा प्रश्न हा सर्वस्वीं त्या पक्षाच्या विश्वासाचा आहे हें व्यक्त केलेलें तत्वज्ञान हवेंतच जिरलें. याच्या उलट तेथें लष्करी कायदा आला व 'मारण्यासाठीं गोळ्या झाडा' अशी जनरल डायरची नक्कल करण्याची कामगिरी काँग्रेस–सरदारांवर आली.

**वर्किंग कमिटीची 'असभ्य घाई'**

मंत्रीमंडळाची पुनर्घटना केल्यावर हें सर्व प्रकरण पक्षापुढें मांडण्याचें माझें मानस होतें; व तेथें जर बहुमत माझ्या सहकाऱ्यांना मिळतें, तर ते मला हांकलून देऊं शकत होते. पक्षाला तोंड देण्याला मी घाबरत होतों असें सूचित

करण्यांत येत आहे. पण ता. २१ रोजीं सरदार पटेल व राष्ट्रसभाअध्यक्ष यांना मी जी तार केली तींत हें सर्व प्रकरण पक्षापुढें ठेवीन असें स्पष्ट कळविलें आहे. पण वर्किंग कमिटीनें मला ही संधी नाकारली व अधिकारग्रहणापासून दोन दिवसांच्या आंतच मला राजीनामा द्यावयास लावला. त्यांची, यांत घाणेरडी किंवा असभ्य घाई होत आहे कीं नाहीं याचा विचार करण्याइतकाही त्यांना दम नव्हता. वर्किंग कमिटीच्या सांगण्यावरून बोलाविलेल्या पक्षाच्या सभेपुढें माझी बाजू मांडण्याची मला संधी होती; पण वर्किंग कमिटीनें तीही मला लाभूं दिली नाहीं; व पक्षाची सभा भरवण्यापूर्वीच वर्किंग कमिटीनें ठराव करून मला जाहीर रीतीनें दोषी ठरवून माझी निर्भर्त्सना केली. पुराव्याशिवाय, चौकशीशिवाय किंवा माझी कैफियतही न घेतां महात्मा गांधींनीं दिलेला एकतर्फी निर्णय वर्किंग कमिटीनें घाईघाईनें मान्य करून त्याची देशाच्या सर्व कोनाकोंपऱ्यांत दवंडी पिटली. आणि इतकें असून सरळ कबुलीजवाब न देऊन मी माझ्या शिस्तभंगाचा गुन्हा अधिक वाढविला असा माझ्यावर गांधीजींचा आरोप आहेच!

**वर्किंग कमिटीचें भ्याड वर्तन**

मी असें विचारतों कीं, जर वर्किंग कमिटीचा निर्णय बरोबर होता, तर ज्यांनीं मला नेता निवडलें त्यांच्या मताचा कौल घेण्याचा माझा अधिकार तिनें मला कां नाकारला?

नागपूर सोडून तिनें वर्ध्याला सभा बोलावणें मला कां भाग पाडलें? कॉंग्रेसच्या अध्यक्षाला सभेचा अध्यक्ष होण्यास कां पाठविलें? श्रीमती दुर्गाताई जोशी यांच्यासारख्या स्त्री-सभासदानें आक्षेप घेतला असतांही डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल, मौ. आझाद, आचार्य कृपलानी व इतर छोटे पुढारी सभेला हजर कां राहिले? ही काय लोकशाही झाली? अमुकच एका व्यक्तीला निवडा अशी दमदाटी करणेंच हें होत नाहीं काय? पुढाऱ्याची निवड अप्रतिबंध होती असें सुभाष बोस म्हणतात. सत्याला स्मरून असें म्हणतां येईल काय? अप्रतिबंध व मनमोकळी निवड करण्यासारखें हें वातावरण होतें काय? माझ्या तीन सहकाऱ्यांच्या राजीनाम्यांचा प्रश्न आला तेव्हां सरदारांनीं पचमढीस पक्षाची

सभा बोलाविली; पण मी व माझे दोन सहकारी यांच्या राजीनाम्यांचा प्रश्न आला तेव्हां त्यांनीं सभा बोलावण्याचें नाकारलें व स्वत:च हुकूम दिला. हा भेदाभेद कां असावा? नागरिक-स्वातंत्र्याच्या देवते, आम्ही जरी वेळीं अवेळीं तुझा जप करीत बसलों तरी तुझें दर्शन मला होऊं शकलें नाहीं. माझी मुस्कटदाबी करून मुसक्या बांधण्यांत आल्या; व लोकशाही संस्थांचा बाह्य देखावा कायम ठेवण्याचीहि पर्वा केली गेली नाहीं. नंगी समशेर ती याहून दुसरी कोणती असते हें मला अजून शिकावयाचेंच आहे!

**गांधीजींचे निराधार आरोप**

ता. ६ ऑगष्टच्या 'हरिजन' मध्यें महात्माजींनीं लेख लिहिला आहे; व त्यांत आपण दु:खित अंत:करणानें (माझ्यावरील आरोप) तें लिहीलें आहे, असें महात्माजी म्हणतात. (डॉ. खऱ्यांनीं तो उतारा उद्धृत केला आहे.) त्यांच्या त्या दु:खांत आणखी भर घालण्याची माझी इच्छा नाहीं; परंतु मला पार्लमेंटरी बोर्डानें कोणताही इषारा दिला नव्हता व मी कोणताच इषारा धुतकारला नाहीं हें मला नमूद केलें पाहिजे. पार्लमेंटरी बोर्डाची मुळीं सभाच झाली नव्हती; बोर्डाचे अध्यक्ष सरदार पटेल हे ता. २२ ला वर्ध्याला आले हें, सरदारच कबूल करतात. महात्माजी जर डॉ. राजेंद्रांच्या पत्राला अनुलक्षून असें म्हणत असतील, तर त्यांचें पत्र मला, माझा राजीनामा मंजूर झाल्यावर ता. २० रोजीं मध्यरात्रींनंतर मिळालें. मी घरांत असूनही पत्र घेतलें नाहीं असा निंद्य गर्भित आरोप करण्यांत आला असून, ठा. छेदिलाल यांनीं मला जें पत्र घातलें त्यांत मी 'रात्रीं १२-३५ ते २ घरीं नसल्यामुळें भेट झाली नाहीं' असें स्पष्टच म्हटलें आहे. त्यांत मी घरांत लपलों असल्याचा आरोप नाहीं.

**लंगडें समर्थन**

ता. २० जुलै रोजीं डॉ. राजेंद्र श्री. मेहतांशीं फोनवर बोलले. माझ्याशीं फोनवर बोलून, आपण पत्र पाठवित असल्याचें त्यांनीं मला कां कळविलें नाहीं? ही काय शिस्त झाली? ता. २० रोजीं पार्लमेंटरी कमिटी वर्ध्यास भरली नव्हती; सरदार पटेल आणि मौ. आझाद हे तेथें नसतांना एकटे डॉ. राजेंद्र म्हणजे पार्लमेंटरी कमिटी असें म्हणणें व्यर्थ आहे. त्यांना वऱ्हाड-मध्यप्रांतावर हुकमत

चालविण्याचा अधिकारही नव्हता. आचार्य कृपलानी यांनीं (कॉंग्रेसचे जन. सेक्रेटरी) यांबद्दल नुकतेंच असें लिहिलें आहे कीं, "गव्हर्नरनें राजीनामा मागिल्यावर निषेधपूर्वक तो द्या असा सल्ला डॉ. राजेंद्र देऊं शकले असते. त्यांनीं तसा सल्ला महाकोशल मंत्र्यांना दिला नाहीं याचा अर्थ, आणीबाणीच्या राजकीय प्रसंगीं वैध प्रश्नांचा विचार केला गेला नाहीं, एवढाच; कारण त्याला जर यशस्वीपणें तोंड दिलें नसतें तर कॉंग्रेसची इभ्रत व अधिकार यांना फार बाध आला असता." यांतील पहिला भाग, डॉ. राजेंद्रांचें कर्तव्य काय होतें हें स्पष्ट दाखवितो; व दुसऱ्या भागानें 'लांडगा आला रे आला' अशी ओरड करून त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला आहे. पण 'विकट राजकीय परिस्थिति' मुळीं उद्भवलीच नव्हती; फक्त जी घरगुती व्यवस्था मी केली होती ती राजेंद्रांना व सरदारांना रुचणारी नव्हती, एवढेंच. कॉंग्रेसच्या अधिकाराचें व इभ्रतीचें अधिष्ठान नैतिक दंडकावर आहे—म्हणजे सत्य, अहिंसा व न्याय यांवर आहे. यांच्यापासून मुद्दाम परावृत्त झाल्यामुळें कांग्रेसची इभ्रत व अधिकार यांना धक्का बसला; माझ्या मंत्रीमंडळाच्या पुनर्घटनेनें तो बसला नाहीं. सत्य, अहिंसा व न्याय या मूलभूत तत्त्वांना सोडून वर्किंग कमिटी किंवा तिचे सदस्य यांचें वर्तन झालें असल्यावर आचार्य व महात्मा यांना त्यांचें समर्थन करण्याचा यापेक्षां कोणता दुसरा मार्ग उरतो? पार्लमेंटरी बोर्डाचे इषारे धुडकावून बेशिस्त वर्तन केल्याचा आरोप खरोखर टिकतो काय?

### हाही आरोप खोटाच आहे

गव्हर्नरला मला बनविण्याची संधी देऊन मी आपली नालायकी दाखविली असें महात्माजी म्हणतात. राजीनामा देण्याचा सल्ला मला गव्हर्नरनें दिला असें म्हणण्यास त्यांच्याजवळ पुरावा नाहीं. मी या सूचित आरोपाचा स्पष्ट इन्कार करतों. मी स्वत: होऊन राजीनामा दिला असतां गव्हर्नरनें मला बनविण्याचा प्रश्नच कोठें उद्भवतो? माझ्या भांडकुदळ व बेइमान सहकाऱ्यांना मला काढावयाचें होतें; व त्यासाठीं मी कायदेशीर उपाययोजना केली. तींत गव्हर्नरचा संबंधच नव्हता. गव्हर्नरनें जर मला बनविलेंच नाहीं, तर मी त्याला मला बनवूं देऊन मी माझी नालायकी व्यक्त केली, हा आरोप तरी कसा टिकणार? गांधीजींनीं गृहीत धरलेली ही दुसरी चुकीची गोष्ट होय.

ता. ... २९९ ...

**अडचणींत दिवाण आले, कॉँग्रेस नाहीं !**

आणि हा आरोप जर टिकत नसेल, तर तिसरा आरोप असा आहे कीं, माझ्या घाईच्या वर्तनानें मी कॉँग्रेसला अडचणींत आणीत आहे हें न जाणण्याचा नालायकपणा मी दाखविला. माझ्या घाईच्या वर्तनानें जर कोणाला धक्का बसला असेल तर तो त्या तीन मंत्र्यांना बसला. पण ते तिघे म्हणजे कांहीं कॉँग्रेस नव्हे. नवीन मंत्रीमंडळ स्थापावयाचें झालें तर त्यांच्याऐवजीं तीन नवे सहकारी घ्यावयाचे होते; त्यांत कॉँग्रेसला अडचणींत टाकण्यासारखें काय होतें ? मी कॉँग्रेसच्या धोरणापासून च्युत झालों होतों कीं कॉँग्रेस-घटनेचें एखादें कलम मोडलें होतें ? कांहींच नाहीं. मी त्या तीन मंत्र्यांना बडतर्फ करण्याची संधी देऊन कॉँग्रेसला अडचणींत आणलें असें कोणी म्हणेल; पण तें तरी खरें आहे काय ? गव्हर्नरनें ते तीन मंत्री नेमले असें म्हणावयाचें असेल, तर त्याच अर्थानें त्यानें त्यांना बडतर्फ केलें असें होईल; पण त्यांची नेमणूक जर त्यानें केलीच नाहीं, तर त्याच अर्थानें त्यानें त्यांना बडतर्फही केलें नाहीं. मी त्यांना नेमलें व मीच त्यांना काढलें ; या दोनही गोष्टी गव्हर्नरद्वारां कराव्या लागतात, एवढेंच. महात्माजींना न समजण्यासारखा कां हा गहन प्रश्न आहे ? पण कुत्र्याला मारायाला कोणतेंही दांडुक चालतें !

**असत्याचा विरोध शिस्तबाह्य कसा ?**

वर्किंग कमिटीचा सल्ला झिडकारून मी माझ्या बेशिस्तींत भर घातली, असाही गांधीजींचा आरोप आहे. पण वर्किंग कमिटीनें असा मला कोणताच सल्ला दिला नाहीं. महात्म्यासह किंवा विरहित असे श्री. देसाई, सुभाष बोस जमनलाल बजाज, सरदार व मौलाना म्हणजे कांहीं वर्किंग कमिटी नव्हे. शेगांवला तयार केलेल्या मसुद्यांत बहुश: असत्यें भरलीं होतीं. खोट्या गोष्टींना संमति देणें हें माझें कर्तव्य होतें काय ? एकंदर चौकशी करून सत्य कोणी शोधून काढलें होतें ? माझ्या विरूद्ध कांहीं गोष्टी मानण्यांत आल्या; व त्या जर खोट्या आहेत अशी माझी खात्री होती, व त्यांना पुष्टि देण्यासाठींच जर माझी सही हवी होती तर तसें न करणें ही काय बेशिस्तीची परमावधि झाली ?

**असलें लष्कर लांछन ठरेल**

'पार्लमेंटरी मनोरचना स्थिरावली आहे' असें नेहमीं प्रतिपादणारा

महात्मा, सरदार पटेल व राजेंद्रप्रसाद यांना उचलून धरण्याच्या भरांत असें म्हणतो कीं, "लढाऊ घटक या नात्यानें कॉंग्रेसनें सर्व सत्ता केंद्रित करून प्रत्येक कॉंग्रेस-मॅननें—मग तो कितीही श्रेष्ठ पदावर असो—तिचें बिनशर्त ऐकलें पाहिजे, अशी कॉंग्रेसची अपेक्षा आहे." याचा अर्थ फक्त हायकमांडचें बिनतक्रार ऐकावें व बाकीच्यांनीं एकमेकांना कस्पटासमान लेखावें असा तर नाहीं ना? जर असेल, तर अशा शिस्तीचें लष्कर हें अभिमानास्पद होण्याऐवजीं लांच्छन मात्र ठरेल. 'मी फक्त फील्ड मार्शलचें ऐकेन; आपल्या जनरलचें ऐकणार नाहीं, असें कोणताच लेफ्टनंट किंवा कॅप्टन सैन्यांत म्हणूं शकत नाहीं. आणि हें जर क्षम्य असेल, तर मग मुळीं लष्कराचें अस्तित्वच अशक्य आहे.

## देवापुढें जाब द्यावा लागेल

मला हें नमूद करतांना अत्यंत दुखः वाटतें कीं, माझ्याविरुद्ध आरोप करतांना गांधीजींनीं आपलें नेहमींचें शहाणपण, विवेक, सत्यनिष्ठा, निःपक्ष-पातीपणा हीं पाळलेलीं नाहींत. या भांडणांत त्यांनीं पडावयास नको होतें. 'मी कॉंग्रेसचा पावली सदस्यही नाहीं' असें ते म्हणतात; पण माझ्यासारख्या पामराला चिरडण्यासाठीं त्यांनीं आपल्या पराक्रमाची शिकस्त केली आहे. आपल्या प्रचारकांचें रक्षण त्यांनीं खुशाल करावें. पण त्यांनीं आपलें हें वळ अधिक चांगल्या कामीं खर्च करावयाचें असतें, असें मात्र मला वाटलें. परमेश्वरा-पुढें जाब देण्याचा दिवस सर्वांच्याच बाबतींत उजाडणार आहे; आणि महात्म्याची देखील त्यांतून सुटका होणार नाहीं.

## सरदारांचें तर्कशास्त्र

आतां सरदार पटेलांकडे मला वळलें पाहिजे. पार्लमेंटरी कमिटीच्या पत्रकानें समाधान न होऊन माझ्यावर खोटेपणाचा आरोप करण्यासाठीं ते स्वतंत्र पत्रक-द्वारां पुढें सरसावले आहेत. प्रधानपद माझ्यावर लादलें गेलें हें माझें विधान चुकीचें आहे, असें दाखविण्यासाठीं ते म्हणतात कीं, नेत्याच्या निवडणुकीच्या पक्षाच्या सभेचें अध्यक्षपद स्वीकारण्याची त्यांना व पं. नेहरूंना मी विनंती करून मी त्यासाठीं त्यांची मदत मागितली. सभासदांत कॅन्व्हासिंग करण्यासाठीं मी त्यांची मदत मागितली असें ते म्हणत नाहींत, याबद्दल परमेश्वराचे आभारच

मानले पाहिजेत. आपलें हें तर्कशास्त्र वर्ध्याच्या सभेला लावण्यास ते तयार आहेत काय? पं. शुक्ला हे पुढारी व्हावेत म्हणून त्यांना मदत करण्यासाठींच सुभाषबाबूंना त्या सभेचे अध्यक्ष होण्यास सांगितलें होतें काय?

**सरदारांचीं चुकीचीं विधानें**

प्रधानपद माझ्याकडे राखण्याला मी उत्सुक होतो, असेंही ते म्हणतात. मी कॉंग्रेसची सेवा करण्यास उत्सुक होतों. प्रधान राहणें हें माझ्या नुकसानीचें असूनही माझें कर्तव्य सोडून मी पळून जाऊं शकत नव्हतों. श्री. शरीफ यांच्यावरील विश्वासदर्शक ठराव मी मंजूर करवून घेतला हें त्यांचें म्हणणेंही खोटें आहे. ती कारवाई कोणती होती, हें सरदारांना ठाऊक आहे. जाफर हुसेनला सोडण्याची संयुक्त जबाबदारी मंत्रीमंडळावर नाहीं याची आम्ही जाहीर घोषणा केली असूनही, व या प्रकरणीं व्यक्त केलेली दिलगिरी वर्किंग कमिटीपुढें श्री. शरीफ यांनीं परत घेतली असतांही, सरदार त्या बाबतींत मला संयुक्त जबाबदारीचा विसर पडला असें कसें म्हणतात?

माझे सहकारी मींच निवडले; पार्लमेंटरी कमिटीच्या एकाद्या सदस्यानें त्याबाबत सल्ला दिला, म्हणजे कांहीं तो त्याचा अधिकार होत नाहीं. मुख्य प्रधानाला न पुसतांसवरतां एकादा मंत्री नेमण्याचा किंवा काढण्याचा वर्किंग-कमिटीला अधिकार नाहीं असें मी म्हणतों. 'संयुक्त जबाबदारीचें मला आतांच प्रेम वाटूं लागलें' असा टोमणा मला सरदारांनीं दिला आहे. या उलट संयुक्त जबाबदारीच्या बाबतींत आचार्य कृपलानी यांनीं 'कॉंग्रेसनें तें तत्व सोडलेलें नाहीं, व त्यावर जर कोणी आक्रमण करील तर ती त्याचा प्रतिकार करील ते' हें जें आश्वासन दिलें आहे, तें समाधानकारक आहे.

**पोकळ वढाईचा आनंद**

पचमढीचा करार, मी सरदार व मौलाना आझाद यांच्या वजनामुळें कबूल केला, हें मी पुन्हां सांगतों. त्याबाबतची मंत्र्याची घोषणा ही केवळ सारवा-सारव करणारी होती. मौ. आझाद यांच्या ता. १४ च्या पत्रावरून हें स्पष्टच होतें. मंत्रीमंडळाची पुनर्घटना होण्याची शक्यताही त्यांना दिसंत असल्याचें व ती एक सामान्य गोष्ट असल्याचेंही त्यावरून दिसतें. आचार्य कृपलानी व

वर्किंग कमिटीचें इतर सदस्यांना त्यांत ‘ गंभीर राजकीय घडामोड ’ दिसावी, हें आश्चर्य होय. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याला तोंड देऊन काँग्रेसला संकटांतून वांचविल्याबद्दल ते आपली पाठ थोपवून घेत आहेत ! जगानें त्यांचा तो आनंद हिरावून न घेण्याची त्यांच्यावर दया करावी.

**समारोप**

मोठमोठ्या तत्वाच्या नांवाखालीं जनतेला अगदी वीट येईपर्यंत जीं असत्यें आणि अर्धसत्यें व निराधार आणि काल्पनिक गोष्टींवर आधारलेल्या कथा यांची जी मेजवानी देण्यांत आली आहे, त्यांचा फोलपणा यावरून दिसून येईल. कांग्रेसमधील वरिष्ठांच्या हृदयांची शुचिर्भूतता होण्याची आवश्यकता आहे; व ते जर यानें साध्य झालें, तर माझ्या या कैफियतीचें सार्थक झालें, असें मी म्हणेन.

हिंदी वृत्तपत्रांचा मी अत्यंत आभारी आहे. जेव्हां काँग्रेसचा बडा तोफखाना माझी चटणी करण्याच्या प्रयत्नांत होता, त्यावेळीं त्यांनीं मला जी मदत केली त्यामुळें माझ्या अडचणींच्या वेळीं मला धीर मिळाला.

आमचा देश, आमची काँग्रेस व आमचा विवेक यांचें परमेश्वर रक्षण करो; व काँग्रेसमधील अहिंसामय सवाई-हिटलरशाहीला तोंड देण्याची शक्ति तो आम्हांला देवो !

# परिशिष्ट २

## वर्किंग कमेटीचीं वशिलेबाजी

## डॉ. खरे यांनी प्रसिद्ध केलेलीं पत्रें

### डॉ. खरे यांचें पत्रक

डॉ. ना. भा. खरे यांनीं पुढील पत्रक प्रसिद्ध केलें आहे :—

"श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं मध्यप्रांतीय घटनेसंबंधीं जें एक लांबलचक पत्रक काढलें आहे, त्यांतील बहुतेक महत्वाच्या मुद्यांना मी माझ्या पत्रकांत उत्तर दिलेंच आहे. मी हायकमांडच्या कांहीं सदस्यांविरुद्ध माझ्या पहिल्या पत्रकांत जे आरोप केले आहेत त्यांना, आपल्या १६००० शद्बांच्या लांबलचक पत्रकांतही सुभाषबाबू उत्तर देऊं शकलेले नाहींत, ही गोष्ट मी जनतेच्या निदर्शनास आणून देत आहे. त्यावरून जनता काय तो निष्कर्ष काढीलच.

### 'हे घ्या पुरावे'

कॉंग्रेसचें शुद्धिकरण करण्याच्या दृष्टीनें हायकमांडच्या वशिलेबाजी वगैरेसंबंधीं जीं काय पत्रें असतील तीं प्रसिद्ध करण्याबद्दल श्री. बोस यांनीं मला सांगितलें आहे. कॉंग्रेसचें शुद्धिकरण हें त्यांना व मलाहि प्रियच आहे. तेव्हां त्यांच्या आज्ञेप्रमाणें मीं श्री. पटेल, सौ. सरोजिनी नायडू व रे. अँड्रयूज यांनीं आपल्याला लिहीलेलें जें पत्र, स्वतःच्या या शिफारसीसह, सेठ जमनालाल बजाज यांनीं मला धाडलें—हीं सर्व पत्रें त्यांच्या छायाचित्रांसह प्रसिद्ध करीत आहे. परदेशांतून वैद्यकीय शिक्षण घेऊन आलेल्या एका गृहस्थाला नोकरी देण्याबद्दल श्री. बोस यांनींही मला एक पत्र लिहिलें होतें; तें पत्र सरकारी फायलींत लागलें असल्यामुळें, त्याचें छायाचित्र मी देऊं शकत नाहीं; परंतु, आपण असें पत्र लिहील्याचें श्री. बोस नाकारतील, असें मला वाटत नाहीं.

### 'स्वयंप्रकाश पत्रें'

या पत्रांवर टीका करण्याचें कारणच नाहीं. तीं पत्रेंच स्वयं बोलकीं आहेत. त्या पत्रांवरून जनतेच्या लक्षांत येईल कीं, तीं पत्रें लहान मोठ्या

सरकारी नोकऱ्या देण्याबद्दल, मोठालीं कंत्राटें देण्याबद्दल व गुन्हेगारांच्या मुदती संपण्यापूर्वींच त्यांना सोडण्याबद्दल आहेत; व त्यावरून जीं काय अनुमानें निघावयाचीं तीं निघूं शकतात.

**पं. नेहरूंचें विसंगत वर्तन**

पंडित जवाहरलाल नेहरू यांचें पत्र ता. २६ जानेवारीला सुटी देण्या-बद्दलचें आहे. माझ्या दुर्दैवानें, माझी आठवण जर बरोबर असेल तर, जानेवारी १९३८ च्या मध्याच्या सुमारास, त्यांनीं एक पत्रक काढून, आपण या दिवशीं सुटी देण्याबद्दल काँग्रेस-प्रधानांना पत्रें टाकलीं नाहींत, असें जाहीर केलें !

मला अशी अंधुक आशा आहे कीं, काँग्रेसचें शुद्धिकरण करण्याची श्री. बोस यांची अत्युत्कट इच्छा माझ्या या नम्र प्रयत्नांनीं सफल होईल."

**मूळ पत्रें व त्यांचा अनुवाद**

डॉ. खरे यांनीं आपल्या या पत्रकांत उल्लेखिलेलीं चारीही इंग्रजी पत्रें त्यांच्या मराठी अनुवादासह पुढें दिलीं आहेत. त्यापैकीं पहिलें पत्र सरदार पटेल यांचें असून, त्यांत ह्यमपाईप कंपनीची शिफारस केलेली आहे. या पत्राची भाषा धूर्तपणाची आहे. पण, नागपूर म्युनिसिपालिटीच्या कारभाराशीं मुख्य प्रधानाचा वस्तुतः कांहींही संबंध नाहीं ही गोष्ट लक्षांत घेतली असतां, श्री. रतनचंद हिराचंद यांना न्याय मिळवून देण्यासाठीं, मुख्य प्रधानांच्या वजनाचें दडपण म्युनिसिपालिटीवर आणण्यासाठींच सरदारांनीं हें पत्र डॉ. खरे यांना घातलें असल्याचें स्पष्ट कळून येईल. दुसरें पत्र सौ. सरोजिनी नायडू यांचें आहे. त्याचें वशिलेबाज स्वरूप इतकें उघड आहे कीं, त्याबद्दल कांहींही लिहिण्याची गरज नाहीं. तिसरें पत्र रे. अँड्रयूज यांचें असून, कंट्रोल बोर्ड आणि नागपूर प्रांतिक कमिटी यांचे अध्यक्ष शेठ जमनलाल बजाज यांनीं तें स्वतःच्या शिफारसी-सह डॉ. खरे यांजकडे पाठविलें होतें. शेठजींनीं त्यावर घातलेला जावक नंबर या गोष्टीचा निदर्शक आहे. चौथें पत्र पं. नेहरू यांचें असून, स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं सार्वजनिक सुटी देण्याची डॉ. खरे यांची योजना कोणी हाणून पाडली, याबद्दल वाचकांच्या मनांत तें कुतूहल उत्पन्न केल्यावांचून राहणार नाहीं.

## सरदार पटेल यांचें पत्र

२१-८-३७

प्रिय डॉ. खरे,

इंडियन ह्यूम पाईप कंपनीचे श्री. रतनचंद हिराचंद यांची ओळख करून देण्यासाठीं मी हें पत्र लिहीत आहे. ते स्वत: कट्टे राष्ट्रीय आहेत. त्यांच एक बंधु मुंबई कायदेमंडळांतील कॉंग्रेसपक्षाचे सदस्य आहेत. त्यांच्या वडील बंधूंनीं मागें पुष्कळ प्रसंगीं कॉंग्रेसला मोठाच पाठिंबा दिला आहे. नागपूर म्युनिसिपालिटीच्या पाणी पुरवठ्याच्या योजनेसंबंधांत त्यांनीं पाठविलेल्या टेंडरच्या बाबतींत त्यांना मेहरबानी नको असून फक्त योग्य संभावना व्हावयाला हवी आहे. कारण या बाबतींत आपल्या प्रतिस्पर्ध्याला त्याच्या वजनामुळें गैरवाजवी फायदा मिळेल अशी भीति त्यांना (श्री. रतनचंद) वाटत आहे. त्यांना न्याय मिळेल अशी व्यवस्था आपण केल्यास मी आपला आभारी होईन. त्यांचे प्रतिस्पर्धी एक युरोपियन ठेकेदार असून, सरकारच्या युरोपियन इंजिनियरच्या शिफारशीवर या बाबतींतील निर्णय अवलंबून आहे, असें मला समजतें.

आपला,

**वल्लभभाई**

———

21-8-37

My Dear Dr. Khare,

This is to introduce the bearer, Sjt. Ratanchand Hirachand of the Indian Hume Pipe Company. He is a strong Nationalist himself. One of his brothers is a member of the Congress Assembly party in the Bombay Assembly. His elder brother has given great support to the Congress on many occasions in the past. He wants a fair deal and no favour in connection with his tender to the Nagpur Municipal water supply scheme, where he is afraid of his rival's inflence in the affair getting an undue advantage. I shall thank you, if you will see that justice is done to him. His rival is an European contractor and the decision in the affair depends, I understand on the recommendation of an European Engineer of Government.

Yours Sincerely,

Vallabbhai

## सौ. नायडू यांचें पत्र

झहीर मंझील रेड हिल
डेक्कन हैद्राबाद
२१ जून १९३८

प्रिय डॉ. खरे,

ॲडव्होकेट जनरलच्या जागेवरील सध्यांचे गृहस्थ हे न्यायासनावर विराजमान होणार असल्यामुळें त्यांच्या जागीं आपण तात्पुरते ॲडव्होकेट जनरल नेमण्याचा संभव आहे असें मी ऐकलें. या बाबतींत मी श्री. वाल्टर दत्त यांच्या वतीनें, शक्य तर, शद्ब टाकूं चहातें. मला वाटतें, हायकोर्टानें त्यांचें नांव नेमणुकीसाठीं मान्य केलें होतें पण आपल्या पूर्वींच्या मुख्य प्रधानांनीं स्वत:च्या मनुष्याची निवड केली. मला त्यांचे नांव घेण्याची गरज नाहीं.

मला वाटतें, श्री. दत्त हे या जबाबदारीच्या जागेला अतिशय लायक आणि अधिकारी आहेत, हें आपल्याला आढळून येईल.

आपली,
**सरोजिनी नायडू.**

**ता. क.**—हंगामी न्यायाधिशाची एक जागा रिकामी होण्याचाहि संभव असल्याचा मला विश्वास वाटतो.

---

ZAHEER MANZIL
RED HILL,
HYDERABAD (DN.)
21ST JUNE 1938.

MY DEAR DR. KHARE,

I hear there you are likely to appoint a new advocate-general temporarily in the event of the present encumbent filling an acting place on the bench. I would like if I may to put in a word for Mr. Walter Dutt. I think his name was approved by the High Court for a post but your predecessor in office preferred his own man whom I need not name.

I think you will find Mr. Dutt W. B. very able and deserving of this responsible position.

*(Sd)*- SAROJINI NAIDU.

**P. S.** — There is also I believe a post of acting judge likely to be vacant.

## श्री. अँड्रयूज यांचें पत्र

जा. नं. २६३८ ५–११–३७

प्रिय जमनलाल,

केंब्रिजमध्यें असलेल्या कमलविषयींची सुवार्ता आपणांला कळली असेल अशी मला आशा आहे. हें पत्र आपण मुख्य प्रधान डॉ. खरे यांच्याकडे पाठवावें. श्री. गरेवाल हे सध्यां प. व. डिपार्टमेंटमध्यें आहेत. त्यांचा मुलगा दलजित याची भरलेली बंदुक उडून जो अपघात झाला त्यांत एक नौकर किंवा झाडूवाला ठार झाला. मध्यप्रांतांत ही घटना घडली त्यावेळीं श्री. गरेवाल हे मध्यप्रांतांत होते. मुलानें या घटनेसंबंधीं खोटें सांगितलें आणि त्याच्या वकिलानें या घटनेच्या वेळीं तो तेथें नव्हता असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण मनुष्यवधाच्या आरोपावरून त्याला जबलपूर रेफरमेटरीमध्यें ४ वर्षांची सजा झाली. मुलाला भेटण्यासाठीं म्हणून श्री. गरेवाल ज्या ज्या वेळीं जातात त्या त्या वेळीं मुलाचें चारित्र्य बिघडत चाललें आहें असें त्यांस आढळून येतें आणि तो जर हीं चार वर्षें तेथेंच राहिला तर तो निगरगट्ट बनून त्याच्या आयुष्याचा विनाश होईल अशी त्यांना भीति वाटते. हा मुलगा (मला बरोबर स्मरत असेल तर) १४ वर्षांचा आहे. आणि याला प्रयोगाखातर आपल्या देखरेखीखालीं घ्यावें अशी विनंती करण्यासाठीं श्री. गरेवाल हे मंत्र्यांना आनंदानें भेटतील.

बापानें खरें सांगितलें आहे आणि प्रयोगाखातर मुलासाठीं बापाला जबाबदार आतां होतां आलें तर त्याचें चारित्र्य सुधारेल याविषयीं मला स्वतःला शंका नाहीं. राजकुमारी यांनीं सुद्धा आपणाला लिहिण्याची तयारी दर्शविली; पण मी स्वतःच आपणाला लिहीन असें मी सांगितलें. हें एक अपवादात्मक प्रकरण आहे आणि यांत खोटें बोलण्याच्या स्वतःच्या अपराधामुळेंच एक थोर सन्मान्य बापाचा मुलगा या भयंकर दशेस आला आहे. तुमच्या बंगल्यावर मुख्य मंत्र्यांची मी भेट घेतली होतीच आणि ते या अपवादात्मक प्रकरणामध्यें लक्ष घालतील अशी मला खात्री वाटते.

आपला प्रिय मित्र

**चार्ली अँड्रयूज**

डॉ. खरे यांची मी आठवण केली असें त्यांना कृपा करून सांगा.

Manervilla, Simla, Nov. 5th, 1937

MY DEAR JAMANLAL,

I do hope you have had good news about Kamal at Cambridge.

I want you to pass on this letter to Mr. Khare the Prime Minister with the enclosure. Mr. Garewal is in the P. W. D. and was in the C. P. where his son, Daljit had an accident with a gun which was loaded and shot a servant or a sweeper. He told a lie over it and his lawyer tried to prove an alibi, but was convicted of man-slaughter and sentenced to 4 years in the Jubbulpore reformatory. His father finds each time he goes that his character is deteriorating and fears that if he remains all the 4 years, he will become hardened and ruined for life. He would gladly come and see the minister and ask that his son, who is about 14 years of age (if I have remembered rightly) might be placed under his own charge on probation.

I have no doubt myself that the father has told me the truth and that if it were possible for him now to be responsible for his own son on probation his character might be saved. The Rajkumari offered to write also, but I said that I would write to you myself. I feel sure that the Prime Minister whom I met at your Bungalow would take an interest in such an exceptional case where a son of a big respectable father has come owing to his own fault in telling a falsehood into such a terrible state.

Your affectionate friend
CHARLIE ANDREWS

Will you give my kindest remembrance to Dr. Khare?

**पं. नेहरू यांचें पत्र**

डिसेंबर, २२, १९३७

प्रिय डॉ. खरे,

आपलें ता. १९ डिसेंबरचें पत्र पोंचलें. जानेवारी ता. २६ हा दिवस सार्वत्रिक सुटीचा दिवस म्हणून जाहीर करण्याचा आपला प्रयत्न चालू असल्याचें ऐकून मला आनंद वाटतो. सर्व काँग्रेस प्रांतांतून ही गोष्ट घडून यावी, या आपल्या कल्पनेशीं मी पूर्ण सहमत आहे. तदनुसार मीं इतर प्रांतांतील मुख्य प्रधानांना लिहिलें आहे.

आपला

**जवाहरलाल नेहरू.**

---

Dec. 22, 1937

My Dear Dr. Khare,

I have your letter of the 19th December. I am glad to learn that you are taking action about January 26th being declared a public holiday. I entirely agree with you that such action should be uniform in all the Congress Provinces. I am writing to the other Prime Ministers accordingly.

Yours Sincerely.

Jawaharlal Nehru.

# परिशिष्ट ३

## बॅ. रामराव देशमुख यांची कैफियत

ता. २१ सप्टेंबर १९३८ रोजीं, प्रश्नोत्तरांनंतर, माजी मंत्री बॅरिस्टर रामराव देशमुख यांनीं आपल्या राजीनाम्यावद्दल एक कैफियत प्रां. असेंब्लीला सादर केली. त्यांनीं या कैफियतींत महाकोशल मंत्र्यांचीं कारस्थानें, राष्ट्र-सभा-अध्यक्षांच्या पत्रकांतील खोट्यांचा बाजार, पचमढीचा करार मोडल्याबद्दल या महाकोशल गटाच्या व त्यांच्या पाठीराख्यांच्या उलट्या बोंबा वगैरे घटनांचें निर्भीडपणें निवेदन केलें आहे. ही कैफियत पुढें सविस्तर दिली आहे.

बॅरिस्टर रामराव देशमुख, आपली कैफियत मांडतांना म्हणाले:—

“ माझ्या स्वत:च्या वर्तणुकीशीं आणि मला माहित असणाऱ्या गोष्टींशीं संबंध येणाऱ्या मुद्यांविषयीं मी वैयक्तिक खुलासा केला पाहिजे, असें मला वाटते. या शिवाय, एक जुना कार्यकर्ता या नात्यानें, माझ्या चारित्र्याशीं संबंध येणाऱ्या मुद्यांचा, असेंब्लींत, माझा मतदार संघ व सर्व सामान्य जनता यांना मी खुलासा करावा, हेंहि माझें कर्तव्यच आहे.

माझा व डॉ. खरे यांचा खाजगी स्नेह नाहीं; राजकारणांत आम्ही बहुधा विरोधी गटांत राहिलों आहोंत. माझा जो त्यांना पाठींबा होता तो आम्ही दोघेही एकभाषी म्हणून नव्हता; घटनाशास्त्रदृष्ट्या डॉ. खरे यांचें वर्तन बरोबर होतें व इतरांचें चुकीचें होतें, अशीं माझी खात्री असल्यामुळें मी त्यांना पाठिंबा दिला. डॉ. खरे यांनीं आपल्या ‘ माझी कैफियत ’ या खुलाशांत जो एक परिच्छेद उद्धृत केला आहे, त्यानें माझी भूमिका स्पष्ट केलेलीच आहे.

### हाय कमांडचा आदेश

हायकमांडच्या एका महत्वाच्या अधिकाऱ्याचा सल्ला घेण्याचा मला एकदां योग आला होता. त्यावेळीं मला असें सांगण्यांत आलें होतें कीं, ज्या वेळीं हुकूम होईल त्यावेळीं ( घटना-कायद्याचा ) भंग करणें किंवा त्याशीं लढत घेणें हें आमचें धोरण आहे; त्या प्रसंगाचा काळ, मार्ग व धोरण यांची निवड

हायकमांड करणार, असें सांगण्यांत आलें होतें. हा प्रसंग येईपर्यंत 'पार्लमेंटेरियन' या नात्यानें, त्याबाबतच्या जगन्मान्य शिस्ती पाळून, लोक-कल्याण जेवढें करतां येईल तेवढें करावें व नैतिक दृष्ट्या आपण श्रेष्ठ राजकारणी आहोंत हें सिद्ध करावें, असा मला त्या वेळीं आदेश मिळाला होता. ही गोष्ट ता. २० जून रोजीं घडली.

### गव्हर्नरशीं संगनमत केल्याचें थोतांड

डॉ. खरे हे चूक करीत आहेत असें जर मला केव्हांही वाटलें असतें, तर मी त्यांना असलेला पाठिंबा ताबडतोब काढून घेतला असता. आणि, त्यांच्यावर आज गव्हर्नरशीं संगनमत केल्याबद्दल जो आरोप केला जात आहे तशी वस्तुस्थिति असल्याचें जर मला केव्हांही दिसून येतें, तर मी आपला पाठिंबा लगेच काढून घेतला असता. माझी अशी ठाम समजूत झाली आहे कीं, मुख्य मुद्याला बगल देऊन धूळफेंक करण्यासाठीं व ता. २७ च्या पक्षाच्या सभेंत हुकुमी डाव टाकतां यावा म्हणूनच गव्हर्नराशीं संगनमत केल्याचें हें थोतांड रचण्यांत आलें. हायकमांडला जर या आरोपांत कांहींही तथ्य आढळलें असतें, तर त्यानीं, मला खात्री आहे कीं, डॉ. खऱ्यांवर पुन्हा पुन्हा हा आरोप करीत राहण्याऐवजीं, गव्हर्नरच्या विरुद्ध कांहीं तरी कारवाई केली असती. अशा परिस्थितींत गव्हर्नर नेहमीं घटना-कायद्याच्या कळसूत्री यंत्राप्रमाणें वागत असतो; आणि त्या यंत्रांत जर आवश्यक नाणें कोणीही घातलें, तरी तें यंत्र नेहमीं असेंच काम करील. मुख्य प्रधानकीच्या राजीनाम्याची किंमत डॉ. खऱ्यांनीं दिली; आणि त्याचा कांहीं एक परिणाम घडून आला. यांत कांहीं गहन कारस्थान होतें अशीं शंका घेणें म्हणजे कल्पकता आणि समजूतदारपणा यांचा अभाव प्रगट करणें होय. . . . ."

### पंडित-मंत्र्यांची हरकत

या वेळीं ना. पं. मिश्र हे उठले व त्यांनीं गव्हर्नरच्या उल्लेखाला हरकत घेतली; आणि प्रधानमंत्री ना. पं. शुक्ल यांनीं त्यांना साथ दिली. एकंदर चर्चेत ना. पं. शुक्लांचा असा आक्षेप असल्याचें दिसून आलें कीं, (१) एक तर गव्हर्नरवरील आरोप वक्त्यांनीं स्पष्ट केल्याखेरीज त्यांना नीट उत्तर मंत्री

देऊं शकणार नाहींत; व (२) दुसरें असें कीं, ता. १९ राजीनामा दिल्यानंतरच्या बाबीचा त्यांना उल्लेख करतां येऊं नये. ना. अध्यक्षांनीं हे आक्षेप अतिव्याप्त आहेत असें सांगून व श्री. देशमुख हे गव्हर्नरच्या कृत्यावर टीका करूं इच्छित नाहींत यांची त्यांच्याकडून खात्री घेऊन, श्री. देशमुखांना आपली कैफियत पुढें वाचण्याची परवानगी दिली. ना. पं. शुक्लांनीं पहिला आक्षेप घेतला, तेव्हां कॉंग्रेस पक्षानें उपरोधिक टाळ्या पिटल्या.

श्री. देशमुख—" ज्या माझ्या मित्रानें आतां हरकत घेतली, त्यांना प्रेमाचे दोन शद्ब सांगण्याची माझी इच्छा आहे.

अध्यक्ष—" छे, छे, मी तुम्हाला प्रेमाचे किंवा वैराचे कोणतेच शद्ब सांगू देणार नाहीं!" (हंशाच हंशा)

श्री. देशमुख—मला एवढेंच सांगावयाचें होतें कीं, ते (ना. मिश्र) ज्याप्रमाणें कोणाच्या दटावणीला भीक घालणारे नाहींत, त्याचप्रमाणें मीही माझी ही कैफियत सादर केल्याशिवाय राहणार नाहीं. असो. हल्लींचें मंत्रीमंडळ आपल्या रोजच्या व्यवहारांत गव्हर्नरची मदत घेतें आणि म्हणून त्यांनीं गव्हर्नरशीं कट केला आहे हें म्हणणें जेवढें चुकीचें होईल, तेवढाच डॉ. खरे यांनीं गव्हर्नरशीं संगनमत केलें होतें हा निष्कर्षहि चुकीचा आहे. त्या आरोपाची पुन्हाः पुन्हा जपमाळ ओढून आपण तो आरोप लोकांच्या गळीं उतरवूं अशी जर हाय कमांडची अपेक्षा असेल तर ती व्यर्थ होय.

**प्रादेशिक कलहांचा आळ**

भाषाद्वेषांना चालना दिली असा एक (आमच्यावर) आरोप आहे. महाराष्ट्र गटावर त्याच्या जबाबदारीचें खापर फोडण्यांत येत असून, श्री. गोळे यांचें पत्र त्यासाठीं पुराव्यांत देण्यांत येत आहे. डॉ. खरे व श्री. गोळे यांच्यांतील चर्चेला मी हजर होतों; व महाकोशल कंपूतून—त्या कंपूला मी सोईसाठीं मरणगांठ किंवा गळफांस म्हणतें असे—बाहेर पडण्यास गोळ्यांची समजूत काढतांना डॉ. खऱ्यांनीं प्रादेशिक कारणें पुढें केलीं नाहींत, हें मी बिनदिक्कत म्हणूं शकतों. उलट, गोळ्यांच्या पत्रांवरून हेंच स्पष्ट दिसून येतें कीं, ज्यावेळीं महाकोशल कंपूची उभारणी प्रादेशिक भावनांवर केली आहे हें त्यांना दिसून आलें.

तेव्हां त्यांनीं त्या कंपूशीं आपला संबंध नको, हेंच स्पष्ट केलें. त्यांनीं दुसऱ्या एका प्रादेशिक गटांत शिरण्यासाठीं तो संबंध तोडला असें नसून, ज्या कंपूचे अधिष्ठान प्रादेशिक भावनांवर आहे अशी त्यांची खात्री झाली, त्या कंपूशीं आपला संबंध तोडण्यासाठीं त्यांनीं तसें केलें (राजीनामा परत घेतला.) त्यावरून आणखी हीहि गोष्ट सिद्ध होतें कीं, ज्यावेळीं त्यांनीं राजीनाम्याच्या पत्रावर सही केली त्यावेळीं त्या बंडखोर मंत्र्यांचें कंपूशाही वर्तन त्यांना समजलेलें नव्हतें.

**महाकोशलस्थांचें प्रादेशिक राजकारण**

कालमानानें पाहतां, ता. ८ रोजीं सकाळीं घडलेल्या प्रकाराचें माझें प्रतिवृत्त हें गोळ्यांनीं राजीनाम्यावर सही करण्यापूर्वींचें आहे; आणि राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांनीं माझें जें हें पत्र आपल्या उत्तरांत दिलें आहे, त्या पत्रावरूनच हें सिद्ध होत आहे कीं, महाकोशलची कंपूशाही तत्पूर्वींच बनली होती व तिनें थैमान घातलेलें होतें. अध्यक्षांनीं माझें पत्र देतांना या गोष्टी दडपून व अर्धसत्यांना प्रसिद्धि देऊन चुकीचा समज करून देण्याचा प्रयत्न करावा याचें मला वाईट वाटतें. (शेम) माझ्या त्या पत्रावरून, महाकोशल कंपूचे आरोप पोरकट असल्याचें, व त्यांनीं जे आरोप केलें तसे आरोप, आपली सारी लाजलज्जा गुंडाळून ठेवण्याचें धार्ष्ट्य करणाऱ्या कोणत्याही मंत्र्याला आपल्या सहकाऱ्याविरूद्ध करतां येतील असे आहेत, हें सहज दिसून येईल.

**महाराष्ट्रीयांची वृथा बदनामी**

महाराष्ट्रीयांचा निराळा असा गट कधींच स्थापला गेला नव्हता; तो आरोप सर्वस्वीं खोटा आहे. या भांडणांत मी कोणतीच बाजू घेतली नव्हती, व मंत्रीमंडळाचें शरीर व आत्मा (श्री. खापर्डे—त्याला आत्मा आहे काय ?—हंशा) ही एकत्र ठेवण्याची खटपट करीत होतों, ही गोष्ट जाहीरच आहे—आणि राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांनीं ही गोष्ट अधिकृतरीत्या मान्यही केली आहे. असें असतांना मीही एका गटांत सामील झालों होतों असें म्हणणें म्हणजे, अगदीं सौम्य शद्बांत सांगावयाचें तर, अन्याय्य व विसंगत आहे.

वस्तुस्थिति अशी होती कीं, त्या गळफांसानें मंत्रीमंडळातील खुल्या चर्चेचें वातावरण नष्ट केलें होतें. सर्व मंत्रीमंडळाचे अधिष्ठान ज्याच्यावर असतें,

तीं मूलभूत गोष्टच त्यां गळफासानें नष्ट केली होती. ज्याचें वर्णन महाराष्ट्र गट असें करतात तो गट त्या मृत्युगांठीच्या बाहेर होता; व उत्क्रांतीच्या तत्वा-प्रमाणें त्याला मागाहून तें नांव प्राप्त झालें. त्यांना कंपू म्हणून संबोधणें आणि त्यांत मी सामील होतों असें म्हणणें ही निव्वळ बदनामी आहे; आणि मी त्याचा स्पष्ट निषेध करीत आहें.

**'संभावितांचा पहिला करार'**

एकंदर परिस्थिति माझ्या लक्षांत येतांच मंत्रीमंडळाचे दिवस भरले असून हा लढा आपसांत सुटणें शक्य नाहीं, असा मी माझ्या मनाशीं निर्णय केला. महाकोशलस्थ सद्‌गृहस्थांनीं ज्या तऱ्हेचें वातावरण पचमढीस निर्माण केलें होतें तसल्या वातावरणांत कोणतेंच मंत्रीमंडळ टिकूं शकणार नाहीं हें जाणण्याइतकीं कल्पकता माझ्यांत आहे. म्हणून, हें सर्व प्रकरण मुंबईस जाऊन वर्किंग कमिटीपुढें मांडण्याबद्दल मी डॉ. खऱ्यांना सुचविलें. ते मुंबईला जाण्याच्या तयारींत होते इतक्यांत, हें भांडण येथेंच तोडण्याचा प्रयत्न करावा असा मिश्रांचा निरोप घेऊन आमचे दोन सहकारी आले. त्यानंतर वाटाघाट होऊन, ता. ९ चा समेट झाला—ज्याचा उल्लेख राष्ट्रसभा—अध्यक्षांनीं आपल्या पत्रकांत केला आहे. हा पहिला 'संभाविताचा करार' (Gentleman's Agreement) होय. राष्ट्रसभा-अध्यक्ष जर कोठें चूक करीत असतील तर, ता. १५ ला त्या करारांतून बाहेर पडण्याचा डॉ. खऱ्यांनीं प्रयत्न केला हा आरोप ते डॉ. खऱ्यांवर करीत आहेत. त्यापूर्वीं पुष्कळच अगोदर, तडजोड करणाऱ्यांपैकींच आमच्या एका सहकाऱ्यानें मला स्पष्ट सांगितलें होतें कीं, हा करार पाळला जाणार नाहीं. तसें करतांना त्यानें जी भाषा वापरली ती महाकोशलस्थ गृहस्थांना भलेपणा देणारी नव्हती.

**महाकोशलस्थांनीं करार मोडला**

याचें कारण त्यानें असें सांगितलें कीं, वरिष्ठ व्यक्तींकडून त्यांना आतां पाठिंबा मिळालेला आहे. ज्याला पाठिंबा मिळाला होता ती व्यक्ति डॉ. खरे ही नव्हती; व ही बातमी मला १५ तारखेपूर्वींच—ज्या तारखेला डॉ. खऱ्यांनीं समेटांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला असें राष्ट्रसभाअध्यक्ष म्हणतात—मिळाली

होती, एवढें मी सांगितलें म्हणजे पुरें. राष्ट्रसभाअध्यक्षांना याची प्रत्यक्ष माहिती नाहीं, ही गोष्टही मी त्याच व्यक्तींच्या पुराव्याच्या आधारावर म्हणतों. आणि म्हणून राष्ट्रसभाअध्यक्षांच्या या विधानाचें मला साहजिकच फार आश्चर्य वाटलें. ज्या लोकांनीं हा पहिला करार मोडला त्याच लोकांनीं दुसऱ्या एका काल्पित कराराचा आधार घ्यावा, आणि ते चौक़शीला निर्मळ असे सादर झाले असा त्यांच्याबद्दल निर्वाळा दिला जावा व त्यांना तसें मिरवावयास मिळावें, ही दुर्दैवी घटना होय. जबाबदार लोकांच्या न्याय्यप्रियतेला हें भूषणावह ठरत नाहीं.

### विषाचें बीज पक्षांत रुजविलें

हें भांडण पक्षांकडे सोपविण्यांत आलें याबद्दल मी असंतुष्ट होतों, म्हणतात. होय, मी असंतुष्ट होतों; आणि ही असंतुष्टता मी समक्षच व्यक्त केली हेही जर अध्यक्ष जाहीर करते तर तें न्यायाचें झालें असतें. वरिष्ठ न्यायालयानें आपल्यावरील जबाबदारी टाळली, व या घटनांच्या बुडाशीं जो दुष्ट हेतु होता त्या दुष्टाव्यांपासून त्यावेळीं अलिप्त असलेल्या पक्षांत ते विष पसरविलें जात आहे असें मला वाटलें; व म्हणून मी त्या निकालावर असंतुष्ट होतों. हा निर्णय किती कोता होता हें मागाहून घडलेल्या घटनांनीं सिद्ध झालेंच आहे.

### बनावट करारार्चे कारस्थान

अध्यक्षांनीं आपल्या पत्रकांत पचमढीच्या कराराच्या म्हणून ज्या क्रमवार अटी दिल्या आहेत, त्याचें मला सगळ्यांत अधिक आश्चर्य वाटतें. तो करार पांढऱ्यावर काळ्यांत कोणी उतरविला होता ? त्यावर कोणाच्या सह्या आहेत ? पक्षाच्या सभेला जो करार वाचून दाखविला त्यावर जशा मंत्र्यांच्या सह्या आहेत, तशा या करारावर मंत्र्यांच्या सह्या आहेत काय ? या प्रश्नांचें उत्तर मिळावें म्हणून मीं आपलें डोकें खूप खाजविलें. हा करार झाला होता असा, ह्या कलमावर अटी प्रसिद्ध करून, समज करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे; पण असा करार झाल्याचें मला मुळींच आठवत नाहीं. आणि हा करार जर मुळीं बनावटच आहे तर त्याला शिष्टांचा करार म्हणणें हें निर्बुद्धपणाचें ठरतें. आणि जर तो लेखीच करार झाला आहे तर त्याला शिष्टांच्या आणाभाका तरी कां म्हणून म्हणतां ?

**खरा करार कोणी मोडला?**

पचमढीला जर कांहीं झालेंच असेल, तर एकोप्यानें व परस्पर सद्बुद्धीनें काम करावें हा करार झाला होता; व तो प्रसिद्धही केला होता. तो करार होण्यापूर्वी अनेकदां चर्चा झाली होती; व तींत या सर्व मुद्यांचा खलही झाला होता. पण तेवढ्यावरून, ज्या स्वरूपांत ही चर्चा मांडली जात आहे त्याप्रमाणें ठरलें होतें, किंवा त्यांत कांहींच फेरबदल होण्यासारखा नव्हता, किंवा त्याला मागाहून देण्यांत येत आहे तसें स्पष्ट कराराचें स्वरूप होतें, अथवा एकमेकांच्या सोयीप्रमाणें त्यांत पुढें कांहींच फरक करतां येण्यासारखा नव्हता, असें जर म्हणणें असेल तर तें, मला मोठ्या नाइलाजानें जाहीर करावें लागत आहे कीं, साफ खोटें आहें.

सहभावानें व सद्बुद्धीनें मिळून काम करण्याबद्दल जो करार झाला, तो घडविण्यास या चर्चा पूरक अशा होत्या; व मुख्य हेतूला बाध न आणतां, उभयतांनीं ज्या कांहीं शर्ती घातल्या होत्या त्या पाळून व त्यांत जरूर तो फेरफार करून, त्या चर्चेतील बाबी कृतींत उतरावयाच्या होत्या. आणि, माझी अशी पक्की खात्री आहे कीं, जर सद्धेतूचा इसारा म्हणून तो गळफांस (death-pact) थोडा सैल केला असता, व मंत्रीमंडळाच्या जीवनांत थोडें स्वतंत्र वातावरण खेळूं दिलें असतें, तर तडजोड होणें मुळींच अशक्य नव्हतें.

**डॉ. खऱ्यांनीं करार पाळला**

अध्यक्षांनीं आपल्या ज्या शर्तींचा उल्लेख केलेला नाहीं, त्या शर्ती दोन प्रकारच्या होत्या. डॉ. खरे यांच्या अटी अशा होत्या कीं, (१) त्यांची जर जनतेंत मानहानि होत असेल, तर ते मुख्य प्रधान राहूं शकणार नाहींत; (२) जर संचालनाच्या सर्व अटी सर्वजण आपआपलीं खातीं सोडून देण्यास तयार असतील तर आपलींही सर्व खातीं सोडण्यास ते तयार होते; आणि (३) खात्यांच्या फेरवाटणींत त्यांचें म्हणणें सर्वांनी ऐकावें. त्यावेळीं आम्हां सर्वांना हें ठाऊक होतें कीं, खरे यांना 'लॉ अँड ऑर्डर' या खात्याची कांहीं मोठी हांव नव्हती. प्रथम ता. २९ जूनला, व पुन्हां ता. १२ जुलैला आपलीं सर्व

खातीं सोडण्याची तयारी दर्शवून डॉ. खऱ्यांनीं तो करार पाळला, असें माझें मत आहे. मिश्रांची—श्री. मिश्रांची—

ना. अध्यक्ष—ना. पं. मिश्र ?

श्री. देशमुख—हो, ना. पं. मिश्रांची अशी अट होती कीं, वृत्तपत्रांत याबद्दल कांहींहीं आलें तरी आपण आपली वृत्ति बदलतां कामा नये. या अटीला मागाहून जें महत्व आलें तें तेवढें येईल, किंवा ना. मिश्रांच्या मनांत त्यावेळीं त्याला तेवढें महत्व होतें, असें मानावयास मी त्यार नाहीं.

**हा दुष्टपणा कोणाचा ?**

मंत्रीमंडळांतील या पत्रव्यवहाराला मागाहून वृत्तपत्रांत प्रसिद्धी मिळाली. ज्या गृहस्थानें तो प्रसिद्ध केला त्यानें प्रांताचें फार मोठें नुकसान केलें, असें माझें मत आहे. या सर्व प्रकरणांत हें प्रसिद्धीकरण अत्यंत दुष्टपणाचें होतें; कारण त्यामुळें कोणालाही गुपचुप माघार घेणें सर्वस्वी अशक्य होऊन बसलें. श्री. मिश्रा यांच्या पचमढीच्या शर्ती लक्षांत घेतां, सदिच्छापूर्ण व्यवहाराला धरून तें प्रसिद्धीकरण खात्रीनें ठरत नाहीं. सर्व मंत्र्यांनीं ज्या सद्भावनेची हमी दिली होती, ती जर सर्वांनीं पाळली असती, तर समेट अमलांत येणें अशक्य नव्हतें; पण ही सद्भावना दाखविली गेली नाही; आणि ज्याचें 'महाराष्ट्रीय गट' असें वर्णन करण्यांत येत आहे त्या गटावर तर त्याची जबाबदारी मुळींच नव्हती.

**महाकोशल गटाचा दुर्योधनी हट्ट**

श्री. अणे यांच्या सल्ल्यानें, नंतर मी—सद्भावाचें निदर्शक म्हणून, तीं खातीं मला हवी होती म्हणून नव्हे—जर त्याला सर्वांची मान्यता मिळत असेल तर, तीं स्फोटक खातीं स्वतःकडे घेण्याची तयारी दर्शविली. स्वतःचें डोकें उखळांत घालून कांडून घेण्याला यापेक्षां अधिक कांहीं करण्याची माझी तयारी नव्हती. मी ही सूचना प्रथम महाकोशल गटापुढें ठेविली; व त्याला-जर तो राजी होत असेल तर ती डॉ. खऱ्यांपुढें ठेवून त्याला त्यांची मान्यता मिळविण्याची तयारीहि दर्शविली. जयापजयाची भावना जर कोणाच्याही मनांत राहिली तर मंत्रीमंडळाचें कार्यच अशक्य होऊन बसेल; आणि जर त्या पत्रव्यवहाराच्या प्रसिद्धीकरणानंतर पोलीस खातें महाकोशल गटाकडे जाईल

तर, त्याचा अर्थ डॉ. खऱ्यांचा पराजय झाला, त्यांची मानहानि झाली व विरूद्ध गटाचा विजय झाला, असा केला जाईल; मानहानि झालेला गृहस्थ मुख्य प्रधान राहण्यापासून कांहींच फायदा उरणार नाहीं; मंत्री या नात्यानें आपण आपली आब राखणें हें तर आपलें कर्तव्य आहेच, पण सर्व राज्यकारभाराचा प्रमुख या नात्यानें मुख्य प्रधानाची आब राखणें हेंही आपलें कर्तव्य आहे—या सर्व गोष्टी मी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. पण, हा साधा व्यवहार, अव्यवहार ठरला; व ही सल्ला झिडकारली गेली हें सांगावयासच नको ! आणि त्यामुळें, ता. १२ व १३ जुलैच्या सर्व वाटाघाटींचा फज्जा उडाला !!

**मेलेल्या मंत्रीमंडळाची उत्तरक्रिया**

या मंत्रीमंडळांत किमान सद्भावहि उरलेला नाहीं, तें मंत्रीमंडळ म्हणजे एक मढेंच होय, असा नंतर मी निःशंकपणें निष्कर्ष काढला. त्याला वांचविण्याचा दवा असूनही तो देतां येत नाहीं हें पाहून मी त्रासलों. एक निष्ठावंत हिंदु या नात्यानें त्याची उत्तरक्रिया करणें एवढेंच नंतर माझें कर्तव्य उरत होतें. घटनात्मक रीतिरिवाज, व संयुक्त जबाबदारीच्या तत्वानुसार मुख्य प्रधानाचें ऐकणें याबद्दलच्या माझ्या समजुतीस अनुसरून मी नंतर ता. १३ जुलैला माझा राजीनामा मुख्य प्रधानाला सादर केला. एकाच अर्ध्या डझन लोकांची मालकी कबूल करणें हें माझें कर्तव्य आहे, असें समजण्यास मी तयार नव्हतों. शिपाई या नात्यानें मी एक शिस्त व एकच हुकूम पाळूं शकतों; या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही गोष्ट मी शिस्तीला घातुक समजतों. राष्ट्रसभा-अध्यक्षांनीं मागाहून म्हटल्याप्रमाणें जर हें युद्ध असेल तर शिपायानें अमुक एकाचेच हुकूम मानले पाहिजेत; अनिश्चित असे बहुविध हुकूम त्याला दिले जाणार नाहींत, याची काळजी घेणें विशेषच जरूर ठरतें.

**शिस्तीचे अजब नवे नियम**

युद्धकाळीं आपल्या सेनापतीशीं हुज्जत घालणें, किंवा त्याला हुकूम सोडणें हें माझें काम नव्हे. त्यानंतर, व्यवहाराचे नवे नियम——आणि तेहि बऱ्याच बाबतींत अभिनव असे—जारी करण्यांत आले आहेत, हें मला माहीत आहे. यापुढें तेच नियम पाळले पाहिजेत हें एकवेळ आपण कबूल करूं.

मला उमेद आहे कीं, हे नवे नियम रद्द तरी केले जातील किंवा ते मृतवत् राहतील; परंतु त्यांच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं, पण आज कोणतेही नवे नियम जारी केले तरी ते मागील व्यवहाराला लावतां येत नाहींत. हायकमांडच्या मनांत काय असेल हें शिपायानें, मंत्र्यांनें किंवा मुख्य प्रधानानें ओळखलें पाहिजे अशी अपेक्षा करणें वेडेपणाचें आहे. जेव्हां मुख्य प्रधानांनीं मला ता. १९ जुलैला पुन्हां राजीनामा मागितला तेव्हां, शिस्तीच्या माझ्या एकूण मनांना धरून, तो देण्यास मला कसलाच संकोच वाटला नाहीं.

**स बाबूंची निराधार विधानें**

राष्ट्रसभा-अध्यक्षांच्या पत्रकांतील जर कोणत्या एका विधानाचें मला अत्यंत वाईट वाटत असेल तर ते याचें कीं, मी राजेंद्रबाबूंचा आदेश ऐकला नाहीं. त्या हुकुमाची इष्टानिष्टता बाजूला ठेविली, तरी ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, त्यांचा तो हुकूम मला ता. २१ रोजीं रात्रीं १२ वाजून ३५ मिनिटांनीं मिळाला (हंशा) आणि त्यावेळीं तर मला माझा राजीनामा मंजूर झाला असल्याचेंही कळलेलें होतें, तेव्हां जो राजीनामा मंजूर झाला होता तो परत घेणें अशक्यच होतें. त्यावरून (राष्ट्रसभा-अध्यक्षांच्या पत्रांतील) कांहीं विधानें कशी चुकीचीं, अन्याय्य आणि अविवेकपूर्ण आहेत एवढेंच दिसून येतें. याचा अर्थ एवढाच कीं, वर्किंग कमिटीला ज्यांनीं माहिती दिली त्यांच हें करणें–शिष्टाचार पाळून वर्णन करणें अशक्य आहे. माहिती देणाराचें आश्चर्य वाटण्याऐवजीं, ज्या वर्किंग कमिटीनें ही सारी निव्वळ खोट्याची घाण गिळली तिचेंच आश्चर्य वाटतें!

**बंडावर शिस्तीचें पांघरूण**

या (राजेंद्रांच्या) सूचना पाळल्याबद्दल महाकोशल मंत्र्यांची पाठ थोपटण्यांत आली आहे! राजेंद्रांची–वरिष्ठांची आज्ञा झाली, म्हणून या गृहस्थांनीं बंडखोरी केली, असा लोकांचा वृथा समज करून देण्याच्या या प्रयत्नाकडे मी जनतेचें मुद्दाम लक्ष वेधूं इच्छितों. खुद्द अध्यक्षांच्या पत्रकांतच याचा पुरावा आहे. या सद्‌गृहस्थांनीं प्रथम बंड केलें; आणि नंतर जड जातें असें दिसून आल्यावर ते आसरा शोधूं लागले, व त्यांना तो आसरा वर्ध्यास

मिळाले. राजेंद्रांची आज्ञा हातीं पडण्यापूर्वी, कमींत कमी १२ तास अगोदर, त्यांनीं बंड केलें होतें. बंडाची (Revolt) गति नेहमींच विचित्र असते. तें जर फसलें तर तो दंगा (riot) ठरतो; आणि यशस्वी झालें तर क्रांति ठरते!

डॉ. राव–दंगा फसला कीं तें बंड (mutiny) ठरतें!

श्री. देशमुख–मी माझा स्वतःचा भाषाप्रयोग वापरणार आहे. (हंशा) महाकोशलस्थांनीं दंगा केला, आणि त्यांच्या सुदैवानें ती अखेर क्रांति ठरली; व त्यांना निवाऱ्याचा आसरा मिळाला. बंडखोरीला जर, या सदगृहस्थां मिळाला तसा, वरिष्ठांचा पाठिंबा मिळाला तर तो गुन्हा ठरत नाहीं, आणि अशा पाठिंब्याच्या अभावीं शिस्तीचे देव्हारे माजविण्यांतही कांहीं राम उरत नाहीं! या प्रांतांतील या घटनांपासून हा धडा शिकण्यासारखा आहे.

**डॉ. खऱ्यांना कां साथ दिली ?**

डॉ. खरे यांच्या दुसऱ्या मंत्रीमंडळांत सामील होण्यास मी कां तयार झालों, हें सांगितल्याखेरीज माझा हा खुलासा संपूर्ण होणार नाहीं. डॉ. खरे हे गव्हर्नरला किंवा प्रतिपक्षी यांना मिळाले आहेत अशी जर माझी खात्री पटती, किंवा डॉ. खरे यांच्याकडे दोष येतो किंवा ते बेशिस्तीनें वागत आहेत, अथवा महाकोशल मंत्र्यांपेक्षां ते पक्षाचे अधिक अहित करीत आहेत असें मला वाटलें असतें तर मी त्यांना कधींच साथ दिली नसती. कॉंग्रेस–श्रेष्ठींनीं या प्रश्नाबाबद खात्री न पटण्यासारखा भाराभर पत्रव्यवहार जो प्रसिद्ध केला आहे तो पाहूनही मला माझें मत बदलण्याचें किंवा स्वीकृत धोरणाबद्दल पश्चाताप वाटण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं.

**हाय कमांडची नालायकी**

आमच्यावर देखरेख करावयास एकादें डिरेक्टोरेट असेल; पण डॉ. खरे हे आमचे मॅनेजर होते; त्यांना जर असें दिसून येईल कीं, त्यांच्या हाताखालील दुय्यम मॅनेजर हे पक्षांत बंडाळीला उत्तेजन देत आहेत, तर त्यांना बडतर्फ करून वरिष्ठांना आपल्या कारवाईचा रिपोर्ट मान्यतेसाठीं सादर करणें हे त्यांचे कर्तव्य ठरतें. जो असें करणार नाहीं तो मॅनेजर नादान ठरेल; व जो मालक त्या हुद्यावर मान्यतेचा शिक्का देणार नाहीं तो गाढव ठरेल. आणि, डॉ. खऱ्यांच्या